श्रीसयाजी-साहित्यमाला पुष्प २४० वें.

जगांतील विद्यमान धर्म

(ऐतिहासिक व तौलनिक समीक्षा)

अनुवादक

रा. ब. आठवले, एम्. ए.

प्रो. रॉबर्ट अर्नेस्ट ह्यूम, पी एच्. डी.

अमेरिकेंतील युनियन थिऑलॉजिकल सेमिनरी यांतील 'हिस्ट्री ऑफ रिलिजन्स' या विषयाचे प्रोफेसर यांनीं लिहिलेल्या

"THE WORLD'S LIVING RELIGIONS."

या पुस्तकाचा मराठी अनुवाद

सन १९३५

किंमत २ रुपये

आवृत्ति १ ली
प्रती १०००

सन १९३५
किं. २ रुपये.

प्रकाशक
दामोदर सांवळाराम आणि मंडळी, मुंबई.
३८० ठाकुरद्वार, मुंबई नं. २

मुद्रक,
नरहरी माधवराव यंदे,
३८० ठाकुरद्वार, इंदुप्रकाश प्रेस, मुंबई नं. २

श्री.

विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी श्रीमंत सरकार महाराज-साहेब सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस्. आय., जी. सी. आय. ई., एल्एल्. डी. यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्री सयाजी साहित्यमालें"तून विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार "**जगांतील विद्यमान धर्म**" या नांवाचा ग्रंथ रा. रा. रा. ब. आठवले, एम्. ए.; यांजकडून तयार करविला. तो उक्त मालेंतील २४० वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा, प्राच्यविद्यामंदिर बडोदें. २०—१०—३५	मं. र. मजमुदार भा. मदतनीस	भा. का. भाटे विद्याधिकारी राज्य बडोदें.

भाषांतरकाराची प्रस्तावना.

सुप्रसिद्ध अमेरिकन पंडित प्रो. ह्यूम ह्यांच्या "The world's living religions" या तुलनात्मक धर्मशास्त्रावरील पुस्तकाचें मराठी भाषांतर वाचकांपुढें ठेवतांना आम्हाला आनंद वाटत आहे.

स्वकीय साहित्याची सेवा करण्याचे मार्ग दोन. पहिला, कोणता तरी स्वतंत्र ग्रंथ लिहून त्या योगानें स्वत:चें साहित्य समृद्ध करणें हा; व परकीय समृद्ध साहित्यांतील आदर्शग्रंथांचीं स्वभाषेंत भाषांतरें करून स्वसाहित्यांत उच्चविचारांची अथवा उपयुक्त माहितीची भर टाकणें हा दुसरा. ह्यापैकीं पहिला मार्ग सर्वतोपरी श्रेष्ठ ह्यांत शंकाच नाहीं. स्वतंत्रग्रंथनिर्मिति हें त्या त्या राष्ट्रांतील लोकांच्या विद्याविकासाचें निरपवाद गमकच होय. विद्वत्तेच्या अथवा जिवंत अनुभवाच्या प्रांतांत अमुक एका राष्ट्रानें इतका पल्ला गांठला आहे हें त्या राष्ट्रांतील स्वतंत्र ग्रंथांच्या परीक्षणावरून अचूकपणें सांगतां येतें. कारण स्वतंत्र ग्रंथांची निर्मिति करायला राष्ट्राला एकतर पूर्वगामी विचार अथवा माहिती आत्मसात् करावी लागते, अथवा त्या राष्ट्राला अनेक रोमहर्षण प्रसंगांतून जिवंत अनुभव घेत बाहेर पडावें लागतें. अशा तऱ्हेचे रोमहर्षण प्रसंग घडत असता त्या योगानें ज्या राष्ट्राला स्वतंत्रग्रंथनिर्मिति करण्याची स्फूर्ति होते तें राष्ट्र खरोखर धन्य होय. पण असे प्रसंग प्रत्येक राष्ट्राच्या वांट्याला येणें ही गोष्ट दुर्लभ आहे. तेव्हां पूर्वगामी विचारसंपत्ति व उपयुक्त माहिती, प्राचीन व अर्वाचीन अभिजात साहित्यांतून घेऊन, व ती आत्मसात् करून, त्यांतून

स्वतंत्रग्रंथनिर्मिति करणें हाच स्वतंत्र ग्रंथनिर्माणाचा सोपा मार्ग आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि या सोप्या मार्गाचा अवलंब करून आमच्या साहित्यांतील भावी ग्रंथकारांनीं स्वतंत्र ग्रंथ रचावे ह्याच उद्देशानें आम्ही इंग्रेजी भाषेंतील एका अभिजात ग्रंथाचें प्रस्तुत भाषांतर केलें आहे.

परकीय भाषेंतील विचारांचें अथवा माहितीचें भंडार स्वभाषेंत आणण्याचा प्रयत्न करणें या प्रकारांतून साहजिकच एक ध्वनि असा निघतो कीं अशा तऱ्हेच्या विचारांचा अथवा माहितीचा आपल्याकडील साहित्यांत अभाव आहे. पुष्कळ लोक भाषांतर करतांना अथवा वाचतांना थोडेसें कचरतात याचें आंतलें कारण हें कीं भाषांतर करणें अथवा वाचणें ह्मणजे स्वतःच्या साहित्यांतील वैगुण्याची स्वमुखानें कबुली देणेंच होय असें या लोकांना वाटतें. आणि म्हणूनच ही कबुली प्रांजळपणानें देतांना बहुतेकांचे जिवावर येतें हें सांगायला नकोच. " सर्वः कान्तमात्मीयं पश्यति " (स्वतःचें तेवढें चांगलेंच वाटायचें) हा सर्वांचाच अनुभव असल्यानें आपल्या साहित्यांतील हा कमीपणा पदरांत घ्यायला सहसा कोणी तयार होत नाहीं. तथापि मनाला कडु वाटलें तरी सत्य बोलल्याशिवाय सुटकाच नाहीं म्हणून आम्हालाही प्रस्तुत भाषांतर करतांना मोठ्या कष्टानें हें कबूल करणें भाग आहे कीं, खरोखरीच प्रस्तुत ग्रंथासारखा ग्रंथ अजून आपल्या भाषेंत झाला नाहीं. आणि खरोखरीच ह्या ग्रंथांचे कर्ते ह्यूमसाहेब यांनीं या ग्रंथाच्या निर्मितीकरतां जे दीर्घ परिश्रम घेतले आहेत ते लक्षांत घेतां स्थूलदृष्टि वाचकालाही हा ग्रंथ ' न सामान्य ' असा

आहे, असें म्हणणें भाग पडेल. प्रस्तुत ग्रंथकार ह्यूमसाहेब यांनीं आपल्या ग्रंथाच्या चौदाव्या मुद्रणाला जी प्रस्तावना जोडली आहे त्यावरून आदर्श स्वतंत्र ग्रंथ लिहितांना सरस्वतीच्या उपासकाला किती व्यासंग करावा लागतो याची चांगलीच कल्पना येते. हातीं घेतलेल्या विशाल विषयावर शेंकडों पुस्तकें मननपूर्वक वाचणें ह्या बाबतींत तर ह्यूमसाहेबांचे परिश्रम वाखा- णण्यासारखे आहेतच, पण जगांतील विद्यमान धर्मांविषयीं आपण जें लिहितों तें संपूर्ण प्रामाणिक असलें पाहिजे या सद्धेतूनें प्रेरित होऊन ह्यूमसाहेबांनीं त्या त्या धर्मांतील शास्त्रीपंडितांशीं प्रत्यक्ष परिचय करून घेण्याकरतां व तद्द्वारा धर्मरहस्य जाणण्या- करतां म्हणून जें विस्तृत पर्यटन केलें त्याबद्दलही त्यांचें कौतुक केलें पाहिजे. धर्मांचा तुलनात्मक अभ्यास जातिवंत पंडितांचे हातूनच होण्यासारखा आहे. तें कांहीं ‘ येरा गबाळाचें काम नोहे ’ ही गोष्ट ह्यूमसाहेबांच्या प्रस्तुत प्रस्तावनेवरून स्पष्ट प्रत्ययास येते. सदरहु प्रस्तावना अभ्यासी वाचकांना मार्गदर्शक होईल असें वाटल्यानें तिचाही मराठी अनुवाद आम्ही पुढें भाषांतराचे आरंभीं दिला आहे.

हा ग्रंथ विद्यमान धर्मांविषयींच्या अनेकविध माहितीचें एक भांडागारच आहे. सामान्य वाचकांना या गोष्टीचा प्रत्यय हा ग्रंथ वाचीत असतां पदोपदीं येतोच; पण तुलनात्मक धर्म- शास्त्राच्या अभ्यासकाला ही याच्यांतील कित्येक प्रकरणांत आलेली माहिती अपूर्व व मनोरंजक वाटेल यांत मुळींच शंका नाहीं. प्रस्तुत अनुवादकालाही ह्या पुस्तकाच्या परिशीलनानें विद्यमान धर्मांतील अनेक बारीकसारीक गोष्टींचें नव्यानेंच ज्ञान झालें ही गोष्ट तो मोकळ्या मनानें कबूल करीत आहे.

ह्या ग्रंथाच्या रचनेंतील पद्धतशीरपणा तर सर्वथैव प्रशंसनीय आहे. एक एक विद्यमान धर्म घेऊन ग्रंथकारानें प्रथम त्याचें, इतर धर्मांशीं तुलना करून काल व संख्या या दृष्टीनें, स्थान निश्चित केलें आहे. यानंतर त्या धर्मांतील प्रमाणग्रंथाविषयीं त्यानें थोडक्यांत माहिती दिली आहे. यापुढें त्या त्या धर्मांतील विविध अंगांचें थोडक्यांत विवरण आलें आहे. मग त्या धर्मांतील तत्वज्ञान व त्याचें इतर धर्मांहून वैशिष्ट्य याविषयीं ग्रंथकारानें मननीय विवेचन केलें आहे. इतकें झाल्यावर, त्या त्या धर्मांतील विशिष्ट आचारांचें त्यानें वर्णन केलें आहे, व त्या धर्माचें प्रचलित स्वरूप काय आहे याचा थोडक्यांत निर्देश केला आहे. आणि शेवटीं त्या धर्मांतील ठळक गुण व अवगुण यांचा त्यानें क्रमशः उल्लेख केला आहे. या गुणावगुणांची यादी देत असतां ग्रंथकाराचें स्वतःचें त्या धर्माविषयींचें मत आलें असल्यानें त्या बाबतींत वाचकांचा ग्रंथकाराशीं मतभेद होण्याचा जरी संभव असला, तरी ग्रंथकाराच्या एकंदर लेखनपद्धतीविषयीं कोणाचाहि मतभेद होण्याचा संभव नाहीं.

अनेक विद्यमान धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करतांना अभ्यासकाची दृष्टि अत्यंत निःपक्षपाती व पूर्वग्रहांनीं सर्वथैव अदूषित अशी असली पाहिजे. आणि आनंदाची गोष्ट ही कीं, ह्या पुस्तकांत बहुतेक स्थळीं अशी निरपवाद दृष्टि बाळगण्याचा ग्रंथकारानें मनःपूर्वक प्रयत्न केला आहे. तथापि इतकेंही करून प्रो. ह्यूमसाहेबांचा एकदोन ठिकाणीं न कळत तोल सुटला आहे. उदाहरणार्थ, तेराव्या प्रकरणांत इतर धर्मांहून ख्रिस्तीधर्माचें श्रेष्ठत्व प्रतिपादन करण्याच्या भरांत ह्यूमसाहेब आपल्या न्यायाधी-

शाच्या भूमिकेवरून बरेच घसरलेले दिसतात. परमेश्वराला ‘ पिता ’ हें अभिधान (विशेषतः स्वर्गीय पिता हें अभिधान) लावण्यांत ख्रिस्तीधर्मानें जितकें औचित्य दाखविलें आहे तितकें दुसऱ्या कोणत्याही धर्मानें दाखविलें नाहीं असें त्यांनीं या प्रकरणांत लिहिलें, इतक्यांत ऋग्वेदांत परमेश्वराविषयीं “ द्यौःपिता ” (स्वर्गीय पिता) असें विशेषण योजलेलें त्यांना आठवलें. पण या उल्लेखानें ख्रिस्तीधर्माचें अपूर्व श्रेष्ठत्व कमी होईल कीं काय अशी त्यांना भीति वाटल्यासारखी दिसते, कारण यापुढें एखाद्या मिशनऱ्याला साजेलशा विकारवशतेनें ते म्हणतात “ परंतु पित्यांतील प्रेमळ पिता अशी ही हिंदूंची देवता जो इंद्र तो इतरत्र ऋग्वेदांत ‘ बडबड्या, दारुड्या व बेगुमान ’ असल्याचें वर्णन आलें आहे. ”

या ऋग्वेदांतील उताऱ्याचा बरोबर अर्थ ह्यूमसाहेबांना समजला नसावा अशी आमची कल्पना आहे. ह्या ऋचेंत ब्रह्मानंदानें मस्त झालेल्या आत्म्याचें, सोमरसानें तर्र झालेल्या मनुष्यासारखें, वर्णन जें केलें आहे तें केवळ लाक्षणिक आहे; व ही गोष्ट ऋग्वेदाचा सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या कोणाही पौर्वात्य पंडितानें ह्यूमसाहेबांना खात्रीनें समजावून दिली असती. असें असतां ऋग्वेदांतील इन्द्र ही देवता दारुडी असल्याचें खुद्द ऋग्वेदांतच वर्णन आहे असें म्हणणें म्हणजे विकृत दृष्टीचा एक खासा नमुनाच होय. त्याचप्रमाणें, इन्द्राचें क्रूरत्व व पापिष्ठत्व सिद्ध करण्याकरितां ह्यूमसाहेबांनीं कौषीतकी उपनिषदांतील एका लांबलचक फक्किकेचें भाषांतर उद्धृत केलें आहे. त्यांतही त्यांचें हिंदुधर्मरहस्याविषयींचें अज्ञान व विकृतदृष्टि हीं दिसून

येतात. उपनिषदांच्या प्रत्येक आस्थेवाईक अभ्यासकाला ही गोष्ट पूर्णपणें माहित आहे कीं, प्रस्तुत कौषीतकीमधील उताऱ्यांत इंद्रानें आपल्या ब्रम्हनिष्ठतेचें व त्यामुळें लाभणाऱ्या 'कर्मबंध-नाशाचें' उत्कृष्ट वर्णन केलें आहे. गीतेंतील "हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते" ही प्रसिद्ध ओळ व त्यांतील श्रेष्ठ तत्त्वज्ञान वरील कौषीतकी मंत्रावरच अधिष्ठित आहे ही गोष्ट मार्मिक वाचकांना सांगावयास नकोच. अशी वस्तुस्थिति असतां वरील कौषीतकीमंत्राचा उत्तानार्थं घेऊन त्यावरून इन्द्राला क्रूर व पापी ठरविण्याचें ह्यूमसाहेबांनीं जें साहस केलें आहे तें त्यांच्या एरव्हींच्या समतोल वृत्तीला साजेसें नाहीं. वाक्यांचा अर्थ करतांना अनेक वेळीं लक्षणावृत्तीचा आश्रय करावा लागतो ही गोष्ट प्रसिद्धच आहे; असें असतां खिस्तीधर्माचें श्रेष्ठत्व ठरविण्याच्या अभिनिवेशाला बळी पडून ह्यूमसाहेबांनीं वरील उपनिषद्वाक्यांच्या उत्तानार्थावरून जो विपर्यस्त सिद्धान्त ठोकला आहे त्यावरून तुलनात्मक धर्मशास्त्राच्या अभ्यासकाला परकीय धर्माविषयीं बोलायचें असतां किती जपून बोललें पाहिजे तें वाचकांच्या चांगलें ध्यानांत येईल. ब्रम्हज्ञानाचें स्पष्ट प्रकरण असतांना अशा तऱ्हेचा अर्थ करणाऱ्या ह्यूमसाहेबांनीं मुख्य तेरा उपनिषदांचें इंग्रेजींत भाषांतर केलें आहे म्हणे ! वरील प्रसंगावरून त्यांच्या भाषांतराच्या प्रामाणिकपणाबद्दल कोणा वाचकाला शंका आल्यास तो त्या वाचकाचा दोष खास म्हणतां येणार नाहीं.

पण येवढें कबूल करणें भाग आहे कीं, अशा रीतीनें स्वतःची समतोलवृत्ति प्रो. ह्यूमसाहेबांनीं इतर ठिकाणीं फारशी

सोडलेली दिसत नाहीं. इतकेंच नव्हे तर 'धर्म व त्याची विविध स्वरूपें' या पहिल्या प्रकरणांत (पान १७) "आमचाच धर्म सर्व धर्मांत श्रेष्ठ" असें उघड उघड म्हणणाऱ्या कांहीं वावदूकांचा ह्यूमसाहेबांनी प्रच्छन्न उपहास केला आहे, त्यावरून त्यांची उदार दृष्टि व्यक्त होते; व तुलनात्मक धर्मशास्त्राचा अभ्यास करण्याचे बाबतींत ते एक अधिकारी पुरुष आहेत याबद्दल शंका वाटत नाहीं.

धर्मांचा तुलनात्मक अभ्यास मनोरंजक तर आहेच, पण अनेक दृष्टींनीं उपयुक्तही आहे. आपल्या धर्माहून इतर अनेक धर्मांचा विविध दृष्टींनीं अभ्यास करीत असतां अभ्यासकाला फार मौज वाटतें. प्रत्येक धर्मांतील आचार, तो धर्म जेथें नांदत आहे त्या देशाच्या भौगोलिक व इतर परिस्थितीवर, किती अवलंबून आहे हें धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करणाराला बरोबर समजतें. एका टोंकाला इंग्लंडमधील धार्मिक उत्सव आणि सण, व दुसऱ्या टोंकाला जपानी लोकांच्या शिंटो धर्मांतील धार्मिक उत्सव आणि सण यांत जें बाह्यतः बरेचसें अंतर दिसतें त्याचें कारण कित्येकदां बाह्य परिस्थितीच आहे ही गोष्ट धर्मांच्या अभ्यासकाला तेव्हांच पटते. भौगोलिक परिस्थितीप्रमाणें ऐतिहासिक परिस्थितिही प्रत्येक धर्मांतील आचार, तत्त्वज्ञान व त्या त्या धर्मांतील देवतांचें स्वरूप, या सर्वांत विविधता आणण्यास कशी कारण होते हें अभ्यासपूर्वक अवलोकन करणें फार मनोरंजक आहे. ज्यू लोकांच्या देवतेचें स्वरूप क्रूर व दयार्द्र अशा संमिश्रित स्वरूपाचें कां; महंमदीय धर्म परधर्मीयांविषयीं इतका असहिष्णु कां, व "नास्तिक व ढोंगी यांच्याशीं निकरानें लढा, त्यांच्याशीं कठो-

रपणानें वागा." (जगांतील विद्यमान धर्म पृष्ठ २७५ पहा) अशा रीतीच्या आज्ञा त्या धर्मांत कां सांपडतात, याचें कारणही त्या त्या धर्मभूमीच्या भौगोलिक, ऐतिहासिक व सामाजिक परिस्थितींत आढळून येते.

पण धर्मांच्या अभ्यासकाचें या प्रकारच्या अभ्यासानें केवळ मनोरंजन होतें असें नसून त्यामुळें त्याला अनेकविध लाभही होतात. सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करणाराला प्रथम लाभ हा होतो कीं, त्याला समतोलपणाची वृत्ति प्राप्त होते. 'आमचाच धर्म काय तो श्रेष्ठ व इतर सर्व धर्म एकजात गचाळ व दोषांनीं भरलेले ' ही संकुचित व वृथाभिमानाची दृष्टि धर्मांच्या अभ्यासकाला कधींही बाधूं शकत नाहीं. दोष असण्याचा संभव असेल तर सर्व धर्मांत ते जवळ जवळ सारख्याच प्रमाणांत आढळतील; गुण असतील तर माझ्या धर्माप्रमाणें इतर धर्मांतही ते असणें शक्य आहे अशी समतोलपणाची नवी दृष्टि अभ्यासकाला प्राप्त होते. व ही दृष्टि एकदां प्राप्त झाली कीं जातीजातींत अथवा धर्माधर्मांत वैमनस्य अथवा झगडा उभा करण्याचें पाप अशा अभ्यासकाचे हातून कदापि घडणें शक्य नाहीं हें उघडच आहे.

अभ्यासकाला दुसरा लाभ हा होतो कीं माझा धर्म मात्र वाईट इतर धर्म किती तरी चांगले ही जी व्यभिचारी दृष्टि कित्येक चंचळ व अविवेकी पुरुषांत आढळून येते ती या अभ्यासकाच्या ठायीं केव्हांही संभवत नाहीं. त्यामुळें अर्थातच परधर्म स्वीकारण्याची ऊर्मि जी कित्येक भोळ्या भावड्यांच्याच नव्हे तर चांगल्या सुशिक्षित म्हणविणारांच्या सुद्धां मनांत उत्पन्न

होते तीं अशा अभ्यासकाच्या मनांत उत्पन्न होणें सर्वथैव अशक्य; कारण तो असा विचार करील कीं परधर्म कांहीं सर्वांशीं निर्दोष नाहींत; आतां त्यांच्यांत जर आपआपल्या अनुयायांना समाधान प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य असेल, तर माझ्या धर्मांतही तें सामर्थ्य अवश्य असलें पाहिजे. ' घरोघर मातीच्याच चुली ' असल्यानें परधर्मांत तरी अशी काय एखादी अजब चीज आहे कीं ती माझ्या धर्मांत सांपडणेंच शक्य नाहीं; तेव्हां परधर्माचा स्वीकार करणें ही गोष्ट केवळ मूर्खपणाची आहे. अशा रीतीच्या विचारसरणीनें त्याची मति स्थिर झाल्यानें तो

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ (गीता)

ह्या गीतेंतील अमोलिक उपदेशाचा केवळ अंध श्रद्धाळुपणानें नव्हे तर विचारपूर्वक स्वीकार करूं शकतो, हा लाभही कांहीं लहानसहान नव्हे.

आतां ह्या ठिकाणीं कित्येक असें विचारतील कीं 'आमचे धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत असून सर्वथैव श्रद्धेय आहेत; व त्या ग्रंथांना प्रमाण मानून त्यांतील तत्त्वें आचरणांत आणणें हें आमचें पवित्र कर्तव्य आहे,' अशी जी खऱ्या धार्मिकाची दृष्टि ती या अभ्यासकाचे ठिकाणीं मुळींच संभवणार नाहीं, याची वाट काय? यावर आमचें उत्तर हेंच कीं धर्मशास्त्राच्या अभ्यासकाचे ठिकाणीं पूर्ण श्रद्धाळु दृष्टि नाहीं संभवली तरी त्यांत फारसें नुकसान नाहीं, उलट यांत एक प्रकारचा लाभच आहे. आंधळ्या श्रद्धाळ्यापेक्षां डोळस संशयात्मा केव्हांही चांगला, कारण कालेंकरून डोळस म्हणजे विचारी संशयात्म्याचें, श्रेष्ठ आध्यात्मिक ज्ञानाच्या मार्गा-

वर, एक एक पाऊल धिमेपणानें पण दृढतेनें पुढेंच पडत जाणार यांत शंका नाहीं. याचे उलट आंधळ्या श्रद्धात्म्याचा आध्यात्मिक विकास कदापि होणें शक्य नाहीं. आतां ही गोष्ट खरी कीं श्रद्धेच्या प्रखरतेमुळें होणाऱ्या प्रत्यक्षाचरणाच्या लाभाला तो संशयात्मा कांहीं काळ मुकेल, पण त्याला होणाऱ्या भावी लाभाच्या मानानें ही हानि फारशी विचारांत घेण्यासारखी नाहीं. एवंच अंधश्रद्धा नाहींशी होऊन विचारी संशयवृत्ति वाढणें हा एक प्रकारचा लाभच अभ्यासकाला होतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पण अशा रीतीनें होणाऱ्या लाभांपेक्षां एक उच्चतर प्रकारचा लाभ अभ्यासकाला हा होतो कीं त्याला या विविध धर्मांच्या द्वैताच्या पसाऱ्यांत अद्वैताची दिव्य दृष्टि प्राप्त होतें. 'समाजाच्या धारणेकरतां व व्यक्तीच्या उन्नतीकरतां योग्य आचारांच्या द्वारें प्रयत्न करणारा तो धर्म,' या व्याख्येप्रमाणें पहातां सर्व धर्म एकाच स्वरूपाचे आहेत, नव्हे एकच आहेत; मात्र तो एकच धर्म परिस्थितिवशात् निरनिराळा भासतो. ही धर्मांच्या अद्वैताची प्रतीति हा ग्रंथ वाचतांना पदोपदीं होते. उदाहरणार्थ: विद्यमान धर्मांतील प्रेमळ भक्तांची आपापल्या देवांना आळविण्याची पद्धति इतकी तंतोतंत एकरूप आहे कीं भाषेचें वरचें पांघरूण काढून टाकल्यास, हे सर्व भक्त एकत्र बसून एकाच परमेश्वराला आळवीत आहेत असा भास सहृदय अभ्यासकाला झाल्यावांचून रहात नाहीं. आचारांचे बाबतींतही हाच प्रकार. जपानांतील शिंटो धर्मामध्यें नव्या धान्याचे प्रसंगीं होणारे अनेक धार्मिक उत्सव व सण यांचें वर्णन वाचीत असतां हिंदूंच्या 'नव्याच्या

धुनवेची ' अथवा अशा सारख्याच हिंदू शेतकऱ्यांच्या इतर सणांची आठवण वाचकाला झाल्यावांचून राहणार नाहीं. नीतिनियमांचे बाबतींत तर सर्व धर्मांत संपूर्ण ऐक्य दिसून येतें. आणि तें तसें दिसणारच. कारण नीतिनियमांच्या द्वारा समाज धारणेचें कार्य सर्वच धर्मांनीं हातीं घेतलेलें आहे; आणि मानव जाति सर्वत्र एकरूपच असल्यानें तिच्याकरतां सांगण्यांत आलेले नीतिनियम एकच स्वरूपाचे असावेत यांत नवल तें काय ?

तात्पर्य, तौलनिक धर्माभ्यासाच्या योगानें अभ्यासकाला अनेक स्पृहणीय लाभ होत असल्यानें अशा तऱ्हेचा अभ्यास देशी भाषांतील साहित्याचे द्वारा सुरू व्हावा ही गोष्ट अत्यंत इष्ट आहे. तथापि अभ्यासकाला साहाय्य करणारे असे, धर्मांचें तौलनिक ज्ञान करून देणारे, ग्रंथ देशी भाषांतून विशेषत: मराठींत फारसे निर्माण झाले नाहींत. तेव्हां मराठींत ह्या विषयावरील स्वतंत्र व प्रामाणिक ग्रंथाचे अभावीं इंग्रेजी सारख्या समृद्ध साहित्यांतून अभिजात ग्रंथ घेऊन त्याचा अनुवाद वाचकांना सादर करणें अगत्याचें आहे. प्राय: हीच दृष्टि ठेवून श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड बडोदानरेश यांनीं प्रस्तुत सुंदर ग्रंथाचा देशी भाषेंत अनुवाद व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली असावी. केवळ त्यांच्या या उत्कट इच्छेमुळेंच हा अनुवाद मराठी वाचकांच्या हातीं पडत आहे. प्रस्तुतसारख्या श्रेष्ठ ग्रंथांचें भाषांतर करण्याची आम्हाला सुसंधि दिल्याबद्दल आम्ही ज्याप्रमाणें महाराजांचे ऋणी आहोंत त्याचप्रमाणें असा ग्रंथ भाषांतररूपानें सुलभ करून दिल्याबद्दल मराठी वाचक वर्गही महाराजांचा ऋणी राहील.

आजीविकेच्या अनेकविध व्यवसायांतून वेळांत वेळ काढून शेवटीं ह्या ग्रंथ हातावेगळा झाल्यानें,

जातो मयाऽयं विशदः प्रकामम् ।
प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा ॥ (शाकुंतल)

ह्या उक्तीप्रमाणें आम्हालाहि आमच्यावरील भार हलका झाल्यासारखा वाटत आहे.

ह्या भाषांतराचे कामीं निरलसपणानें आम्हाला साहाय्य केल्याबद्दल आमचे तरूण मित्र श्री. आबा देशपांडे, कन्या चि. कमलावती व पुत्र चि. विनायक यांच्या पाठीवरून जरूर हात फिरविला पाहिजे. त्यांनीं योग्य तें साहाय्य केलें नसतें तर भाषांतर पुरें होण्यास आणखी किती दिरंगाई झाली असती कोण जाणें ?

महाराष्ट्र सोसायटी एलिसब्रिज
अहमदाबाद १४–१०–३५ } रामचंद्र बलवंत आठवले.

मूळ ग्रंथकाराची चौदाव्या मुद्रणाची
प्रस्तावना.

शंभर वर्षांवर टिकून राहिलेले असे आजकाल एकंदर अकरा धर्म आहेत. विशिष्टसंस्कृतिसंपन्न असे हे धर्म चांगले संघटित आहेत. यापैकीं फक्त दोन धर्म सोडून बाकीच्या सर्व धर्मांत खिस्तीधर्म हा अगदीं अर्वाचीन आहे. ह्या सर्व धर्मांचे मूळ, त्यांचे धर्मग्रंथ, त्यांच्या प्रगतीचा इतिहास या सर्वांचा थोडक्यांत परामर्श घेण्याचें आम्ही प्रस्तुत ग्रंथांत योजिलें आहे.

ह्याशिवाय पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे अलीकडल्या काळात निघालेले आणि आजकाल विद्यमान असलेले कांहीं पंथ आहेत. हे पंथ बहुतेक स्वतंत्र असून, आपापल्या मताच्या प्रसारांची कार्यें करीत आहेत. यापैकीं कांहीं पंथांना तर बरेच दिवसापासून आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त झालें आहे. ह्याच्याच जोडीला जडवस्तूंमध्येंही प्राण आहे असें मानणारा एक धर्म आज कैक वर्षें तगून राहिला आहे; ह्या धर्माचें प्रस्थ अजूनही रानटी लोकांत बरेंच आहे. तथापि सुधारणेचें पाऊल पुढें पाडण्यांत या धर्माचा कांहीं एक उपयोग झालेला नाहीं, व पुढेंही होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. आजकाल प्रचलित असलेल्या ह्या धर्मापेक्षां आणि पंथापेक्षां, एकेकाळीं उत्पन्न होऊन नंतर लुप्त झालेल्या अशा धर्मांची व पंथांची संख्या कितीतरी पटीनें जास्त आहे. परंतु ज्या धर्मांनीं आज कित्येक वर्षें व शतकें संघटित समाजाची घडी कायम टिकविली आहे, ज्या धर्मांनीं साहित्य कला, आणि धर्मविधि यांची अखंड परंपरा चालू ठेविली आहे त्या धर्मांच्या कार्याचा व्याप केवढा आहे हेंच

फक्त सांगावें व मानवी धार्मिक जीवनांत त्या व्यापाचें महत्त्व केवढें आहे हें व फक्त दाखवून द्यावें अशी आम्ही प्रस्तुत ग्रंथाला मर्यादा घालून दिलेली आहे.

जगांतील विद्यमान धर्मांचा परामर्श घेणें हें काम एक प्रकारें फारच मोठें आहे, तरीपण या कामाची मर्यादाही ठरलेली आहे. ह्या कामासाठीं लागणारी सामुग्री फार गुंतागुंतीची असून फार विशाल आहे. ही सामुग्री घेऊन तिचें पृथक्करण करणें, आणि तेंही पुन्हा व्यापक दृष्टीनें आणि चोखपणानें करणें अगत्याचें आहे. प्रत्येक धर्मांतील लोकांवर अनेक गोष्टींचा प्रभाव पडत असतो. आपापल्या आर्थिक, सामाजिक, राष्ट्रीय भौगोलिक इत्यादि परिस्थितींचा प्रभाव प्रत्येक धर्मांतील लोकांवर हटकून पडत असतो व त्यामुळें त्यांचे निरनिराळे गट पडतात. तरीपण हे गट पडण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे त्या त्या लोकांनीं मनुष्य आणि परमेश्वर या संबंधीं धर्म व नीति यांच्या दृष्टीनें ठरविलेले निराळे आदर्श. हे आदर्श पिढ्यान् पिढ्या चालत राहतात आणि शेवटीं त्यानांच प्रामाण्याचें स्वरूप प्राप्त होतें. तरीपण इतिहासप्रसिद्ध धर्मांचे बाबतींत माहिती मिळविण्याचें सर्वश्रेष्ठ एकमेव साधन त्यांतील धर्मग्रंथ हें होय. पश्चिमेच्या लगतचा पूर्वदेश, मध्यपूर्वदेश, व थेट पूर्वेकडील देश यामधील बहुतेक धर्मांचे धर्मग्रंथ मूळ भाषेंतून कसें वाचावें हें बरोबर समजल्यानें फार फायदा होतो असें अनुभवांतीं आम्हाला दिसून आलें. आणि प्रस्तुत ग्रंथाचा विशेष हा आहे कीं प्रत्येक धर्मांतील ऐतिहासिक ठळक गोष्टींचा निर्देश करताना तसेंच त्या धर्माची शिकवण सांगताना आम्ही त्यांतील धर्मग्रंथांचे उतारे घेण्याची पद्धति स्वीकारली आहे.

सामुग्री जमविणें व ती तपासून घेणें ह्या बाबतींत आम्ही आजवर जे दीर्घ परिश्रम केले त्यांचें सारभूत फळ ह्मणजे हा आमचा छोटासा ग्रंथ. हिंदुस्तानांतील धर्मांच्या अनुयायांशीं आमचा कित्येक वर्षं अगदीं जिव्हाळ्याचा संबंध जडला होता. तसेंच या सर्व धर्मासंबंधीं हिंदुस्तानांतील एका प्रमुख भाषेंत लिहिलेलें वाङ्मयही आमच्या वाचण्यांत आलें होतें; व त्या त्या धर्मांतील अनुयायांशी आमचीं त्यांच्या भाषेच्या द्वारें संभाषणेंही झालीं होतीं. अनेक देशांतून वारंवार प्रवास करतांना आम्हीं अनेक स्थळें सूक्ष्म दृष्टीनें पाहिलीं, इतकेंच नव्हें, तर एकदा आम्हीं पृथ्वीपर्यटनही केलें. युरोपांतील तीन भाषांतून आम्ही आपला अभ्यास चालविला होता. हिंदुस्तानांतील सहा महाविद्यालयें आणि विद्यापीठें यांतून आम्ही व्याख्यानें दिलीं. अमेरिकेंत कैक-वर्षं आम्ही अध्यापनाचें काम केलें आहे. विद्यार्थ्यांच्या व शिक्ष-कांच्या आवडीचे विषय कोणते, त्याचप्रमाणें ज्ञानसंपादनाच्या व ज्ञानदानाच्या पद्धति कोणत्या हें समजण्याचें कामीं आम्हाला वरील सर्व गोष्टींचा उपयोग झाला. जगांतील विद्यमान धर्मांतील अग्रगण्य व्यक्तींशीं आम्हाला आमच्या पेशामुळें विचार विनिमय करतां आला, व त्यांच्याशीं मित्रत्वाचें रम्य नातें जोडतां आलें. ह्यामुळेंही आमच्या माहितींत महत्वाची भर पडली आहे व आम्हाला मार्मिक दृष्टीचाही थोडाबहुत लाभ झाला आहे.

ईश्वराशीं संबंध ठेवून तद्द्वारा मानवी जीवनांतील उच्च तत्त्वें जतन करून ठेवणें व त्यांची इतर उच्च तत्त्वांशीं तुलना कर-ण्याचा प्रयत्न करणें म्हणजेच धर्म. ह्मणून प्रत्येक धर्मांतील मह-त्वाच्या ऐतिहासिक घटना कोणत्या, हें निश्चित करून संपूर्ण

रीतीनें धर्मांचा अभ्यास करणारा मनुष्य त्या धर्मांची इतर धर्मांशीं तुलना मोठ्या सावधगिरीनें व शास्त्रीय दृष्टीनें करतो, व तुलनेनें त्या धर्मांचें सापेक्ष महत्त्व ठरवितो. धर्मांचा व्यापक दृष्टीनें अभ्यास करणारा मनुष्य प्रत्येक धर्माचा दर्जा तुलनेनें ठरवूं पाहतो; व असें करतांना स्पष्टपणानें, मित्रत्वाच्या नात्यानें, पण न्यायाला धरून तो आपलें मत प्रदर्शित करतो. ह्या पुस्तकांत प्रत्येक धर्माचा अभ्यास करतांना उदारदृष्टि अभ्यासकाचें वरील धोरण शेवटपर्यंत स्वीकारलें आहे.

हें पुस्तक प्रथम छापलें तेव्हांपासून आतांपर्यंत प्रस्तुत ग्रंथ-कारानें ह्या पुस्तकांत अनेक सुधारणा केल्या आहेत; आणि ह्या चौदाव्या मुद्रणाचे वेळीं तर चौपन्न ठिकाणीं ग्रंथावर पुन्हा संस्करणाचा हात फिरविला आहे; आणि आमच्या माहितींत जसजशी नवीन भर पडत जाईल तसतशा आणखीही सुधारणा करूं. ह्या पुस्तकाचें एका परकी भाषेंतही भाषांतर छापून प्रसिद्ध झालें आहे.

प्रत्येक धर्माचें वैशिष्ट्य कशांत आहे व त्याचा इतर धर्मांशीं कोणत्या बाबतींत विशिष्ट भेद आहे ह्याचें सूक्ष्मदृष्टीनें केलेलें विवेचन, व ऐतिहासिक ठळक गोष्टींचा, अभ्यासकाला साजे-लशा कांटेतोलपणानें केलेला, निर्देश येथें वाचकांस पहावयास सांपडेल अशी प्रस्तुत ग्रंथकाराला आशा वाटत आहे. पण ह्यापे-क्षांही ह्या विषयांत जास्त शोध करण्याची, व जगच्चालक परमे-श्वराविषयीं मानव हृदयांत वसत असलेल्या श्रद्धेचें महत्व जाण-ण्याची, धर्मांच्या अभ्यासकांना उत्कट इच्छा व्हावी असें या ग्रंथांत बरेंचसें आहे असा आम्हांस भरंवसा वाटतो.

अनुक्रमणिका

प्रकरण	विषय	पृष्ठ
प्रकरण १ लें	प्रास्ताविक प्रकरण ... ... (धर्म व त्याचीं विविध स्वरूपें) ...	१–३०

दक्षिण आशियांत जन्मलेले धर्म

(हिंदुस्तान)

प्रकरण २ रें	हिंदुधर्म	३१–६५
प्रकरण ३ रें	जैनधर्म	६६–९८
प्रकरण ४ थें	बौद्धधर्म	९९–१४४
प्रकरण ५ वें	शीखधर्म	१४५–१५०

पूर्व आशियांत जन्मलेले धर्म

(चीन व जपान)

प्रकरण ६ वें	कान्फ्यूशियन धर्म	१५१–२२४
प्रकरण ७ वें	टाओ धर्म	२२५–२६०
प्रकरण ८ वें	शिंटो धर्म	२६१–३१८

पश्चिम आशियांत जन्मलेले धर्म
(पॅलेस्टाइन, इराण, अरबस्तान)

प्रकरण ९ वें यहुदी धर्म २९९–३३०

प्रकरण १० वें झोरास्ट्रियन उर्फ पारशी धर्म ... ३३१–३६४

प्रकरण ११ वें इस्लाम अथवा मुसलमान धर्म ... ३६५–४००

प्रकरण १२ वें ख्रिस्ती धर्म ४०१–४४०

प्रकरण १३ वें विद्यमान धर्मांची संक्षिप्त तुलना ... ४४१–४७४

परिशिष्टें

परिशिष्ट १ लें विद्यमान धर्मांतील वैशिष्ट्यांचें कोष्टक... ४७५–४९८

परिशिष्ट २ रें तुलनात्मक धर्मशास्त्राच्या अभ्यासास उपयुक्त असलेल्या ग्रंथांची यादी ४९९–५०१

परिशिष्ट ३ रें धर्मांच्या अभ्यासकाला उपयुक्त अशा प्रश्नांचा संग्रह... ... ... ५०२–५०६

विषय व विशेष नामें यांची सूची ५०७–५१२

जगांतील विद्यमान धर्म

प्रकरण १ लें

धर्म व त्याचीं विविध स्वरूपें.

धर्म हा मनुष्यप्राण्यांचा एक प्रमुख विशेष आहे. कांहीं मनुष्येतर प्राणी कांहीं मनुष्यापेक्षां तीक्ष्ण इंद्रियशक्ति, व्यवहारचातुर्य, उपयुक्त वस्तु निर्माण करणें, मिळून मिसळून वागणें इत्यादि कांहीं विशिष्ट शक्तींचे बाबतींत वरचढ असतील; पण मनुष्यांना हल्लीं असलेल्या ज्ञानावरून पाहतां मानवेतर प्राण्यांत धार्मिकजीवनाचें चिन्ह मुळींच दिसून येत नाहीं. अथवा ‘ हा आपल्या मरणोत्तर जीवनाकरता तयारी करीत आहे ’ असें म्हणतां येईल अशीही एखादी गोष्ट मानवेतर प्राण्यानें केलेली नाहीं. आतां मनुष्यांतही कांहीं प्राणी असे आढळतात कीं, त्यांना धर्म म्हणून कांहीं आहे याची स्थूल मानानेंसुद्धां जाणीव नाहीं; अथवा उच्चजीवन आणि नीति म्हणून कांहीं आहे ह्याचीही त्यांना कल्पना

नाहीं; पण अशी माणसें थोडीं. सामान्यतः पाहिलें तर धर्म हा मानवजातीचा प्रमुख विशेष आहे, असें म्हणता येईल.

मानवजातीच्या उपलब्ध असलेल्या इतिहासावरून असें दिसतें कीं, कोणत्याना कोणत्या तरी स्वरूपांत धार्मिक भावना प्रत्येक मानववंशांत आढळते. मध्य आस्ट्रेलियांतील बुशमन आणि पॅटागोनियांतील इंडियन, यांना तर मनुष्यप्राण्यांतील अत्यंत हीन कोटींतील लोकांचा नमुना समजतात ना? पण ते सुद्धां भूतयोनीला मानतात आणि त्यांची कसली तरी पूजा करतात. इजिप्तचे पिरामीड व भारतीय प्राचीन वेदवाङ्मय हीं सुसंस्कृत मानवजातीचीं पुराणतम स्मारकें आहेत असें म्हणतात; पण त्यांतही धर्मश्रद्धा, धार्मिक-आकांक्षा आणि धार्मिकविधि आढळून येतात.

मानवी इतिहासांत धर्म ही एक अत्यंत प्रबल बाबत होऊन बसली आहे. मानवी जीविताचीं इतर अंगें कांहीं कमी महत्त्वाचीं नाहींत, पण आजपर्यंतच्या मानवेतिहासांत धर्माइतका सर्वतोपरी श्रेष्ठ विशेष दुसरा कोणताही दिसून आलेला नाहीं. आपल्यापेक्षां उच्च कोटींतील प्राणी आहेत व त्यांची वेळोवेळीं आपल्याला जरूर तेवढी मदत मिळत गेली आहे, अशी मनुष्यप्राण्यांची ठाम समजूत होऊन बसली आहे..

२ धर्माचें कार्य.

या जगांतील एक अथवा अनेक अतिमानुष शक्तींच्या आधारानें माझा जीवनकलह यशस्वी होईल, असा दृढविश्वास वाटणें, ही गोष्ट धर्मापासूनच मनुष्याला मिळते; इतर कोणापासूनही मिळत

नाहीं. प्रत्येक धर्म आपापल्या अनुयायांकरतां तसेंच समाजाकरताही अनेक चांगल्या गोष्टी करतो. उदाहरणार्थ, व्यक्तीमध्यें अधिक शक्ति व अधिक समाधान उत्पन्न करण्यांत धर्मच साहाय्य करतो. आयुष्यांतील अनेक हालअपेष्टा निमूटपणें सहन करण्यांत धर्मांचीच मदत होते. सुखदुःखाचें कोडेंही धर्मच सोडवतो. उच्च मानवीजीवनांत एक प्रकारचा उच्चपणा आणून देणाराही धर्मच. 'माझें मरणोत्तरजीवन हल्लींपेक्षांही सुखकर होईल' अशी आशा धर्मच उत्पन्न करतो. आदर्शसमाजाचें रम्य चित्र डोळ्यापुढें ठेवणाराही धर्मच. मुक्तीचा मार्ग आंखून देणाराही धर्मच.

नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, अथवा आदर्श सुसंस्कृत जीवनाविषयींची धडपड या सर्वांहून धर्म हा कांहीं निराळाच आहे. त्याचें कार्यही या सर्वांहून निराळें आहे. तें हें कीं, धर्म हा मनुष्यप्राण्यांना एकप्रकारचें निरतिशय समाधान प्राप्त करून देतो. या जगांत एक अथवा अनेक अतिमानुषशक्ति आहेत हें ओळखून, धर्मानें त्या शक्तींचें व मानवी प्राण्याचें जिव्हाळ्याचें नातें जोडून दिलें आहे. मनुष्याला समाधान मिळतें तें यामुळेंच.

३ धर्माचें स्वरूप.

धर्म ही बाब इतकी साधी आहे कीं एखाद्या सुबुद्ध मुलालासुद्धां धर्माचा यथार्थ अनुभव घेता येतो. अर्थात् प्रौढ मनुष्यालाही त्याचा अनुभव घेतां येतो हें उघडच आहे. उलटपक्षीं धर्म इतका व्यापक व जटिल आहे कीं, त्याचें पूर्ण आकलन व्हावें व संपूर्ण रीतीनें त्याचा अनुभव घेतां यावा, म्हणून त्याचें पृथक्करण करणें हेंही

जरूरीचें आहे. साध्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे " आपल्याला दैवी वाटत असलेल्या शक्तीशीं कसलें तरी नातें जोडतांना मनुष्याला येणारे अनुभव, त्याच्यांत उत्पन्न होणाऱ्या भावना, त्याच्या मनांत येणारे विचार, त्याचे हातून घडणारें कर्म, या सर्वांचें मिश्र स्वरूप म्हणजे धर्म." वर सांगितलेला दैवी शक्ति. ही जगाचें नियमन करणारी एक अत्यंत महनीय देवता आहे, असें मनुष्याला वाटतें.

मानसशास्त्राच्या दृष्टीनें बोलायचें म्हणजे धर्म ही कांहींशी बौद्धिक, कांहींशी भावनात्मक व कांहींशी इच्छाशक्तिसंबंधक वस्तु आहे. तरी पण. धर्म ही केवळ आत्मानुभवाचीच एक बाब आहे असें नाहीं. धर्मांत मनुष्याच्या श्रद्धेचा विषय जो देव त्याचाही समावेश होतो. अर्थात् एक अथवा अनेक देवांचे विषयीं श्रद्धा हा जसा एक धर्माचा भाग आहे, तसाच त्या देवाविषयींचा अनुभव हाही एक धर्माचा भाग आहे. तेव्हां एका धर्माचा दुसऱ्या धर्माशीं फरक पडतो तो–भिन्नभिन्न देवतांविषयींची श्रद्धा आणि अर्थात्च त्या श्रद्धेमुळें भिन्नभिन्न मनुष्यांत उत्पन्न होणारा भिन्नभिन्न अनुभव, यामुळेंच.

४ देवतांचीं विशिष्ट लक्षणें.

उक्त धर्मश्रद्धा, पूजाविधि आणि धार्मिक अनुभव, या सर्वांचा विषय असलेल्या देवतांमध्यें खालीं दिलेलीं पांच लक्षणें तरी निदान आढळतात:—

(१) ह्या देवतांचें स्वरूप अतिमानुष असतें, त्यांची शक्तिही अतिमानुष असते. आतां कांहीं बाबतींत ह्या देवता माणसासारख्याच असतात, हा भाग वेगळा.

(२) ह्या देवता इंद्रियगोचर नसतात, अदृश्य असतात. क्वचित्प्रसंगीं मात्र ह्या देवता मूर्तस्वरूपांत—स्थूल आकारांतही प्रकट होतात.

(३) ह्या देवतांत नियामकशक्ति असते. मानवांचें सुखदुःख, त्यांची भावीस्थिति, त्याचप्रमाणें हें भौतिक जग, ह्या सर्वांवर या देवता कांहींतरी सत्ता चालवितात.

(४) धर्मानें वागणाऱ्या मनुष्याला ह्या देवतांना प्रसन्न करतां येत.

(५) ह्या देवता पूजनीय अथवा वंदनीय आहेत. धर्मपरायण व्यक्तीच्या अंतःकरणांत ह्या भय, आदर, विश्वास, आज्ञाधारकपणा, सहकारिता, शरणागति इत्यादि भावना उद्भूत करतात.

जसें भक्ताचें तसेंच प्रत्येक देवतेचें स्वरूपही गुंतागुंतीचें असतें. वर सांगतलेल्या पंचलक्षणांनीं युक्त अशा देवतेविषयींच खऱ्या धार्मिक व्यक्तीला कांहीं विशिष्ट अनुभव येतात.

५ देवतांच्या स्वरूपाविषयीं भिन्न मतें.

तेव्हां एकंदरींत कोणत्यांना कोणत्या तरी प्रकारची देवता मानणें हें धर्माचें एक अगत्याचें अंग आहे हें जरी खरें, तरी देवतांचें हें पंचविध स्वरूप मानूनही पुन्हां प्रत्येक मनुष्याची आपापल्यापरी ह्या देवतांविषयीं प्रत्यक्ष कल्पना कांहीं निराळीच असते. उदाहरणार्थः—

(१) संख्येच्या बाबतींत:—अनेक देवतावादी कांहीं धर्म आहेत त्यांत अनेक देव मानतात. जगांत फक्त एकच देवता आहे असें मानणारे एकेश्वरवादी धर्म आजकाल फक्त चारच आहेत.

(२) व्यक्तभावाचे बाबतींत:—तात्विक हिंदुधर्म व 'टाओ' धर्म हे दोन धर्म असें मानतात कीं, ईश्वर हा अव्यक्त परमात्मा आहे. ईश्वर हें एक अमूर्त तत्त्व आहे. पण प्रचलित हिंदुधर्म, टाओधर्म आणि बाकीचे सर्व धर्म, असें मानतात कीं, परमेश्वर सगुण आहे.

(३) शक्तीचें बाबतींत:—इस्लाम धर्म असें मानतो कीं, सर्वश्रेष्ठ सगुण परमेश्वराचें सामर्थ्य विश्वव्यापक व अनंत आहे. पारशी धर्माचें मत असें आहे कीं, एका आधिभौतिक अनिष्ट शक्तीच्या विरोधामुळें ह्या व्यक्त देवतेची शक्ति मर्यादित झाली आहे. ह्या अद्वितीय देवतेचें सामर्थ्य स्वतःविषयींच्या व मानवांविषयींच्या नैतिक जबाबदारीमुळें मर्यादित झाली आहे, असें ख्रिस्ती धर्माचें म्हणणें आहे.

(४) नैतिक जबाबदारीचें बाबतींत:—इस्लाम धर्माची अशी समजूत आहे कीं, सर्वश्रेष्ठ ईश्वर ही एक बेजबाबदार व स्वच्छंदी व्यक्ति आहे. याचे उलट कान्फ्यूशियन व ख्रिश्चन या धर्मांचें असें आग्रहानें सांगणें आहे कीं, परमेश्वराला आपल्यावरील जबाबदारीची योग्य जाणीव आहे.

(५) गुणाचे बाबतींत:— कान्फ्यूशियन व झोरास्ट्रियन उर्फ पारशी धर्म, हे असें प्रतिपादन करतात कीं, ईश्वर हा अत्यंत न्यायी आहे. ख्रिस्तीधर्म असें सांगतो कीं, ईश्वर हा अत्यंत दयाळु आहे.

वरील महत्त्वाचे मुद्यांचा आधार घेऊन ख्रिश्चन धर्माची इतर धर्मांशीं योग्य तुलना करणें शक्य आहे. पहिल्या चार बाबतींत ख्रिश्चन धर्म इतर धर्माहून निराळा नाहीं, ही गोष्ट खरी. तरीपण जेथें दोन गुणांपैकीं कोणता गुण ईश्वरांत मानायचा असा प्रश्न येऊन पडतो, तेथें ख्रिस्ती धर्म ईश्वरांत अधिक दुःसाध्य व उच्चतर असाच गुण फार करून मानतो.

ख्रिस्ती धर्मांत परमेश्वरीय कल्पनेच्या बाबतींत असा एक अपूर्व विशेष आहे कीं, ईश्वराचें आत्मिक सामर्थ्य कोणत्याही विरोधी शक्तीनें मर्यादित नाहीं, असें जरी तो धर्म मानतो, तरी हें सामर्थ्य नैतिक जबाबदारीनें मर्यादित झालेलें आहे, असें या धर्माचें म्हणणें आहे. साधारणपणें ख्रिस्ती लोकांची कल्पना अशी कीं, परमेश्वर हा दयाळु आहे, व मानवांना तारून नेण्याची—मुक्तकरण्याची—जबाबदारी परमेश्वराचे शिरावर आहे.

६ धर्माच्या कल्पनेंत निरनिराळे लोक निरनिराळ्या गोष्टींवर भार देतात.

धर्म ही वस्तु इतकी व्यापक व समृद्ध आहे कीं, त्याचीं निरनिराळीं अंगें निरनिराळ्या स्वभावाच्या लोकांना कमीअधिक महत्वाचीं वाटतात; आणि तसें वाटणेंही स्वाभाविक आहे. उदाहरणार्थ:—

(१) म्यॅक्सम्यूलरनें धर्माच्या बौद्धिक स्वरूपावर जास्त भार दिला आहे. तो म्हणतो, "धर्म ही एक मानसिक शक्ति आहे आणि ही शक्ति इंद्रियज्ञान अथवा तर्कज्ञान यांची परवा न करतां, किंवा असेंही म्हणा कीं, त्यांना धाब्यावर बसवून विविधनामरूपाखालीं दडून बसलेल्या अनंत तत्त्वाचें मनुष्याना भान करून देते (सायन्स ऑफ रिलिजन-प्रस्तावना, १८८२ तील आवृत्ति पृष्ठ १३.)

(२) धर्माच्या नैतिक स्वरूपांचें प्राधान्य इम्यॅन्युएल कँट व माथ्यू अर्नोल्ड यांनीं केलेल्या धर्माच्या दोन इतिहास प्रसिद्ध व्याख्येंत जोरानें प्रतिपादलेलें आढळतें.

कँट म्हणतो, "सर्व कर्तव्यकर्में ह्या प्रभूच्या आज्ञा आहेत ही जाणीव म्हणजेच धर्म." (ॲबटकृत "क्रिटिक ऑफ प्रॅक्टिकल रीझन" याचें भाषांतर, पृष्ठ २२६.) "भावनेनें युक्त अशी नीति म्हणजेच धर्म" (लिटरेचर अॅन्ड डॉग्मा पृष्ठ ४६.)

(३) श्लीअर मार्कर या थोर धर्मज्ञ पंडितानें धर्मांत भावना या अंगाचें प्राधान्य पुढील प्रमाणें स्पष्ट केलें आहे:—

"माझा सर्वस्वी आधार परमेश्वर आहे हें धर्माचें सार" (डिस्कोर्सेस ऑन रिलिजन भाग २ रा).

(४) पूजा या अंगाचें महत्व ॲलन मेन्झीज पुढीलप्रमाणें वर्णितातः—

"अगत्याचें वाटल्यावरून मानवानें आपणाहून उच्च असलेल्या शक्तीची आराधना करणें म्हणजेच धर्म" (हिस्ट्री ऑफ रिलिजन १३).

(५) अल्बर्ट रेव्हिल, धर्माच्या इतिहासाचा अलकिडच्या काळांतील एक जुना लेखक म्हणतो कीं, स्वार्थ हेंच धर्माचें मुख्य अंग आहे.

"सगळ्यांत धर्माचा आधार जर कशावर असेल, तर तो जगांतील विरोधी शक्ति व स्वतःचें दैव, यांचा चांगलाच मेळ बसतो. हें तत्त्व जाणण्याची जी आवश्यकता तीवर. (रिलिजन्स ऑफ नान्‌सिव्हिलाइज्ड पीपल्स १,१२०).

(६) सामाजिक हित हेंच धर्माचें उत्तमांग असें ठासून सांगून खालील सर्वांस आवडणारी धर्माची व्याख्या प्रो. एडवर्ड स्क्रिबनर आमींज यानें केली आहे. "उत्कृष्ट समाजकल्याणाची जाणीव म्हणजेच धर्म" (सायकॉलॉजी ऑफ रिलिजस एक्स्पीरियन्स ७)

(७) धर्म ही वैयक्तिक बाब आहे, असा अगदीं निराळ्याच तऱ्हेचा पण स्पष्ट सिद्धांत माजी प्रोफेसर वुइलियम्स जेम्स यांनीं काढला आहे; व तो त्यांनीं अत्यंत निःसंदिग्धपणानें आपल्या ग्रंथांत नमूद केला आहे. "एकांतांत

मनुष्य प्रभूसमोर (कोणत्यातरी दैवीशक्ति समोर) उभा राहिला असता त्याचे हातून घडणारीं कृत्यें, त्याला येणारे अनुभव, त्याचे अंतःकरणांत उद्भवणाऱ्या भावना हीं सर्व मिळूनच धर्म होतो, अशी आमची धर्म शब्दाची व्याख्या आहे; व अशा तऱ्हेचा धर्म तुम्ही स्वीकारावा असें माझें तुम्हा सर्वांना सांगणें आहे, - मग असें सांगणें भरमसाटपणाचें आहे असें कुणाला वाटेल तर भलें वाटो" (व्हरायटीज ऑफ रिलिजस एक्स्पीरियन्सेस ३१)

(८) एका अत्युच्च आदर्शभूत स्थितीकडे जाण्याची क्रिया म्हणजेच धर्म असें आपलें मत असल्याचें प्रोफेसर जी. डब्ल्यू. स्ट्रैटन यांनीं सांगितलें आहे:—

" दृश्य जगापलीकडे एक अदृश्य जग आहे, आणि अदृश्य प्राणी आहेत, याची जाणीव म्हणजेच धर्म. या जाणीवेचा मार्ग आक्रमणें म्हणजेही धर्मच. अशी जाणीव झाल्यानंतरची आचारात्मक स्थिति म्हणजेही धर्मच. अथवा ह्याहीपेक्षां स्पष्ट तऱ्हेनें सांगायचें म्हणजे आपल्याला अत्युत्कृष्ट अथवा अत्यंत थोर वाटणाऱ्या वस्तूकडे मानवी मनाची जी अभिमुख वृत्ति, तोच धर्म. (सायकॉलॉजी ऑफ धि रिलिजस लाइफ ३४२).

(९) वरीलपैकीं बहुतेक गोष्टींचा समावेश करण्या इतकी व्यापक व्याख्या करण्याचा सुंदर प्रयत्न प्रोफेसर विलियम्स अडॅम्स ब्राऊन यांनीं केला आहे:—" एका

अतिमानुष शक्तीशीं संबद्ध असलेलें जीवन म्हणजेच धर्म. जास्त स्पष्ट सांगायचें म्हणजे ह्या शक्तीवर सर्वस्वी भार टाकणें, ह्या दैवीशक्तीनें माझ्यावर कांहींतरी जबाबदारी टाकली आहे असें मानणें, आणि या अदृश्य शक्तीशी व्यवहार करतां येतो असें मानणें, म्हणजेच धर्म. आदर्श धर्माच्या व्याख्येंत दैवी शक्तीविषयीं शरणागति, कर्तव्याचें भान आणि या शक्तीशी व्यवहार ठेवणें, या तिघांचाही समावेश होतो. (क्रिश्चन थिऑलॉजी इन आउटलाईन, पृष्ठ २९).

७ धर्माच्या अभ्यासाचे विविध मार्ग.

एक तऱ्हेच्या अभ्यासपद्धतीनें धर्माचा प्रांत चोंखाळला जाणार नाहीं. कारण धर्म हा विषयच विशाल आहे. तेव्हां अर्थातूच धर्माचा अभ्यास अनेक बाजूंनीं व्हायला पाहिजे. उदाहरणार्थः—

(१) पहिली महत्वाची दृष्टि म्हणजे ऐतिहासिक. मानवी इतिहासावर आर्थिक, भौगोलिक राजकीय व सांस्कृतिक परिस्थितिचा प्रभाव पडलेला स्पष्ट दिसतो. पण त्याबरोबरच ऐतिहासिक दृष्टीनें धर्माचा अभ्यास झाला पाहिजे. कारण, एक अथवा अनेक अतिमानुष शक्तीविषयीं वाटणाऱ्या धर्मश्रद्धेच्या भोंवतीं संघटित समाज गोळा करण्याची धर्माची प्रवृत्ति असते; आणि ही प्रवृत्ति इतिहासावरून दिसून येते.

(२) अलिकडची एक नवीन आवडती दृष्टी म्हणजे मानसशास्त्रदृष्टि. धर्म हेंच मनुष्याचें लक्षण, व मनुष्याची इच्छाशक्ति, त्याची भावना, त्याचे विचार इत्यादि सामग्रीचा संपूर्ण रीतीनें समावेश धर्मांतच होतो, असें मानून मानसशास्त्रही धर्माचा अभ्यास करतें.

(३) तत्त्वज्ञानदृष्टयाही धर्माचा अभ्यास झाला पाहिजे. कारण, परमोच्च सत्यस्वरूप परमात्म्याच्या ज्ञानासाठीं मनुष्यानें केलेल्या शोधांत धर्माचाही भाग आहे. पण तत्त्वज्ञान व धर्म यांत फरक इतकाच कीं, तत्त्वज्ञानाची धांव सत्याचें ज्ञान करून घेण्याच्या पलिकडे जात नाहीं. तर धर्म, हें ज्ञान करून घेऊन, स्वतःच्या जीवनांत आपला परमात्म्याशीं जिव्हाळ्याचा संबंध आणण्याचा प्रयत्न करतो.

(४) मनुष्याच्या अनेक सामाजिक प्रवृत्तींपैकीं धर्म ही एक प्रवृत्ति आहे. या दृष्टीनेंही धर्माचा अभ्यास करणें जरूरीचें आहे. पण सामाजिक प्रवृत्ति याचा अर्थ इतकाच कीं, मनुष्य धर्मांचे द्वारा एक आदर्श समाजव्यवस्था घडवून आणण्याचा प्रयत्न करतो. या व्यवस्थेला साधन म्हणून एक अथवा अनेक नियंते (म्ह. ईश्वर) यांच्याशी तो निकट संबंध आणूं पाहतो.

(५) साहित्याचे द्वारा धर्माचा अभ्यास करणें, हा तर एक राजमार्गच आहे. परमात्म्याविषयीं असलेलें आपलें ध्येय

व भावना, हीं कधीं कधीं शब्दातीत असतात; पण हीं जेव्हां शब्दांनीं व्यक्त करण्याचा मनुष्य प्रयत्न करतो, तेव्हां त्यानें लिहिलेलें जें वाङ्मय त्याचाही अभ्यास करणें आवश्यक आहे. शिवाय प्रत्येक प्रतिष्ठित धर्मांतील पवित्र ग्रंथांचे द्वारा त्या त्या धर्माचा अभ्यास करणें फारच फायदेशीर असतें.

(६) सौंदर्यशास्त्राच्या मार्गाचीही धर्माच्या अभ्यासाचे बाबतींत उपेक्षा करतां कामा नये. सौंदर्याचा रसास्वाद, त्याचें आविष्करण व त्याची निर्मिति, हें सर्व करण्याचे मनुष्याच ज अनेक मार्ग आहेत, त्यांपैकीं धर्म हा एक आहे. धर्म हा सौंदर्यनिर्मिति साहित्याचेद्वाराच करतो असें नसून, संगीत, मूर्तिशिल्प, स्थापत्य व इतर कलांचे द्वाराही करतो. धर्म हा सौंदर्योपासक आहे. याचें कारण परमात्मा हा निरतिशय सौंदर्यशाली आहे, असें धर्म मानतो.

(७) या जगांत मानवी व्यापारांची नियामक अशी एक कल्याणतम शक्ति आहे असें मानून तिच्याशीं जिव्हाळ्याचें नातें जोडून त्याचे जोरावर आपलें स्वतःचें जीवन कल्याणतम करण्याचा प्रयत्न करणें, म्हणजेच धर्म. या दृष्टीनें पाहतां नीतिशास्त्राचे मार्गानेंही धर्माचा अभ्यास करतां येतो.

(८) आत्मानुभवदृष्ट्या धर्माचा अभ्यास करणें, हा सगळ्यांत अगदीं जवळचा मार्ग. प्रत्येक धर्मांत, मानवी जीवनावर

सत्ता चालविणाऱ्या एक अथवा अनेक शक्तींशीं साक्षात् संबंध ठेवून तद्वारा मोक्ष मिळविता यावा म्हणून कांहीं तरी विशिष्ट विधि सांगितलेला आढळतो.

(९) संशोधकांच्या शोधांनीं पूर्ण हस्तगत करून दिलेल्या तुलनात्मक धर्माभ्यासाच्या सामग्रीकडेही दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. परमात्म्याविषयीं अजूनही मानवी मनांत अनेक कल्पना खेळत आहेत. त्या कल्पनांमध्यें परस्पर साम्य व वैषम्य किती आहे हें पाहणें, व त्या कल्पनांचा व्यक्ति आणि समाज यांच्या जीवनावर काय परिणाम झाला आहे याचा अभ्यास करणें, फारच फायदेशीर आणि मनोरंजक आहे.

धर्माच्या व्यापक स्वरूपाचें संपूर्ण आकलन करून घ्यावयाचें असेल, तर वर सांगितलेले सर्व मार्ग व याखेरीज सापडेल तो मार्ग धर्माच्या अभ्यासाचे बाबतींत चोखाळण्यासारखा आहे, ही गोष्ट उघड आहे.

८ धर्मग्रंथ हे धर्माच्या अभ्यासाचें एक खास साधन आहे.

प्रतिष्ठित धर्मांतील पवित्र धर्मग्रंथांच्या साक्षात् अध्ययनानें अलीकडे धर्माचें स्वरूप समजण्याचे बाबतींत अत्यंत महत्वाची प्रगति झाली आहे. या वर सांगितलेल्या धर्मग्रंथांपैकीं सर्वांचें जरी नाहीं, तरी बहुतेकांचें इंग्रेजींत भाषांतर झाल्यानें हे ग्रंथ आपल्या हस्तगत झाले आहेत. आज जगांत विद्यमान असलेल्या अकरा धर्मांपैकीं कोण्या एखाद्याचें मूळस्वरूप कसें होतें, ह्याचा निर्णय करण्याचा

जो महत्वाचा प्रश्न, तो सोडविण्यांत या ग्रंथांची मदत घेतल्यावांचून चालणें शक्यच नाहीं. उदाहरणार्थः—प्राचीन धर्मग्रंथांचें अध्ययन झालें असल्याशिवाय ख्रिस्तीधर्माचें शुद्ध स्वरूप ग्रीक ख्रिस्तीधर्मांत सापडतें, कां रोमन ख्रिस्तीधर्मांत आढळून येतें, कां प्रोटेस्टंट ख्रिस्तीधर्मांत दिसून येतें, हें कसें ठरवितां येईल? प्रत्येक धर्मसंस्थापकाची शिकवण ही त्या त्या धर्माच्या अनुयायांना एक प्रामाण्याची कसोटी होऊन बसते. यानंतरच्या काळांत ह्या शिकवणीचीं जी मूलतत्वें त्यांचा अर्थातच विचार करून तीं व्यवहारांत लागू करण्यांत येतात. तरीपण अलीकडील ऐतिहासिक व भाषाविषयक संशोधनाच्या साहाय्यानें या मूल तत्वांकडे परत जाता येतें आणि जाणें अगत्याचेंही आहे.

तेव्हां ही गोष्ट उघड आहे कीं, विविध धर्मांच्या अभ्यासाचा एकमेव पाया म्हटला म्हणजे हे पवित्र धर्मग्रंथच होत. विद्यमान अकरा धर्मांपैकीं प्रत्येक धर्मांत त्या त्या धर्मांतील ग्रंथांना प्रामाण्याचें उच्चासन दिलेलें आढळतें; आणि या धर्मग्रंथांत त्या त्या धर्मांच्या मूळसंस्थापकाची शिकवण असायची हें ठरल्यासारखेंच आहे.

धर्माचा तुलनात्मक व ऐतिहासिकदृष्ट्या अभ्यास करीत असतां या धर्मग्रंथांचा खरा अर्थ समजणें जरूरीचें आहे; पण ही गोष्ट कठिण आहे. तथापि ही अडचण कायम राहणारच. स्वतःच्या धर्माचें यथायोग्य स्वरूप सांगता येण्याला भाषेचें व इतिहासाचें बरेंच ज्ञान असलें पाहिजे. स्वतःच्या धर्माची जर ही स्थिति, तर मग अर्थातच निरनिराळ्या सोळा भाषेंत लिहिलेल्या निरनिराळ्या

धर्मग्रंथांचा अभ्यास करून तद्द्वारा अशा धर्मांचें विश्वसनीय ज्ञान संपादन करण्याचें जें प्रचंड कार्य, त्याच्या कल्पनेनें बहुतेक अभ्यासक गांगरून जावे यांत नवल नाहीं.

९ धर्मांच्या तुलनेचे बाबतींत विविध दृष्टिबिंदु.

धर्मांचा प्रत्येक अभ्यासक त्या त्या धर्माकडे कोणत्याना कोणत्या तरी ठराविक दृष्टीनें पाहत असतो, हें नक्की. कधीं कधीं ही त्याची अभ्यासाची दृष्टि त्याची त्यालाच कळत नाहीं. कित्येक वेळां ही त्याची दृष्टि विसंगतही असते. पण कांहीं झालें तरी या दृष्टीचा त्याच्या धर्माच्या अभ्यासावर हटकून परिणाम होतोच.

(१) अशा दृष्टीपैकीं एक दृष्टि म्हणजे ‘ एकजात सर्व धर्म, अज्ञान, अंधपरंपरा, वृथाभिमान, भोळी समजूत, या सर्वांचा परिपाकच आहेत असें समजून त्यांना तुच्छ लेखणें ’ ही होय. विविध धर्मांचा व्यापक अभ्यास करणारांपैकीं कांहींनीं सर्व धर्मांना सरास धिक्कारण्याची ही दृष्टि स्वीकारली आहे. उदाहरणार्थः —

“जितके धर्म जगांत आहेत तितकीं सगळीं बंधनेंच म्हणावयाचीं. मला तर धर्माची व्याख्या अशी करावीशी वाटते कीं, आपल्या शक्तींचा मोकळेपणानें उपयोग करणाऱ्या मार्गांत अडथळे आणणाऱ्या संकोचांचें गाठोडें म्हणजेच धर्म”

(रायनाकः ‘आफर्यूजः ए जनरल हिस्ट्री ऑफ रिलिजन्स’ ३)

(२) जवळ जवळ या वरील दृष्टीइतकीच अविवेकी अशी दुसरी एक दृष्टि आहे. ती म्हणजे ख्रिस्ती धर्माहून इतर धर्मांना तुच्छ लेखणें ही होय. इतर धर्मांचा चांगला अभ्यास करूनही ख्रिस्ती धर्मांचा पुरस्कार करूं पाहणाऱ्या कांहीं अभ्यासकांची ही दृष्टि आहे. उदाहरणार्थः— "ख्रिस्तीधर्म हा सर्व दृष्टींनीं चांगला. बाकीचे खोटे धर्म सत्याकडे नेणाऱ्या पायऱ्या आहेत असें मानताच येणार नाहीं. ख्रिस्तीधर्म हा संपूर्ण धर्म आहे, म्हणजे काय, तर त्याच्यांत चुकाच आढळत नाहीं" (बरेलः 'रिलिजन्स आफ धि वर्ल्ड' ४).

(३) तिसरी एक दृष्टि आहे. ती वरील दोन्ही दृष्टींपेक्षां जास्त ऐतिहासिक आधारावर उभारलेली आहे. ती म्हणजे बायबलप्रणीत धर्माखेरीज इतर सर्व धर्मांना गचाळ मानणें. या दृष्टीचे लोक असें मानतात कीं, ख्रिस्ती-धर्माचा ऐतिहासिक दृष्ट्या यहुदी धर्माशीं अखंड संबंध आहे, आणि सबंध ख्रिस्ती बायबल हे धर्माच्या विकासाचा एक अखंड प्रवाह आहे. 'ख्रिस्ती व यहुदी धर्म वगळता बाकीचे सर्व धर्म बाल्यावस्थेंत आहेत. बायबल-प्रणीत धर्म हा एकच शुद्ध नैतिक धर्म म्हणतां येईल.' (नान्‌बिब्लिकल सिस्टिम्स ऑफ रिलिजनः ए सिम्पोसियम १९९–२००).

(४) चवथी एक दृष्टि सर्वत्र आढळते. ती म्हणजे आपला धर्म वगळून बाकीच्या सर्व धर्मांना सरसहा धिक्कारणें.

इतर धर्मांचा ऐतिहासिक दृष्ट्या ज्यांनीं मुळींच अभ्यास केलेला नसतो अशा माणसांची ही अशी दृष्टि असायचीच. ही दृष्टि जशी ख्रिश्चन लोकांत तशीच हिंदूंतही आढळते.

(५) वरील दृष्टिपेक्षां जास्त उदार पण विवेकशून्य अशी आणखी एक दृष्टि आहे. ती असें मानते कीं, दरएक धर्मांत कांहींतरी चांगल्याचा अंश असतोच. सर्व धर्मांत सारखा चांगुलपणा जरी नसला, तरी त्या त्या धर्मांच्या अनुयायांना पुरेसा चांगुलपणा त्या त्या धर्मांत असतो. या दृष्टीचा स्वीकार करणारांचा नमुना म्हणजे थिऑसॉफिस्ट लोक. याशिवाय धर्माच्या प्रचाराची बाबत मुळींच न मानणारे लोक ह्याच दृष्टीचे असतात. "दरएक धर्मांचे वाट्याला या जगांत कांहाएक विशिष्ट कामगिरी आलेली आहे. ही कामगिरी त्या त्या धर्मांतील लोकांना अनुकूल अशीच असते. इतकेंच नव्हें तर, ज्या विशिष्ट संस्कृतीचा प्रसार त्या लोकांना करावयाचा असतो, त्यालाही अनुकूल अशी ही कामगिरी असते" (बेझंट; फोर ग्रेट रिलिजन्स, ७ वें पान) असें ह्या दृष्टीच्या लोकांचें म्हणणें आहे.

(६) सर्वांत शेवटची दृष्टि म्हणजे ही कीं, प्रत्येक धर्मांत कांहींतरी चांगलेंपणा असतोच. मात्र त्या चांगलेपणाचे प्रमाणांत फरक असतो. चांगलेपणाचे सर्वोत्कृष्ट प्रमाण ज्या धर्मांत असतें तो धर्म जगाला हवा असतो. ख्रिस्तीधर्म-

पीठांनीं चालविलेल्या प्रचार-कार्याचा उत्साहपूर्वक पुरस्कार करणाऱ्या, प्रगतिशील, कार्योद्यत व बुद्धिमान् अशा ख्रिश्चन लोकांचा वाढता वर्ग या दृष्टीचा स्वीकार करतो. कित्येक ख्रिश्चनेतर धर्मांचे कांहीं अलीकडील पुरस्कर्तेही ह्याच दृष्टीला स्वीकारतात. आजकालच्या एका कार्यकर्त्या हिंदुलेखकाला, ह्या दृष्टीचें एक ठळक उदाहरण म्हणून निर्दिष्ट करता येईल. तो म्हणतोः—

"पाश्चात्य संस्कृतीचा अभ्यास करतांना मला असें वाटूं लागले कीं, हिच्यांत कांहींतरी कमी आहे. जे हिच्यांत नाहीं तें हिंदुस्तानच्या जवळ आहे. आपणाला जगांतील भावीं युद्धें किंवा युद्धांची शक्यता टाळायची असेल तर मोटारींतून सारखें इकडे तिकडे धूम ठोकण्याऐवजीं आपण नम्रपणानें आसनावर बसून प्रार्थना केली पाहिजे. (हरींद्रनाथ मैत्रः 'हिंदुइझम धि वर्ल्ड आयडियल' ७-८).

१० धर्मांची अशास्त्रीय वर्गवारी

शास्त्रीय दृष्ट्या चुकलेली व उपयुक्ततेच्या दृष्टीनें कुचकामाची अशी धर्मांची वर्गवारी करण्याचा प्रकार सर्वत्र आढळतो. उदाहरणार्थ-

(१) धर्मांची 'खरे धर्म व खोटे धर्म' अशी वर्गवारी लावतात. पण ही पद्धति प्रत्यक्ष शास्त्रीय अथवा सामाजिक कसोटी धरून मुळींच लावीत नाहींत. ही वर्गवारी प्रत्येक व्यक्तीच्या लहरीवर अवलंबून असते. किंवा त्या व्यक्तीच्या अज्ञानावर अथवा त्या व्यक्तीच्या आवडानिव-

डीवर ही वर्गवारी बसविलेली असते. खरें सांगायचें म्हणजे धर्माच्या योग्यतेचें बुद्धिपूर्वक माप काढून त्यावर धर्मांची वर्गवारी केली पाहिजे.

(२) धर्मांचें परंपरेनें चालत असलेलें वर्गीकरण म्हटलें म्हणजे मनुष्यानें प्रचालित केलेले धर्म व ईश्वरानें प्रकटविलेले धर्म, हें होय. पण हे विभाग परस्परसापेक्ष आहेत, अगदीं अलग नाहींत. कारण प्रत्येक धर्म अंशतः मनुष्यकृत व अंशतः ईश्वरकृत असतो. सत्य ग्रहण करण्याची व्यक्तीची ज्या मानानें शक्ति असेल, त्यामानानें सत्य ग्रहण करणें ही नेहमींची स्वाभाविक रीत. या दृष्टीनें पाहतां धर्म हा मनुष्यकृत म्हणतां येईल. याचे उलट, धर्माला ईश्वरकृतही म्हणतां येईल. कारण सत्याचें स्पष्ट दर्शन व्यक्तीला उत्तरोत्तर करून देणारा परमेश्वर नव्हे तर दुसरा कोण ?

(३) अगदीं स्वाभाविक वर्गीकरण म्हणजे स्वतःला पसंत पडेल तो धर्म, व इतर बाकीचे धर्म हें होय. ‘ माझ्या धर्मानें मला संपूर्ण समाधान वाटलेंच पाहिजे ’ अशी खरोखरी धर्माविषयीं प्रत्येक व्यक्तीची अपेक्षा असली पाहिजे. तरीपण प्रत्येक संपूर्ण धर्मपरायण मनुष्य आपल्या पसंतीच्या धर्माला वैयक्तिक कसोटीप्रमाणें सामाजिक कसोटी लावील तर बरें. धर्माची पुरी कसोटी दोन दृष्टींनीं व्हावीः—धर्म हा स्वतःला त्याचप्रमाणें इतरांनाही हितकारक असला पाहिजे. प्रत्येक

मनुष्यानें स्वतःला व दुसऱ्याला हा प्रश्न विचारावा:— ‘ ह्या धर्मानें माझें समाधान जसें होत आहे तसें अखिल मानवजातींचें होईल काय ?’

११ धर्मांचीं कित्येक अगदीं व्यावहारिक वर्गीकरणें.

वर निर्दिष्ट केलेल्या अशास्त्रीय वर्गीकरणावरून दुसऱ्या विषयाकडे वळताना मध्येंच प्रत्यक्ष दृष्ट हकीकतीवरून केलेल्या कांहीं मनोरंजक वर्गीकरणांचा परामर्श घेऊं या. ह्या वर्गीकरणांचें महत्व असलें तरी धर्मांची खरी किंमत लक्षांत आणून मगच हीं वर्गीकरणें केलीं आहेत असें मात्र नाहीं.

(१) विद्यमान व भूतकालीन धर्मः—

ऐतिहासिकदृष्ट्या ठळक असे बाराधर्म आज लुप्त होऊन गेले आहेत. प्राचीन इजिप्त देशाचा धर्म हा एक, आफ्रिकेंतील धर्म, प्राचीन पेरू व मेक्सिको या देशांतील एक एक धर्म मिळून अमेरिकेचे दोन धर्म; मिथ्रिझम, मॅनिकेइझम, बाबिलोनियाचा धर्म, फीनिशियाचा धर्म व हिटाइट्स् यांचा धर्म, मिळून आशियाचे पांच धर्म; प्राचीन ग्रीकांचा एक धर्म, रोमन लोकांचा एक धर्म, प्राचीन ट्यूटनांचा एक व स्कँडिनेव्हियाचा एक धर्म, मिळून युरोपांतील चार धर्म. एकंदरीनें बारा धर्म आज लुप्त झाले आहेत. हल्लीं विद्यमान असलेले धर्म एकंदर अकरा आहेत. त्या त्या धर्मांच्या अनुयायांच्या संख्येवरून त्यांच्या सामर्थ्याचें निःसंदिग्ध अनुमान जरी काढतां येत नसलें, तरी

खालील माहितीवरून हे धर्म कितपत आणि कोठवर खरोखरी जिवंत आहेत हें जरूर कळून येईल.

जैन, शिंटो, झोरास्ट्रियन हा पारश्यांचा धर्म, हे संख्येच्या दृष्टीनें मरत चालले आहेत. बुद्ध, यहुदी, टाओ व शीख, हे धर्म इतरांचे मानानें थंडावले आहेत. कान्फ्यूशियन, हिंदुधर्म, इस्लामधर्म व ख्रितीधर्म, हे संख्येच्या दृष्टीनें वाढत आहेत.

एकच धर्मांत स्थलपरत्वें कमी आधिक जोरदारपण असलेला दिसतो. उदाहरणार्थ,–इराणांत पारश्यांचा धर्म मरत चालला आहे. तर हिंदुस्थानांत तो समृद्ध स्थितींत आहे. सिलोन, तिबेट व ब्रह्मदेश, येथें बुद्धधर्म वाढतही नाहीं व घटतही नाहीं. पण चीन व जपान येथें तो धर्म अगदीं जोरांत आहे.

(२) भौगोलिक उत्पत्तिस्थानाचे दृष्टीनें धर्मांची वर्गवारीः–

सामान्यतः बोलायचें म्हणजे आशियाखंड ही सर्व विद्यमान धर्मांची जन्मभूमि आहे. तथापि, जरासें तपशिलांत उतरून असें म्हणतां येईल कीं, हिंदुधर्म, जैनधर्म आणि शिखधर्म, यांचें जन्मस्थान दक्षिण आशिया आहे. कान्फ्यूशियन्, टाओ व शिंटो, हे धर्म पूर्व आशियांत जन्म पावले; व यहुदी धर्म, झोरास्ट्रियन धर्म, इस्लामधर्म व ख्रितीधर्म, हे पश्चिम आशियांत जन्माला आले.

(३) त्या त्या धर्मांच्या संस्थापकांच्या समयावरून काल-क्रमदृष्ट्या केलेली धर्मांची वर्गवारी:—

असे दोन धर्म आहेत कीं, त्यांचा कोणी संस्थापकच नाहीं; तेव्हां या धर्मांची जन्ममिति अंदाजानें किंवा परंपरेनें चालत आलेल्या उल्लेखावरून ठरवावी लागते.

१ हिंदुधर्म २०००–१५०० (खिस्तपूर्व) हिंदुस्तानावर स्वारी.
२ यहुदीधर्म १५००–१२०० ,, मोशेचा अंदाजी समय.
३ शिंटो ६६० ,, पहिल्या जपानी बादशहाचा समय.
४ झोरास्ट्रियन ६६० ,, झोरास्टरचा अगदीं अर्वाचीन समय.
५ टाओधर्म ६०४ लाओट्स हा याचा संस्थापक असें मानतात.
६ जैनधर्म ५९९ ,, मानलेला संस्थापक महावीर.
७ बुद्धधर्म खि. पू. ५६० बुद्धाचा अंदाजी जन्म समय.
८ कान्फ्यूशियन् ५५१ कान्फ्यूशियसचा अंदाजी जन्म समय.
९ खिस्तीधर्म ,, ४ येशूखिस्ताचा अंदाजी जन्म समय.
१० इस्लामधर्म इ. स. ५७० महंमदाची नक्की जन्म तारीख.
११ शीख इ. स. १४६९ गुरू नानकाचा निश्चित जन्म समय.

इसवी सनापूर्वीं सहावें शतक, हा धर्म उत्पन्न होण्याचा ऐन बहारीचा समय होता, ही मनोरंजक व लक्षांत ठेवण्या-सारखीं गोष्ट आहे; कारण ह्यावेळीं जगांतील सहा मोठे धर्म जन्माला आले. हें शतक यहुदी धर्माच्या दृष्टीनें फार महत्वाचें आहे.

(४) अनुयायांच्या संख्येच्या दृष्टीनें धर्मांची वर्गवारी—

अर्थात् या बाबतींत आंकडे मिळणें कठिण, व मिळाले तरी

त्यापासून योग्य तो निष्कर्ष काढणें कठिण. कोणत्याही धर्माच्या अनुयायांची संख्या म्हणजे त्या धर्माचा कांहीं अत्यंत महत्वाचा भाग नव्हे; तथापि, एक प्रकारचा सामान्य ओघ कोणीकडे चालला आहे हें दाखविण्याचे बाबतींत त्या संख्येचा जरूर तो उपयोग होतो. चीन व जपान या दोन देशांत, तीन खिश्चनेतर धर्म खुद्द देशांतल्या देशांतच नव्हें, तर एकेका व्यक्तींत सुद्धां इतके परस्पर एकजीव होऊन मिसळून गेले आहेत कीं, या तिन्ही धर्मांच्या अनुयायांचे आंकडे अंदाजानें द्यावे लागले आहेत. तरीपण अनेक ठिकाणाहून एकत्र करून त्यातल्यात्यांत विश्वसनीय म्हणून हातांत आलेले आंकडे पुढें दिले आहेत:—

धर्म	अनुयायांची संख्या	
ख्रिस्तीधर्म	५५ कोटी	७० लक्ष
कान्फ्यूशियनधर्म	२५ कोटी	
इस्लामधर्म	२३ कोटी	
हिंदुधर्म	२१ कोटी	७० लक्ष
बुद्धधर्म	१३ कोटी	७० लक्ष
टाओधर्म	४ कोटी	३० लक्ष
शिंटोधर्म	१ कोटी	६० लक्ष
यहुदीधर्म	१ कोटी	१० लक्ष
शीखधर्म		३० लक्ष

जैनधर्म	१० लक्ष
झोरास्ट्रियनधर्म	१ लक्ष

विद्यमान धर्मांपैकीं ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांची संख्या सर्वांत मोठी आहे. कोणत्याही दोन धर्मांच्या अनुयायांच्या संख्येची बेरीज केली तरी, त्यापेक्षां ही संख्या जास्त भरते. तथापि, जातिवंत ख्रिश्चन लोकांची संख्या मोजण्याची पद्धति अशी आज एकही उपलब्ध नाहीं, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. उदाहरणार्थ, दक्षिण अमेरिकेला ख्रिश्चन लोकांचा देश म्हणतात; तथापि तेथील लोकसंख्येंत ख्रिश्चन नसलेल्या अशा तद्देशीय लोकांचा भरणा मोठा आहे.

(५) कार्यक्षेत्राच्या दृष्टीनें धर्मांची वांटणीः—

हल्लीं विश्वधर्म होण्याची आकांक्षा बाळगणारे असे तीनच धर्म आहेतः—बुद्धधर्म, ख्रिस्तीधर्म व इस्लामधर्म अशी यांची कालानुक्रमानें नांवें देतां येतील. बाकीचे आठ धर्म आपापल्या मूळ अनुयायांतच समाधान मानून राहणारे पारंपारिक अथवा विशिष्टदेशमर्यादित असे आहेत.

(६) देवतांच्या विशिष्ट स्वरूपाच्या कल्पनेमुळें झालेली धर्मांची वांटणीः—

सहा धर्म ठसठशीतपणानें सगुण परमेश्वर मानणारे आहेतः—शीख, टाओ, यहुदी, झारोस्ट्रियन, ख्रिश्चन व इस्लाम हे ते सहा धर्म होत. बुद्ध व जैन हे दोन धर्म परमेश्वराच्या स्वरूपाविषयीं स्पष्टपणानें कांहींच सांगत नाहींत. हिंदुधर्म, कान्फ्यूशियन व शिंटो, हे धर्म

बहुदेवतावादी आहेत व सृष्टिपूजेच्या कल्पनेंतून ते अवतीर्ण झाले आहेत.

(७) कोणता धर्म किती देवांना मानतो यावरून केलेली वर्गवारीः—

जगांतील कांहीं विद्यमान धर्म निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या देवता मानीत असलेले दिसतात. उदाहरणार्थः-प्रथम यहुदी धर्म आपला पुण्यशील देव (येहोवा) याच्याशी एकनिष्ठ होता; पण त्यांतून पुढें कालांतरानें तो धर्म अखिल विश्वाचा एकच परमेश्वर आहे, या कल्पनेपर्यंत जाऊन भिडला. शिवाय येहोवाचा अनन्यभक्त म्हणून जरी त्या धर्माची ख्याति होती, तरी इतर राष्ट्रांना आपापल्या देवतांची अनन्यभक्ति करण्याचा हक्क आहे, असेंही तो धर्म मानीत असे. त्याचप्रमाणें हिंदुधर्म अनेक देवतात्मक सृष्टिपूजेच्या कल्पनेंतून जात जात शेवटीं जनतेंत रूढ झालेल्या अनेक देवतांच्या मूर्तिपूजेपर्यंत जाऊन पोंचला; आणि इतकेंही करून एकमेव परमेश्वराची तात्त्विक कल्पना त्यानें कधींही सोडून दिलेली नाहीं.

ही दृष्टि पुढें ठेवून थोडक्यांत असें सांगता येईल कीं, शीख, यहुदी, ख्रिश्चन व इस्लाम हे चार धर्म स्पष्टपणें ईश्वर एकच आहे असें म्हणणारे आहेत. झोरास्ट्रियन धर्म हा जवळ जवळ एकेश्वरवादी आहे. आतां या धर्मांतील आध्यात्मिक कल्पना द्वैतप्रतिपादक असून

त्यातील धर्मग्रंथांत अनेक असुरांची पूजा सांगितली आहे हा भाग निराळा. बाकीचे सहा धर्म बहुतेक अनेक देवतावादी आहेत.

(८) संस्थापकांच्या व्यक्तित्वावरून झालेली धर्मांची विभागणी—

धर्मसंस्थापक पुरुष तीन तऱ्हांनीं संस्मरणीय झाले आहेतः—धर्माचे उत्पादक म्हणून, धर्मांतील आदर्श पुरुष म्हणून व धर्माचे उपदेशक म्हणून, तीन धर्मांनीं स्वतः आपल्या संस्थापकांचीं नांवें स्वतःला लावून घेतलीं आहेत. कान्फ्यूशियस महंमद व झोरास्टर या तिघांच्या नांवांनीं, त्यांनीं प्रचलित केलेले धर्म आज ओळखिले जातात.

तीन धर्म आपल्या संस्थापकांना मिळालेल्या पदव्यावरूनच प्रसिद्ध आहेतः—जैन धर्माचा संस्थापक महावीर याच्या जिन म्हणजे जिंकणारा, या पदवीवरून त्यानें स्थापिलेल्या धर्माला जैन हें नांव मिळालें. बुद्धधर्माचा संस्थापक गौतम याला मिळालेल्या, बुद्ध म्हणजे संपूर्ण ज्ञानी, ह्या पदवीवरून त्यानें स्थापिलेल्या धर्माचें बौद्धधर्म असें नांव पडलें. ख्रिस्तीधर्मसंस्थापक येशू याला प्राप्त झालेल्या ‘ ख्रिस्त ’ म्हणजे धर्मदीक्षित या पदवीवरून त्याच्या धर्मालाही ख्रिश्चन म्हणूं लागले. चार धर्मांचीं नांवें त्यांच्यांत केलेल्या मुख्य उपदेशावरून पडलीं:— ‘ टाओ ’ म्हणजे परमेश्वराचा मार्ग. यावरून टाओ—

धर्म हें नांव; 'शिंटो' म्हणजे देवांचा मार्ग यावरून शिंटो-धर्म हें नांव, 'इस्लाम' म्हणजे शरण जाणें ह्यावरून इस्लामधर्म हें नांव, व 'शीख' म्हणजे चेला या शब्दावरून शीखधर्म हें नांव, अशीं या धर्मांचीं नांवें पडलीं.

१२ धर्मांच्या खऱ्या योग्यतेवरून व त्यांच्या दृष्टिबिंदूवरून केलेलें वर्गीकरणः

आपल्यांतील प्रत्येक व्यक्तीला आणि सामान्यतः मनुष्यसमाजाला उन्नति करण्याकरितां जास्त संधि देणें, व त्यावर जास्त जबाबदारी टाकणें, या दोन गुणांच्या कसोटीवरून केलेली धर्मांची वर्गवारी सर्वांत उत्तम. वरील अकरा विद्यमान धर्मांपैकीं प्रत्येक धर्म मनुष्याच्या व समाजाच्या योग्यतेचें माप अवश्य कांहीं तरी ठरवीत असलेला दिसतो. बहुतेक ख्रिश्चनेतर धर्म वैयक्तिक मोक्षाच्या पाठीमागें लागलेले दिसतात. आणि पुन्हां मौज ही कीं, हे धर्म मनुष्य व्यक्तीचीं किंमत फारच अल्प आहे असेंही मानतात. इस्लामधर्म हा वरील गोष्टीला अपवाद असल्यासारखा वाटतो ; कारण त्या धर्मांत धर्मप्रचाराची जोराची प्रवृत्ति आढळून येते. पण ही प्रवृत्ति आपल्या समाजाची इतर समाजावर सत्ता असावी ह्या हेतूनें प्रेरित झालेली दिसते. सहकारितेनें कार्य करून मोठ्या प्रमाणावर समाजाची उन्नति करण्याच्या बुद्धीनें ही प्रवृत्ति होत नाहीं, असें वाटतें.

ख्रिश्चनधर्म हा जगांत असा एकच धर्म आहे कीं, तो प्रत्येक व्यक्तीला परमेश्वररूपी पित्याचे लेकरूं मानतो, आणि सहकारी सेवेच्या पायावर वैयक्तिक व सामाजिक मोक्ष मिळवू पाहणारा असा जगांत हा एकच धर्म.

१३ धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करण्यापूर्वी आवश्यक असणाऱ्या गोष्टी

इतर विषयांत उपयुक्त म्हणून ठरलेल्या पद्धति तर धर्मांच्या अभ्यासाचे बाबतींतही जरूरीच्या आहेतच; पण इतर विषयांच्या मानानें जगांतील धर्मांच्या अभ्यासकांत अनेक गुणांचा असाधारण संयोग असण्याचीही जरूरी आहे. ह्या गुणांचा निर्देश पुढीलप्रमाणें करतां येईल:—

(१) शास्त्रीय चोखपणा हा गुण विशाल माहितीचा परामर्श घेतांना अवश्य असला पाहिजे. प्रत्येक धर्मग्रंथाचा अभ्यास काळजीपूर्वक केला पाहिजे. कोणत्याही धर्माविषयीं सरांस विधानें करणें, हें काम फार जोखमीचें आहे. तेव्हां अशीं विधानें अगदीं जपून केलीं पाहिजेत.

(२) प्रत्येक धर्मापासून त्या त्या धर्माच्या अनुयायांना वाटणाऱ्या समाधानाची जाणीव होण्याकरितां सहानुभूतीची वृत्ति असल्याशिवाय चालावयाचेंच नाहीं.

(३) विविध अनुभव व जीवनांतील विविध ध्येयें ह्यांची निरनिराळ्या धर्मांना वाटणारी निरनिराळी किंमत पारखण्याकरितां सूक्ष्म विवेचक शक्तीचा उपयोग अवश्य केला पाहिजे.

(४) जगांतील सर्व धर्मांतून इतस्ततः विखुरलेल्या मूल्यवान् वस्तूंना एकत्र करून, त्यांत मनोहर एकसूत्रीपणा उत्पन्न करण्याला विधायक व संग्राहक वृत्तीचा फार उपयोग होतो.

(५) आध्यात्मिक योग्यता जेथें जेथें आढळेल, तेथें तेथें तिच्यावर निर्भयवृत्तीनें विश्वास ठेवणेंही जरूर आहे. असें केल्यानें अभ्यासकाच्या अंतःकरणांत विश्वव्यापी सत्यस्वरुपी अशा परमेश्वराविषयींचा आदरभाव दुणावेल, आणि मानवी हृदयांतील धर्मविषयक आकांक्षेविषयींही त्यांचा आदर वाढेल.

(६) ख्रिश्चनेतर धर्म व व्यक्ति यांच्याकडे बघतांना खऱ्या ख्रिश्चनाला साजेलशी मनाची वृत्ति अवश्य पाहिजे. संशोधनाच्या क्षेत्रांत त्याचप्रमाणें इतर व्यवहारांतही खऱ्या ख्रिश्चनानें नव्या करारांत केलेला उपदेश कृतींत उतरविला पाहिजे :—

" प्रत्येक गोष्ट नीट तपासून पहा; व मग त्यांतली जी चांगली गोष्ट वाटेल तिला कधींही सोडूं नका. "
(१ थेसालोनियन्स ५:२१)

"अखिल मानवांनीं यथार्थतेनें सांगितलेल्या वस्तु आम्हां ख्रिश्चन लोकांच्याही मालकीच्या आहेत." (२ अॅपॉलॉजी १३:४) जास्टिन मार्टर यांची ही वरील उक्ति आजही खरी आहे.

जगांतील विद्यमान धर्मांचा तुलनात्मक अभ्यास प्रत्येक ख्रिश्चन मनुष्याच्या जीवनाला व विचाराला हितकारकच ठरेल. अशा तऱ्हेचा अभ्यास मनापासून करणाऱ्या कोणाही व्यक्तीला तो हितप्रद झाल्यावाचून राहणार नाहीं.

प्रकरण दुसरें.

हिंदुधर्म.

ईश्वराचें सर्वव्यापित्व आणि जन्मजात उच्चनीचभावात्मक समाजरचना प्रतिपादणारा धर्म.

१ प्रास्ताविक—

जगांतील विद्यमान धर्मांत हिंदुधर्माचें स्थान.

बहुधा ख्रिस्तपूर्व १५०० पासून आस्तित्वांत आलेला हिंदुधर्म विद्यमान प्रतिष्ठित धर्मांपैकीं सर्वांत जुना आहे. तसेंच तो अत्यंत मोठ्या (संख्येच्या दृष्टीनें) धर्मांपैकींही एक आहे. कारण त्याच्या अनुयायांची संख्या एकवीस कोटी सत्तर लक्ष आहे. लोकसंख्येच्या नैसर्गिकरीत्या होणाऱ्या वाढीमुळें दर दहा वर्षांनीं या धर्माच्या अनुयायांची जवळ जवळ दहा लाख संख्या वाढत आहे. हिंदुधर्म हा जन्मजात धर्म असून त्याची व्याप्ति हिंदुस्तानच्या आंतच आहे. दुसऱ्या धर्मांतून आपल्या लोकांना ओढणारे असे ख्रिश्चन व इस्लाम हे दोन धर्म, दिवसेंदिवस हिंदुधर्मांतून जास्तजास्तच लोक आपल्यांत ओढीत आहेत; त्यामुळें अर्थातच जगांतील लोक-

संख्येशी हिंदुधर्मीयांच्या संख्येचें प्रमाण उत्तरोत्तर कमी होत चाललें आहे.

जातिसंस्थेच्या दृष्टीनें जगांतील सर्व धर्मांत हिंदुधर्म अगदीं अपूर्व आहे. ऐतिहासिक कालापासून हिंदुधर्मांत मुख्य चार जाति आढळतात. या जातींत आपापसांत बेटीव्यवहार तर दूरच राहिला, पण रोटी व्यवहारही निषिद्ध मानला आहे. या जातींतील प्रत्येक व्यक्तीनें आपापला परंपराप्राप्त धंदाच केला पाहिजे, असा हिंदुधर्माचा कटाक्ष आहे. एकाहून एक कमी दर्जाच्या असलेल्या अशा या चार जाति (वर्ण) पुढीलप्रमाणें आहेत.

(१) ब्राम्हण, (२) क्षत्रिय, (३) वैश्य, (४) शूद्र, यापैकीं ब्राह्मण जाति ह्मणजे धार्मिक कृत्यें व विद्या यांवर उपजीविका करणारा वर्ग होय. राज्य चालविणाऱ्या व युद्धधर्म करणाऱ्या लोकांचा वर्ग ह्मणजे क्षत्रिय जाति. सामान्य शेतकरी वर्ग व कारागिर वर्ग या दोन वर्गांची मिळून वैश्य जाति बनलेली आहे. याहून खालच्या दर्जाचे लोक शूद्र जातींत येतात. या चार जातींत उत्तरोत्तर पोटजाति निर्माण होऊन, आज त्याच्या अठ्ठावन जाति झाल्या आहेत. प्रत्येक जातींत स्थूलमानानें दहा लाख लोक आहेत. एकंदरींत एकमेकापासून अगदीं अलग अशा दोन हजार पोटजाति सध्यां हिंदुधर्मांत नांदत आहेत.

आपल्या अनुयायांच्या धर्मश्रद्धेची विविधता व अस्पष्टपणा ह्या बाबतींत हिंदुधर्म जगांतील सर्व धर्मांत एक न्याराच धर्म आहे

" ह्या देशांत (हिंदुस्थानांत) माझा धर्म अमुक आहे, असें सांगताना कोणालाच संकोच वाटत नाहीं. प्रत्येक धर्मपंथ जर स्पष्ट निश्चित व दुसऱ्याहून अगदीं अलग असता, तर त्या त्या धर्मपंथांतील लोकसंख्या नक्की मिळवायला अडचण पडली नसती. या देशांत शेजाऱ्याचा धर्म कोणता आहे, हें जाणण्याची कुणालाच परवा नसते; पण शेजाऱ्याशीं मला रोटीव्यवहार करतां येईल कीं नाहीं, किंवा त्याच्या हातचे पाणी मला चालेल कीं नाहीं, याची मात्र प्रत्येकजण कसून चौकशी करतो. (जनरल रिपोर्ट ऑफ धि सेन्सस ऑफ इंडिया १९११ पान ११३) ईश्वराचे बाबतींत हिंदूंची मुख्य भावना अशीं आहे कीं या विश्वांत एक सर्वव्यापी परमेश्वर असून त्याचेंच नांव ब्रह्म. पण ईश्वराचें हें सर्वव्यापित्व हिंदूंच्या धर्मग्रंथापैकीं अत्यंत प्राचीन असें जे वेद व ब्राह्मण हे द्विविध ग्रंथ त्याच्यांत मुळींच सांपडत नाहीं. खरें सांगायचें ह्मणजे प्राचीन परंपरेंतलि हिंदुलोक अनेक देवतावाद, सर्वव्यापी देववाद सर्व कांहीं मानतात. ज्यांना जो देव आवडेल त्याची ते पूजा करतात अथवा तसेंच सांगायचें ह्मणजे कोणत्याहीं देवाची ते पूजा करीत नाहींत. नीतीचा कोणताही आदर्श त्यांना आचाराचे बाबतींत खुशाल चालतो. किंवा नीतीचा आदर्श त्यांच्यापुढें नसला, तर त्यांचें कांहीं आडत नाहीं. जोपर्यंत ते जातींच्या नियमांचा उघड उघड भंग करीत नाहींत, तोपर्यंत प्रतिष्ठित धार्मिक माणसांत त्यांची गणना होते; पण जर का जातिनियमांचा भंग करण्याचा गुन्हा कोणी केला, तर मात्र त्यांनीं त्याला वाळींत टाकलेच ह्मणून समजा.

(धर्म ३)

भिन्नप्रकृतीच्या पण धर्मभावनेनें परस्पर संबंध असलेल्या लोकांची जी एक हळुहळु आजकाल विचित्र प्रकारची वाढ होत आहे त्यालाच हिंदुधर्म म्हणता येईल. या धर्मांत विविधता हवी तितकी आहे. तरीपण सर्वांतर्यामी, सर्वव्यापी, सर्वपावन, अशा एका परमात्म्यावर सर्वांचाच विश्वास असल्यामुळें ह्या धर्मांत एक प्रकारचा एकसूत्रीपणाही आहे. जातीचे द्वारा सर्व व्यक्तींवर हा धर्म सामाजिक सत्ता चालवीत असल्यानें या धर्मांत एकत्वाची भावना प्रादुर्भूत झाली आहे. हिंदुधर्माच्या पोटांत कमींत कमी सहा निरनिराळे पंथ विकास पावले आहेत, व त्यांचा उल्लेख त्या त्या पंथाच्या ग्रंथांतून आढळतो. हे सर्व ग्रंथ संस्कृतांत लिहिले आहेत. अर्वाचीन हिंदु-युरोपीय भाषांच्या आजीपणाचा मान या संस्कृत भाषेला देतां येईल. हिंदुधर्माची सांगोपांग व प्रमाणभूत माहिती त्यांतील इतिहासप्रसिद्ध धर्मग्रंथाच्या अवलोकनानें मिळवितां येते.

२ प्राचीन सृष्टिपूजा; चार वेद
(ख्रिस्तपूर्व १००० वर्षांपूर्वी)

हिंदूंच्या सर्व धर्मग्रंथांना वेद हें व्यापक नांव देण्यांत येतें. वेद ह्या शब्दाचा अर्थ ज्ञानपूर्ण ग्रंथ. हिंदुधर्मांतील निरनिराळ्या शाखांचे निरनिराळे विशिष्ट वेद आहेत. प्राचीनतम चार वेद म्हणजे पहिला ऋग्वेद (सूक्तांचा अथवा ऋचांचा वेद), दुसरा यजुर्वेद (पवित्र विनियोग मंत्राचा वेद), तिसरा सामवेद (गीतांचा वेद) व चवथा अथर्ववेद (जारण मारणाचा वेद) या चारांपैकीं ऋग्वेद अत्यंत महत्वाचा वेद आहे. खरें सांगायचें म्हणजे जगांतील सर्व धर्मांच्या

धर्मग्रंथांत अत्यंत प्राचीन ग्रंथ ऋग्वेद हाच होय. वेदानंतरचे धर्मग्रंथ, व प्राचीन परंपरेंतील लोक असे मानतात कीं, ऋग्वेद हा सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वीं निर्माण करण्यांत आला आहे. युरोपीय अभ्यासकांनीं ऋग्वेद खिस्तपूर्वीं २००० पासून खि. पू. १००० पर्यंतच्या काळांत केंव्हांतरी रचला आहे. असें ठरविलें आहे. ऋग्वेदांत एकंदर १०२८ सूक्तें आहेत. हीं सर्व मिळून हिब्रू धर्मग्रंथ जो साल्टर त्याच्या पांचपट मोठी भरतील. हिंदु लोक असें मानतात कीं, ऋग्वेद हा ग्रंथ अक्षरशः प्रमाणभूत ग्रंथ आहे; त्यांत चूक संभवतच नाहीं. हिंदुलोकांनीं मुखपाठाच्या परंपरेनें ऋग्वेद संहितेचें रक्षण करण्याचें असें कांहीं अपूर्व यश संपादन केलें आहे कीं ग्रीक भाषेतील मूळ नवा करार व हिब्रू भाषेतील मूळ जुना करार यांच्यांत आज जितके पाठभेद आढळतात त्याच्यामानानें कितीतरी कमी पाठभेद ऋग्वेदांत आढळतात. ऋग्वेद संहितेतील गायत्री मंत्राची ऋचा तर खिस्तीधर्माहून निदान हजार वर्षांनीं जुनी आहे. ही ऋचा अजूनही उच्चवर्णीय हिंदुलोक दररोज सकाळीं सूर्याची प्रार्थना करताना म्हणतात.

ह्या ऋचेचा अर्थ येणेंप्रमाणें:—

"प्रकाशमान सवित्याच्या स्पृहणीय तेजाचें आम्ही ध्यान करतों. तें तेज आमच्या बुद्धीला प्रेरणा करो." (ऋग्वेद ३–६२–१०).

प्राचीन हिंदूच्या धर्मग्रंथावरून असें दिसतें कीं या ग्रंथाचे काळांत हिंदुधर्मांत सृष्टिपूजा मोठ्या प्रमाणांवर प्रचलित होती. ऋग्वेदांत निरनिराळ्या सुमारें ७६ देवतांना उद्देशून प्रार्थना व

स्तुति केली आहे. यापैकीं बहुतेक देवता निसर्गाच्या विविध शक्ति आहेत. या शक्तीनाच ऋग्वेदांतील कवींनीं सगुण देवतांचीं रूपें दिलीं आहेत. सूर्य, चंद्र, आकाश, वायु, पर्जन्य, पृथ्वी, मरुत्, अग्नि ह्या, ऋग्वेदांतील कांहीं देवता. वैदिक देवतांपैकीं सर्वांत महत्वाची देवता म्हणजे इन्द्र. ह्या व इतर देवतांची प्रार्थना करताना " आम्हाला दीर्घायुष्य, पुत्रपौत्र, धनधान्य, आरोग्य, शत्रूंवर विजय, आणि ऐहिक समृद्धि दें " अशाच तऱ्हेची इच्छा बहुधा ऋषींनीं प्रकट केली आहे. तरीपण खिस्तापूर्वीं हजार वर्षांहून जास्त जुन्या असलेल्या या आर्यांच्या धर्मग्रंथात (ऋग्वेदांत) कांहीं ठिकाणीं उदात्त नैतिक कल्पना असल्याचें दिसून येतें. दोन आकाशदेवतेंपैकीं एकाचें नांव ऋग्वेदांत द्यौःपिता म्हणजे स्वर्गरूपी पिता असें आढळतें. उदाहरणार्थः—

" स्वर्ग हा माझा पिता—जनक आहे
माझ्या उत्पत्तीचें मूळ हाच " (ऋग्वेद १-१६४-३३)

द्यौःपिता ह्याला वरील ऋचेंत जनक असें म्हटलें आहे. तें व्यवहारातील जनक या दृष्टीनेंच बहुधा म्हटलें असावें; कारण हा पिता पृथ्वीमातर म्ह० पृथ्वीरूपी माता या नांवाच्या स्त्रीदेवतेशीं संयुक्त असल्याचें ऋषींनीं कल्पिलें आहे.

नीतिदृष्ट्या वेदांतील अत्युच्च देवता म्हणजे वरुण (म्ह० चोंहोंबाजूंनीं व्यापून टाकणारा स्वर्ग) स्वर्गाच्या (म्ह० वरुणाच्या) सर्वज्ञत्वाचें व सर्वव्यापित्वाचें वर्णन करणारें एक सूक्त आहे. त्या सूक्ताचा, चारीवेदांतील सूक्तांत अत्यंत सुंदर सूक्त म्हणून कदा-

चित् निर्देश करता येईल (अथर्व४।१६) या सूक्ताचें १३९·७-१० या बायबलातील सामाशीं विलक्षण साम्य आहे. मात्र या सूक्ताची शत्रूना शाप देणाऱ्या ऋचेनें समाप्ति केली आहे ! अर्वाचीन हिंदुधर्मांत या वरुण वगैरे देवता लुप्त होऊन गेल्या आहेत; तथापि मूळची ही सृष्टीपूजा व निसर्गशक्तीविषयीं वाटणारें भय ह्या गोष्टी अजूनही हिंदुधर्मांत शिल्लक राहिल्या आहेत.

ऋग्वेदांत फक्त एकाच ठिकाणीं चातुर्वर्ण्याचा उल्लेख आला आहे. सुमारें हजार वर्षां पूर्वीच्या या हिंदुच्या प्राचीन धर्मग्रंथांत हे चार वर्ण विराट्स्वरूपी आदिपुरुषाचीं वर पासून खालपर्यंतचीं अवयवें आहेत असें कल्पिलेलें दिसतें. उदा०—

“ ब्राह्मण हा या आदिपुरुषाचें मुख
क्षत्रिय हा या आदिपुरुषाचा बाहु
वैश्य हा या आदिपुरुषाची मांडी
आणि या आदिपुरुषाच्या पायापासून उत्पन्न झालेला शूद्र ”

ऋग्वेद १०:९०:१२

ऋग्वेदाच्या मतें मोक्षाचा मुख्य उपाय देवतांची प्रार्थना हा आहे.

(३) पुरोहित प्रधान हिंदुधर्मः ब्राह्मणग्रंथ
(१००७ ते ८०० ख्रिस्तपूर्व)

आर्यलोकांनीं हिंदुस्तानावर पहिली स्वारी करून तेथील मूळ रहिवाश्यांशीं ज्या लढाया केल्या त्यांचेबरोबर प्रार्थना व यज्ञ हीं ही हिंदुस्तानांत घुसली. पुढें पुढें तर हे यज्ञ अनेक दिवस चालविण्याची प्रथा जोरानें सुरु झाली; व यज्ञाची प्रक्रिया अगदीं एका

साच्यांत बसविण्यांत आली. वर सांगितलेल्या मोहिमेत आर्यलोकांना जो जय मिळाला व त्याचबरोबर त्यांच्या धर्माचा जो विजय झाला त्यामुळें वैदिकधर्माला स्थैर्य प्राप्त होऊन त्याला एकप्रकारचें कायम स्वरूप मिळालें. वैदिककालीं असलेले धर्माचें साधें स्वरूप जाऊन त्याला श्रेष्ठकनिष्ठ भावाचें स्वरूप प्राप्त झालें. गुंतागुंतीचें व किचकट क्रियाकाण्ड त्यांत शिरलें. अनेक पार्थिव वस्तु आहुतींच्या यादींत आल्या. यज्ञात पशूंची सुद्धां आहुति देण्यांत येऊं लागली. आणि हा सर्व प्रकार ब्राह्मणांनीं आपल्या अधिकारांत सुरू केला.

अर्थात् या सर्वांना साजेलसें नवें साहित्य निर्माण झालें. नवा धर्म सुरु झाला. ब्राह्मणग्रंथ (म्ह० पुरोहित कर्माचे ग्रंथ) हे या नूतन धर्माचे प्रचंड गद्य ग्रंथ होत. या ग्रंथांत मुख्यत्वेंकरून धर्मानें विहित अशा अनेक यज्ञाविषयीं दिलेल्या सूचनांचा भरणा आहे आणि जुन्या धर्मकथांचाही यांत संग्रह आहे. जगातील साहित्यापैकी आज उपलब्ध हिंद–युरोपीय गद्य लिखाणांत हिंदूंचे हे ब्राम्हण ग्रंथ अत्यंत प्राचीन होत.

ब्राह्मण ग्रंथांचा मुख्य भर म्हणजे यज्ञावर.

"खरोखर जर ब्राम्हणांनीं यज्ञ केला नाहीं तर सूर्य उगवणार नाहीं"

(शतपथ ब्राह्मण २. ३. ५; से. बु. ई. १२:३२८)

ह्या सर्व यज्ञांत अश्वमेघ यज्ञ हा अत्यंत श्रेष्ठ पण भारी किचकट आहे. हा पुरा व्हायला एक वर्ष लागतें. ह्याच्या सुरवातीसच मुळीं ठरलेल्या अनुक्रमानें एकंदर ६०९ पशूंचा वध करावा लागतो. हा यज्ञ केल्यानें यजमानाला अपार सामर्थ्य व अनंत फल प्राप्त होतें, अशी समजूत आहे.

"जो हा अश्वमेध यज्ञ करतो त्याच्या सर्व कामना पूर्ण होतात त्याला जें मिळावेसें वाटतें तें मिळतें (से. बु. ई. ४४·३४७)
"सर्व पापाचें प्रायश्चित्त, सर्व रोगांवर रामबाण उपाय, असा हा अश्वमेध आहे, हा यज्ञ करणारा सर्व पापांपासून मुक्त होतो. (से. बु. ई. ४४-३२८)

दक्षिणा देऊन नेमलेल्या ऋत्विजांकरवीं करायच्या ह्या यज्ञांचें अत्यंत श्रेष्ठ धर्मक्रिया म्हणून जसें जसें प्रस्थ माजत चाललें तशी तशी जुन्या वैदिक देवतांची प्रतिष्ठा कमी होत चालली या देवता मूळच्या मर्त्य पण यांनीं यज्ञ केल्यामुळें या अमर्त्य झाल्या असें उघड उघड मानण्यांत येऊं लागलें. (से. बु. ई. ४३-३५६-३५७) फार काय सांगावें ह्या यज्ञांचें क्रियाकाण्ड व विधिविधान जाणणाऱ्या ब्राम्हण पुरोहितांना या वैदिक देवतांच्या तोलाचा मान मिळूं लागला. 'ऋत्विजाना दक्षिणा दिल्याखेरीज स्वर्ग मिळायचाच नाहीं' अशा तऱ्हेचा जो अधिकार ब्राह्मणग्रंथांनीं या ऋत्विजांना दिला त्याला जगांतील कोणत्याही धर्मग्रंथांत तोड सापडायची नाहीं.

या ब्राह्मणग्रंथांनीं कांहीं नवे प्रकार धर्मांत घुसडले ते आजपर्यंत हिंदुधर्मांत कायम राहिले आहेत. उच्चनीच भावावर अधिष्ठित झालेल्या व मुख्यस्थान ब्राह्मणाना देणाऱ्या चातुर्वर्ण्याचा जसजसा जास्त जोरानें पुरस्कार होऊं लागला; तसतशी शूद्रांची अवहेलना होऊं लागली; इतकी कीं त्याजातशिी देव ब्राह्मण हे बोलेनासे झाले. (से. बु. ई. २६-४) गोमांसभक्षणाचा निषेध याच सुमारास हिंदुधर्मानें प्रथम सांगितला. (से. बु. ई. २६-११)

पत्नीनें पतीशीं सहभोजन करता कामा नये, असा निषेध प्रथम याच सुमारास सांगण्यांत आला. पुर्नजन्माची कल्पनाही अगदीं स्पष्ट शब्दांत याचवेळीं प्रथम पुढें मांडण्यांत आली.

तथापि ब्राह्मणग्रंथांनीं ज्या विशिष्ट धर्माचा विकास केला त्या पुरोहितप्रधानधर्माला याचवेळेपासून आजपर्यंत सुमारें २७०० वर्षें हिंदुधर्मांत अढळ स्थान मिळालें आहे. स्वर्ग अथवा मोक्ष हा ब्राह्मणपुरोहितांनीं केलेल्या यज्ञयागांचे द्वारा मिळतो, असें ब्राह्मण-ग्रंथांत प्रतिपादलें आहे.

४ तत्त्वज्ञानप्रधान हिंदुधर्म (उपनिषदें ८०० ते ६०० ख्रिस्तपूर्व)

तत्वज्ञानाच्या गहन विचारांची आवड हें हिंदूचें एक शाश्वत लक्षण मानतां येईल. ऋग्वेदासारख्या प्राचीन ग्रंथांतूनही विश्वाच्या उत्पत्तीसंबंधीं प्रचलित असलेल्या कित्येक ध्यानांत ठेवण्याजोग्या कल्पना आढळतात. ह्या कल्पनांच्या रूपानें हिंदूंचा वर सांगितलेला विशेष (अथवा शाश्वतलक्षण) प्रथम प्रकट झाला. पण हिंदुधर्म-ग्रंथाचा तिसरा गट जे उपनिषद् ग्रंथ त्यांत तर हा विशेष उत्कट-त्वानें दिसून येतो. हीं उपनिषदें म्हणजे गुरुसमीप बसून तत्त्व-ज्ञानासंबंधीं चालविलेली चर्चा ज्यांत आहे असें ग्रंथ. त्याकाळीं तरुणलोकांना व स्त्रियांनाहीं या तत्त्वचर्चेची रुचि असल्याचें ह्या ग्रंथावरून दिसून येतें.

ह्या उपनिषदांच्या रूपानें हिंदुधर्माचा एक नवाच प्रकार उदय पावला असें म्हणता येईल. ब्रह्मविषयक विविध कल्पना हें ह्या नवो-दित हिंदुधर्मांचें केंद्र ह्मणतां येईल. जुन्या वैदिक ब्राह्मणधर्मांत

ब्रह्म शब्दाचें 'प्रार्थना' 'मंत्र' 'पवित्र ज्ञान' असे अनेक अर्थ आहेत. पण उपनिषदांत हा शब्द 'विश्वाचें आदिकारण परमात्मा' या अर्थींच योजिला आहे. वैदिक देवतांना या ब्रह्माचा मुळींच ठाव लागलेला नाहीं, असें खुद्द उपनिषदांत ह्मटलें आहे. तत्वज्ञानाच्या विचारांचा प्रवाह अनेक वळणें घेत घेत, या काळीं वहात चालला होता. ह्या वळणाचें थोडक्यांत स्वरूप असें आहे:—

सर्व वैदिक देवता, किंबहुना सर्व वस्तु व सर्व घटना हीं विश्वाच्या गाभ्यांत असलेल्या परमात्मशक्तीचींच व्यक्त स्वरूपें आहेत असें समजावें. वैदिकधर्माच्या जुन्या सांप्रदायिक भाषेंत बोलायचें ह्मणजे ह्या शक्तीला प्रार्थनेची शक्ति असें ह्मणतां येईल; पण तत्वज्ञान दृष्ट्या ब्रह्म हें निरवधि, अनंत, शाश्वत, सर्वव्यापि अमूर्त, अनिवर्चनीय असें एक तत्व आहे. याला आत्मा अथवा जगदात्मा असेंही ह्मणता येईल. याच परमात्म्यांत जीवात्म्याचा लय होतो. उपनिषदांतील, अगदीं सर्वांच्या तोंडीं असलेला मंत्र ह्मणजे "तत्त्वमसि" हें महावाक्य. याचा अर्थ "तूं तें आहेस" या मंत्राची छांदोग्योपनिषदांत नऊदा आवृत्ति झाली आहे.

> हें ब्रह्मज्ञान वैदिक सर्वदेवतावादाच्या ज्ञानाहून श्रेष्ठ आहे असेंही ह्मटले आहे. "अशारीतीनें 'मी ब्रह्म आहे' असें जाणणारा सर्वव्यापी-ब्रह्मरूप होतो. त्याला ब्रह्मरूप न होऊं देण्याचें सामर्थ्य खुद्द देवांतही नाहीं, कारण ब्रह्मज्ञानी मनुष्य ह्या देवांचाही आत्मा झालेला असतो." (ह्यूमः— थर्टीन प्रिन्सिपल उपनिषद्स ८३-८४;से. बु. ई. १५:८८)

ह्या अनंत शाश्वत ब्रह्माच्या तुलनेनें पहातां सविकार, समर्याद अशा या नामरूपात्मक विविध विश्वाला स्वप्न अथवा माया ह्मटले पाहिजे. तेव्हां तत्त्वतः सांगायचें ह्मणजे " मी आत्मा आहे व सर्व विकारांपासून किंबहुना पुनर्जन्मापासूनही मी मुक्त आहे; परमात्म्याशी माझा संपूर्ण अभेद आहे; " अशी अत्यंत निष्क्रिय व प्रशांत राहून होणारी जी जाणीव तोच मोक्ष.

व्यवहाराचे दृष्टीनें मात्र असें सांगतां येईल कीं, जीवाशिवाचें ऐक्यज्ञान होण्याला, योगमार्गाचा अवलंब करून समाधि लावणें ह्याच पद्धतीची मदत घ्यायला हरकत नाहीं. आपल्या हृदयांत व्यापून राहिलेल्या निरातिशयानंदस्वरूप, अत्यंतनिष्क्रिय, शाश्वत, अनिर्वचनीय, अशा ब्रम्हाचें एकाग्र ध्यान करण्याकरता सर्व इंद्रियांचे व्यापार थांबविले पाहिजेत, किंबहुना श्वासाचाही निरोध केला पाहिजे असें उत्तरकालीन उपनिषदांत सांगितलें आहे.

हिंदुधर्मांत नीतिदृष्ट्या चांगले अथवा वाईट, पाप अथवा पुण्य, ह्यांत कांहीं फरक नाहीं; कारण ह्या धर्मांत जीवात्म्याचें प्रशांत, असामान्य,अनाकलनीय अमूर्त अशा परमात्म्याशीं संपूर्ण ऐक्य आहे, असें सांगितलें आहे. (ह्यूम–कृत थ. प्रि. उ. १३६, १४३, १४४, १६९, २७६, २७७, २९९, ३००)

"'खरोखर अशा ब्रह्मवेत्याल ' मी पुण्य कां बरें केलें नाहीं ?' असा विचारही जाचत नाहीं, अथवा ' मी पाप कां बरें केलें ?' ह्याही विचाराची टोंचणी मनाला लागत नाहीं. ब्रह्मवेत्त्याला ह्या दोन्हीही प्रकारचे विचार स्पर्श करीत नाहींत. कारण खरोखरी हें

ब्रह्म जाणणाराला पुण्य अथवा पाप ह्यापैकीं कशाचाही लेप लागत नाहीं—हें गूढ औपनिषदिक ज्ञान आहे.

औपनिषादिक हिंदुधर्मानें मुळांतील चातुर्वर्ण्य कायम राखिलें आहे. फरक येवढाच कीं, हें चातुर्वर्ण्य ईश्वरकृत (ब्रह्मकृत) आहे असें उपनिषदें मानतात. तरीपण सर्वव्यापी परमात्म्याचें ध्यान केल्यानें मोक्ष मिळतो हीच उपनिषदांची मुख्य शिकवण.

५ शास्त्रबद्ध हिंदुधर्मः मनूचें धर्मशास्त्र (खि. पू० २५०)

ऋग्वेदादि चार वेद हा एक गट, ब्राह्मणग्रंथ हा दुसरा गट व उपनिषदें हा तिसरा गट, ह्या तीन गटांतील तीन प्रकारच्या ग्रंथांनीं निरनिराळ्या तीन प्रकारच्या स्वभावाच्या लोकांना हिंदुधर्माचे तीन निरनिराळे प्रकार सांगितले आहेत. ऋग्वेदादि वेदग्रंथांनीं हिंदुधर्म ह्मणजे प्रार्थना करणें, असें प्रतिपादलें आहे; यज्ञ करणें हेंच हिंदुधर्माचें मुख्य लक्षण असें ब्राह्मणग्रंथ सांगतात; तर तत्त्व-विचार हेंच हिंदुधर्माचें मुख्य स्वरूप असें उपनिषदें कंठरवानें घोषित करतात. आज हिंदुधर्मीय लोकांच्या जीवनांत धर्माची जागतीज्योत दिसत आहे याचें कारण त्या लोकांनीं सुमारें एकवीसशे वर्षांपूर्वीं या धर्माची एक बंधनकारक सामाजिकसंस्था उभी केली. ह्या संस्थेतील प्रत्येक वर्णाश्रमाच्या दैनिक जिवनाचीं कृत्यें आणि त्यांत पाळायचे निषेध यांच्या तपशीलवार आज्ञाही धर्मग्रंथात दिलेल्या आहेत. अशा आज्ञा दिलेल्या ग्रंथांना ‘ हिंदुधर्मशास्त्र ’ शी संज्ञा आहे. अशा अनेक धर्मशास्त्रग्रंथांत ‘मानवधर्मशास्त्र’ हा ग्रंथ

अत्यंत पूज्य व प्रभावशाली मानण्यांत येतो. आक्स्फोर्ड युनिव्हर्सिटींतील संस्कृतचे माजी प्रोफेसर सर मानियर विलियम्स आपल्या पुस्तकांत मानवधर्मशास्त्र उर्फ मनुस्मृति या ग्रंथासंबंधीं असें लिहितात कीं, "जगाच्या साहित्यांतील अत्यंत अपूर्व ग्रंथापैकीं हा एक आहे. ह्या ग्रंथांतील कांहीं नीतिवचनें खुद्द ख्रिस्तीधर्मांतील नीतिवचनांच्या तोडीचीं आहेत. (सर मानियर विलियम्सकृत 'हिंदुइझम' पृ. ५४; 'इंडियन वुइज्डम' २०४) मनुस्मृतीच्या बारा ही अध्यायांत अनेक उत्कृष्ट नीतिवचनें आहेत. उदाहरणार्थ, गुरु, माता, आणि पिता यांची आदर भावानें आज्ञा पाळणें ह्याविषयीं (मनु. २-२२५-२२९) पश्चात्ताप आणि पापाची कबुली (मनु. ११-२२८-२३१) प्रतिज्ञापालन (मनु.९।९९) पवित्र अन्नाचें सेवन (मनु. २: ५४-५६) न रागावता निमूटपणें दुःख सहन करणें याविषयीं; कठोर शब्द निमूटपणें सहन करावें; कोणाचाही अपमान करूं नये; रागावलेल्या मनुष्यावर आपण उलट रागावूं नये, दुसऱ्यानें शिव्याशाप दिले असतांही आपण त्याचें कल्याण चिंतावें. (मनुस्मृति ६।४७,४८)

तथापि, एकंदरीनें मनुस्मृति हा खास हिंदुधर्माचाच ग्रंथ मानला पाहिजे; कारण वेद हे पवित्र असून अत्यंत प्रभावशाली आहेत; अशी या ग्रंथाची शिकवण आहे. यज्ञ करणें, युद्धाला संमति देणें, उपनिषदांतील ब्रह्मज्ञानाची मुक्तकंठानें प्रशंसा करणें, पुनर्जन्मापासून मुक्ति कशी मिळविता येईल याचें प्रतिपादन करणें वगैरे विषय ह्या ग्रंथांत आलेले आहेत.

मनूनें चातुर्वर्ण्याचें मोठ्या विस्तारानें वर्णन केलें आहे. आपापले धंदे प्रत्येक वर्णानें करावें; चातुर्वर्ण्य परमेश्वरानें उत्पन्न केलें आहे व तें जगाच्या कल्याणा करतांच आहे असें मनू ह्मणतो. (मनू. १-३११,८७ ९३;१०:४५;११:२३६) ब्राह्मण वर्ण हा परमेश्वराचा श्रेष्ठ अवतार असल्यानें ब्राह्मणाचें स्थान चातुर्वर्ण्यांत कायमचें अत्युच्च आहे (मनु १:९३–१००; ९:३१७–३१९; ११:३५) शेवटच्या वर्णांतील जे शूद्र त्यांना मनूनें आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सर्वांत अधम स्थान दिलें आहे. (मनु० २:३९, १०३; ४:६१, ७९,८१; ८:४१३–४१७; ९:३३४–३३५; १०:५१–५६, १२१–१२५ १२९; ११:१३)

हिंदुधर्मात मनूनें कांहीं नवे प्रकारही सुरु केले. विशेषतः चार आश्रमांची व्यवस्था प्रत्येकाच्या धार्मिक जीवनांत प्रथमतः मनूनेंच सुरू केली. हे चार आश्रम ह्मणजे ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे होत. ब्रह्मचारी ह्मणजे अविवाहित विद्यार्थी;(२:६९-२४६) विवाह करून कौटुम्बिक जीवनाचा स्वीकार करणारा तो गृहस्थ (३:१,५,१६९) संसारापासून निवृत्त झालेला तो वान-प्रस्थ. (६:३३-९७) आणि उच्च धार्मिक जीवनाकरता सर्व संग-परित्याग करणारा तो संन्यासी. (६:३३-९७) हिंदूच्या या धर्मग्रंथांतच प्रथमतः देवळे व देवळातले पुजारी यांचा उल्लेख आला आहे, (२:१५२-१८०; ८:२४८; ९:२८०; २८५) मूर्तींचा स्पष्ट उल्लेख मनूंतच प्रथम आढळतो. (९:२८५) आणि मूर्तींविषयीं कांहीं अस्पष्ट उल्लेखही या ग्रंथांतच आढळतात. (४:३९, १३०,

१५३;७:५४;८:८७) शास्त्रविहित अन्न कोणतें व निषिद्ध अन्न कोणतें याचीही मनूनें यादी दिलेली आहे (५:११, १७) पापें व त्यावर प्रायश्चित्तें यांची क्रमवार यादी दिलेली येथें आढळते (११-४९, २६६) कांहीं प्रसंगीं बायकोलाही मारण्याचीही परवानगी मनूनें दिली आहे. (मनु ८:२९९;३००). वेदविरुद्ध वागण्याचे अलीकडील सर्व नवे प्रकार पाखंडी आणि त्याज्य होत असें मनू ह्मणतो. (१२:९५-९६). चातुर्वण्याचें नियम व इतर धार्मिक नियम पाळल्यानेंच मुख्यतः मोक्ष संपादन करतां येतो, असें मनूनें म्हटलें आहे.

६ भक्तिप्रधान हिंदुधर्म (भगवद्गीता) सुमारें इसवी सनाचें पहिलें शतक.

हिंदुधर्मीयांना व परकीयानांही अत्यंत पूज्य असलेल्या हिंदुधर्मांतील पवित्र ग्रंथांपैकीं भगवद्गीता हा एक ग्रंथ आहे. संस्कृतमधून इंग्रेजींत भाषांतररूपानें प्रथम प्रकट होणारा हाच ग्रंथ. संस्कृतज्ञ जुन्या इंग्रेजांपैकीं एका चार्लस विल्किन या नांवाच्या गृहस्थानें इसवी सन १७८५ मध्यें यांचें इंग्रेजी भाषांतर केलें. या भाषांतराला वारन हेस्टिंग्ज यानें प्रस्तावना लिहिली आहे. ‘स्वर्गीय गीता’ असें नांव देऊन सर एड्विन अर्नोल्ड यानेंही भगवतद्गीतेचें इंग्रेजी भाषांतर केलें आहे. “हें भाषांतर मी जर केलें नसतें, तर इंग्रेजी साहित्य दरिद्री राहिलें असतें” असें अर्नोल्डनें ह्मटलें आहे. हें भाषांतर हारवर्ड पुस्तकमालेंत छापलें आहे. हिंदूच्या या आवडत्या धर्मग्रंथाची आजपर्यंत इंग्रेजींत बाराचे वर भाषांतरें झालीं

आहेत. भगवद्गीता हे संवादात्मक काव्य आहे. युद्धाच्या प्रारंभींच्या रोमहर्षण प्रसंगानें या काव्याची सुरवात झाली आहे. भारतीय वीर अर्जुन पूर्वी कोणीही उपस्थित न केलेला प्रश्न प्रथमच उपस्थित करतो. युद्धांत मनुष्यवध करणें हें उचित आहे काय हा तो प्रश्न. अर्जुनाचा सारथी श्रीकृष्ण अर्जुनाच्या मनाला बोचत असलेल्या या शंकेचें निरसन करण्याकरतां आत्म्याचें अमरत्व व निर्लेपता या विषयावर अपूर्व विवेचन करतो. व त्या प्रसंगानें कठोपनिषदांतील पुढील प्रसिद्ध मंत्र प्रथमतःच उध्दृत करतोः—

"आत्मा कोणाला मारीत नाहीं अथवा मरत नाहीं. आत्म्याला जन्मही नाहीं व मरणही नाहीं. शस्त्रें त्याचा छेद करू शकत नाहींत; अग्नि त्याला जाळू शकत नाहीं; पाणी त्याला भिजवूं शकत नाहीं; अथवा वारा त्याला सुकवू शकत नाहीं. हें जाणून तूं आत्म्याकरता शोक करू नकोस. (गीता २:१९:२५) अर्थात् धर्मप्राप्त जें क्षत्रियाचें कर्तव्य तें त्यानें केलेंच पाहिजे.

'क्षत्रियाला धर्मानें प्राप्त झालेल्या युद्धाहून श्रेयस्कर असें दुसरें कांहींच नाहीं. तेव्हां आतां जर तूं धर्मयुद्ध करणार नाहींस तर कीर्ति आणि स्वधर्म या दोहोंनाही मुकल्यानें तुला पाप लागेल. (गीता २:३१, ३३).

भगवद्गीतेंतील मुख्य वक्ता ह्मणजे सारथ्याचें रूप धारण केलेला साक्षात् भगवान् श्रीकृष्णच होय. परमेश्वर एका विशिष्ट मानवाचें रूपानें अवतीर्ण होतो ह्या कल्पनेनें हिंदुधर्मांत भगवद्गीतेनंतर विलक्षण स्थित्यंतर घडून आलें आहे. श्रीकृष्ण 'साधूंच्या संरक्षणा

करता, दुर्जनांच्या विनाशा करतां आणि धर्माच्या स्थापनें करता मी अवतार घेतों (गीता ४:८) अशी घोषणा करीत आहेत.

"अनन्यभक्तीनें जो माझें पूजन करतो तो सर्व व्यवहार करीत असतांही माझे ठिकाणींच राहतो." (गीता ६:३१).

"अनन्यभावानें जे मला भजतात, ते माझ्याठायीं व मी त्यांचे- ठायीं असतो. तूं असें निश्चित समज कीं, माझा भक्त कधींही नाश पावत नाहीं (गीता ९:२९-३१). पापी जनांनाही मोक्षाचें द्वार खुलें असल्याचें जें भगवद्गीतेतील प्रतिपादनांत आलें आहे,तें हिंदु- धर्मांतील एक अपूर्व तत्त्व म्हटलें पाहिजे. (गीता ४:३६; ९:३०).

मोक्ष हा स्त्रियांना व नीच योनींतील शूद्रादिकांनाही मिळविता येतो असें गीतेनें स्पष्ट सांगितलें आहे (गीता ९:३२). तथापि, ऐतिहासिक परंपरनें चालत आलेलें हिंदुधर्माचें मुख्य स्वरूप जें चातुर्वर्ण्य त्याचा पुनरपि जोरानें पुरस्कार केलेला गीतेंत आढळतो. चातुर्वर्ण्याचें स्वरूप आणि कार्य हें न बदलणारें व जन्मजात आहे, ही गोष्ट जवळ जवळ मनूच्या शब्दांतच गीतेनें प्रतिपादिली आहे.

" शौर्य, तेजस्विता, धैर्य, दक्षता, युद्धांतून पळून न जाणें, दातृत्व, आणि प्रजेवर सत्ता चालविणें, हें क्षत्रियाचें स्वाभाविक कर्तव्य होय. शेती, गुरेंढोरें पाळणें, आणि व्यापार, हे वैश्यांचें स्वाभाविक कर्म. आणि सेवा करणें हें शूद्राचें कर्म" (गीता १८:४३:४४) भगवद्गीतेंतील नवदेवता श्रीकृष्ण यांनीं "चातुर्वर्ण्य मी उत्पन्न केलें आहे" (गीता ४:१३) अशी घोषणा केली आहे.

हिंदुधर्मांतील परंपरेनें चालत आलेल्या इतर बाबी, उदाहरणार्थ, वेदाविषयीं पूज्यबुद्धि (गीता २:४) जन्ममरणाचा फेरा चुकविणें हेंच मनुष्याचें अंतिमध्येय (गीता ४:९), इत्यादि भगवद्गीतेनें कायम राखिल्या आहेत. परंपराप्राप्त हिंदुधर्माचें उच्चाटन न करतां गीतेनें त्याच्यांत थोडी भर टाकली आहे. गीतेचा व्यावहारिक संदेश सरळ भाषेंत पुढीलप्रमाणें सांगतां येईल:–" स्वधर्मप्राप्त कर्मे करा व मोक्षाचे बाबतींत परमेश्वरावर भरंवसा ठेवा. " गीतेच्या मतें मुख्यतः सगुण परमेश्वराच्या भक्तीचे द्वाराच मोक्ष मिळविता येतो.

७ जनतेंतील हिंदुधर्मः इतिहास व पुराणें (इ. स. १ ते २५०)

हिंदुधर्माची मुख्य इमारत ख्रिस्ताच्या जन्मापूर्वीच उभारली गली होती. यापुढें त्याचा जनतेंत मात्र फैलाव होणें व कित्येक नवे धर्मपंथ उदयास येणें हीं कामें इसवी सनानंतर चालू राहिलीं. अत्यंत प्रभावशाली साहित्याच्याद्वारां हिंदुधर्माचा जनतेंत फैलाव करण्याचें कार्य ज्या ग्रंथांनीं केलें, त्यापैकीं शेवटचे दोन ग्रंथ म्हणजे रामायण व महाभारत हीं दोन ऐतिहास महाकाव्यें होत. महाभारतांत भारतीय युद्धाचें वर्णन केलें आहे; व रामायणांत भगवान् रामचंद्राचें चरित्र गायिलें आहे. याच सुमारास अठरा पुराणें उदयास येऊं लागलीं. पुराणें म्हणजे प्राचीन धर्मग्रंथांचा संग्रह. अथवा ' पुराण ' या शब्दाच्या मूळ अर्थाच्या दृष्टीनें सांगायचें म्हणजें 'जुन्या गोष्टी'.

धर्मग्रंथांत परिगणित असलेल्या सर्व गोष्टींचा जगद्व्याळ संग्रह म्हणजेच हा जनतेचा हिंदुधर्म. यांत दुसऱ्याही कांहीं बाबी आहेत. पैकीं कांहीं महत्त्वाच्या बाबी पुढें दिल्या आहेत.

जातिनियमाप्रमाणें एका जातीच्या मनुष्याला इतर जातीशीं अथवा स्वतःच्या पोटजातींशी कोणत्याही तऱ्हेचा निकट संबंध ठेवणें, बेटीव्यवहार आणि रोटीव्यवहार करणें ह्या गोष्टी निषिद्ध आहेत.

हिंदुधर्मांत अनेक संप्रदाय आहेत. पैकीं विष्णूची उपासना करणारा वैष्णवपंथ व शिवा (म्हणजे संहारक देवते) ची उपासना करणारा शैवपंथ अथवा शैवसंप्रदाय असे मुख्य दोन संप्रदाय आहेत. हिंदुधर्मांत निदान एकोणसाठ पंथ अथवा संप्रदाय आहेत. यावरून हिंदुधर्मांचे विविध प्रकार व नमुने दिसून येतात. आचार व तत्त्वज्ञान यांचेंही वैविध्य या सर्व पंथांतून दिसून येतें. मात्र या सर्व पंथांत सारखेपणा हा आहे कीं, सगुणपरमेश्वराचीच हे सर्व पंथ उपासना करतात. तथापि, या सगुणभक्तींतही परस्पर विरुद्ध दोन टोकें दृष्टीस पडतात. वल्लभाचार्यांचा विषयसुखाकडे झुकणारा वैष्णवपंथ, व जगत्संहारिणी कालीमाता ही उपास्य देवता मानून क्रूराचाराकडे झुकणारा शाक्तपंथ हीं तीं दोन टोकें.

हिंदुधर्मानें व्यापलेल्या हिंदुस्तानांत मूर्तिपूजा मोठ्या प्रमाणावर दिसून येते. मूर्तिपूजेंत मनुष्यरूप व पशुरूप घेऊन अवतीर्ण होणाऱ्या परमेश्वराच्या पूजेचे सर्व प्रकार येतात. योनिपूजा व लिंगपूजा याचाही मूर्तिपूजेंत अंतर्भाव झालेला आहे.

जनतेंतील हिंदुधर्मांत असंख्य देवळें व लहान मोठीं मंदिरें आढळतात. या सर्वांचा, ग्रामदेवता व मुख्य देवता यांची पूजा करण्याकडे उपयोग केला जातो. या देवळांतून (चालणारी)

पूजा बहुधा प्रत्येकजण स्वतंत्र करतो. बहुधा प्रत्येक व्यक्ति आपापल्यापुरती स्वतंत्र उपासना करते. मूर्तींना व पूजाविधि सांगणाऱ्या उपाध्यायांना अनेक पदार्थ भक्तगण अर्पण करतात. देवाला उजवी कडून प्रदक्षिणा घालणें हाही देवपूजेचा एक प्रकार आहे.

जनतेंतील हिंदुधर्मांत तीर्थस्थानें, क्षेत्रें, उत्सव व पर्वें यांचें प्रामुख्य दिसून येतें. अखिल हिंदुस्थानांतील पवित्र नद्या, पर्वत, व मंदिरें यांची यात्रा श्रद्धाळु यात्रेकरूंच्या टोळ्या नेहमीं करीत असतात. अनेक प्रकारचे उपासतापास, पारणीं, सण व पर्वोत्सव हिंदुलोक करतात. बीं पेरणें, पिकाची कापणी करणें व इतर शेतकीचीं कामें करणें ह्या सर्वप्रसंगीं हिंदुलोक धार्मिक विधि करतात. लौकिक हिंदुधर्म हा जन्म, विवाह, वगैरे प्रसंगीं करावयाचे संस्कार, मृतांकरता करावयाचा श्राद्धविधि, व अन्नग्रहणाचे नियम वगैरे सर्व प्रकार सांगत असल्यानें त्याचा जनतेच्या गृहजीवनाशीं अत्यंत निकट संबंध आला आहे. या धर्मांत धार्मिक स्नानें व प्रायश्चित्तें याचा सुळसुळाट आहे. पहिल्या तीन वर्णांतील वयांत आलेल्या प्रत्यक मुलाचा मौंजीबंधन संस्कार सांगितला आहे. यांत प्रत्येक मुलाच्या गळ्यांत एक तीन पदरी जानवें घालतात, तें त्यानें गळ्यांतून केव्हांही काढावयाचे नसतें.

लौकिक हिंदुधर्माचा खानपानाशीं अगदीं निकट संबंध येतो. या धर्माची उच्चवर्णीय हिंदूंनीं मादक पदार्थ सेवन करतां शुद्ध शाकाहार करावा अशी स्पष्ट आज्ञा आहे. नीचवर्णीयाच्या हातानें विटाळलेलें पाणी पिता कामा नये असाही या धर्मानें निर्बंध घातला आहे. नीचवर्णीय हिंदूंना अस्पृश्य समजतात. त्यांना

देवळांत येऊं देत नाहींत. अगदीं हलक्या दर्जाचीं कामें करण्या-खेरीज यांचा उच्च समाजाशी कोणताही संबंध येत नाहीं. त्यांचा धर्म म्हणजे जवळ जवळ भूताखेतांची पूजा. लौकिक अथवा जनतेंतील धर्मांत (उच्चवर्णीयांच्यांत सुद्धां) कांहीं भूताखेतांची व वृक्षपाषाणांची देवता ह्मणून पूजा करणें प्रचलित आहे. भूतांची भीति वाटणें, ग्रहणांना अशुभ मानणें, फल-ज्योतिषावर विश्वास ठेवणें मंत्रतंत्र, जादूटोणा दृष्ट लागणें, इत्यादि अनेक प्रकार लौकिक हिंदुधर्मांत आढळतात.

८ हिंदुधर्मांतील मुख्य तत्त्वें:—

हिंदुधर्मांत प्रचलित असलेल्या भावना व आचार यांची विल-क्षण विविधता असली, तरी जाति ही एक अशी गोष्ट आहे कीं, ती आजतागायत अनेक ऐतिहासिक कालखंडांतून आणि धर्मग्रंथांच्या परंपरेंतून अबाधित कायम राहिली आहे. तरीपण, हल्लींचे कांहीं समाजसुधारक जाति नष्ट करूं पहात आहेत. निदान जातिसंस्थेंत कांहींतरी सुधारणा करण्याचा त्यांचा उद्देश तर खराच.

वैदिक कालानंतरच्या कालापासून आजपर्यंत वेदाविषयीं पूज्य-भाव ही एक दुसरी गोष्ट हिंदुधर्मांत अबाधित चालत आली आहे. तरीपण, हा पूज्यभाव असून ही आपल्या वेदाविषयीं प्रत्यक्ष माहिती अथवा अर्थज्ञान फारच थोड्या हिंदूंना असतें.

हिंदुधर्मांतील मुख्य धर्मभावना अशी आहे कीं, जगांत सर्वव्यापी व सर्वांतर्यामी असें एक तत्त्व आहे व तें म्हणजे ब्रह्म. ही भावनाही

वैदिककालांतील पहिल्या* दोन कालखंडापर्यंत लोकांच्या मनांत उद्भूतच झाली नव्हती.

पुनर्जन्म आणि कर्म या दोन गोष्टींवरही बहुतेक हिंदूचा विश्वास आहे. तरीपण ह्या दोन्ही कल्पना हिंदुधर्माच्या सुरवातीस मान्य असलेल्या दिसत नाहींत. आणि एक ब्रह्मतत्त्व मानण्याच्या कल्पनेशी या दोन कल्पनांचा अर्थाअर्थीं कांहींएक संबंध नाहीं.

९ हिंदुधर्मांत सुधारणेचे प्रयत्न (ख्रिस्तपूर्व ५५७ पासून तों १९१७ इ. स. पर्यंत.)

हिंदुधर्माच्या समग्र इतिहासापैकीं अर्धाअधिक काल हिंदुधर्मांतील तत्त्वांशीं बुद्धिपुरःसर झगडून त्यांत सुधारणा करण्याच्या प्रयत्नांनीं व्यापिलेला आहे. पण हें झगडणें आणि सुधारणेचे प्रयत्न पुष्कळअंशीं निष्फळ झाले आहेत.

अशा रीतीची सुधारणा करण्याचा प्रयत्न करणारा पहिला पुरुष महावीर. हा एक हिंदुराजाचा मुलगा असून त्याचा काल इ. स. पूर्वीं ५५७ हा आहे. हिंदुधर्मांतील खालीं दिलेल्या गोष्टींशी त्यानें कसून विरोध केला. (१) ब्राह्मण पुरोहिताचें सर्वस्वीं वर्चस्व व तुसडेपणा; (२) संस्कृत भाषेंतील वेदग्रंथांचें प्रामाण्य; (३) पशुयज्ञाची क्रूर पद्धति; (४) प्रचलित औपनिषदिक तत्वज्ञानांतील अद्वैतवाद. पण ह्या त्याच्या सर्व प्रयत्नाचा परिणाम मात्र एवढाच झाला कीं, त्यानें एक निराळाच धर्म काढला. तो म्हणजे जैन धर्म.

---

* संहिताकाल व ब्राह्मणकाल हे ते दोन कालखंड असावेत.

गौतमबुद्ध या नांवाचा दुसरा एक राजपुत्र इ. स. पूर्वी ५२५ च्या सुमारास पुढें आला; व त्यानेंही महावीराप्रमाणें हिंदुधर्मांतील खालील गोष्टींशी विरोध केला:–(१) वंशपरंपरागत जातिसंस्थेचें खुळ; (२) मोक्षाकरता ब्राह्मणांना दक्षिणा देणें अथवा देवतांना लांच देणें; (३) धर्मविचारांत कल्पनांचा, विधींचा आणि भावनांचा सुळसुळाट; (४) अर्थहीन जुन्या भाषेंत लिहिलेल्या वेदांचें पावित्र्य.

बुद्धानें केलेल्या झगड्याचें पर्यवसानही त्यानें आपल्या नांवानें स्थापन केलेल्या बुद्धधर्मांत झालें.

तिरुवल्लुवर या नांवाच्या नीचवर्णीय हिंदूनें इसवी सन ८००चें सुमारास असें प्रतिपादन केलें कीं, मोक्ष मात्र परमेश्वरी कृपेमुळेंच मिळणें शक्य आहे. त्याचा पवित्र 'कुरल' हा काव्यग्रंथ दक्षिण हिंदुस्तानांतील तामील भाषेंत एक अत्यंत प्रभावशाली ग्रंथ समजला जातो. हा गृहस्थ जैन होता, असें जैन लोक मानतात. (पोप कृत 'पवित्र कुरल' हें पुस्तक पृष्ठ १८९).

'माणिक्कवसगर' हा दुसरा एक नीचवर्णीय गृहस्थ इ. स. ११००चे सुमारास दक्षिण हिंदुस्तानांत होऊन गेला.

"एकच सगुण परमेश्वर असून शिव हा त्याचा अवतार आहे, मोक्ष हा परमेश्वराच्या अनुग्रहावर अवलंबून आहे. मोक्षाचा अर्थ मरणोत्तर ज्ञानयुक्त स्थितींत अनंतकालपर्यंत राहणें," अशा अर्थाची त्याची शिकवणूक आहे. त्याचा तिरुवसगम् (पवित्र वाणी) हा हिंदुधर्माचा तामीलभाषेंतील एक अत्यंत सुंदर काव्यग्रंथ आहे, असें मानतात.

यानंतरच्या बाराव्या शतकाचे प्रारंभीं मद्रास इलाख्यांतील चिंगलपट जिल्ह्यांतील एका ब्राम्हणानें (प्रसिद्ध रामानुजाचार्य ह्यांनीं) आपल्या विशिष्टाद्वैताची स्थापना केली. त्यानीं प्रस्थानत्रयी व इतर हिंदुतत्त्वग्रंथांवर विस्तृत भाष्यें लिहिलीं आहेत. परंतु एक उत्कृष्ट धर्मोपदेश म्हणून यांची विशेष ख्याति आहे. परमेश्वर सगुणच आहे ही त्यांची शिकवणूक. हे सर्व जातींना उपदेश करीत असत. ह्यांनीं जातीजातींतील तुटकपणा कमी करण्याचा व स्त्रियांची उन्नति करण्याचा मनापासून प्रयत्न केला. ह्यांनीं मठस्थापना करून आपले शिष्य उपदेशाकरतां चोहोंकडे पाठविले. सेरामपूर कॉलेजचे मि. हावेल यांनीं आपल्या 'सोल् ऑफ इंडिया' या पुस्तकांत असें स्पष्ट विधान केलें आहे कीं, "हिंदुस्थानांतील ख्रिस्तीधर्मशास्त्री ख्रिस्तीधर्माचें हिंदूंच्या दृष्टीनें सोपपत्तिक विवेचन करण्याचे जर मनांत आणील; तर त्याला भक्त रामानुजाचार्यांच्या तत्वज्ञानाची पुष्कळच मदत होईल. (पृष्ठ ३६८).

आनंदतीर्थ अथवा मध्वाचार्य हे दक्षिण हिंदुस्तानांतील कन्नड जिल्ह्यांत एक प्रसिद्ध ब्राह्मण होऊन गेले. हे धर्मोपदेश करीत चोहोंकडे संचार करीत असत. यज्ञांतील पशुवधाविरुद्ध यांनीं जोराचा विरोध केला. भगवंतांच्या लोकोत्तर गुणांचें भक्तिपूर्वक आकलन होणें हाच मोक्ष, हें यांच्या द्वैतमतपंथांचे सार होय. या द्वैत मताचा पुढें एक निराळाच पंथ झाला.

उपनिषदांतील 'तत्त्वमसि' या प्रसिद्ध वाक्यांत आत्मा आणि परमेश्वर यांचें ऐक्य सांगितलें आहे, असें समजण्यांत येतें. पण हे वाक्य अद्वैतपर आहे असें म्हणणें म्हणजे अज्ञानमूलक

निव्वळ बडबड आहे, असें या पंथाचें मत आहे. तथापि, ही बाबत सोडून बाकीच्या बहुतेक बाबतींत हा पंथ पुराण हिंदुधर्मा-भोंवतीं पसरलेल्या विधिविधांनाच्या जाळयांत अडकून पडला आहे. (हावेलकृत सोल ऑफ इंडिया ३७० ते ७२)

चौदाव्या शतकानंतर रामानंद हे पुढें आले. त्यांनीं असें जोरानें प्रतिपादिलें कीं, मोक्ष हा मुख्यतः भगवत्प्रसादानें मिळतो, आणि ही गोष्ट उपनिषदांत स्पष्ट सांगितली आहे. (ह्यूम थ. प्रि. उ. ३०, ३५०, ४०२, ४११) "कोणीही कोणाची जात अथवा पंथ विचारूं नये. परमेश्वराची भक्ति करणारा प्रत्येक मनुष्य परमेश्वराचाच आहे," ही यांची उक्ति प्रसिद्धच आहे. रामानंदांनीं प्रत्येक जातीच्या पंथाच्या अथवा वर्गाच्या मनुष्याला श्रीरामाची निःसीम भक्ति करण्याचा उपदेश केला. यांचा पंथ उत्तर हिंदुस्तानांत आजही पुष्कळ पसरलेला दिसतो. विशेषतः गोरगरीबांत ह्या पंथाचें प्राबल्य आढळतें. पूर्वीं या पंथांतून जातीचें उच्चाटन झालें होतें. आजही या पंथाला तत्त्वतः जाति मान्य नाहींत. तथापि आज जातिसंस्थेनें या पंथांवर पुन्हां आपलें वर्चस्व स्थापिलें आहे.(हावेलकृत 'सोल ऑफ इंडिया' १७४).

* हिंदूचा देव जो श्रीरामचंद्र त्याची भक्ति कशी करावी याविषयीं जोराचा वाद माजून राहिला आहे. उत्तरपंथीय लोकांचे (वडगलै) म्हणणें असें कीं, रामावर भक्ति मांजरीच्या पिल्लाप्रमाणें करावी. ज्याप्रमाणें मांजरीचें पिल्लू आईकरता टाहो फोडून तिच्या-

* **टीपः**—हें सर्व वर्णन रामानुजपंथाला लागू पडतें. ग्रंथकारानें चुकीनें तें वर्णन रामानंदपंथाविषयीं केलें आहे.

वर सर्वस्वी भार टाकतें आणि मग ती मांजरी त्याला आपल्या तोंडांत धरून सुरक्षित स्थळीं नेते, तद्वत्च भक्तानें आपला भार सर्वस्वीं परमेश्वरावर टाकल्यास परमेश्वर त्याला सर्व संकटांतून निभावून नेतो. याचे उलट दाक्षिणपंथीय लोकांचें (तेनगलै) मत असें कीं, परमेश्वरावर भक्ति, वांदरीच्या पिछाप्रमाणें, करावी. ज्याप्रमाणें पिलु आपण होऊन पोटाशीं बिलगल्याखेरीज वांदरी त्याला सुरक्षित स्थळीं नेऊ शकत नाहीं, त्याप्रमाणें भगवदनुग्रह संपादण्याकरता भक्तांनींही बुद्धिपुरःसर प्रयत्न केला पाहिजे. (हॉप्‌कीन्सकृत रिलिजन ऑफ इंडिया पृष्ठ ५००, ५०१; मॅक्‌निकलकृत इंडियन थीइझम ११०; हॉवेलकृत सोल ऑफ इंडिया ३६८).

नानक (इ. स. १४७९ ते १५३८) हे वैश्यवर्णीय गृहस्थ होते. हे पंजाबातले राहणारे. मुसलमान धर्माचा ह्यांच्यावर बराच प्रभाव पडलेला दिसतो. हिंदु व मुसलमान यांचा देव एकच आहे ही यांची शिकवण. त्यांच्या ह्या शिकवणीचा परिणाम मात्र एक स्वतंत्र धर्मपंथ काढण्यांत झाला. ह्या स्वतंत्र शीखधर्माचें वर्णन प्रस्तुक पुस्तकाच्या पांचव्या प्रकरणांत येईलच.

चैतन्य (इ. स. १४८५ ते १५२७) हे विष्णूचे उपासक बंगालमध्यें होऊन गेले. बंगालमध्यें संगीताचा पुनरुद्धार यांनींच केला. ‘ भगवंताच्या दृष्टीनें सर्व वर्ण सारखेच आहेत. प्रेमलक्षणा भक्ती व भगवद्गुणगान केल्यानें मोक्ष मिळतो ’ हें यांचें मत. विधवांच्या पुनर्विवाहाबद्दल त्यांचें अनुकूल मत होतें. ह्यांच्या पंथांतील अनुयायांत पुढें पुढें शृंगारिक अनीतीचा फार प्रादुर्भाव होऊं लागला.

कबीर हे (इ. स. १४८८ ते १५१२) सगुणभक्तीचें माहात्म्य गाणारे एक हिंदु कवि होऊन गेले. शिखांच्या ग्रंथवाक्यामध्यें ह्यांच्या कांहीं कवितांना स्थान मिळालें आहे. ह्यांच्या उपदेशाचाही तात्कालिक परिणाम हिंदुधर्मामध्यें कबीरपंथ ह्या नांवाचा एक नवीन पंथ स्थापण्यांत झाला.

तुळसीदास (इ. स. १५३२ ते १६३२) हे मध्ययुगीन हिंदुस्तानांतील एक उत्कृष्ट महाकवि होते. संस्कृतांतील वाल्मीकी रामायणावर हिंदीभाषेचा अतिसुंदर साज चढवून तें ह्यांनीं फारच लोकप्रिय केलें. हें एक परमभक्त होऊन गेले. श्रीरामाची परमभक्ति करून त्याच्यावर सर्व भार टाकला असतां मनुष्य जन्ममरणाच्या अनंत फेऱ्यांतून मुक्त होतो, हें त्यांच्या उपदेशाचें सार.

*दादू (इ. स. १६०० शेचा सुमार) हे एक कोष्टी होऊन गेले. परमेश्वर भक्ति व ईश्वराच्या अवतारावर श्रद्धा, या गोष्टीवर त्यांच्या उपदेशाचा भर असे. ह्यांच्या नांवानें दादूपंथ या नांवाचा एक पंथ निघाला. त्यांत दादूमहाराजांचीच भक्ति करतात.

राममोहनराय हे बंगाली ब्राह्मण होते. कांहीं उपनिषदांचे इंग्रजींत भाषांतर करणारे हे पहिले गृहस्थ. नव्या करारांतील कांहीं निवडक भागांचा एक संग्रह करून त्यांनीं प्रसिद्ध केला; व त्याला 'सुख व शांति यांचा मार्ग दाखविणाऱ्या येशूचीं बोधवचनें' असें नांव दिलें. इ. स. १८२८ त ह्यांनीं ब्रह्मोसमाज स्थापला. हा समाज स्थापण्यांत

* दादू हा ब्राह्मण गुर्जरदेशीय होता, असे फारकहारानें An 'outline of religions ह्या पुस्तकांत म्हटलें आहे.

यांचा हेतु हिंदुधर्मांतील खालील गोष्टींना विरोध करण्याचा होता. (१) मूर्तिपूजा व अनेक देवतोपासना; (२) सती जाण्याची चाल; (३) विधवा विवाहास प्रतिबंध; (४) बहुपत्नीकत्व; (५) जातिसंस्थेचा कट्टरपणा; (६) राष्ट्रीय व धार्मिक तुसडेपणा व (७) हीनजातीय लोकांवर लादलेले निर्बंध.

ब्रह्मसमाज हा हिंदुधर्मसुधारणेचा पहिला नांव घेण्यासारखा प्रयत्न होय. हल्लीं हा समाज अंतस्थकलहामुळें दुबळा बनला आहे.

डॉ. आत्माराम पांडुरंग यांनीं इ. स. १८६७ मध्यें मुंबईस प्रार्थनासमाजाची स्थापना केली. प्रार्थनासमाज या शब्दांचा अर्थ एकत्र प्रार्थना करणारांचा संघ. या समाजाचा उद्देश धर्माचे बाबतींत व्यक्तिस्वातंत्र्याला वाव देणें व इतर कांहीं समाजसुधारणा करणें हा होता. प्रार्थनासमाजांत पुढें पुढें बऱ्याच प्रसिद्ध व्यक्ति येऊन मिळल्या. तरीपण, आज हा समाज अगदीं छोटेखानी व कांहीं विवक्षित व्यक्तींचाच आहे,

दयानंद सरस्वती ह्यांनीं मूर्तिपूजेचा विरोध करण्याच्या हेतूनें इ. स. १८७५ मध्यें आर्यसमाजाची स्थापना केली. बाकी पुराण हिंदुप्रमाणें वेदांचें प्रामाण्य व पावित्र्यही या समाजाला मान्य आहे. आर्यसमाजाचा अर्थ उच्च लोकांचा संघ. बाबू हरींद्रनाथ मैत्र यांनीं इ. स. १९१६ सालीं 'हिंदुइझम धि वर्ल्ड आयडियल' (हिंदुधर्म—जगांतील आदर्शधर्म) या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. श्री. ग भा. वैद्य यांनीं इ. स. १९१७ मध्यें मुंबईस हिंदुमिशनरी सोसायटी स्थापून हिंदुधर्माच्या एकलकोंडया वृतीवर उघड उघड

झेंडा चढविला. यांनीं ख्रिश्चन मिशनरींचें बुद्धिपुरःसर अनुकरण केलें आहे. सर्व जगाला हिंदुकरणें ही यांची प्रतिज्ञा होती. या सोसायटीच्या संस्थापकांच्या मरणानंतर तिच्या कार्यक्रमाचा व्याप कमी होत चालला आहे.

१० हिंदुधर्म व ख्रिश्चनधर्म यांची तुलना.

हिंदुधर्मामध्यें आजपर्यंत वेळोवेळीं इतका फरक होत गेला आहे कीं, त्यांतील अत्यंत महत्त्वाच्या व आजपर्यंत कायम टिकलेल्या अशा थोड्याच बाबी तुलनेकरतां घेतां येतील. ख्रिस्तीधर्माचे बाबतींत येशूनें केलेला उपदेश हा सामान्यतः प्रातिनिधिक स्वरूपाचा मानता येईल. खालील बाबतींत तुलना येथें केली आहे.

परमेश्वरः—हिंदुधर्मांत निर्गुण ब्रह्मालाच परमेश्वर मानतात. तत्त्वदृष्ट्या हें एकमेवाद्वितीय तत्त्व असून तें शांत आणि शिव, अध्यात्मदृष्ट्या व नीतिदृष्ट्या सर्वोपाधि रहित असें आहे.

याचे उलट ख्रिस्तीधर्मांत परमेश्वर हा सगुण, सर्वश्रेष्ठ, शुद्धतम, सृष्टिकर्ता, जगन्नियंता, दयाळु व सर्वभूतांना साहाय्य करणारा असा मानला आहे.

मानवः—हिंदुधर्म असें मानतो कीं, मानवप्राणी हा एका निर्गुण परमेश्वरापासून उत्पन्न झालेला आहे, अथवा कांहीं काळापुरता आविर्भाव पावला आहे. स्वभावतः हा प्राणी शाश्वत योग्यतेचा नाहीं; आणि त्यानें

इतर मानवांशीं भ्रातृभावानें वागावें असाही ईश-संकेत दिसत नाहीं.

ख्रिस्ती धर्माचें मत असें कीं, मनुष्यप्राणी हा स्वर्गांतील पित्याचें मूल आहे. ईश्वराच्या कल्याणमय गुणांचा त्याच्यांत अंश आहे. तथापि दुरन्त स्वार्थ, उद्दामपणा व अधोगति ह्यांच्या तडख्यांत तो कधीं कधीं सापडतो. आपल्या विश्वबांधवांविषयीं प्रेमळ सेवावृत्ति धारण करण्याचें उत्तरदायित्व परमेश्वराच्या दृष्टीनें मनुष्यप्राण्यांवरच आहे. इहलोकीं व परलोकीं इतर मनुष्यप्राणी व ईश्वर यांच्याशीं मनुष्यानें प्रेमभावानें वागावें असा परमेश्वराचा आदेश आहे.

जगत्ः—हिंदुधर्माचें मतें जगत् हें नश्वर, निस्सार व मायिक आहे. ख्रिस्तीधर्मांत जगत् हें परमेश्वरी योजनेचें बुद्धिमत्तेचें व शक्तीचें व्यक्त स्वरूप मानतात. जसजसा ज्ञानाचा विकास होत जाईल, तसतसें जगाचें स्वरूप मनुष्याला जास्त कळूं लागेल; आणि नैतिक व आध्यात्मिक जीवनाचें एक गौण साधन म्हणून त्याला जगाचा उपभोग घेतां येईल.

पापः—हिंदुधर्म असें मानतो कीं, पाप ही कल्पनाच खोटी आहे. शोचनीय अविद्या आणि वर्णाश्रमनियमांचा भंग हे दोष मात्र खरे, व त्यायोगें मनुष्य जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतो. पण पुण्य पापातीत जें परब्रह्म त्यांत

लीन झालें असतां व परंपरागत वर्णाश्रमधर्माचें पालन केलें असतां मनुष्य ह्या सर्व बाह्यदोषांपासून मुक्त होतो.

ख्रिश्चनधर्माचें मत असें कीं, पाप ही गोष्ट खरीच आहे. पाप हें त्रिविध आहे:-परमेश्वराविरुद्ध पाप, आपल्या विश्वबांधवाविरुद्ध पाप व आपल्या स्वतःविरुद्ध पाप. या पापाशीं झगडणें हें प्रत्येक ख्रिस्तीधर्मीयाचें कर्तव्य आहे, असें हा धर्म मानतो.

मोक्षः—हिंदुधर्मांत मोक्षाचे तीन मार्ग सांगितले आहेत:— ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग व कर्ममार्ग. पैकीं ज्ञानमार्ग परमेश्वर सर्वव्यापी आहे ह्या ज्ञानावर अधिष्ठित आहे. आपल्या इष्टदेवतेविषयीं उत्कट भक्ति करणें हा भक्तिमार्ग; आणि शास्त्रोक्त कर्में अनासक्तीनें करणें हा कर्म मार्ग. ख्रिस्तीधर्मांत जगज्जनक परमेश्वराचें शासन व प्रेम याविषयींच्या निरतिशय भक्तीच्या द्वारा मोक्ष मिळतो अशी कल्पना आहे. आपला पिता जो परमेश्वर त्याचा पुत्र होण्याची योग्यता आपल्यांत आणण्याकरतां सगळ्यांत जास्त साहाय्य येशूख्रिस्त करतो अशी प्रत्येक ख्रिस्त्याची समजूत असते.

समाजः—हिंदुधर्माची अशी मान्यता आहे कीं, चातुर्वर्ण्य हें परमेश्वर निर्मित असून त्यांतील वर्णांत उच्चनीच भाव व परस्पर पृथक्पणा आहे. कोणाही हिंदूला हें चातुर्वर्ण्य अमान्य करतां येत नाहीं. ख्रिस्ती धर्म असें मानतो कीं, अखिल मानवजाति हें एक कुटुंब

आहे. त्यांतील प्रत्येक व्यक्तीनें मानवसेवा करून हलके हलके स्वतःची उन्नति करून घ्यावी, अशी ईश्वरी योजना दिसते.

कर्म व परमेश्वराचा अनुग्रहः—ब्रह्म अथवा परमेश्वर ह्याहून भिन्न अशी एक न्यायशक्ति सृष्टीमध्यें असून तिचें नांव कर्म आहे, असें हिंदुधर्म मानतो. कर्मविपाक ही एक अमूर्त परंतु सत्य वस्तु आहे. प्रत्येक प्राण्याच्या बऱ्यावाईट कर्माचें फळ त्याला अवश्य मिळतें; व त्या कर्माप्रमाणें पुढील जन्मीं त्याला उच्च किंवा नीच योनी प्राप्त होते. परंतु कर्म अशारीतीनें अनिवार्य असलें, तरी वासनात्यागानें प्राचीन कर्माच्या परिणामाला नष्ट करून मनुष्याला कर्मातीत उच्चस्थिति प्राप्त करून घेता येते.

पण ख्रिस्तीधर्माचें म्हणणें असें कीं, न्यायी परमेश्वरच प्राण्यांच्या पुण्यपापांची फळें त्याला देतो. पण तीं पुनर्जन्माच्या रूपानें देत नाहीं. या जगांत दयाळु परमेश्वर अथवा परमेश्वराची विभूति जो येशू अथवा इतर कोणीही संत महात्मा तो पापी प्राण्याला आपल्या प्रभावानें किंवा अनुग्रहानें उच्च स्थितीप्रत नेऊं शकतो. हा उच्च सिद्धांत जगांत प्रभावशाली असल्याबद्दल ख्रिस्तीधर्म ग्वाही देतो.

११ हिंदुधर्मांतील कांहीं ठळक गुण.

(१) सर्वश्रेष्ठ, सर्वव्यापी अव्यक्त असें ब्रह्मतत्व अखिल सृष्टीचा आधार आहे, असा विश्वास.

(२) परमेश्वराच्या सत्यस्वरूपाचें ज्ञान होणें व परमेश्वराशीं तादात्म्य होणें हें मानवी जीविताचें अत्युच्च ध्येय होय.

(३) पुनर्जन्म आहे व पुण्यपापांचें निश्चित फळ मिळतें यांवर विश्वास.

(४) चातुर्वर्ण्य हें ईश्वरनिर्मित आहे, व व्यक्तीपेक्षां चातुर्वर्ण्याची योग्यता अधिक आहे अशी श्रद्धा.

(५) हिंदुधर्म हा त्यांतील अनुयायांच्या जीवनाशीं अत्यंत निकट रीतीनें संबद्ध आहे.

(६) एका सर्वसाधारण धार्मिक भावनेच्या सूत्रानें ओवून शतकानुशतकें अनेक प्रकारच्या लोकांचा गट एकत्र स्थिर ठेवण्याचें सामर्थ्य.

१२ हिंदुधर्माच्या दुर्बलतेला कारण असलेले कांहीं मुद्दे.

(१) परब्रह्म हा सगुण ईश्वर नाहीं; व त्यावर कोणतीही नैतिक जबाबदारी नाहीं.

(२) हिंदुधर्मानें व्यक्तीपुढें कोणतेंही नैतिक ध्येय ठेविलें नाहीं. मनुष्याच्या शाश्वत व स्वतंत्र व्यक्तित्वाला हिंदुधर्मांत स्थान नाहीं.

(३) सामाजिक उच्चनीच भावाखेरीज दुसरी कोणतीही नैतिक कसोटी हिंदुधर्मांत नाहीं.

(४) व्यक्तीचा सामाजिक दर्जा मरेपर्यंत बदलत नाहीं,

(५) समाजाची रचना केव्हांही बदलतां येत नाहीं व त्यांत सुधारणाही करता येत नाहीं. कांहीं सुधारकांचा या बाबतींतील प्रयत्न निष्फळ ठरला आहे.

(६) क्रियाकांडाचें अवास्तव स्तोम हें एक टोंक, तर पोकळ ध्यानाचा बडिवार हें दुसरें टोंक, अशीं दोन टोकें यांत दिसतात.

(७) मूर्तिपूजेचे किळसवाणे प्रकार यांचें समर्थन ईश्वराच्या सर्वव्यापित्वाच्या योगानें कसेंतरी करतां येतें. हिंदुधर्मांतील विचारवंतांनीं आजपर्यंत मूर्तिपूजेचा फारसा निषेध केलेला नाहीं.

(८) जातींच्या योगानें आलेली निष्प्राणता व पडलेले अनेक विभाग.

(९) स्त्रियांची योग्यता कमी लेखणें. भगवद्गीतेखेरीज बाकीच्या सर्व धर्मग्रंथांत स्त्री ही हीन मानली गेली आहे.

(१०) स्वतःच्या धार्मिक गटाबाहेर दुसऱ्या कोणाकडेही हिंदुधर्मानें लक्ष दिलें नाहीं. याला अपवाद हल्लींचे कांहीं धर्मसुधारक आहेत.

(११) हिंदुधर्मग्रंथांत कौतुक वाटण्यासारखी व प्रभावशाली अशी एकही ऐतिहासिक व्यक्ति उल्लेखिलेली नाहीं.

(१२) या धर्मांतील बहुतेक अनुयायांना स्वतःचे धर्मग्रंथ अजूनही वाचण्याचा अधिकार नाहीं

प्रकरण तिसरें

जैनधर्म

तपस्याप्रधान धर्म

१ प्रास्ताविक:—विद्यमान धर्मांत जैन धर्माचें स्थान

प्राच्य धर्मांपैकीं जैनधर्माची माहिती फारच थोड्यांना आहे. तथापि, तो धर्म आपल्या जन्मभूमींतील इतर धर्म व तत्वज्ञान यामध्यें बऱ्याच वरच्या दर्जाचा आहे. जगातील अखिल धर्मांतही त्याचें स्थान बरेंच उच्च आहे.

(१) हिंदुस्तानच्या इतिहासाच्या दृष्टीनें जैनधर्माचें स्थान—

जैनधर्म हा जगांतील व्यक्तिसंस्थापित धर्मांपैकीं जुन्यांतजुना धर्म. हिंदुस्थानांतील अत्यंत प्राचीन असा जो वैदिकधर्म, त्याच्यांत बुद्धिपुरःसर सुधारणा घडवून आणण्याकरता एका प्रचंड धर्मसुधारकानें शेंकडो वर्षांत न झालेला असा प्रयत्न केला. त्या प्रयत्नाचें सुसंघटित फळ म्हणजेच जैनधर्म. या प्रयत्नानंतर बत्तास वर्षांनींच धर्मसुधारणेची दुसरी एक लाट उठली व तिचें पर्यवसान बुद्धधर्म स्थापन होण्यांत झालें. हिंदुधर्मांतून फुटून निघालेल्या या धर्मांनीं पशुयज्ञसंस्थेविरुद्ध जोराचा हल्ला चढवून जनतेवर

आपला हितकारक प्रभाव पाडला. पण, या बंडांचा साक्षात् हिंदुधर्मांत सुधारणा होण्याचे बाबतींत कांहींही उपयोग न होता, त्यांचें नवीन धर्म स्थापण्यांत पर्यवसान झालें. स्थापत्य व प्राचीन वस्तूंचे अवशेष या दृष्टीनें पाहतां जैनधर्माला महत्त्वाचे स्थान द्यावें लागलें. मथुरेंत सांपडलेल्या एका जैनस्तूपावर (स्तूप म्हणजे घमटाच्या आकाराचें स्मारक) एक लेख आहे. तो ख्रिस्तीशकाच्या सुरवातीइतका जुना आहे. त्या लेखांत असें म्हटलें आहे कीं, हा स्तूप प्रत्यक्ष देवांनीं बांधलेला आहे; इतका तो जुना आहे. विटांनीं बांधलेलें हें स्मारक हिंदुस्तानांतील आज माहीत असलेल्या इमारतींत अत्यंत जुनें आहे, असें पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या "न्यू इंपीरियल सिरीझ" या ग्रंथांत म्हटलें आहे. पश्चिम हिंदुस्तानांत अबूच्या पहाडावर असलेलीं जैनमंदिरें व अहमदाबाद, वेरुळ, अजमीर या ठिकाणचीं जैनमंदिरें आणि दक्षिण हिंदुस्तानातील कालीगमलाई या ठिकाणचें 'एक–पाषाणनिर्मित' सुंदर जैन देवालय हीं सर्व शिल्पाचे दृष्टीनें हिंदुस्तानांत अमोलिक आहेत. जगभर प्रवास करणारांना ह्या मंदिरांच्या दर्शनापासून निःसंशय आनंद होण्यासारखा आहे. जवळजवळ एकाच वेळीं सुरू झालेल्या सुधारणेच्या चळवळींपैकीं जैनधर्म हा मानानें वडील असला, तरी पुढील

इतिहासांत त्यानें बुद्धधर्माइतकी महत्त्वाची कामगिरी बजावली नाहीं. एकतर बुद्धधर्माप्रमाणें हा धर्म हिंदुस्तानाबाहेर मुळींच पसरला नाहीं. खुद्द हिंदुस्तानांतही अगदीं मर्यादित क्षेत्रांतच त्याचा प्रसार झाला आहे, आणि तोही मुख्यत्वेंकरून दक्षिण व पश्चिम हिंदुस्तानांतच. तथापि, या धर्मांतील अनुयायांपैकीं मोठा वर्ग व्यापाऱ्यांचा असून त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेनें व व्यापारांतील प्रावीण्यानें धनिकवर्ग म्हणून जैनजातीला उच्च सामाजिक दर्जा प्राप्त करून दिला आहे. संख्येच्यामानानें यांतील धनिक वर्गाचें प्रमाण फारच मोठें आहे. तथापि, हें मान्य केलें पाहिजे कीं, हिंदुस्तानांतील लोकसंख्येच्या मानानें या धर्मांतील अनुयायांच्या लोकसंख्येचें प्रमाण दिवसेंदिवस घटत चाललें आहे. स. १९२१ सालच्या खानेसुमारीच्या पत्रकावरून पहातां त्यावेळीं जैनधर्मीय लोकांची संख्या बारा लक्ष अठ्ठेचाळीस हजार होती. अशा रीतीनें ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां जैन धर्माचें स्थान महत्त्वाचें असलें, तरी संख्येच्या दृष्टीनें हा धर्म क्षय पावत आहे.

(२) इतर धर्म व तत्त्वज्ञान यांचीं जैनधर्माशी तुलना.

जैन धर्माचा संस्थापक यानें आपलें कार्य जगांतील एका अत्यंत महत्वाच्या काळीं सुरु केलें. महावीर हा बुद्धाचा समकालीन तर होताच; पण

याशिवाय चीनमधील कान्फ्यूशियस व लाओत्झ हे दोन धर्मसंस्थापक व इराणांतील धर्मसंस्थापक झोरास्टर या तिघांचाहि महावीर समकालीन होता. इस्राएलधर्माचा बाबिलोनमधील समय, त्याचप्रमाणें जेरेमिआ एझेकील आणि ईसाई या यहुदी धर्माचार्यांच्या समय व महावीराचा समय एकच होय. ग्रीक तत्त्वज्ञानापैकीं सहा प्राचीन तत्त्वज्ञानी—थेल्स, अनक्झीमँडर, अनक्झीमीनीझ्, झेनोफेन्स, पायथॅगोरस व हेराक्लिस—हे महावीराचे जवळ जवळ समकालीनच होते. परंतु तत्त्वज्ञान व सौंदर्य याविषयीं विख्यात असलेल्या ग्रीकभूमींतील या प्रमुख विचारप्रवर्तकांच्या जीवनाविषयीं माहिती आज मुळींच उपलब्ध नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. याचे उलट हिंदुस्तानांत आजपर्यंत लक्षावधि लोक महावीराला पूज्य मानून त्याच्या मूर्तींची पूजा करीत आहेत. जैनधर्माच्या या संस्थापकाला महावीर (म्हणजे थोर वीर पुरुष) ही अत्यंत प्रसिद्ध पदवी या जैनधर्माच्या अनुयायांनींच बहाल केली आहे. या धर्मांतील लोक आपणाला जैन म्हणवितात. जैन म्हणजे जिनाचा अनुयायी. जिन ही पदवी सुद्धां महावीराला अर्पण करण्यांत आली असून त्याचा अर्थ 'विजेता' हा आहे.

(३) या धर्माची ख्रिस्तीधर्माशीं तुलनाः—

दोन मुख्य बाबतींत या धर्माची ख्रिस्तीधर्माशीं तुलना करता येईल. जड शरीर व आत्मा या दोहो-

मध्यें चालत असलेल्या द्वंद्वयुद्धाचा खरा धार्मिक अर्थ, खिस्तशिष्य पॉल यांनीं आपल्या ग्रंथांत अशाच तऱ्हेनें शरीर व आत्म्याचें वर्णन करून सांगण्यापूर्वीं शेकडों वर्षें जैनधर्मांत प्रतिपादिलेला आहे, ही एक बाब. तसेंच, खिस्तीधर्माचें विशिष्ट लक्षण जें आचारात्मक विश्वधर्मत्त्व तेंही खिस्तीधर्मापूर्वीं शेकडों वर्षें जैनधर्मानें स्वतःचें लक्षण म्हणून स्वीकारलें होतें. जैनधर्मशास्त्रापैकीं दोन धर्मग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, जगाच्या शाश्वत कल्याणाकरता अत्यंत समर्थ अशा जैनधर्माच्या प्रसाराविषयीं महावीराला परमेश्वराच्या आदेश मिळाला. अशा तऱ्हेचा आदेश ज्याला मिळालेला होता अशा येशू खिस्तापूर्वीं पांचशें वर्षें हें विश्वधर्मप्रसाराचें काम महावीरानें सुरू केलें होतें. पण, दुर्दैवाची गोष्ट ही कीं, विश्वधर्मप्रसाराचें जैनधर्मानें सुरू केलेलें हें कार्य पुढें अजिबात बंद पडलें.

२ जैनधर्मसंस्थापक महावीराचें चरित्र. (खि. पू. ५९९ ते ५२७)

जैनधर्मग्रंथांत या धर्मसंस्थापकाचें चरित्र रेखाटण्याचा यत्न केलेला दिसत नाहीं. तथापि, त्याच्या चरित्राला उपयोगी पडेल अशी संकीर्ण माहिती ह्या धर्मग्रंथांतून मधून मधून सांपडते. मुख्यतः ही माहिती तीन ग्रंथांतून सांपडते. ह्या तिन्ही ग्रंथांचें इंग्रजींत भाषांतर झालें आहे (से. बु. ई. २२,७९–८७;२२:२१७, २७०;४५,२८७–२९२) यापैकीं महावीराविषयीं सर्वांत जास्त माहिती सांगणारा ग्रंथ महावीरानंतर हजार वर्षांनीं रचला गेला.

ह्यांत मुख्यतः महावीराच्या जन्मप्रसंगीं घडलेल्या अद्भुत गोष्टींचा संग्रह आहे. उदाहरणार्थः—महावीराच्या आईला आपल्या मुलाच्या जन्मापूर्वी चौदा अद्भुत स्वप्नें पडलीं. स्वप्नवेत्त्यांनीं या स्वप्नांचा अर्थ असा केला कीं, या स्त्रीचे पोटीं एक अलौकिक पुत्र जन्माला येईल. याशिवाय, महावीराच्या कुटुंबाला एकाएकीं भाग्य-काल येणें या व इतर अनेक अनुकूल प्रसंगांचें वर्णन प्रस्तुत ग्रंथांत आलें आहे. या सर्व गोष्टींतील अद्भुततेचा अंश वजा करतां सरळ हकीकत अशी मिळते कीं उत्तरहिंदुस्तानांतील वैशाली नगरीचा एक छोटेखानी राजा होता, त्याचा दुसरा मुलगा महावीर.

(१) राजवाड्यांतील विलासी जीवन. (वयाच्या १ ते ३० वर्षांपर्यंत) महावीर विलासाच्या वातावरणांत वाढला होता. "महावीराचे संगोपन करणाऱ्या एकंदर पांच दाया होत्या. एक दूध पाजणारी, एक न्हाऊ घाल-णारी, एक कपडे घालणारी, एक त्याला खेळवणारी व शेवटची त्याला इकडून तिकडे हिंडवणारी. एका दाईच्या मांडीवरून दुसऱ्या दाईच्या मांडीवर अशा-रीतीनें त्याचें बालपण केलें." (से. बु. ई. २२: १९२–१९३) त्याचें, दुसऱ्या एका राजघराण्याच्या मुलीशीं, लग्न होऊन त्याला एक मुलगी झाली. राजपुत्र या दृष्टीनें त्याचें जीवन वैभवशाली होतें.

(२) महानिर्वाण (वयाच्या ३० व्या वर्षी) आईबाप निवर्तल्यावर महावीरानें तपस्वी होण्याचा निश्चय केला, कारण तत्कालीन हिंदुधर्मांत तपस्वी

होणें हा मोक्ष मिळविण्याचा उपाय समजला जात असे. “ मी बारावर्षेंपर्यंत माझ्या शरीराची मुळींच काळजी करणार नाहीं.” (से. बु. ई. २२:२००)

महावीरानें हा आपला निश्चय पूर्वजन्मींच केला होता. तथापि आईबापांना वाईट वाटेल ह्मणून त्यानें हा निश्चय त्यांच्या जिवंतपणीं अमलांत आणला नाहीं. आईबापांच्या मरणानंतर मात्र त्यानें, आपलीं उंची वस्त्रें फेकून दिलीं, आपली सर्व संपत्ति वाटून टाकली, पांच मुठी भरतील इतके आंगावरचे केस उपटून टाकले, आणि कायमची प्रव्रज्या स्वीकारली. ह्या त्याच्या कृत्यानें देव संतुष्ट झाले; व हा क्षत्रिय कुमार धर्माचा परमभक्त असून विश्वाचें कल्याण करणाऱ्या धर्माचा प्रसारक आहे अशी त्याची त्यांनीं प्रशंसा केली. “ हे अर्हता ! जगांतील प्राणिमात्रांचें कल्याण करणाऱ्या धर्माचा तूं प्रसार कर” (से. बु. ई. २२: १९५)

“ हे क्षत्रिय श्रेष्ठा ! तुझें कल्याण असो. हे जगत्प्रभो ! जागा हो. अखिल विश्वांतील प्राणिमात्रांचें आत्यंतिक कल्याण करणाऱ्या धर्माची स्थापना कर. त्यानें जगांतील प्राणिमामात्रांचें आत्यंतीक कल्याण होईल.” (से. बु. ई. २२: २५६)

“ हे जगाच्या आनंददायका ! तुझा त्रिवार जय असो. हे महावीरा ! त्रैलोक्याच्या क्षेत्रांत तूं अत्युच्च ज्ञान मिळव व सर्वज्ञ हो.

(३) तपश्चर्याद्वारा मोक्ष.

पहिले तेरा महिने त्यानें वस्त्र वापरलें. त्यानंतर मात्र तो नग्न तपस्वी बनला (से. बु. ई. २२: ७९; २२: २५९–२६०)

मनुष्य व पशु यांच्याकडून त्याला बराच उपसर्ग झाला. तथापि, असह्य कष्ट सोसूनही त्यानें आपली तपश्चर्या अखंड चालू ठेविली. (से. बु. ई. २२: ७९–८९)

"चंदनाचा सुगंध अथवा घाणरेड्या पदार्थांची घाण या दोहोंबद्दलही तो उदासीन असे. रत्न आणि तृण; कांचन आणि चिखल; सुख आणि दुःख; या द्वंद्वाविषयीं तो संपूर्ण उदासीन असे. त्याच्या मनांत इहलोकाविषयीं आसक्ति व परलोकाविषयीं उत्सुकता हें कांहींच उरलें नव्हतें. जीवन अथवा मरण यापैकीं कशाचीच त्याला परवा नव्हती. (से. बु. ई. २२: २६२)

"अशा रीतीनें अत्युच्च ज्ञानानें, शांतीनें, तितिक्षेनें, संयमानें व संतोषवृत्तीनें त्या पूज्य महावीरानें १२ वर्षेंपर्यंत साधना केली. (से. बु. ई. २२: २६३)

"तेराव्या वर्षीं तो एकदा मांडी घालून, खालीं मान करून निश्चलमनानें ध्यान करीत असतां त्याला निर्वाणाची स्थिति प्राप्त झाली; त्याच्या हृदयांत

संपूर्ण, अप्रतिहत, व अनंत केवळ ज्ञानाचा उदय झाला. (से. बु ई. २२: १०१)

(४) प्रव्रज्येच्या नवधर्माचा उपदेश.

स्वतःच्या शरीरावर व जगावर संपूर्ण प्रभुत्व आतां स्वतःला प्राप्त झालें आहे असें वाटू लागतांच महावीरानें एकांतवास सोडून दिला व तो साधकांचा उपदेशक व मार्गदर्शक बनला. त्यानें शेकडों लोकांना आपलें शिष्य केलें; व आपल्या धर्मांत त्यांना घेतलें. दंतकथा अशी आहे कीं, हिंदुस्थानांतील चार बलिष्ठ राजे त्याचे शिष्य झाले होते. महावीरानें आपल्या उपदेशाचें कार्य आमरण चालू ठेवलें होतें.

"कर्माच्या परिणामाविषयीं संपूर्ण माहितीनें भरलेलीं अशीं त्यानें पंचावन प्रवचनें दिलीं; व शेवटीं दुःखरहित स्थितींत तो समाधिस्थ झाला" (से. बु. ई. २२:२६९)

"ज्यारात्रीं भगवान् महावीर समाधिस्त झाले, त्या रात्रीं स्वर्गांतून खालीं येणाऱ्या व वर जाणाऱ्या येरझाऱ्यांनीं चोहोंकडे गडबड उडाली होती. " (से. बु. ई. २२:२६९)

२ महावीराविषयींची भक्ति

खुद्द महावीराच्या उपदेशाप्रमाणें पाहतां पूजेला योग्य असा कोणताही पदार्थ या जगांत नाहीं. तो स्वतः आपल्या उपदेशाप्रमाणें वागला. त्याचें जविन अत्यंत शांत व क्षोभरहित असून

त्यागपूर्ण होतें. कोणत्याही तऱ्हेची हिंसा त्यानें केली नाहीं. स्वतः महावीरानें कोणत्याही देवतेची भक्ति किंवा पूजा केली नाहीं. तथापि त्याचे अनुयायी मात्र त्याची पूजा करतात. जैनांच्या धर्मग्रंथांत महावीर दैवगुणांनीं संपन्न होता असें म्हटलें आहे. संपूर्ण निष्पाप म्हणून महावीराची पूजा केली जाते.

> स्वतः ज्ञानी असल्यामुळें महावीरानें कोणत्याही तऱ्हेचे पाप केलें नाहीं. पापापासून व वासनेपासून मुक्त होऊन तो आत्मज्ञानानंदांत सदैव मग्न असे. (से. बु. ई. २२;८६–८७)
>
> "त्या महात्म्याचे हातून कधींहीं पाप घडणें शक्यच नव्हतें." (से. बु. ई. ४५:२९१)
>
> "संसार व पापी प्रवृत्ति यांचा अनादि प्रवाह चालला आहे, हें जाणून महावीरानें कोणत्याही तऱ्हेचें पापाचरण केलें नाहीं.' (से. बु. ई. २२:८१)
>
> सर्वज्ञत्वाचे बाबतींतही तो सर्वश्रेष्ठ होता. "सर्व प्राणिमात्रांचे अंतःस्थ विचार तो जाणत असे." (से. बु. ई. २२:२५७)
>
> "सर्वोच्च, अमर्याद व अप्रतिहत असे केवल ज्ञान त्याला झालें होतें. त्याला प्राणिमात्रांचें अंतर्ज्ञानही होतें." (से. बु. ई. २२:२५७)
>
> "त्या चतुर व ज्ञानी महात्म्याचें ज्ञान अनंत होतें; व त्याची श्रद्धाही अनंत होती. (से. बु. ई. ४५:२८७)

सर्वज्ञतेच्या तेजानें तो विलसत होता. त्या सर्वज्ञ महात्म्यानें सद्धर्माचा उपदेश केला आहे. सर्वज्ञाची कीर्ति थोर आहे. महावीर सर्वज्ञ आहे. (से. बु. ई. ४५: २८८-२९१)

जनांच्या धर्मग्रंथांत असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं, महावीराचे अनेक जन्म पूर्वीं होऊन गेले. व हा जन्म घेण्याची त्यानें अगाऊच योजना करून ठेविली होती.

" तो स्वर्गांतून खालीं उतरला. भगवान् महावीर विमानांतून (देवाच्या प्रसादांतून) खालीं उतरला, आणि जंबुद्वीपांतील भारतवर्षाच्या दक्षिणेस येऊन त्यानें देवनंदेच्या गर्भांत प्रवेश केला " (से. बु. ई. २२: १८९-१९०; २२: २१७-२२८)

धर्मपंथाचा पुरस्कर्ता म्हणून महावीर पूज्य मानिला जातो इतकेंच नव्हें तर त्याची मूर्तिपूजाही होत आहे. या मूर्तिपूजेच्या बाबतींत जैनधर्मांतील श्वेतांबर व दिगंबर या दोन उपपंथांत कायमचा मतभेद पडला आहे. महावीराच्या मूर्तीवर कपडे चढवावे असें श्वेतांबरांचें म्हणणें; व ती मूर्ति नग्न ठेवावी असें दिगंबरांचें म्हणणें. मानवांचा उद्धारक या दृष्टीनें महावीराची पूजा होते. जैनधर्मांत आजपर्यंत असे चोवीस

उद्धारक म्हणजे तीर्थंकर होऊन गेले. यापैकीं शेवटचा तीर्थंकर महावीर हा होय. (से. बु. ई. २२,२१८,२८०)

४ जैन धर्मग्रंथ

जैन धर्मांतील प्रमुख धर्मग्रंथांना आगम (म्हणजे उपदेश) म्हणतात, अथवा सिद्धांत म्हणतात. या धर्मग्रंथापैकीं पहिल्याची बारा अंगें आहेत. या पैकीं बारावें अंग आज उपलब्ध नाहीं. या पैकीं कोणताही धर्मग्रंथ महावीर समाधिस्त होऊन दोनशें वर्षे होईपर्यंत रचलेला नव्हता. हल्लींच्या धर्मग्रंथांच्या यादींतील सत्ताविसाव्या ग्रंथांत महावीराचा जीवनवृत्तांत विस्तारानें दिलेला आहे. ह्या ग्रंथांत दोन ठिकाणीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, हा ग्रंथ रचण्यापूर्वी ९८० वर्षें महावीर समाधिस्त झाले होते. उपलब्ध धर्मग्रंथापैकीं कोणतें ग्रंथ मान्य समजावें या बाबतींत जैनपंथांत बराच मतभेद आहे. स्थानकवासी पंथाचे असें म्हणणें कीं, धर्मग्रंथाच्या यादींतील फक्त तेहतीस ग्रंथच आम्ही प्रमाण मानणार. श्वेतांबरपंथीय लोक पंचेचाळीस ग्रंथ प्रमाणभूत मानतात. कांहीं जैनपंथांतील लोक तर चौऱ्यांशी धर्मग्रंथ प्रमाण मानतात. जैनशास्त्रावर अधिकारानें बोलण्याची योग्यता असलेल्या एका युरोपियन बाईनें असें म्हटलें आहे कीं, जैनलोक आपल्या धर्मग्रंथांचा जवळ जवळ मुळींच उपयोग करीत नाहींत असें म्हटलें तरी चालेल.

"आपल्या धर्मग्रंथांचा अभ्यास जैनलोक फारसा करीत असल्यानें दिसत नाहीं. फारांत फार म्हणजे आपल्या धर्मग्रंथांचीं नांवे मुखोद्गत करण्यांत ते

स्वतःला कृतकृत्य समजतात." (मिसेस स्टीव्हन्-सनकृत "हार्ट ऑफ जैनिझम" १२)

जैनधर्मग्रंथाची भाषा अर्धमागधी असून ती प्राकृत भाषेचा एक पोटभेद आहे. ही भाषा महावीराचे वेळीं उत्तरहिंदुस्तानांत प्रचलित होती. या प्राकृतांत लिहिलेल्या धर्मग्रंथांवरील जुन्यांतली जुनी टीका संस्कृतांत लिहिलेली आहे. अर्वाचीन जैनधर्मसाहित्य बहुतेक संस्कृतांत लिहिलें आहे. हल्लींच्या जैनांचा वरील दोन्ही भाषेपैकीं कोणाशींच परिचय नाहीं. यापैकीं कांहीं धर्मग्रंथांतील पंक्तिच्या पंक्ति नियमानें जैनमंदिरांत म्हटल्या जातात; व श्रद्धाळु जैन कांहीं ग्रंथांचे नित्यपठणही करतात. तरीपण बहुतेक जैनांचें आपल्या धर्मग्रंथांविषयीं गाढ अज्ञान असल्याचें आढळतें. यांपैकीं कांहीं धर्मग्रंथांचीं हल्लीं प्रचलित देशीभाषेंत भाषांतरें झालीं आहेत. चार धर्मग्रंथांचीं भाषांतरें "सेक्रेड बुक्स ऑफ धि ईस्ट" या मालेमार्फत झालीं आहेत. याशिवाय आणखीं तीन ग्रंथांचीं भाषांतरें युरोपियन पंडितांनीं केलीं आहेत; तरीपण एकंदरीनें इंग्रजीद्वारा फारच थोडे जैनधर्मग्रंथ पाश्चात्यांना उपलब्ध आहेत.

४ जैनधर्माची परमेश्वराविषयींची कल्पना

प्रारंभापासून जैनधर्म परमेश्वर मानीत नाहीं. नानाविध निसर्गदेवता अथवा अतिमानुष देवता मानण्याची मुळींच जरूर नाहीं,

असें महावीराचें स्पष्ट म्हणणें आहे. इतकेंच नव्हे तर, देवतांची प्रार्थना करणें अथवा त्यांच्याविषयीं कांहीं बोलणें याचाही महावीरानें स्पष्ट निषेध केला आहे.

> “कोणाही जैन साधूनें अथवा साध्वीनें स्वर्गांतील देवतेसंबंधीं बोलूं नये; इतकेंच नव्हे तर ‘ वादळांचा राजा,’ ‘ पर्जन्याचा राजा,’ ‘ देवा ! पाऊस पडूं दे,’ ‘ देवा ! पिकें उगवू दे,’ ‘ आमच्या राजाचा जय असो ’ अशी किंवा अशा तऱ्हेची भाषा केव्हांही वापरू नये. पण हे सर्व निसर्गांतील पदार्थ आहेत असें समजून त्यांनीं ‘ ही हवा आहे,’ ‘ ढग जमले आहेत,’ ‘ ढगांतून पाऊस पडत आहे,’ अशा तऱ्हेचे वाक्यप्रयोग करावे, हेंच त्याचें कर्तव्य होय. ’ (से. बु. ई. २२: १५२)

बाणेदार वृत्तीच्या महावीरानें असें स्पष्ट बजावलें आहे कीं, ‘ माझ्यापेक्षां उच्च असलेल्या देवतेकडून मला साहाय्य मिळालें असें दीनवाणें उद्गार माणसानें कधींही काढू नयेत.

> “ हे मानवा ! तूंच स्वतःचा मित्र आहेस. तुझ्याहून निराळ्या अशा एखाद्या मित्राची तूं अपेक्षा कां करतोस ? ” (से. बु. ई. २२: ३३)

कुंभाराच्या दृष्टांताला अनुसरून या जगड्व्याळ जगाचा उत्पादक कोणी तरी असला पाहिजे असें

मानणें हें निव्वळ अज्ञान आहे असें महावीरानें स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे.

"जे लोक आपल्या स्वतःच्या डोक्यांतून कांहीं तरी कल्पना काढून असें म्हणतात कीं परमेश्वरानें जग निर्माण केलें आहे त्यांना कांहींच कळलें नाहीं (से. बु. ई. ४५: २४५).

तथापि, या एकान्तिक मताविरुद्ध प्रतिक्रिया लौकरच सुरू झाली. ज्या महावीरानें ईश्वरपूजेचा निषेध केला त्याचीच ईश्वर म्हणून पूजा सुरू झाली. इतकेंच नव्हे तर, त्याच्यासारख्या दुसऱ्या अनेक तीर्थंकरांची, आर्हतांची, सिद्धांची व जिनांची श्रद्धापूर्वक पूजा सुरू झाली. आणि मौजेची गोष्ट ही कीं देवतांचा स्पष्ट निषेध करणाऱ्या महावीरानें स्थापलेल्या धर्मांत हा प्रकार सुरू झाला.

"जैनधर्म हें एक गूढ आहे. कारण एकाबाजूनें पाहिलें तर तो धर्म सगुण परमेश्वर मानीत नाहीं; किंवा परमेश्वर हा सृष्टिकर्ता आहे, अथवा तो पिता अथवा सखा आहे ही ही गोष्ट या धर्माला मान्य नाहीं. पण दुसऱ्या बाजूनें पाहतां स्वतःला निरीश्वरवादी म्हटलेलें या धर्माला रुपत नाहीं. किंबहुना एखाद्या जैनाला नास्तिक म्हटलें असतां तो त्याला भयंकर अपमान झाल्यासारखा वाटतो. (मिसेस स्टीव्हन्सन् कृत "हार्ट आफ जैनिझम" पृष्ठ २९८)

सरटीव्हन्सन् कृत हार्ट आफ जैनिझम पृष्ठ २९८)

या जन्मांत केलेल्या कर्माचें फळ पुढील जन्मांत मिळतें, अशा तऱ्हेच्या कर्मविपाकाच्या तत्त्वाची शिकवण महावीराची होती. या जगांत एक अदृश्य शक्ती असून ती सतत कार्य करणारी पण अज्ञेय अशी आहे; तिच्या तडाख्यांतून कोणीही सुटू शकत नाहीं, असे जैन धर्म मानतो. जैनधर्माची परमेश्वर-विषयक कल्पना हिंदूच्या एतद्विषयक कल्पनेहून अगदीं निराळी आहे हें वरील विवेचनावरून दिसून येईल. परमेश्वर म्हणजे अज्ञेय, निर्गुण, व निष्कलंक ब्रह्मच होय, असें हिंदुधर्म मानतो.

६ जैनधर्मातील नीतिकल्पना

जैनधर्मातील आदर्श पुरुष म्हणजे नग्न, निर्वैर, व कोणाचीही हिंसा न करणारा असा यति होय.

"जैनांच्या उच्च धर्माचें रहस्य माझेकडून समजावून घ्या. कपट, लोभ, क्रोध व गर्व हा सर्वांपासून शहाण्या मनुष्यानें परावृत्त व्हावें. शहाण्या मनुष्यानें जोडे व छत्री वापरू नये; द्यूत खेळू नये; दुसऱ्याची सेवा करू नये. आपल्याला कोणीही मारले तरी रागावू नये; कोणी शिव्या दिल्यास खवळून जाऊ नये; पण शांत चित्तानें तें सर्व सहन करावें, व त्या विरुद्ध 'ब्र' ही काढू नये. से. बु. ई. ४५: ३०१–३०५)

"यतीला कोणी मारलें असतां त्यानें रागावू नये; त्यानें वाईट विचार केव्हांही मनांत आणू नयेत; क्षमा हा परमश्रेष्ठ सद्गुण आहे हें जाणून यतीनें सदा धर्म चिंतन करीत राहावें. राग अथवा द्वेष हे दोन्हीही आसक्तीचे प्रकार असल्यानें त्या दोहोंचाही त्याग करावा." (से. बु. ई. ४५:१२)

"आपल्यावर प्रेम करणाऱ्यावरही जो यति उलट प्रेम करीत नाहीं, तो सर्व पाप आणि द्वेष यापासून मुक्त होतो." (से. बु. ई. ४५–३२)

"प्रेम द्वेष आणि चुकीची श्रद्धा या सर्वांचा त्याग केल्यानें कर्माचें बंधन तोडता येतें."(से. बु. ई. ४५: १७२ "सत्यज्ञानाच्या उपदेशानें अज्ञान व अविद्या ह्यांचा नाश झाला असता, आणि राग-द्वेषाचा निरास झाला असतां, निर्वाणपदाची प्राप्ति होते." (स. बु. ई. ४५–१८४)

"जैन धर्मातील मुख्य गुण म्हणजे अहिंसा, व भिक्षावृत्तियुक्त परिव्रज्या हे होत. यतीनें विहित अन्नाचें सेवन करून एकट्यानें भटकत रहावें. त्यानें अन्नाची भिक्षा मागावी, व आपल्याला भिक्षा मिळेल किंवा नाहीं याची परवा करूं नये." (से. बु. ई. ४५: १२–१३)

"थाळीतलें पाणी, बाजरीची भाकरी, थंड पेज, अथवा बाजरीचें पाणी अशा तऱ्हेचा हलका आहार

किंवा निदान पाणी दिलें तरीसुद्धां यतीनें नाहीं ह्मणूं नये. त्यानें हीनदर्जाच्या लोकांच्या घरींसुद्धां भीक घ्यावी; तरच त्याला खरा यति ह्मणतां येईल. (से. बु. ई. ४५:७२)

" कोणाही प्राण्याची हिंसा न करणें हें सर्व ज्ञानाचें सार आहे. "(से. बु. ई. ४५-२४७)

महावीरानें आपल्या अनुयायांना पंचमहाव्रताचा उपदेश केला आहेः—अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हीं तीं महाव्रतें. (से. बु. ई. २२ –२०२–२१०)

७ जैन धर्मांतील इतर महत्वाचे मुद्दे.

शुद्ध सनातन आत्म्याचा दुष्ट भौतिक शरीराशीं संबंध जडणें हें सर्व दुःखाचें मूळ आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें या कल्पनेला द्वैत असें ह्मणतात. आत्मा व जड द्रव्य हे दोन प्रकार भिन्न प्रकारचे असून एकमेकापासून संपूर्ण विभिन्न आहेत.

वरील द्वैताची कल्पना व्यवहारांत लागू केली असता त्याचा सरळ अर्थ असा होतो कीं, प्रत्येकानें मोक्ष मिळविण्याकरता परम जिन महावीराप्रमाणें शरीराचें दमन करावें. मोक्ष अथवा निर्वाण हें प्रत्येक जैनाचें अंतिम ध्येय असलें पाहिजे. या मोक्षावस्थेंत जीवात्मा सर्व शारीरिक बंधनापासून व उपाधीपासून मुक्त होतो. या अवस्थेंत त्याच्या सर्व प्रारब्धकर्माचाही क्षय होतो.

मोक्षाचा एकमेव उपाय ह्मणजे जैन धर्मांत सांगितलेलें रत्नत्रय होय.

मानणें हें निव्वळ अज्ञान आहे असें महावीरानें स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे.

" जे लोक आपल्या स्वतःच्या डोक्यांतून कांहीं तरी कल्पना काढून असें म्हणतात कीं परमेश्वरानें जग निर्माण केलें आहे त्यांना कांहींच कळलें नाहीं (से. बु. ई. ४५: २४५).

तथापि, या एकान्तिक मताविरुद्ध प्रतिक्रिया लौकरच सुरू झाली. ज्या महावीरानें ईश्वरपूजेचा निषेध केला त्याचीच ईश्वर म्हणून पूजा सुरू झाली. इतकेंच नव्हे तर, त्याच्यासारख्या दुसऱ्या अनेक तीर्थंकरांची, आर्हतांची, सिद्धांची व जिनांची श्रद्धापूर्वक पूजा सुरू झाली. आणि मौजेची गोष्ट ही कीं देवतांचा स्पष्ट निषेध करणाऱ्या महावीरानें स्थापलेल्या धर्मांत हा प्रकार सुरू झाला.

"जैनधर्म हें एक गूढ आहे. कारण एकाबाजूनें पाहिलें तर तो धर्म सगुण परमेश्वर मानीत नाहीं; किंवा परमेश्वर हा सृष्टिकर्ता आहे, अथवा तो पिता अथवा सखा आहें ही ही गोष्ट या धर्माला मान्य नाहीं. पण दुसऱ्या बाजूनें पाहतां स्वतःला निरीश्वरवादी म्हटलेलें या धर्माला रुचत नाहीं. किंबहुना एखाद्या जैनाला नास्तिक म्हटलें असतां तो त्याला भयंकर अपमान झाल्यासारखा वाटतो. (मिसेस स्टीव्हन्सन् कृत "हार्ट आफ जैनिझम" पृष्ठ २९८)

हीन प्रतीचीं कामें करतात." (मिसेस् स्टीव्हन्सन कृत हार्ट ऑफ जैनिझम, पृष्ठ २७०)

केलेल्या कर्मांचें फळ भोगणें (म्हणजे कर्मविपाक) हें जैन-धर्माचें दुसरें एक महत्वाचें वैशिष्टय आहे. ह्या कर्मवादाचेंच एक व्यावहारिक अंग म्हणजे पुर्नजन्म. प्रारब्धकर्मामुळें जीवाला ह्या जगांत पुनरपि जन्म घेणें भाग पडतें.

"ज्या अष्टविध कर्मांच्या योगानें बद्ध झालेल्या जीवात्म्याला जन्ममरणाच्या फेऱ्यांत सारखे फिरत राहावें लागतें, त्याचें मी आतां वर्णन करतों." (से. बु. ई. ४५-११२)

"प्राण्यांचा घात केल्यानें मनुष्य आपल्या आत्म्याचाच घात करतो. कारण त्यामुळें तो जन्म-मरणाच्या फेऱ्यांत पुरा सांपडतो." (से. बु. ई. ४५-२१२)

स्त्रीजातीची जैनधर्मशास्त्रांत फारच निंदा केली आहे.

"स्त्रिया ह्या सर्व पापकृत्याचें मूळ आहे, असें महावीर मानीत असे. त्याचें हें मानणें वस्तुस्थितिला धरूनच होतें." (से. बु. ई. २२-८१)

"ह्या जगांत स्त्रिया हा भयंकर मोहाचा विषय आहे, असें महावीरानें सांगितलें आहे; म्हणून यतीनें स्त्रियाविषयीं कांहीहीं बोलूं नये, त्यांच्याकडे बघूं नये, त्यांच्याशीं संभाषण करूं नये, त्यांच्यावर

आपली मालकी गाजवूं नये, अथवा त्यांचे कोणतेंही काम करूं नये." (से. बु. ई. २२-४८)

आणि इतकें सांगूनही पुन्हा आपलें जैनधर्मानें स्त्रियांना साध्वी ह्मणून यति संघांत दाखल केलें आहे!

८ जैन धर्मांतील विविध पंथ.

जैनधर्मांत मुख्य दोन पंथ आहेत. एक श्वेतांबर व दुसरा दिगंबर. इ. स. पूर्वी ३१० व्या वर्षी उत्तर–हिंदुस्थानांत भयंकर दुष्काळ पडला होता. त्यांत जैन यतींचे फार हाल होऊं लागल्यानें बारा हजार जैनयति मुनि भद्रबाहु यांच्या नेतृत्वाखालीं उत्तर–हिंदुस्थान सोडून म्हैसूरकडे (दक्षिण–हिंदुस्थानांत) आले. या प्रदेशांतील गरम हवेमुळें साहाजिकच त्यांना कपड्याची जरूरी फारशी भासेना; त्यामुळें अर्थात्च त्यांना उत्तर-हिंदुस्थानातील जैन-यतीपेक्षां कमी वस्त्रें लागूं लागलीं. किंबहुना वस्त्रहीन राहता येऊं लागले. या प्रकारामुळें उत्तरेकडील व दक्षिणेकडील यतींमध्यें दोन तट पडले. इ. स. ८२ च्या सुमारास तर वस्त्र वापरावें कां न वापरावें या मुद्यावर निकराचें भांडण होऊन दोन तट कायमचे पडले. विंध्यपर्वताचे उत्तरेस राहणारे जैन आपणाला श्वेतांबर ह्मणवून घेऊं लागले; व दक्षिण हिंदुस्थानांतील जैनांनीं दिगंबरपंथाचा स्वीकार केला. दिगंबरपंथियांचा विवस्त्र राहण्याचा हा पण मात्र शेवटपर्यंत टिकूं शकला नाहीं; कारण दक्षिण हिंदुस्थानांतल्या मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें दिगंबर जैनांना निदान लंगोटी तरी वापरणें भाग पडलें.

या दोन पंथांत दुसरा फरक हा कीं, श्वेतांबर जैन हे आपल्या पंथांतील मनुष्यांप्रमाणें आपल्या देवांच्या मूर्तींनांही पांढरें वस्त्र नेसवीत. दिगंबरजैनांत मात्र भक्तांप्रमाणें देवही विवस्त्र राहात.

ह्या दोन पंथांतील तिसरा मोठा फरक स्त्रियांना वागविण्याचे बाबतींत दिसून येतो. श्वेतांबर पंथांत स्त्रियांना साध्वी होण्याचा अधिकार आहे, पण दिगंबरपंथीय लोक स्त्रियांना मोक्ष मिळण्याची शक्यता मानीत नाहींत. स्त्रिया इहलोकींच्या पुण्यानें भावी जन्मांत पुरुष होऊनच मोक्ष मिळवू शकतात, असें हा पंथ (दिगंबर) मानतो.

या दोन पंथांखेरीज तिसरा एक पंथ जैनधर्मांत आहे. त्याचें नांव स्थानकवासी. हा पंथ मूर्तिपूजा मानीत नाहीं. याची स्थापना इ. स. १४७४ मध्यें श्वेतांबरपंथांतील एका धर्मसुधारकानें केली. त्याचें म्हणणें असें होतें कीं, जैनधर्मशास्त्रांत मूर्तिपूजेचा मुळींच उल्लेख नाहीं. स्थानकवासी जैनांचे अकरा उपपंथ आहेत. व श्वेतांबर जैनांत तर चौऱ्याऐंशीं उपपंथ आहेत असें म्हणतात.

९ जैन धर्माचा इतिहास

गेल्या पंचवीस शतकांत जैनधर्मानें बऱ्याच वेळा धर्मप्रसाराचें कार्य करून राजाश्रय मिळविलेला दिसतो. या धर्मानें नांवाजण्यासारखें धार्मिकसाहित्य व शिल्पकलाकृति निर्माण केली आहे. तथापि, एकंदरीनें हा पंथ आत्मतृप्त व आपल्याच कोंढाळ्यांत राहून परंपरा जतन करणारा आहे. आपल्या पोटपंथातल्या आपापसांतील मारामाऱ्यामुळें हा पंथ अनकवेळां जर्जर झाला आहे. त्याचप्रमाणें हिंदु व मुसलमान या धर्मांकडून ह्या धर्मास बराच त्रास सोसावा

लागला आहे ह्या धर्माच्या दीर्घकालीन इतिहासांत पुढील टळक गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

इ. स. पूर्वी	घडलेली गोष्ट.
५१३	ह्या धर्माच्या संस्थापकाच्या मरणानंतर चौदा वर्षांनीं जैनधर्मात पहिल्यानें तट पडला.
४००	एका जैन मंदिरांत महावीराची मूर्ति पूजे-करतां प्रथम स्थापण्यांत आली (कदाचित् ४०० च्या आंतबाहेरही ही गोष्ट घडली असेल):—मि० स्टीव्हन्सनकृत हार्ट आफ जैनिझम पान ६९.
३००	पाटणा येथील धर्मपरिषदेंत जैनधर्मशास्त्रग्रंथांचें दोन गट ठरविण्यांत आले असें मानतात.
२५०	प्रसिद्ध बौद्धधर्मी राजा अशोक यानें पांच गुंफा जैन लोकांना यावच्चंद्र दिवाकरौ दिल्या
२३२	अशोकानंतर गादीवर बसलेला त्याचा नातू संप्राली यानें जैन मंदिरें व मठ बांधिले.

इ. सनानंतर	घडलेली गोष्ट
१००	दक्षिण हिंदुस्थानांत तामीळ भाषेत जैन साहित्याचा प्रारंभ झाला.
२००	पश्चिम हिंदुस्थानामध्यें गुजरातेंतील तत्कालीन देशीभाषेंत जैनसाहित्याचा प्रारंभ.
५१४	वलभीच्या धर्म परिषदेंत जैन धर्मग्रंथांची यादी कायमची ठरविण्यांत आली.

(१) प्राचीन हिंदुधर्माशीं जैनधर्माचें सादृश्य.

महावीराचा जन्म हिंदुधर्मांत झाला इतकेंच नव्हें, पण तो त्याच धर्मांत वाढून त्यांतच त्याचें निधन झालें. त्यानें हिंदुधर्माचा त्याग असा कधींच केला नाहीं. उलट ज्याप्रमाणें ज्यू-धर्मांतील लोकांनीं येशूला आपल्यामधून बहिष्कृत केले, त्याप्रमाणें हिंदुधर्मीयांनीं त्याला केव्हांही बहिष्कृत केले नाहीं. इतकेंच नव्हें तर, वयाच्या तिसाव्या वर्षी ज्यावेळीं महावीरानें धर्मप्रसाराची चळवळ चालविली, त्यावेळीं नव्या धर्माचें स्वरूप त्याच्या उपदेशाला प्राप्त झालें. तरीपण, त्यानें हिंदुधर्मांतील दोन मौलिकतत्त्वें उराशीं बाळगिलीं. हीं दोन तत्त्वें म्हणजे कर्मविपाक व मरणोत्तर पुनर्जन्म.

(२) मूळहिंदुधर्माशीं वैसादृश्य.

परंतु सादृश्यापेक्षां या दोन धर्मांत वैसादृश्यच जास्त आहे. हिंदुधर्माचा देवतावरील विश्वास याविरुद्ध जैनधर्मानें कसून विरोध केला. देवता एक असो वा अनेक असोत, त्या वेदांत सांगितल्या असोत व नसोत त्या सर्वांशीं किंबहुना उपनिषदांत सांगितलेल्या परब्रह्माच्या कल्पनेशीसुद्धां जैन धर्माचा तीव्र विरोध आहे. महावीराला कोणत्याही देवतेचें अस्तित्व मान्य नव्हतें.

नांव उपलब्ध नाहीं, पण तो निःसंशय जैन असावा.

८०० तिरुवल्लवरचा " पवित्र कुरल " हा ग्रंथ रचला गेला. हा काव्यग्रंथ तामीळ साहित्यांत जैनधर्मांतील अत्युत्कृष्ट ग्रंथ म्हणून मानिला जातो. या ग्रंथांत जैनधर्मांतील कांहीं पारिभाषिक शब्द आले आहेत. यावरून तो कोणीतरी जैनानें रचिला असावा असें मानतात.

८१५–८८० राजा अमोघवर्ष याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत जिनसेन आणि गुणभद्र यांच्या नेतृत्वाखालीं जैन धर्माचा चांगला प्रसार झाला.

११२५–११५९ महाप्रसिद्ध जैनपंडित हेमचंद्राचार्य यांनीं कुमारपाल नांवाच्या एका हिंदुराजाला गुजरातेंत जैनधर्माचा दीक्षा दिली. कुमारपालानें या प्रसंगाचे स्मरणार्थ बत्तीस जैनमंदिरें बांधलीं. यापुढें गुजराथप्रांत हा जैनधर्माचा अभेद्य किल्ला म्हणून मानला गेला.

११७४–११७६ ह्यानंतरचा गुजरातचा राजा अजयदेव ह्यानें राज्यावर बसताच जैनांचा छळ करायला सुरवात केली. त्यानें अनेक जैनांवर अन-

न्वित जुलूम करून त्यांच्या मुख्य आचार्याला ठार मारलें, व जैनमंदिरांचा विध्वंस केला. (व्हिन्सेंट स्मिथ 'अर्ली हिस्ट्री ऑफ इंडिया' आवृत्ति तिसरी, पान २०३.

१२९७–१२९८	गुजरातचा मुसलमान विजेता अल्लाउद्दिन यानें गुजरात बेचिराख करून जैनांवर कहर गुदरविला.
१५४२–१६०५	मोगलसम्राट् अकबर याचा जैनधर्माविषयीं अनुकूल ग्रह झाला. त्यानें गुजरातेंत डोईपट्टी माफ केली; आणि जैनांच्या पवित्र धर्मस्थलांवरील जैनांचा हक्क मान्य केला. प्राणिमात्रांवर दया करण्याबद्दलच्या जैनधर्माच्या उपदेशाला मान देण्याकरतां त्यानें आपल्या राज्यांत असें जाहीर केलें कीं, वर्षांतून दोन वेळ अखिल हिंदुस्थानांत प्राणिवध बंद करावा.

१० जैनधर्म व हिंदुधर्म यांची तुलना

प्राचीन हिंदुधर्माचा मूळ संस्थापक कोण हें सांगतां येत नाहीं. तो धर्म स्वयंभू आहे. याचे उलट जैनधर्म हा विशिष्ट व्यक्तींनीं स्थापिलेल्या धर्मांपैकीं पहिला धर्म आहे. या दोन धर्मांत (हिंदु व जैन या धर्मांत) सादृश्याचें तसेंच वैसादृश्याचे अनेक महत्वाचे मुद्दे आहे. त्यापैकीं कांहीं मुद्दे खालीं दिले आहेत.

(१) प्राचीन हिंदुधर्माशीं जैनधर्माचें साहश्य.

महावीराचा जन्म हिंदुधर्मांत झाला इतकेंच नव्हें, पण तो त्याच धर्मांत वाढून त्यांतच त्याचें निधन झालें. त्यानें हिंदुधर्माचा त्याग असा कधींच केला नाहीं. उलट ज्याप्रमाणें ज्यू-धर्मांतील लोकांनीं येशूला आपल्यामधून बहिष्कृत केले, त्याप्रमाणें हिंदुधर्मीयांनीं त्याला केव्हांही बहिष्कृत केले नाहीं. इतकेंच नव्हें तर, वयाच्या तिसाव्या वर्षी ज्यावेळीं महावीरानें धर्मप्रसाराची चळवळ चालविली, त्यावेळीं नव्या धर्माचें स्वरूप त्याच्या उपदेशाला प्राप्त झालें. तरीपण, त्यानें हिंदुधर्मांतील दोन मौलिकतत्त्वें उराशीं बाळगिलीं. हीं दोन तत्त्वें म्हणजे कर्मविपाक व मरणोत्तर पुनर्जन्म.

(२) मूळहिंदुधर्माशीं वैसाहश्य.

परंतु साहश्यापेक्षां या दोन धर्मांत वैसादृश्यच जास्त आहे. हिंदुधर्माचा देवतावरील विश्वास याविरुद्ध जैनधर्मानें कसून विरोध केला. देवता एक असो वा अनेक असोत, त्या वेदांत सांगितल्या असोत व नसोत त्या सर्वांशीं किंबहुना उपनिषदांत सांगितलेल्या परब्रह्माच्या कल्पनेशीसुद्धां जैन धर्माचा तीव्र विरोध आहे. महावीराला कोणत्याही देवतेचें अस्तित्व मान्य नव्हतें.

याशिवाय, परमेश्वर एक असून जीव आणि प्रकृति हीं दोन्हीं त्याचींच स्वरूपें आहेत ह्या हिंदु-धर्मातील कल्पनेलाही जैनधर्म विरोध करतो. ह्या कल्पनेऐवजीं महावीरानें द्वैतवादाचा पुरस्कार केला. जीव आणि प्रकृति हीं पृथक् तत्त्वें असून तीं सत्य आहेत असें त्यानें प्रतिपादन केलें आहे. अर्थात् त्याला परब्रह्माचें अद्वैत मुळींच मान्य नव्हतें.

वेद अथवा ब्राह्मण या ग्रंथांत प्रतिपादलेला पशु-यज्ञ ह्या बाबतींत जैनधर्माचा हिंदुधर्माशीं प्रबल विरोध आहे. उभयतामधील विरोधाचा हा तिसरा मुद्दा. पशुयज्ञाच्या अगदीं उलट सर्व प्राण्यांविषयीं दयाभाव, व संयमपूर्वक त्याग यांचाच उपदेश महावीरानें केला आहे.

जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याचा हिंदुधर्मानें उघडउघड पुरस्कार केला आहे. याच्या अगदीं उलट महावीरानें जातिभेदाचा स्पष्ट शब्दांत निषेध करून, धर्माचरण करणारी प्रत्येक व्यक्ति समान आहे, असें जोरानें प्रतिपादिलें आहे.

देवतानुग्रह अथवा आचार्योपासना ह्यांचे द्वारा मोक्ष मिळविण्याच्या कल्पनेचाही महावीरानें स्पष्ट निषेध केला आहे. कोणाच्याही सहाय्यावाचून संयमपूर्वक धर्माचरण केलें असतां प्रत्येक व्यक्तीस आत्मोद्धार करता येतो असें महावीरानें सांगितलें आहे.

आहे.

प्राचीन संस्कृत भाषेंत लिहिलेलें वेद वगैरे धर्म-ग्रंथ हिंदुधर्माला प्रमाण; तर याचे उलट महावीराला हे सर्व धर्मग्रंथ संपूर्णपणें अप्रमाण. महावीरानें आपला धर्मोपदेश तत्कालीन प्रचलित असलेल्या जनतेच्यां भाषेंतच म्हणजे प्राकृत भाषेंतच केला. जनतेच्या या प्राकृत भाषेंतच जैनांचे सर्व धर्मग्रंथ रचले गेले आहेत.

हिंदुधर्माच्या मर्यादेंत व हिंदु जातीसच मोक्षाचा उपदेश हिंदुधर्मानें केला आहे. याचे उलट अखिल मानवांचा उद्धार करण्याकरितां धर्मोपदेश कर-ण्याची मला दैवी प्रेरणा झाली आहे असें महावीर ह्मणतो.

(३) पुढील काळांत या दोन धर्मांत उत्पन्न झालेलें सादृश्य:—

जैन धर्माच्या स्थापनेपासून आजपर्यंत हजारो वर्षे हिंदुस्तानांत हे दोन धर्म एकमेकांशीं गुण्यागोविं-दानें एकत्र राहून नांदत आहेत. याचा साहजिकच परिणाम असा झाला आहे कीं, नवोदित जैनधर्मानें प्राचीन हिंदुधर्मातील अनेक तत्त्वें आत्मसात् करून टाकलीं आहेत. या मुळें हल्लींच्या जैनधर्माचें स्वरूप अनेक बाबतींत मूळ हिंदुधर्माशीं मिळतें आहे.

उदाहरणार्थ हल्लींच्या जैन धर्मांत मूर्तिपूजेचें तत्त्व दाखल झालें आहे. हिंदुप्रमाणें जैनलोकही आपल्या पवित्र तीर्थंकरांच्या मूर्तींची पूजा करूं लागले आहेत.

पवित्र तीर्थंकरांच्या मूर्तींची पूजा करूं लागले आहेत.

ही मूर्तिपूजेची पद्धति, हिंदुधर्मातील रामकृष्ण, विष्णु, शिव, इत्यादिकांच्या मूर्तींच्या पूजेवरूनच घेतली आहे हें उघड आहे.

हिंदुधर्माप्रमाणें जैनधर्मातही हल्लीं अनेकदेवतावाद घुसला आहे. हिंदुधर्मांत उपास्यदेवतांचे विविधत्व जसें दृष्टीस पडतें तसें आजच्या जैनधर्मांतही दिसून येतें.

हिंदुधर्माप्रमाणें आजच्या जैनधर्मांतही मूर्तिपूजा सर्रास प्रचलित आहे. आतां हें खरें आहे कीं, खुद्द हिंदुधर्मांतही महावीरापूर्वीं मूर्तिपूजा प्रचलित नव्हती आजमात्र या दोन्हीही धर्मांत मूर्तिपूजा जोरांत चालू आहे. नाहीं म्हणायला जैनधर्मांतील स्थानकवासी पंथानें मूर्तिपूजेचा सर्वथा निषेध केलेला आढळतो.

हिंदुधर्माप्रमाणें आज जैनधर्मांतही मंदिरांचा सुकाळ झालेला दिसतो. एक वेळ अशी होती कीं, या दोन्ही धर्मांत मंदिरें मुळींच दृष्टीस पडत नव्हतीं.

हिंदुधर्माप्रमाणें जैनधर्मांतही आजकाल पुजारी, गुरुमहाराज, आचार्य, व्रतें, वैकल्यें विधि यांचा सुळसुळाट झाला आहे. कांहीं प्रसंगीं धर्मविधी करितां जैनलोक ब्राम्हणाना जैनमंदिरांत बोलावितात ही ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

पूर्वीं हिंदुधर्मांतील ज्या जातिभेदाविरुद्ध महावीरानें आमरणांत जोराची मोहिम चालविली होती

तें जातिभेदाचें उंटाचें पिल्लूही आजच्या जैनधर्मांत शिरलें आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, आजच्या जैनधर्मांतील देवदेवतानाही हें जातिभेदाचें तत्त्व लागू करण्यांत आलें आहे. जातिभेदाच्या ऐवजीं दुसरें एखादें विधायक सामाजिक सहकारितेचें तत्त्व जैनांनीं आपल्या धर्मांत दाखल न केल्यामुळेंच जातिभेदाचें भूत त्यांच्या बोकांडीं बसलें आहे.

आजकाल हे दोन्ही धर्म एकमेकांच्या अगदीं जवळ येत चालले आहेत. जैनधर्माला इतःपर पूर्वीं-प्रमाणें हिंदुधर्माविषयीं परकेपणा वाटत नसून आपलेपणा वाटत आहे. दिवसेंदिवस हिंदूंचें आचार विचार व श्रद्धा जैनधर्म आत्मसात् करूं लागला आहे.

११ जैनधर्माचें सामर्थ्य पुढील गोष्टींत आहे.

(१) जैनधर्मसंस्थापक महावीर यांच्या जीवनांत एक-प्रकारची उदात्त कळकळ दिसून, आपल्याला प्राप्त झालेल्या श्रेष्ठ ज्ञानाविषयीं त्याची निरतिशय निष्ठा होती.

(२) महावीरानें उपदेशिलेल्या उच्चतम धर्मावर अचल श्रद्धा ठेवून प्रत्येकानें सर्वसंगपरित्यागपूर्वक अनेक कष्ट सोसूनही धर्माचरण करावें अशी उदात्त शिकवणूक ह्या धर्माची आहे.

(३) प्रत्येक जीवात्मा स्वतंत्र व सत्य आहे अशी या धर्माची घोषणा आहे. जीवात्म्याशीं संबद्ध असलेलें हें पांचभौतिक शरीरही सत्य व स्वतंत्र असून या दोन्ही तत्त्वांचा मोक्षपथावर प्रवास चालला आहे असं हा धर्म सांगतो.

(४) आत्मोद्धारापुढें जगांतील सर्व भौतिक पदार्थ कःपदार्थ आहेत असें ह्या धर्माचें सांगणें आहे.

(५) जीवांविषयीं ह्या धर्माला पूज्यभाव वाटतो. आतां तो पूज्यभाव विवेकहीन व अर्धवट आहे, हा भाग निराळा.

(६) या धर्मानें निदान तात्त्विक दृष्ट्या तरी जातिभेदाचा निषेध केला आहे. जातिभेदाच्या आवरणांतून त्याला संपूर्ण डोकें वर काढतां आलें नाहीं हा भाग निराळा.

(७) जैन धर्मांतील भिक्षूंचा व यतींचा संघ जगांतील सर्वधर्मसंघाहून जुना आहे.

१२ जैन धर्माच्या दुर्बलतेचीं कांहीं कारणें.

(१) ह्या धर्मांत महावीराविषयीं पूज्यभाव असला तरी एक सगुण परमेश्वर मानला नाहीं.

(२) मनुष्याला आपल्या साहाय्याकरतां कोणत्याही देवतेचें या धर्मांत आवाहन करता येत नाहीं. नाहीं ह्मणायला हिंदुधर्माचें अनुकरण करून ह्या धर्मानें तीर्थंकराची पूजा सुरू केली आहे.

(३) प्रत्येक प्राणिमात्राचें मोक्षसाधन व्यक्तिगत व भिन्न असून मर्यादित स्वरूपाचें आहे असें हा धर्म मानतो.

(४) पापाचें मूळ मुख्यतः प्रत्येकाचे देहांत आहे, अशी या धर्मानें चुकीची पापमीमांसा केली आहे.

(५) बाह्य त्यागावर व संयमावर या धर्मानें फाजील भर दिला आहे.

(६) बलात्कारानें इंद्रियदमन करणें, हा निषेधात्मक प्रकार ह्या धर्मांत आडळतो.

(७) स्वतःच्या शरीराशी कठोरपणानें वागून प्राणिमात्रावर दया करण्याचा विचित्र प्रकार ह्या धर्मांत सांपडतो.

(८) ह्या सृष्टींतील अनेकविध रमणीय पदार्थावर सर्रास अनिष्टत्वाचा शिक्का या धर्मानें मारला आहे.

(९) जगांतील सौंदर्य व आनंद यांच्याशीं हा धर्म सर्वथैव पराङ्मुख आहे.

(१०) कुटुंब व स्त्रिया ह्यांची या धर्मानें अनुदार निंदा केली आहे.

(११) मानवी जीविताची या धर्मानें फारच कमी किंमत लेखिली आहे.

(१२) सामाजिक संघटना अथवा सुधारणा जेणेंकरून होईल असें एकही विधायक तत्त्व या धर्मांत आढळत नाहीं.

(१३) महावीराच्या वेळची उदार व व्यापकदृष्टि आजच्या संकुचित जैन धर्मांत राहिलेली नाहीं.

(१४) आजचा जैनधर्म मूर्तिपूजा व जातिभेद ह्यांच्या खोल गर्तेत पडला आहे.

प्रकरण चौथें

बौद्ध धर्म

शांतिमय नैतिक आत्मविकासाचा धर्म

१ प्रास्ताविक—विद्यमान धर्मांत बौद्ध धर्माचें स्थान.

सर्व जगांत व्यापक होऊं पाहणारा जगांतील पहिला धर्म बुद्धधर्मच होय. असें असूनही बुद्धधर्माला धर्म हें नांव द्यावयाला अनेक लोक कचरतात.

> "ऐतिहासिक दृष्ट्या धर्म ही संज्ञा आम्हीं बुद्धधर्माला देत असलों, तरी धर्माची मूलभूत कल्पना लक्षांत घेतां बुद्धधर्माला धर्म हा शब्द वास्तविक लावता येणार नाहीं" (मेन्झीजकृत 'हिस्ट्री ऑफ रिलिजन' पान ३५३; ३८०; ४२४.)

> मूळ बुद्धाचा बौद्धधर्म तरी निदान धर्म या संज्ञेला पात्र नाहीं. या विषयांतील एका तज्ज्ञाचें पुढील मत आहे:—

> "निदान मूळच्या अस्सल बौद्धधर्माला तरी धर्म म्हणता येणार नाहीं. जीवनाविषयीं नैराश्यानें ग्रासलेल्या दृष्टीवर उभारलेलें तत्वज्ञान व नीतीशास्त्र याखेरीज मूळच्या बौद्धधर्माला दुसरें नांवच देता येणार नाहीं." (मॉनियर विलियम्सकृत 'बुद्धिझम' पान ५३७; ५३९.)

वास्तविक या धर्माच्या संस्थापकाला एखादा नवा धर्म मुळींच स्थापावयाचा नव्हता. दुःखानें संपूर्ण ग्रासलेल्या जगांतून स्वतःला सोडविणें हें त्याचें एकमेव ध्येय होतें. अमुक एका देवतेची पूजा अथवा प्रार्थना करा, असें त्यानें केव्हांही म्हटलें नाहीं. मात्र त्यानें एका विश्वव्यापी नीतिधर्माचा उपदेश केला. आणि हा नीतिधर्म त्यानें ज्या धर्माविरुद्ध बंड केलें, त्या हिंदुधर्मांतील परमेश्वरविषयक कल्पनेहून निःसंशय श्रेष्ठ दर्जाचा होता. तथापि, कालेंकरून खुद्द बुद्धिचीच देव म्हणून गणना होऊं लागली; व बहुतेक बौद्धधर्मीय लोक इतर अनेक देवता मानू लागले. बुद्धानंतर थोड्याच दिवसांनीं या धर्मांत पूजा आणि प्रार्थना हीं एक जात सुरू झालीं; व जैनांच्या तोडीचे भिक्षुसंघ अथवा यतिसंघ स्थापण्यांत येऊ लागले. हे भिक्षुसंघ साऱ्या जगांत जैन धर्मांतील यतिसंघाच्या खालोखाल जुने आहेत.

आज बौद्धधर्माइतकेच व्यापक असे दोन धर्म आहेत. एक खिस्तीधर्म व दुसरा इस्लामधर्म. या पैकीं पहिला धर्म बुद्धानंतर पांचशें वर्षांनीं सुरू झाला, व दुसरा बुद्धानंतर अकराशें वर्षांनीं अस्तित्वांत आला.

बौद्ध धर्मांतील अनुयायांची संख्या आज जवळ जवळ तेरा कोटि सत्तर लक्ष आहे. टी. डब्ल्यू ऱ्हाइस डेव्हिड यांच्या मतें (‘ बुद्धिझम ए स्केच ’ पान ६) ही संख्या पन्नास कोटिवर आहे. पण ही संख्या अतिरिक्त फुगवलेली दिसते. मौजेची गोष्ट ही कीं, वरील बौद्धधर्माभिमानी सद्गृहस्थांनीं आपल्या या अतिरिक्त विधानाला पुढील पानांतच मुरड घातली आहे:—

“ बुद्धदेवाच्या मूर्तीवर फुलें वाहणाऱ्या व त्याच्या उपदेशाप्रमाणें थोडे बहुत वागणाऱ्या वरील पन्नास कोटि लोकांपैकीं खरा बौद्ध अथवा केवळ बौद्ध एकही आहे असें म्हणता येणार नाहीं.

आजकाल बौद्धधर्म स्वतःच्या जन्मभूमींत बहुतेक नामशेष झाला आहे. नाहीं ह्मणायला हिंदुस्तानांत ब्रिटिश हद्दींत शुद्ध भारतीय बौद्ध जवळ जवळ दोन हजारच शिल्लक आहेत. आज बौद्धधर्म मानणारे आर्य अथवा सेमेटिक मानववंशांत कोणीही उरलें नाहीं. आज बौद्धधर्मीय लोक एक जात मांगोलियन वंशांचे आहेत. सयाम, चीन व जपान या ठिकाणचे, बौद्धधर्माच्या पुनरुज्जीवनाचे कांहीं थोडे प्रयत्न सोडून दिल्यास बाकी सर्वत्र बौद्धधर्म थंडावलेल्या स्थितींत असलेला दिसतो.”

स्थितींत असलेला दिसतो.

बौद्धधर्माच्या संस्थापकाचे जीवन (ख्रिस्तपूर्व ५६०–४८०)

बौद्धधर्मग्रंथांत बुद्धाच्या जीवनचरित्राविषयीं थोडीबहुत हकीकत आढळते. तरीपण त्यांत बुद्धाचें समग्र जीवनचरित्र देण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाहीं. या पुढील काळांत रचलेल्या कथांतून व काव्यांतून बुद्धाविषयीं चमत्कृतिपूर्ण माहिती दिलेली आढळते. उदाहरणार्थ बुद्धाच्या आईला पुरुषसंपर्करहित गर्भ राहिला; त्याची आई पंचेचाळीस वर्षांची असतां अतिमानुषरीतीनें त्याचा जन्म झाला वगैरे. (वॉरनकृत " बुद्धिझम इन ट्रांस्लेशन्स " ४२–४८)

> " त्या राणीच्या पोटीं तिला प्रसूतिवेदना अथवा कोणत्याही तऱ्हेचे क्लेश न होतां, जगत्कल्याणार्थ एक पुत्र जन्माला आला. त्याचा जन्म अलौकिक रीतीनें झाला. " (से. बु. ई. पान ४९; भाग १ पान ५–६)

> त्याच्या जन्माच्या वेळीं अनेक चमत्कार घडले. तो लहान असतांनाच एका हिंदु साधूनें ' हें मूल पुढें एक अलौकिक पुरुष होईल ' असें भविष्य वर्तविलें होतें. (वॉरन बी. टी. ४५–४७; से. बु. ई. १९ : १६–१८)

> बुद्धधर्माच्या संस्थापकाचा ऐतिहासिकत्वाचे बाबतींत बरेच दिवस संशय होता. पण इ. स. १८९६ च्या दिसेंबर महिन्यांत ब्रिटिश अर्क्यालॉजिकल सर्वे खात्याचे एक ऑफिसर डॉक्टर फुरेहर यांनीं बुद्धाची जन्मभूमि ' कपिल वस्तु ' या गांवीं प्रसिद्ध बौद्धधर्मानुयायी राजा अशोक यानें उभारलेला एक स्तंभ—आजवर जमिनींत गाडला

गेलेला—बाहेर उकरून काढला. तेव्हांपासून वरील संशयाचें निराकरण झालें आहे. या स्तंभावर इ. स. पूर्वी २५० ही मिति लिहिली आहे.

(१) राजमहालांतील राजपुत्र (वय १ ते २९)

बुद्धाचें मूळ नांव संस्कृत भाषेंत "गौतम" व पाली भाषेंत 'गोतम' असें होतें. शाक्य जातींतील एका श्रीमान् हिंदु राजाचे पोटीं त्याचा जन्म झाला. तो आपल्या बापाचा एकुलता एक मुलगा असून राज्याचा वारस होता. ह्या राजाची राजधानी कपिलवस्तु हें गांव होतें. हें काशीच्या उत्तरेस शंभर मैलावर आहे. गौतमाचा बालपणचा काल अत्यंत विलासांत गेला.

"गौतमाच्या बापानें आपल्या मुलासाठीं सर्व दृष्टीनें दोषरहित व सुंदर अशा अनेक दाया ठेविल्या होत्या. त्याच्या तैनातीला मोठा लवाजमा ठेवला असून त्याच्या भोंवतालचें वातावरण अत्यंत आकर्षक करण्यांत आलें होतें." (वॉरन बी. टी. ५३) सोळाव्या वर्षीं या तरुण राजपुत्राकरतां त्याच्या बापानें तीन टोलेजंग वाडे बांधले.

"या वाडयांपैकीं एकेका वाड्यांत एकेका ऋतूंत तो राजपुत्र मोठ्या थाटांत व चैनींत राहत असे." (वॉरन बी. टी. ५५)

एकोणिसाव्या वर्षी त्याचें शेजारच्या देशांतील एका राजकन्येशीं लग्न झालें; पण दहा वर्षेपर्यंत त्याला मूल झालें नाहीं.

(२) लोकोत्तर त्याग (वय २९).

एके दिवशीं तो रथांत बसून सहल करायला गेला असतां त्यानें चार दृश्यें पाहिलीं. त्यांचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्यापैकीं पहिलें दृश्य जरेनें जर्जर झालेल्या म्हाताऱ्याचें, दुसरें दुर्धर रोगानें पीडलेल्या एका माणसाचें, तिसरें एका प्रेताचें, व चौथें दुःखशोकानें अविचालित अशा एका यतीचें. मी व माझ्याप्रमाणेंच इतर सर्व मनुष्य प्राणी जरा, रोग व मृत्यु, यांच्या कचाट्यांत सापडले आहेत, या कल्पनेनें त्याच्या मनाला फार दुःख झालें. मनाचा धडा करून संसारत्याग केल्यावांचून व दुःखाच्या कारणाचा शोध लाविल्यावांचून आपल्या मनाला शाश्वत शांति प्राप्त होणार नाहीं अशी त्याची खात्री झाली. त्यानंतर संसाराचा जबर मोहपाश तोडून त्यानें आपल्या पत्नीचा, नुक्त्याच जन्मलेल्या बालकाचा व राज्याच्या गादीचा त्याग केला. आपले केस कापून त्यानें यतिवस्त्रें परिधान केलीं. (से. बु. ई. १९:३१-५८; ४९:१-२७-६१; वॉरन बी. टी. ५६-५७.)

(३) मोक्षसाधना. (वयाच्या २९ पासून ३५ वर्षांपर्यंत).

जगद्व्यापी दुःखाविषयीं त्याचेपूर्वीं फारसा कोणी विचारच केला नव्हता. प्रथम त्यानें हिंदुधर्मांतील मोक्षप्राप्तीच्या ठराविक मार्गानें जाऊन दुःखध्वंसाचा प्रयत्न केला. या मार्गांत अर्थातच त्यानें जीवात्मा व परमात्मा यांच्या परस्पर संबंधाविषयीं चिंतन सुरू केलें; तरी पण दुःख ध्वंसाचा त्याला मार्ग सांपडेना. (से. बु. ई. १९:१४२)

यानंतर त्यानें शारीर तप आचरण्यास सुरवात केली. तपाचा हा प्रकार त्याकाळीं जैनधर्मीय लोक मोक्षा करतां अवलंबीत असत.

“ तो दररोज एक तिळाचा अथवा तांदुळाचा दाणा खाऊन राहूं लागला. अशा रीतीनें त्या महात्म्यानें सहा वर्षेंपर्यंत घोर तपश्चर्या केली. ही त्याचीं सहा वर्षें वाऱ्याची मोट बांधण्याच्या प्रयत्नांतच जणु गेलीं. ” (वॉरन बी. टी. ७०–७१)

(४) दिव्य ज्ञान (३५ व्या वर्षीं)

अशा रीतीनें एका रात्रीं एकांतांत मांडी घालून अश्वत्थवृक्षाखालीं ध्यान करीत बसला असतां, दुःख, दुःखकारण व दुःखनिरोध, ह्याविषयींचा मानसिक उपाय त्याला सहज सुचला. त्याला ज्या चार आर्य-सत्यांचा साक्षात्कार झाला, तीं येणेप्रमाणें:—

सत्यांचा साक्षात्कार झाला,

(१) जीवित म्हटलें कीं तेथें दुःख आलेंच.

(२) सदा अतृप्त राहणाऱ्या वासनांच्या पाशांत सांपडल्यानें दुःख होतें.

(३) अर्थात् वासनाक्षयानें दुःखक्षय आपोआप होतो.

(४) तरीपण जिवंत असेंपर्यंत मनुष्यानें युक्त आहार व विहार करून राहावें. " अष्टधा आर्य मार्गाचें " अनुसरण करावें. सम्यक् श्रद्धा, सम्यक् संकल्प, सम्यक् भाषण, सम्यक् क्रिया, सम्यक् आजीविका, सम्यक् प्रयत्न, सम्यक् विचार व सम्यक् ध्यान, हा तो अष्टविध आर्यमार्ग. (से. बु. ई. १०: १, ५२; ११: १४८. १५२; १३९५: १०२; १७: १०४-१०५).

अशा रीतीच हें दिव्यज्ञान ज्याला झालें, त्याला " बुद्ध " ही पारिभाषिक संज्ञा आहे. बुद्ध हें बुध् (जाणणें) ह्या संस्कृत धातूचें भूतकृदन्ताचें रूप आहे; व त्याचा अर्थ ' ज्ञानी झालेला ' असा आहे. गौतमाला दिव्यज्ञान झालेल्या दिवसापासून "बुद्ध" ही पदवी देण्यांत आली.

" ह्या चार आर्य सत्याविषयीं मला दिव्यज्ञान होऊन अंतर्दृष्टि प्राप्त होतांच माझी खात्री झाली

कीं, स्वर्ग अथवा मृत्युलोक ह्यांत ज्याला तोड नाहीं, अशा पूर्ण ज्ञानाचा मला साक्षात्कार झाला आहे. माझ्या हृदयग्रंथीचा अक्षय्य मोक्ष झाला; हा माझा शेवटचाच जन्म, आतां यापुढें मला पुनर्जन्म नाहीं." (से. बु. ई. ११: १५२-१५३)

पुनर्जन्माच्या भयापासून मुक्त झाल्यामुळें बुद्धाला हायसें वाटलें. ह्या त्याच्या चित्तशांतीचें वर्णन दिव्यज्ञानाचाच एक भाग म्हणून बुद्धधर्मशास्त्रांत अनेक ठिकाणीं केलेलें आढळतें. (से. बु. ई. १०: १; ४२-४३; ११: १५३; १३: ९७; वॉरन बी. टी. ३१८)

(५) धर्मप्रचार (वय ३५ ते ८०)

दिव्यज्ञान होतांच बुद्धानें आपला मायदेश जो उत्तर हिंदुस्तानांतील मगधदेश त्यांतून संचार सुरू करून आपल्या नवीन प्राप्त झालेल्या मोक्षपथाचा उपदेश सुरू केला. ह्या मोक्षमार्ग म्हणजे मनोवृत्तींचा निरोध करून व नीतिमार्गाचा अवलंब करून आत्मविकास करणें, हा होय. मनुष्य खरोखरीच मुमुक्षु असेल, तर त्यानें आपल्या चित्तवृत्तीवर जय मिळवावा म्हणजे झालें. त्याकरतां त्याला देवदेवतार्चन, विधि, तंत्र, गुरुसांप्रदाय, अथवा भगवदनुग्रह यापैकीं कशाचीच जरूर नाहीं, असा त्याचा उपदेश होता. तत्कालीन प्रचलित असलेल्या वेदप्रामाण्याच्या विरुद्ध व परमे-

प्रचलित असलेल्या वेदप्रामाण्याच्या विरुद्ध व परमे-

श्वरवाद आणि देवतानुग्रहाची कल्पना याविरुद्ध मुख्यतः बुद्धानें आपला हल्ला चढविला.

" ब्रह्माला प्रत्यक्ष कोणी पाहिलें आहे ? " तुम्ही वाटेल तितकी प्रार्थना केली, देवतांचे आवाहन केलें, वाटेल तितके देवाला नवस केले, तरी आकीवेती नदीचें पैलतीर कधींतरी ऐलतीर होणें शक्य आहे कां ? "

" तेव्हां या वेदपारंगत ब्राह्मणांचें बोलणें शुद्ध वेडगळ व हास्यास्पद ठरतें. त्यांचें बोलणें ह्मणजे निव्वळ शब्दजाल—एक पोंचट वस्तु ! (से. बु. ई. ११. १७२, १७४, १८०.)

त्याला साठ शिष्य मिळतांच त्यानें त्या सर्वांना आपल्या या साध्या व सुटसुटीत आदेशाचा उपदेश व प्रसार करण्यास चोहोंकडे पाठविलें. ह्या उपदेशाची लोकांना त्या काळीं फार आवश्यकता वाटत होती. कारण हिंदुधर्मात इतक्या खुल्या रीतीनें, इतका मुक्तद्वार उपदेश पूर्वी कोणीही केला नव्हता.

" शिष्य हो ! तुम्ही जगांतील प्राणिमात्राविषयीं दयेनें प्रेरित होऊन चोहोंकडे जा. देवांच्या व मनुष्याच्या कल्याणाकरतां चोहोंकडे जा. एकाच ठिकाणीं दोघे जाऊं नका. एकेकटे एकेका दिशेला जा. ह्या उदात्त धर्माचा उपदेश करा. पवित्र, शुद्ध व

उदात्त जीवनाचा उपदेश करा." (से. बु. ई. १३ : ११२–११३; तसेंच ११ : ६०)

बुद्ध हा फार प्रभावशाली उपदेशक व कर्तबगार मनुष्य होता. त्यानें अनेक लोकांना बौद्धधर्माची दीक्षा दिली. त्याच्या भाषणांतील कित्येक कथा व दृष्टांत येशूख्रिस्ताच्या कथांप्रमाणें असल्या तरी त्यांची मजा कांहीं औरच आहे. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांची गोष्ट (से. बु. ई १० : २, ११, १५;) उधळ्या मुलांची गोष्ट (से. बु. ई. २१ : ९९ : १०६) मोहोरीच्या दाण्याचा दृष्टांत

(ऱ्हाईस डेव्हिडकृत ' बुद्धिझम ए स्केच (१३३ १३४) पैकीं बऱ्याच कथांचा संग्रह इ. डल्यू. बर्मिंगेम यांनीं आपल्या ' बुधिस्ट पॅरॅबल्स ' या पुस्तकांत केला आहे.

" शेकडों मुद्दे पुढें मांडून व शेकडों दृष्टांत देऊन ह्या नाहीं त्या तऱ्हेनें मी सर्व प्राण्यांना आनंदित केलें आहे." (से. बु. ई. १२; ४४)

बुद्ध ऐंशी वर्षांचा होऊन वारला. मरण्यापूर्वीं त्याचें शरीर जराजर्जर झालें असलें तरी, त्याचें मन पूर्ण कणखर होतें. शेणानें लिंपलेल्या एका झोपडींत पांचशें शिष्यांच्या परिवारानें वेष्टित असा तो धर्मोपदेश करीत बसला असतां त्याचें प्राणोत्क्रमण झाल.

"ह्या सर्व परिषदेंत अशी एकही व्यक्ती नाहीं कीं, जिला बुद्ध अथवा चार सत्यें अथवा आर्यपथ ह्या विषयीं कोणत्याही तऱ्हेची शंका आहे." असें ह्मणून भगवान् बुद्ध तेथें जमलेल्या मंडळींना उद्देशून पुढील शब्द बोलले "बंधुहो ! पहा, विनाश हा सर्व उत्पन्न झालेल्या वस्तूंत असावयाचा हें ठरलेलेंच आहे. तुम्हीं स्वप्रयत्नानेंच आपला उद्धार करा." भगवान् बुद्धाचे हे शेवटचेच शब्द. (से. बु. ई. ११: ११४; १९: ३०७: वॉरन बी. टी. १०९)

३ बुद्धाविषयीं पूज्यबुद्धि.

ज्या बुद्धानें कोणीही कोणत्याही देवतेची पूजा करता कामा नये असा स्पष्ट निषेध केला. जो स्वतःच्या व जगाच्या उद्धाराकरतां स्वतःच राबला, त्या बुद्धाची त्याच्या मागें देव ह्मणून पूजा होऊं लागली. ही धर्माच्या इतिहासांतील ठळकपणें नजरेस येणारी अशी एक गोष्ट आहे.

(१) बुद्ध ही एक ऐतिहासिक व्यक्ति होती याविषयीं पुरावाः—

प्राचीन बौद्ध धर्मग्रंथांतील अनेक कथांवरून असें दिसतें कीं, बुद्धाला इतर माणसांप्रमाणें देह-व्याधि होत असत.

"भगवान् बुद्धाच्या पोटांत एकदा वात धरला" (से. बु. ई. १७ ६८.)

"एकदा कुंद ह्या तांबटानें तयार केलेलें अन्न बुद्धानें खाल्लें असतां त्याला भयंकर हगवण लागली,

वें पोटांत फार दुखूं लागलें. या दुखण्यांतच त्याचा अंत झाला."

(२) त्याच्या भक्तिमान् व प्रेमळ शिष्यांच्या दृष्टीनें तो (भगवान बुद्ध) संपूर्ण दोषरहित असा पुरुष होता. स्वतःला सहज राज्यपद प्राप्त होण्यासारखें असतांही ज्यानें त्याचा त्याग केला, ज्यानें जवळजवळ पन्नास वर्षें जगाच्या उद्धाराकरतां एखाद्या सामान्य मनुष्या-प्रमाणें सतत श्रम केले, त्या बुद्धांत त्याच्या शिष्यांना एकही दोष न दिसल्यास नवल नाहीं.

"संपूर्ण ज्ञानी भगवान् बुद्धांत एकही दोष नाहीं" (से. बु. ई. १० : २. १०२).

"भगवान् बुद्ध सर्व जगांत केवढे अनुपम! केवढे शांत! केवढे दयाळु! स्वतःपुढें त्यांनीं किती उच्च ध्येय ठेविलें होतें! आणि त्याकरतां त्यांनीं प्रयत्न तरी किती प्रचंड केला!" (से. बु. ई. ३५ : १७८).

"सम्राटांचा सम्राट्! श्रेष्ठ विजेता!" (से. बु. ई. १० : २१-१०२)

अशा रीतीनें संपूर्ण ज्ञानी म्हणून बुद्धाविषयींची भक्ति वाढत जाऊन तिचें पर्यवसान हिंदूंच्या देवतांच्या तोडीचा तो आहे असें मानण्यांत झालें.

"जगांतील श्रेष्ठ पुरुष! अगदीं इंद्रासारखा!" (से. बु. ई. ४९: १,—५६).

" ब्रह्मादि सुरगण त्या नगरांत गेले, आणि त्यांनीं भगवान् बुद्धाची पूजा केली, व त्याचेपाशीं वराची याचना केली." (से. बु. ई. ४९:१, १९०)

" कालावर जय मिळविणाऱ्या ह्या भगवंताची देव व मनुष्यें पूजा करतील. ह्या जगांत देवासुद्धां कोणीही तुझी बरोबरी करूं शकणार नाहीं " (जे. एच. मूर कृत ' इति. वुत्तक, धि सेइंग्ज ऑफ बुद्ध ' १३२-१३३)

(३) बुद्धाच्या दिव्यत्वाविषयीं पुरावा.

तो सभेंत प्रकट होऊन अद्भुत रीतीनें उपदेश करी, आणि उपदेश पुरा होतांच लोकांना चकित करून तो अंतर्धान पावे.

" अशा रीतीनें अंतर्धान पावणारा हा कोण असावा बरें ? हा देव आहे कां मनुष्य ?" (से. बु. ई. ११:४९)

त्याच्या जन्माच्या वेळीं बत्तीस चमत्कार घडले. त्यांपैकीं कांहीं खालीं दिले आहेत:—

एका आंधळ्याला दृष्टी प्राप्त झाली. जणुं काय त्यानें भगवंताच्या लीला पाहाव्या अशींच परमेश्वराची इच्छा होती. बहिऱ्यांना ऐकूं येऊं लागलें. कुबड्यांचे शरीर सरळ झालें. लंगड्यांना चालतां येऊं लागलें. शृंखलेनें बांधलेल्यांच्या पायांतून शृंखला तुटल्या. (वॉरन बी. टी. ४४).

बुद्धाला दिव्य ज्ञान प्राप्त झालें त्यावेळीं असेंच अनेक चमत्कार घडले:—

आंधळ्यांना दृष्टि प्राप्त झाली. जन्मापासून बहिरे असलेल्यांना ऐकूं येऊं लागलें. लंगडे चालू लागले. आणि बुद्धलोक बंधनापासून मुक्त झाले. (वॉरन बी. टी. ८३).

(४) बुद्धाच्या दिव्यत्वाच्या दृष्टीनें झालेले पंथभेद.

बौद्धधर्मांत मुख्यतः दोन पंथ आहेत. पहिला हीनयानः—याचा प्रसार एशिया खंडाच्या दक्षिणेस आहे. ह्या पंथांतील लोक असें मानतात कीं, बुद्ध हा दुःखापासून मुक्त होण्याचा मार्ग सांगणारा एक सामान्य पुरुष होता. आणि धर्माच्या बाबतींत तर्कबळावर नाना प्रश्न उपस्थित करण्यापासून कांहीं-एक फायदा नाहीं.

" मी दुःखाचें विवेचन केलें आहे; तसेंच दुःखाचें मूळ कशांत आहे हेंहीं मी सांगितलें आहे; आणि ह्या दुःखापासून मुक्त कसें व्हावें याचा उपा-यही मी सांगितला आहे; दुःखनाशाचें स्वरूपही मी प्रतिपादिलें आहे, ह्या चार प्रश्नांचा ऊहापोह करणें हेंच धर्माचें मुख्य स्वरूप असें मी मानतों, आणि ह्याचेच योगाने मनुष्यांत क्रमशः वैराग्य, शम, दम, शांति, ज्ञान, साक्षात्कार आणि निर्वाणपद ह्यांची प्राप्ति होते." (वॉरन बी. टी. १२२).

एशिया खंडाच्या उत्तरेस व इतरत्र पस… बौद्ध धर्माचा दुसरा पंथ महायान हा होय. चीन व जपान या देशांत ह्या पंथाचा खूप प्रसार झाला आहे. ह्या पंथांतील लोक बुद्धास मरणसमयीं निर्वाणपद पावलेला केवळ एक उपदेशक मानीत नसून दिव्य अवतार समजतात; व तो जगदुद्धारार्थ अवतार घेऊन आला आहे असें ते मानतात.

" अनादि; सहेतुक अवतार घेणारा; लोकोत्तर-रीतीनें गर्भांत प्रवेश करणारा; अलौकिकरीतीनें जन्म पावणारा. " (बॅारन बी. टी. ४२-४६).

" स्वतः निष्पाप असूनही त्यानें जगाकरता अपार दुःख भोगलें. " (से. बु. ई. ३५:१७८).

" जगाचा उद्धार करण्याच्या हेतूनेंच त्यानें जन्म घेतला. " (से. बु. ई. २१: ४०, ४६)

" सर्वज्ञ आणि सर्वसाक्षी." (से. बु. ई. २१ ४४; ११८: १२१).

" देव आणि मनुष्य यांचा तारक. " (से. बु. ई. २१: १२०).

" तो शाश्वतस्वरूप आहे." (से. बु. ई. २१: ३०२).

महायान पंथांतल्या लोकांनीं त्याला नुसतें देव बनविलें नसून बौद्धत्रिमूर्तींतही त्याची स्थापना केली आहे.

(५) बुद्धाची मूर्तिपूजा

ज्या बुद्धाचा साऱ्या जन्मभर उपदेश, आणि मरतेसमयींचे शेवटचे शब्द होते कीं, " लोक हो! नैतिक मार्गानें चालून, कोणत्याही देवतेचें साहाय्य न घेतां तुम्ही स्वप्रयत्नानें आत्मोद्धार करा." त्याच बुद्धाची मोठ्या प्रमाणावर मूर्तिपूजा सुरु व्हावी हा प्रकार इतिहासांतील अनेक विपरीत प्रकारापैकींच एक म्हणायचा. आजकाल जगांत बुद्धाच्याइतकी मूर्तिपूजा दुसऱ्या कोणाचीही नाहीं. (से. बु. ई. ११: ११४; वॉरन बी. टी. १०९).

४ बुद्धाचें नीतिशास्त्र.

हिंदु धर्मांत प्रतिपादिलेल्या अचिंत्य परब्रह्माच्या कल्पना,-तरंगमय तत्त्वज्ञानाच्या मानानें बुद्धाचा व्यावहारिक संदेश अगदीं निराळ्या तऱ्हेचा वाटतो. त्याच्या आदेशांत उपाध्यायांची लुडबुड नाहीं, यज्ञांतील मंत्रतंत्र नाहींत, अथवा विधींचा पसाराही नाहीं. बौद्धधर्मग्रंथांत ' धम्मपद ' ह्या नांवाचा एक छोटेखानी ग्रंथ आहे; त्यांतील १० ते २० या श्लोकांत शम, दम, आत्मशुद्धि वगैरेंचा उपदेश असून मनुष्यानें सदैव दक्षतेनें राहून आपल्या प्रयत्नानेंच आत्मोद्धार करावा असें सांगितलें आहे.

" चंचल आणि आवरण्यास कठिण अशा मनाला वठणीवर आणणें ही गोष्ट अगत्याची आहे.

मन ताब्यांत आलें कीं, सर्व सुखाची प्राप्ति झालीच म्हणून समजावें." (से. बु. ई. १०:१. १२).

" जो नेहमीं संयमानानें राहतो, आणि ज्यानें स्वतःवर विजय मिळविला आहे, अशा मनुष्याचा पराभव देव, गंधर्व, मार अथवा साक्षात् ब्रह्माही करूं शकत नाहीं." (से. बु. ई. १०: १ ३१-३१).

हिंदुधर्मांतील चातुर्वर्ण्याचा निषेध करून निराळें वळण देण्याचे बाबतींत बुद्धाचा निर्भयपणा खऱ्या सुधारकवीराला साजेसाच होता. ख्रिस्तापूर्वी पांचशें वर्षें व जवळ जवळ येशूख्रिस्ताच्याच शब्दांत बुद्धानें आपल्या वेळच्या गर्विष्ठ, पापी व लोभी लोकांस स्पष्ट शब्दांत असें बजाविलें कीं, ज्याचा जन्म थोर कुळांत झाला त्याला उच्चदर्जाचा मनुष्य म्हणतां येणार नाहीं; पण जो उच्चनीतीचा अवलंब करतो तोच उच्च मनुष्य. जो अनीतीनें वागतो तोच हीन मनुष्य. उच्च अथवा हीन कुळांत जन्मणें ही मनुष्याच्या उच्चतेची अथवा हीनतेची कसोटी होऊं शकत नाहीं.

" ब्राह्मण कुळांत जन्म झाला ह्मणूनच केवळ एखाद्याला ब्राह्मण ह्मणतां येणार नाहीं. पण ज्याच्यांत सत्य आणि सात्विकता असते तोच खरो-खर धन्य, व तोच खरा ब्राह्मण. हे मूर्ख मनुष्या ! तुझ्या मनांत लोभ माजलेला आहे, आणि वरवर

तुझ्या मनांत लोभ माजलेला आहे,

मात्र तूं स्वच्छता दाखवितोस." (से. बु. ई. १०: १, ९१ तसेच १०:१. ३८, ३९, ९०-९६; १०: २, ८८, १११-११५; १३: ७९-८०).

" ज्याच्या मनांत क्रोध व द्वेष भरलेले आहेत, जो प्राणिमात्रांची हिंसा करतो, जो खोटे बोलतो, जो स्वतःस उच्च समजून दुसऱ्याची अवहेलना करतो, त्यालाच खरोखर चांडाळ समजावें." (से. बु. ई. १०:२, २१-२२).

बौद्ध धर्माची दीक्षा घेणाराला हिंदु धर्मातील चातुर्वर्ण्याचा त्याग करावा लागे.

बुद्धानें आपल्या सामान्य बौद्ध अनुयायांना पांच प्रकारचे निषेध सांगितले आहेतः—

"हिंसा करूं नका; चोरी करूं नका; व्यभिचार करूं नका; खोटे बोलूं नका; व मादक पदार्थांचे सेवन करूं नका;" (सुत्तनिपात ३९२-३९८ से. बु. ई. १०:२. ६३-६६).

उच्च दर्जाच्या बौद्ध भिक्षूंना उद्देशून बुद्धानें दहा निषेध सांगितले आहेत. सुत्तनिपातांत सांगितलेले पांच निषेध व खालील पांचः—'निषिद्ध वेळीं खाऊं नका. गीत, नृत्य, वादन वर्ज करा; नाटक वगैरे पाहूं नका. माळा, सुगंधी द्रव्य, अलंकार व सुंदर कपडे वापरूं नका. उंची गाद्यांवर निजूं नका.

सोन्यारुप्याला हात लावू नका.' (से. बु. ई. १२ २११).

बुद्धाच्या नीतिशास्त्राचें एकंदर वळण निवृत्तिपर आहे. इंद्रियांचें दमन करणें व मनाला शांत करणें, यावर त्याचा भर आहे. त्याचें नीतिशास्त्र व्यक्तिनिष्ठ व सामाजिक दृष्टींशी विरोधी असें आहे.

" इष्टमित्र, मुलेंबाळें व संपत्ति, या सर्वांचा त्याग करा. " (थेरी गाथा ३०१; मिसेस् ऱ्हाइस डेव्हिडकृत "साम्स ऑफ धि सिस्टर्स" पान १३३.)

" गेंड्यासारखें एकटें भटकावें " (से. बु. ई. १० २ ६–११).

एखाद्याला दीक्षा घ्यावयाची असल्यास, दुःखरूप पुनर्जन्म टाळावयाचा असल्यास अथवा निश्चितपणें मोक्ष मिळवावयाचा असल्यास त्यानें पुण्यमार्गानें गेलें पाहिजे. चित्तशांति मिळविण्यासाठीं त्यानें यत्न केला पाहिजे. ध्यानानंदापासून त्यानें कधींही च्युत होतां कामा नये. सर्व वस्तूचें तत्त्व त्यानें शोधून पाहिलें पाहिजे, व एकांताचें सेवन केलें पाहिजे. (से. बू. ई. ११:२१३).

विधिनिषेधाच्या नीतिमर्यादा ओलांडून पूर्णतेच्या अवस्थेप्रत पोंचणें हें बुद्धनीतिशास्त्राचें अंतिम ध्येय आहे. ह्या अवस्थेंत—

'पापपुण्याचा विचारही मनांत येत नाहीं.'
(से. बु. ई. १०:१, १३).
'तो पापपुण्याच्या पलीकडे गेला आहे'
(से. बु. ई. १०: १. ९४).

५ बौद्ध धर्मांतील कांहीं महत्त्वाचीं तत्त्वें.

परमेश्वराची पूजा करण्याविषयीं लोकांत श्रद्धा उत्पन्न करणें ह्याकरतां बौद्धधर्माचा अवतार झालेला नाहीं. ह्या धर्मांत एखाद्या विशिष्ट तात्विक पद्धतीचाही अवलंब केलेला नाहीं. दुःखमय जगांतून मुक्त होऊन शांति मिळविणें हाच ह्या धर्माचा एकमेव उद्देश. अशी वस्तुस्थिति असल्यानें बौद्धधर्मांत असे कांहीं मुद्दे आढळतात कीं, त्यांचा परस्परांशीं फारसा संबंध नाहीं. उदाहरणार्थ—

(१) कर्म विपाक

"या जगांत प्रत्यक्ष अनुभवाला येणारी अशी 'कर्मविपाक' या नांवाची एक शक्ति आहे. तिची सत्ता सर्वव्यापी, अवश्यभावी पण अदृश्य असून ती व्यक्तीनें केलेल्या बऱ्याबाईट कर्मांचें न्यायपूर्वक फळ देते."

"तुम्ही वर आकाशांत उडाला, समुद्राच्या तळाशीं दडला, गिरीकंदरीं लपला अथवा दुसरीकडे कुठेंहि गेला तरी, तुम्हांला तुमच्या

दुष्कृत्याचें फळ मिळाल्याशिवाय राहणार नाहीं, ” (धम्मपद १२७ से. बु. ई. १०–१–३५).

मनुष्यानें केलेल्या दुष्कृत्यांच्या परिणामाचा दोष त्याचे स्वतःचे माथीं आहे; त्याबद्दल त्याच्या कुळाला, समाजाला, दैवाला, ईश्वराला अथवा कलिपुरुषाला बोल लावतां येणार नाहीं. जर सर्व लोक कर्मविपाकाच्या तत्त्वाप्रमाणें आपण आपल्या स्थितीविषयीं जबाबदार आहोंत असें जाणतील, तर जगांत मोठीच सुधारणा घडून येईल असा बुद्धाचा विश्वास होता. “ जर सर्व प्राणिमात्रांना आपल्या दुष्कृत्यांचे परिणाम आपल्याला हटकून भोगावे लागतील असें बरोबर कळेल, तर ते उद्वेग पावून दुष्कृत्यांपासून परावृत्तच होतील.” (से. बु. ई. १९:१५८)

पापपुण्यांच्या निवाड्याचें वर्णन बौद्धधर्मग्रंथांत खालीलप्रमाणें केलें आहे.

“ पापी मनुष्याला यमाचे दूत यमधर्मापुढें खेंचीत नेऊन उभे करतात. त्यांना यम म्हणतो; ‘ तुम्हांला सावध करण्याकरतां मी मृत्युलोकावर पाठविलेले माझे पांच दूत पाहिले नाहींत काय ? लहान मूल, वृद्ध गृहस्थ, रोगी, शिक्षा भोगीत असलेला गुन्हेगार आणि प्रेत हे माझे पांच दूत. ’ यावर तो पापी मनुष्य उत्तर देतो:–‘ होय, मी त्यांना

पाहिले.' नंतर यम त्याला म्हणतो, 'तर मग तूं आपल्या मनांत विचार नाहीं कां केलास, कीं, माझ्याही पाठीमागें जन्म, जरा, मृत्यु हीं लागलेली आहेत, तेव्हां मला सत्कृत्यें केलीं पाहिजेत?' यावर तो पापी मनुष्य उत्तर देतो 'नाहीं महाराज! माझ्या मूर्खपणामुळें मी या गोष्टीचा विचार केला नाहीं. नंतर यम त्याला शिक्षा फर्मावून म्हणतो, या तुझ्या दुष्ट कृत्याबद्दल तुझे आईबाप, नातेवाईक, मित्र, सल्लागार कोणीही जबाबदार नाहींत. तूं आपण होऊन हीं दुष्कृत्यें केलीं आहेस, तेव्हां त्यांचें फळ तुलाच भोगलें पाहिजे. (मॉनियर विलियम्सकृत 'बुद्धिझम' ११४–११५; ओल्डन-बर्गकृत 'बुद्ध' पान २४४–२४५; वॉरन 'बुद्धिझम' २५५–२५७; अंगुत्तरनिकाय ३:३५)

(२) अहंकाराचा भ्रम.

अहंकार हें साधकाच्या मार्गांतील एक मोठें विघ्न असून तें त्याला प्रथम दूर केलें पाहिजे.

"प्रथम अहंकाराची हकालपट्टी करा. ज्या-प्रमाणें राखेच्या खालीं असलेला अग्नि हा पाय ठेवतांच जाळतो, त्याप्रमाणें अहंकार हा प्रत्येक उच्च आकांक्षेला जाळून टाकतो." (से. बु झ. १९:२६१).

" ज्याप्रमाणें शरदृतूंतील कमल हातानें उपटून टाकतात, त्याप्रमाणें तूं आपला अहंभाव उपटून टाक. " (से. बु. ई. १०:१:६९)

हा अहंभाव म्हणजे मनुष्याचा आत्मा नव्हे. पण मनोवृत्ति व वासना कांहीं काळ एकत्र झाल्या असतां त्यालाच अहंभाव ही संज्ञा प्राप्त होते.

" ज्याप्रमाणें रथ हा एखादा विशिष्ट पदार्थ नसून जोखड, चाकें, ध्वज, दांडा, व बसायची जागा, या सर्वांना आपण रथ हें नांव व्यवहारा-करतां देतों, तद्वत्च अहंकाराची गोष्ट समजावी, " (वॉरन बी. टी. १३२).

(३) जीवाचीं तीन लक्षणें

बुद्धाच्या मतें जीवन ही वस्तूच नाहीं. त्यानें केलेल्या जगाच्या निराशामय मीमांसेप्रमाणें पाहतां जीव हा सूक्ष्म दुःखमय व क्षणिक असें कांहीं तरी आहे.

" बुद्ध जन्माला आले किंवा आले नाहींत कांहींही माना. पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे कीं, जीवन हें क्षणभंगुर, दुःखमय व आत्मरहित आहे. " (वॉरन बी. टी. पान १४).

(४) पुनर्जन्म

कर्मविपाकांतून निष्पन्न होणारा आनुषंगिक सिद्धांत पुनर्जन्म हा होय. आपल्या बऱ्यावाईट कृत्याचें फळ भोगण्याकरतां प्रत्येक व्यक्तीला पुनर्जन्म घेणें भाग पडतें. पण येथें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, बुद्धधर्मांत तर आत्मा मानलेला नाहीं, मग पुनर्जन्म घेतो कोण ? यावर बुद्धधर्माच्याबतीनें असें गुळमुळीत उत्तर देण्यांत येतें कीं, ज्याअर्थी खुद्द बुद्धाला दिव्यज्ञान झाल्यानंतर ' मी पुनर्जन्माच्या फेऱ्यांतून सुटलों ' असें वाटून हायसें झालें, त्याअर्थी पुनर्जन्मापासून मुक्त होण्याची आशा दरेकानें बाळगण्यास हरकत नाहीं. (से. बु. ई. १०:२ ५८, १९८; ११:२५, २१३; १३:१०१; १७:९).

(५) निर्वाण

इंग्रेजी साहित्यांत बौद्धधर्मांतील निर्वाण हा शब्द अत्यंत परिचित झाला आहे. ह्या शब्दाचा ' अत्यंतिक सुख' असा अर्थ करतात. (से. बु. ई. १०:१. ९, २५) पण निर्वाणाचा अर्थ " अत्यंतिक उच्छेद " हा घ्यावा कीं काय, याविषयीं विद्वानांनीं अजून निर्णय केलेला दिसत नाहीं. पण " व्यक्तित्वाचा संपूर्ण उच्छेद " व ' जाणिवेचा

आत्यंतिक निरास ' हे अर्थ बौद्धधर्मांचीं मूलतत्वें व बुद्धानें केलेलीं विधानें यावरून संभवित दिसतात.

" ज्यांच्या मनांत भावी जीवनाविषयीं उद्वेग उत्पन्न झाला आहे, ज्या ज्ञानी लोकांनीं पुनर्जन्माच्या बीजाचा नाश केला आहे, आणि ज्यांच्या वासना वृद्धिंगत होत नाहींत, त्यांना विझलेल्या दिव्या-प्रमाणें निर्वाणाची प्राप्ति होते, " (से. बु. ई. १०:२, ३९).

तथापि निर्वाणाचा अर्थ सर्व अशांतिपासून आत्यंतिक मुक्ति असा मात्र होत नाहीं. निर्वाण ही अभावात्मक स्थिति आहे. ऊर्मिरहित शांति हा त्याचा खरा अर्थ.

(६) बौद्ध धर्मांतील संघ.

तात्त्विकदृष्ट्या पाहतां बौद्धधर्मांत संघाची कल्पना असतां कामा नये. कारण, तो धर्म उघड उघड व्यक्तिनिष्ठ व सामाजिक भावनेला विरुद्ध असा आहे. तथापि, आपल्या धर्मांत आलेल्या भिक्षूंची संघटना करण्याचें व्यवहारचातुर्य बुद्धानें प्रकट केलें आहे. बुद्धधर्मांत शरणत्रयाची कल्पना अत्यंत प्रसिद्ध आहे. या शरणत्रयाचा उच्चार प्रत्येक नवदीक्षिताला बौद्धधर्माच्या दीक्षासमयीं करावा लागतो.

"मी बुद्धाला शरण जातों. मी धर्माला शरण जातों, मी संघाला शरण जातो." हें तें शरणत्रय. (से. बु. ई. १०:२ ३७-४०; १३: १०९, ११५).

बौद्धधर्माची दीक्षा घेऊ इच्छिणारांनीं खालील कसोटीला उतरलेंच पाहिजे.

"तुह्मांला [कुष्ट, गळवें, गलितकुष्ट, क्षय, अपस्मार ह्यापैकीं] एखादा रोग झाला आहे का ? तुह्मी पुरुष आहां कां ? तुह्मी कोणाचें दास नाहीं ना ? तुह्मांला कर्ज नाहीं ना ? तुह्मी राजसेवा करतां आहां काय ? तुमच्या दीक्षेला तुमच्या आई-बापांची संमति आहे कां ? तुह्मी पुरे वीस वर्षांचे आहांत कां ? तुमचा भिक्षुवेष व भिक्षापात्र धड आहे ना ?" या सर्व प्रश्नांचीं योग्य उत्तरें मिळाल्यावरच दीक्षा देण्यांत येते. (से. बु. ई. ६३:२३०)

तरी पण पुढें पुढें स्त्रियांनाही बौद्धधर्माची दीक्षा देऊं लागले. तथापि, त्यांचा दर्जा पुरुषापेक्षां कमी मानला जात असे. (से. बु. ई. २०:३२२ ३२६) बौद्ध विहारांत देवपूजा होत नसल्यानें त्यांना मंदिरें ह्मणतां येणार नाहीं, हें जरी खरें असलें तरी, बुद्धाच्या उपदेशवचनांचा पाठ करणें व स्वतःचीं पापें कबूल करणें, हे ख्रिस्ती मंदिरांतलि प्रकार बौद्ध विहारांत असत.

"दर पंधरा दिवसांनीं सर्व भिक्षूंनीं वाद न करतां आनंदानें व गुण्यागोविंदानें राहून आत्मशक्ति वाढविण्याचा प्रयत्न करावा."

दर पंधरा दिवसांनीं भिक्षूंना एकंदर एकशें सत्तावीस धर्मनियमांचा उच्चार करावा लागे. या नियमांचा समावेश पिटकत्रयांपैकीं प्रथम पिटकांत करण्यांत आला आहे.

(७) बौद्धधर्मग्रंथ

त्रिपिटक हा बौद्धधर्मांतील श्रेष्ठ धर्मग्रंथ. पिटक ह्याचा अर्थ टोपली. त्रिपिटक म्हणजे तीन टोपल्या. या तीन पिटकांपैकीं पहिले विनयपिटक ह्यांत नवदीक्षित आणि उच्चभिक्षु यांनीं पाळावयाच्या नियमांचा उल्लेख आहे. दुसरें सुत्तपिटक, ह्यांत बुद्धानें उपदेशिलेल्या वचनांचा संग्रह सूत्ररूपानें आहे. तिसरें अभिधम्मपिटक ह्यात बुद्धमतांतील तत्वज्ञानाचे गुंतागुंतीचे मुद्दे विशद करून सांगितले आहेत. त्रिपिटकाची भाषा पाली. बुद्धाच्या वेळीं ही भाषा सामान्य लोकांच्या बोलण्यांत असून तिचा प्रचार उत्तर हिंदुस्तानांत होता. ह्याशिवाय संस्कृत भाषेंत लिहिलेलेही कांहीं बौद्धग्रंथ आहेत. त्रिपिटकाचे एकोणतीस पोटविभाग असून त्यापैकीं लहानांतला लहान भाग दहा पानांचा आहे; व मोठ्यांतला मोठा भाग १८३९ पानांचा आहे. सबंध त्रिपिटकाचें इंग्रजी भाषांतर अजून झालेलें नाहीं. इतकेंच नव्हे तर, मूळ पालीभाषेंतही हा ग्रंथ अजून संपूर्ण छापलेला नाहीं. मॅन्चेस्टर युनिव्हर्सिटीचे प्रसिद्ध प्रोफेसर

परलोकवासी ऱ्हाईस डेव्हिड्स ह्यांच्या नेतृत्वाखालीं व इतर अनेक युरोपीय पंडितांच्या सहकारितेनें लंडनमधील 'पाली टेक्स्ट सोसायटी' ही मूळ बौधधर्मग्रंथ व त्यांचीं भाषांतरें प्रसिद्ध करण्याचें कार्य नेटानें करीत आहे. सर्व प्रमुख बौद्धधर्मग्रंथ प्रसिद्ध केल्यास त्यांचीं सुमारें दहा हजार पानें भरतील.

"समग्र बौद्धधर्मग्रंथांचें इंग्रजी भाषांतर बायबलच्या चौपट मोठें होईल." (ऱ्हाइस डेव्हिड्स 'बुद्धिझम ए स्केच' पान २०)

त्रिपिटकाच्या भागापैकीं, धम्मपद या छोटेखानी भागाचें सर्वांत प्रथम भाषांतर झालें. हें भाषांतर ई. स. १८७० मध्यें आक्स्फोर्ड युनिव्हर्सिटीचे परलोकवासी प्रोफेसर म्यक्सम्यूलर यांनीं केलें. बौद्धधर्मग्रंथापैकीं एकाचेंही भाषांतर होण्यापूर्वींच इंग्रजी भाषा बोलणाऱ्या लोकांना बौद्धधर्माविषयीं एकप्रकारचें आकर्षण वाटूं लागलें. इ. स. १८७० च्या पूर्वींच न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररींत बौद्धधर्म ह्या विषयावर सुमारें दोनशें चौदा पुस्तकें व बौद्धधर्म ह्या विषयावर प्रसिद्ध झालेले अनेक महत्वाचे लेख होते. वर सांगितलेलें सर्वांत पहिलें प्रसिद्ध झालेलें धम्मपपदाचें भाषांतर व 'सेक्रेड बुक्स ऑफ धि ईस्ट' या पुस्तकमालेच्या दहाव्या खंडांत समाविष्ट केलेलें दुसरें पुस्तक सुत्तनिपाताचें भाषांतर, व हीं दोन्हीही पुस्तकें लोकादरास पात्र झालीं आहेत.

" आत्म्याच्या अदृष्ट वैभवाची माहिती करून घेण्याची ज्यांची इच्छा आहे, अशा सर्व लोकांनीं काळजीपूर्वक वाचण्याइतकी, धम्मपद व सुत्तनिपात या ग्रंथांची योग्यता आहे. या ग्रंथाचा साधेपणा व कळकळ, त्यांत आलेल्या मनोरंजक कथा व दृष्टांत आणि घरगुती गोष्टी बरोबर त्यांत सांपडणारें अत्युच्च सत्य या गुणानीं जगांतील धार्मिक ग्रंथांमध्यें अत्यंत प्रभावशाली म्हणून या ग्रंथाची गणना होते " (मेनूझीज-हिस्ट्रि ऑफ रिलिजन पा. ३७३)

त्रिपिटकाच्या दुसऱ्या एका भागाची मॅन्चेस्टर युनिव्हर्सिटीचे तुलनात्मक धर्म या विषयाचे प्रोफेसर यांनीं ग्रीकतत्वज्ञानापैकीं एका उत्कृष्ट तत्वज्ञानाच्या ग्रंथाशी तुलना पुढील प्रमाणें अतिशयोक्तिपूर्ण शब्दांत केली आहे.

" प्राचीन ग्रंथरत्नभांडारांतील आजपर्यंत जतन करून ठेवलेले एक अत्यंत अमूल्य भांडार म्हणून पंडित लोक ह्या ग्रंथाची सादर प्रशंसा करतील. ह्या ग्रंथाचें योग्य भाषांतर होऊन त्याचें अध्ययन सुरू होतांच ह्यांतील गौतमाचे संवाद आपल्या इतिहास व तत्वज्ञानमंडळामध्यें प्लेटोच्या संवादाच्या तोडीचे मानण्यांत आल्यावाचून राहणार नाहीं. " (व्हाइस डेव्हिड्स ' बुद्धिझम इट्स हिस्ट्रि ॲन्ड लिटरेचर पान ५९).

त्रिपिटकांत बुद्धाच्या कांहीं आठवणी आहेत; बौद्धमताचें कांहीं थोडेसें विशदीकरण आहे; आणि शांतिमय आयुष्य घालविण्याविषयीं बराचसा उपदेश आहे. पण या बौद्धग्रंथांत बुद्धाचें समग्र जीवन-चरित्र मात्र आढळत नाहीं, अथवा बुद्धानंतर झालेल्या व त्याचें कार्य पुढें चालविणाऱ्या एखाद्या श्रेष्ठ बौद्धाविषयींही त्याच्यांत माहिती दिसत नाहीं, त्याचप्रमाणें बौद्धधर्मांतील अत्युच्च तत्त्वें समाज विकासाच्या बाबतींत लागू केलेलींही त्यांत दिसत नाहींत, किंवा ह्या लोकीं अथवा परलोकीं एका दिव्य व विपुल जीवनाचा संभव आहे अशीही या ग्रंथांनीं आर्षदृष्टीनें पाहून ग्वाही दिलेली नाहीं.

७ बौद्ध धर्माचा इतिहास

हिंदुस्तानांत बौद्धधर्म आजपासून चोवीसशें वर्षांपूर्वी अस्तित्वांत आला. एवढ्या दीर्घकालांत त्यानें अनेक वैभवशाली कालखंडें पाहिलीं. ह्या कालखंडांत अशोक, दुसरा चंद्रगुप्त, कनिष्क व हर्ष यांसारखे अनेक भक्तिमान् व उदार राजे बौद्ध धर्माला लाभले. पण बुद्धानंतर सुमारें एक हजार वर्षांनीं हिंदुस्तानांतील बौद्ध लोक भ्रष्ट होऊन क्षुल्लक कारणाकरतां आपापसांत कलह करूं लागले. चीन देशांतील बौद्ध यात्रेकरू ह्युएनत्संग ह्यानें इ. स. ६२९ ते ६४५

या दरम्यान हिंदुस्तानांत मोठी यात्रा केली. त्या वेळीं त्यानें आपल्या धर्मभूमीच्या यात्रेबद्दल महत्वाची हकीकत लिहून ठेविली आहे, त्यांत तो म्हणतो कीं, " हीनयान व महायान हे दोन्ही बुद्धधर्मांतील पंथ एकमेकापासून विभक्त झालेले मला दिसले. शिवाय बुद्धधर्मांतील मुख्य अठरा पंथ आपल्या कफनीच्या आकाराविषयीं व ती शिवण्याच्या पद्धतीविषयीं एकमेकांत भांडतांनाहि मला दिसले.

" बुद्धधर्मांतील अनेक संप्रदाय एकमेकांशी सतत वर्दळीवर येत असलेले दिसतात. त्यांच्या भांडणाचा आवाज खवळलेल्या समुद्राच्या लाटाप्रमाणें भासतो ! (बुधिस्ट रेकार्डस् ऑफ धि वेस्टर्न वर्ल्ड १ : ८०)

अशा रीतीनें अगोदरच खिळखिळा झालेला बुद्धधर्म हिंदुस्तानांत नवीन आलेल्या इस्लामधर्माचा धक्का बसतांच विशीर्ण होऊन जावा यांत नवल नाहीं. कारण हिंदुस्तानांत घुसलेल्या त्या इस्लामधर्मांतील देवही प्रचंड शक्तिमान्, त्या धर्माचा संस्थापकही ईश्वराच्या कल्पनेनें मस्त झालेला, आणि त्या धर्मांतील मतेंही मूर्तिपूजेविरुद्ध जोराचा हल्ला चढवून एकेश्वरवादाचा पुरस्कार करणारीं. याचा परिणाम असा झाला कीं, बुद्धधर्म आपल्या जन्मभूमींतूनच आज जवळ जवळ अस्तच पावला आहे.

बुद्धधर्माचा परदेशांत प्रचार करण्याचा प्रथम प्रयत्न अशोक राजाच्या पुत्रानें इ. स. पूर्वी २५० चे सुमारास सीलोनमध्यें केला. ह्या प्रथमागत प्रचारकांविषयीं सिंहलद्वीपच्या लोकांचे मनांत उत्पन्न झालेला ग्रह सिलोनच्या मोठ्या बखरींत लिहिलेला आढळतो:— "परमदयाळू जिन (म्ह. बुद्ध) यानें आपल्या सुखावर लाथ मारली, त्याप्रमाणें ह्या (नवागत) लोकांनीं आपल्यापुढें आलेल्या सुखाचा त्याग केला व जगाच्या कल्याणाकरितां कष्ट केले. उघडच आहे, जगाच्या कल्याणाचा जेथें प्रश्न आला तेथें आळस अथवा औदासीन्य कोण दाखविणार ? (महावंश १२ : ५५)

बुद्धधर्म सीलोन, तिबेट, ब्रह्मदेश, सयाम वगैरे ज्या ज्या देशांत गेला, त्या ठिकाणीं त्याची त्या त्या देशांतील मूळच्या सर्व चेतनवादी धर्माशीं गांठ पडली; पण त्या धर्मांशी विरोध न करतां अजूनही तेथें त्या मूळ रानटी धर्माशीं गुण्यागोविंदानें बुद्धधर्म राहत आहे.

वास्तविक चीन आणि जपान हे देश बुद्धधर्माची जन्मभूमि जे हिंदुस्तान त्याहून कितीतरी दूर; तरी पण या देशांत आज बुद्धधर्माचा फारच मोठा अनुयायिवर्ग धर्मप्रसाराचें कार्य करीत असलेला आढळतो. पण या देशांत जाऊन बुद्धधर्माचें मूळचें

स्वरूप मात्र पार बदलून गेलें आहे. ह्या वर सांगितलेल्या देशांत बुद्धधर्म त्या देशांतील राष्ट्रीय धर्म जे कॉन्फ्यूशियानिझम, टॅओझियम, व शिंटो त्यांच्याशीं मांडीशीं मांडी लावून बसला आहे. चीनमध्यें अत्यंत लोकप्रिय बुद्धदेवता ' कान्–यिन ' ही आहे. ही दयेची देवता मानतात. जपानमध्यें हल्लींचे बुद्धधर्मीय लोक कांहीं रूढ झालेल्या ख्रिश्चन रीतिरिवाजाचा स्वीकार करीत आहेत. उदा० संघप्रार्थना, धर्मसंगीत, मुलांच्याकरितां रविवारच्या शाळा, तरुण लोकांचे बौद्धमंडळ, स्त्रियांचीं मंडळें, समाजसेवा, सामान्य लोकांकरितां शाळा. चीन व जपान या देशांत मूळ बुद्धधर्माच्या शांतिमय जीवनाबरोबर त्या धर्माशीं अत्यंत विसंगत असे कांहीं प्रकार बौद्ध धर्मांत शिरले आहेत. उदा० समाजसेवेची कल्पना, सौंदर्याभिरुचि, बुद्धाच्या अनुग्रहानें मोक्ष मिळेल ही कल्पना, स्वर्ग व नरक यांची विचित्र चित्रें, आणि अनेक देवतांची प्रभावळ.

ह्या थेट पूर्वेकडील देशांत बुद्धधर्मानें पश्चिमेकडील देशांत आढळून न येणारी एक प्रकारची समानतेची भावना लोकांत उत्पन्न केली आहे आणि ह्याचें कारण उघड आहे. बुद्ध धर्मांतील सार्वत्रिक ध्येयाच्या छत्रांखालीं हे लोक आले आहेत.

पुढील मतें ह्या सर्वांच्या हाडीमासीं खिळून गेल्या-सारखीं झालीं आहेतः—

(१) अनेक कष्ट सोसून व धैर्यानें वागून जीवन शांतिमय करणें हेंच संपूर्ण मानवी जीवन.

(२) कोणीही मनुष्य मग तो स्त्री, बालक कोणीही असो, धर्माच्या दृष्टीनें कायमचा उच्च मानता येणार नाहीं.

(३) या जगांतील श्रेष्ठ शक्ति ही सगुण नाहीं, निर्गुण आहे.

(४) क्रमशः जीवनाचा विकास करणें हा निर्वाणाचा अर्थ नव्हे, तर जीवनाचा संपूर्ण उच्छेद हा निर्वाणाचा खरा अर्थ.

८ जैन, बौद्ध व हिंदु या तीन धर्मांची परस्पर तुलनाः—

ह्या तिन्ही धर्मांचें उत्पत्तिस्थान हिंदुस्तान. ख्रिस्ति धर्माच्या पूर्वी निदान पांचशें वर्षांपासून हे तिन्ही धर्म नांदत आहेत. ह्या तिन्ही धर्मांत कांहिं बाबतींत सादृश्य तर इतर कांहीं बाबतींत वैसादृश्य आहे.

पुढील बाबतींत हे तिन्ही धर्म एकमेकांशीं सदृश आहेतः—

(१) ह्या भौतिक व सामाजिक जगांत मानवी जीवन फारच क्षुद्र व दुःखमय आहे, हा नैराश्यवाद.

(२) मानवी देह अत्यंत निःसार आहे.

(३) इहलोकांतील मानवी प्रवृत्ति अत्यंत निःसार आहे.

(४) व्यक्ति ह्या दृष्टीनें मनुष्य अत्यंत निःसार आहे.

(५) संन्यासधर्माकडे सार्वत्रिक कल.

(६) पंथ, उपपंथ होण्याकडे सार्वत्रिक कल.

(७) सामाजिक सुधारणा करण्याच्या संघटनेचा अभाव.

(८) नम्रता, शांति, शमदम हें आत्यंतिक श्रेयाचें सार्वत्रिक ध्येय. अर्थात् ह्या ध्येयांत विश्वकल्याणाची दृष्टि मुळींच नसून व्यक्तीच्या कल्याणाची मात्र दृष्टि आहे.

(९) व्यक्तित्वाचा विकास करून मोक्ष मिळविणें ही दृष्टि नसून प्रखर शमदमाच्या योगानें मोक्ष मिळविण्याची कल्पना.

(१०) जितकें अधिक दुःख व्यक्ति भोगील तितकें तिला पुण्य जास्त लागतें ही सार्वत्रिक कल्पना. आत्मश्रेयांकारितां देहदंड आपण होऊन करण्याची कल्पना.

(११) एकाच धर्मांत अनेक महात्मे अवतीर्ण होऊन त्या त्या धर्मांतील शाश्वत तत्त्वांचा उपदेश करतात ही कल्पना.

(१२) कर्म व पुनर्जन्म या विषयीं श्रद्धा.

(२) हिंदुधर्माशी विरोध करण्याचे बाबतींत जैन बौद्धधर्मांचे परस्पर साम्यः—

(१) वेद हे प्राचीन भाषेंत लिहिल्यामुळें कोणाला समजतही नाहींत व सामान्य जनतेला वेदांचा अधिकारही नाहीं, त्याअर्थी वेदांचा त्याग करावा असें ह्या दोन्ही धर्मांचें मत.

वेदांना अप्रमाण मानिल्यावर ह्या दोन्ही धर्मांनीं आपापले धर्मग्रंथ लोकभाषेंत रचले. जैनांनीं आपले अंगग्रंथ प्राकृतांत रचले, व बौद्धांनीं आपलीं त्रिपिटकें पालीभाषेंत लिहिलीं. पण आज स्थिति अशी आहे कीं, या वरील दोन्हीं भाषा आज बोलण्यांत नाहींत, आणि त्या भाषेंत लिहिलेले धर्मग्रंथ त्या त्या धर्मांच्या अनुयायांनाही दुष्प्राप्य आहेत.

(२) दोन्हीही धर्मांनीं हिंदु धर्मांचें तत्त्वज्ञान झुगारून दिलें. यानंतर जैनांनीं आपला द्वैतवाद स्थापिला व बौद्धांनीं शून्यवादाचा अंगीकार केला.

(३) हिंदुधर्मांतील देवतावाद, सर्वव्यापीदेवतावाद व अनेक–देवतावाद, ह्या सर्व वादांना ह्या दोन धर्मांनीं एकजात मूठमाती दिली, इतके झाल्यावर मग मात्र जैनांनीं व बौद्धांनीं आपल्या नास्तिक संस्थापकांना देवता बनविले आणि त्यांची मूर्तिपूजा सुरू केली. इतकेंच नव्हे तर, चोवीस तीर्थंकरांचीही देवता म्हणून जैनधर्मांत मूर्तिपूजा सुरू झाली.

(४) हिंदूंच्या यज्ञसंस्थेचा संपूर्ण निषेध ह्या दोन्ही धर्मांनीं केला व प्राणिमात्रांवर दया करण्याविषयीं उपदेश सुरू केला. पशुयज्ञाऐवजीं स्वदेहाचा यज्ञ करण्याचा उपदेश जैनांनीं सुरू

केला व आपल्या व्यक्तित्वाचा व वासनांचा यज्ञ करावा असे बौद्धधर्म उपदेशूं लागला.

(५) जातिसंस्थेच्या अधिकाराची या दोन्ही धर्मांनीं हकालपट्टी केली; आणि मग स्वेच्छेनें स्वीकारलेल्या यतिधर्माचे त्यांनीं संघ निर्माण केले. जगांतील प्राचीनतम भिक्षुसंघ जैनांनीं स्थापिले व त्यांच्या खालोखाल बौद्धांनीं आपले भिक्षुसंघ सुरू केलें.

(३) वरील तिन्ही धर्मांत एकमेकांशी न जुळणाऱ्या बाबतीः—

(१) जगांतील दुःखाचें कारणः—

(१) हिंदुधर्माचें मतें—अविद्या (हें बौद्धिक कारण).
(२) जैनधर्माचे मतें—देहोपाधि (हें शारीरिक कारण).
(३) मूळ बौद्धधर्माचे मतें, अतृप्तवासना (हें भावनात्मक कारण).

(२) दुःखनाशाचा उपायः—

(१) हिंदुधर्माच्या मतें—ईश्वराच्या सर्वव्यापित्वाचें ज्ञान.
(२) जैनधर्म—संयम.
(३) बुद्धधर्म—वासनाक्षय.

(३) मोक्षाचें स्वरूपः—

(१) हिंदुधर्म—परब्रह्माशी लय होणें.
(२) जैनधर्म—आत्मा रागद्वेषादिकांपासून मुक्त होणें.

(३) बौद्धधर्म—शाश्वत शांति—निर्वाण.

(४) दृश्य जगत्:—

(१) हिंदुधर्माच्या मतें—मिथ्या, मायिक.

(२) जैनधर्माच्या मतें—सत्य.

(३) बौद्धधर्माचे मतें—असत्य.

(५) जीवात्माः—

(१) हिंदुधर्माचे मतें—मिथ्या, औपाधिक प्रादुर्भाव.

(२) जैनधर्म—सत्य.

(३) बौद्धधर्म—मिथ्या.

(६) परमात्माः—

(१) हिंदुधर्म—एकमेव सत्य, पूर्ण.

(२) जैनधर्म—मिथ्या.

(३) बौद्धधर्माचे मतें—मिथ्या.

(७) संयमधर्मः—

(१) हिंदुधर्माचे मतें—ऐच्छिक; तत्त्वदृष्ट्या अनावश्यक

(२) जैन—,, ,, आवश्यक; मोक्षाचा एकमेव उपाय.

(३) बौद्ध—,, ,, केवळ देहाचा नाहीं तर वासनांचाही संयम केला पाहिजे.

(८) नीतिधर्मः—

(१) हिंदुधर्म—फारसा महत्वाचा नाहीं, तत्त्वदृष्ट्या नीतिधर्मही मिथ्या.

(२) जैनधर्म—सापेक्षतेनें गौण; निषेधाची उपयुक्तता खरीच.

(३) बौद्धधर्म—अगदीं महत्वाचा; पण निर्वाणापुढें गौणच.

(९) बुद्धधर्म व ख्रिस्तिधर्म या उभयतांतील कांहीं बाबतींत सादृश्य:—

(१) दोन्हीही धर्म एशियाखंडांत जन्म पावलें; त्यांच्या संस्थापकांनीं त्या त्या धर्माचा प्रसार करून त्याला जगद्व्यापी केले. पण गेल्या सात शतकांत भौगोलिक दृष्ट्या बुद्धधर्मानें एशियाच्या बाहेरच्या प्रदेशांत आक्रमण केलेलें नाहीं. अलिकडे कांहीं शतकें ख्रिस्तीधर्म मात्र पूर्वेकडे व पश्चिमकडे सारखा पसरत चालला आहे, आणि आपला धर्म-प्रसाराचा व्याप वाढवीतच चालला आहे. विद्यमान धर्मांमध्यें ख्रिस्तिधर्म हा एकच विश्वधर्म होण्याचीं चिन्हे स्पष्ट दिसू लागलीं आहेत.

(२) या दोन्हीही धर्मांचा नैतिक जीवनावर फार भर. फरक येवढाच कीं, बुद्धधर्मांतील नैतिक जीवन देवतानिरपेक्ष आहे तर ख्रिस्तीधर्मांतील नैतिक-जीवन प्रभुसाम्य प्राप्त करून घेण्याच्या कल्पनें-वर अधिष्ठित झालें असून हें साम्य परमेश्वराच्या अनुग्रहानेंच साध्य आहे असें हा धर्म मानतों.

(३) दोन्हीही धर्मांना " कर्म हें अखिल मानवी-जीवनावर प्रभुत्व गाजवितें; कर्म हें केव्हांही बदलत नाहीं, अथवा त्याच्या तडाख्यांतून कोणा-

लाही सुटता येत नाहीं " हें मान्य आहे. तरी-पण बुद्धधर्माच्या मतें कर्म हें एक अमूर्त तत्त्व असून तें शेवटीं व्यक्तित्वाचा उच्छेद करतें. याचे उलट ख्रिस्तिधर्म असें मानतो कीं, परमेश्वर हा पूर्ण पुरुष आहे व तो मानवांना अत्युच्च दशा प्राप्त व्हावी एतदर्थ ह्या विश्वव्यापी कर्म-विपाकाचा उपदेश करतो.

(४) दोन्हीही धर्म लोभ हा मानवी दुःखाचें कारण आहे असें मानतात. पण अहंभावाचा संपूर्ण विलय करावा असें बुद्धधर्माचें ह्मणणें. ही विल-याची कल्पना अगदीं व्यक्तिनिष्ठ व केवळ व्यक्तिच्या कल्याणापुरतीच उपयोगी आहे. ख्रिस्तीधर्मांतील कल्पना याहून निराळी आहे. त्यांत अहंभावाचा विलय सांगितला नसून दुस-ऱ्यावर प्रेम करण्याच्या रूपानें अहंभावाचा विकास करावा असें सांगितलें आहे. अर्थात ही कल्पना उदार दृष्टीची असून तिचें क्षेत्र व्यक्ति नसून समाज आहे.

(५) दोन्हीही धर्मांत मोक्षाचा उपदेश आहे; पण बुद्धधर्मांतील मोक्षाची कल्पना केवळ व्यक्तिनिष्ठ आहे; त्यांत समाजाचा अंतर्भाव होत नाहीं. याचे उलट समाज व व्यक्ति ह्या उभयतांच्या मोक्षाची दृष्टि ख्रिस्तीधर्मांत आहे.

(६) दोन्हीही धर्मांनीं यतिसंघांची स्थापना केली आहे. पण बुद्धधर्म हा यतिसंघाला व यतिजीवनाला उच्च लेखतो, याचे उलट ख्रिस्ति धर्म हा अखिल सामाजिक जीवनाला पवित्र मानतो.

(७) उच्च जीवनाचे दृष्टीनें दोन्हीही धर्म आपापल्या संस्थापकांना पूज्य मानतात. पण नैतिक जीवनाचा आदर्श बुद्धीनें आपल्या उतारवयांत प्राप्त करून घेतला. एकामागून एक तीन प्रकारच्या जीवनांचा त्यानें स्वीकार व त्याग केला. प्रथम त्यानें सुखोपभोगाच्या जीवनाचा अनुभव घेतला. नंतर तो तत्वचिंतन करू लागला, नंतर तो देहदमन करू लागला व शेवटीं तो नैतिक—जीवनाच्या आदर्शाकडे वळला. याचे उलट जीझसला, लहानपणापासूनच सतत ईश्वरीय व मानवी जीवनाशी तादात्म्य पावल्यामुळें श्रेष्ठ आनंदाचा उपभोग घेतां आला. ह्याच तादात्म्याचा त्यानें जगाला उपदेश केला.

(८) दोन्ही धर्मांची स्थापना स्वार्थाचा होम करणाऱ्या महनीय व्यक्तींनीं केली. पण बुद्ध ऐंशीवर्षांपर्यंत जगला व शेवटीं जडान्न खाल्ले असतां हगवण लागून मेला. याचे उलट जीझस, तीस वर्षांचाच असताना, त्याच्या प्रेममूलक सेवेची

किंमत जनतेला न वाटल्यानें सुळावर लटकून मेला.

(१०) बुद्धधर्म व ख्रिस्तधर्म या उभयतांतील मौलिक भिन्नतेचे मुद्दे:—

(१) बुद्धधर्माला सगुण परमेश्वर मान्य नाहीं. आतां पुढें खुद्द बुद्धाचीच देवता म्हणून पूजा होऊं लागली व त्याच्याबरोबर इतरही अनेक देवता बुद्धधर्मांत शिरल्या हा भाग निराळा.

ख्रिस्तिधर्मानें एक परमेश्वर मानला असून त्याची आज्ञा पाळणें, त्याचेवर प्रेम करणें व त्याला शरण जाणें ह्याही गोष्टी त्या धर्मांत स्वीकारल्या आहेत.

(२) बुद्धधर्माचे दृष्टीनें मनुष्य हा क्षणिक असा पंच-भूतांचा पिण्ड अतएव निःसार आहे.

ख्रिस्तीधर्म प्रत्येक मनुष्य परमेश्वराचा पुत्र आहे असें मानतो.

(३) बुद्धधर्माचे दृष्टीनें मनुष्यदेह म्हणजे एक मोठें विघ्न आहे. ख्रिस्ती धर्म असें मानतो कीं, अध्यात्मिक जीवनाकरितां मानवदेह हें एक योग्य साधन आहे.

(४) कोणत्याही प्रकारच्या व्यक्तीच्या जीवनाबद्दल वासना बाळगणें हें बुद्धधर्म पाप समजतो.

ख्रिस्तीधर्माचें पुण्यमय जीवनाविषयीं म्हणणें असें कीं, मनुष्यानें इच्छा बाळगलीच पाहिजे, आणि ती इच्छा परमेश्वर अवश्य पुरी करतो.

(५) बुद्धधर्मांत प्रवृत्ति ही फारतर किंचित्कालपर्यंत अनिवार्य आहे असें मानलें आहे; तरीपण एकंदरींत प्रवृत्ति ही वाईटच व शेवटीं प्रवृत्तीचा त्यागच केला पाहिजे असेंच हा धर्म मानतो.

ख्रिस्तिधर्मांत प्रवृत्ति ही पवित्र जीवनाला अत्यावश्यक मानिली आहे.

(६) बुद्धधर्म हा व्यक्तिनिष्ठ असल्यानें एकाचें पापाबद्दल दुसऱ्यानें शिक्षा भोगणें ही कल्पनाच त्या धर्माला पटत नाहीं.

ख्रिस्तिधर्मांत अन्यायानें भोगावें लागणारें दुःख ही भयंकर गोष्ट खरी, पण त्या दुःखाचा कल्याणाकडे उपयोग करता येतो, असें मानण्यांत येतें.

(७) मनुष्याचे हातून परमेश्वराविरुद्ध पाप घडतें ही गोष्ट बुद्धधर्माला मान्य नाहीं. ख्रिश्चन धर्माच्या मतें पापी मनुष्याचे हातून परमेश्वराविरुद्ध त्याचप्रमाणें इतर मनुष्याविरुद्ध पाप घडतें, इतकेंच नव्हे तर स्वतःच्या आत्म्याविरुद्धही त्याचे हातून पाप घडतें.

(८) मानवीजीवन दुःखप्रचुर असल्यानें बुद्धधर्माच्या मतें जगण्याला योग्य नाहीं. ख्रिस्तीधर्माचें ह्मणणें असें कीं, जीवनांत दुःख आहे ही गोष्ट खरी असली तरी त्याचा क्रमानें विकास करून त्याचें महत्व वाढवितां येतें.

(१०) बुद्धधर्माचें सामर्थ्य खालील गोष्टींत दिसून येतें:—

(१) ह्या धर्मानें प्रतिपादलेलें ' जगत् दुःखरूप आहे.' हें तत्व फार महत्वाचें असून तें मनाला तत्काल पटतें.

(२) मनुष्याच्या मनावर त्याचा मोक्ष अवलंबून आहे असें हा धर्म मानतो.

(३) बुद्धधर्माच्या नीतिशास्त्रांत एक प्रकारची उदात्त कळकळ दिसून येते.

(४) संन्यास मोक्षाकरिता आवश्यक आहे असें या धर्माचें मत आहे.

(५) ह्या धर्मानें केलेल्या पहिल्या पांच आज्ञा कौतुक करण्यासारख्या आहेत.

(६) कर्मविपाकाचा या धर्मानें केलेला उपदेश.

(७) ह्या धर्माच्या संस्थापकांत आढळून येणारे कांहीं लोकोत्तर गुण.

(८) ह्या धर्मानें जातिसंस्थेला यशस्वी रीतीनें अर्धचंद्र दिला आहे.

(८) ह्या धमान जातसस्थला यशस्वा रातान अधचद्र दिला आहे.

(१२) बुद्धधर्म दुर्बल होण्याचीं कांहीं कारणें:—

(१) ह्यांतील मूळचा नास्तिकवाद.

(२) ह्या धर्मानें अमूर्त तत्वावर दिलेला स्पष्ट भर.

(३) मानवी जीवित व मनुष्यदेह यांची या धर्मानें केलेली निंदा.

(४) कुटुंब व स्त्रिया ह्यांची ह्या धर्मानें केलेली अवहेलना.

(५) सभोंवतालच्या जगाविषयीं या धर्मानें दाखविलेला तिरस्कार.

(६) व्यक्तिमात्राची प्रवृत्तिपरता ह्या धर्मानें कुंठित करून टाकली आहे.

(७) सामाजिक जबाबदारी व्यक्तीच्या शिरावर आहे ही गोष्ट या धर्माला मुळींच मान्य नाहीं.

(८) मानवीजीवनाचा क्रमविकास होणें ही कल्पना ह्या धर्माला संमत नाहीं.

(९) आत्मोद्धारावर अतिरिक्त भर.

(१०) मोक्षप्राप्तीचा ह्या धर्मात सांगितलेला उपाय साधारणतः अभावात्मकच आहे.

(११) आनंदपूर्ण निर्वाणाची या धर्मातील फोल कल्पना

(१२) ह्या धर्मांतील सर्वसाधारण निराशावाद.

(१३) मूळच्या धर्माची प्रचारात्मक दृष्टि पुढें नाहींशी झाली.

(१४) ह्या धर्माच्या संस्थापकाचा नैतिक लंगडेपणा.

प्रकरण पांचवें

—*×०×*—

शीख धर्म

सत्यस्वरूप एकमेव परमेश्वराच्या शिष्यांचा धर्म

१ प्रास्ताविकः—ह्या धर्माचे विद्यमान धर्मांत स्थान. कालदृष्ट्या हा धर्म विद्यमान अकरा धर्मांत अगदीं अर्वाचीन आहे. संख्येच्या दृष्टीनें ह्या धर्माच्या अनुयायांची संख्या मात्र बत्तीस लक्ष एकूणचाळीस हजार असल्यानें ह्याचा अकरा धर्मांत नववा नंबर लागतो. फक्त जैन व पारसीधर्मांतील लोकसंख्या शीखधर्मापेक्षां कमी आहे.

भौगोलिकदृष्ट्या शीखधर्म जवळजवळ फक्त हिंदुस्तानांतच नांदत आहे, आणि तेही त्यांतील पंजाब या एकाच प्रांतांत. परंतु हा धर्म स्थापन झाल्यापासून अवघ्या दोनशे वर्षांत त्यानें उत्तर हिंदुस्थान व्यापून दक्षिणेंत सीलोनपर्यंत मजल मारिली आहे. हिंदुस्थानच्या बहुतेक प्रांतांतील गव्हर्नरांचे बॉडीगार्ड (शरीर—संरक्षक) धिप्पाड शरीराचे शीखच आहेत. पेनांग, सिंगापूर हांगकांग, शांघाय व इतरही थेट पूर्वेकडील ब्रिटिश साम्राज्याच्या ताब्यांतील शहरांतील रस्त्यावर आज शीख

शिपायांचेच पाहरे आहेत. अशारीतीनें शीखलोक इतस्ततः विखुरले असले तरी शीखलोकांपैकीं शेंकडा ९५ लोक, ज्या पंजाबांत या धर्माचा उदय झाला त्याच ठिकाणीं आजही रहात आहेत.

राजकीयदृष्ट्या ज्यू-राष्ट्राचा अपवाद सोडून दिल्यास शीख धर्म हा जगाच्या इतिहासांत असा एक धर्म आहे कीं, त्यानें नवेंच राष्ट्र निर्माण केलें आहे. ह्या धर्माचें इतिहासांतील मुख्य स्थान धार्मिक नसून राष्ट्रीय आहे. आज ज्यू-धर्माप्रमाणें ह्या धर्मांतील लोकांचें राजकीय स्वातंत्र्य नष्ट झालें आहे, तरीपण धर्माच्या व इतर दृष्टीनें ते आजही आपलें वैशिष्ट्य कायम राखून इतरांचे लक्ष वेधेल अशा रीतीनें समर्थपणानें नांदत आहेत. शिल्पकलेच्या दृष्टीनें अमृतसर (अमरत्वाचा तलाव) येथील सुवर्णमंदिर हे शिखांचे मुख्य मंदिर हें "हिंदुस्तानांत आग्र्याच्या ताजमहालाच्या खालोखाल अत्यंत प्रेक्षणीय दृश्य म्हणून म्हणता येईल. एका तळावाच्या मध्यभागीं हें सुंदर मंदिर आपल्या सोनेरी घुमटांनीं व कळसांनीं सुशोभित झालेलें दिसतें. ह्या मंदिरापर्यंत जाण्याला एक संगमरवरी दगडाचा पूल आहे. ह्या मंदिराचें दृश्य इतकें मनोहर आहे कीं, तें एकदा पाहिले कीं त्याचा ठसा मनावर कायम रहातो. (सर मॉनियर वुलियम्स, ब्रॅम्हॅनिझम व हिंदुइझम, ऑर रिलिजस थॉट ॲन्ड लाइफ इन इन्डिया १७५-१७६).

धर्मविचारदृष्ट्या शीखधर्मांत, त्याचें इतराहून कांहीं वैशिष्ट्य दिसेल असें कांहीं नाहीं. तरीपण हिंदुस्तानांतील परस्पर विरोधी दोन प्रबळ धर्मांत परस्पर सलोखा उत्पन्न करण्याचा प्रयत्न म्हणून हा धर्म उत्पन्न झाला. अशारीतीनें जगांतील विद्यमान धर्मांत अत्यंत अर्वाचीन असलेला हा धर्म, कठोरपणानें मूर्ति पूजेविरुद्ध आपली मोहिम चालविणारा एकेश्वरवादी मुसलमान धर्म व ईश्वराचें गूढ व अस्पष्ट सर्वव्यापित्व ह्याकडे व मूर्तिपूजेकडे अतिरिक्त झुकणारा हिंदुधर्म ह्या दोहोंचें मिश्रण होऊन निर्माण झालेला आहे.

वरील दोन धर्मांचा संयोग एका शांतस्वभावी सुधारकानें आपल्या वैयक्तित अनुभवाच्या व प्रभावाच्या जोरावर घडवून आणिला. हा धर्मसुधारक युरोपमध्यें जन्माला आलेल्या ल्यूथर नांवाच्या एका लोकोत्तर धर्मसुधारकाचा समकालीन होता.

२ ह्या धर्माचा संस्थापक नानक,—याचें जीवनचरित्र (१४६९–१५३८ इ. स.)

ह्याच्या जीवनाविषयीं माहिती 'जनम्—साखी' (जीवन कथा) ह्या ग्रंथांत मिळते. हा ग्रंथ शीखधर्मग्रंथांत मोडत नाहीं.

(१) धर्माविषयीं तळमळ व असंतोष—वयाच्या छत्तिसाव्या वर्षापर्यंत:—

पंजाबची राजधानी जें लाहोर शहर त्याच्या नैऋत्येस सुमारें ३० मैलांवर रावी नदीच्या कांठीं असलेल्या एका गांवीं नानकाचा जन्म झाला. ह्याच नदीला ग्रीक इतिहासकारांनीं हिडास्पीस असें नांव दिलें होतें. वरील

छोटेखानी गांवाचें मूळ नांव तालवंडी. पण नानक या थोर विभूतीच्या सादर-स्मरणार्थ त्याचें नांव पुढें 'नानकारा' (नानकाची जागा) असें ठेवण्यांत आलें. नानकाचे आईबाप सामान्य स्थितीतले खेडवळ होते. त्याचा बाप क्षत्रिय जातीचा एक गृहस्थ असून तो एका मुसलमान जमीनदाराचे पदरीं नोकर होता. नानकाची आई एक अत्यंत सात्विक व श्रद्धाळू बाई होती. वयाच्या सातव्या वर्षी प्रथमच शाळेंत पाठविले असतां या (प्रतिभाशाली) मुलानें आपल्या हिंदु गुरूला वेदांचा अभ्यास करायचे ऐवजीं "ईश्वराची दया संपादन करून त्याचें सत्यस्वरूप जाणा," असा उपदेश केला. एका अर्वाचीन जनम्-साखीतील माहितीवरून असें दिसतें कीं, नवव्या वर्षीं या मुलानें फारशी भाषेचा अभ्यास सुरू केला. शीख धर्मग्रंथांतील कांहीं भागांची भाषा फारशी आहे, याचेंही कारण हेंच असावें. ग्रंथसाहेबांतील एका महत्वाच्या भागांत नवव्या वर्षी नानकानें बोललेल्या वचनाचा संग्रह आहे, असें नानकाचा एक चरित्रकार म्हणतो. ते कसेंही असो; शीखलोकांचा असा विश्वास आहे कीं, नानकानें आपल्या मुंजीच्या वेळीं मौंजिबंधन संस्काराचा खरा आध्यात्मिक अर्थ काय याविषयीं आपल्या उपाध्यायालाच उपदेश केला.

त्याला व्यवहारांतील कोणताही व्यवसाय आवडत नसे, पण प्रशांत, भक्तियुक्त जीवनाची मात्र त्याला प्रथमपासूनच फार आवड असे. अडचणीच्या वेळीं त्याला एक अतिमानुष शक्ति साहाय्य करीत असे वगैरे, त्याच्याबद्दलच्या अनेक कथा प्रचलित आहेत. त्याला कोणत्याही तऱ्हेच्या हातकामाचा, शारीरिकश्रमाचा व व्यापार धंद्याचा कोणताही व्यवसाय त्यामुळें आवडेना. त्याच्या मित्रांची व नातेवाईकाची त्याच्याबद्दल फार निराशा झाली. "हा मुलगा अगदीं कुचकामाचा असून आपल्या कुलाला कलंक आहे" असें त्यांना वाटू लागलें. त्याच्या मेहुण्याच्या हाताखालीं एक मोठ्या मानाची सरकारी नोकरी त्यांनीं त्याला पाहून दिली, पण तेथेंही त्याला चैन पडेना (म्यॅकलिफकृत शीखधर्म पृष्ठ २३-२६).

त्याचे वैवाहिक जीवन मुळींच सुखाचें नव्हतें. ह्याला कारण त्याची बायको मात्र मुळींच नव्हती. ती बिचारी भली होती. पण संसारांतून त्याचें मन उडून गेल्यानें त्यानें आपल्या बायकोचा व दोन मुलांचा त्याग केला. (ट्रंप–कृत 'ग्रंथसाहेबाचें' भाषांतर).

त्याला खाणेंपिणें गोड लागेना. ईश्वराविषयीं त्याची तळमळ वाढत चालली. म्हणून तो अरण्यांत गेला व झाडाखालीं बसून आत्मचिंतन करूं लागला. कांहीं जिन्नस लागल्यास विकत घेतां यावा म्हणून त्याचे

बापानें त्याला कांहीं पैसे दिले होते ते त्यानें साधु-संतांना देऊन टाकले. याबद्दल त्याच्या बापानें त्याची कानउघाडणी केली पण व्यर्थ.

" मधेंच तो उभा राही व मोठ्यानें ओरडत राही कीं, " " प्रभो ! मी तुझा आहे " (पान ३३).

(२) परमेश्वराची हांक व आदेश

एके दिवशीं स्नान केल्यानंतर नानक एकाएकीं जंगलांत जाऊन दिसेनासा झाला. त्या ठिकाणीं त्याला भगवंतानीं दर्शन दिलें. त्यांनीं त्याला अमृताचा एक प्याला दिला, त्याचा त्यानें कृतज्ञ अंतःकरणानें स्वीकार केला. नंतर भगवान् म्हणाले, " नानका ! मी तुझ्या जवळ आहे. मी तुला सुखी केलें आहे. तुझें नांव घेणारांनाही मी सुखी करीन. जा, आतां यापुढें माझें नामस्मरण करीत रहा, आणि दुसऱ्यांनाही नामस्मरणाच्या मार्गाला लाव. जगाचा लेप लावून न घेतां रहा. जपजाप्य, दानधर्म, स्नान, पूजा, ध्यान ह्यांत सदैव रंगून रहा. मी साक्षात् ब्रह्म आहे आणि आजपासून तूंही सर्वांचा सद्गुरू झालास " (पृष्ठ ३३ ते ३५).

हा प्रकार घडल्यानंतर तीन दिवसांनीं जगलांतून नानक घरीं परत आला. घरीं येतांच आपल्या जवळ होतें नव्हतें तेवढें सारें त्यानें गरिबांना देऊन टाकलें. लोकांना वाटलें कीं, याला भूतबाधा झाली असावी.

म्हणून त्याचें भूत गाडण्याकरितां एका मुसलमान पंचाक्षऱ्याला बोलावून आणिले. (पान ३६).

आपल्यावेळीं प्रचलित असलेली शोचनीय, धार्मिक व सामाजिक परिस्थिति नानकानें आपल्या ग्रंथसाहेबांत वर्णिली आहे.

कलियुग ही एक सुरी आहे. त्यांतील राजेलोक हे खाटिक आहेत. त्यांना पाहतांच न्यायरूपी पक्षी उडून गेला आहे. असत्याच्या या कालरात्रींत सत्याच्या चंद्राचा उदय कोठून होणार ? (पान १७०)

यानंतर नानकानें कौपीन परिधान केलें व कफनी घातली व अशा रीतीनें तो बावा बनला. एक सबंध दिवस त्यानें मौनांत घालविला व दुसऱ्या दिवशीं " कुणी हिंदूही नाहीं आणि मुसलमानही नाहीं " हें अर्थपूर्ण वाक्य त्यानें उच्चारलें. (पान ३७)

प्रचलित धर्माविरुद्ध काढलेले निषेधाचे हे आश्चर्यकारक उद्गार ऐकून लोकांच्या अंतःकरणाला जबर धक्का बसला. तरीपण कांहींजणांनीं " हा एखादा जास्त आध्यात्मिक व व्यापक धर्म स्थापणार असावा " असा ह्या उद्गारांचा अर्थ केला.

" नंतर त्या ठिकाणचा काझी नानकाजवळ आला व त्याच्या पायावर डोकें ठेवून म्हणाला, " अहो, केवढा हा चमत्कार ! ह्या गृहस्थावर खुदाची मेहेरबानी

झालेली दिसते." यानंतर तो काझी नानकाचा भक्त झाला. त्या काझीला उद्देशून नानकांच्या तोंडून पुढील श्लोक बाहेर पडला:—

"जो आत्मशुद्धि करतो तोच खरा मुसलमान. ज्याचे ठिकाणीं खरी कळकळ आहे; जो क्षमायुक्त आहे; ज्याची वाणी पवित्र आहे तोच मुसलमान, तोच स्वर्गाला जाण्याच्या योग्यतेचा आहे असें समजावें."

हा श्लोक ऐकतांच हिंदू व मुसलमान दोघेही म्हणू लागले, खरोखरी नानकाचे रूपानें परमेश्वरच हें बोलत आहे (ट्रंप भाग १३ वा).

(३) नानकाचा धर्मप्रचारार्थ संचार

यानंतर पूर्वी आपल्या घरीं नोकर म्हणून राहत असलेल्या मर्दन या नांवाच्या मुसलमानाला बरोबर घेऊन नानक धर्मप्रचारार्थ बाहेर पडला. हा मर्दम नानकाच्या गाण्याची साथ करी. आपल्या गायनाच्या व भजनाच्या द्वारा त्यानें आपल्या धर्ममताचा प्रसार मोठ्या प्रमाणावर करायला सुरवात केली. "रावापासून रंकापर्यंत सर्व लोक एका सत्यस्वरूप परमेश्वराचे शिष्य आहेत" हें त्याचें धर्ममत.

गुरु नानकानें बावा आणि फकीर यांच्या वेषांचें मिश्रण करून आपला वेष बनविला होता. तो केसरी रंगाची बंडी घाली व त्यावर एक शुभ्र उपरणें घेई. तो डोक्यावर मुसलमानी थाटाची 'कलंदर' टोपी

चढवी, गळ्यांत हाडकांची माळ घाली व कपाळावर हिंदुपद्धतीचा केशराचा टिळा लावी. हिंदुधर्म अथवा मुसलमानधर्म ह्यापैकीं कोणत्याही एका धर्माकडे तो झुकला नाहीं. ह्यावरून वरील दोन्ही धर्मांला मान्य होईल असा एक धर्म स्थापन करायची त्याची उत्कट इच्छा होती, ही गोष्ट स्पष्टपणें नजरेस येते. (पान५८)

नानक व मर्दन यांच्या या जोडींत तत्काळीं प्रचलित असलेल्या हिंदु व मुसलमान ह्या प्रमुख धर्मांचा विचित्र संयोग झालेला दिसत असे. आपल्या भजनाचे व उपदेशाचे योगानें या दोघांनीं आपल्या कार्यांत अपूर्व यश संपादन केलें. त्यांनीं बहुतेक उत्तर–हिंदुस्तानभर प्रवास करून कुरुक्षेत्र, हरिद्वार, पानिपत, दिल्ली, वृंदावन, गोरखमाता, बनारस, ब्रह्मपुत्रा, जगन्नाथपुरी, हिमालय इत्यादि पवित्र स्थलांची यात्रा केली. वाटेंत तहानभूक व सतत प्रवास ह्यामुळें मर्दनाचे फार हाल झाले (पान ९५).

सुमारें बारा वर्षांनीं ही जोडी पंजाबांत परत आली. पण पुन्हां थोडक्याच दिवसांनीं त्या दोघांनीं धर्मप्रसारार्थ संचार सुरू केला. यावेळीं तर त्यांनीं खूप लांबवर प्रवास केला. ते प्रथम मद्रासला गेले, त्यानंतर दक्षिणेकडील एक जैनमंदिर पाहून ते थेट सिंहलद्वीपाला गेले. त्या ठिकाणच्या राजाला व राणीला गुरुनानकानें आपल्या धर्माचा उपदेश केला.

राणीला गुरुनानकानें आपल्या धर्माचा उपदेश केला.

ह्यानंतर गुरुनानक एका बेटावर गेले; त्या ठिकाणीं एक जुलमी राक्षस राज्य करीत होता (पा. १५२).

हिंदुस्तानच्या थेट वायव्यदिशेला असलेल्या काश्मीरांतील श्रीनगर, सुमेरुपर्वत, हिमालय व सरहद्दीवरील पेशावर प्रांतसुद्धां त्यांनीं आपल्या विस्तृत प्रवासांत सोडला नाहीं. इतकेंच नव्हे, पण या साक्षेपी महंतानें थेट पश्चिम एशियांत जाऊन तेथें खुद्द मुसलमानांच्या घरांत आपला धर्मध्वज फडकाविला. मुसलमानी वेषांत खुद्द मक्केची यात्रा करणारा पहिला हिंदू बहुधा नानकच असावा. मक्केस जाऊन तेथील काबा नांवाच्या पवित्र शिळेसमोर ईश्वराच्या विश्वव्यापित्वाबद्दल गुरु नानकानें उपदेश केला. त्याचा तेथील लोकांच्या मनांवर अद्भुत परिणाम झाला. (पा. १७४।७५; ट्रंप भाग ४१–४२.)

मक्केनंतर नानक मदीनाला गेला. ह्या ठिकाणीं त्यानें शास्त्रार्थ करून वादांत मुसलमानी मुल्लांना जिंकलें. नंतर बगदादकडे त्यानें आपला मोर्चा वळविला. त्या ठिकाणीं जाऊन त्यानें प्रार्थनेकरितां एकत्र जमण्याकरितां लोकांना पाचारण केलें असतां, त्या ठिकाणीं असलेल्या मुल्लानें त्याला " तुम्ही कोण व तुमचा धर्मपंथ कोणता म्हणून विचारलें; त्यावर " मी अखिल मानवांना सन्मार्ग दाखविण्याला या युगांत अवतीर्ण झालों आहे, मी कोणत्याही पंथाचा नाहीं. मात्र

लाही सुटता येत नाहीं " हें मान्य आहे. तरी-पण बुद्धधर्माच्या मतें कर्म हें एक अमूर्त तत्त्व असून तें शेवटीं व्यक्तित्वाचा उच्छेद करतें. याचे उलट ख्रिस्तिधर्म असें मानतो कीं, परमेश्वर हा पूर्ण पुरुष आहे व तो मानवांना अत्युच्च दशा प्राप्त व्हावी एतदर्थ ह्या विश्वव्यापी कर्म-विपाकाचा उपदेश करतो.

(४) दोन्हीही धर्म लोभ हा मानवी दुःखाचें कारण आहे असें मानतात. पण अहंभावाचा संपूर्ण विलय करावा असें बुद्धधर्माचें ह्मणणें. ही विल-याची कल्पना अगदीं व्यक्तिनिष्ठ व केवळ व्यक्तिच्या कल्याणापुरतीच उपयोगी आहे. ख्रिस्तीधर्मांतील कल्पना याहून निराळी आहे. त्यांत अहंभावाचा विलय सांगितला नसून दुस-ऱ्यावर प्रेम करण्याच्या रूपानें अहंभावाचा विकास करावा असें सांगितलें आहे. अर्थांत ही कल्पना उदार दृष्टीची असून तिचें क्षेत्र व्यक्ति नसून समाज आहे.

(५) दोन्हीही धर्मांत मोक्षाचा उपदेश आहे; पण बुद्धधर्मांतील मोक्षाची कल्पना केवळ व्यक्तिनिष्ठ आहे; त्यांत समाजाचा अंतर्भाव होत नाहीं. याचे उलट समाज व व्यक्ति ह्या उभयतांच्या मोक्षाची दृष्टि ख्रिस्तीधर्मांत आहे.

" परमेश्वराच्या दरबारांत त्याची दया दोन मार्गांनीं संपादन करता येते. एक अपराध कबूल करणें व दुसरें केलेल्या पापाचें प्रायश्चितद्वारा परिमार्जन करणें. "

गुरु नानकाच्या उपदेशानुरूप तो वागू लागला. त्याला गुरुनानकानें आपल्या जवळचा सर्व पैसा गरिबांना देऊन टाकायला सांगितलें. (पा. ४७ टूंपु भाग १४)

एका देशांतल्या बायका जादूटोणा व मंत्रतंत्र या विद्येंत प्रवीण असल्याबद्दल बरीच ख्याति होती. त्या ठिकाणीं जाऊन त्यानें त्या चेटक्यांना व त्यांच्या राणीला उपदेश केला. तेव्हां त्या सर्व स्त्रिया गुरु-नानकाच्या पाया पडल्या व 'आम्हाला मोक्ष कसा मिळेल' म्हणून त्यांनीं त्याला विचारलें. " परमेश्वराचें नामस्मरण करा. शुद्ध बुद्धीनें सर्व व्यवहारांतलीं कर्में करा, व चेटकीविद्या सोडून द्या. " असा यावर गुरु नानकानें त्यांना उपदेश केला. त्या सर्व गुरुंच्या शिष्यीणी झाल्या आणि अशा रीतीनें मोक्षाच्या मार्गाला लागल्या.

हिंदुधर्मांतील संन्यासमार्गाचा तो स्पष्ट निषेध करीत असे. यामुळें व आपल्या सवगोलंकार वाटणाऱ्या वागण्यामुळें त्यानें हिंदूचीं मनें दुखविलीं; तरीपण हिंदुधर्माचा नवीन तऱ्हेचा एक अध्यात्मपर अर्थ त्यानें लावल्यानें त्याच्याकडून अनेक मोठमोठ्या

लाही सुटता येत नाहीं " हें मान्य आहे. तरी-पण बुद्धधर्माच्या मतें कर्म हें एक अमूर्त तत्त्व असून तें शेवटीं व्यक्तित्वाचा उच्छेद करतें. याचे उलट ख्रिस्तिधर्म असें मानतो कीं, परमेश्वर हा पूर्ण पुरुष आहे व तो मानवांना अत्युच्च दशा प्राप्त व्हावी एतदर्थ ह्या विश्वव्यापी कर्म-विपाकाचा उपदेश करतो.

(४) दोन्हीही धर्म लोभ हा मानवी दुःखाचें कारण आहे असें मानतात. पण अहंभावाचा संपूर्ण विलय करावा असें बुद्धधर्माचें ह्मणणें. ही विल-याची कल्पना अगदीं व्यक्तिनिष्ठ व केवळ व्यक्तिच्या कल्याणापुरतीच उपयोगी आहे. ख्रिस्तीधर्मांतील कल्पना याहून निराळी आहे. त्यांत अहंभावाचा विलय सांगितला नसून दुस-ऱ्यावर प्रेम करण्याच्या रूपानें अहंभावाचा विकास करावा असें सांगितलें आहे. अर्थात ही कल्पना उदार दृष्टीची असून तिचें क्षेत्र व्यक्ति नसून समाज आहे.

(५) दोन्हीही धर्मांत मोक्षाचा उपदेश आहे; पण बुद्धधर्मांतील मोक्षाची कल्पना केवळ व्यक्तिनिष्ठ आहे; त्यांत समाजाचा अंतर्भाव होत नाहीं. याचे उलट समाज व व्यक्ति ह्या उभयतांच्या मोक्षाची दृष्टि ख्रिस्तीधर्मांत आहे.

केली आहे (पा. ९७, ९८, १०१, ११०, ११४, १४१, १७१).

(५) नानकाचा अद्भुत मृत्युः—

आपलें मरण जवळ येत चाललें आहे हें जाणून गुरुनानकानें आपल्या मागें आपला शिष्य अंगड याला आपल्या गादीवर बसविण्याचें ठरविलें. नानकाचे पुत्र मुळींच आज्ञाधारक नव्हते. त्यांचीं मनें शुद्ध नव्हतीं. शिवाय त्यांनीं आपल्या बापाविरुद्ध बंड करून त्याचा त्याग केला होता. थोड्याच दिवसांत सर्व लोकांना कळून चुकलें कीं, गुरुनानकाचा अंत जवळ येऊन ठेपला आहे (पा. १८७–१८८).

अंतकाल जवळ येताच नानक एका बाभळीच्या वठलेल्या झाडाखालीं जाऊन बसले. तों असा चमत्कार झाला कीं, तो वृक्ष एकदम हिरवागार दिसूं लागला व त्यावर पालवी फुटून तो मोहरला. (पा. १८८)

त्याच्या मरणापूर्वीं त्याचे मुसलमान शिष्य म्हणू लागले कीं, " आम्हाला नामस्मरणाची दीक्षा आमच्या गुरुनानकाकडून मिळाली असल्यानें आम्ही त्याच्या प्रेताला पुरणार; " उलट त्याचे हिंदु शिष्य म्हणूं लागलें कीं, "नानक हा आमचा गुरु असल्यानें आम्ही त्याच्या प्रेताला अग्निसंस्कार करणार. ह्यावर गुरु नानकाला आपला निर्णय देण्याविषयीं विनंती करण्यांत आली असता तो

म्हणाला, " प्रथम माझ्या प्रेताच्या उजव्या भागावर हिंदूनीं व डाव्या भागावर मुसलमानांनीं फुलें वाहवीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ज्यांचीं फुलें अगदीं ताजीं राहातील त्यांनीं माझ्या शरीराचा अंत्यसंस्कार करावा. "

इतकें झाल्यावर गुरु नानकानें सर्व शिष्यांना भजन करायला सांगितलें व म्हटलें, " मित्रांनो ! मला प्रभु भेटावा म्हणून माझ्याकरिता तुम्ही प्रार्थना करा. " यानंतर गुरुनानकानें आपल्या अंगावर एक वस्त्र घेतलें, परमेश्वराला वंदन केलें व आपली प्राणज्योति आपला उत्तरवर्ती गुरु अंगड याच्या शरीरांत घातली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तें वस्त्र काढून त्याचे खालीं पाहतात तों तेथें कांहीं एक दिसेना ! तेथें पडलेलीं दोन्ही बाजूचीं फुलें मात्र टवटवीत दिसत होती. गुरुच्या प्राणोत्क्रमणाचे जागीं येऊन सर्व शिखांनीं आदरपूर्वक वंदन केलें. पंजाबांतील कर्तेपूर हें गांव नानकाचें निधनाची जागा. या ठिकाणीं शिखांनीं एक मंदिर उभारलें व मुसलमानांनीं एक थडगें रावी नदीच्या तीरावर बांधलें. नदीच्या पुरामुळें तें मंदिर व थडगें दोन्हींही धुवून गेलीं आहेत.

३ गुरु नानकाविषयीं पूज्यभावः—

(१) शिखधर्मातील ग्रंथांतून दिसून येणारे नानकाचे दोषः—गुरुनानकाचीं स्वतःचीं म्हणून कांहीं वाक्यें ग्रंथसाहेबांत उद्धृत केलीं आहेत. त्यांत तो आपल्या-

मध्यें अनेक दोष असल्याची कबुली देतो; व आपल्यावर प्रभूनें दया करून क्षमा करावी अशी करुणा भाकतो.

"सत्यस्वरूप, अनाकलनीय व अनंत असा प्रभुच सर्व कांहीं करतो. मी पापी आहे आणि हे प्रभो! तूं क्षमा करणारा आहेस." (ट्रंप ५०३ व हेस्टिंग्‌चे भाषांतर ९.१३३)

" प्रभो ! तूं सर्वव्यापी आहेस तरी मला तूं दूर आहेस असें वाटलें. तूं माझें प्रत्येक कृत्य बघतोस तरी माझा तुझ्यापुढें लपडाव चालूच आहे. मी तुझ्या आज्ञेचें पालन करीत नाहीं व तुझें नामस्मरणही करीत नाहीं असा मी पापी आहे." (३५ ट्रंप ३९)

"माझ्या अवगुणाला पार नाहीं. समुद्रांतील व महासागरांतील पाण्याइतकी माझी पापें अगाध आहेत. प्रभो ! माझ्यावर दया कर. थोडीतरी माझी करुणा येऊं दे. एखाद्या पाषाणाप्रमाणें मी बुडत आहे. मला तार. (पा. ३० ट्रंप २२०).

रात्रंदिवस माझ्या तोंडांत परनिंदेशिवाय कांहींच येत नाहीं. मी अधम व कवडीमोल आहे. माझ्या शेजाऱ्याच्या घरावर माझा नेहमीं डोळा असतो. काम व क्रोध हे चांडाळ माझ्या हृदयांत रहात आहेत. हे विश्वविधात्या! मी आंतून पारध्यासारखा आहे. बाहेरून

साधूंचा वेष घेऊन आंतून दुसऱ्यांना आपल्या जाळ्यांत पकडायला मी टपलों आहे. लुच्चांच्या देशांत मीही एक लुच्चा आहे. मी इतका कृतघ्न आहे कीं, तूं माझ्याकरितां इतकें केलेंस तरी, मला त्याची किंमत नाहीं. ऱ्यां दुष्टानें व लबाडानें तुला तोंड तरी कसें दाखवावें ? दास नानक आज आपलें हृदय उघडून दाखवीत आहे (पान. १८४ टूंप ३८)

मी शुद्ध नाहीं, सत्यवादी नाहीं, पंडित नाहीं. मी जन्मापासून मूढ आहे. (हेस्टिंग्ज ९–१८३) [पंजाबी भाषेंतील नानकाचे मूळ शब्द मेकॉलिफनें आपल्या नानक चरित्रांत उद्धृत केले आहेत. पान १८०.]

आपल्या देशांतील धार्मिक परिस्थिति शोचनीय झाली आहे, असे आपल्या आयुष्याच्या उत्तरभागांतही दुःखोद्गार काढीत असतां आपल्या मनाचा झालेला गोंधळ व मोक्षाकरिता धडपड करीत असतां पुढें पसरणारा अंधार याचें वर्णन नानकानें केलें आहे.

" तुझा शोध करताना माझ्या मनाचा गोंधळ उडाला आहे. अंधारांत मला वाट सांपडेनाशी झाली आहे. नानक म्हणतो, " गर्वांत चूर झालेला मी आतां दुःखानें रडत आहे ! माझा उद्धार कसा होईल बरें ?" (पा. १७० टूंप २०२).

(२) ग्रंथसाहेबाहून इतर ठिकाणीं असलेल्या त्याच्या जीवनचरित्रांत आलेलें त्याच्या अवगुणाचें वर्णन:—

असें म्हणतात कीं, वयाच्या छत्तीस वर्षांपर्यंत नानक हा एक नालायक, रोगी व परमेश्वराच्या शोधांत व्यग्र झालेला असा मनुष्य होता.

" मला प्रथम प्रभूच्या विरहाचें दुःख होतें, आणि मग त्याच्या चिंतनाची भूक लागते. यमदूत मला शिक्षा करतील याचीही मला भीति वाटते. मला असें भय वाटतें कीं, माझें रोगग्रस्त शरीर नष्ट होईल. मी ईश्वराला विसरलों व विषयसुखांत दंग होऊन गेलों. शेवटीं मला रोगानें पछाडलें. माझ्या दुष्ट हृदयाला भली शिक्षा झाली. " (पा. २७)

" चारी वेद धुंडाळले; पण त्यांनांही परमेश्वराचा अंत लागलेला दिसत नाहीं. मुसलमानी धर्मातील कुराण वगैरे ग्रंथांचा अभ्यास केला, पण त्यांतही खऱ्या महात्म्याचें वर्णन आलेलें नाहीं. पृथ्वीचे नव खंड पालथे घातले. हृदयाची नौका करून प्रत्येक सागरांत धुंडाळून पाहिले. नदीनाल्यांच्या कांठीं राहिलों, व चौसष्ट तीर्थांत जाऊन स्नान केलें. "

(३) धर्मग्रंथाहून इतर ठिकाणच्या जीवनचरित्रात आलेलें त्यानें केलेल्या चमत्कारांचें वर्णन:—

असें म्हणतात कीं, त्यानें एका वठलेल्या वटवृक्षाला सजीव केलें (५९–६१). तसेंच एका वृक्षालाही त्यानें पालवी फोडली. (१८८ ट्रंप भाग ४५). एका मेलेल्या हत्तीला त्यानें जीवंत केलें (५६ ट्रंप भाग १५). एका मृतप्राय मनुष्याला त्यानें उठविलें. (९४-९५) एका कुष्टरोग्याला त्यानें बरा करून दीक्षा दिली. सुक्या जमिनींतून त्यानें पाणी काढलें (१७२). असे अनेक चमत्कार त्यानें केले व अनेक लोकांना शीख-धर्माची दीक्षा दिली. (११३–११४)

(४) जिवंतपणींच दिव्य तारक म्हणून त्याला लोक पूजू लागले:—

नानकाला 'गुरु' ही संज्ञा बहुतेक ठिकाणीं दिलेली आढळते. याशिवाय सरदार, राजा, नानक-शहा इत्यादि विशेषणेंही त्याला लावलेलीं आढळतात, याशिवाय त्याला प्रेमानें 'बाबा नानक' असेंही म्हणत. आयुष्याच्या उत्तर–भागांत तर त्याला 'महात्मा' व 'दिव्य तारक' म्हणून लोक भजू लागले.

लोक त्याला ईश्वर मानू लागले; व आपल्यावर अनुग्रह करून त्यानें मोक्ष द्यावा म्हणून त्याची प्रार्थना करू लागले (पा. ५१).

(५) पुढें पुढें त्याच्याविषयींच्या पूज्यबुद्धीचा कळस झाला.

पूर्वेकडे धर्मोपदेशकाला मान देता देता, त्या मानाचें पर्यवसान सहजासहजीं त्याला देव मानण्यांत होतें,—नव्हे असें पर्यवसान करण्याचा कित्येकांना अनावर मोह होतो. नानकाचे निधनानंतर साठ वर्षांनीं गुरुदासाची लढाई संपण्याचे वेळीं त्याचे भक्त त्याला चमत्कार करणारा महात्मा येवढेंच मानूनच राहिले नाहींत, तर त्यांनीं त्याला परमेश्वराच्या कोटीला नेऊन बसविलें.

उदा०—गुरु नानक हा परमेश्वर आहे, साक्षात् परब्रह्म आहे. (गुरुदास १३:२५).

धर्मचर्चेच्या गुंतागुंतींत न शिरता हल्लींचे सुशिक्षित शीखलोक आपल्या धर्मस्थापकाला अत्यंत पूज्य भावानें भजतात. आणि इतकें करूनही पुन्हां जीझसविषयक पूज्य बुद्धिही त्यांच्या मनांत वसत आहे.

‘ गुरु नानकाच्या स्वभावांत पुढें कांहीं सुधारणा झाली नाहीं, ह्याचें कारण लहानपणापासून त्याचा स्वभाव सर्वांशीं निर्दोष व परिपूर्ण होता. त्याचे ठिकाणीं कोणत्याही तऱ्हेचा अतिरेकीपणाच नव्हता, मग तो दूर करण्याची जरूर कशी असणार ? कोणत्याही तऱ्हेचा विक्षिप्तपणा त्याचे अंगीं नसल्यानें त्या बाबतींतही सुधारणेला अवकाश नव्हता. एवंच नानकाचा स्वभाव सर्वांशीं परिपूर्ण व सर्वप्रकारानें सुसंगत असल्यानें

त्याला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. त्या काळीं हिंदुस्तानांत ख्रिस्तिधर्माचा प्रवेश झाला नव्हता. त्यामुळें अर्थात्च नानकाच्या लिखाणांत त्या धर्माचा उल्लेख नाहीं. तरीपण त्याच्या धर्ममतांचा झोंक पहातां असें बिनधोकपणानें म्हणतां येईल कीं, एका दृष्टीनें तो ख्रिश्चन नसला तरी, दुसऱ्या दृष्टीनें तो सर्व ख्रिस्ति-लोकांत अत्युच्च दर्जाचा ख्रिश्चन होता. आपल्या शिष्यांचे अत्युच्च प्रेम संपादन करणें, हें त्याचें जीवन-कार्य होतें. त्याच्या धर्ममतांत हटवादीपणाचा लेशही नसल्यानें त्या मतांबद्दल त्याला स्वतः कांहीं लिहिण्याची अथवा दुसऱ्याकडून लिहविण्याची जरूरच भासली नाहीं. गेलीं चारशें वर्षें शीखलोक असें मानीत आले आहेत कीं, त्याचीं वचनें परमेश्वरी स्फूर्तीनें त्याच्या तोंडून निघालीं आहेत. अशा या लोकोत्तर विभूतीला दैवीपुरुष म्हणायला कांहींच हरकत नाहीं. माणसांत पुरुषोत्तम व देवांतला एक देव, असें त्याचें वर्णन करणें यांत गैर कांहींच नाहीं. मनुष्य स्वभावांत जेवढें म्हणून उच्च व उदात्त असूं शकेल त्या सर्वांचा गुरु-नानकाचे स्वभावांत एकत्र संयोग झाला होता. त्याला विकार नव्हते असें नाहीं, पण त्यांच्यांत व आपणांत फरक येवढाच कीं, आपण विकारांशीं नुसतेंच झगडतों, पण नानकानें त्यावर विजय मिळविला होता.

" ज्याचे ठायीं परमेश्वराचा चांगुलपणा, व ज्ञान प्रकट झालें असेल, त्याला साक्षात परमेश्वर खुशाल म्हणावें, कारण चांगुलपणा व ज्ञान हीं परमेश्वराचींच लक्षणें आहेत, हें माझें वचन वज्रलिखिताप्रमाणें अबाधित समजा " (मॅथ्यू अर्नोल्डच्या कवितेंतील उतारा).

(सेवारामसिंग थप्पर बी. ए. एल. एल बी. कृत, A eritical story of the life and teachings of Sri Guru Nanak Dev, the founder of Sikhism पृष्ठ १७३-१७९ रावळपिंडी कमर्शियन युनियन प्रेस १९०४)

(४) शिखांचे धर्मग्रंथ

सामान्यतः ग्रंथ या संस्कृत शब्दाचा अर्थ कोणतेंही पुस्तक असा होतो. पण ह्या ठिकाणीं पारिभाषिकरीत्या 'शिखांचा विशिष्ट धर्म ग्रंथ ' असा त्याचा विवक्षित अर्थ होतो. ह्या शिखांच्या 'ग्रंथांत' अनेक कवितांचा संग्रह आहे. ह्यापैकीं कांहीं कविता फारच छोटेखानी आहेत. कवितांचीं संख्या जवळ जवळ २९४८० यमकयुक्त ओळी इतकीं भरेल. ह्या सर्व कवितांची रचना अंशतः अनेक कवींच्या कालक्रमानें केली आहे, व अंशतः ह्यांत येणाऱ्या एकतीस छंदांच्या क्रमानें केलेली आहे. ह्या संकीर्ण संग्रहाचा सामान्यतः भगवच्चिंतन व उपदेश हा विषय आहे. ह्या काव्य संग्रहाचें हिब्रू भजनें व सुभाषितें ह्यांच्याशीं बरेंच साम्य आहे. ह्यापैकीं " आदिग्रंथ " हा प्राचीन ग्रंथ, शिखांच्या

पांचव्या गुरूनें आपल्या हातीं आलेल्या, गुरूनानकाच्या व त्याच्यानंतरच्या गुरूंच्या वचन संग्रहावरून सन १६०४ या वर्षीं रचला. यानंतर शिखांच्या नवव्या व दहाव्या गुरूंनीं वरील संग्रहांत कांहीं थोडीशीं भर टाकली. ह्या ग्रंथाचें मुद्रण लाहोरच्या सरकारी छापखान्यातर्फे झालें असून त्याची एकंदर १५७० पानें आहेत. ह्या ग्रंथांतील शब्द जवळ जवळ दहा लाख (कांहीं थोडे कमी) भरतील. शिखांमधील अगदीं प्राचीन परंपरेंतील लोक दहाव्या गुरूनें रचलेल्या 'दशम ग्रंथ' या नांवाच्या ग्रंथालाही आपला प्रमाणभूत धर्मग्रंथ ह्मणतात. हा ग्रंथ पहिल्या ग्रंथसाहेबानंतर शंभर वर्षांनीं रचला गेला. आदिग्रंथांत एकंदर सदतीस निरनिराळे कवि आले आहेत. नानकांच्या गादीवरील दहा आचार्यांपैकीं सात आचार्य, अनेक शीख कवि व अनेक मुसलमान व हिंदु भक्त या सर्वांचीं भजनें आदिग्रंथांत आलीं आहेत. आदिग्रंथांतील कवींपैकीं कबीर ह्या मुसलमान व रामानंद हा हिंदु आहे. ह्या दोघांनींहीं हिंदुधर्मांत सुधारणा करण्याचे उद्देशानें त्याच धर्मांत दोन पंथ काढले. ग्रंथसाहेबांत पुढील सहा भाषांतील काव्यें आलीं आहेत:— पंजाबी, मुसलमानी, फारशी, प्राकृत, हिंदी व मराठी, याशिवाय अनेक प्रांतभाषा आहेत त्या निराळ्याच. जगांतील इतर कोणत्याही धर्मग्रंथांत भाषांची इतकी विविधता दिसून येत नाहीं. या ग्रंथाच्या इंग्रेजी भाषांतरकाराचा असा अंदाज आहे कीं, हा मूळ ग्रंथ अथपासून इति

पर्यंत समजून वाचणारे आज दहा लोकही सांपडणार नाहींत.

आणि या दहा समजदार वाचकांपैकीं मूळ ग्रंथाचा इंग्रजींत अर्थ सांगणारा तर फारच विरळा; मुळींच कोणी नाहीं असें म्हटलें तरी चालेल. या दृष्टीनें पहातां विद्यमान धार्मिक अथवा तदितर ग्रंथांत ग्रंथसाहेबासारखा अत्यंत कठिण ग्रंथ दुसरा सांपडायचा नाहीं.

ह्या ग्रंथाला प्रत्येक शीख सर्वस्वीं प्रमाणभूत मानतो. तरीपण आज ह्या ग्रंथाचा अभ्यास बहुतेक कुणीही करीत नाहीं. शेंकडा नव्वद शीख ह्या ग्रंथांतला विषय काय आहे हें सुद्धां जाणत नाहींत. अशी स्थिति असूनही ह्या ग्रंथाची प्रत्यक्ष पूजा करण्याइतकी पूज्यभावना ह्याचेविषयीं दाखविण्यांत येते. ह्याचें प्रचलित नांव 'ग्रंथसाहेब' म्हणजे ग्रंथरूपी प्रभु. अमृतसर येथील शिखांच्या मंदिरांत,—

> " एकही मूर्ति स्थापलेली नाहीं. केवळ अद्वितीय परमेश्वराचें म्हणून हें मंदिर मानण्यांत येतें. तरीपण तेथेंही अमूर्त परमेश्वराचें मूर्त प्रतीक असा हा ग्रंथ आहे, असा सर्व शिखांचा विश्वास आहे. किंबहुना ग्रंथसाहेब हाच मंदिरांतील देव—अथवा परमेश्वराचें सगुण स्वरूप मानण्यांत येतें.

दररोज सकाळीं या ग्रंथसाहेबाला एक बहुमोल पोषाख चढवितात, व त्याला रत्नखचित छताखालीं एका सिंहा-

सनावर ठेवतात. दर संध्याकाळीं त्याला मंदिराच्या गाभाऱ्यांत एका सोन्याच्या पलंगावर निजवितात. ह्या गाभाऱ्यांत गेले असता, ग्रंथसाहेबाला विटाळ होईल ह्मणून गाभाऱ्याभोंवती लोखंडाचा कठडा केला आहे. (मॉनियर वुइल्यिम्स कृत " Brahmanism and Hinduism or religious thought and life in India " १९०७)

देवळाच्या एका बाजूला ग्रंथसाहेबाची एक प्रत घेऊन त्याचें दिवसभर पहाऱ्या पहाऱ्यानें अखंड पारायण चालतें. देवळांतले पुजारी पारायण करीत असतां पुढील प्रसिद्ध भजन गायलेलें ऐकूं येतें:—

" जन्ममृत्यूच्या तावडींत सांपडलेल्याची पूजा करण्यांत काय अर्थ ?

पृथ्वी व सागर यांना व्यापून राहिलेल्या एका प्रभूचें स्मरण करा."

(मकॉलिफकृत गुरुनानकांचें चरित्र पृ० २८०).

प्रसिद्ध हिंदु—धर्मसुधारक, एकोणीसाव्या शतकांतील प्रचंड धर्म सुधारणेचें फळ जो आर्यसमाज त्याचा संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती, यांनीं ह्या शिखांच्या ग्रंथपूजेविषयीं खास टीका केली आहे:—

"शीख लोक मूतिपूजा करीत नाहींत, पण मूर्तिपूजेला मागें सारील अशा तऱ्हेनें ते आपल्या धर्मग्रंथाची पूजा करतात. ही मूर्तिपूजाच नव्हे तर काय ? कोणत्याही

पार्थिव वस्तूपुढें नमस्कार करण्याकरितां डोकें टेकणें अथवा तिची पूजा करणें, म्हणजेच मूर्तिपूजा. ज्यांनीं मूर्तिपूजकाप्रमाणें आपल्या पूजाविधीचा एक किफायतशीर व्यापार मांडला आहे, तेही मूर्तिपूजक नव्हेत तर काय ? ज्याप्रमाणें मूर्तिपूजक आपण पूजित असलेल्या मूर्ति लोकांना दाखवून त्यांच्याकडून देशाच्या नांवावर पैसे उकळतात, त्याचप्रमाणें नानकाचे भक्तसुद्धां ग्रंथसाहेबाची पूजा स्वतः करून दुसऱ्यांना करायला लावतात. त्यांच्याकडून ग्रंथापुढें पैसे ठेवावितात." (सत्यार्थप्रकाश इंग्रेजी भाषांतर पान ६३).

५ शीखधर्मांतील परमात्म्याविषयींची कल्पना

भक्तियुक्त अद्वैतवाद हें नानकाचें मुख्य धर्ममत. त्याचे अनुयायीसुद्धां हेंच मत मान्य करतात. ईश्वरी साक्षात्कार होतांच नानकाचे तोंडून प्रथम जे उद्गार निघाले, त्यांतील पहिली दोन वाक्यें ग्रंथसाहेबांत आलीं आहेत. प्रत्येक शिखानें निजून उठतांच त्या वाक्यांचा पाठ करावा असें विधान आहे:—

"परमेश्वर एक आहे, त्याचें नांव सत्यविधाता. तो भयद्वेषरहित, अमर, अज, स्वयंभू, श्रेष्ठ व दयाळु आहे. सृष्टीच्या आदि, मध्य, अंत ह्या त्रिकाळीं तो सत्य परमेश्वर विद्यमान आहे."

ग्रंथ साहेबांत भक्तियुक्त आर्तोद्गार अनेक ठिकाणीं आले आहेत. जगांतल्या कोणत्याही धर्मग्रंथांत इतके

आर्तोद्धार सांपडत नाहींत. परमात्म्याच्या अद्वैताविषयीं उपनिषद् व कुराण याप्रमाणें या ठिकाणींही वारंवार घोषणा केली आहे.

" प्रभु एक आहे. भाई ! त्याचे खेरीज दुसरा कोणी नाहीं " (१४९ ट्रंप ५८९).

" या जगद्व्यापारांत तुझा भागीदार दुसरा कोणीही नाहीं. " (ट्रंप ४३१)

" दुसरा कुणी नाहींच; मग म्हणू तरी कसा ' आहे. ' म्हणून ? अखिल ब्रह्मांडांत एकच निष्कलंक परमात्मा आहे. " (ट्रंप भाग ९८।३२०)

" तुझ्यासारखा दुसरा कुणी नाहीं. सर्व काळीं तूंच एक आहेस. सदा सर्वदा तूंच आहेस. तुझ्याखेरीज दुसरा कुणी नाहीं " (ट्रंप १७)

ईश्वराचा महिमा अगाध व अचिंत्य आहे. हें धर्ममत नानकानें कां तर अक्षरशः कुराणांतून घेतलें असावें, अथवा कोणत्यातरी हिंदूधर्मग्रंथांतून घेतलें असावें.

" जीवांचा बंध आणि मोक्ष हे प्रभो ! तुझ्याच हातून घडतात. दुसरा कोणीही ह्या बाबतींत लुडबुड करूं शकत नाहीं." (२०९; ट्रंप ८)

" त्याला वाटेल ते तो करतो. प्रभूला दुसरा कोण आज्ञा करणार ? तो राजा आहे—सार्वभौम आहे. त्याच्या इच्छेपुढें सर्व मान वाकवितात. " (२१२; ट्रंप १०)

" त्याला वाटेल त्याप्रमाणें तो प्राणिमात्राला आज्ञा करतो. तो सर्वसाक्षी आहे, पण तो कुणालाही दिसत नाहीं." (२१३; ट्रंप ११)

" हे प्रभो ! तुला जसें पाहिजे तसेंच असतें. तूं जसें करतोस तसेंच होतें. तुला जें आवडेल तेंच घडणार " (ट्रंप १७)

मुळांत परमेश्वर जरी एक असला, तरी त्याच्या अनेक रूपांच्या दृष्टीनें त्याला अनेक नांवें देणें यांत गैर कांहींच नाहीं, असें नानकाचें मत होतें. या बाबतींतही हिंदुधर्म व मुसलमानधर्म यांचें ऐक्य घडवून आणण्याचा त्याचा इरादा होता. परमेश्वराला उद्देशून ग्रंथसाहेबांत अल्ला, खुदा वगैरे मुसलमानी नांवें दिलेलीं जशीं आढळतात, तशीं ब्रह्म, परब्रह्म, परमेश्वर, हरि, राम, गोविंद, नारायण, इत्यादि हिंदु नांवेंही त्या ग्रंथांत दिलेलीं आढळतात.

" प्रभो तूं एक आहेस, पण तुझीं रूपें अनंत आहेत " (३१० ट्रंप ५०४ तसेंच ४००).

वरील अनेक नांवाखेरीज परमेश्वराला उद्देशून नानकानें ' गुरु ' हें साधें पण अर्थपूर्ण नांव योजिलें आहे. जगांतल्या धर्मांत शीख हा असा एकच अपूर्व धर्म आहे कीं, त्यांतल्या धर्मग्रंथांत परमेश्वराला उद्देशून " गुरू " हा शब्द वापरला आहे. आणि या धर्मांतील अनुयायांनाही ' शीख ' (ह्मणजे शिष्य) हा

शब्द लावण्यांत येतो. हीही बाब ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

शीख धर्मांत ईश्वराला 'सत्-नाम' हें एक प्रमुख विशेषण लावण्यांत येतें. शिखांच्या धर्मग्रंथांतील अगदीं प्रारंभीचें दोन शब्द 'सत्-नाम' हेच होत. दरएक भजनाच्या प्रारंभींही हेच शब्द येतात, व ग्रंथांत अनेक ठिकाणींही हेच पुनः पुनः आले आहेत. ह्या शब्दांना पवित्र मंत्राचें स्वरूप शीखधर्मांत प्राप्त झालें आहे. फार काय ईश्वराचें प्रतीक ह्मणूनही या दोन शब्दांची शीख लोकांत भक्तीनें पूजा करतात.

सत्-नाम हे शब्द दरएक भजनाचे आरंभीं कां लिहिले आहेत असा एकानें गुरुनानकाला प्रश्न केला असतां त्यानें उत्तर दिलें: 'सत्-नाम' हें देवाधिदेव आहे. शीख या 'सत्-नामा'ची उपासना करून मोक्ष मार्गांतील सर्व विघ्नांना पळवून लावतात. ह्मणूनच सर्व भजनांचे प्रारंभीं 'सत्-नाम' हे शब्द घातले आहेत. (पान १३८)

"त्यांना नामाचा विसर पडतो, ह्मणूनच ते पापमार्गांत शिरतात. नामावाचून मनुष्याचा उद्धार कसा होईल ?" (१४९; ट्रंप ५८९)

"मी नामाचें ठायीं वास करतों; व नाम माझे ठायीं वास करतें" (१३५ ट्रंप ७७)

(६) मनुष्य व विश्व याविषयींची शीख धर्माची कल्पना :—

" सर्वशक्तिमान व सनातन परमेश्वराच्या दृष्टीनें जग हें निःसार व क्षणिक आहे.

" मैत्री तरी कुणाशी करायची ? कारण सगळें जग नाशिवंत आहे. प्रभो ! तूं मात्र एक अविनाशी आहेस, बाकी सर्व लटकें आहे." (१३१,२३१ ट्रंप ६४२).

" जगांतील प्रत्येक व्यवहार क्षणिक आहे, हा सर्व चार दिवसाचा पसारा आहे. चला, नेटानें पुढें चला. जग हें मायिक आहे " (१८८-१८९).

"सर्वशक्तिमान् व शाश्वत परमेश्वरापुढें मानव हा किती दुबळा ! त्यानें परमेश्वरापुढें लीन होणें हेंच योग्य."

" नानक हा प्रभूचा बंदा गुलाम आहे. प्रभु हाच परमेश्वर. " (ट्रंप ६४४)

" मी कर्ता हा अहंभाव जोपर्यंत मनुष्यांत आहे, तोंपर्यंत त्याला कोणत्याही तऱ्हेचें सुख मिळणें शक्य नाहीं " (ट्रंप ४००).

" प्रभूच्या आज्ञेनें हे प्राणी निर्माण झाले आहेत. त्याच्याच आज्ञेनें त्यांचे सर्व व्यवहार चालले आहेत. त्याच्याच आज्ञेनें मृत्यु त्यांच्यावर झडप घालतो. त्याच्याच आज्ञेनें सर्वप्राणिमात्र त्याच्यांत लय पाव-

तात. नानक ह्मणतो—प्रभूच्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं घडत असतें. प्राण्याच्या हातांत कांहींएक नाहीं " (१३५; टूंप ७८).

" त्याच्या मनांत आलें तर तो प्राण्यावर अनुग्रह करतो. त्याला वाटलें कीं प्राण्यांना शिक्षा करावी, तर तो तसें करतो. त्याला वाटेल तसें तो करतो. नानक ह्मणतो, त्याच्यापुढें मनुष्याचा काय पाड ? " (टूंप ५८५)

(७) मोक्षमार्ग—

शीख धर्माच्या मतें, मोक्ष ह्मणजे परमेश्वराचें ज्ञान होणें, अथवा परमेश्वर प्राप्ति होणें, अथवा परमेश्वरांत लय होणें. अचिंत्य प्रभूचें सर्वसत्ताधीशत्व ही शीखधर्मांतील मौलिक कल्पना—ह्या कल्पनेला जुळतील अशा तऱ्हेच्या ह्याच्या बरोबरच पुढील दोन कल्पना त्या धर्मांत आहेत. एक जगाची निःसारता व दुसरी मानवांचा दुबळेपणा.

"नुसत्या बडबडीनें आत्मज्ञान होणें शक्य नाहीं; परमेश्वराच्या अनुग्रहानेंच मोक्ष मिळतो. दयाळु प्रभु तुमच्याकडे दयादृष्टीनें पाहील, तेव्हांच तुह्माला सद्गुरुची प्राप्ति होईल." (२२३ टूंप ६३८).

" ज्यांच्यावर परमेश्वराची कृपा होते तेच त्याचे उपासक होतात. दयावन प्रभूची अनुग्रहदृष्टि ज्यांच्यावर पडेल, त्यांचाच उद्धार होतो." (५७,२२४ टूंप ६३८).

हिंदूंच्या उपनिषदांमध्यें वरील भगवदनुग्रहाचें मत निदान चारदा तरी आलें आहे. उदा. कठ २-२०; श्वेताश्वतर १:६; ३:२०; मुंडक ३:२,३.

" जग उत्पन्न करणारा तोच; व त्याचा संहार करणाराही तोच. कांहीं लोक गळयांत कंठी घालीत आहेत; कांहीं ऐटीत घोड्यावर बसले आहेत, ह्या सर्वांना कळसूत्री बाहुल्याप्रमाणें ईश्वर खेळवीत आहे. सर्व क्रिया करणारा ईश्वरच. मग मी कुणापुढें माझें रडगाणें गाऊं ? " (२४८, ट्रंप ६५२)

विश्वेश्वरापुढें अत्यंत लीनभावानें वागणें ही कल्पना इस्लामधर्मांतही स्पष्ट सांगितली आहे.

मीं परमात्मा आहे हें ज्याला कळलें, त्यालाच सोऽहं शब्दाचा खरा अर्थ कळला असें समजावें. (ट्रंप ८४)

जीवात्म्यानें परमात्म्यांत सर्वभावानें विलीन होऊन मोक्ष मिळविणें हा मार्ग व उपनिषदानें मोक्ष प्राप्तीचा सांगितलेला मार्ग हे अगदीं एक आहेत.

' मी ब्रह्म आहे ' असें जो जाणतो तो ब्रह्मच होतो. (बृहदारण्य १:४:१०) श्वेतकेतो ! तूं तें आहेस. (छांदोग्य ६:८-१६ नऊवेळ ह्याच वाक्याची पुनरावृत्ति त्या उपनिषदांत झाली आहे.) शीख धर्मांतील उपासनेचा मुख्य विधि म्हणजे ईश्वराचें ध्यान, विशेषतः ' सत् नाम ' ह्या रूपानें त्याचें ध्यान.

" भाई ! प्रभुचें ध्यान हाच आमचा धार्मिक विधि " (३२५).

" एका परमेश्वराचें नामस्मरण करणें हेंच तुमचें उच्चतम कर्तव्य " (२३४)

" ईश्वराचें पवित्र नाम हाच माझा आधार " (ट्रंप ५७७).

" पवित्र रामनामाचा जप कर. बाकी सर्व सोडून दे " (ट्रंप ५८२)

" नामस्मरण कर. नाम श्रवण कर. नामस्मरणांतच तुझे व्यवहार चालू दे " (११८; ट्रंप ५८७)

" ईश्वराचें ध्यान कर; प्रत्येक श्वासोछ्वासागणिक त्याचें नांव घे. म्हणजे ईश्वराच्या ज्योतींत तूं मिळून जाशील " (१८१).

शीखधर्मांत यज्ञयागादिकांचा व मूर्तींचा संपूर्ण अभाव आहे-हें त्याचें वैशिष्ट्य. ह्या बाबतींत ह्या धर्माचें मुसलमानी धर्माशी अत्यंत साम्य आहे. हिंदुधर्मांतील कांहीं पंथाशीही या बाबतींत त्याचें साम्य आहे. तरी पण इतर कांहीं पंथांशीं इतर बाबतींत त्याचा पूर्ण विरोध आहे.

" मोक्षाकरितां सद्गुरुची अत्यावश्यकता मानणें" हें शीखधर्माचें दुसरें महत्वाचें वैशिष्ट्य. ह्या बाबतींत त्याचें हिंदु व मुसलमान या दोन्हीही धर्मांशी तंतोतंत साम्य आहे. कारण हिंदुधर्मांत गुरुविषयीं पूज्यबुद्धि सर्वत्र

आढळतें, आणि इस्लामी धर्मांत तर त्या धर्माचा मूळ संस्थापक जो महंमद त्यालाच गुरू मानिलें आहे.

" आत्मज्ञान गुरूकडूनच शिष्याला मिळतें " (३७)

" सद्गुरू ही नौका आहे, ही गोष्ट थोड्यानाच कळते, पण ज्यांना ही गोष्ट कळली त्यांना सद्गुरू कृपाळूपणें तारतात (२३६; ट्रंप ६४५).

" सद्गुरूवाचून मोक्षमार्ग सांपडावयाचा नाहीं " (२३७; ट्रंप ६४६).

" ईश्वरासंबंधीं कितीही चर्चा केली तरी सद्गुरूच्या साहाय्यावाचून कुणालाही ईश्वरप्राप्ती झालेली नाहीं " (१४२; ट्रंप ५८९).

शिखांची खालसा संगत (शिख म्ह. शिष्य; खालसा म्हणजे शुद्ध; व संगत म्हणजे संघ) हें शीखधर्माचें तिसरें वैशिष्ट्य. ह्या नूतन धार्मिक संघाची स्थापना हें नानकानें केलेलें मोठेंच कार्य म्हणतां येईल. ह्या संघाच्या कल्पनेला नानकानंतरच्या गुरूंनीं दुजोरा दिला व दहाव्या गुरूनें तर त्याला विधिपूर्वक धार्मिक स्वरूप दिलें. अशा तऱ्हेनें धर्म व समाज या दोहोंवर अधिष्ठित झालेला हा संघ शीखधर्माच्या सामर्थ्याचें एक प्रमुख कारण आहे.

९ शीखधर्माचा इतिहास

ह्या धर्माच्या प्रारंभींचा इतिहास व ह्या धर्माच्या दहा गुरूंचा इतिहास ह्या दोहोंचा अगदीं निकट संबंध आहे.

(१) स. १५३८ त नानक वारला. मरणापूर्वी त्याला असें दिसून आलें कीं, आपल्या पाठीमागें आपल्या गादीवर बसायला आपल्या दोन्ही मुलांपैकीं एकही लायक नाहीं, ह्मणून त्यानें लहीना या नांवाचा, दोऱ्या वळण्याचा धंदा करणारा आपला एक परमभक्त शिष्य आपल्या गादीवर बसविला व त्याला अंगद (शरीर अर्पण करणारा) असें नवें नांव दिलें.

(२) गुरू अंगद (१५३८-१५५२) ह्यानें जुन्या गुरुमुखी लिपीचें नूतन संस्करण करून भाषेच्या बाबतींत साऱ्या पंजाबवर मोठेच उपकार केले. याशिवाय 'नानक हा साक्षात् परमेश्वर आहे' ही एक नवी समजूत त्यानें प्रचलित केली. (कोर्ट, शिखांच्या इतिहासाचें इंग्रेजी भाषांतर लाहोर १८८८).

(३) गुरू अमरदास (१५५२--१५७४) या शांत पण उत्साही गुरूनें शीखजातीचें संघटन करून, तिचें इतर जातींहून वैशिष्ट्य स्पष्ट करून तिचें सामर्थ्य वाढविण्याचें काम केलें.

(४) गुरू रामदास (१५७४–१५८१) ह्या उत्साही गुरूनें शीखांकरितां हरमंदिर हें मुख्य पूजास्थान केलें. लाहोरच्या आग्नेयेस तीस मैलावर एक लहानसें सरोवर आहे. त्यांत त्यानें हें मंदिर बांधलें. ह्या सरोवराला त्यानें अमृतसर हें नांव दिलें. आज शीखलोकांचें हें सर्वांत प्रमुख मंदिर मानलें जातें. गुरु रामदास हा गुरु अमरदासांचा जांवई होता. त्यानें आपल्यामागें आपल्या

मुलाला गादीवर बसविले व 'वंशपरंपरेनें गादीवर हक्क' हें तत्त्व सुरू केलें.

(५) गुरू अर्जुन (१५८१–१६०६) ह्यानें ग्रंथसाहेबाची रचना केली म्हणून ह्याचें नांव ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. त्यानें आपल्या पूर्वींच्या चार गुरूंचें अवशिष्ट असलेलें लिखाण, इतर साधुसंतांची कविता व आपली स्वतःची कविता ह्या सर्वांचा ग्रंथांत संग्रह केला. त्यानें धार्मिक वेष सोडून दिला व मौल्यवान कपडे वापरणें सुरु केलें. शिवाय सर्व शिखांकडून धार्मिक कर घेण्याचा प्रघात यानेंच सुरू केला. त्यानें शीखधर्माचा जोरानें प्रसार केला. दिल्लीच्या बादशहाशी लढता लढता ह्याचा अंत झाला.

(६) गुरु हरगोविंद (१६०६ ते १६३८) ह्यानें शिखांचा पुढारी म्हणून तरवार हें चिन्ह धारण केलें. शिखांचा पहिला किल्ला यानेंच बांधला. शांत परमधार्मिक व भक्त शिखांना हिंदुस्तानांतील मोंगल बादशहाशी लढणारे शूर सैनिक यानेंच बनविले.

(७) गुरू हरराय (१६३८ ते १६६०) यानें औरंगझेबाविरुद्ध आपल्या लष्करी मोहिमा चालूच ठेविल्या, पण त्यांत हररायाचा पराभव झाला.

(८) गुरु हरकृष्ण (१६६० ते १६६४) ह्यानें अवरंगजेबाशी लढाई चालूच ठेविली.

(९) गुरु तेगबहादूर (१६६४ ते १६७५) हा निधड्या छातीचा वीरपुरुष होता. ह्यानें शीखधर्माचा प्रसार दूर-

वर उत्तर–पूर्वेस व दक्षिणेंत सीलोनपर्यंत केला. व्यक्तिशः त्याचा मुसलमानधर्माशीं विरोध नव्हता; तरीपण मुसलमानाशी यशस्वी रीतीनें लढण्यांत यानें आपलें सर्व आयुष्य खर्ची घातलें. त्यानें शेवटच्या एका लढाईंत मुसलमानांना इतका बेदम मार दिला कीं, त्या वेळेपासून त्यांची तेगबहादुराशी लढण्याची छातीच होईना. (गुरु तेगबहादुराच्या प्रवासाचें वर्णन या पुस्तकाचें इंग्रजी भाषांतर पृष्ठ ५८). ह्या गुरूचें कांहीं लिखाण आदिग्रंथांत समाविष्ट केलें आहे.

(१०) गुरु गोविंदसिंग (१६७५–१७०८) शिखधर्माचें लढाऊ धर्मपंथांत परिवर्तन करण्याचें धोरण यानेंही चालू ठेविलें. ह्याच्या कारकीर्दींत पूर्वबंगाल व आसाम ह्यांची राजधानी जें डाका शहर त्याची शीखधर्माचें एक प्रबळ ठाणें म्हणून ख्याति झाली. त्यानीं स्वतः सिंग (=सिंह) ही पदवी धारण केली व प्रत्येक शिखालाही ही उपाधि धारण करायला लावले; अशाकरता कीं, त्या सर्वांचें एक विशाळ शूर कुटुंब गणलें जाऊन त्या सर्वांनाच खालसा (=शुद्ध) या नांवाखालीं येता यावें.

शीख लोकांच्या दीक्षाविधीचा त्यानें एक नवा प्रकार सुरु केला. नवदीक्षिताना लोखंडी भांड्यांत तरवारीच्या टोकानें ढवळलेलें व गोड केलेलें पाणी स्वतःवर शिंपडून घ्यावें लागे व थोडें प्यावें लागे. ह्या संस्कारयुक्त पाण्याला 'अमृत' म्हणत. ह्या पाण्यानें आत्मशुद्धि होते व युद्धांत पराभव होत नाहीं, असा समज आहे.

गुरुगोविंदसिंगानें 'दहाव्या गुरुचा ग्रंथ' लिहून 'हा आदिग्रंथाचा परिशिष्टग्रंथ आहे व त्याला आदिग्रंथाइतकेंच प्रामाण्य आहे' असें जाहीर केलें.

> "त्याला असें दिसून आलें कीं, आदिग्रंथाच्या पठणानें शीखलोक मनानें दुबळे होत चालले आहेत. तेव्हां असा एक ग्रंथ लिहिण्याचा त्यानें संकल्प केला कीं, तो वाचला असता त्याचे शिष्य लढण्याच्या कामाला योग्य होतील. तो म्हणाला, "माझ्या मरणानंतर तुम्ही समग्र ग्रंथसाहेबाला आपला गुरु माना." (कोर्टकृत History of the shiks पा. १ १।२६).

१७०८ मध्यें आपल्या दहाव्या गुरुच्या मरणानंतर शेवटीं शीख लोकांनीं आपली अत्युच्च शक्ति गुरुवरून काढून ग्रंथसाहेबावर कायमची ठेविली गुरु श्रेष्ठ कां ग्रंथसाहेब श्रेष्ठ हा लढा दहा गुरुंच्या कारकीर्दींत दोनशे वर्षेपर्यंत शिखांच्या मनांत चालला होता.

शीखांच्या राजसत्तेचा नाश होतांच शीखजातीचे तुकडे पडून तिचे अनेक गट बनले. हे गट आपापल्या पुरतीं छोटेखानीं राज्यें करीत होते. तथापि, सन १७६५ मध्यें अमृतसर येथील शिखांची राष्ट्रियसभा जी खालसा, तिनें नाणीं पाडलीं व "ग्रंथवाक्य, तरवार, निश्चितजयैय" हे शब्द त्या नाण्यांवर कोरले. ग्रंथबाबावर अचल श्रद्धा व जगद्विजय यांचा नित्य संबंध आहे, असा या शब्दसमूहांत ध्वनि होता. तरीपण शेवटीं सन १८४९ मध्य दुसऱ्या शीखयुद्धानंतर शिखांचा शेवटचा स्वतंत्र राजा धुलिपसिंग

यानें ब्रिटिशांची सार्वभौमसत्ता मान्य करून आपल्या जव-ळचा जगत्प्रसिद्ध कोहिनूर हिरा व्हिक्टोरिया राणीला अर्पण केला; अशा रीतीनें लढवय्या धर्म या दृष्टीनें चालत आ-लेली शिखांची राजसत्ता संपुष्टांत आली. १८५८ नं तर राणी हिंदुस्तानची सम्राज्ञी झाली व धुलिपसिंगानें ख्रिस्तिधर्म स्वीकारला.

आज सुद्धां " पंजाबचे सिंह " या आपल्या इतिहास प्रसिद्ध नांवाबद्दल शिखांना मोठा अभिमान वाटतो. आजचे बहुतेक शीख आपल्या जन्मभूमींतच राहून शांत-तेनें शेतीचा धंदा करीत आहेत.

शीखधर्मांत दोन मुख्य पंथ आहेत. एक नानकपंथः यांतील लोक आपल्या धर्माचा शांतिप्रिय आद्यसंस्थापक नानक याच्या वचनावर संपूर्ण श्रद्धा ठेवून चालतात. दुसरा खालसा पंथः यांतील लोक प्रवृत्तिपर असून दहावा गुरु गोविंदसिंग याच्या वचनावर यांचा अढळ विश्वास आहे.

याशिवाय पुढील पंथही शिखांत आढळतातः—
१ उदासी पंथ (= जगाविषयीं उदासीन लोकांचा). २ सुथ्रे (=शुद्ध, भिक्षूंचा). ३ दिवाने साधु (= वेड्या भक्तांचा). ४ निर्मल साधु (=शुद्ध ब्रम्हचाऱ्यांचा) व ५ अकाली(=कालातीत अनंत परमेश्वराचे उपासकांचा).

तसेंच पाहिलें तर एकंदर शीख पंथांची संख्या वीस भरेल. कित्येक पंथ कपड्यांच्या पांढरा, निळा, तांबडा, पिवळा वगैरे रंगावरूनच निघाले आहेतः कांहीं कप-ड्यांचें लांबीरुंदीवरूनच निघाले आहेत इतर कांहीं

मिशा कशा कापाव्या व केस कसे ठेवावे या मुद्यावर मतभेद झाल्यामुळें निघाले आहेत.

(११) शीख व हिंदुधर्म यांची तुलना

(१) साम्याचे मुद्दे:–

(अ) परमेश्वराच्या एकत्वाविषयीं श्रद्धा.

(आ) परमेश्वराची व्यवहारांतील असंख्य नावें उभय धर्मांत आहेत.

(इ) ईश्वर हा सगुण असून सर्वव्यापी आहे ही कल्पना शीखधर्मानें मान्य केली आहे. हिंदुधर्मांतील उपनिषदें व गीता यांत हीच कल्पना सर्वमान्य आहे.

(ई) भगवदनुग्रहानें मोक्ष मिळतो हें उभय धर्मांसही मान्य आहे.

(उ) कर्मवाद.

" जसें पेरावें तसें घ्यावें (१२४ कोर्टकृत इतिहास पा० ४८).

(ऊ) पुनर्जन्म.

" स्वत: पेरावें, स्वत: कापून खावें. ईश्वराज्ञेनेंच प्राणी पुनर्जन्माच्या चक्रांत सांपडतो " (२०६ टूंप ७).

" भाई, आपल्या पुण्यपापांचें फळ ह्मणून प्राणी या लोकीं जन्माला येतो "(३२५).

(ऋ) मंत्र व जप यांचें मोठेंच महत्व हे दोन्ही धर्म मानतात.

(२) मतभेदाचे मुद्दे:—

(अ) सर्व शीख एकच—ही गोष्ट एकदा स्वीकारल्यावर हिंदुधर्माचा जातिभेद शिखांना मान्य नाहीं हें ओघानेंच आलें.

" परमेश्वरदृष्टीनें जाति कसली आणि अजाति कसली ?

तो ज्यावर अनुग्रह करतो तोच श्रेष्ठ." (ट्रंप, ७५)

" जाति हे निव्वळ थोतांड आहे " (ट्रंप ११४)

" एखाद्या भिकाऱ्यानें बाहेरच्या फाटकाजवळ येऊन आर्तस्वरानें भीक मागितली, तरी ती प्रभूला आपल्या महालांत ऐकू जाते. परलोकीं ' जाति ' ही वस्तूच नाहीं. (ट्रंप ४९४)

(आ) अमूर्त परमेश्वर शीखधर्माला मान्य असल्यानें त्यानें हिंदूंच्या मूर्तिपूजेचा निषेध केला आहे.

" हिंदु, ईश्वराला विसरून भलत्याच मार्गानें चालले आहेत. अज्ञानी लोक धोंडे घेऊन त्याची पूजा करतात. हिंदुहो! स्वत: पाण्यांत

बुडणारा दगड तुम्हाला भवसागरांतून कसा तारुन नेईल ? " (३२६)

" भाई ! तूं देवदेवतांची पूजा करतोस; पण त्यांच्याजवळ मागतोस तरी काय ? आणि त्यांच्याकडून तुला मिळणार तरी काय ? पाण्यानें दगड कितीही धुतलास तरी तो पुन्हा पाण्यांत हा बुडणारच. (३३६)

(इ) एकेश्वरीमत शिखांना मान्य असल्यानें त्यांनीं अनेक देवतावादाचा निषेध केला आहे.

(ई) शिखधर्मानें शुद्ध परमेश्वराच्या उपासनेचा स्वीकार केला आहे व हिंदूच्या तीर्थयात्रा, कर्मकांड व संन्यासधर्म यांचा निषेध केला आहे.

" वेदांच्या शब्दजालानें लोक भलतीकडे जात आहेत. कर्मकांडी लोक फार गर्विष्ठ असतात.

तुझ्या मनांतला गर्वरूपी मळ कायमच आहे; मग तीर्थयात्रेला जाण्याचा फायदा तरी काय ? (२७२).

दगडांची पूजा केली; तीर्थयात्रा केल्या; अरण्यांत राहिला; संसार सोडला; खूप

भटकला; तरी घाणरडें मन शुद्ध कसें होणार ? (३३९)

(उ) ग्रंथबाबाचें प्रामाण्य व वेदांचा निषेध. वेद ही एक बेडी आहे. त्याच्या पठनानें वाद व गर्व वाढतो (ट्रंप १५४८).

(ऊ) शीखधर्मात स्त्रियांना उच्च स्थान दिलें आहे. हिंदुधर्मानें स्त्रियांची केलेली अवहेलना या धर्माला खपत नाहीं.

(ऋ) हिंदूंची बालहत्या निषिद्ध मानून शीखधर्मानें प्रजोत्पादनाचा जोरानें पुरस्कार केला.

(ॠ) हिंदूंची शाकाहारपद्धति शिखांना मान्य नाहीं. त्याचे ऐवजीं पुष्टिवर्धक मांसाहाराचा ते स्वीकार करतात.

१३ शीख व इस्लाम धर्मांची तुलना:—

साम्याचे मुद्दे:—

(१) सगुण परमेश्वराचें एकत्व.

(२) परमेश्वराचें सर्वसत्ताधारित्व.

(३) अनिर्वचनीय परमेश्वराचें दयालुत्व; त्याची कर्तुमकर्तुं शक्ति असून त्या विरुद्ध आपण ब्र ही काढता कामा नये.

(४) ईश्वराला शरण जाण्यानें मोक्ष मिळतो.

(५) ईश्वराचें नामस्मरण करणें हीच त्याची पूजा.

(६) ठराविक प्रार्थना करण्याचें दोन्हीही धर्मांत फार महत्व मानतात.

(७) धर्मसंस्थापक हा ईश्वराचा प्रेषित म्हणून त्याची भक्ति करणें.

(८) धर्मग्रंथाविषयीं अत्यंत पूज्यभाव.

(९) दोन्हीहीं धर्मांतील मुख्य प्रार्थना त्या त्या धर्माच्या संस्थापकाचे तोंडून लहानपणीं कोणत्या तरी अत्यंत आणीबाणीचे प्रसंगीं निघालेली असून पुढें तीच प्रार्थना धर्मग्रंथांत समाविष्ट होऊन तिचा नित्य पाठ करावा असें विधान करण्यांत आलें.

(१०) मुख्य संस्थापकामागून त्याची गादी चालणें.

(११) दोन्हीही धर्म प्रबल लढाऊवृत्तीचे आहेत.

(१२) पंथ उपपंथ असूनही वरील दोन्हीही धर्मांत एकी दिसून येते.

(१३) दोन्हीही धर्मांचें प्रसिद्ध मुख्य स्थान एक एकच आहे. मुसलमानांची मक्का, व शिखांचें अमृतसर.

(१४) मूर्तिपूजेचा स्पष्ट निषेध.

(२) भेदाचे मुद्दे: —

(१) शिखांचा धर्मसंस्थापक महंमदाइतका निष्ठुर व भयंकर वृत्तीचा नव्हता.

(२) इस्लामांचा देव जितका निष्ठुर अथवा भयंकर आहे, तितका शिखांचा नाहीं.

(३) इस्लामी-धर्मग्रंथ मात्र एकाच महंमदाची कृति मानतात; शिखांच्या धर्मग्रंथाची रचना निदान सदतीस व्यक्तींनी केली आहे, असें म्हणतात.

(४) रमदान महिन्यांत मुसलमानांना उपवास करावे लागतात. शीख लोकांना उपवासाचें तत्व मान्य नाहीं.

(५) अन्तिम न्यायाचा एक दिवस मुसलमानी धर्मांत मुक्रर केलेला आहे; आनंदमय स्वर्गाची कल्पनाही तो धर्म स्वीकारतो. शीखधर्मांत ह्या दोन्हीही कल्पना नाहींत.

१३ शीख धर्माच्या प्रबलतेची कारणें:—

(१) ह्या धर्माच्या संस्थापकानें धर्मसुधारणा व शांततेची स्थापना याविषयीं जोराचा प्रयत्न केला.

(२) ह्या धर्माच्या संस्थापकानें धर्मप्रसाराची चळवळ मोठ्या उत्साहानें व यशस्वीरीतीनें केली.

(३) ह्यांतील स्पष्ट एकेश्वरीमताचा उपदेश.

(४) धर्माचरण करायचें म्हणजे शिष्य (शीख) बनले पाहिजे ही ह्या धर्माची शिकवणूक

(५) पंथ उपपंथ असूनही ह्या धर्मांतील अनुयायांची संघटना अत्यंत दृढ आहे.

१४ शीखधर्माच्या दुर्बलतेचीं कारणें:—

(१) परमेश्वराविषयीं ह्या धर्मांतील बऱ्याच गूढ कल्पना.

(२) ह्या धर्मांतील जप व चित्ताची तळमळ या गोष्टी.

(३) जग हें निःसार आहे ही कल्पना.

(४) ईश्वरावर अगदीं सर्वस्वीं भार टाकणें, व त्याच्या इच्छेला मान वाकविणें.

(५) ह्या धर्माच्या ग्रंथांत अनेक भाषांची खिचडी झाली आहे. त्यामुळें त्याचें साकल्यानें आकलन होणें जवळ जवळ अशक्य होऊन बसलें आहे.

(६) ह्यांतील ग्रंथसाहेबाची पूजा मूर्तिपूजेचाच एक प्रकार म्हणायचा.

(७) हल्लींच्या शिखांची साधारपणें आढळून येणारी संकुचित मनोवृत्ति.

प्रकरण सहावें

—*×○×*—

कान्फ्यूशियन धर्म

सामाजिक शिष्टाचाराचा धर्म

१ प्रास्ताविक:—विद्यमान धर्मांत या धर्माचें स्थान-

कान्फ्यूशियन हा जगांतील विद्यमान स्वतंत्र राष्ट्रांपैकीं एका अत्यंत जुन्या राष्ट्राचा धर्म आहे. कित्येक विद्वानांचें असें ह्मणणें आहे कीं, ह्याला धर्म हा शब्दच लावता येणार नाहीं; कारण ह्याच्या मूळ संस्थापकानें सगुण परमेश्वराचा निषेध केला आहे; त्याच-प्रमाणें प्रार्थनेची पद्धति व परमेश्वराची सेवपूजा ह्या गोष्टीही त्याला मान्य नव्हत्या; तेव्हां ह्याला धर्म मानण्याचे ऐवजी एखादा नीतिपंथ म्हणावें.

पण, हें ह्मणणें बरोबर नाहीं असें वाटतें; कारण ह्या धर्माच्या संस्थापकानें सगुण परमेश्वर मानला नसला, तरी परमेश्वराचें अस्तित्व त्याला मान्य आहे इतकेंच नव्हे तर, परमेश्वर जगन्नियंता आहे हें-ही तो कबूल करतो. फार काय, अगदीं अलिकडे इ.स. १९१५ पर्यंत ह्या धर्मांत परमेश्वराची पूजा सरकारी रीत्या करण्यांत येत असे. पुढें मात्र चीन प्रजासत्ताक सरकारनें ही वहिवाट बंद केली. चीनच्या राजेसाहेबांचें दर्शन जसें चीनमधील सामान्य जनांना घडणें कठीण, तसेंच परमेश्वराचे बाबतींतही झालें आहे. कारण, हा धर्म मुळीं लोकांना परमेश्वराजवळ जाऊच देत नाहीं. तरीपण परमेश्वराची नसली तरी इतर अनेक वस्तूंची उपासना कराव-

याला ह्या धर्मानें वाट मोकळी ठेवलीच आहे. तेव्हां एका दृष्टीनें धर्माचें कार्य ह्यानें केलें असल्यानें ह्याला धर्म ह्मणण्यास हरकत नाहीं. त्या धर्मानें आपलें काम चोख बजाविलें कीं नाहीं हा प्रश्न वेगळा.

चीनच्या आजपर्यंतच्या चिवटपणाचें रहस्य जर कशांत असेल, तर तें त्याच्या धर्मशक्तींत. एवढी जग्‌द्व्याळ लोकसंख्या एकाद्या निराळ्या ध्येयानें प्रेरित झाली असती तर तिच्यांतून अशी युद्ध शक्ति निर्माण झाली असती कीं, त्याला जगांत तोड नाहीं. पण चीन देशांतील धर्मानें क्षात्रियवर्गाला अत्युच्च स्थान कधींच दिलें नाहीं, बाकीच्या जगापासून अलग राहणें हेंही चीनच्या सुदीर्घ जीवनाचें कारण नाहीं; कारण चीन अलग असें कधींच राहिलें नाहीं. अनेक वेळीं त्या बिचाऱ्याला परकीयसत्तेखालीं मान वांकवावी लागली आहे. आणि जेव्हां जेव्हां चीननें अलग राहण्याची वृत्ति दर्शविली, तेव्हां तेव्हां त्याचा विकास होण्याऐवजीं तें निष्कृष्टदशेलाच पोंचलें. बरें विशिष्ट राज्यपद्धति हें चीनच्या दीर्घायुष्याचें कारण ह्मणावें, तर तेंहीं नाहीं; कारण चीनमध्यें ही राज्यपद्धति प्रबळ अशी केव्हांच नव्हती. शेतें, अरण्यें व खनिजपदार्थ यांची प्रचंड संपत्ति चीनपाशीं आहे. पण त्याचा योग्य उपयोग चीननें केव्हांहीं करून घेतला नाहीं. सन १९०५ पर्यंत चीनमध्यें सरकारांत अधिकाराच्या जागा देण्याची एक अपूर्व पद्धति चालू होती. ह्या जागांकरिता आलेल्या उमेदवारांची कान्‌फ्यूशियन धर्मग्रंथ या विषयांत परीक्षा घेतली जात असे, व त्यावरून त्यांची लायकी ठरविण्यात येई. तथापि, या धर्मग्रंथाचे

मार्मिक अध्ययन न होता निव्वळ पोपटपंची पठण होत असे, आणि सार्वत्रिक शिक्षणाची पद्धति चीनमध्यें केव्हांच नव्हती.

धार्मिक विधि ह्मणून मातापित्यांची आज्ञा पाळणें हा प्रकार चीननें जितका मोठ्या प्रमाणावर यशस्वी करून दाखविला आहे, तितका जगाच्या इतिहासांत कोणत्याही राष्ट्रानें आजपर्यंत करून दाखविला नाहीं. अशारीतीनें पित्राज्ञापालनाचा धर्मविधि मोसेनेंही आपल्या पुस्तकांत सांगितला आहे.

> " तूं आपल्या मनांत आईबापाविषयीं पूज्यबुद्धि बाळग, ह्मणजे प्रभूनें ज्या भूमींत तुला जन्माला घातलें त्या ठिकाणीं तूं दीर्घायुषी होऊन नांदशील. (Exodus 20:12)

तुलनात्मक दृष्टीनें असेंही ह्मणता येईल कीं, चीनधर्माप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही धर्मांत समाजांतील व्यक्तिगत व एकमेकां-विषयींच्या कर्तव्यावर प्रत्यक्ष भर दिलेला नाहीं.

कान्फ्यूशियन धर्माच्या " इतिहासग्रंथा " प्रमाणें पाहतां चीनचा इतिहास ख्रि. सनापूर्वी २३५६ वर्षांइतका प्राचीन आहे. इतक्या पुराणकालींही सामाजिक धर्म, समाजहित; सामान्य जनांचा राज्यकारभारांत प्रवेश या गोष्टी धर्मश्रद्धा व ईश्वरपूजन या बरोबरच प्रचलित असलेल्या दिसतात.

चीनमधील राजधर्म सुमारें १८०० वर्षेपर्यंत अबाधित चालू होता, तरीपण ख्रिस्तपूर्व ५०० वर्षेपर्यंत त्याला धर्माचें व्यवस्थित-स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. इ. स. पूर्वी ५००च्या सुमारास तो धर्म अगदीं निकृष्टदशेला पोंचला असता एका महान् व्यक्तीनें त्या धर्माला सुस्थितीला आणलें. यानंतर या धर्माला वरील महान् व्यक्तीचें नांव पडलें, तें आजही चालू आहे.

याला ह्या धर्मानें वाट मोकळी ठेवलीच आहे. तेव्हां एका दृष्टीनें धर्माचें कार्य ह्यानें केलें असल्यानें ह्याला धर्म ह्मणण्यास हरकत नाहीं. त्या धर्मानें आपलें काम चोख बजाविलें कीं नाहीं हा प्रश्न वेगळा.

चीनच्या आजपर्यंतच्या चिवटपणाचें रहस्य जर कशांत असेल, तर तें त्याच्या धर्मशक्तींत. एवढी जगड्व्याळ लोकसंख्या एकाद्या निराळ्या ध्येयानें प्रेरित झाली असती तर तिच्यांतून अशी युद्ध शक्ति निर्माण झाली असती कीं, त्याला जगांत तोड नाहीं. पण चीन देशांतील धर्मानें क्षात्रियवर्गाला अत्युच्च स्थान कधींच दिलें नाहीं, बाकीच्या जगापासून अलग राहणें हेंही चीनच्या सुदीर्घ जीवनाचें कारण नाहीं; कारण चीन अलग असें कधींच राहिलें नाहीं. अनेक वेळीं त्या बिचाऱ्याला परकीयसत्तेखालीं मान वांकवावी लागली आहे. आणि जेव्हां जेव्हां चीननें अलग राहण्याची वृत्ति दर्शविली, तेव्हां तेव्हां त्याचा विकास होण्याऐवजीं तें निष्कृष्टदशेलाच पोंचलें. बरें विशिष्ट राज्यपद्धति हें चीनच्या दीर्घायुष्याचें कारण ह्मणावें, तर तेंही नाहीं; कारण चीनमध्यें ही राज्यपद्धति प्रबळ अशी केव्हांच नव्हती. शेतें, अरण्यें व खनिजपदार्थ यांची प्रचंड संपत्ति चीनपाशीं आहे. पण त्याचा योग्य उपयोग चीननें केव्हांहीं करून घेतला नाहीं. सन १९०५ पर्यंत चीनमध्यें सरकारांत अधिकाराच्या जागा देण्याची एक अपूर्व पद्धति चालू होती. ह्या जागांकरिता आलेल्या उमेदवारांची कान्फ्यूशियन धर्मग्रंथ या विषयांत परीक्षा घेतली जात असे, व त्यावरून त्यांची लायकी ठरविण्यात येई. तथापि, या धर्मग्रंथाचें

मार्मिक अध्ययन न होता निव्वळ पोपटपंची पठण होत असे, आणि सार्वत्रिक शिक्षणाची पद्धति चीनमध्यें केव्हांच नव्हती.

धार्मिक विधि ह्मणून मातापित्यांची आज्ञा पाळणें हा प्रकार चीननें जितका मोठ्या प्रमाणावर बराच्री करून दाखविला आहे, तितका जगाच्या इतिहासांत कोणत्याही राष्ट्रानें आजपर्यंत करून दाखविला नाहीं. अशारीतीनें पित्राज्ञापालनाचा धर्मविधि मोसेनेंही आपल्या पुस्तकांत सांगितला आहे.

> " तूं आपल्या मनांत आईबापाविषयीं पूज्यबुद्धि बाळग, ह्मणजे प्रभूनें ज्या भूमींत तुला जन्माला घातलें त्या ठिकाणीं तूं दीर्घायुषी होऊन नांदशील. (Exodus 20:12)

तुलनात्मक दृष्टीनें असेंही ह्मणता येईल कीं, चीनधर्माप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही धर्मांत समाजांतील व्यक्तिगत व एकमेकां-विषयींच्या कर्तव्यावर प्रत्यक्ष भर दिलेला नाहीं.

कान्फ्यूशियन धर्माच्या " इतिहासग्रंथा " प्रमाणें पाहतां चीनचा इतिहास खि. सनापूर्वी २३५६ वर्षांइतका प्राचीन आहे. इतक्या पुराणकालींही सामाजिक धर्म, समाजहित; सामान्य जनांचा राज्यकारभारांत प्रवेश या गोष्टी धर्मश्रद्धा व ईश्वरपूजन या बरोबरच प्रचलित असलेल्या दिसतात.

चीनमधील राजधर्म सुमारें १८०० वर्षेपर्यंत अबाधित चालू होता, तरीपण खिस्तपूर्व ५०० वर्षेपर्यंत त्याला धर्माचें व्यवस्थित-स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. इ. स. पूर्वी ५००च्या सुमारास तो धर्म अगदीं निकृष्टदशेला पोंचला असता एका महान् व्यक्तीनें त्या धर्माला सुस्थितीला आणलें. यानंतर या धर्माला वरील महान् व्यक्तीचें नांव पडलें, तें आजही चालू आहे.

" पुनरपि जगाची अवनति झाली. धर्मतत्वांचा ऱ्हास झाला. विपरीत भाषण व जुलमी कृत्यें यांचा सुळसुळाट झाला. प्रधानांनीं राजांचा वध करणें, व पित्याचा घात पुत्रानें करणें ह्या गोष्टी अनेक ठिकाणीं घडल्या. ही स्थिति पाहून कानूफ्यूशियसचें चित्त व्याकुळ झालें व त्यानें सुधारणेचा चंग बांधला (मेन्शियस ३:२:९,७–८).

२ धर्मसंस्थापक कानूफ्यूशियसचें जीवनचरित्र

(५५१ ते ४७९ ख्रिस्तपूर्व)

ह्या धर्माच्या "धर्मवचनसंग्रह" (Analects) या ग्रंथांत या संस्थापकाची जितकी विपुल माहिती सापडते तितकी कोणत्याही धर्मग्रंथांत त्या त्या धर्माच्या संस्थापकाविषयीं मिळत नाहीं.

(१) एक नम्र युवक (वय १–२१)

शांटंग प्रांतांत कानफ्यूशियसचा जन्म व मृत्यु झाला. तेव्हां-पासून चिनी लोक ह्या प्रांताला पवित्रभूमि मानतात. आपल्या अकरा भावंडांत कानूफ्यूशियस हा सर्वांत धाकटा असून एक-टाच काय तो धट्टाकट्टा होता. तो तीन वर्षांचा असतांनाच त्याचा बाप वारला. त्यामुळें लहानपणापासूनच कुटुंबपोषणाचा भार त्याचे अंगावर पडून त्याला काबाडकष्ट करावे लागले.

"पंधराव्यावर्षीं मला शिकावेंसे वाटलें" (वचन० २:४.१)

वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं त्याचें लग्न झालें. कानूफ्यूशियन धर्मग्रंथांत त्याच्या बायकोविषयीं कुठेंही उल्लेख सांपडत नाहीं. नाहीं म्हणायला त्यानें " तुझ्या आईच्या मरणाविषयीं तूं शोक करणें योग्य नव्हें " असा आपल्या मुलाला उपदेश केल्याचा

उल्लेख आढळतो (से. बु. ई. २७:१२२, ११:२:२७:१३१, ११२) आपल्या एकुलत्या एक मुलाला कान्फ्यूशियस कठोरपणानें वागवीत असे. आपल्या धन्याविषयीं त्याची निष्ठा आदर्शभूत होती.

(२) (यशस्वी उपदेशक—(वय २१ ते ५१)

प्रथम त्यानें एक खानगी शाळा काढली, या शाळेची प्रगति होतां होतां अखेरीस तींत तीन हजार विद्यार्थी शिकू लागले. मनापासून अध्ययन करायला आलेल्या कोणत्याही गरीब विद्यार्थ्याला त्यानें विमुख दवडले नाहीं, इतका त्याचा उदार स्वभाव होता. (पण विद्यार्थी मेहनती पाहिजे एवढीच त्याची अट होती). त्याला मेहनत करणारा विद्यार्थी मनापासून आवडे.

त्याच्या पाठशाळेंतून इतिहास, काव्य, साहित्य, राजनीति, भौतिक-शास्त्रें, संगीत इत्यादि नानाविध विषयांचे अध्ययन-अध्यापन चाले. (७:१७, २४, ११;८:८-१०-३;१६:१२;१-३; १७:९-१-७) पण चमत्काराचे प्रयोग, अद्भुत शक्तीचे प्रयोग, दंगल व अतिमानुषविद्या, या विषयांना मात्र त्याच्या पाठशाळेंत मज्जाव होता. जे विद्यार्थी सद्गुणी असून वक्तृत्वकलेंत तसेंच राज्यतंत्र व साहित्य या विषयांत पारंगत असत त्यांच्याविषयीं त्याला मोठा अभिमान वाटे (११:२,२)

(३) यशस्वी अधिकारी (वय ५१–५५)

अशा ह्या कीर्तिमान पंडिताची तो राहात असलेल्या गांवीं मुख्य फौजदाराच्या जागीं नेमणूक झाली होती, ह्या जागेवरून चढतां चढतां तो प्रथम दुय्यम कार्याध्यक्ष व शेवटीं राज्यांतील सरन्यायाधीश झाला. अंतर्गत राज्यकारभारांत व आंतरराष्ट्रीय

कामकाजांत त्यानें चांगल्या तऱ्हेचें यश मिळविलें. त्याचे अम लाखालीं राजसत्ता दृढमूल झाली, चोहोंकडे शांतता नांदू लागली, कामाची घडी नीट बसली, व त्यामुळें युद्ध साधनें हळुहळु कमी करण्याइतकी सुस्थिति प्राप्त झाली. राज्यांतील मुख्य बाब वसूल ही नसून प्रत्येकानें आपापलें कर्तव्य योग्यरीतीनें बजावणें ही मुख्य बाब आहे, असें त्याचें ह्मणणें होतें. (१२:११-१-३)

त्याचेविषयींचा शेजारच्या राज्याचा मत्सर व गुप्त कारस्थानें यामुळें शेवटीं त्याला आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. (मेन्सियस् ६:२-६-६)

(४) धर्मोपदेशार्थ संचार (वयाच्या ५५ ते ६८ वर्षांपर्यंत)

राज्यकारभार व समाजकार्य या बाबतींत सुधारणा करण्याच्या आपल्या सामर्थ्याविषयीं त्याचा अढळ विश्वास असल्यानें, त्यानें राजीनामा दिल्यानंतर दुसऱ्या एका राज्यांत हुद्याची जागा पत्करली. पण त्याचे वांट्यास फारसें यश आलें नाहीं. तथापि, सुराज्याच्या योगानें इष्ट सुधारणा घडवून, आणता येतात इत-केंच नव्हे, तर मनुष्यस्वभावांतही सुधारणा करता येते याविष-यींची त्याची श्रद्धा मात्र शेवटपर्यंत कायम राहिली. (१३:११) चीन देशांतील अनेक संस्थानांत समाजसुधारणा करण्याबद्दलचा विश्वास व उत्साह त्यानें आपल्या निराश झालेल्या विद्यार्थ्यांच्या मनांत उत्पन्न केला. (११:२५;३:५) एकेवेळीं त्याच्या हाताखालचा एक अधिकारी त्याला सहज भेटला असतां, "मला समाजसुधारक म्हणून परमेश्वरानें येथें धाडिलें आहे" असें त्यानें त्या अधिकाऱ्याला सांगितलें. "माझ्यांत प्रत्यक्ष परमेश्व-रानें अलौकिक गुण उत्पन्न केले आहेत" हा त्याचा विश्वास

त्याच्यावर प्राणसंकट आलें असतांही कमी झाला नाहीं. एकदा तर कांग शहरांत त्याच्या भोंवती लोकांनीं गराडा घालून त्याला ठार करण्याचा घाट घातला, तरीसुद्धां "ईश्वर माझ्या सख्त्यांत माझा पाठीराखा आहे" हा त्याचा विश्वास रेंसमात्र ढळला नाहीं. (९:५;१-३) पुन्हा एकवार त्याच्या प्राणावर संकट आलें तरीसुद्धां तसल्या असहाय स्थितींतही तो आपल्या सात्विक आनंदांत मस्त राहिला. त्यानें एकही दीन उद्गार काढला नाहीं. (७:१५) आपल्या भग्नहृदय अनुयायांसह अशा रीतीनें हालअपेष्टा भोगीत असतांही तो सन्मार्गापासून च्युत झाला नाहीं. (१५:१;२-३) अशा स्थितींतही ह्या कार्याचा व्याप आवरून स्वस्थ बसावें असे मनांत न आणतां दु:खग्रस्त जगाला साहाय्य करण्याचा त्यानें दृढसंकल्प केला. कधीं कधीं त्याचा एकनिष्ठ शिष्य त्याला आपल्या कार्यापासून च्युत करण्याचा व निराश करण्याचा प्रयत्न करी; तरीपण तो आपल्या गुरुला (कान्फ्यूशियसला) कधींही सोडून गेला नाहीं.

(५) शेवटची वाङ्मयकृति (वयाच्या ६८–७२ वर्षांपर्यंत) या सुमारास त्यानें ग्रंथरचना केली. हल्लीं "कान्फ्यूशियन आदर्शसाहित्य" म्हणून हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. ह्या ग्रंथांत "वसंत व वर्षा" ह्या नांवाचें एक प्रकरण आहे. त्यांत 'लु' नांवाच्या राज्याची हकीकत आली आहे. ह्या प्रकरणाचा समाजसुधारणेच्या बाबतींत अपूर्व प्रभाव पडला.

बंडखोर प्रधान व दुष्ट हृदयाचे मुलगे ह्यांची हें पुस्तक वाचून भीतीनें गाळण उडाली. (मेन्शियस ३:२;९:११)

बाह्यतः अयशस्वी व निराश झालेल्या ह्या वृद्ध गृहस्थानें मरतेसमयीं स्वतःशीं पुढील करुणोद्गार काढले आहेतः— "महापर्वतालाही एके दिवशीं कोसळावेंच लागणार. मजबूत तुळई सुद्धां केव्हांतरीं मोडणारच. शहाणे लोकही जीर्ण वनस्पतीप्रमाणें जीर्ण होऊन जातात. ह्या चीन साम्राज्यांत असा एकही इसम आज राहिला नाहीं कीं, जो मला स्वतःचा गुरु करील. माझा मृत्युसमय जवळ येऊन ठेपला आहे" (लेगेकृत कानूफ्यूशियसचें जीवन व उपदेश ८७-८८; डग्लसकृत कानफ्यूशियन व टाओ धर्म ६२; सूथिलकृत "धर्मसंग्रह" ५६)

त्याच्या शिष्यांनीं त्याच्या करता तीन वर्षें पर्यंत शोक केला, त्याच्या पैकीं एक शिष्य त्याच्या थडग्याजवळ सहावर्षें राहिला होता. (मेन्सियस ३:१ ४:१३)

२) कॉनफ्यूशियसविषयीं पूज्यभावः—

त्याच्याविषयींची पूज्यबुद्धि अत्यंत विलक्षण रीतीनें वाढत गेली.

(१) त्याचें स्वतःविषयींचें नम्र मत (त्याची निरभिमानता)

'मी एक मात्र निरोप्या आहे. मी स्वतः कांहींच शोधून काढलें नाहीं' असें तो ह्मणत असे. (७:१) 'मी आमरण मेहनत घेणारा एक शिष्य आहे व गुरुही आहे.' 'माझ्यांत कांहीं खास नैतिक अवगुण आहेत' अशी तो सरळ कबुली देत असे. (७:३) "मला आणखी पन्नास वर्षें प्रयत्न करायला मिळालीं, तर मी माझे अवगुण दूर करीन अशी मला आशा आहे." असें तो नेहमी ह्मणे (७:१६)

गुरु ह्मणाले "विद्वत्तेच्या बाबतींत कदाचित् मी इतरांच्या तोंडीचा असेन.

पण ' बोले तैसा चाले ' अशा महात्म्यांच्या कोटीला मी अजून पोंचलों नाहीं. " (७:३२)

" महात्मा होण्याला अजून चार गोष्टींची उणीव आहे" असें तो प्रांजळपणें कबूल करी. (Doctnrie of the mean १३:४ शिवाय लीकी २८ १-३३- से.बु. ई २८:२०५-२०६) माझ्यांत अजून चार कर्तव्यें पालन करण्याची ताकद नाहीं असें तो सरळ सांगे. " दारु पिण्यांत मला अगदीं सुमार राहत नाहीं " हा वरील चारांतला एक अवगुण (९:१५) तथापि त्याचे शिष्य सांगत कीं—

" तो दारू मात्र अतिरिक्त पीत असे. तरीपण त्या पिण्यामुळें तो आपल्याला निशा कधीं येऊं देत नसे " (१०:८:४)

(२) त्याच्या अगदीं जवळच्या शिष्यांचें त्याच्याविषयीं मत:—
" आमचे गुरुजी चार गोष्टीपासून अगदीं अलिप्त होते. ते कोणत्याही गोष्टीविषयीं अगाऊ निर्णय देऊन टाकीत नसत. (२) मनाला वाटेल तसा पूर्वग्रह कोणत्याही गोष्टी विषयीं ते बाळगीत नसत. (३) त्यांचा स्वभाव हटवादी नव्हता. (४) त्याच्यांत अहंकार मुळींच नव्हता (९:४).

तो आपला उद्योग निर्भयपणानें सतत चालू ठेवी. अर्थात् त्याला तत्काळ यश मिळत नसे ही गोष्ट निराळी (१४:

४१). सामान्य जनांपेक्षां तो कितीतरी उच्च होता. फार काय त्याची खरी योग्यता जाणणें हेंहीं सामान्य मनुष्याच्या आवाक्याबाहेरचें होतें. त्याच्याशीं कोणाची तुलना करणें शक्यच नव्हतें; कारण त्याची खरी योग्यता कुणालाच कळली नव्हती. (१९:२३-२५)

" ज्याप्रमाणें आकाशाला शिड्या लावून पोंचणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें आमच्या सद्गुरूंची योग्यता मापता येणें शक्य नाहीं " (१९:२५:३)

(३) कान्फ्यूशियन धर्मग्रंथांत

त्याच्याविषयीं आढळणारें मत:—

"त्यांच्याशी कुणाचीच तुलना करता येत नाहीं. अखिल विश्वांत तो श्रेष्ठ पुरुष होता "

"म्हणूनच त्याची कीर्ति 'मध्यराज्या'पर्यंत पसरली आहे. रानटी लोकांच्या राज्यापर्यंत त्यांची कीर्ति गेली आहे; जेथें जेथें जहाजें जाऊ शकतात; जेथें गाड्यांची गति आहे; ज्या ज्या प्रदेशावर आकाशाचें छत आहे; ज्या ज्या ठिकाणीं पृथ्वी प्राणिमात्रांचें धारण करते; ज्याज्या ठिकाणीं चंद्रसूर्य प्रकाशतात; जेथें जेथें बर्फ व दंव पडतें; त्या त्या ठिकाणचे सर्व लोक—सर्व श्वासोच्छ्वास करणारे प्राणी त्याचें अकृत्रिमपणें कौतुक करतात; त्याच्यावर प्रेम करतात व त्याला मान देतात " (मध्य-'मार्गीयमत' (३०:२;३१:३ शिवाय लोकी २८:२ ५३-५६;से. बु. ई. २८:३२६–३२७)

जगाच्या इतिहासांत तो एक अद्वितीय पुरुष होता.

हे! जगाच्या उत्पत्तिपासून आतांपर्यंत कान्फ्युशियसच्या तोडीचा दुसरा पुरुषच झाला नाहीं. (मेन्सियस २:१;२:२३ या सारखें उद्गार २:१:२:२७ २८) तो औचित्याचा मूर्तिमंत आदर्श होता. त्याच्यांत सर्व बाजूंनीं 'संवादिता' होती. त्याच्यांत ज्ञान व बल यांचा यथायोग्य संयोग झाला होता. (मेन्सियस ५:२-१:४-७)

त्याच्याविषयीं राजेलोकांचा पूज्यभाव उत्तरोत्तर वाढतच गेलेला दिसतो.

खि. पू. १९५ त चीनच्या बादशहानें त्याच्या थडग्यापुढें पशूंचा बलि दिला.

इ. स. १ त्याला "डयूक्नी"—' संपूर्ण प्रख्यात ' ही बादशाही पदवी देण्यांत आली.

" ५७ राजधानींतील व प्रांतांतील महाविद्यालयांत त्याच्या नांवानें रीतसर यज्ञ करण्यांत यावा असें बादशाही फर्मान निघालें.

स. ८९ त्याला ' अमीर ' ही बादशाही पदवी बहाल करण्यांत आली.

सन २६७ वर्षांतून चारवेळां त्याचेकरता विधिपूर्वक यज्ञ करावे असें बादशहाचें आज्ञापत्र निघालें.

सन ४९२ " पूज्य, व सिद्ध महात्मा " ह्मणून त्याची पूजा होऊं लागली.

सन ४९२ वर्षांतून चारवेळां त्याचेकरतां विधि पूर्वक यज्ञ करावे असें बादशहाचें आज्ञापत्र निघालें.

सन ५५५ चीनमधील प्रत्येक प्रांताचे राजधानींत त्याच्या पूजेकरतां मंदिरें बांधावीं असा बादशहानें हुकूम सोडला.

सन ७४० राजधानींतील महाविद्यालयांत मुख्य स्थानीं त्याचा पुतळा इतिहासप्रसिद्ध चीनराजांच्या पुतळ्यांच्या शेजारीं ठेवला. पूर्वीं हा पुतळा एका बाजूस होता.

सन १०६८-८६ कॉन्फ्यूशियसला 'सम्राट्' ही पदवी अर्पण करण्यांत आली.

सन १९०६ दिसेंबर ३१. स्वर्ग व पृथ्वी यावरील देवतांच्या बरोबरीनें त्याची योग्यता आहे असें एका राजशासनाच्याद्वारें ठरविण्यांत आलें. (सदरील "धर्मवेचें ६०; मूर ' धर्मेतिहास १-२२).

सन १९१४ चीन प्रजासत्ताकराज्याच्या 'युवन् शी काई' या पहिल्या अध्यक्षानें कान्फ्यूशियसची पूजा चालू ठेविली.

(५) प्रत्यक्ष मंदिरांत होणारी कॉन्फ्यूशियसची पूजा.

निदान जवळजवळ १२०० वर्षें, वर्षांतून दोनदा चीनची मुख्य राजधानी पेकींग या शहरीं कान्फ्यूशियसची पूजा करीत आले आहेत. यावेळीं स्तोत्र-पाठ, मंत्र-तंत्र व यज्ञ करण्यांत येत असे. (डग्लस कॉन्फ्युशियन व टाओधर्म पा. १६३-१६४.)

चीनमधील प्रत्येक प्रसिद्ध शहरीं, आणि छोट्या छोट्या गांवीं मिळून १५६० मंदिरात स्थानिक अधिकारी वर्षांतून दोन वेळ लांबलचक मंत्रतंत्रांनीं कॉन्फ्यूशियसची पूजा करतात. आणि दर महिन्याला दोनदा आटपशीर विधि-विधानांनीं युक्त अशी पूजा करतात. या पूजाप्रसंगीं दरवर्षीं मंदिरांतील वेदीवर ६२६०६ प्राण्यांना बळी देतात. (डग्लसकृत कान्फ्यूशियस व टाओ धर्म १६५; वेल्सविल्यम्सकृत 'मध्यराज्य' भा. २:२०२)

अलीकडे कांहींवर्षें मात्र कॉनफ्यूशियसच्या मंदिरांची फार आबाळ होत आहे.

(६) कानफ्यूशियसच्या पूजेंतील महत्वाचें तत्त्व व त्याचा ऐतिहासिकदृष्ट्या परिणामः—

कान्फ्यूशियस या नम्र समाजसुधारकाचा मुख्य उद्देश योग्य सामाजिक कर्तव्यें करण्यास लोकांना प्रवृत्त करणें हा होता. त्यानें प्रार्थनेचा स्पष्ट निषेध केला आहे. (३:१३;७:३४) 'अतिमानुष प्रकारांशी अथवा अतिमानुष देवतांशीं संबंध ठेऊं नका' असें त्यानें स्पष्ट सांगितलें आहे. आज आपली होत असलेली पूजा व त्याकरितां होणारा प्राणिवध त्यानें पाहिला असता, तर त्याचे हृदयाला धक्काच बसला असता. तरीपण त्याचा स्पष्ट सिद्धांत असा होता कीं, लोककल्याणार्थ केलेली व्यापक-सेवा हें एक लोकोत्तरपणाचें अथवा सद्गुणाचें चिन्ह समजावें. (६:२८) किंबहुना जनसेवा हा एक दैवीगुण आहे, (जाइल्स " कान्फ्यू-शियसची वचनें " ६०) आज चार हजार वर्षें चीनचें स्वराज्य अबाधित चालू आहे. कोणत्याही देशाच्या वांट्याला इतका दीर्घ इतिहासकाल आजपर्यंत आलेला

नाहीं, इतक्या वर्षांच्या अवधींत चीनमध्यें शूनृंगच्या या महात्म्यासारखा दुसरा एकही असा पुरुष झाला नाहीं कीं, ज्याच्याविषयीं लोकांचा इतका निरतिशय आदरभाव होता. ह्या आदरभावाचा परिणाम असा झाला आहे कीं, चिनी लोकांच्या स्वभावावर या महापुरुषाच्या व्यक्तित्वाची छाप पडलेली स्पष्ट दिसून येते. एका व्यक्तीचा इतका विलक्षण प्रभाव जनमनावर झालेला दुसऱ्या कोणत्याही देशांत आढळून येत नाहीं.

(४) धर्मग्रंथः—(आदर्शसाहित्य क्लासिक्स व इतर धर्म ग्रंथ)

कोणत्यातरी महान् व्यक्तीकडून स्थापलेले असे आज नऊ धर्म विद्यमान आहेत. या सर्वांत स्वतः संस्थापकच एक धर्मग्रंथकार असणें ही अपूर्व गोष्ट प्रस्तुत धर्मांत आढळते. ह्या धर्मग्रंथाप्रमाणें थोडीशी स्थिती अवेस्ता या पारशी धर्मग्रंथाची आहे; कारण त्या ग्रंथांतला कांहींसा भाग पारसी धर्माचा संस्थापक झोरास्टर यानें लिहिला आहे. तसेंच लाओट्झ यानें टाहोटेहकिंग हें छोटेंसें प्रकरण लिहिलें आहे.

कॉन्फ्यूशियसनें आपल्या देशांतील परंपरागत धर्मांत एखाद्या नव्या सिद्धांताची अथवा आचाराची अथवा धर्मानुभवाची भर टाकली असें मुळींच नाहीं. तथापि, कान्फ्यूशियन धर्माला एक अत्यंत प्रमाणभूत धर्मग्रंथाची त्यानें स्वतः जोड करून दिली, ही त्यानें त्या धर्माची मोठीच कामगिरी केली. त्यानें स्वतः धर्म-

ग्रंथ रचला नसता तर पुढील २५०० वर्षें तो धर्म जवळ जवळ अविकृत स्वरूपांत चालू राहणें अवश्य प्राय होतें.

चीनच्या धार्मिक इतिहासांत अशा रीतीनें एका धार्मिक साहित्याची भर जरी कॉन्फ्यूशियसनें टाकली असली तरी ग्रंथकार व विचारक या दृष्टीनें त्याच्यांत प्रतिभा हा गुण मुळींच दिसून येत नाहीं. वरील धर्मग्रथावलींतील पहिल्या भागांत (पहिल्या पांच किंवा सहा कॉन्फ्यूशियसच्या नांवावर मोडणाऱ्या ' आदर्श ग्रंथांत ') त्याचें स्वतःचें असें फारसें कांहीं नाहीं. मात्र त्यानें दुसऱ्याच्या वचनांची एक कंथा तयार केली आहे. नाहीं म्हणायला या आदर्शग्रंथांतील एक प्रकरण खुद्द त्याच्याकडून लिहिलें आहे. ह्या प्रकरणाचें नांव ' च्यूनचिऊ ' उर्फ ' वसंत आणि शरद्. ' ह्यांत त्याच्या लू ह्या संस्थानाची अत्यंत नीरस अशी हकीकत आलेली आहे.

धर्मग्रंथाच्या दुसऱ्या खंडांत " सुरशु " ह्या नांवाचीं चार प्रकरणें आहेत. हीं चार प्रकरणें त्याच्या अनुयायांपैकीं अथवा त्याच्या समकालीन अथवा उत्तर-कालीन शिष्यांपैकीं कोणीतरी लिहिलीं आहेत. त्यांत त्याच्या स्वतःसंबंधीं आणि त्याच्या मतासंबंधीं माहिती आली आहे.

(१) प्रथमखंडः—ह्यांत पांचसहा आदर्श धर्म-ग्रंथ येतातः—

(१) इतिहासग्रंथ—शुकिंग—चीनच्या इतिहासाचें सिंहावलोकन.

(२) काव्यग्रंथ—शीकिंग—धार्मिक व व्यावहारिक काव्यसंग्रह.

(३) भविष्यग्रंथ—इ--किंग—ह्यांत फलज्योतिषासंबंधीं माहिती आली आहे.

(४) विधिग्रंथः—लिकिंग ह्यांत धर्मविधींचा माहिती आहे.

(५) वसंत आणि शरद् (च्युनच्यिऊ)—स्थानिक इतिहासाचें पुस्तक. ह्यांत " पित्राज्ञापालन " नांवाचा ग्रंथही कोणी घालतात. ह्या ग्रंथाला सायोकिंग हें चिनी नांव आहे. ह्यांत पित्राज्ञापालनाचें महत्व वर्णिले आहे.

(२) द्वितीयखंडः—ह्यांत खालील चार प्रकरणें आलीं आहेतः—

(१) श्रेष्ठ विद्याः—टॉसिओ—सद्गुणावर व्याख्यान

(२) मध्यममार्ग—च्युंग यंग—युक्ताहारविहाराचें प्रतिपादन.

(३) उक्ति—संग्रह—लुन्यू—कॉनफ्यूशियसच्या वचनांचा संग्रह.

(४) मेन्सियस—मेंगझे—ह्यांत कॉन्फ्यूशियसच्या वचनावर विस्तृत भाष्य केलें आहे.

वरील ग्रंथ अपौरुषेय आहेत अथवा त्यांस सर्वोपरि दैवी प्रामाण्य आहे असें मत अजून काढण्यांत आलेलें नाहीं. तरीपण या ग्रंथांनीं चिनी लोकांपुढें मानवी स्वभावाचा एक अत्युच्च आदर्श ठेवून, तो आजपर्यंत कायम ठेवण्याचें कार्य उत्कृष्ट रीतीनें बजाविलें आहे यांत शंका नाहीं.

याशिवाय, कॉनफ्यूशियसनंतर झालेले कांहीं तत्वज्ञानी व नीतिशास्त्रज्ञ यांचे कांहीं ग्रंथही महत्वाचे आहेत. ह्या तत्वज्ञांपैकीं 'मोहटी' (खिस्तपूर्व ५ वे शतक), 'वांगचांग' (इ. सनाचें पहिलें शतक) 'च्यू सी' (११३०–१२००) इत्यादि प्रमुख होत. तरी पण कॉन्फ्यूशियसच्या ग्रंथावर जशा अनेक टीका लिहिल्या आहेत, अथवा त्यांचा जसा अभ्यास सतत चालू आहे, अथवा त्याचे मुखपाठ जसे चालू आहेत, किंवा अधिकारावर नेमण्याकरता त्या ग्रंथाची जशी परीक्षा द्यावी लागते तशी या वरील तत्त्वज्ञांच्या ग्रंथांची स्थिति नाहीं.

(५) कॉन्फ्यूशियसचें नीतिशास्त्र.

सामाजिक शिष्टाचार हें कान्फ्यूशियसचे मुख्य व्यावहारिक तत्व, ह्या तत्वाचें संक्षेपतः प्रतिपादन स्वतः कान्फ्यूशियसनें पुढीलप्रमाणें केलें आहे:—

"झेकुंग यानें विचारलें, 'अखिल जनांना व्यवहारांत वागण्याकरितां उपयोगी पडेल असा नियम एका शब्दांत सांगतां येईल कां?

सद्गुरूंनीं उत्तर दिलें ‘ परस्पराचार ’ हा तो शब्द म्हणून नाहीं कां सांगतां येणार ? दुसऱ्यांनीं आपल्याशी जी गोष्ट करू नयेसें वाटतें ती आपण त्यांच्याशी करूं नये ’ (न तत्परस्य संदध्यात्) (१५:२३ ह्या नियमाला ‘ सुवर्णनियम ’ म्हणतात. कॉनफ्यूशियसच्या धर्मग्रंथांत ह्या नियमाचा आणखी ५।६ ठिकाणीं उल्लेख आला आहे. ५:४१; १२:२ ‘श्रेष्ठविद्या’ १०:२ मध्यम मार्ग १३:३ व ली की २८:१.२२).

हा पारस्परिकाचार विशेषत: खालील पांच प्रकारच्या नात्यांचे बाबतींत तर अवश्य पाळला पाहिजे.

राजा व प्रजा; पिता व पुत्र; पति व पत्नी; धाकटा भाऊ व थोरला भाऊ; व मित्र. या नात्यांत ह्या पारस्पारिकाचाराचा त्याग कोणाही बुद्धिमंताला अथवा बुद्धिमंदाला एक दिवस सुद्धां करतां येणार नाहीं. हा सरळ आचारमार्ग सोडून तुह्मी जर एखादे उच्च वाटणारें गूढतत्व शोधायच्या अथवा विचित्र आणि अद्भुत क्रियाकांडाचें स्तोम माजविण्याच्या भानगडींत पडाल तर तुमच्यासारखे मूर्ख तुम्हीच. (कांगसी या चीनच्या बादशाहानें काढलेल्या पवित्र फर्मानाचें भाषांतर; लेगेकृत चीनचे धर्म, पा. १०५).

एकंदरीनें आपल्या जवळच्या नातेवाईकांशी वागतांना योग्य आचार प्रत्येकानें पाळणें हेंच कान्फ्यूशियसच्या मतें नीतीचें परमोच्च ध्येय.

'श्रेष्ठ पुरुषा' चा आदर्श व्यक्तिमात्रापुढें ठेवणें व त्यालाच नीतिशास्त्राचें उच्चध्येय मानणें, हें दुसरें कार्य कॉन्‌फ्यूशियसनें केलें. ह्या श्रेष्ठ पुरुषाचें अथवा 'पुरुषोत्तमाचें' वर्णन 'उताऱ्यांचा संग्रह' ह्या ग्रंथांत एकशें पांच वेळ आलें आहे. हें वर्णन करीत असतां त्याचेबरोबर 'अधम पुरुषाचीं' लक्षणेंही दिलीं आहेत; अशा-करतां कीं, दोहोंतील फरक वाचकांना नीट कळावा. ह्या आदर्श पुरुषाचे जोडीला 'आदर्श स्त्रीचें' वर्णन केलेलें मात्र कोठेंच दिसत नाहीं. इतकेंच नव्हे तर, एके ठिकाणीं राजस्त्रीचें गुणवर्णन केलेलें सोडून दिल्यास इतरत्र स्त्रियांच्या गुणांचा उल्लेखच आला नाहीं. एक ठिकाणीं 'उताऱ्यांचा संग्रह' या ग्रंथांत स्त्रीजातीचा उल्लेख आला आहे, पण तो स्त्रियांना निःसंशय अपमानकारक असाच आहे.

पुढील अनेक सद्गुणांचा खास उपदेश वरील ग्रंथांत केला आहे:—औचित्य; कळकळ; निष्ठा; अभ्यासशीलता; न्यायबुद्धि; उदारता; पूज्यभाव; परिमितता; शांति व सत्यप्रियता.

ज्ञान, उदारता व धैर्य, हे तर शाश्वत सद्गुण आहेत (मध्यम-मार्ग २०:८ ली. की. २८:२,९ से. बु. ई. २८:३१३).

पण कांहीं सद्गुणांच्या मर्यादाही सांगितल्या आहेत.

"तुमच्या बरोबरीच्या नसलेल्या लोकांशीं मैत्री करूं नका" (१:८:३ व ९:२४).

"अपकाराची फेड अपकारानेंच करा व दयेचा मोब-दला दयेनेंच करा" (१४:३६:३)

" पितृभक्ति ह्मटली कीं, त्यांत पित्याचे दोष मुलानें काढणें व मुलाचे दोष पित्यानें काढणें, ही गोष्ट येतांच कामा नये "

स्वतःला उच्चवर्णीय मानणाऱ्या, व दीर्घकाळ प्रतिष्ठित झालेल्या सामाजिक व्यवस्थेबद्दल अभिमान बाळगणाऱ्या लोकांचें जशाप्रकारचें नीतिशास्त्र असावें, तसेंच कान्फ्यूशियसचें आहे. आपल्या राज्यांतील प्रजाजनांचें कल्याण करण्याचें कर्तव्य राजेलोकांना या ग्रंथांत जितक्या स्पष्ट रीतीनें व ठासून उपदेशिलें आहे, तितकें जगांतील दुसऱ्या कोणत्याही नीतिग्रंथांत उपदेशिलेलें आढळत नाहीं. कान्फ्यूशियसच्या नीत्युपदेशाचे वेळीं चीनमधील लोक आत्मसंतुष्ट व कूपमंडूकवृत्तीचे होते. अर्थात्च वरील उपदेशांत औद्योगिक—युग, लोकसत्ता, वगैरे आंतरराष्ट्रिय प्रश्नावर उत्तरें सांपडणें शक्यच नाहीं.

(६) देवतांविषयक कल्पना:—

कॉनफ्यूशियन धर्माचे दृष्टीनें नीतिशास्त्र ही महत्वाची गोष्ट असली तरी, या नीतिशास्त्राची उभारणी या धर्मांत धर्माचे पायावरच केलेली दिसून येते. उदाहरणार्थ; ' मनुष्यस्वभावांत जात्याच चांगुलपणा भरलेला आहे, कारण परमेश्वरानें प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत, आपला दैवीअंश ठेवलेला आहे ' ही कल्पना, नीति—अनीतिची उपजत भावना परमेश्वरानें अगदीं अधमांतल्या अधम मनुष्याच्या हृदयांत सुद्धां जन्मतःच निर्माण केली आहे, या भावनेला कौल लावून त्याचप्रमाणें वागलें असतां मनुष्याच्या हातून चूक होणेंच शक्य नाहीं.

(से. बु. ई. ३; ८९—९०).

पुण्यकृत्याकरतांच प्रत्येक मनुष्यप्राण्याचा जन्म आहे.
(३—१६).

परमेश्वरानें घडविलेल्या वृत्तींनाच स्वभाव असें ह्मणतात.
(मध्यममार्ग १:१).

मानवाची जात्याच प्रवृत्ति चांगल्याकडे असते. ह्याचे उलट जात्याच वाईटाकडे प्रवृत्ति असलेला कुणीही आढळत नाहीं.

या जगांत एक परमोच्च शक्ति आहे, या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख या धर्मांतील प्रत्येक ग्रंथांत आढळतो. या शक्तीची तीन नांवें या ग्रंथांत आलेलीं आहेत. (१) शांगटी ह्मणजे जगन्नियंता हें विशेषण: से. बु. ई. मालेंत या विशेषणाचें भाषांतर प्रत्येक ठिकाणीं ' ईश्वर ' असें केलें आहे. ' टायेन ' ह्मणजे स्वर्ग, हा शब्द जगाचा नियंता असलेला जो अव्यक्त नैतिक नियम त्याचें प्रतिपादन करतो. वर दिलेल्या " जगन्नियंता " या सगुण विशेषणाच्या तिप्पट या **अव्यक्त नियमांचा** प्रयोग वरील धर्मग्रंथांत आलेला आहे. पण कधीं कधीं या दोन्ही शब्दांचा प्रयोग एकत्र अथवा एकार्थीं केलेलाही आढळतो. तिसरा एक ' मिंग ' हा शब्द ' नियति ' ही अव्यक्त कल्पना दर्शविण्याकरितां वापरलेला आढळतो.

वरील सर्व नीतिनियम पाळण्याकरतां परमेश्वराचे ठायीं निष्ठा असणें अवश्य आहे, असें ' सूक्तिसंग्रह ' या ग्रंथांत सांगितलें आहे.

" सद्गुरु म्हणाले:— परमेश्वराचा आदेश काय आहे हें समजल्याखेरीज श्रेष्ठ पुरुष होणें अशक्य आहे. सदा-

चाराचे नियम माहित नसतील, तर सच्छील होणें सर्वथैव अशक्य " (२०:३, १०२).

तथापि वरील धर्मग्रंथांत सगुण नांवानें परमेश्वराला एकाच ठिकाणीं संबोधलेलें आढळतें, आणि तें सुद्धां परमेश्वराचें काव्य-मय वर्णन करण्याचे प्रसंगानें. कान्फ्यूशियसनें स्थापलेल्या नीति-युक्त धर्मांत परमेश्वराविषयीं श्रद्धा व त्याची पूजा, या कल्पना जरूर होत्या, याबद्दल वाटेल तितके पुरावे देतां येतील. तरीपण एकंदरीनें परमेश्वराचें स्वरूप सगुण नसून निर्गुण आहे, व्यक्त नसून अव्यक्त आहे; व नीतिधर्म हे व्यवहारिक उपयोगाचे आहेत, या दोन गोष्टी मुख्यतः त्यानें लोकांच्या मनावर बिंबविल्या.

कान्फ्यूशियसच्या धर्मांतील जुन्या धर्मग्रंथांत व अर्वाचीनकाळीं प्रचलित असलेल्या धर्मविधींत अनेक देवतांची पूजा आढळते.

> "त्यानें प्रचलित विधीला अनुसरून विशिष्ट यज्ञ केले. शुद्ध अंतःकरणानें व भक्तिभावानें त्यानें ' सहा श्रेष्ठांना ' उद्देशून यज्ञ केले. त्यानें नद्या व पर्वत यांनाही उद्देशून विधिपूर्वक यज्ञ केले; इतकेंच नव्हे तर, भूतगणांचीही तो पूजा करी. (से. बु. ई. ३:२९).

त्यांच्या पूजेचे विषय स्वर्ग, पृथ्वी, सूर्य, चंद्र व चीनमधील मोठाले पर्वत व नद्या, इत्यादि निसर्गांतील वस्तु होत्या. याशिवाय क्षुद्र भुतें-खेतें ह्यांचीही तो पुजा करी. कांहीं पौराणिक व ऐतिहासिक व्यक्तींचीही या धर्मांत पूजा होते. पैकीं कान्फ्यूशियस ही व्यक्ति प्रख्यातच आहे. या शिवाय 'कांगटी'

या चीनमधील प्राचीन बादशहाची देवतास्वरुपानें (युद्ध देवता म्हणून) ह्या धर्मांत पूजा होते. ह्या सम्राट्देवतेचीं १६०० मंदिरें चीन सरकारनें बांधिलीं आहेत. अमुक देवतेची अमुक सरकारी अधिकाऱ्यानें पूजा करावी, असें या बाबतींत स्पष्ट नियम करण्यांत आले आहेत.

" ' स्वर्गपुत्र ' बादशहा, स्वर्ग, पृथ्वी, प्रसिद्ध पर्वत व प्रख्यात नद्या (पांच महापर्वत व चार महानद्या) यांची पूजा करी. राजपुत्र पृथ्वीदेवता, धान्यदेवता व देशांतील प्रसिद्ध नद्या व पर्वत यांतील देवता यांची पूजा करीत असत. " (से. बु. ई. २७:२२५).

७ कान्फ्यूशियन धर्म हा राजधर्म आहे.

या धर्मांत निराळी धर्माचार्यांची परंपरा मुळींच नाहीं. तथापि, कांहीं विशिष्ट धर्मविधि खास सरकारी अधिकाऱ्यांच्या हातून करविले जातात. ह्या बाबतींत थोडीशी अधिकारविभागणी झाली आहे. ती अशी कीं, कान्फ्यूशियसची पूजा स्थानिक अधिकाऱ्यांकडून केली जाते; आणि निसर्गाचे पूजेचा प्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं चालू ठेविला आहे.

स्वर्गस्वरूप परमेश्वराची पूजा राष्ट्राच्या वतीनें स्वतः चीनचा बादशहा करतो. अशा तऱ्हेची राजाकडून होत असलेली पूजा इतक्या दीर्घकालपर्यंत टिकलेली अशी चीन देशांतच. ही पूजा प्रतिवर्षीं ता. २२ डिसेंबरच्या रात्रीपासून सुरू होते. याप्रसंगीं अनेक बैलांना सबंधच्यासबंध बळी देतात. याशिवाय अन्न, रेशमीवस्त्रें, दारू, संगीत, इत्यादि उपचार कर-

त्यांत येतात. तसेंच याप्रसंगीं मोठा दीपोत्सव करून देवाचा छबिना काढतात; त्यांत हुद्याप्रमाणें एकामागून एक अधिकारी चालतात. हा प्रचंड उत्सव पेकिंग शहराच्या दक्षिणेस असलेल्या भव्य वेदीवर होतो. ही वेदी तिमजली असून ती संगमरवरी दगडाची बांधली आहे. साऱ्या जगांत अत्यंत प्रचंड ह्मणून या वेदीची ख्याति आहे. अशा रीतीचा एक उत्सव सन १५३९ त झाला. त्याप्रसंगीं चीनच्या सम्राटानें पुढील प्रार्थना गायली होती:—

" परमोच्च प्रभु आमच्यावर दया करतो. हे प्रभो! ज्याप्रमाणें कुंभार मातीचीं भांडीं करतो, तद्वत् तूं सर्व वस्तु निर्माण केल्या आहेस. भगवन्, तुझा महिमा असीम व अप्रमेय आहे. आकाशाला आपल्या स्थिर जागीं ठेवणाराही तूंच, व या स्थूल पृथ्वीला घडविणाराही तूंच. तुझें अधिराज्य शाश्वत आहे. पृथ्वीचे कानेकोपरेही तुझ्याकडे बघत असतात. तुझें नांव ऐकतांच पृथ्वीवरील सर्व मानव व सर्व वस्तुमात्र आनंदानें नाचूं लागतात. (लेगे—चीनचे धर्म ४७-५१).

अलीकडे मांचू घराण्यांतील राजाला पदच्युत केल्यानंतर वरील उत्सव चालवायला चीनच्या प्राचीन सिंहासनावर कोणीही उरलें नाहीं. तरीपण, चीनच्या नव्या प्रजासत्ताक राज्याचा पहिला अध्यक्ष ' युवन् शिकाई ' यानें, आपली राजपद्धति पूर्वीच्या राजपद्धतीहून सर्वस्वी निराळी असूनही, हा उत्सव पुढें चालविला. अशारीतीनें हा उत्सव अखंड चालू राहिला. तथापि, चीन देशांतील या धामधुमीच्या काळांत व नव्य प्रवृत्तीच्या घडामोडींत, या शेंकडों वर्षांच्या प्राचीन उत्सवांत हळुहळु बरी-

फशी शिथिलता येत चालली आहे. पूर्वीच्या त्या इतिहास-प्रसिद्ध भव्य 'स्वर्गाच्या वेदीची' आबाळ होत चालल्यानें ती हळुहळु पडत चालली आहे. हीच स्थिति आजकाल कान्-फ्यूशियसच्या अनेक देवळांचीही होत चालली आहे.

पृथ्वीपूजेचा उत्सव, हा वरील उत्सवापेक्षां कमी दर्जाचा असला तरी तो सरकारी अधिकारी प्रतिवर्षीं साजरा करतात. हा उत्सव ग्रीष्म संपातांत करतात. या प्रसंगीं पृथ्वीची प्रतिमा म्हणून पाण्यानें वेष्टिलेली एक चौरस वेदी पेकिंगच्या उत्तरेस आहे, तिच्यावर बळि दिले जातात.

वरीलप्रमाणेंच प्रतिवर्षीं पेकिंग शहराच्या पूर्व दरवाज्यापाशीं वसंत संपातांत सूर्यपूजा करतात; आणि पश्चिम दरवाज्यापाशीं शरत्संपतांच चंद्रपूजा करतात.

अशारीतीनें प्रतिवर्षीं चारवेळा पेकिंगच्याबाहेर चार मुख्य दिशांना अधिकाऱ्यांकडून आपले अवश्य कार्यापैकीं एक कार्य म्हणून हे उत्सव केले जात. हल्लीं मात्र या उत्सवांना उतरती कळा लागली आहे.

(८) या धर्मानें जनतेकरतां सांगितलेला धर्मविधिः—

चीनमधील सामान्य जनतेकरतां या धर्मानें एकाप्रकारची विशिष्ट पूजा सांगितली आहे. अधिकाऱ्यांकरताही निराळा पूजा-विधि ह्यांत सांगितलेला आहे. पितृपूजाही प्राचीन कालापासून चीन देशांत चालत आलेली आहे. कान्फ्यूशियसच्या पूर्वीच्या ग्रंथांतून पितृमंदिरांचें महत्व व पितृपूजेचा विस्तृत विधि हीं वर्णि-लेलीं आढळतात. 'सूक्तिसंग्रहांत' या पितृपूजेचें फार महत्व असल्याचें सांगितलें आहे.

" पितरांच्या मरणानंतर त्यांची और्ध्वदेहिक क्रिया करण्यास विसरूं नका. यापुढें त्यांच्या मरणानंतर बरेच दिवसांनीं त्याला उद्देशून यज्ञही करा. असें करणाराला फार पुण्य लागतें. " (१:९)

मातापितरांविषयीं तीं जिवंत असतां पूज्यभाव बाळगायचा कान्‌फ्यूशियसनें आपल्या अनुयायांना उपदेश केला आहे. त्या पूज्यभावाचेंच निदर्शक चिन्ह पितरांच्या मरणोत्तर त्यांचे अंत्यसंस्कार करणें हें होय.

" पितृभक्ति हें सर्व सद्गुणांचें मूळ होय. ह्यांतून सर्व प्रकारचे नैतिक सद्गुण पल्लवित होतात. आपल्या शरीराचा प्रत्येक अंश, आपली त्वचा, आपले केस हे सुद्धां आपल्याला आपल्या मातापितरांपासून मिळाले आहेत. अर्थात् अशा आपल्या जन्मदात्या पितरांना काया वाचामनें करून न दुखाविणें हें आपलें कर्तव्य आहे. "
(से. बु. ई. ३: ४६६)

" आपलीं मातापितरें जिवंत असताना त्यांची सेवा करणें व त्यांच्याविषयीं पूज्यभाव बाळगणें; आणि त्यांच्या निधनानंतर त्यांचेबद्दल हळहळणें, हे प्रत्येक मनुष्यानें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे." (से. बु.ई. ३:४८८)

मृतपितरांच्या मरणोत्तरस्थितीबद्दल या धर्मांतील लोकांना भीतिही वाटत नाहीं, अथवा त्यांची स्थिति स्पृहणीय आहे असेंही कोणाला वाटत नाहीं. पितरांचें अस्तित्व मरणोत्तर चालूच राहतें. तें कांतर मृत्यलोकावरील आपल्या पूर्वीच्या घराभोंवतीं

घिरट्या घालीत असतात, अथवा आपल्या थडग्याभोंवती परिभ्रमण करीत असतात. विशिष्ट प्रसंगीं त्यांच्यापुढें अन्न ठेवतात तें त्यांच्या पापक्षालनाकरतां नसून त्या सर्व पितरांना एकत्र बसून जेवायला मिळावें म्हणून.

या धर्मांतील पितृपूजेच्या प्रकारावरून " या धर्माच्या मतें मरणोत्तर प्राण्यांना आपल्या शुभाशुभ कर्मांचें फळ मिळत नाहीं " हें अनुमान स्वाभाविकच होतें, आणि तें खरेंही आहे. इहलोकीं अमुकप्रकारें नीतिनियम पाळून मनुष्यानें वागावें, असें हा धर्म जोरानें प्रतिपादन करतो खरा, पण मरणोत्तर केव्हांतरी आपल्या पुण्यकृत्याचा अथवा पापकृत्यांचा निवाडा परमेश्वर करतो, अथवा आदर्शनीतीचें फळ हमखास मिळत असल्यानें सन्मार्गानें वागणें चांगलें, अशातऱ्हेचें आश्वासन ह्या धर्मानें मुळींच दिलेलें नाहीं. उलट "तुम्हीं आयुष्यांत चांगलें वागला असा किंवा वाईट वागला असा; तुम्हाला त्यामुळें मरणोत्तर फायदा तोटा कांहींच नाहीं." असें हा धर्म व्यक्तीला खुशाल सांगून मोकळा होतो! इहलोकींच्या जीवनापेक्षां उच्च जीवन मरणोत्तर मिळेल अशी आशा बाळगणें व त्याकरतां यत्न करणें, हें व्यर्थ आहे, असें हा धर्म स्पष्ट बजावतो. इतकें असूनही 'इहलोकीं पितृभक्ति हा उच्च सद्गुण आहे व मरणोत्तर पितरांची ते इहलोकीं दुष्टरीतीनें वागले असले तरी पूजा केलीच पाहिजे; कारण ते नरकांत जाणें अशक्य आहे' ह्या कल्पनेच्या उलट जर कोणी सांगितलें तर या धर्मांतील श्रद्धाळु लोकांना धक्का बसल्यासारखें होतें. वस्तुस्थिति अशी असल्यानें या धर्मांतील श्रद्धाळु चिनी लोकांना, प्रत्येक पितृश्राद्धाचे प्रसंगीं व प्रत्येक अंत्यविधीचे वेळीं, इतका अवाढव्य खर्च

करावा लागतो कीं, त्याच्या भाराखालीं ते बिचारे चिरडून जाण्याचे बेतांत आले आहेत.

केवळ आपल्या मृतपितरांचे आत्मेच नव्हे, तर पृथ्वी व आकाश यांत वावरणारे इतरही असंख्य आत्मे यांच्याविषयीं सर्वसाधारण चिनी लोकांना फार आदर वाटतो, व त्यांचा हा आदर प्रत्यक्ष व्यवहारांतही दिसून येतो. ‘ फेंगशुई ’चा म्हणजे पाणी व वायु या महाभूतांत वसत असलेल्या आत्म्यांचा, अपमान होईल कीं काय, ही भीति या धर्मांतील लोकांच्या प्रत्यक्ष धार्मिक जीवनांत प्रामुख्यानें दिसून येते.

(९) कान्फ्यूशियन धर्म प्रबल होण्याचीं कारणें:—

(१) ह्या धर्माचा नीतीवर भर. नीति ही प्रत्येक मनुष्याला अत्यावश्यक आहे, असें हा धर्म सांगतो. “ सद्गुणसंरक्षण करण्याकरतां प्राण गेला तरी बेहत्तर असें तो मानतो ” (१५:८).

(२) जगांत नीति हें नियंतृक तत्व आहे असा विश्वास.

सद्गुरु म्हणाले:—‘ अग्नि किंवा पाणी हीं मनुष्याला जितकीं आवश्यक, त्यापेक्षांही सद्गुण हा ज्यास्त आवश्यक आहे. पाण्यानें माणसाला बुडविल्याचें व अग्नीनें माणसाला जाळल्याचेंही मी पाहिलें आहे; पण सद्गुणानें

माणसाचा नाश झाल्याचें मी अजून पाहिलें नाहीं ' (१५:३४).

(३) मनुष्याचे स्वभावांत दैवी—चांगुलपणा जात्याच असतो असा विश्वास.

(४) मनुष्याची इच्छाशक्ति अगम्य आहे, अशी ह्या धर्माची शिकवण.

सद्गुरु म्हणाले:—'एखाद्या मोठ्या राज्यांतील सेनापतीला पकडून नेतां येणें शक्य आहे; पण सामान्य मनुष्याचीही इच्छाशक्ति त्याचेपासून हिरावून घेतां येणार नाहीं. ' (९:२५).

(५) सामाजिक कर्तव्यें कोणाकाही चुकवता येणार नाहींत, असें ह्या धर्म घोषणापूर्वक सांगतो.

(६) सुवर्णनियमाच्या तत्त्वाचें प्रतिपादन.

(७) पारस्परिकाचाराची जबाबदारी या धर्मानें उपदेशिली आहे.

(८) कुटुंबाचें महत्व या धर्मानें जोरानें प्रतिपादिलें आहे.

(९) ह्या धर्मानें ईश्वराचें सर्वव्यापकत्व बाह्यतः स्वीकारलें नसलें तरी आंतून तें त्याला मान्य

आहे. " भाई ! ह्या चतु:समुद्रामधील सर्व वस्तूंत परमेश्वर भरून उरला आहे. " (१२:५:४).

(१०) राज्याच्या दृष्टीनेंही धर्माचें महत्त्व असल्याचें हा धर्म सांगतो.

(११) ह्या धर्मानें शिक्षणाचें महत्व व त्याची आवश्यकता ह्या गोष्टीवर फार भर दिला आहे. (१३:९:१:४; १७:४:३).

" सदुपदेशाच्या जनतेच्या मनावर जितका परिणाम होतो, तितका सुराज्याचाही होत नाहीं. कारण सुराज्यांतही लोक वचकून असतात. याचे उलट सदुपदेश लोक प्रेमानें ऐकतात. सुराज्य हें लोकांच्या द्रव्याला वश करून घेतें, पण सदुपदेश हा लोकांचें हृदय वश करून घेतो." (मेन्सियस ७:१:१४; २—३; व १:१.२.४; ३:१ ४.८; शिवाय से. बु. ई. २८: ८२—८३).

(१२) श्रेष्ठांच्या उदाहरणाचा इतरांवर निश्चित प्रभाव पडतो, असें ह्या धर्मांचें म्हणणें आहे.

सद्गुरु म्हणाले:—' आपल्या श्रेष्ठ गुणांनीं राज्य चालविणाऱ्या पुरुषाला उत्तरध्रुवाची उपमा देता येईल. कारण तो आपल्या जागीं

स्थिर असतो व इतर लोक तारकांप्रमाणें त्याचे भोंवतीं फिरत रहातात ' (२,१).

सद्गुरु ह्मणाले:—' एखाद्या राजाचें खानगी वर्तन अगदीं चोख असलें, म्हणजे त्यानें हुकूम न सोडतांही त्याचें राज्य सुरळीत चाललें. याचे उलट त्याचें वर्तन शुद्ध नसेल तर त्यानें कितीही फर्मानें काढलीं तरी तीं कुणीही पाळीत नाहीं ' (१३: ६ व २:३. १-२; ८:२. १—२; १२: १८; १३:१; १३: ४.३; १३:१३; १४:४४).

(१३) ह्या धर्माच्या संस्थापकानें स्वार्थत्यागपूर्वक आपलें सर्व आयुष्य लोककल्याणार्थ खर्चीं घातलें.

(१४) प्राचीनांच्या ज्ञानाबद्दल आदर बाळगा, असा ह्या धर्माचा उपदेश आहे.

(१०) ह्या धर्मांतील व्यंगें:—

(अ) या धर्मांतील परमेश्वरापाशीं फक्त चीन सम्राटाला जाता येतें, पण सामान्य जनांना जाता येत नाहीं !

(आ) जगन्नियंता एक आहे, असें हा धर्म तोंडानें ह्मणत असला तरी, खरोखरी त्याला अनेकदेवतावाद मान्य आहे.

(इ) मोक्षाविषयीं या धर्माची अतिरिक्त संकुचित कल्पना ‘ श्रेष्ठ पुरुषाला जें कांहीं पाहिजे आहे तें खुद त्याच्यांतच आहे. ’ (१५:२०).

(ई) या धर्मांत पुरेसा उत्साह उत्पन्न करण्याइतकी प्रवृत्तिपरता नाहीं.

(उ) आज्ञा, विधि व तंत्र, यांवर या धर्मानें दिलेला अतिरिक्त भर.

“ या धर्मांत तीनशें तंत्रें व तीन हजार आचार आहेत. (मध्यममार्ग २७:३; व लीकी २८:२ ३८; से. बु. ई. २८:३२३).

(ऊ) स्वार्थत्यागपूर्वक केलेल्या प्रेमानें व्यक्तीचा उद्धार होतो हें तत्त्वच या धर्मांत नाहीं.

(ऋ) यांतील नीतिशास्त्राला पुरेसा धर्माचा पायाच नाहीं.

(ॠ) या धर्मांतील आदर्श नियमांतही, विधिपेक्षां निषेधच फार आहेत.

(ए) मनुष्य स्वभावांतील नैतिक दोषाचे बाबतींत त्यानें केलेली अपुरी मीमांसा.

(ऐ) खऱ्या सामाजिक सुधारणेच्या कार्यक्रमाचा या धर्मांत अभाव दिसून येतो. विशेषतः खालच्या वर्गाच्या उन्नतीची यानें कांहींच व्यवस्था केलेली नाहीं.

(ओ) साधारणतः ह्या धर्मानें स्त्रियांचा दर्जा कमी मानला आहे.

"पुरुषाची आज्ञा स्त्री पाळते, व त्याला अनुसरते. कौमार्यावस्थेंत ती पित्याचें व भावाचें अनुसरण करते. लग्नानंतर ती पतीच्या मर्जीप्रमाणें वागते, व त्याच्या मरणानंतर ती आपल्या मुलाच्या इच्छेप्रमाणें वागते." (से. बु. ई. २७:४४).

"स्त्री व पुरुष यांच्यांत जर भेदभाव मुळींच मानला नाहीं, तर जगांत सर्वत्र बेबंदशाही माजेल." (से. बु. ई. २८:१०४; व २७: ७७–७८, ३८०, ४३९, ४५४–५५, ४५८, ४७९).

(औ) ह्या धर्म नेहमीं मागें पाहून चालणारा आहे त्याचेपुढें विकासशील ध्येयच नाहीं. प्राचीन-

(१) प्रथमखंडः—ह्यांत पांचसहा आदर्श धर्म-
ग्रंथ येतातः—

(१) इतिहासग्रंथ—शुकिंग—चीनच्या इतिहासाचें सिंहावलोकन.

(२) काव्यग्रंथ—शीकिंग—धार्मिक व व्यावहारिक काव्यसंग्रह.

(३) भविष्यग्रंथ—इ--किंग—ह्यांत फलज्योतिषासंबंधीं माहिती आली आहे.

(४) विधिग्रंथः—लिकिंग ह्यांत धर्मविधींचा माहिती आहे.

५) वसंत आणि शरद् (च्युनच्चिऊ)—स्थानिक इतिहासाचें पुस्तक. ह्यांत " पित्राज्ञापालन " नांवाचा ग्रंथही कोणी घालतात. ह्या ग्रंथाला साथोकिंग हें चिनी नांव आहे. ह्यांत पित्राज्ञापालनाचें महत्व वर्णिले आहे.

(२) द्वितीयखंडः—ह्यांत खालील चार प्रकरणें आलीं आहेतः—

(१) श्रेष्ठ विद्याः—टॉसिओ—सद्गुणावर व्याख्यान

(२) मध्यममार्ग—च्युंग यंग—युक्ताहारविहाराचें प्रतिपादन.

(३) उक्ति—संग्रह—लुन्यू—कॉनफ्यूशियसच्या वचनांचा संग्रह.

प्रकरण सातवें

टाओ-धर्म

देवमार्गाचा धर्म.

प्रास्ताविक.-विद्यमान धर्मांत याचें स्थानः—

व्यक्तिस्थापित धर्मांत चीनमधील हा धर्म अत्यंत जुना. ह्यांतील धर्मग्रंथामधून उतारे जपानमध्यें इ. स. ६०० सुमारास घेतले होते, व त्या धर्मावर व्याख्यानें त्या ठिकाणीं इ. स. ७९७ देण्यांत येत होतीं. पण एकंदरीनें चीनच्या बाहेर ह्या धर्माची फारशी माहिती नाहीं. या धर्मातील अनुयायांची ध्येयाच्या बाबतींत, फारच अवनति झाली आहे. तेव्हां ह्याला धर्म म्हणता येईल कीं नाहीं, ह्याची कित्येकांना शंका वाटते. आक्सफोर्ड युनिव्हर्सिटीचे चिनी-भाषा व साहित्य या विषयांचे प्रोफेसर ह्या धर्मातील प्राचीन धर्मग्रंथांविषयीं ह्मणतातः—

"धर्म अथवा भोळ्या समजुती ह्याचा गंध येईल असा एकही शब्द ख्रि. पू. ६०० चे सुमारास टाहो टेकिंग ह्यांत सांपडत नाहीं." (लेगे 'चीनचें धर्म १६४).

कदाचित् दुसऱ्या एका चीनाभ्यासी युरोपीय पंडितानें ह्मटल्याप्रमाणें ख्रिस्ती-शकापूर्वी कांहीं दिवस सत्ताधीश असलेल्या चीनमधील हान घराण्याचे वेळेपर्यंत ह्या धर्माला धर्म ह्मणता येईल असें व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. पण ह्या घराण्याच्या वेळेपासून मात्र ह्या धर्माच्या जगद्गुरूंची परंपरा सुरु झाली. अगदीं नक्की आंकडा मिळणें कठीण आहे, तरीपण या धर्मांतील अनुयायांची संख्या जवळ जवळ ३ कोटी २० लक्ष आहे असें ह्मणतात.

चीनमधील तीन राजमान्य धर्मांपैकीं हा एक धर्म होय. हे तीन धर्म म्हणजे कान्फ्यूशियन, टाओ व बुद्ध-धर्म हे होत. ह्या तिघांमध्यें बुद्धधर्माचा चीनमध्यें प्रवेश स. ७१ च्या सुमारास झाला. एकंदरींनें हे तिन्ही धर्म ख्रिश्चन धर्माच्या सुरवातीपासून चीनमध्यें नांदत आहेत. हे तीन धर्म एकत्र नांदत आहेत इतकेंच नव्हे, तर एकमेकांत मिसळून गेले आहेत. असंख्य चिनी लोक ह्या धर्मांच्या विधिविधानांत व धर्मकृत्यांत भाग घेऊन त्यांना जिवंत ठेवीत आहेत. तरीपण या तिन्ही धर्मांतील वैयक्तिक वैशिष्ट्यें स्पष्ट आहेत. कान्फ्युशियन धर्माचें वैशिष्ट्य हें आहे कीं, त्यांत समाजांतील उच्च व कनिष्ट वर्गांनीं आपलीं पारस्परिक कर्तव्यें चोखरीतीनें पाळावीं, असा उपदेश आहे. चीनमधील बुद्धधर्माची विशिष्टता ही आहे कीं, त्यांत संसाराचा त्याग करून ध्यानद्वारा व इंद्रियसंयमद्वारा सगुण देवतोपासन करावें

व अशारीतीनें आत्मोद्धार करावा अशी शिकवणूक आहे. टाओ धर्मप्रमाणें, परमेश्वराच्या दैवीभागाचें अनुसरण करणें ह्यांतच व्यक्तीचा मोक्ष आहे.

टाओ धर्माच्या संस्थापकाच्या जन्मभूमींत एक टाओमंदिर आहे. त्यांतील शिलालेखांत टाओ-धर्म व कान्फ्यूशियन धर्म यांमध्यें भेद कोणत्या बाततींत आहे, हें स्पष्ट सांगितलें आहे:-

" कान्फ्यूशियन धर्मांत सांगितलेल्या तीनशें धर्मनियमांनींदेखील मनुष्याचें मन आवरता येणें शक्य नाहीं. शिक्षेचे व निषेधाचे तीन हजार नियम त्या धर्मांत सांगितले असतांही त्या धर्माच्या अनुयायांच्या दुष्ट प्रवृत्तींना आळा घालता आला नाहीं. एखाद्या झऱ्याचें पाणी स्वच्छ व शुद्ध करायचें असेल, तर झऱ्याच्या उगमापासूनच तें स्वच्छ व शुद्ध करीत आलें पाहिजे; तद्वत्च ज्या मनुष्याला आपल्या शुद्धीची चाड असेल त्यानें ह्या शरीरेंद्रियाच्या मूलाधाराकडे वळलें पाहिजे. आणि जगांतील यच्चयावत् वस्तूंचा मूलाधार व मूलोत्पत्तिस्थान प्रभु 'टाओ' वांचून दुसरें कोण आहे? (से. बु. ई. ४०:३१२)

'अपकाराची फेड उपकारानें करावी' ह्या ख्रिश्चन तत्त्वाशीं अगदीं जुळणारा उपदेश करणारा धर्म जगांत टाओ हा एकच आहे.

(२) ह्या धर्माच्या संस्थापकाचें (लाओट्झ याचें) जीवनचरित्र. (ख्रि. पू. ६०४-५१७)

जगांतील सर्व धर्मसंस्थापकांत निरपेक्ष उपकाराचा उपदेश करणारा पहिला धर्मसंस्थापक लाओट्झ हाच.

ह्या नम्रहृदय पुरुषाच्या जीवनचरित्राची माहिती आज फारच थोडी उपलब्ध आहे. ह्याच्या मरणानंतर ५०० वर्षांनीं विख्यात चीन इतिहासकार ' स्मा-शीन ' यानें अवघ्या २४८ शब्दांत चिनीभाषेंत याचें अल्प जीवन-चरित्र लिहिलें आहे. हेंच आज त्याच्या जीवना-विषयीं माहिती मिळविण्याला आधार.

मध्य चीनच्या होनान या प्रांतात लाओट्झचा जन्म झाला. कान्फ्यूशियस पूर्वीं सुमारें ५० वर्षें हा जन्मास आला. तेव्हां ह्या दोघा धर्मसंस्थापकांना समकालीन म्हणायला हरकत नाहीं. ह्याशिवाय इराणांतील पारसीधर्मसंस्थापक झोराष्टर, हिंदुस्तानां-तील जैनधर्माचा संस्थापक महावीर, व बुद्धधर्माचा जनक बुद्ध, ह्यांचाही लाओट्झ हा समकालीन होता. इतकेंच नव्हे तर, प्रख्यात हिब्रू धर्माचार्य जैरेमी एझेकिल व ईसा ह्यांचाही हा समकालीन होता. चीनमधील चाऊ या राजघराण्याच्या दरबारीं त्याची राजदफ्तरदार म्हणून नेमणूक झाली होती. त्याच्या ह्या अधिकारामुळें आणि मोठ्या पांडित्यामुळे त्याला मोठे मोठे लोक भेटायला येत व त्याला ' महनीय तत्त्वज्ञ ' असें म्हणत. कान्-फ्यूशियस हाही आपल्या वयाच्या चौतिसाव्या वर्षीं त्याच्या भेटीला आला होता. भावी काळांत इतिहासकार व समाजसुधा-रक होऊं इच्छिणाऱ्या या तरुण कान्फ्यूशियसची, सामाजिक आचाराच्या जोरावर चीनचें प्राचीन वैभव परत मिळविण्याची आकांक्षा बाळगणें, व चीनच्या प्राचीन इतिहासाचा सांगोपांग अभ्यास करण्याची हांव धरणें, या गोष्टींबद्दल लाओट्झनें बरीच टवाळी केली.

"ज्या लोकाबद्दल तूं बोलत आहेस ते लोक केव्हांच मरून गेले आहेत. त्यांच्या हाडाचीही माती होऊन गेली आहे. आपली घमेंड सोड आणि आपल्या धाजत्या इच्छाना पायबंद घाल." (से बु. ई ३९:३४)

वरील गोष्टीऐवजीं कान्फ्यूशियसनें विश्वांतील गूढ तत्त्व 'टाओ' याविषयीं स्वतः शांतचित्तानें शोध करावा, असें लाओ-ट्झनें सुचविलें;—कारण त्याच्यामतें धर्म व जीवन ह्यांचें रहस्य ह्या तत्त्वांवाचून उकलणें शक्य नाहीं. ह्यावर तरुण कान्फ्यूशि-यसनें त्याला जोरांत उत्तर दिलें कीं, "मी गेलीं वीस वर्षें सतत प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करीत आहे" हें ऐकून लाओट्झ म्हणाला:—

"टाओ हें तत्त्व लोकांना देण्यासारखें असेल तर तें त्यांच्या राजाना कां देता येणार नाहीं ? जर तें माणसांना देता येतें, तर तें त्यांच्या मातापितरांना देणेंही शक्य आहे. जर तें अमुक मनुष्यांना जाहीररीतीनें देतां येण्यासारखें असेल, तर तें त्यांच्या इतर बांधवाना कां नाहीं देता येणार ? जर तें मानवांना देतां येतें, तर तें त्यांच्या मुलाबाळांना कां नाहीं देतां येणार ? आतां तुम्हा तें तत्त्व कां मिळत नाहीं म्हणशील तर त्याचें कारण हें आहे कीं, तूं त्या तत्त्वाला अजून आपल्या हृदयमंदिरांत स्थान दिलेलें नाहींस ! (डग्लसकृत कान्फ्यूशियनधर्म व टाओधर्म पा. १८४; कांगझे १४:२; ७:५ से. बु. ई. ३९:३५५, गाइल्सकृत चुवांग झ्र. पा. १८३)

ह्या भेटीनंतर कान्फ्युशियस आपल्या
शिष्यांना म्हणालाः—

"पक्षी हवेंत कसे उडतात, मासे पाण्यांत कसे पोहतात, जनावरें पृथ्वीवर कशीं धांवतात, हें सर्व मला माहीत आहे. पण ड्रगून हा प्राणी वातचक्रावर आरूढ होऊन ढगांतून व अंतरिक्षांतून शीघ्र संचार कसा करतो हें मला सांगतां येणार नाहीं. आज लाओट्झला मी पाहिलें तेव्हां मला वाटलें हा ड्रगूनसारखा एक प्राणी आहे" (म्ह० ही व्यक्ति अतिपार्थिव व अगम्य अशी आहे.) [से. बु. ई. ३९: ३४–३५]

हाच कान्फ्यूशियस पुढें साऱ्या चीन राष्ट्रांतील अंत्यंत प्रसिद्ध, विद्वान् व उपदेशक म्हणून गणला जाणार होता.

ह्या वेळीं मात्र कानफ्यूशियसला खरोखरींच लाओट्झ हा आपल्या कल्पनातरंगावर आरूढ होऊन मेघांतून भराऱ्या मारणारा असा कोणीतरी स्वर्गीय 'स्वप्नद्रष्टा' आहे असें वाटलें. उलट लाओटझला वाटलें असेल कीं, कान्फ्यूशियस हा दरएकाच्या कामांत ढवळाढवळ करणारा एक लुडबुड्या आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, हे दोन प्रख्यात पुरुष, भावना, आवड आकांक्षा, कार्यपद्धति व तत्वदृष्टि या सर्व बाबतींत एकमेकाहून अगदीं भिन्न प्रतीचे होते.

वर दिलेल्या त्रोटक माहितीखेरीज जास्त अशी माहिती स्मा शीननें लिहिलेल्या चरित्रांतील उपसंहारांत पुढीलप्रमाणें आढळते:—

" लाओट्झनें स्वतःच्या बुद्धीचा व सद्गुणांचा विकास चांगल्या तऱ्हेनें केला होता. स्वतःच्या व्यक्तित्वाचा जगापुढें टेंभा न मिरवणें व आपल्या नांवाचाही पत्ता लागू न देतां सत्कार्य करणें हें त्याचें ध्येय होतें. "

" लाओट्झ जवळ जवळ जन्मभर 'चाऊ' या शहरीं राहिला. जेव्हां त्याला चाऊचा नाश होणार अशी चिन्हें दिसू लागलीं, तेव्हां त्यानें तें गांव सोडलें व तो चीनच्या सरहद्दीवर आला. जातांना त्याला यिन्ही नांवाच्या एका सरकारी अधिकाऱ्यानें विनंती केली की, ' महाराज! तुम्ही येथून जातां? बरें आहे, मर्जी तुमची. पण निदान माझ्याकरितां ह्मणून एक ग्रंथ तरी लिहा." ह्या विनंतीला मान देऊन दोन भागांत त्यानें जवळ जवळ पांच हजार शब्दांचा एक ग्रंथ लिहिला. यांत बुद्धि व सद्गुण या विषयींची त्यानें चर्चा केली आहे. ग्रंथ लिहून पुरा झाल्यावर त्यानें तें स्थान सोडलें. तो कोणत्या ठिकाणीं मरण पावला हें कुणालाही माहिती नाहीं. (केरस कृत बुद्धि व सद्गुण यांचें नियम; ग्रंथ १७-२)

२ लाओट्झचा स्वभाव—

कान्फ्यूशियसच्या मताप्रमाणें पाहतां पारस्परिक सदाचार हें जीवनांतील मार्गदर्शक तत्त्व आहे. अर्थात् या तत्त्वाप्रमाणें वागल्यास एखाद्यानें आपल्यावर अपकार केला असला, तर त्याची फेड आपल्याला अपकारानें करणें भाग आहे.

‘ अपकाराची फेड अपकारानेंच करा. दयेची फेड दयेनें करा. ’ (कान्फ्यूशियसचा सूक्तिसंग्रह:–१४:१६:३)

पण लाओट्झच्या मताप्रमाणें पाहतां अपकाराची फेड श्रेष्ठ उपकारानेंच करावी.

“ अपकाराची फेड उपकारानेंच करा. ” (६१:२)

“ जें माझ्याशीं चांगुलपणानें वागतात त्यांच्याशीं तर मी चांगुलपणानें वागतोंच, पण जें माझ्याशीं चांगुलपणानें वागत नाहींत त्यांच्याशींसुद्धां मी चांगुलपणानें वागतों. ह्यामुळें अर्थात्च पुढें त्या मनुष्याला माझ्याशीं चांगलें वागणें भाग पडतें. आणि अशारीतीनें सर्वच चांगलीं होतात. जे माझ्याशीं प्रेमळपणानें वागतात त्यांच्यावर तर मी प्रेम करतोंच, पण जें माझ्याशीं कपटानें वागतात त्यांच्याशीही मी प्रेमानें वागतों. अर्थात्च त्यामुळें सर्वांनाच प्रेमळपणानें वागणें भाग पडतें. ”

अशारीतीनें निरपेक्षपणें सर्व विश्वाशीं चांगुलपणानें वागण्याबद्दल या धर्मानें जी घोषणा केली आहे त्याला ख्रिश्चनेतर धर्मांत तोड सांपडणार नाहीं. ख्रिश्चन धर्मांत मात्र त्या धर्माचा संस्थापक येशू ख्रिस्त यानें लाओट्झवर आलेल्या प्रसंगापेक्षांही आणीबाणीच्या प्रसंगीं, अपकाऱ्यांनाही आपल्या प्राणांची परवा न करता क्षमा केली व आपल्या प्रत्यक्ष उदाहरणानें जगाला क्षमेचा धडा शिकविला (ल्यूक ६:२७; २३:२४). पण लाओट्झ व येशू ख्रिस्त या दोहोंमध्यें मोठा फरक हा आहे कीं, ‘अपकाऱ्यावरही उपकार करणें ’ हें तत्त्व जरी दोघांनींही प्रतिपादिलें असलें तरी ह्या तत्त्वाचा संबंध येशूनें प्रत्यक्ष परमेश्वराशीं जोडला

व हें तत्त्व मनुष्यांनीं का स्वीकारावें ? तर प्रत्यक्ष ईश्वर हें तत्त्व आचरतो; व आपल्यावर अपकार करूं पाहणाऱ्या व आपल्यापेक्षां हीन असणाऱ्या प्राण्यांवरही तो निरपेक्षपणें दया करतो, असें ईश्वराचें उदाहरण दाखवून त्याप्रमाणें वागण्याचा मनुष्यांना त्यानें उपदेश केला. लाओट्झनें मात्र असें केलें नाहीं. (माथ्यू ५: ३८–४८)

ख्रिश्चनधर्माची कसोटी लावून पाहतां लाओट्झचें 'अपकाराबद्दल उपकार' हें तत्व कान्फ्यूशियसच्या 'जशास तसें' ह्या तत्वापेक्षां निःसंशय श्रेष्ठ आहे. तथापि हें तत्व सोडून दिलें तर त्याची स्वतःची वर्तणूक कान्फ्यूशियसपेक्षां अगदीं कर्मीप्रतीची होती. हे दोघेही धर्मसंस्थापक समकालीन असून एकाच सामाजिक परिस्थितींत वाढले होते. कानफ्यूशियसप्रमाणें लाओट्झनेंही 'जनतेचें दारिद्र्य,' 'भयंकर अंदाधुंदी' 'लुच्चेगिरींत प्रावीण्य' 'चोर व दरवडेखोर' 'उलट्या काळजाचे आततायी,' 'लोकांचा उथळेपणा, व आपलेच घोडे पुढें दामटण्याची वृत्ति' वगैरेविषयीं त्यानें खेदोद्गार काढले आहेत. पण ह्या सर्व अनिष्ट परिस्थितीला तोंड देऊन तिला आपलें तत्त्व प्रत्यक्षरीतीनें कान्फ्यूशियसप्रमाणें लागू करण्याऐवजीं लाओटझनें मात्र शहाणपणाचा उपदेश केला; आणि वेळ येतांच आपल्या सरकारी जागेचा राजीनामा देऊन तो सर्व जबाबदारींपासून मुक्त झाला. आज सुद्धां अशा प्रकारचा अंगचोरपणा अनेक चीनी अधिकारी करताना आढळतात.

> " लोकांच्या पुढें पुढें न नाचतां कुठेंतरी कोनाकोपऱ्यांत जाऊन राहणें हा स्वर्गाचा मार्ग आहे " (टी. के. के. ९: २; से. बु. ई. ३९:५१)

तेव्हां चीनच्या भगभगींच्या परिस्थितींतून त्यानें आपलें अंग काढून घेतलें व तो पश्चिमेकडे निघून गेला.

(४) लाओट्झविषयींचा पूज्यभाव—

टाओ धर्माच्या संस्थापकाला आपल्या तत्त्वाच्या श्रेष्ठतेविषयीं पूर्ण विश्वास होता, तरीपण स्वतःविषयीं तो नेहमीं नम्रपणानें बोले.

" जगांतले असंख्य लोक सुखी—कितीतरी सुखी-आहेत. मी मात्र तसाच दुःखी राहिलों आहे. मी अगदीं निराधार आहे. मला चोहोंकडे शून्य दिसत आहे. आणि मी कितीतरी अज्ञानी, कितीतरी मूर्ख आहे. माझ्या मनाचा अगदीं गोंधळ उडला आहे ! माझें एकट्याचेंच मात्र कुणाशीही जमत नाहीं. मला आतां फक्त माझ्या टाओ—मातेचाच आधार आहे. (टी. के. के. २०:३:९; केरसकृत भाषांतर " बुद्धि व सद्गुण यावरील नियमग्रंथांचें. ")

" सगळें जग मला मोठा म्हणतें, पण माझी किंमत मी जाणतों. माझ्या जवळ तीन खजिनें आहेत व त्यांची मला फार आवड आहे. ते तीन खजिनें म्हणजे दया, मितव्यय आणि नम्रता " (टी. के. के. ६७: १—२ केरसकृत भाषांतर पा. १२१-१२२.)

" माझें म्हणणें अगदीं साधे व आचरणांत आणण्याजोगें आहे. पण चमत्कार हा आहे कीं, ह्या जगांत, माझ्या शब्दांत काय अर्थ भरला आहे तें कुणालाही कळत नाहीं, आणि त्याप्रमाणें आचरण करणें तर कुणाच्याच

हातून होत नाहीं. माझ्या शब्दांत एक विश्वव्यापी सर्जक तत्व भरून राहिलें आहे; आणि त्या शब्दांत जगाचें नियंतृक तत्वही आहे. हे शब्द कुणालाही आकलन करतां येत नसल्यानें अर्थात्‌च माझेंही आकलन कुणाला होत नाहीं. " (टी. के. के. ७०:१-२; से. बु. ई. ३९:११२-११३).

लाओट्झच्या जिवंतपणीं जरी त्याला अशा तऱ्हेची निराशा वाटण्यासारखी स्थिति होती, तरी पुढें पुढें ही स्थिति पुष्कळ पालटून लोकांना त्याची किंमत कळूं लागली. इतकेंच नव्हें तर, सरकारकडून व धर्मचार्यांकडूनही त्याचा सत्कार होऊं लागला. इ. स. १५६ मध्यें प्रथम लाओट्झला उद्देशून यज्ञ केला जावा असा सरकारी हुकूम सुटला. इसवी सनाच्या चौथ्या शतकांत ह्या "महनीय तत्वज्ञान्या"च्या कल्पनेवर एक धर्मपंथ सुरू झाला. कधीं कधीं ' महनीय तत्वज्ञानी ' ह्या पदवीच्या ऐवजीं त्याला " वृद्ध कुमार " अशी पदवी बहाल केलेलीही आढळते. लोट्झेचे केस जन्मत:च पांढरे होते ही एक गोष्ट; शिवाय तो अकालीं परिपक्व बुद्धीचा होता ही दुसरी गोष्ट. या दोन्ही गोष्टींमुळें तो प्रसूतीसमयीं लहान मूल नसून प्रौढ होऊनच जन्माला आला व तत्पूर्वी आपल्या आईच्या पोटांत तो बहात्तर किंवा एक्याऐशीं वर्षें राहिला अशी त्याच्याविषयीं लोकांची कल्पना होती. त्याला " वृद्धकुमार " ही पदवी द्यायचें तरी हेंच कारण. (से. बु. ई. ३९:३५; १ ली टीप) इ. स. ५८६ मध्यें, त्याच्या जन्मभूमीच्या स्थळीं असलेल्या एका जीर्ण मंदिराचा जीर्णोद्धार करण्यांत आला. त्यावेळीं त्या मंदिरावर एक शिला-

लेख कोरला. त्यांत लाओटझचे अनेक अवतार झाल्याचा उल्लेख आहे (से. बु. ई. ४०:२११-२१३) इ. स. ६५० पासून ६८४ पर्यंत राज्य करणाऱ्या चीनच्या एका बादशहानें असें जाहीर केलें कीं, लाओट्झ हा पूर्वजन्मीं बादशहा होता. सन ७१३ ते ७४२ या दरम्यान त्याला "श्रेष्ठज्ञानी पूर्वज" म्हणून त्याला देवतास्वरूप प्राप्त होऊन त्याची पूजा होऊं लागली. या पुढें केव्हांतरी त्याला टाओ-त्रिमूर्तींत स्थान मिळालें. ह्या त्रीमूर्तींतील दुसरें स्थान 'पानूकु' या प्रेरक अध्यात्मिक तत्त्वाला देण्यांत आलें आणि ह्या त्रिमूर्तींतील तिसरें स्थान 'मौक्तिक-सम्राट' म्हणून सर्वांना परिचित असलेली संज्ञा धारण करणाऱ्या एका ऐतिहासिक व्यक्तीला मिळालें. (सूदहिल: चीनमधील तीन धर्म पा. ८२-८३).

लाओट्झचे वर दिलेले दीनोद्गार त्यानें जगाच्या व्यवहारांतून अंग काढून घेतांना काढले होते, यानंतर तो कांहीं दिवस अप्रसिद्ध स्थितींत राहून मरण पावला. त्याचे दीनोद्गार टाओ-धर्मग्रंथांत समाविष्ट झाले आहेत. या उद्गारावरून तो एक सामान्य मनुष्य होता असें अनुमान निघत असलें, तरी त्याकडे त्याचे अनुयायी डोळेझांक करतात व बेलाशक असें मानतात कीं, "विश्व-प्रेमाचे धडे आम्हाला शिकविणारा लाओट्झे ही एक दैवी विभू-तिच असली पाहिजे. खुद्द लाओट्झनें सगुण परमेश्वराचा केव्हां-ही स्वीकार केला नाहीं. तसेंच जागतिक प्रेमाचा उपदेश त्यानें मुक्तकंठानें केला असला, तरी त्याची स्वतःची वागणूक त्याला जुळेल अशी नव्हती. इतकें असूनही त्याचे लक्षावधि अनुयायी आपल्या धर्मगुरुला व विद्वान् उपदेशकाला प्रत्यक्ष परमेश्वराचा

आविर्भाव-अवतार—मानतात. नम्रतेचें तत्त्व सर्व जगांत मान्य होऊन त्याचा सर्वत्र जयजयकार व्हावा अशारीतीची त्यानें जी टाओ-धर्मग्रंथाच्या अठ्ठाविसाव्या भागांत आशा प्रदर्शित केली आहे, ती आशा चीनमधील लोकांनीं प्रत्यक्ष सफल करून दाखविली, असें चीनच्या इतिहासावरून दिसतें. कारण ह्या नम्रतेच्या उपदेशक व्यक्तीचा त्यांनीं खरोखरच जयजयकार केला.

> "ज्याला ज्ञान प्राप्त झालें आहे, तथापि जो ज्ञानाचें प्रदर्शन करीत नाहीं तो सर्व जगाला आदर्शभूत पुरुष होईल. तो अशा रीतीनें आदर्शपुरुष असल्यानें त्याचे जवळ सद्गुणांचें शाश्वत सांनिध्य असणारच. शेवटीं हा आदर्शपुरुष परमात्म्याचे पायापाशीं जाणार हें ठरलेलेंच आहे."
> (डग्लसकृत कान्फ्यूशियन व टाओधर्म पा. १९५).

लाओट्झ हा कांहीं अंशीं " वृद्ध तत्त्वज्ञ " होता ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे. तरीपण त्याला 'चीनचा दुःखी कष्टी सेवक " मानतात तसा मात्र तो खास नव्हता. त्यानें आपल्या धर्मांत एका उन्नत ध्येयाचा समावेश केला, तरी स्वतःचे बाबतींत मात्र तो कोरडा राहिला !

व्यक्ति संस्थापित अशा जगांतील सहा धर्मांचीं नांवें त्या त्या संस्थापकांच्या नांवावरून पडलीं आहेत: उदा० जैन, बौद्ध, कान्फ्यूशियन, झोराष्ट्रीयन, ख्रिश्चन व मुसलमान या धर्मांचीं नांवें. पण टाओ हा धर्म व्यक्तिसंस्थापित असूनही त्या धर्माला त्या संस्थापकाचें नांवही मिळालें नाहीं, अथवा त्या श्रेष्ठ व्यक्तीच्या चारित्र्याचाही त्या धर्मावर प्रभाव पडला नाहीं. तर त्यानें ज्या

अमूर्त टाओ-या-तत्त्वाचा मुख्यत: उपदेश आपल्या अनुयायांना केला त्या तत्त्वाचें नांव त्याच्या धर्माला पडलें-ही एक ध्यानांत ठेवण्यासारखी बाब आहे.

(५) टाओ धर्मग्रंथ:—

टाओ धर्मांत ग्रंथरत्न म्हणून मानलेला धर्मग्रंथ खुद्द लाओ-ट्झनें लिहिला आहे, असें मानतात. या ग्रंथराजाचें नाव ' टाओ टे—किंग.' ह्या चिनी नांवाचा अर्थ अनेक भाषांतरकारांनीं (जवळ जवळ बारा जणांनीं) अनेक रीतीनें केला आहे. कांहींनीं त्याचें अजिबात भाषांतरच केलें नसून; मूळ चिनी भाषेंतील समासच कायम ठेविला आहे. कोणी या सामासिक शब्दाचें " टाओ व सद्‌गुण यावरील आदर्शग्रंथ " असें भाषांतर करतात. (उ० चामर्स); तर कोणी " सद्गुणपथाचा ग्रंथ " असा त्याचा अर्थ करतात. एकानें (उ० पार्करनें) त्याचा "प्रभुकृपेचा आदर्शग्रंथ" असा अर्थ लावला आहे; तर दुसऱ्या एकानें (बाल्फोरनें) " निसर्गतत्त्व व त्याची विशिष्ट लक्षणें " असा या शब्दाचा अर्थ केला आहे. अलेक्झांडर या गृहस्थानें " निसर्ग व परमेश्वराचे आविर्भाव यावरील विचार " असें ह्या शब्दांचा लांबलचक अनुवाद केला आहे. आमच्या मतें वरील सामाजिक चिनी शब्दाचें सुटसुटीत समर्पक भाषांतर ' केरस ' नें केलेलें " बुद्धि व सद्‌गुण यावरील धर्मग्रंथ " हें आहे.

ह्या टाओ धर्मग्रंथाचें पांच सहा युरोपीय भाषांतून भाषांतर झालें आहे. ह्याचें भाषांतर करण्याचें काम आकर्षक असलें तरी कठिण आहे. ह्या ग्रंथाचें लॅटिन भाषेंत भाषांतर सन १७८८ मध्यें फादर ग्रामंट नांवाच्या एका रोमनकॅथोलिक मिशनरीनें

केलें. या गृहस्थाची अशी चुकीची समजूत होती, कीं परमेश्वर अवतार घेतो ही कल्पना व पवित्रतम त्रिमूर्तीचें रहस्य ह्यांची खिस्ती धर्माच्याही पूर्वी प्राचीन चिनी लोकांना माहिती होती. (से. बु. ई. ३९:१२) अर्वाचीन युरोपीय भाषेंत हा धर्म-ग्रंथाचें भाषांतर प्रथम फ्रेंच भाषेंत १८२३ मध्यें फादर रेम्यूसा यानें केलें. मुखपृष्ठावर " लाओट्झ-च्या मतांवरील व जीवन-चरित्रावरील एक ग्रंथ; ' लाओट्झ ' हा चिनी तत्वज्ञानी खिस्त-पूर्व सहाशेच्या सुमारास होऊन गेला. सामान्यतः पायथागोरस, प्लेटो व त्याचे शिष्य यांचीं म्हणून मानलीं जाणारीं मतें ह्या तत्वज्ञाचींही होती. " असा मजकूर आहे.

' टेओ-टे-किंग ' चें फ्रेंच भाषांतर प्रसिद्ध होतांच युरोपीय पंडितांना विस्मित करून टाकणारी एक गोष्ट आपोआप बाहेर आली; ती ही कीं, हिब्रू देवतांपैकीं एका देवतेचें विशिष्ट नाम ' जेहोवा ' हें, टाओ-धर्मग्रंथाच्या चवदाव्या अध्यायांत आलें आहे. त्यावरून हें नांव इ.सनापूर्वी सहाव्या शतकांत रूढ होतें असें सिद्ध झालें.

' टाओ-टे-किंग ' या धर्मग्रंथांत सर्वसाधारण सिद्धांत व उपदेशपर वाक्यें यांची एकच खिचडी करून टाकली आहे. या ग्रंथाच्या तीन अध्यायांत आलेल्या या धर्मसंस्थापकाच्या आत्मचरित्राचा त्रोटक भाग, आणि सामान्यतः ग्रंथकाराच्या समकालीन समाजस्थितीचा उल्लेख, याशिवाय या ग्रंथांत ऐतिहासिक महत्वाचा असा फारसा मजकूर नाहीं. चीनमधील विशिष्ट व्यक्ति अथवा घटना यांचा तर ह्यांत मुळींच निर्देश नाहीं. ग्रंथाच्या छोटया छोटया एक्याऐंशी अध्यायांत विशेषनाम असें एकही नाहीं.

टाओ-टे किंग मधील ऐतिहासिक भागांत या ग्रंथाच्या माहात्म्याविषयीं लोकांनीं वेळोवेळीं काढलेल्या प्रशंसोद्गारांचाही समावेश होतो. चींग टी (खि. पू. १५६–१४०) या चीन बादशहानें सरकारीरीत्या या ग्रंथाला ' आदर्शग्रंथ ' म्हणून मान्य केले. मिंग टी (इ. स. २२७–२३९) हा चीन सम्राट् ह्या रूक्ष ग्रंथावर आपल्या दरबारांत प्रवचन करीत असे. प्रवचन करतेवेळीं त्याची दरबारांतील श्रोत्यांना सक्त ताकीद असें कीं प्रवचन ऐकतांना कुणीही आळस देऊ नये; जांभई देऊ नये; अथवा कुणीही खोकूं नये ! ! (एच. ए. जाइल्सकृत " कानफ्यूशियन धर्म व त्याचे प्रतिस्पर्धी " हें पुस्तक पा. १८१; एल. जाइल्स: लाओट्झचीं वचनें पा. १२).

एकामागून एक आज्ञापत्रें काढून दुसऱ्या दर्जाच्या स्नातकांच्या परीक्षेला हा ग्रंथ शेवटीं आवश्यक म्हणून नेमण्यांत आला. प्रत्येक उमेदवाराजवळ या ग्रंथाची एकतरी प्रत असलीच पाहिजे असा निर्बंध घालण्यांत आला. चीनच्या दोन्हीही राजधान्यांत हा ग्रंथ शिलांवर कोरण्यांत आला. पुढें पुढें तमाम शिक्षणाधिकाऱ्यांना ह्या ग्रंथाच्या छापील प्रती वाटण्यांत आल्या; व त्यांचें भाषांतर न्यू चेन टार्टर्स भाषेंत करण्यांत आलें. (जाइल्सकृत–वचनें १२)

सियानफू ह्या नांवाच्या चीनमधील शेन्शी प्रांतांतील एका गांवीं नेस्टरियानुयायी खिश्चन–लोकांचें एक स्मारक आहे, त्यावरून असें दिसतें कीं, सन ७८१ पूर्वी ह्या खिश्चन लोकांना टाओ-टे-किंग ह्या ग्रंथाची माहिती होती.

अलीकडील या ग्रंथाचे पाश्चात्य अनुवादक, व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करणारे—या सर्वांनीं ह्या ग्रंथाच्या अमूल्य गुणांची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे.

> " ह्या ग्रंथाची खुबी ही आहे कीं तो दिसायला अगदीं क्लिष्ट आहे, पण तसें पाहिलें तर अगदीं सरळ व प्रसन्न आहे; अगदीं अर्वाचीन काळांतील शास्त्रें व तत्त्वज्ञान यांच्या सिद्धांताशीं या ग्रंथांतले सिद्धांत इतके तंतोतंत जुळतात कीं, तें पाहून अत्यंत आश्चर्य वाटतें. या ग्रंथांतील विषयाची व्यवस्थित मांडणी, त्याची पृथक्करणपद्धति, त्याची शिकवणूक, त्याची प्रतिपादनशैली ह्या सर्वांची जितकी प्रशंसा करावी तितकी थोडीच. ग्रंथ सर्वांशीं निर्दोष उतरला आहे. " (हेसिंगरकृत " चीनदेशाचा दीप "—टाओ-टे-किंग ५,८)

> " हा एक अद्वितीय ग्रंथ आहे. ह्यांतील विचारसरणी किती भव्य ! प्रतिपादन किती तेजस्वी ! वाचकांना हा ग्रंथ विसाव्याचें स्थान वाटतो. हा ग्रंथ एक अपूर्व शक्तीचा ठेवाच आहे. ह्यांतील प्रतिपादन जितकें लोकोत्तर, तितकीच ह्याची रचना ही लोकोत्तर. गूढ व विश्वव्यापी ज्ञानाचें सूत्रात्मक ग्रथन ह्या ग्रंथांत आहे." (रे० सॅम्यूअल जॉन्सन ह्यांच्या " पौर्वात्यधर्म व त्यांचा विश्वधर्मांशीं संबंध " या विभागात्मक ग्रंथांतून; पान ८६२). आयू हेसे यांनीं " लाओट्झ: ख्रिस्तापूर्वींचा सत्यद्रष्टा " या जर्मनभाषेंत लिहिलेल्या ग्रंथांत बायबल व टाओ–टे-किंग ह्या दोन्ही ग्रंथांतील दोनशे समानार्थक कवितांची एक मोठी यादी दिली आहे.

टाओ-टे-किंग नंतरचा अलीकडील धर्मग्रंथ " टाइ-शांग-कांग यिंग-पीन " हा ग्रंथ होय. " कर्मे व त्यांचीं फळें " हा या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय. टाओ-धर्मानुयायी या ग्रंथाला टाओ टे-किंग च्या खालोखाल मान देतात. या ग्रंथांतील नीतिध्येय किती उच्च आहे हें पाहणें धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करणारांना बरेंच उपयुक्त वाटेल. ह्यांतील कांहीं उपदेशवचनें अगदीं सामान्यदर्जाचीं आहेत; तरीपण, या ग्रंथांतील कांहीं भाग नीतिशास्त्राच्या दृष्टीनें इतका उत्कृष्ट आहे कीं, त्याच्या तोडीला ख्रिश्चनेतर धर्मांतील कोणत्याही धर्माच्या ग्रंथाला बसविता येणार नाहीं. ह्यांतील सत्पुरुषाचें वर्णन खालीं दिलें आहे; त्याच्याशी समानार्थक असे अनेक उतारे बायबलांतून काढून दाखवितां येतील.

" सत्पुरुषाचें पाऊल केव्हांही वाकडें पडायचें नाहीं. सद्गुण व पुण्यकृत्यें यांचा संग्रह तो करीतच असतो. त्याची सर्वभूतीं दयादृष्टि असते. तो पत्नीशी एकनिष्ठपणानें, पित्याशी आज्ञाधारकपणें व कनिष्ठ बंधूशीं (धाकट्या भावाशीं) प्रेमळपणें वागतो. ज्येष्ठ बंधूशीं त्याचें वागणें नम्रपणानें असतें. तो आपल्या हातून घडणारी चूक सुधारून दुसऱ्यांना चांगलें वळण लावतो. त्याच्या हृदयांत आईबापावाचूनच्या बालकांबद्दल दया व विधवाविषयीं अनुकंपा असते. त्याचे मनांत वृद्धाविषयीं आदर व लहानांविषयीं प्रेम असतें. क्षुद्रजीवजंतु, गवत किंवा झाडें यांनाही तो कधीं दुखापत करीत नाहीं. दुसऱ्यांच्या दुष्टप्रवृत्तींची त्याला मना-

पासून कींव येते; व दुसऱ्याचे उत्तम गुण पाहून त्याला आनंद होतो. कोणी अडीअडचणींत सांपडला असतां तो त्याला मदत करतो, व त्याला संकटांतून सोडवितो. दुसऱ्याला लाभ झाला असता हा मलाच झाला असें तो मानतो; आणि दुसऱ्याची हानि झाली असतां ही माझीच हानि झाली असें त्याला वाटतें. दुसऱ्यांच्या दोषांची तो वाच्यता करीत नाहीं; अथवा स्वतःच्या मोठेपणाचाही तो टेंभा मिरवीत नाहीं. तो वाईटप्रवृत्तीला आळा घालून चांगल्या प्रवृत्ति लोकांच्या नजरेस आणून त्यांची महत्ता वाढवितो. तो दुसऱ्यांना सढळ हातानें देतो; पण स्वतःकरता दुसऱ्याकडून थोडेंसुद्धां घेत नाहीं. दुसऱ्यांनीं अपमान केला असता तो निमूटपणें सहन करतो; दुसऱ्यांनीं मान दिला असता त्याला घाबरल्यासारखें होतें. मोबदल्याची इच्छा न धरता तो दुसऱ्यावर उपकार करतो; आणि दुसऱ्याला कांहीं दिलें असतां त्याला त्याबद्दल मागाहून हळहळ वाटत नाहीं. अशा लक्षणांनीं जो युक्त त्याला सत्पुरुष म्हणावें. अशा सत्पुरुषाला सर्व लोक मान देतात. परमेश्वर सत्पुरुषाचा सदैव पाठीराखा असतो. सुख–संपत्ति त्याचे मागें हात जोडून धांवत येतात. विघ्नें त्याला भिऊन दूर पळतात. तो करील तें काम सिद्धीस जायचें हें ठरलेलेंच असतें. अमूर्त व शाश्वत स्वरूपांत राहणें ही गोष्ट त्याच्या हातची आहे.

ह्या टाओ–धर्माच्या दुसऱ्या धर्मग्रंथांत महत्त्वाच्या तशाच सामान्य तऱ्हेच्या आज्ञांची बरीच लांबलचक यादी दिली आहे.

"आपल्या आईबापांचे दोष उघडकीला आणूं नका; खऱ्या खोट्याचा घोंटाळा करु नका; पापी मनुष्याला उत्तेजन देऊं नका. निरपराध्यांना दंडूं नका; वाऱ्याशी भांडूं नका; पावसाशी वर्दळीवर येऊं नका; आपल्या आइबापांची आज्ञा व उपदेश अवश्य ऐकत जा; उसनें घेतलेलें जरूर फेडीत जा; परमेश्वरानें ठरवून दिलेल्यापेक्षां जास्तीची हांव धरू नका. दुष्ट उपाय योजूं नका; महिन्याचे शेवटच्या दिवशीं अथवा वर्षाच्या शेवटच्या दिवशीं नाचूं व गाऊं नका!! महिन्याच्या पहिल्या दिवशीं अथवा सकाळच्या वेळीं ओरडूं नका अथवा रागावूं नका!! उत्तरेकडे तोंड करून रडूं नका व थुंकूं नका. तुटलेल्या ताऱ्याकडे पाहून थुंकूं नका! इंद्रधनुष्याकडे बोट दाखवूं नका. एखाद्यानें एखादें वाईट कृत्य केलें व नंतर त्याला त्याचा पश्चात्ताप होऊन त्यानें कुमार्गाचा त्याग करून सन्मार्गाचें सेवन केलें, तर त्याला शेवटीं सुख लागल्याखेरीज राहणार नाहीं. असें जर आहे, तर चांगल्या कृत्याबद्दल आपल्या मनावर सक्ती कां न करा? (डग्लसकृत कान्फ्यूशियन व टाओ-धर्म २६०–२७१)

(६) ह्या धर्मांतील 'टाओ'–ही मुख्यवर्ती कल्पना

टाओ ह्या शब्दाचा व्युत्पत्त्यर्थ 'मार्ग,' हा आहे. हा चिनी शब्द टाओ–शिंटो या धर्मवाचक शब्दामधील एक भाग आहे. तेथेंही त्या शब्दाचा अर्थ मार्ग असा असून शिंटो या शब्दाचा अर्थ देवांचा मार्ग असा होतो.

ख्रिश्चनधर्माला प्रथम नुसतें मार्गच म्हणत असत. (ॲक्टस ९:२; १९:९; १९:२३; २२:४ २४:१४ २४:२२२)

कान्फ्यूशियन धर्मग्रंथांतही पूर्ण धर्मपुरुषाचा मार्ग, अथवा परमेश्वराचा पंथ ह्या अर्थी शद्ब आले आहेत.

टाओ (मार्ग) हा आहे, " जें दुसऱ्यांनीं तुम्हाला करू नये असें तुम्हाला वाटतें तें दुसऱ्यांना तुम्ही करू नका. (मध्यम मार्ग ११:३)

ईश्वराचा मार्ग (टाएन्-टाओ) हा आहे कीं, चांगल्याचें स्वागत करायचें व वाईटाचा निषेध करायचा.

मूळ ' मार्ग ' अथवा पंथ ह्या साध्या शद्बांतून विकास होत होत टाओ ह्या शद्बांचे हल्लीं तीन अर्थ प्रचलित झाले आहेत. जगाची भौतिक व नैतिक सरणि, हा एक अर्थ; बुद्धि, सत्य अथवा सत्यत्त्वाचा मार्ग, हा दुसरा अर्थ; व पूर्ण सद्गुणाचा मार्ग अथवा ईश्वराला मान्य असलेल्या जीवनाचा सन्मार्ग, हा तिसरा अर्थ. टाओ या शद्बाचा अत्युच्च व पारिभाषिक अर्थ संपूर्ण परमात्मतत्त्व. या शब्दाचें केरस हा Reason (बुद्धि) या इंग्रेजी शद्बानें भाषांतर करतो; पार्कर या शद्बाचा अर्थ ' जगन्नियंता ' असा करतो; अलेक्झांडर ' परमेश्वर ' असें त्याचें भाषांतर करतो. रेम्यूसानें केलेल्या फ्रेंच भाषांतरांत ' टाओ 'चा अर्थ परमात्मा, बुद्धि, शद्ब, ज्ञान, वगैरे शद्बांनीं व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. बायबलच्या चिनी भाषां-

तरांत ' Gospel according to st. gohn ' ह्या भागांतील पहिल्या कवितेचें भाषांतर पुढीलप्रमाणें केलें आहे:—

" सृष्टीच्या प्रारंभीं ' टाओ ' होतें; परमेश्वरापाशीं टाओ होतें; परमेश्वरच टाओ आहे."

(७) परमात्म्याची कल्पना—

टाओ–टे–किंग मधील मुख्य कल्पना एक, शाश्वत, अमूर्त, गूढ अशा परमात्मतत्त्वाबद्दलची आहे. ह्या समग्र ग्रंथांत फक्त एका ठिकाणीं परमेश्वराच्या सगुणत्वाचा उल्लेख आहे. (टी– म्हणजे शास्ता हें तें सगुणनाम. से. बु. ई मध्यें ह्या शब्दाचें भाषांतर ' परमेश्वर ' असें केलें आहे.)

' टाओ ' हें कुणापासून उत्पन्न झालें कांहीं कळत नाहीं. कारण तें परमेश्वराच्या पूर्वी होतें. (टाओ–टे–किंग ४:३) (से. बु. ई. ३९:५०)

वस्तुतः टाओ हें तत्त्व निश्चल व अनिर्वचनीय आहे. तरीपण टाओ–टे–किंग ह्या ग्रंथांत टाओच्या प्रवृत्तीचें व धर्माचें वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे.

" मूलतत्त्व; अनादि; स्वर्ग व पृथ्वीच्याही पूर्वीचें; अन्तिम; निश्चल; अरूप; अविकार्य; अशब्द " (२५: १–४.)

" सर्व वस्तुमात्राचा एकमेव विराट् आधार " (३९:१२)

" आडंबररहित जगत् निर्माण करून त्याचें विधरण करतें (५१:३-५)

" सर्वव्यापी, अकृत्रिम, सर्जक " (३२; १-२)

" परमेश्वराचा मार्ग (टाएज-टाओ) शांतपणें, निःस्वार्थपणें चांगल्याची उत्पत्ति करतो." (७: १-२; ९: १-२; ४७: १; ६८-१-२; ७३: २: ७९: ३; ८१: ३)

" अंतर्दृष्टीनेंच आकलन करण्यास योग्य " (४७: १-२; ८१-१)

" अनंताला जाणणें ही ज्ञानाची पराकाष्ठा आहे " (केरस १६: ४; ५३: ३)

" टाओ हें अनिर्वाच्य, अशब्द; आणि कल्पनातीत महत आहे. (१: १; १४: १-३; २५: १-४; ३३: १; ३८: ३)

" तरी जणुं कांहीं विश्वपिता "

" विश्वमाता पण " (१: २; ६: १; २०:२; २५:१; ५२: १-२)

" जो याला जाणतो तो या जगांत अत्युच्च पुरुष होतो. " (५६:१-३)

" ह्याला जाणणारा दीर्घायुषी व अक्षय्यशरीर होतो. " (१६:२)

" हें जाणणाराला कसलीच भीति नाहीं; कुठेंच पराभव नाहीं; त्याच्याजवळ मृत्यु जाऊच शकत नाहीं. " (केरस ५०:१-४)

" अगदीं खरें बोलायचें म्हणजे टाओ हें निष्क्रिय व निश्चल तत्त्व आहे. " (३७:१; ६२;१)

८ टाओ धर्मांतील नीतिकल्पना.—

ईश्वराप्रमाणें निश्चल, शांत व साधें होणें हें टाओ-धर्माचें नीतिध्येय आहे. टाओ धर्मांतील आदर्श पुरुष हा 'टाओ' या तत्त्वाप्रमाणेंच शांत—अक्षोभ्य—असतो असें मानतात. सनातन टाओच्या ह्या शाश्वत शांतीचीं वर्णनें अठरा समानार्थक शब्दांनीं चिनी भाषेंत केलीं आहेत. नम्रतेवर ह्या धर्मांत वारंवार भर दिलेला आढळतो.

" स्वर्ग चिरंजीव आहे, पृथ्वी शाश्वत आहे याचें कारण हीं दोन्हीं स्वतःकरता नसून दुसऱ्याकरतां अस्तित्वांत आलीं आहेत, म्हणूनच सत्पुरुषसुद्धां आपल्या व्यक्तित्वाला जगापुढें तुच्छ लेखतात; पण चमत्कार हा कीं, जों जों तो स्वतःला तुच्छ लेखतात तों तों त्यांची योग्यता वाढतच जाते. पाण्याची इतकी श्रेष्ठ योग्यता कां, तर तें 'जगाच्या कल्याणा'साठीं अवतीर्ण झालें आहे; आपल्याकडे निमुट-पणें कमीपणा घेणें ही गोष्ट लोकांना आवडत नाहीं; पण पाणी तक्रार न करता आपलेकडे कमीपणा घेतें. "
(७:१–२; ८:१; से. बु. ई. ३९:५२.)

ह्या ग्रंथांतील अत्युत्कृष्ट भागापैकीं पुढील दोन उतारे नमुना म्हणून देता येतील:—

" जे लोक माझ्याशीं भलेपणानें वागतात, त्यांच्याशीं तर मी भलेपणानें वागतोंच; पण जे लोक माझ्याशीं भलेप-णानें वागत नाहींत, त्यांच्याशींही मी भलेपणानें वागतो. अशा रीतीनें सर्वच भलेपणानें वागू लागतात. जे लोक माझ्याशीं सरळपणानें वागतात त्यांच्याशीं तर मी सरळ

वागतोच, पण जे माझ्याशीं सरळ वागत नाहींत त्यांच्याशींहि मी सरळ वागतों. अशा रीतीनें सर्वच सरळ वागू लागतात. (४९:२; से. बु. ई. ३९:९१)"

" अपकाराची फेड उपकारानें करा "

(६८:१ से. बु. ई. ३९:१०६)

आदर्श पुरुष हा शांत, ' आत्मन्येवात्मना तुष्टः ' (आत्मतुष्ट) व जगाविषयीं उदासीन वृत्तीचा असा असतो. परमात्म्याचेंही याच शब्दांत वर्णन करता येईल.

" अत्यंत निर्लोभवृत्ति बाळग; व अत्यंत शांत रहा."
(१६:१; पार्करचें भाषांतर)

" सत्पुरुष हा जगाविषयीं अत्यंत उदासीन असतो. "

(४९:३)

" महत्वाकांक्षेला स्वैर सोडणें—यासारखा घोर अपराध दुसरा कोणताही नाहीं; आपल्या नशिबीं जें असेल त्याबद्दल हळहळत बसणें यासारखें दुसरें दुःख नाहीं. ' मला हें हवें तें हवें ' अशी सारखी इच्छा करीत राहणें हा एक भयंकर गुन्हा आहे. संतोषवृत्तीनेंच शाश्वत सुख मिळतें."—

(४६:२)

" स्वर्ग व पृथ्वी यांच्यांत दयेचा भाव मुळींच नाहीं. जगांतील हजारों वस्तु त्यांना कस्पटाप्रमाणें वाटतात. साधुपुरुषांतही दयाभाव नसतो. पृथ्वीवरील हजारों कुटुंबाची त्याला काडीइतकीही किंमत

नसते. (५:१; केरस–लाओट्झकृत टाओ–टे–
किंग ९९)

टाओ–धर्मांमधील एक शब्द अत्यंत अपूर्व असा आहे, आणि तो म्हणजे ' वुइ–बी ' याचा "निष्क्रियता" "स्वस्थ बसणें" किंवा "कूटस्थता" असा अर्थ करतात. विश्वघटनेचा कूटस्थता हा नियमच आहे. (२:३) निश्चल व शांत पुरुषच यशस्वी होतो. (२९:१)

म्हणूनच साधुपुरुष म्हणतो " मी 'वुई–बी' चें आचरण करतो. " (केरसचें भाषांतर)

अगदीं साधें वागा. सदैव संतुष्ट रहा. लढाई, राज्यकारभार वगैरेच्या अगदीं भानगडींत पडू नका. लेखन, प्रवास हींही नकोत. मृत्यूला भिऊ नका. (८०; १–५) " टाई–शांग " या अर्वाचीन धर्मग्रंथांतही अशाच तऱ्हेचें उच्चनीच तत्त्वांनीं युक्त नीतिध्येय आहे.

(९) टाओ–धर्मांतील अलीकडील धर्मगुरु—

या धर्माच्या संस्थापकाच्या मरणानंतर शंभर–सवाशें वर्षे नांव घेण्यासारखा असा एकही धर्मगुरु या धर्मांत झाला नाहीं. पण नंतर ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकाचे सुमारास लीट्झे यानें कांहीं अत्युच्च धर्मतत्त्वाचें प्रतिपादन केलें. ह्याचें "टाओ–धर्मोपदेशक" म्हणून लिओनेल जाइल्स यानें इंग्रजींत भाषांतर केलें आहे.

" माझ्याजवळ अशी एक गूढ विद्या आहे कीं, त्याच्या योगानें साम्राजांतील प्रत्येक स्त्रीपुरुष व मूल ह्यांना एकमेकावर प्रेम करण्याची स्फूर्ति होईल. ह्या तुमच्या सत्सं-

कल्पांत खरी कळकळ असेल तर आपल्या राज्यांतील प्रत्येक मनुष्य तुह्माला सुखी करता येईल." (५६-५७).

" ज्यानें टाओ—तत्त्वाशीं साधर्म्य प्राप्त केलें त्याला जगांतील बाह्य वस्तूशीं साधर्म्य प्राप्त करून घेतां आलें म्हणून समजण्यास हरकत नाहीं. अशा मनुष्याला जगांतील कोणतीही वस्तु विघ्न अथवा अपाय करूं शकत नाहीं. घन पदार्थ (धातु, पाषण इत्यादि) यांतून आरपार जाणें; अग्नीवरून चालत जाणें, पाण्यावरून चालत जाणें, ह्या गोष्टी त्याला सहज करता येतात." (५१)

या शेवटच्या उताऱ्यावरून हें उघड दिसतें कीं, लीट्झेच्या उच्च ध्येयांत क्षुद्रसिद्धि प्राप्त करणें हें हलक्या प्रकारचें ध्येयही मिसळलेलें दिसतें. कोणत्याही तऱ्हेचा भेदभाव उपयोगाचा नाहीं, नीतिदृष्टया मान्य असलेला भेदभावही निषिद्ध आहे, असें लीट्झ ह्मणतो. (जाइल्स टाओ-धर्मोपदेश ४४-४५) चमत्कार व जादूटोणा ह्यांचें या ग्रंथांत ज्ञानाशीं मिश्रण झालेलें आढळतें (४४—४५). निसर्गाचें अनुसरण करण्याचें पर्यवसान जडपूजेंत झालें आहे (५४—५५). शून्यमनस्कता ही श्रेयस्कारक स्थिति आहे, असें ह्यांत मानलें आहे (७१). ज्याला ईश्वराचा साक्षात्कार झाला आहे, अशा सत्पुरुषाचें मुख्य लक्षण म्हणजे जीवन व समाज याविषयीं आत्यंतिक उदासीनता; असें ह्या धर्मांत सांगितलें आहे (७८-७९).

कांगझे ह्या ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकांत होऊन गेलेल्या दुसऱ्या एका टाओ—धर्मांतील ग्रंथकारानें लिहिलेले ग्रंथ अत्यंत

लोकप्रिय आहेत. पिल्ग्रिम्स प्रोगेस हें पुस्तक लिहून त्याद्वारें आपलीं धर्मतत्त्वें ज्याप्रमाणें जॉन बन्यननें प्रसृत केलीं, त्याप्रमाणें ह्या ग्रंथकारानेंही हुबेहूब वर्णणानीं; काल्पनिक संभाषणानीं सार्थ विशेषनामांच्या प्रयोगानें, मार्मिक सुभाषितांनीं व चमत्कृतिजनक विरोधाभासांनीं आपल्या धर्मतत्वांचा प्रसार केला आहे. इ. स. ६०० च्या सुमारास त्याच्या ग्रंथाच्या जवळजवळ वीस आवृत्या निघाल्या होत्या. सन ७४२ मध्यें बादशाही हुकमानें त्याची सत्पुरुष ह्मणून पूजा होऊं लागली. कांगझेनें टाओ–धर्मांतील प्रमुख तत्त्वांचाच पुनरुच्चार केला आहे.

" टाओ हें विश्वतत्त्व अदृश्य, अश्राव्य, अशब्द, अनिर्वाच्य व अकथनीय आहे " (सं. बु. ई. ४०; ६८-६९) पूर्ण पुरुष हा टाओप्रमाणेंच शांत असतो. (से. बु. ई. ३९:१९२-१९३) सृष्टीच्या प्रारंभीं असलेलें कृतयुग ह्यालाच आम्हीं आदर्श स्थिति ह्मणतों. (से. बु. ई. ३९:२७८)

शून्यता; निश्चलता, प्रशांतता, अरसता, निःशब्दता, निष्क्रियता हीं सर्व स्वर्ग व पृथ्वी यांच्या साम्यावस्थेचीं लक्षणें आहेत. पूर्णस्वरूप टाओचीही हींच लक्षणें समजावीं. (से. बु. ई. ३९:३३१)

प्रत्यक्ष स्वतःच्या व्यक्तित्वाविषयीं संशय घेण्याचें धर्मसाहित्यांतील अपूर्व उदाहरण ह्मणजे कांगझेंचा " फूलपाखराचें स्वप्न " हा लेख होय. " पूर्वजन्मीं कांगझेला मी फुलपाखरूं आहें असा भास झाला, कीं एका फुलपाख-

राला 'मी कांगझे' आहे असा भास झाला, हें मला नीट सांगतां आलें नाहीं. (से. बु. ई., ३९:१९७)

(१०) टाओ धर्माचा इतिहास

गेलीं सुमारें २५०० वर्षें टाओधर्म हा चीनमधील मुख्य असा कान्फ्यूशियन धर्माला टक्कर देत राहिला आहे; ख्रिस्ती-शकानंतर ह्या दोन विरोधी धर्मांच्या तोडीला बौद्धधर्म हा तिसरा धर्म आला. जुन्या काळांत टाओ-धर्माला कांहीं चिनी बादशाहांनीं आश्रय दिला होता. तरीपण ह्या धर्माच्या शुद्ध स्वरूपाची अवनति झाल्यामुळें त्याला मानाचें स्थान असें बहुतेक मिळालेंच नाहीं. टाओ-धर्माचा परदेशीं प्रसार करणारा धर्म-प्रचारक संघ केव्हांच नव्हता. ह्या धर्मांत धर्मसुधारकही फारसे झाले नाहींत. अमुक वेळीं चीनच्या बादशाहांनीं आश्रय देऊन या धर्माला उर्जितावस्थेला आणले; अथवा अमुक वेळीं आश्रयाच्या अभावीं या धर्माला उतरतीकळा लागली, ह्याखेरीज ऐतिहासिक घटना ह्या धर्मांत फारशा घडल्याच नाहींत.

ख्रि. पू. २१२	शीं हुअंगटी ह्या बादशहानें कान्फ्यूशियस धर्म-ग्रंथ जाळून टाकले; टाओ धर्माची स्थापना केली; व अमृतवल्लीचा शोध लावण्याकरता पऱ्यांच्या बेटावर एक गलबतांचा काफला पाठविला ! !
इ. स. १............	चीनमधील एक प्रसिद्ध टाओ-धर्मगुरूनें अमरत्व प्राप्त करून देणारी गोळी तयार करण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १५६........ चीनच्या 'व्हान' नांवाच्या बादशहानें प्रथम लाओट्झप्रीत्यर्थ यज्ञ केला.

इ. स. ५७४-५८१ वु ह्या बादशहानें टाओ, बौद्ध व कान्फ्यूशियन या धर्मांमध्यें उच्चनीचभाव ठरवून टाकला. पहिलें स्थान त्यानें कान्फ्यूशियन धर्माला दिलें; दुसरें स्थान टाओ धर्माला; व तिसरें स्थान बौद्धधर्माला. तथापि, लौकरच त्याला शेवटच्या दोन्ही धर्मांचा कंटाळा आला, तेव्हां त्या धर्मांची हकालपट्टी करण्याचा त्यानें हुकूम सोडला. यानंतरच्या त्सिंग या चिनी बादशहानें मात्र ह्या दोन्हीही धर्मांची पुन्हां स्थापना चीनमध्यें केली.

इ. स. ६५०-६८४ लाओट्झची देवता म्हणून पूजा सुरू झाली. सरकारी जागेबद्दलच्या परीक्षेला त्याचे ग्रंथ नेमण्यांत आले.

इ. स. ७१३-७४२ काई युअेन ह्या बादशहानें 'टाओ-टे-किंग' या ग्रंथाच्या प्रती आपल्या साऱ्या राज्यांत वांटल्या. टाओधर्मांतील 'सुवर्ण-शिला' नांवाचें औषध त्यानें पोटांत घेतलें........जादुटोण्याचा प्रकार वाढत चालला.

इ. स. ८२५-८२७ पाओली या बादशहानें आपल्या राज्यांतून टाओ-धर्मानुयायी वैद्यांची हकालपट्टी केली. व त्यांना थेट दक्षिण चीनकडे रवाना केले. हे वैद्य ढोंग व गुप्त-कारस्थानें यांत तरबेज होते; हेंच त्यांच्या उचलबांगडीचें कारण.

इ. स. ८४१ ते ८४७ वू त्संग ह्या बादशहानें सर्व टाओ व बौद्ध मठ (जोगी व जोगिणी या दोघांचेही) बंद करून टाकण्याचा हुकूम सोडला. पण पुढें त्यानेंच टाओ-धर्माला आश्रय देऊन, "परधर्म" म्हणून बौद्ध धर्मावर शिक्का मारला. आपलीं हाडें दिव्य बनविण्याकरता टाओ-धर्मानें सांगितलेलें औषध त्यानें घेतलें; ह्या औषधाचें योगानें अंतरिक्षांतून परीप्रमाणें उडतां येईल अशी त्याची कल्पना होती.

इ. स. १६६१-१७२१ कांग सी या बादशहानें टाओ वैद्य बुवांना व त्यांच्या रोग्यांनाही शिक्षा ठोठवावी असा हुकूम सोडला. टाओ-धर्मानुयायांच्या सभा व मिरवणुकी यांना बंदी केली; व टाओ-धर्मांतील अनेक पंथ चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला.

सन १९०० .... बाक्सर बंडाच्या धामधूमींत कट्टर टाओंचा एक नवा पंथ निघाला. या पंथांतील लोक असें मानीत कीं, परकीयांच्या बंदुकींतून सुटलेल्या गोळ्या आम्हांला कांहींही इजा करूं शकणार नाहींत. त्यांच्या ह्या अजब विश्वासाचें मूळ म्हणजे त्यांच्या धर्म-संस्थापकाचे पुढील शब्दः—

"ते सैनिकांच्या गर्दींत घुसले, तरी त्यांना शस्त्रास्त्रांचीं मुळींच भीति नाहीं." (टाओ-टेकिंग ५०:४ केरसचें भाषांतर)

११ आधुनिक टाओ-धर्म.

ह्या धर्माच्या संस्थापकानें प्रतिपादिलेलीं उच्च तत्त्वें व त्याचे प्रत्यक्ष व्यवहारांत परिवर्तन यांत जमीन-अस्मानाचा फरक दिसून येतो. तरीपण मूळ "टाओ-टे किंग" या ग्रंथाच्या पायावर पुढील काळांतील टाओधर्म उभारला गेला आहे. फक्त अलिकडच्या काळातील धर्मगुरूंची परंपरा व गादी ह्याला ह्या ग्रंथांत आधार सांपडत नाहीं. समाजांत माजलेल्या बखेड्याविरुद्ध या धर्माच्या संस्थापकानें जें बंड उभारलें व त्यावर असल्या नीतिध्येयांची उपाय योजना केली, त्याचा अल्पांशसुद्धां अलीकडील धर्मांत दिसून येत नाहीं. टाओ-धर्मांत प्रथम पासूनच गूढपणा भरला होता; पण आजपर्यंतच्या इतिहासकालांत ह्या

गूढतेचें पर्यवसान जादुटोणा व इतर अशास्त्रीय प्रकारांत झालें आहे. एकंदरीनें या धर्माचा इतिहास फारच खेदकारक आहे. ह्या धर्माची सुरवात झाली तेव्हां त्यांतील कांहीं गोष्टी निसंशय कौतुक करण्यासारख्या होत्या; पण पुढें पुढें त्याची संपूर्ण अवनति झाली. आज ह्या धर्मात ' अनेक-देवतावाद, भूतप्रेतपूजा, चेटूक, चमत्कार याखेरीज दुसरें कांहीं सांपडत नाहीं.

" हल्लींच्या टाओ-धर्मगुरूंचा धंदा म्हटला म्हणजे देवांचा प्रसाद देणें, आणि रोग व भूतबाधा होऊ नये म्हणून ताईत, गंडे, दोरे वगैरे विकणें हा आहे. (जाइल्स कान्फ्यूशियनधर्म व त्याचे विरोधी धर्म १७८)

सामान्यत: टाओ-धर्मगुरूंचें नैतिक आचरण आक्षेपार्ह असतें. पूर्वीच्या धर्मग्रंथांतून वर्णिलेली अमर-टाओची अविकृत स्थिति प्राप्त करण्याचा हल्लींचा सोपा उपाय म्हटला म्हणजे, संसारत्याग करून मठांत जाऊन राहणें व सर्वथैव निष्क्रिय राहून अत्यंत दीर्घायुषी होणें हा होय. आजकाल ज्यांना ज्यांना म्हणून टाओ-धर्माची प्रत्यक्ष माहिती आहे, ते ते तज्ज्ञ या धर्माची उघड निंदा करतात.

" ह्या धर्माची अवनति होऊन त्यांत कित्येक विचित्र प्रकार शिरले आहेत. उदाहरणार्थ:—

" अत्यंत पतित अशा मूर्तिपूजकांच्या धर्माच्या खालोखाल ह्या धर्माला लोक अवनत समजतात. " (डग्लस कान्फ्यूशियनधर्म व टाओधर्म २८७)

" आज अनेक शतकें टाओ-धर्म हा एक निंदावाचक शब्द होऊन बसला आहे. हा पंथ म्हणजे जादु-टोण्याचें व ठगबाजीचें एक विचित्र भारुड आहे." हें भारुड राष्ट्रांतील अत्यंत हीनदर्जाच्या लोकामधून आलेल्या धर्मगुरूंनीं रचलें आहे. (एल. जाइल्स लोट्झ वचनसंग्रह १७–१८)

" चीनमधून टाओधर्माचें संपूर्ण उच्चाटन झाल्याशिवाय चीनची राजकीय, नैतिक व धार्मिक परिस्थिति सुधारण्याची फारशी आशा नाहीं. चीनच्या सर्व अनर्थाचें मूळ हा धर्म आहे." (एच्. एस्. डयूबॉस यांचा " प्रचारकधर्म " हा ग्रंथ १८१)

१२ टाओ धर्माच्या प्रबलतेचीं कारणें—

(अ) प्रत्येक मनुष्यव्यक्तीचा परमात्म्याशीं अगदीं निकट संबंध आहे हें ह्या धर्माचें मत.

(आ) पूर्ण अथवा आदर्श पुरुषाला ईश्वरी मार्ग अनुसरलाच पाहिजे ही या धर्माची शिकवणूक.

(इ) अपकाराची फेड उपकारानें करावी हा ह्या धर्माच्या संस्थापकाचा उपदेश.

(ई) पुढील अवनत कालांतही ह्या धर्मांतील आदर्श पुरुषाचें ध्येय कायम राहिलें.

१२ या धर्मांतील ठळक व्यंगें:—

(अ) ह्यांतील परमात्मा पुरेसा सगुणही नाहीं व जगद्-व्यवहाराबद्दल पुरेसा जबाबदारही नाहीं.

(आ) ह्या धर्माचा संस्थापक विघ्नांना भिऊन निवृत्तपर बनला व सुधारणेविषयीं त्यानें मुळींच खटपट केली नाहीं.

(इ) जगांत पाप आहे ही गोष्ट त्यानें अर्धवट मान्य केली आहे.

(ई) आधिभौतिक तत्त्वें ह्या धर्माला फारशी मान्य नाहींत. त्यामुळें ह्या धर्म शास्त्रीय शोधाचे बाबतींत प्रति-गामी आहे.

(उ) पुरुषप्रयत्नाला ह्या धर्मांत फारशी किंमत नाहीं, कारण ह्यानें निष्क्रियतेवर फाजील भर दिलेला आहे.

(ऊ) जीवनाला अनुकूल असें एकही उत्साही तत्त्व या धर्मांत नाहीं. यांतील उपदेश मुख्यत: निषेधात्मकच आहे.

(ऋ) बेजबाबदार उदासीनता हें या धर्माचें नैतिक ध्येय.

(ऋ) अमरत्वाची या धर्मानें केलेली कल्पना अगदीं अस्पष्ट आहे. दीर्घायुष्य हेंच अमरत्व ही या धर्माची कल्पना !

(ऌ) समाजोद्धाराविषयीं या धर्मांत कसलाही कार्यक्रम नाहीं; नाहीं म्हणायला मूळ जंगली स्थितीप्रत पोंचणें हा या धर्माचा समाजसुधारणेबद्दलचा उपाय.

(ॡ) ह्या धर्माची अवनति होऊन त्याच्यांत अनेक देवता-पूजा, वेतालपूजा व जादूटोणा हे प्रकार शिरले.

प्रकरण आठवें

शिन्टोधर्म.

निसर्गपूजा, सम्राटपूजा व पावित्र्य यांचा धर्म

१ विद्यमान धर्मांत याचें स्थान.

जपानचा अत्यंत प्राचीन असा हा राष्ट्रधर्म जागतिक धर्मांत तिसऱ्या नंबरचा प्राचीन आहे, असें ह्मणतां येईल. कारण, त्या धर्माविषयींची प्रचलित परंपरा खि. पू. ६६० पासून सुरू होते. अलीकडील सूक्ष्म अभ्यासावरून असें दिसतें कीं, हा समय बराच अलीकडे आणला पाहिजे. तरीपण, एवढी गोष्ट निश्चित आहे कीं जपानच्या इतिहासाची जेव्हांपासून सुरवात झाली, तेव्हांपासून शिंटो हा धर्म जपानी लोकांची धर्माचे बाबतींतील विशिष्ट मनोरचना दर्शवीत आहे.

आपल्या अनुयायांच्या पुढें एक विशिष्ट राजकीय सिद्धांत ठेवून त्यांच्यांत राष्ट्रीय स्थैर्य उत्पन्न करणें या बाबतींत या धर्मानें मोठीच कामगिरी बजावली आहे. या दृष्टीनें पाहतां जगांतील धर्मांत हा एक अपूर्व धर्म आहे. या धर्माच्या पवित्र धर्मग्रंथांत " परमेश्वरानें पृथ्वी उत्पन्न करण्याचे वेळीं सगळ्यांत पहिल्यानें

जपान हें बेट निर्माण केलें; व त्यावर राज्य करणारा पहिला मिकाडो हा सूर्यदेवतेचा पृथ्वीवर आलेला पहिला वंशज होय " असें म्हटलें आहे.

" जा ! माझ्या भव्य वंशजा ! तेथें जा आणि राज्य कर. तुझ्या घराण्याची भरभराट होवो; स्वर्ग व पृथ्वीप्रमाणें तुझा वंश अक्षय्य टिको." (निहान-गी १:७७)

जपानच्या या राष्ट्रधर्मानें ' जपानचें राज्य व भूमि हीं खास ईश्वरी योजनेनें अस्तित्वांत आलीं आहेत व जपानचा राजवंश हा यावच्चंद्रदिवाकरौ टिकणार आहे ' हा विश्वास सत जपानी लोकांच्या मनांत सतत जागृत ठेवला आहे. सन १८८९त जपानला इतर राष्ट्राच्या राजपद्धतीप्रमाणें एक राजपद्धति असावी या उद्देशानें एक नवी राजघटना तयार करण्यांत आली, तिचे प्रारंभीं असें स्पष्ट सांगण्यांत आलें आहे कीं जपानचा आपल्या राष्ट्रधर्मावरील विश्वास अचल आहे. याशिवाय त्या घटनेच्या प्रास्ताविक भागांत "अनादि कालापासून अखंड परंपरेनें चालत आलेल्या सिंहासनावर मिकाडो राजे बसतात" अशी घोषणा केली आहे. जगांतल्या एका अत्यंत जुनाट राजघराण्याला धर्माच्या पायावर अधिष्ठित करण्याचें श्रेय ऐतिहासिक दृष्ट्या शिंटो या धर्माला जरूर देतां येईल.

परधर्मविषयीं सक्रिय सहिष्णुतेच्या बाबतींत हा धर्म खरो-खरी अपूर्व आहे. शिंटोधर्माच्या इतिहासांतच असें नमूद केलें आहे कीं हा धर्म सुमारें चौदाशे वर्षें कानफ्यूशियन व बौद्ध या दोन धर्मांच्या मांडीला मांडी लावून गुण्यागोविंदानें नांदत आहे. इ. स. ६०० पासून टाओ-धर्मानें आपलें कायमचें ठाणें जपानांत दिलें आहे. या धर्माला जपानांत मिळालेलें रूढ नांव

'कमि-नो-मिची' हें आहे. याचा अर्थ 'देवांचा मार्ग.' तथापि, या धर्माचें अत्यंत प्रचलित नांव शिंटो हें आहे. शिंटो-शिन-टाओ यांतील टाओ या शब्दावरून ही गोष्ट उघड दिसून येतें कीं, या धर्मांत टाओ धर्मांतील विशिष्ट अंश आलेला आहे. तथापि, जपानी इतिहासावरून (निहॉन-गी २–१९५) असें दिसतें कीं, जपानच्या एका बादशहाला 'देवांचा मार्ग' न आवडल्यामुळें त्यानें जाहीररीत्या बुद्धधर्माचा स्वीकार केला.

शिंटो-धर्मानें इतर धर्मांतील लोकांना आपल्या धर्मांत खेंचण्याचा अथवा त्यांना छळण्याचा प्रकार केव्हांही केला नाहीं. फक्त राजसत्तेविषयीं एकनिष्ठ राहण्याचे बाबतींत परधर्मीयांवर सक्ती होत असे. शिंटो हा धर्म व्यक्तिसंस्थापित नसल्यानें व्यक्तिनिष्ठ धर्मानुभव व निष्ठा इतर व्यक्तिसंस्थापित धर्मांप्रमाणें उत्कटत्वानें या धर्मांत दिसून येत नाहींत. अलीकडे जपान, युरोप व अमेरिका या ठिकाणचें धर्मविषयांतील तज्ज्ञ शिंटो-धर्माला मुळीं धर्मच मानायला तयार नाहींत. त्यांचे म्हणणें असें कीं, हा धर्म नसून देशभक्तीचा एक पंथ आहे.

२ शिंटो-धर्मांतील धर्मग्रंथ—

खुद्द जपानमध्यें या धर्मांतील दोन ग्रंथ अत्यंत महत्वाचे व प्रामाणिक असे मानले जातात. ह्या ग्रंथांत मनुष्यें उत्पन्न होण्यापूर्वीच्या देवयुगांतील देवांचीं संभाषणें व त्यांनीं केलेलीं कार्यें ह्यांची हकीकत दिली आहे. याशिवाय जपानची ईश्वरानें खास उत्पत्ति कशी केली तें सांगून एक हजार वर्षांत होऊन गेलेल्या जपानी राजांच्या कारकीर्दींची हकीकतही या ग्रंथांत दिलेली आहे. ह्यांतील पहिल्या ग्रंथाचें नांव "को-जिकी" म्हणजे 'पुराण वृत्तांताचा संग्रह.'

दुसऱ्या ग्रंथाचें नाव ‘ निहोन्–जी ’—याचा अर्थ ‘ जपानचा वृत्तांत. ’ पहिल्या ग्रंथांतील प्रस्तावनेवरून त्याचा रचनाकाल सन ७१२ हा नक्की करतां येतो. दुसऱ्या ग्रंथावर मूळ ग्रंथानंतर शंभर वर्षांनीं एक टीका लिहिली आहे. त्यावरून मूळ ग्रंथाच्या रचनेचा काल ७२० सन हा आहे. असें निश्चित सांगता येतें. ह्या रचनाकालावरून उघड दिसतें कीं, जगांतील विद्यमान धर्मांतील ग्रंथांत शिंटो धर्म-ग्रंथांचें स्थान अगदीं अर्वाचीन आहे; कारण हे ग्रंथ महंमदाच्या जन्मानंतर शंभर वर्षांनीं रचले गेले. मानवी इतिहासांत जुन्यांत जुना वृत्तांत जर कोणता नमूद केला गेला असेल, तर तो निम्मू टेनो या पहिल्या मिकाडो राजाच्या राज्यारोहणसमारंभाचा. हा समारंभ खिस्तपूर्व ६०० वर्षीं झाला. ह्या समारंभकालानंतर १३०० वर्षांनीं शिंटो-धर्म-ग्रंथांची रचना झाली. तरीपण जपानांतील पुस्तकें लिहिण्याचा जुन्यांत जुना नमुना म्हणून या ग्रंथांचा निर्देश करतां येईल.

‘ को—जिकी ’ या धर्मग्रंथाचा कर्ता ग्रंथांच्या प्रस्तावनेंत आपला स्वतःचा वाचकांना परिचय करून देतांना म्हणतो, “ मी राजदरबारीं पांचव्या दर्जाचा एक सरदार आहे. प्राचीन कालांतील सुभाषितांचा व राजे लोकांच्या वंशावलींचा संग्रह करून त्याला व्यवस्थितरूप देण्याची बादशहानें मला आज्ञा केली आहे. मला ह्यांतील सर्व माहिती एका अपूर्व ‘ पुराणिका ’च्या तोंडून मिळालेली आहे. हा पुराणिक इतका बुद्धिशाली आहे कीं, त्यानें एकदा एखादा ग्रंथ वाचला कीं तो त्याला तोंडपाठ झालाच म्हणून समजावें; आणि एकदा ऐकलेली हकीकत त्याच्या ध्यानांत कायमची राहते.”

"थोड्याच वर्षांनीं येथील राजघराण्याची महत्वाची हकीकत नष्टप्राय होईल असा रंग दिसतो. म्हणून वेळेवरच या राजघराण्याचा इतिहास, त्यांतील हकीकतीची योग्य निवड करून, जुनी माहिती नीट तपासून, व्यवस्थित स्वरूपांत देण्याचा आमचा विचार आहे."
(को-जिकी. १, ९, ११, १३)

दुसरा ग्रंथ 'निहॉन-गी.' याच्या टीकेंत असें लिहिलें आहे कीं, प्रथमग्रंथाच्या कर्त्यानेंच निहॉग-गी हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ प्रथमग्रंथानंतर आठ वर्षांनीं ग्रंथकारानें बादशहाच्या आज्ञेनें लिहिला. हा ग्रंथ लिहिण्यांत त्याला राजघराण्यांतील एकानें बरीच मदत केली. पहिल्या ग्रंथापेक्षां हा ग्रंथ बराच विस्तृत असून त्यांत विविध प्रकारची हकीकत आली आहे. अर्थात् हा ग्रंथ लिहिण्याचा उद्देश व पहिला ग्रंथ लिहिण्याचा उद्देश अगदीं एकच होता.

आजपर्यंत ह्या दोन ग्रंथांना अत्यंत विश्वसनीय ऐतिहासिक ग्रंथाचें प्रामाण्य देण्यांत येत असे. पण सन १८९३ मध्यें टोकिओ युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर क्यूमे ह्यांनीं ह्या ग्रंथाचा सूक्ष्म व मार्मिक अभ्यास करून असें सिद्ध केलें कीं, या ग्रंथांना ऐतिहासिक दृष्ट्या प्रमाणभूत ग्रंथ मानता येणार नाहीं. ह्या त्यांच्या विधानानें शिंटो-धर्मांतील पुराणमतवादी लोकांच्या श्रद्धेला आघात बसल्यासारखे झाल्यामुळें प्रोफेसरमजकुरांना आपल्या जागेला मुकावें लागलें!

जगांतील कोणत्याही धर्मग्रंथापेक्षां को-जिकी या ग्रंथांत अश्लीलपणा जास्त भरला आहे. इंग्रेजी भाषांतरकारानें या

गोष्टीचा प्रस्तावनेंत पांच वेळा उल्लेख केला आहे. निदान सोळा पानावरील मजकूर इतका अश्लील आहे कीं, त्याचें इंग्रेजी भाषांतर आम्हाला करता येत नाहीं असें भाषांतर कर्त्यानें स्वच्छ कबूल केलें आहे; व त्याचे लॅटिनमध्यें भाषांतर केलें आहे. (को-जिकी पान ४)

शिंटो धर्मांतील तिसरा महत्त्वाचा ग्रंथ येंगीशिकी (येंगी-कालखंडांतील संस्था) हा होय. (सन ९०१--९२३) या ग्रंथांतील पन्नास अध्यायापैकीं पहिल्या दहा अध्यायांत या धर्माच्या माहितीबद्दलची जुन्यांत जुनी सामग्री मिळते. या ग्रंथांत विविध धर्मविधींच्या प्रसंगीं म्हटल्या जाणाऱ्या ' नोरीट् ' नांवाच्या पंचवीस प्रार्थनांचा संग्रह आहे. दरवर्षी पिकें आल्या-वर एक धार्मिकविधि केला जात असे, त्या प्रसंगीं म्हणायची प्रार्थना नमुना म्हणून खालीं दिली आहे:—

क्षेत्रपतिरूप परमेश्वर, कणसांचे घोसच्या घोस मिळतील इतकें पीक मला देईल तर मी पहिल्या पिकापैकीं हजार कणसांचा एक मोठा ढीग करीन. त्यावर मधाचे घडे ठेवीन व ते सर्व क्षेत्रप-तीला अर्पण करीन. याशिवाय त्याचेबरोबर पांढरा घोडा, पांढरें डुक्कर, व पांढरा कोंबडा—हीं सर्व त्याला अर्पण करीन. मग बाकीचें पीक मी माझ्या करता घेईन. (साटो ' एशिआटिक सोसायटी ऑफ जपान ' चा लेखसंग्रह पा. ७:१०५, १०९. १११)

चवथा महत्त्वाचा शिंटो—ग्रंथ 'मॅन्योशियू हा होय. ह्याचा अर्थ ' दहा हजार पृष्ठांचा संग्रह.' ह्यांत ४४९६ कवितांचा संग्रह असून त्याची रचना इ. स. च्या ५ पासून ८ व्या शतका-

पर्यंत केव्हांतरी झाली असावी. ह्यांतील खालील कविता नमुना म्हणून दिली आहे:—

" स्वर्ग व पृथ्वी यांच्या उत्पत्तीनंतर देवांनीं एक सभा भरविली; त्या सभेंत असंख्य देव आले. त्यांनीं स्वर्गाचें राज्य सूर्यदेवतेच्या हातीं दिलें; आणि त्या देवतेच्या पौत्राला सुंदर भातकणसांची ही भूमि त्यानीं दिली व त्याला सांगितलें कीं, ' स्वर्ग व पृथ्वी आहे तोपर्यंत तूं व तुझे वंशज देवाप्रमाणें ह्या भूमीवर राज्य करतील ". (आस्टन-जपानी साहित्याचा इतिहास ३६)

ह्या सर्व धर्मग्रंथांत विविध पुराण-कथा, वृत्तांत, पोवाडे आणि जपानचे द्वीपसाम्राज्याचा प्राचीन इतिहास व जपानच्या राजांची ईश्वरापासून उत्पत्ति यावर कविता, या सर्वांचा संग्रह आहे. निसर्गशक्तींबद्दल उत्कट आनंद व निसर्गाच्या भयानक स्वरूपाची जाणीव ह्या ग्रंथांत दिसून येते. परंतु साधारणतः धार्मिक साहित्यांतील करुण व भव्य विषय ह्या ग्रंथांत मुळींच आढळत नाहीं. उदाहरणार्थ, मानवी कर्तव्यांचा झगडा, नैतिक ध्येयासंबंधीं गुंतागुंतीचे प्रश्न, पुण्य व पाप या बाबतींत मानवी हृदयांत चाललेलें दारूण युद्ध, धर्मसंस्थापक अशी एक ऐतिहासिक व्यक्ति, सद्गुणाकरता धडपडणाऱ्या व्यक्तीला मिळणारें प्रभूचें साहाय्य व कृपा, अखिल जगाची क्रमविकासात्मक योजना, मरणोत्तर स्थितीची महत्त्वपूर्ण गूढता यापैकीं कोणताही विषय या ग्रंथांत आलेला नाहीं.

(३) देवताविषयक कल्पना:—

जपानी भाषेंत देव व देवता याबद्दल ‘ कामी ’ हा शब्द रूढ आहे. या शब्दाचा मूळ अर्थ ‘ वरिष्ठ ’. जपानांत शिंटो-धर्मावर अगदीं नुकतेंच लिहिलेल्या एका पुस्तकांत या ‘कामी ’ शब्दाची व्युत्पत्ति व अर्थ सोळा प्रकारचा दिला आहे, व खालील तीन वर्गांत त्या सर्वांचा समावेश केला आहे. (१) शुद्ध अथवा तेजस्वी (२) वरिष्ठ, (३) विचित्र, गूढ भयानक, गुप्त, अतिमानुष. इतक्या विविध अर्थांचा समावेश करणारा आणि जपानांतील व इतर भाषांतरकारांना पदोपदीं नडणारा असा दुसरा कोणताही शब्द मूळ जपानी भाषेंत नाहीं. (होल्टोम पा. ४९: २. १२९)

ह्या ‘ कामी ’ शब्दांतील विशिष्ट कल्पना प्रथम मोतूरी (१७३०-१८०१) या अत्यंत श्रेष्ठ शिंटो-धर्मशास्त्राभ्यासी विद्वानानें आपल्या ग्रंथांत विशद करून सांगितली आहे. त्या ग्रंथांतील प्रस्तुत कामी शब्दाच्या विवेचनाचा पुढील उतारा ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत प्रमाणभूत मानला जातो:—

“ केवळ मनुष्य प्राणीच नव्हे, तर पशु-पक्षी, वृक्ष-वनस्पती, समुद्र-पर्वत व इतर ज्या ज्या वस्तु विलक्षण व लोकोत्तर शक्तींनें युक्त असल्यामुळें भयप्रद व आदरणीय आहेत, त्या सर्वांना ‘ कामी ’ हें नांव लावतां येतें. परंतु उपयुक्तता, चांगुलपणा अथवा अत्यंत उदात्तपणा ह्या बाबतींत श्रेष्ठ असलेल्या वस्तूंनाच ‘ कामी ’ ही संज्ञा लावतां येते असें नाहीं. विश्वांतील गूढ व दुष्ट पदार्थांनाही ‘ कामी ’ म्हणतात—कारण ते पदार्थही भयप्रद

आहेत. आजपर्यंतचे मिकाडो राजे; प्राचीन व अर्वाचीन काळच्या दैवीसंपत्तीनें युक्त अशा विभूति, कोल्हे, वाघ, लांडगा, रत्नें, फळें या सर्वांना ' कामी ' म्हणतात. (अस्टन-शुद्ध शिंटोधर्माचा पुनरुद्धार ४२-४३; ह्या ग्रंथाचें पुनर्मुद्रण १८८३ व १९०५ या वर्षीं झालें आहे).

निहानगीया धर्मग्रंथांत शिंटो धर्मांतील देवतांची संख्या बहुतेक ठिकाणीं आठ लाख सांगितलेली आढळते; पण कोजिकी ग्रंथांत ही संख्या ऐंशी लक्षापर्यंत नेली आहे. कित्येक ठिकाणीं संख्येवाचूनही या देवतांचा उल्लेख केला आहे.

" देव ", " स्वर्गांतील देव ", " उच्च स्वर्गांतील देव " " स्वर्ग व पृथ्वीवरील देव ". "पृथ्वीवरील देव व धान्यांचे देव" " स्वर्ग व पृथ्वीवरील सर्व देव ", " सर्व देव ", "पर्वताच्या भव्य उतारावरील देव ", " नदीचे हद्दीवरील देव ", कोणताही देव न सोडता. (को-जिकी १७५)

स्वर्ग व पृथ्वी निर्माण झाल्यानंतर, देवता जन्म पावल्या असें दोन्ही धर्मग्रंथांत सांगितलें आहे; आणि स्वर्ग व पृथ्वी हीं अंधकार निरस्त होऊ लागल्यानंतर उत्पन्न झालीं. (कोजिगी ४; निहानगी १:१-२)

ह्यांतील मूळच्या दोन देवता म्हणजे ' इझांगी ' (आवाहक-पुरुष) व इझानमी (आवाहक-स्त्री) ह्या जोडप्यानें पुढील सर्व वस्तुमात्रांना निर्माण केलें.

देवताद्वंद्वांची कार्यें (स्त्री व पुरुष देवता या उभयतांची) शिंटोधर्मग्रंथांत अगदीं स्पष्टपणानें वर्णिलीं आहेत. देव जन्म

पावतात; लग्नें करतात; प्रजोत्पादन करतात; ओकतात, स्नानें करतात, आजारी पडतात, चिडतात, मत्सर करतात, रडतात, शिव्या देतात, नाश करतात, मरतात, त्यांना कुठेंतरी पुरतात, आणि शेवटीं कोणतातरी एखादा जपानी बादशहा त्यांना उच्च पदाला चढवितो.

शिंटो-देवतांचा स्वभाव मनुष्यस्वभावासारखाच अनेकरूप आहे. उदाहरणार्थ, एका वर्गातील देवांना "खोटें बोलणारे देव" असें म्हणतात. ह्या पैकीं एका महत्वाच्या देवाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे: —

> "सुसा नोवो" हा देव मोठा दुष्टस्वभावाचा होता. (निहॉनूगी १—२०); त्याची वागणूक अत्यंत उद्धटपणाची होती. (निहानूगी १:४०) विशेषत: हा देव विजयानें उन्मत्त होई तेव्हां तो भाताचीं शेतेंच्या शेतें उध्वस्त करी, खंदक भरून टाकी, व प्राण्यांना जिवंत सोलून काढी. (कोजिकी ५—५३) (निहानूगी १:४१ ४५, ४७) सरतेशेवटीं सगळ्या देवांनीं मिळून त्याला दंड केला. (निहानगी १:४५, ४९) एकत्र जमा झालेले देव त्याला म्हणाले, "तुझें वर्तन अगदीं दुष्ट आणि हलकटपणाचें आहे." शेवटीं त्यांनीं त्याला, त्याची चांगली निर्भत्सना करून हद्दपार केला. (निहानगी १:५७) नंतर त्या लक्षावधि देवांनीं वाटाघाट केलीं, त्याची दाढी उपटली व त्याच्या हातापायांचीं नखेंसुद्धां तोडलीं. (कोजिकी ५९; निहानगी १:४५)

शिंटो धर्मग्रंथांत देवांना म्हणून जे नीतिनिर्बंध सांगितलें आहेत, त्याचेपेक्षां जपानांत हल्लींच्या व्यवहारांतील नीतिनिर्बंध किती सुधारलेले आहेत याचें अगदीं उत्कृष्ट उदाहरण ह्याठिकाणीं पहायला मिळतें. सुसानोवो ह्या देवाला प्राचीनकाळीं जी गोष्ट बेछूटपणें करतां आली, ती आजकाल जपानमध्यें कोणाही माणसाला करण्याची सूट नाहीं. तसेंच त्याच्या गुन्ह्याबद्दल त्याला सर्व देवांनीं ज्याप्रकारची शिक्षा केली, त्या प्रकारची शिक्षा आज कोणालाही जपानांत करतां यावयाची नाहीं. येथें हेंही सांगण्यासारखें आहे कीं, जपानांत सन १८६८ च्या पूर्वीं लिंगपूजेचा प्रकार सर्रास चालू होता, पण मीजी (ज्ञानोदय) च्या शकाच्या प्रारंभापासून ही लिंगपूजेची प्रथा अजिबात बंद करण्यांत आली आहे.

४ निसर्गांतील देवता.

शिंटो धर्म हा मुख्यत: निसर्गपूजक धर्म आहे. प्राचीन धर्मग्रंथांत वर्णिलेल्या बहुतेक देवता निसर्गाच्या विविध शक्ति आहेत. ह्या देवतांपैकीं "अमातेरसू" (अंतरिक्षांतील प्रकाशदेवता) ही सूर्यदेवता सर्वांत अत्यंत पूज्य मानलेली देवता होय. विश्वाची आदिमाता इझानागी हिच्या संततीवर राज्य करण्याचा अधिकार ह्याच देवतेचा होता.

"'उच्च स्वर्गांतील अधिराज्य तुझ्या दैवी विभूतीकडेच आहे.'' (कोजिकी ४३; निहानगी १: ३२)

जपानी मिकाडोराजे ईश्वरांश मानले जातात. हे राजे ह्या सूर्यदेवतेचे प्रत्यक्ष वंशज असल्याचें धर्मग्रंथांत सांगितलें आहे. परमेश्वराला ही बनविणारा जगांतला हा पहिलाच धर्म !

त्सुकीयोमी (चंद्रदेवा) कडे जगावर दुय्यम अधिकार चालविण्याचें काम जगत्पित्यानें सोंपविलें होतें.

" तूं आपल्या विभूतिमत्त्वानें रात्रीवर राज्य कर." (कोजेकी ४३–४४; निहानगी १:२२)

" त्याचें (चंद्रदेवाचें) तेज सूर्यदेवतेच्या खालोखाल होतें, तरीपण सूर्यदेवतेशीं लग्न लावून तिच्या राज्यकारभारांत तिला मदत करण्याचें काम ह्याच्यावर सोंपविण्यांत आलें.

ह्याशिवाय शिंटो-धर्मग्रंथांत इतर अनेक देवतांचा निर्देश केला आहे. उदाहरणार्थ कागासे–वो (तारादेवता) सुसानोवो (वायु-देवता) ताकिरीबीमा (हिम-देवता) वगैरे.

फुजियामा हा पर्वत दुसऱ्या अनेक पवित्र पर्वतांमध्यें अत्यंत पवित्र मानला जातो. 'मान्यो शिऊ' या काव्यांतील पुढील ओळी पहा:—

" यामातो–हा उदयपर्वत शांति देणारा व साक्षात् देवच आहे." (अस्टन 'देवपथ-शिंटो' १७)

" ह्या पर्वताचें वर्णन शब्दांनीं करता येत नाहीं. त्याला योग्य नांव देणें कठिण आहे; खरोखरी हा एक अद्भुत देव आहे." (अस्टन 'जपानी-साहित्य' ४१)

५ मिकाडोची पूजा.

दोन्हीही प्राचीन शिंटो-धर्मग्रंथांत पहिल्या मिकाडोची उत्पत्ति साक्षात् सूर्यदेवतेपासून झाली असें सांगितलें आहे. अमातेरासू

आपल्या संततीपैकीं एकाला खास पृथ्वीवर राज्य करण्याच्या उद्देशानें पाठविते.

" खालीं उतर; तेथें रहा; आणि भाताच्या लोंब्रांच्या व बरुंच्या वेटांच्या फलद्रूप भूमीवर राज्य कर." (कोजिकी १०६-१०७)

इतकेंच नव्हे, तर प्रथम हा मिकाडो ज्या जागीं उतरला ती जागासुद्धां नेमकी धर्मग्रंथांत सांगितली आहे.

" मिकाडो महाराज ' हो-नो-नि-नि-गी ' हें प्रथम त्सुकुशी प्रांतांतील ' टाकात्री ' या पर्वताच्या शिखरावर उतरले." (कोजिकी ५; १११-११२; निहानगी १:७८-७९)

दैवी उत्पत्ति व दैवी सत्ता आपल्या वंशांत असल्याचा उल्लेख मिकाडो राजे वारंवार आपल्या आज्ञापत्रांत व घोषणेंत करतात.

" ऐका, जनहो ऐका, उच्च स्वर्गांत शासन करणाऱ्या आमचा प्रिय आदिपिता व आदिमाता यांनीं आस्थापूर्वक आम्हाला असा आशिर्वाद दिला आहे कीं, ' बरू ' व भाताच्या फलद्रूप भूमीवर आमचे विभूतियुक्त पौत्र सुखानें राज्य करोत.' " (प्रतिवार्षिक शुद्धीकरणसंस्काराची हकीकत पा. ५९)

" सूर्यदेवतेनें आपल्या वंशजाकडे भूमीवरील अधिराज्य सोंपवून म्हटलें ' माझी मुलेंबाळें—दैवी अंशाची असल्यानें ह्या भूमीवर राज्य करतील; ' तेव्हांपासून—जगाच्या प्रारंभापासून—ह्या देशावर मिकाडो राजे राज्य करीत आहेत. अशारितीनें आम्ही दैवी अंशाचे असल्यानें आम्हाला

कर्तव्य म्हणून या देशावर राज्य चालवून सुव्यवस्था करणें भाग आहे."

" प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार म्हणून जगावर राज्य करणाऱ्या जपानच्या बादशहाची ही आज्ञा आहे."

मिकाडो बादशहाची राजसत्ता व देवांश यांचा नम्रतापूर्वक स्वीकार त्याचा प्रजाजनांनीं केल्याचेंही धर्म-ग्रंथांत लिहिलें आहे. (निहानगी २:२१७)

" म्हणून हे सम्राट् महाराज! आनंद व पूज्यभाव ह्यांनीं युक्त असा मी आपल्या पायावर डोकें ठेवून विज्ञापना करीत आहे. 'आपण देवांचा अवतार म्हणून अष्टद्वीपा भूमी-राज्य करीत आहां." (निहानगी २:२१७)

मिकाडो राजांची अप्रतिहत अधिराजसत्ता व वंशपरंपरागत अखंड चक्रवर्तित्व प्राचीन शिंटो धर्मग्रंथांत सांगितलेंच आहे. त्यांचाच आधुनिक जपानच्या घोषणा व राज्यघटना यांत रीतसर समावेश केला आहे. सन १८८९ च्या राज्यघटनेचें इंग्रेजी भाषांतर झालें आहे. त्यांत पुढील कलमें आढळतात.

कलम १ लें—अनादिकालापासून अखंड परंपरेनें राज्य करणारे मिकाडो राजे जपानी साम्राज्यावर राज्य करतील.

कलम ३ रें—सम्राट् ही व्यक्ति पवित्र असून तिचें शासन अप्रतिहत आहे. सन १८९० च्या आक्टोबरच्या ३० तारखेला शिक्षण या विषयावर जपानी सरकारनें एक महत्वाचा खलिता प्रसिद्ध केला आहे. त्यांत प्रथम मीजी शक सुरु झाल्याचें जाहीर करून प्रजेला असें निक्षून सांगितलें आहे कीं, "तुम्ही जपानच्या चालत आलेल्या वंशपरंपरेनें राजसत्तेविषयीं अढळ निष्ठा बाळगली पाहिजे."

" हे प्रजाजनहो ! नीट ध्यानांत ठेवा. आपल्या सम्राटांच्या गादीचा उत्तरोत्तर उत्कर्ष होईल असें वागा, व गादीचे रक्षण करा. ही गादी पृथ्वीच्या प्रारंभापासून अखंड चालत आलेली आहे. "

तथापि, मिकाडो राजांना जपानांवर आपली एकमुखी सत्ता अगदीं हळुहळु स्थापिता आली, आणि ती सुद्धां विरोध करणाऱ्या लोकांशी सारखें लढून. 'जपानचा वृत्तांत' या धर्मग्रंथांत अनेक मिकाडो राजांच्या अवगुणांची निंदा केलेली आढळते. ही गोष्टही ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

" सूर्यदेवतेनें आपल्या प्रथम उपदेशाचे वेळीं मिकाडो राजाला समजावून सांगितलें कीं, जपानी प्रजेला ताब्यांत ठेवण्याकरता दंडबलाची आवश्यकता आहे. "

" दिव्य पौत्र मिकाडो ह्या भाल्याचा उपयोग करील तर त्याला आपल्या शत्रूंना नामोहरम करता येईल. "

" असें म्हणतात कीं, जपानचा पहिला बादशहा जिम्मू यानें ईश्वरानें दिलेल्या तरवारीच्या जोरावर ही भूमि जिंकली आणि युद्धांत शत्रूंच्या अनेक टोळ्यांना नेस्तनाबूद केलें. " (निहानगी १:११५)

" मिमाकी हा बादशहा अर्धवट होता, त्यामुळें तो फार दिवस जगला नाहीं. म्हणून माझ्या तेजस्वी वंशजा ! तुला सांगतों कीं, ह्या बादशहाच्या अवगुणांचा सखेद चित्तानें विचार कर. इतःपर पूजाविधीविषयीं दक्ष रहा. असें करशील तरच तुझी तेजस्वी कारकीर्द दीर्घकाळ टिकेल व राज्यांत चोहोकडे शांतता नांदेल. " (निहानगी १:१७७)

आपल्या पूर्वीच्या सम्राटानें ईश्वराच्या आज्ञा पाळल्या नाहींत, म्हणून जिंगो या राणीला फार दुःख झालें. ह्याच दुःखानें तिचा अकालीं अंत झाला.

जपानमध्यें गेलीं अनेक शतकें प्रजाजनांना आपल्या बादशहाचें तोंडसुद्धां पहाण्याची संपूर्ण मनाई आहे. तरीपण १९२२ च्या सुमारास या बाबतींतला निर्बंध, चोहोंकडे लोकसत्तेचें वारें वाहू लागल्यामुळें, इतका शिथिल झाला कीं, जपानचा युवराज आजपर्यंत बाहेर कुठेंही प्रवासाला जात नसे तो यावेळीं प्रथमच बाहेर पडून युरोपखंडांत गेला, आणि तेथून परत आल्यावर जपानमधील अनेक शहरांत रस्त्यावरून तो लोकासमक्ष हिंडला !

(६) पूजाविधीचें देशभक्तिपर आणि केंद्रीभूत स्वरूप–

अतिमानुष देवतांची पूजा करणें, ही कसोटी लावल्यास शिंटोला धर्म हा शब्द निःसंशय लावता येईल. ह्या धर्माचीं अनेक देवळें जपानमध्यें आहेत. ह्या धर्माचे गुरुही जपानांत चोहोंकडे आहेत. तरीपण या धर्मांतील देवतांची संख्या इतकी मोठी व अनिश्चित स्वरूपाची आहे कीं, त्यांची यथाविधि पूजा होणें शक्यच नाहीं. आणि शिंटोधर्मग्रंथांतही यापैकीं फारच थोड्या देवतांच्या पूजेचा निर्देश केलेला आढळतो.

अनेक निसर्गदेवतांची पूजा करणाऱ्या या धर्मांत सूर्यदेवतेची पूजा फार महत्वाची मानिली आहे; कारण ती देवता प्रत्यक्षदृश्य व श्रेष्ठ अशीच आहे. या देवतेची व्यक्तिशः व सार्वजनिक-

रीत्याही पूजा केली जाते. तरीपण या श्रेष्ठ देवतेची अत्यंत मोठ्या प्रमाणावर पूजा सरकारतर्फे 'ईसे' ह्या शहरीं केली जाते. त्यांत सारें जपानी राष्ट्र भाग घेतें. अशाच तऱ्हेचा एक राष्ट्रीय पूजोत्सव पूर्वी जेहोवा या देवतेला उद्देशून यहुदीधर्मांत जरुसलेम या शहरीं करीत असत. ह्या उत्सवाचें स्थान कियोटो या जपानच्या प्राचीन राजधानीचे आग्नेयेस समुद्रतीरावर आहे. हें स्थान साऱ्या जपानांत अत्यंत पवित्र मानतात, व या ठिकाणीं प्रतिवर्षी हजारो जपानी यात्रेकरु जातात. येथील 'नाईकु' (आंतील देवालय) हें मंदिर खिस्तापूर्वी चारवर्षें बांधलें, असा समज आहे. मिकाडो राजांची आदिमाता जी अमातेसूर (सूर्यदेवता) तिचें हें पवित्रस्थान आहे. ह्या मंदिरांत एक वाटोळा आरसा ठेवला आहे, तो अंतरिक्षांतील सूर्यबिंबाचें पवित्र प्रतीक मानला जातो.

ह्या ठिकाणच्या पूजेचा व पूजाविधीचा उल्लेख दोन्ही शिन्टो धर्मग्रंथांत आढळतो. ही पूजा खिस्ती शकाच्या पूर्वीपासून चालत आलेली आहे, असे म्हणतात. वर सांगितलेला आरसा साक्षात सूर्यदेवतेनें पहिला मिकाडो ह्या आपल्या वंशजाला स्वतःचे पवित्र चिन्ह म्हणून दिला असें मानतात.

> "अमा तेरसूनें तो अमूल्य आरसा आपल्या हातांत घेऊन म्हटलें "बेटा ! तूं ह्या आरशांत ज्या ज्या वेळीं बघशील, त्या त्या वेळीं माझ्याकडेच बघत आहेस अशी भावना कर. ह्या आरशाला तूं पवित्र मान." (निहोंनगी १-८३)

" जपानच्या बखरींत " म्हटलें आहे कीं, खिस्तीधर्माच्या पूर्वींपासून अगदीं आतांपर्यंत जपानमध्यें अशी एक चाल आहे कीं, जपानची राजकन्या ईसे मंदिरांतील ह्या सूर्य-देवतेची मुख्य पुजारीण असलीच पाहिजे. (कोजिकी १७४,१८६)

शिंटो धर्मांतील बहुतेक श्रद्धाळू लोक असें मानतात कीं, जन्माला येऊन एकदातरी ईसे मंदिराची यात्रा करणें हें आपलें कर्तव्य आहे. ह्या ईसेच्या मंदिराशेजारीं गेकू-"बाहेरचे देऊळ" आहे. त्यांत ' ऊकेमोची ' ह्या अन्नदेवतेचे पवित्र देवस्थान आहे.

सम्राट्पूजा हीही एक धार्मिक बाब म्हणून शिंटोधर्मांत सांगितली आहे. दरवर्षी मिकाडोच्या जन्मदिवशीं सरकारी हुकु-मानें प्रत्येक शिक्षण—संस्थेंत एक मोठा समारंभ करतात. त्यांत सम्राटाच्या तसबिरीपुढें प्रार्थना करणें हा कार्यक्रम असतो. हा समारंभ बहुतांशीं देशभक्तिपर असतो.

तेजस्वी आरक्तसूर्याच्या चिन्हानें युक्त असा जपानचा राष्ट्रध्वज, देशभक्ति वाढविण्याकडे धर्माचा प्रत्यक्ष उपयोग कसा होतो याचें ढळढळीत उदाहरण आहे. उगवत्या सूर्याचें हें राष्ट्रध्वजा-वरील चित्र पाहून सुबुद्ध जपानी नागरिकांच्या मनांत साहजि-कच अशीं भावना उत्पन्न होते कीं, आपला देश हा उगवत्या सूर्याचा देश आहे, व आपल्यावर राष्ट्रीय व धार्मिक आधिपत्य प्रत्यक्ष सूर्यदेवतेचें आहे, इतकेंच नव्हे तर, मिकाडो हा सूर्य वंशोत्पन्न असल्यानें त्याचें द्वारा जपानी प्रजेंतही सूर्यदेवतेचा अंश आहे, व ती प्रजाही एका पवित्र भूमींत नांदत आहे.

७ मंदिरें व नैवेद्य

शिंटो धर्मांतील पूजाविधी बहुधा प्रत्येक खेडेगांवांत असलेल्या मंदिरांत रस्त्याच्या बाजूला असलेल्या कोणत्याही देवळांत व जपानांतील बहुतेक विचित्ररमणीय स्थलीं पाहायला सांपडतो. दहाव्या शतकांत (येंगीशिकी या धर्मग्रंथावरून असें दिसतें कीं) सरकारनें मान्य केलेलीं अशीं एकंदर तीन हजार एकशें बत्तीस देवळें होतीं. सन १८८० मध्यें खेडेगांवांतील व इतर ठिकाणचीं किरकोळ देवळें एक लक्ष त्र्यांयशीं हजार सत्तेचाळीस भरलीं; तरीपण सन १९२० मध्यें ही संख्या कमी होऊन १११९८१ वर आली. तथापि, सरकारनें चालविलेली देवस्थानें अलिकडे वाढत असून त्यांचीं संख्या पंचावन्न वरून एकशें पांचापर्यंत गेली आहे.

शिंटो मंदिरांत शिरतांना एक विशिष्ट तऱ्हेचा 'तोरी-ई' नांवाचा दरवाजा लागतो. ह्या कमानी उलटया असून त्यांचीं दोन्हीं टोकें वर आकाशाकडे जात असलेलीं दिसतात. शिंटो-मंदिरें बहुधा रमणीय निसर्गाच्या मध्यमार्गी, अथवा गगनचुंबित वृक्षराजींत, अथवा धबधब्याशेजारीं, अथवा मोठमोठया कमानींच्या पुलामुळें शोभणाऱ्या जलाशयाच्या कांठीं, वसविलेलीं आढळतात. थोडक्यांत म्हणजे निसर्गांतील रमणीयतेचें भान सहजासहजीं होईल अशाच ठिकाणीं शिंटो—मंदिरें बांधलेलीं दिसतात.

शिंटो—मंदिरांतून होणारी पूजा बहुतेक वैयक्तिक स्वरूपाची असते. संघपूजेचा प्रकार ह्या मंदिरांतून जवळ जवळ मुळींच

पहायला मिळत नाहीं. पूजा करणारे लोक देवाला साष्टांग नमस्कार घालतात. गुडघे टेकण्याची फारशी चाल नाहीं. कित्येक वेळीं कांहीं न बोलता नुसते हात जोडून उभे राहण्याची पद्धति आहे.

नैवेद्य अथवा इतर वस्तु देवाला अर्पण करणें हा शिंटोधर्मातील पूजाविधीचा दुसरा प्रकार.

"आजकाल सूर्यदेवता व अन्नदेवता यांना ईसा येथील मंदिरांत दररोज मदिरेचे चार प्याले, भाताच्या सोळा थाळ्या, मिठाचीं चार ताटें इतकें अर्पण करतात. याशिवाय मासे, पक्षी, फळें, समुद्रातील वनस्पति व भाज्या हेंही अर्पण करतात. जिम्मू या पहिल्या मिकाडोच्या थडग्यापुढें प्रतिवर्षी एकदा, पर्वतावर उत्पन्न होणारे पदार्थ, त्याचप्रमाणें समुद्र, नद्या इत्यादिकांतील मासे वगैरे प्राणी अर्पण करतात. याशिवाय पोळ्या, पक्ष्याचें मांस व दारू वगैरेचा देवाला नैवेद्य दाखवितात तो वेगळाच. (ॲस्टन कृत-शिंटो-देवपथ-पृष्ट २१३)

बहुधा प्रत्येक शिंटोधर्मीय गृहस्थ मंदिरांत जाऊन प्रार्थना करण्यापलीकडे कांहीं जास्त करीत नाहीं. हीच त्याची देवपूजा.

" प्राचीनकथासंग्रह " या शिंटोधर्मग्रंथांत देवतेशी भक्तानें केलेल्या संभाषणाचा अनेक ठिकाणीं उल्लेख आढळतो, पण देवतांची प्रार्थना करण्याचा निर्देश मात्र त्यांत मुळींच नाहीं. नाहीं म्हणायला वर सांगितलेल्या धर्मग्रंथांत फक्त दोन ठिकाणीं मात्र प्रार्थनेचा ओझरता उल्लेख आहे:—

" प्रार्थना केल्यानंतर " (केजिकी १०४)
" नम्रभावानें मंत्र म्हणून " (कोजिकी ५७)

इतर धर्मग्रंथांतही प्रार्थनेचा उल्लेख जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. निहानगी या ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, बेचाळीस राजांपैकीं फक्त दोनच राजे प्रार्थना करीत असत. (१: २२०, २२५) तथापि, येंगींशिकी या अर्वाचीन धर्मग्रंथांत सरकारी रीत्या केल्या जाणाऱ्या नोरी-टो नांवाच्या प्रार्थनेची पंचवीस लांबलचक गीतें दिलीं आहेत. या सर्व गीतांतून अनेक देवतांचे आवाहन, स्तुतिस्तोत्रें व देवतांना अर्पण केलेल्या अथवा अर्पण करायच्या वस्तूंची यादी इत्यादि प्रकार आढळतात. पहिल्या 'नोरी-टो' प्रार्थना गीतांत " आमच्या या मनकामना पूर्ण कर " अशा तऱ्हेचे शब्द निदान एकोणीस वेळ आलेले आहेत, याशिवाय त्यांत देवताशी अमुक गोष्टीचा करार करण्याची कल्पनाही एकदोनदा आढळते.

" परमेश्वरानें मला पीक चांगलें दिलें तर मी त्याला पहिल्या बाराचीं फळें देईन. " (अस्टन देवपथ शिंटो २८१–२८५;........

या सर्व शिष्टसंमत प्रार्थनागीतांत नैतिक अथवा आध्यात्मिक उन्नतीबद्दल केव्हांही प्रार्थना केलेली नाहीं. " आमचीं पिकें चांगलीं येऊं दे; योग्य वेळीं पाऊस पडूं दे; भूकंप व वणवा यांचा उपद्रव आम्हाला होऊं देऊं नको. आमचे राजे दीर्घायुषी होवोत, व त्यांना आरोग्य व संतति यांचा लाभ होवो; त्यांचें राज्यांत दीर्घकाळ शांति नांदो व राज्याची भरभराट होवो; त्यांचे परराष्ट्रीय मंत्री सुरक्षित राहोत. राज्यांतील बंड मोडलें जावो;

शत्रूंच्या स्वाऱ्या परतविल्या जावोत; राजांच्या सैन्याचा जय होवो; राज्याची समृद्धि होवो " अशा तऱ्हेच्या प्रार्थना केलेल्या आढळतात. आजकालसुद्धां शिंटोदेवतांची प्रार्थना कांहींतरी भौतिक वस्तूंचा लाभ व्हावा म्हणूनच केली जाते. (अस्टन देवपथ २३४–२३६; जपानचा प्राचीनधर्म शिंटो पृष्ठ ६२)

९ उत्सव व सणवार

नोरी-टोमधील सर्व धार्मिक प्रार्थनेचा कोणत्याना कोणत्या तरी धार्मिक विधीशीं संबंध येतोच. या प्रार्थनांचा लौकिक उत्सवाशीही संबंध येतो. उत्सव हें शिंटोधर्माचें एक प्रधान अंग आहे. सर्व निसर्गपूजक धर्मांत व इतरही कांहीं धर्मांत जेथें जेथें म्हणून शेतीच्या कामांचा संबंध येतो तेथें तेथें अशा तऱ्हेचे धार्मिक उत्सव होतच असतात. उदाहरणार्थः—

(१) दर वर्षाच्या दुसऱ्या महिन्यांत भाताची पेरणी करण्याचे वेळीं पिक चांगले येण्याबद्दल एक धार्मिक उत्सव करतात; त्याचे नांव टोशिगोहिनो—मत्सूरी. ह्याप्रसंगीं म्हटली जाणारी प्रार्थना नोरी-टो या प्रार्थना संग्रहांतील पहिली प्रार्थना, (अस्टन देवपथशिंटो २८० टा. ए. सो. ज. ७:१०४,१२६).

(२) भात उगवून वर येत असतां प्रतिवर्षाच्या चौथ्या महिन्यांतील चौथ्या दिवशीं हा उत्सव अन्नदेवतेला उद्देशून केला जातो. ह्या उत्सवाचें नांव हिरोज-ओहो, इमिनो मत्सूरी असें आहे. ह्या प्रसंगीं देव-तांना अनेक पदार्थ अर्पण करतात, व स्वतः बाद-शहा खालील प्रमाणें नवस करतो:—

"परमेश्वरानें कृपा करून शेतांतले पीक उत्कृष्ट दिलें तर मी पहिल्या पिकाचा पर्वताएवढा ढीग त्याजा अर्पण करीन." (टा. ए. शि. ज. ७:४१४-४१५)

(३) नव्या तांदुळाचा भात करायचे वेळीं (वर्षाच्या अकराव्या महिन्यांत) हा उत्सव करतात. हा एक प्राचीन उत्सव असून मोठ्या खटाटोपाचा आहे. ह्याचा उल्लेख निहानगी या ग्रंथांत अनेक वेळ केलेला आहे. ह्या उत्सवांत गीत, नृत्य, भोजनसमारंभ, नवे कपडे, देवाला अनेक पदार्थ अर्पण करणें वगैरे बहुविध प्रकार असतात. हा उत्सव झाल्याखेरीज नव्या तांदुळाचा भात खाणें कोणाही धार्मिक शिंटोधर्मीयाला बरें वाटत नाहीं. (अस्टन देवपथ शिंटो २२७) ह्या उत्सवाचें जपानी भाषेंतील नांव ' ओहो निहे ' (राज्यारोहणोत्सव) ह्या उत्सव प्रसंगीं स्वतः बादशहा ह्यांतील सर्व विधि करतो.

ह्या गंभीर व अत्यंत खटाटोपाच्या उत्सवाचें विस्तृत वर्णन हिरत या ग्रंथकारानें लिहिलें आहे. त्याकरता कोजिकी या ग्रंथावरील त्यानें लिहिलेल्या टीकेचीं सुमारें ४८० पानें त्याला खर्ची घालावीं लागलीं.

(अस्टन देवपथशिंटो २७७)

या शिवाय इतर कृषिविषयक उत्सव:—ह्या पैकीं एक अहिनामे अथवा अहिंबे नांवाचा उत्सव सहभोजनाचा असतो. दुसऱ्या उत्सवांत देवाना नवें पीक अर्पण करतात. (निहानगी २:२२५

अमावास्येचा पर्वोत्सव:—हा धार्मिक सण आहे. या दिवशीं प्रार्थना व नैवेद्य यांचा कार्यक्रम असतो.

मासिक उत्सव:—त्सुकीनामीनो मत्सूरी ह्या नांवाचे हे उत्सव दर महिन्यांत होतात. या वेळीं तीन ठराविक प्रार्थना नोरीटो—या प्रार्थना संग्रहांतून होतात.

(अस्टन देवपथशिंटो २८५—२८६)

१० शिंटो धर्मांतील स्वच्छता

शिंटों धर्मांतील एक व्यवहारिक दृष्टया विशेषता जपानी लोकांमध्यें आढळते; ती ही कीं, या धर्मांतील लोक फारच स्वच्छ असतात. या धर्मानें लोकांना नेहमीं अतिशय स्वच्छ राहण्याचा परिणामकारक उपदेश केलेला दिसतो. शिंटों धर्मांतील दोन प्रमुख ग्रंथांत या धर्मांतील आदिजनक इझानगी ही देवता सुद्धां शरीरशुद्धीचे बाबतींत अत्यंत दक्ष असल्याचें वर्णिलें आहे.

" मी माझ्या दिव्य शरीराची शुद्धि करीन "

(कोजिकी ३९).

" माझा देह अशुद्धीपासून मुक्त करणें हें योग्य आहे " (निहानगी १:२६)

शिंटों धर्मांत वारंवार येणारा अत्यंत महत्वाचा धर्मविधि म्हणजे ओहो—हराही या नांवाचा होय.

हा विधींत सुरवातीला एक क्षालनविधि सांगितला आहे; त्यानंतर प्रायश्चितादाखल कांहीं दान द्यावें लागतें. मग नोरीटो या संग्रहांतून कांहीं प्रार्थना म्हणतात त्यांत मिकाडो राजा हा देवाचा अंश असल्यानें त्याला आपल्या प्रधानांना व प्रजेला

पाप व अशुद्धि यापासून मुक्त करण्याचें सामर्थ्य आहे, अशा तऱ्हेचा मजकूर असतो. (अस्टन देवपथ शिंटों २९४ SARJ ६४).

ह्या विधिच्या प्रसंगीं दिलेला बळी नदींत किंवा समुद्रांत फेंकून देतात; या बाबतींत अशी समजूत आहे कीं, या बळी-बरोबर लोकांचें पाप निघून जातें. इस्राएलच्या पापप्रतिनिधी बकऱ्याच्या बाबतींत हाच समज प्रचलित होता. शेतीच्या कामांतील नानाप्रकारचे त्रासदायक अडथळे ह्यांचाही वरील पापांत समावेश होतो. (अस्टन, SARJ ७२)

एवंच शिंटोधर्माचा स्वच्छतेच्या बाबतींत फारच कटाक्ष असलेला दिसतो. त्याचप्रमाणें सामाजिक गुन्ह्यांचें परिमार्जन करणें ह्याचाही शुद्धीकरणांतच समावेश ह्या धर्मानें केला आहे. तथापि एकंदरीनें शारीरिक व सांस्कारिक शुद्धि यावर या धर्माचा भर दिसतो; यांत हृदयाची शुद्धि, विचाराची शुद्धि व सामाजिक संबंधाची शुद्धि यावर ह्या धर्माचा फारसा भर दिसत नाहीं.

११ शिंटो धर्मांतील नीति-कल्पना.

मिकाडो हा देवांश असून त्याला श्रेष्ठ मानून त्याच्याशीं नम्रभावानें वागणें ह्या खेरीज दुसरीं नीतितत्त्वें अथवा नीतिनियम ह्या धर्मांत फारसें दिसत नाहींत. देवताविषयक कल्पना अथवा नीतिविषयक कल्पना ह्यांचा ह्या धर्मांत संपूर्ण अभाव आहे, ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. शिंटोच्या दुसऱ्या धर्मग्रंथांत कांहीं ठिकाणीं सरकारी अधिकाऱ्यांना शहाणपणाचा उपदेश केलेला आढळतो.

" सत्य बोलणाराचें केव्हांही नुकसान होत नाहीं. खोटें बोलणाराचें निश्चितपणानें नुकसान होणारच "
(निहानगी १:३१७)

" अधाशीपणा सोडून दे. लोभ टाकून दे. वाईटाचा धिक्कार करून चांगल्याला उत्तेजन दे. रागानें बेफाम होऊं नकोस. रागीट मुद्रासुद्धां दाखवूं नकोस. कुणाचाही मत्सर करूं नकोस. (निहानगी २:१३०-१३१)

सामान्य जनतेला पुढील उपदेश केलेला आढळतो:—

राजवाड्यांत शिरतांना अथवा बाहेर पडतांना प्रत्येकानें दोन्ही गुडघे टेकावे; आणि दोन्ही हात भुईवर ठेवावे. दरवाजा ओलांडल्यावर मात्र उभे राहून चालायला हरकत नाहीं.
(निहानगी २: १३३)

दोन्हीही प्रमुख शिंटोधर्मग्रंथांत सर्वसाधारण जनतेला नीतीचा सामान्य उपदेश साक्षात् कुठेंही केलेला आढळत नाहीं. अठराव्या शतकांतील प्रसिद्ध शिंटोधर्मविवेचक मोतूरी हा या धर्मांत साक्षात् नीतिनियम केलेले कां आढळत नाहींत, याचें कारण पुराणमतवाद्यांना साजेलसें पुढील प्रमाणें देतो.

" प्रत्येक मिकाडो हा सूर्यदेवतेचा पुत्र आहे. त्या देवतेचे विचार व भावना हीं त्याच्यांत तंतोतंत उतरलीं आहेत. अर्थात् मिकाडो केव्हांही नवे नीतिनियम शोधून काढीत नाहीं; पण देवांच्या वेळेपासून जी पूर्वापार राज्यपद्धति चालत आलेली आहे तिला अनुसरून तो राज्य चालवितो. केवळ मिकाडोच नव्हे, तर सचिव व प्रजा हीसुद्धां दैवीपरंपरेला अनुसरून वागतात.

अर्थात् स्वतंत्र ' नीति ' ही कल्पना अथवा नीतिपंथ प्राचीन-काळीं अस्तित्वांत असणें शक्यच नव्हतें. कारण त्याकाळीं कोणत्याही तऱ्हेचा नीतिनिबंध प्रत्यक्ष शब्दांनीं सांगितलेला नसला, तरी कोणत्याही तऱ्हेचा दंगाधोपा होत नव्हता व राज्यांत शांतता नांदत होती. प्रत्यक्ष व्यवहारांत नीतीच्या मार्गानें त्याकाळीं जपानी लोक चालत असल्यानें त्यांना शाब्दिक नीति-शास्त्राची जरूरच नव्हती. चिनीलोक नीतिशास्त्राचा मोठा बडेजाव माजवितात, कारण ते आचरणाचे बाबतींत ढिले आहेत. (टा. ए. सो ज. ३·२४-२६,)

तथापि, मौजेची गोष्ट ही आहे कीं, प्राचीन कथासंग्रहांत सांगितलेल्या अतिप्राचीन महाशुद्धीकरणविधींत पुढील गुन्ह्यांचा निर्देश आढळतो:—

जिवंतपणीं सुलटें कातडें सोलणें; उलटें कातडें सोलणें; भात-शेतांचे बांध फोडणें, खंदक भरून टाकणें; उच्च व नीच वर्णां-तील विवाह; घोड्याशीं संयोग; गुरांशीं संयोग; कोंबड्याबद-कांशीं संयोग; कुत्र्यांशीं संयोग. (कोजिकी २३०)

दर सहामाहीलाही एक मोठा शुद्धिविधि सांगितला आहे. त्याप्रसंगीं नोरी-टो संग्रहातील दहावें प्रार्थनागीत म्हणायचें असतें. त्यांत पुढील पापाचें शुद्धीकरण अथवा क्षालन मिकाडो करतो, असें म्हटलें आहे:—

भातशेतांचे बांध फोडणें; कालव्यांचे पाट बंद करणें; नळ उखडून टाकणें; पेरलेल्यावर पुन्हां बी पेरणें; शूळ उभे करणें (मंत्र म्हणून); जिवंत कातडें सोलणें; उलटें चामडें सोलणें, ह्या सर्व गुन्ह्यांना देवांचे गुन्हे म्हणतात, कारण देवांश म्हणून

ह्या भूमींत राहायला आलेल्या लोकांचें हातून वरील गुन्हे घडण्याचा संभव आहे.

पृथ्वीवरील गुन्ह्यांची यादी खालीं दिली आहे:—

जिवंत शरीरें कापणें; प्रेतें कापणें; गलितकुष्ठ; मातृगमन; कन्यागमन श्वश्रूगमन; सावत्र मुलीशीं संयोग; पशुसंयोग; सर्प, गोम वगैरेंचा उपद्रव; वीज अथवा भुतें यापासून उपद्रव; मोठे पक्षी, हिंस्र पशु व चेटक्या यापासून उपद्रव (अस्टन देवपथ शिंटो २९७-३००; टा. ए. सो. ज. २७: ६०-६१)

शिंटो-धर्मातील नीति व देवता याविषयींच्या कल्पना अगदीं निसर्गमूलक आहेत. तथापि, धर्मग्रंथरचनेनंतर जपानांत नीति-कल्पनेंत मोठा महत्वाचा विकास झालेला आढळतो.

बुशिडो (वीरपंथ—वीराचाराचा उपदेश) नांवाचा नीति-नियमग्रंथ इ, स. च्या सुमारें अकराव्या व बाराव्या शतकांत रचला गेला. जपानांतील सरंजामी पद्धतीचा एक भाग म्हणून ह्या ग्रंथाची रचना झाली. जपानमध्यें प्रचलित असलेल्या तिन्ही धर्मांतील कांहीं व्यावहारिक भाग एकत्र करून ह्या ग्रंथाची रचना केली आहे. ह्यांत शिंटोधर्मातील राजनिष्ठा, व राजा हा देवांश ही कल्पना; कान्फ्यूशियन धर्मांतील पितृभक्ति; व बुद्धधर्मांतील जन्ममरणाविषयीं प्रशांत उदासीनता या सर्व कल्पनांचा समावेश केलेला आहे.

बुशिडो ह्या नीतिग्रंथाचे टीकाकार असें मोठ्या अभिमानानें सांगतात कीं, ह्या नीतिपंथानें राजनिष्ठा, धैर्य, स्वार्थत्याग, शिष्टाचार, उदारता, स्वाभिमान न्यायबुद्धि, संयम इत्यादि अनेक सद्गुणांचें संवर्धन जपानी राष्ट्रांत केलेलें आहे.

तथापि, चिनी नीतिशास्त्रज्ञ कान्फ्यूशियस व मेन्सियस ह्यांच्या तोंडच्या कांहीं नीत्युपदेशाखेरीज वरील ग्रंथांत प्रत्यक्ष सद्गुणोपदेश अथवा नीत्युपदेश कुठेंही केलेला नाहीं.

"खरें म्हणायचें म्हणजे हा नीतिग्रंथच नव्हे. फारतर फार म्हणजे ह्याच्यांत मुखपरंपरेनें आलेल्या कांहीं म्हणी अथवा कोणातरी प्रसिद्ध वीरपुरुष अथवा साधु पुरुषाच्या हातून लिहिलेल्या कांहीं सुभाषितांचा संग्रह आहे." (निटोबे, बुशिडो ५१)

बुशिडो या ग्रंथाची ही थोरवी म्हणा किंवा कमीपणा म्हणा, पण त्याच्यांत एकाही नीतिपंथाचा उल्लेख नाहीं. (निटोबे-जपानी राष्ट्र १५५-१५६)

लष्करी सरंजामी पद्धतिबरोबरच या ग्रंथाचा भाग्योदय झाला व त्याच्या ऱ्हासाबरोबरच या ग्रंथाचा ऱ्हास झाला.

१२ शिंटो धर्माचा इतिहासः—

ह्या इतिहासाचे पांच कालखंड कल्पिता येतील. प्रत्येक खंडांत या धर्माची विचित्र स्थित्यंतरें घडून आलीं.

(१) प्राचीन काळखंड-ह्यांत ह्या धर्माची अप्रतिहत सत्ता होती. (ख्रि. पू. ६६० ते ख्रिस्तोत्तर ५५२ पर्यंत)

जवळ जवळ १२०० वर्षेपर्यंत म्हणजे जिम्मू या पहिल्या मिकाडोपासून बुद्धधर्माचा प्रवेश होईपर्यंत जपानांत शिंटोधर्माची सत्ता अप्रतिहत होती.

(२) दुसरा कालखंड--बौद्धधर्माचा प्रारंभींचा विजय. (इ. स. ५५२ ते ८०० पर्यंत)

चीनमधून तीन नवे धर्म—कान्फ्यूशियन, टाओ व बौद्ध हे-जपानांत घुसू लागले होते, तरी मूळच्या शिंटो धर्माचें प्राबल्य अडीचशें वर्षे कायम राहिलें. निहानगी या धर्मग्रंथाची जवळ जवळ दोन पंचमांश पानें, जपानांत नवीन आलेल्या बुद्धधर्मांची दीडशें वर्षांची कारकीर्द वर्णन करण्यांत खर्ची पडलीं आहेत. या ग्रंथांत, प्रबळ होत चाललेल्या बुद्धधर्माचा निदान पन्नास ठिकाणीं उल्लेख आला आहे.

सन ६४५ ह्या वर्षी कोटुकू या बादशहानें बुद्ध-धर्माचा सत्कार करून देवपथाचा (शिंटो) तिरस्कार केला. (निहानगी २: १९५)

सन ६७१ ह्या वर्षी जपानी युवराजानें संसारत्याग करून संन्यासदीक्षा घेतली. (निहानगी २:३०२)

(३) तिसरा कालखंड—मिश्र शिंटोधर्म (सन ८०० ते १७०० पर्यंत)

या नऊशें वर्षांत जपानांतील शिंटो या मूळ धर्मांशी बाहेरच्या धर्मांचें बुद्धिपुर:सर मिश्रण करण्यांत येत होतें.

कोबो दैशी (सन ७७४-८३५) या बुद्धभिक्षूनें—योबू अथवा मिश्र शिंटो धर्माचा उपदेश करून तो धर्म सर्वमान्य केला. प्राचीन शिंटो-धर्मांतील देवता ह्या बुद्धदेवतांचा पुनरवतारच होय असें ह्या मिश्र—शिंटोधर्मांत मानतात.—

कितबतके चिकाफुसा (सन १२९३ ते १३५४) आणि इच्चिजो कनेयोषी (सन १४६५ ते १५००)

ह्या दोघांचें असें मत होतें कीं, शिंटो, बुद्धधर्म व कान्-फ्यूशियन ह्या तिन्ही धर्मांना एकजीव करून त्यांचा एक धर्म करता येणें शक्य आहे. (ब्रिंक्ले, जपानी लोकांचा इतिहास, पृष्ठ ४५२)

परधर्माच्या स्पर्धेंत ह्या काळीं शिंटो धर्माचें वजन जपानी दरबारीं इतकें कमी झालें कीं, शिंटोधर्मांतील अत्यंत महत्वाचा धर्मविधि ओहोनिहे (राज्यारोहण विधि) हा सन १४६५ ते १६८७ पर्यंतच्या आठ राजांच्या कारकीर्दींत लुप्तप्राय होऊन गेला (अस्टन देवपथ शिंटो ३६४ व ३७७)

(४) शिंटोचें पुनरुज्जीवन (स. १७०० ते १८६८ पर्यंत)

सुमारें पावणे दोनशें वर्षांच्या या कालखंडात जपानी राजसत्ता इतकी कमकुवत झाली होती कीं, लष्करी अधिकारी मिकाडोची बहुतेक सत्ता बळकावून बसले. अशा वेळीं चार प्रचंड पंडितांनीं शिंटोधर्माचें जोरानें पुनरुज्जीवन केलें. ह्या पैकीं कड (१६६९ ते १७३६) या पंडितानें प्राचीन जपानी भाषेचा पुनरुद्धार करून अनेक प्राचीन पुस्तकांचें संपादन केलें. ह्या पंडिताचा शिष्य मबुची (१६९७ ते १७६९) ह्यानें असें प्रतिपादन केलें कीं,—

" प्राचीनकाळीं मनुष्यांचा स्वभाव सरळ होता. त्यामुळें गुंतागुतीच्या नीतिशास्त्राची त्यांना जरूरच नव्हती; त्याचप्रमाणें सत्यासत्याची मीमांसा करणाऱ्या शास्त्राचीही त्यांना आवश्यकता भासली नाहीं. याचे उलट

चिनी लोक बाहेरून कितीही चांगले दिसले तरी अंतः-करणाचे वाईट होते; त्यामुळें नीतिशास्त्राचा उपदेश त्यांच्या मनावर बिंबणें शक्य नव्हतें. जपानी लोक सरळ अंतःकरणाचे असल्यामुळें त्यांचें शास्त्रोपदेशावाचून कांहीं अडत नाहीं. (टा. ए. सो. ज. ३:१६)

मोतूरी (१७३० ते १८०१) नें कोजिकी या धर्मग्रंथावर एक बृहत् टीका लिहिली आहे. त्या टीकेचे छापील चाळीस खंड होतील येवढी ती मोठी आहे. शिंटो धर्माचें गतवैभव परत मिळविण्याकरतां त्यानें पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत.

" चीन व हिंदुस्तान हे देश (विशेषतः पहिला देश) सूर्यदेवतेच्या खास अमलाखालीं नसल्यानें त्यावरील राजसत्ता अखंड परंपरेनें चालत नाहीं. आणि याचा साहजिकच परिणाम असा झाला आहे कीं, त्या देशांत भुतांखेतांनीं धिंगाणा चालून मानवजातीला बिघडवून टाकलें आहे. (टा. ए. सो. ज. ३:२५)

कोणी असें विचारतात—" कांहो ! कामिनोमिची आणि लाओट्झचा टाओ धर्म हे एकच नाहींत कां ? " यावर आमचें असें म्हणणें कीं बाह्यतः हे दोन्ही धर्म सारखे दिसतात खरे; कारण लाओट्झला चिनी पंडितांच्या पोकळ घमेंडीची मोठी चीड असे; शिवाय त्याला निसर्ग-मूलक धर्म फार आवडे. तरी पण सूर्यदेवतेच्या साक्षात् छत्राखालीं नसलेल्या एका घाणेरड्या देशांत त्याचा जन्म झाला असल्याकारणानें सूर्यदेवतेच्या पवित्र वंशजांच्या

परंपरेची कीर्ति त्यानें नुसती दुरूनच ऐकली होती. (टा. ए. सो. ज. ३—२९)

हिराटा (सन १७७९ ते १८४३) या पंडितानें शंभरा-वर ग्रंथ लिहिले असून, शिंटोधर्माच्या समग्र इतिहासांत प्रचंड पंडित व समर्थ लेखक म्हणून त्याची ख्याति आहे. शिंटो धर्माचें विवरण त्यानें पुढीलप्रमाणें केलें आहेः—

" आमचे दोन मुख्य सिद्धान्त आहेत. एक हा कीं, जपान हा देवांचा देश आहे; व दुसरा हा कीं, त्या देशांतील रहिवासी देवांचे वंशज आहेत. एका बाजूला जपान व दुसऱ्या बाजूला चीन, हिंदुस्तान, रशिया, सयाम, कांबोडिया, हॉलंड व जगांतील इतर राष्ट्रें—ह्या दोहोंत स्वरूपतःच फरक आहे; केवळ तारतम्याचा फरक नाहीं. " (टा. ए सो. ज. ३ः ४६)

" मिकाडो हा परमेश्वराचा खरा पुत्र असून त्याला चार समुद्र व दहा हजार देश यावर राज्य करण्याचा अधि-कार आहे. " (टा. ए. सो. ज. ३ः५२)

" जपानी लोक हे देवांचे वंशज असल्यामुळें साहजिकच ते बुद्धि व धैर्य या बाबतींत इतर राष्ट्रांतील लोकांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ आहेत." (टा. ए. सो. ज. ३ः ५४)

" जपानी लोक अन्तःकरणाचे सरळ व प्रामाणिक असल्या-मुळें ते इतर राष्ट्रांतील लोकांप्रमाणें विनाकारण कल्प नेच्या भराऱ्या मारीत नाहींत अथवा सत्याचा अपलापही करीत नाहींत. " (टा. ए. सो. ज. ३ः५८)

मिकाडो व जपानी लोक यांच्याविषयींच्या श्रद्धेचे अशा तऱ्हेनें धार्मिक वातावरण पुन्हां उत्पन्न झाल्यानेंच सन १८६८ सालीं जपानचा भाग्योदय घडून आला.

(५) पांचवा कालखंड; १८६८ नंतर शिंटोधर्मांत अनेक स्थित्यंतरें घडून आलीं.

मीजी—शतकाच्या प्रारंभीं मिकाडोची पुनरपि स्थापना झाली; याचा पहिला परिणाम हा झाला कीं, शिंटोधर्माचें शुद्ध स्वरूपांत पुन:संस्करण झालें. सन १८७१ व १८७२ च्या सरकारी हुकमांनीं देशांतील तमाम शिंटो-मंदिरांना असें फर्मावण्यांत आलें कीं, स्थानिक अधिकाऱ्यांसमक्ष सरकारी उत्सव म्हणून जून व दिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशीं शुद्धीकरणाचा महोत्सव साजरा करण्यांत यावा. तरीपण, यानंतर अलीकडे शिंटोधर्माचें सिंहासन डळमळीत होत असल्याचीं चिन्हें दिसू लागलीं आहेत.

> " सन १९०० च्या व १९१३ च्या मंदिराविषयक कायद्यांनीं शिंटोमंदिरांचें धर्माच्या प्रांतांतून उच्चाटन करून त्यांना राष्ट्रीयकार्याच्या खात्यांत ढकलून दिलें आहे. "
>
> (होल्टम टा. ए. सो. ज. ४९:२. ९५-९६)

तथापि विशेषत: गेल्या महायुद्धापासून शिंटोधर्माचें जागतिक संबंधाचे दृष्टीनें पुनरुज्जीवन करण्याकडे व त्याचें नूतन पद्धतीनें रहस्य सांगण्याकडे लोकांचा कल दिसू लागला आहे.

> " टोकियोमधील सरकारी युनिव्हर्सिटीच्या कायदाखात्याचे प्रोफेसर डॉ. काकेही यांनीं शिंटो धर्माला व्यापक

स्वरूप देण्याची चळवळ सुरू केली आहे. शिंटो धर्माला अत्यंत व्यापक अशा जागतिक धर्माचें स्वरूप व त्यांत बौद्धधर्म, कान्फ्यूशियनधर्म, शिंटोधर्मातील तेरा पंथ, ख्रिस्ती—धर्म, टाओ—धर्म, व मुसलमानीधर्म या सर्वांचा समावेश व्हावा, हा या चळवळीचा उद्देश आहे. त्यांच्या मतें शिंटोधर्म हा सर्व धर्मांचें मूळ आहे; तो धर्मांचा धर्म आहे. (होल्टन, टा. ए. सो. ज. ४९: २. ९९)

जपानी लोक हे देवाचे लाडके लोक असून त्यांचा बादशहा हा साक्षात् ईश्वराचा अवतार आहे. म्हणून तर्कदृष्ट्या शिंटो हा विश्वधर्म होणार; व जगाचा उद्धार करणारी संस्कृति तो धर्म फैलावणार ही गोष्ट ठरलेली आहे. हा धर्म व ही संस्कृति पसरविण्याचा प्रयत्न करणें, हें जपानी लोक व बादशहा यांचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य चांगल्या रीतीनें बजावलें गेल्यास लौकरच जपानी बादशहा जगावर आपलें आधिभौतिक व आध्यात्मिक अधिराज्य चालवू शकेल. अर्थात् जपानचें जगावरील स्वामित्व शांततेच्या मार्गानींच स्थापिलें जाणार आहे, पण ह्या कामीं शांततेचे उपाय थकल्यास दंडबलाचा आश्रय करणेंहि वावगें होणार नाहीं.

(बिबालिकल वर्ल्ड; जुलै १९१९ पृष्ट ४३४)

जपानी प्राचीन कवि हिटोमारो (स. ७३७) यानें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें आजहि जपानचा असा दृढ विश्वास आहे कीं,—

"जपानांत प्रार्थना करण्याची जरूरच नाहीं;
कारण ही भूमी देवांची आहे.
तरीपण मी मोठ्यानें प्रार्थना करतो"

(चेंबरलेंन:--जपानी प्राचीन काव्य ८८)

१३ शिंटोधर्मांतील कांहीं ठळक गुण:—

(अ) निसर्गांतील अतिमानुष शक्तीविषयीं पूज्यभाव.

(आ) सामान्यत: मूर्तिपूजेचा अभाव; नाहीं म्हणाला मंदिरांतील गोल आरसा सूर्यदेवतेचें प्रतीक मानतात.

(इ) राजपद ही एक दैवी संस्था आहे अशी पूज्यभावना व त्याकरता प्राण देण्याची तयारी.

(ई) ऐक्य करणारी व उत्साह वाढविणारी स्वदेशभक्ति

(उ) मानव व देव यामधील परस्पराकर्षण

(ऊ) स्वच्छता व शुद्धि यांना या धर्मांत महत्वाचें स्थान दिलें आहे.

(ऋ) सौंदर्याविषयींपूज्य भाव हें या धर्माचे महत्वाचें अंग आहे.

(ऋ) वरिष्ठाविषयीं एकनिष्ठा हा या धर्माचा प्राण आहे

१४ या धर्मांतील कांहीं ठळक दोषः—

(अ) या धर्मांत अनेक देवतांची अगदीं खिचडी झाली आहे, त्यांच्या प्रकारांत व स्वरूपांत विश्वरचनेच्या दृष्टीनें एकसूत्रीपणा मुळींच नाहीं.

(आ) ह्या धर्मांतील ग्रंथांत देवतांच्या विचित्र कथा आढळतात.

(इ) नीतीचे बाबतींत आदर्श म्हणून पूजण्याला योग्य अशी एकही देवता ह्या धर्मांत नाहीं.

(ई) मानवजातीपुढें उच्च नीतिनियम ह्या धर्मानें ठेविलेले दिसत नाहींत.

(उ) मनुष्य व्यक्तीची वास्तविक योग्यता ह्या धर्मानें जाणलेली दिसत नाहीं.

(ऊ) धर्माला व्यवस्थित स्वरूप देऊन त्यांत चैतन्य ओतणारा असा एकही ऐतिहासिक संस्थापक ह्या धर्माला लाभला नाहीं.

(ऋ) सर्वांच्या नजरेला ढळढळीत दिसणारें असें एकाही महान् पुरुषाचें उदात्त चरित्र या धर्मांत आढळत नाहीं.

(ऋ) मानवसमाजापुढें या धर्मानें कोणताहि भव्य आदर्श ठेवलेला नाहीं.

(ए) भावी जीवनाविषयीं उन्नत आशा हा धर्म उत्पन्न करूं शकत नाहीं.

(ऐ) खरें धार्मिक जीवन ह्या धर्मांत दिसत नाहीं. केवळ कर्मकांडाचा खटाटोप ह्याच्यांत मुख्यतः दिसतो.

(ओ) ह्यांतील देवता मनुष्यांना फारशी मदत करीत असलेल्या दिसत नाहींत.

(औ) ह्या धर्माच्या बाहेर असलेल्या परकीय लोकांना ह्या धर्मानें इतिहासांत नोंद करण्यासारखे असें प्रत्यक्ष साहाय्य केव्हांही केलेलें नाहीं.

(अं) जपानी लोकाखेरीज इतरांना ह्या धर्मांत मुळींच स्थान नाहीं. अलीकडे मात्र ही स्थिति पालटत चालली आहे.

प्रकरण नववें

यहुदी धर्म.

न्यायी परमेश्वराची आज्ञा पाळणारा धर्म.

१ प्रास्ताविकः विद्यमान् धर्मांत याचें स्थान.

जूडेइझम (यहुदीधर्म) हा शद्ब नव्या करारांत (गॅलॅशियन १:१३) आढळतो. हा शद्बाचा अगदीं प्रथम उपयोग ग्रीक यहुदी साहित्यांत खिस्तपूर्व पहिल्या शतकांत केलेला सांपडतो. (२ मॅकाबीज २:२१; ८:१) "हिब्रूलोकांचा धर्म" हा त्या शब्दांचा तेथें अर्थ आहे. हा धर्माच्या समग्र इतिहासांतील घटना व्यक्त करणारा असा प्रस्तुत शब्दाखेरीज दुसरा कोणताही समर्पक शद्ब आढळत नाहीं.

व्यक्तिसंस्थापित नऊ धर्मांपैकीं यहुदीधर्म हा सर्वांत प्राचीन- आज जगांत पांच धर्म असें आहेत कीं, "विशिष्ट संस्थापकाला साक्षात् ईश्वरानें आमच्या धर्माचें रहस्य सांगितलें आहे" या श्रद्धेवर त्यांची उभारणी झाली आहे. या पांच धर्मांत यहुदीधर्म हा अत्यंत प्राचीन धर्म आहे. यहुदीधर्मानंतर कालदृष्ट्या पारशी,

ख्रिश्चन, इस्लाम, व शीख हे धर्म येतात. सृष्टीचा कर्ता व अखिल ब्रह्मांडाचा शास्ता असा एकच सगुण परमेश्वर आहे, असें मानणारे आज तीन धर्म आहेत. या तिघांत यहुदीधर्म कालदृष्ट्या पहिला. एका सगुण परमेश्वराविषयींची ही श्रद्धा या धर्मानें वारसा म्हणून ख्रिश्चन धर्माला दिली, व त्यानें इस्लाम धर्माला दिली.

परमेश्वराच्या अधिराज्याखालीं पृथ्वीवर कृतयुग अवतरेल अशा तऱ्हेची ग्वाही आपल्या धर्मग्रंथाचे द्वारें देणारे दोन धर्म; एक ख्रिश्चन धर्म; व त्यापूर्वीचा यहुदीधर्म हा दुसरा ही उज्ज्वल आशा यहुदी धर्माप्रमाणें ख्रिश्चन धर्मांतही उत्कटत्वानें दिसते. तरीपण ख्रिश्चन धर्माच्या मतें पृथ्वीवरील परमेश्वराचें हें चिरकालेप्सित अधिराज्य सुरू होण्याकरितां परमेश्वराशी प्रत्यक्ष सहकार्य करण्याची जबाबदारी ख्रिस्ती-लोकांवरच आहे.

यहुदी धर्मासंबंधीं एक अपूर्व गोष्ट अशी सांगतां येईल कीं, या धर्माचे अनुयायी, या धर्माचें आद्यस्थान जें पालेस्टाईन, त्यांत जितकीं वर्षें राहिले, त्यापेक्षां कितीतरी जास्त वर्षें ते अनुयायी पृथ्वीवर चोहोंकडे विस्कळित होऊन राहिले आहेत. तथापि, ते लोक अजून आपली धार्मिक व वांशिक विशेषता अजून विसरले नाहींत; आणि जगांतील कोणत्याही धर्मांतील लोकांना सोसावे लागले नाहींत इतके हाल यांना सोसावे लागले असूनही, त्यांनीं आपलें वैशिष्ट्य अजून कायम राखलें आहे ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

यहुदी धर्माच्या दीर्घकालीन इतिहासांत या धर्माची अनेकविध स्थित्यंतरें झालेलीं दिसतात. इतर धर्माप्रमाणें यानेंही दुसऱ्या धर्मांतून बऱ्याच गोष्टी घेतल्या आहेत. पण या धर्मानें

परधर्मांतून जितकें घेतलें त्यापेक्षां यानें दुसऱ्यांना जास्त दिलें आहे. खरें सांगावयाचें म्हणजे, यहुदी धर्म हा ख्रिश्चन व मुसलमान या दोन प्रबलप्रचारक धर्मांच्या पितृस्थानीं आहे. नीतीचे पायावर उभारलेला सगुणेश्वराद्वैतवाद हें या धर्माचें एक उज्ज्वल अंग आहे; जगाच्या धर्मविचारांत यहुदीधर्मानें ह्या सगुणेश्वराद्वैतवादाची मोठीच भर घातली आहे.

२ यहुदीधर्माचें धर्मग्रंथ:—

या धर्मांतील धर्मग्रंथांत एकंदर चोवीस ग्रंथांचा समावेश होतो. ह्या ग्रंथांचे एकंदर तीन गट केले आहेत. पहिल्या गटाचें नांव नियमग्रंथ; दुसऱ्या गटाचें नांव स्फूर्तवाणी; व तिसऱ्या गटाचें नांव लिखितग्रंथ. हे सर्व ग्रंथ हिब्रू भाषेंत लिहिले आहेत. फक्त डॅनियल या ग्रंथाचा अर्धा अधिक भाग, इझ्रा भागांतील कांहीं सरकारी ग्रंथ व जेरेमियातील एक कविता येवढीं काय ती आरामीक भाषेंत लिहीलीं आहेत. हे सर्व ग्रंथ प्राचीनपद्धतीच्या पूजामंदिरांत दर एक मूळभाषेतूनच वाचले पाहिजेत असा दंडक अजूनपर्यंत चालत आहे. ह्या ग्रंथाचें ख्रिश्चनधर्मांतील जुना करार असें विशेष प्रसिद्ध नांव आहे. जुन्या करारांत या ग्रंथांचीं एकोणचाळीस प्रकरणें केलीं आहेत.

सुमारे हजार वर्षेपर्यंत हें धर्मग्रंथसाहित्य रचलें जात होतें. परमेश्वरीय ज्ञानासंबंधीं धर्माचा जो विकास होत आला, त्याचे अनेक टप्पे या धर्मग्रंथांत दिसून येतात. ह्या ग्रंथांपैकीं पहिले पांच ग्रंथ यहुदी लोक फार पवित्र मानतात. या ग्रंथांना नियमग्रंथ अथवा हिब्रूभाषेंत तोरा असे म्हणतात. ह्या ग्रंथांत सृष्टीची

उत्पत्ति, यहुदीराष्ट्र व यहुदीधर्म इत्यादि विषय आले आहेत. तथापि, धर्मभावनेचा अत्युच्च विकास, या दृष्टीनें पाहतां नियम-ग्रंथांतील शेवटचा (डयटरानामी) ग्रंथ, धर्मगीतें व स्फूर्तिवाणी हा सबंध ग्रंथ ह्या सर्वांहून जास्त महत्व आहे. ईश्वराची सगुण भक्ति हे जें यहुदी धर्माचें अर्वाचीन स्वरूप त्यांतूनच ख्रिश्चन धर्माचा उदय झाला.

३ मूळच्या सेमेटिक धर्मांतून या धर्माचा उदय

(ख्रि. पू. १२००)

सेमेटिक लोकांच्या मूळच्या धर्मजीवनांतून यहुदीधर्म हा जन्म पावला असून, अशा तऱ्हेचा हा पहिलाच धर्म. हे असंस्कृत पण धर्मभावनाशील सेमेटिक लोक पूर्वी सर्वत्र भटकणारे असे एक जातीचे लोक होते, त्यांचे आधुनिक वंशज बदाऊन जातीचे लोक होत. ह्या लोकांचा मूळ विश्वास असा आहे कीं, निसर्गातील कित्येक पदार्थ उदाहरणार्थ पर्वत अथवा झरे, अथवा भावनेनें पवित्र म्हणून मानलेले खांब अथवा कमान यासारखे पदार्थ, ह्यांना देवता म्हणतां येईल. यांच्या समाजाची टोळ्या टोळ्यांनीं रचना केलेली होती; आणि प्रत्येक टोळीची मुख्य अशी एक एक देवता मानीत असत. टोळींतील प्रत्येक इसम (फार काय, पण टोळीवरील मुख्य देवतासुद्धां) टोळीचें ऐहिक-हित करणें व शत्रूंची हानि करणें या बाबतींत दक्ष असला पाहिजे, अशी या लोकांची अपेक्षा होती. या सर्व हकीकतीवरून एक गोष्ट स्पष्ट होते; ती ही कीं, ह्या लोकांच्या देवतेची कल्पना टोळीचा परंपरागत नायक अशा स्वरूपाचीच मुख्यत: होती. टोळीच्या बाहेरच्या लोकांचे बाबतींत हे लोक नीतिनियमांची

फारशी परवा करीत नसत. खुद्द आपल्या टोळींतही ह्या लोकांचे परस्परांशी संबंध अगदीं साधे व प्राथमिक स्वरूपाचे होते. ह्या संबंधाचें प्रदर्शन सामुदायिक भोजन करण्याचे द्वारें होत असे. ह्या भोजनसमारंभांत दिलेल्या बळीचें रक्त स्वीकारण्याकरतां टोळीची देवताही हजर राहते, असें हे लोक मानीत असत.

अशा रीतींच्या प्राथमिक अवस्थेंत असलेल्या धर्मांतून यहुदी-धर्माचा उदय झाला. मूळ धर्मांत नीतिकल्पना फारच थोड्या असून तो धर्म अनेक देव मानणारा होता. याचे उलट, यहुदीधर्मांत नीतिकल्पनांचा स्पष्ट विकास झालेला असून त्याचें एकेश्वर-वादावर प्रतिष्ठापन झालें होतें. या दोन धर्मांत इतकें अंतर पडण्याचें कारण त्यांतील अब्राहाम, मोझेस, एलिजा, व इस्रा-एलचे धर्माचार्य ह्या महनीय विभूति होत.

जेनेसीस ग्रंथांत अब्राहामचें वर्णन आलें आहे. त्यावरून त्याला नीतीच्या, एकपत्नीव्रताच्या व सत्यवादीपणाच्या बाबतींत आदर्श-पुरुष, आजकालचे लोक मुळींच मानणार नाहींत. तो आपल्या बायकोजवळ खोटें बोलला होता. (जेनेसीस १२ : ११–१९) आपल्या मुलाचा बळी द्यायला तो तयार झाला होता. (जेनेसीस २२ : १०) बऱ्याच बाबतींत तो आपल्या काळाला साजेल-साच मनुष्य होता. तरीपण, एकंदरीनें आपल्या अनेक देवता-त्मक परंपराधर्माला सोडून एका नव्या धर्माला अस्तित्वांत आणण्याचें त्यानें जें साहस केलें, त्यावरून तो एक मोठा मनुष्य होता असें म्हणायला हरकत नाहीं.

“ परमेश्वर आब्राहामपुढें प्रकट होऊन म्हणाला “ मी सर्वशक्तिमान् ईश्वर आहे, माझ्यासमोर चाल आणि पूर्ण पुरुष हो.”(जेनेसीस १७ : १)

ज्यू व ख्रिश्चन लोक अब्राहामला " ईश्वरभक्तांचा जनक " मानतात; कारण परमेश्वरावर त्याची श्रद्धा असून त्यानें परमेश्वराला संपूर्ण आत्मसमर्पण केलें होतें. आब्राहामचा असा विश्वास होता कीं " पृथ्वी व स्वर्ग यांचा शास्ता जो ईश्वर त्यावर माझी दृढश्रद्धा असल्यामुळें मी पृथ्वीवरील असंख्य प्रजाजनांचा राजा होणार आहे, आणि मी जगावर मोठे उपकार करणार आहे, " यहुदीधर्म व ख्रिश्चन धर्म ह्यांतील धर्मग्रंथांत आब्राहामचे ' देवाचा मित्र ' म्हणून वर्णन केलें आहे. तथापि, त्यानें आपल्या हयातींत आपल्या नवधर्मांचा प्रसार व संघटना करण्याचा प्रयत्न मुळींच केला नाहीं. यामुळें यहुदीधर्मांच्या इतिहासांत आब्राहाम जरी एक महनीय व्यक्ति गणली जाते, तरी तो त्या धर्माचा संस्थापक ह्मणून त्याची गणना करता येणें कठीण आहे.

४ जेहोवा पूजेचा संस्थापक मोझेस

(ख्रि. पू. १२०० च्या सुमारास)

इस्राएल, हिब्रू, ज्यू इत्यादि निरनिराळ्या नांवांनीं ओळखल्या जाणाऱ्या लोकांच्या या धर्माची उत्पत्ति धर्मदृष्ट्या एका मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगांतून झाली. मोझेस हा मूळ इजिप्तमध्यें राहणारा एक हिब्रू होता. इजिप्तमधील राजदरबारी त्याला मोठी मानाची जागा मिळाली होती. एकदा एका हिब्रू गृहस्थाला एक इजिप्तमधील गृहस्थ शिव्या देत होता. हें पाहून मोझेसनें या इजिप्तमधील गृहस्थाला ठार मारलें, व स्वत: जंगलांत पळून गेला. त्या ठिकाणीं त्याला असा भास झाला कीं, " आपल्या लोकांची जुलमापासून मुक्तता करण्याकरता ये "

असें ह्मणून येहोवा आपल्याला बोलावीत आहे. ह्मणून हिब्रू-लोकांच्या स्वातंत्र्याचा कैवारी ह्मणून 'परमेश्वराच्यावतीनें' तो पुढें आला. परमेश्वराला त्यानें योजलेला शब्द 'मी तो आहे' अथवा हिब्रू भाषेंत 'येहोवा' हा होता. अस्सल शब्द जाहवे अथवा याहवे हा असावा. असो; मोझेसनें अनेक स्थित्यंतरें अनुभवून शेवटीं इस्राएल प्रजेची इजिप्तमधील गुलामागिरींतून सुटका करण्यांत पुढाकार घेतला. यानंतर सुमारें चाळीस वर्षें इजिप्तसोडून पुढें पुढें जात त्यानें त्या लोकांना पॅलेस्टाइन ह्या ईश्वरदत्त भूमीच्या सरहद्दीवर आणून सोडलें. एकदा होरेब उर्फ सिनाई पर्वतावर चोहोबाजूंनी आकाश मेघांनीं व्याप्त झालें होतें; मधून मधून मेघांचा गडगडाट चालला होता; निसर्गाची अशारीतीनें मन:क्षोभ उत्पन्न करणारी परिस्थिति असतां मोझेसनें प्रत्यक्ष ईश्वरानें केलेल्या ह्मणून "दहा आज्ञा" लोकांपुढें जाहीर केल्या. (एक्झोडस २०: १-१७; ड्यूटरानामी ५:६:२१) संकट-समयीं ईश्वरानें आपलें रक्षण केलें ही कृतज्ञताबुद्धी जागृत झाल्यानें व या दहा आज्ञा प्रत्यक्ष ईश्वरानें केल्या ही भावना असल्यानें इस्राएल लोकांनीं ईश्वरीय कल्पनेचा स्वीकार केला. आतां ही कल्पना त्यांच्या बुद्धीला पटली होती अथवा ह्या कल्पनेच्या बळावर त्यांना विश्वाचें कोडें सोडवितां आलें, असें मात्र मुळींच नाहीं.

मानवजातीच्या तत्कालीन धर्मांत मोझेसनें अत्यंत प्रगति केली. त्यानें कधीं न विसरणारा असा एक चमत्कार करून लोकांना दाखविला व "सामाजिक अन्यायांच्या परिस्थितीतून न्यायी परमेश्वरानें तुमची आतां सुटका केली आहे" असा त्या चम-

ळ्काराचा त्यानें अर्थ केला. न्यायप्रिय परमेश्वराविषयीं वैयक्तिक व जातीय श्रद्धा हा इस्राएल (यहुदी) धर्माचा मूळ पाया होय.

५ पॅलेस्टाइनमध्यें झालेलें अनेक धर्मांचें संमिश्रण—

(खि. पू. १२०० ते ९००)

हिब्रू लोक प्रथम ' कन्नन ' या प्रांतांत शिरले, तेव्हां त्यांनीं तेथील मूळच्या रहिवाश्यांची कत्तल उडविली. ही कत्तल आह्मी ईश्वरी आज्ञेनुसार करीत असल्यानें त्यांत आमचा अपराध नाहीं, अशी त्यांची समजूत होती. (जोशुआ १०:२२-२६; ११ २–९, २१) यानंतर त्यांनीं आपली भटकण्याची वृत्ति सोडून दिली, शेतीवाडी सुरू केली, व त्या भूमींत कायमची वस्ती केली. आतां मात्र त्यांच्या धर्मकल्पनेंत कांहीं ठळक फेरफार घडून आले. पूर्वीं परिस्थितीवर मात करण्याची त्यांची वृत्ति होती, ती मागनूत आतां परिस्थितीशी मिळतें घेण्याची वृत्ति त्यांच्यांत उत्पन्न झाली. हळुहळु मूळच्या कॅनान लोकांना त्यांनीं आपल्यांत मिळवून घेतलें व त्यांच्या कॅनानीधर्मांतील कांहीं गोष्टीही आपल्या धर्मांत घेतल्या. उदाहरणार्थ, तद्देशीय धर्मांतील बालपूजा (भूमिदेवतांची पूजा) त्यांनीं स्वीकारली, व कन्नन लोकांच्या अष्टराथ (सेमिटिक देवता) देवतांचीही ते पूजा करूं लागले. ज्या लोकांना मोझेसनें जेहोवाचा धर्म अगदीं सोंवळा ठेवा म्हणून निक्षून सांगितलें होतें, तेच यहुदीलोक आतां कॅननी-लोकांच्या, वसंतोत्सव, शरदुत्सव, नवसस्योत्सव, मदिरोत्सव इत्यादि उत्सवांत आपलेपणाच्या भावनेनें भाग घेऊं लागले.

" त्यांनीं या देवताकरतां मोठालीं मंदिरें बांधलीं, स्तूप उभे केले, प्रत्येक उंच टेकडीवर एक एक अशेरिम (लिंग)

स्थापिलें, व प्रत्येक वृक्षाखालीं एक एक देऊळ बांधलें. ज्या धर्मविधींना येहोआनें तिरस्करणीय मानले आणि त्यांच्या सांगण्यावरून इस्राएल लोकांनीं ज्या विधींचा संपूर्ण निषेध केला होता, तेच विधि ते आतां खुशाल पाळूं लागले. (१ किंग १४ : २३)

आणि ज्या मूर्तींच्या पूजेचा जेहोवानें स्पष्ट शब्दानें निषेध केला होता, त्याच मूर्तींना ते आतां भजूं लागले. (२ किंग्ज १७ : १०–१२)

अशा रीतीनें मूळच्या धर्माचा खूप प्रभाव पडल्यामुळें यहुदी धर्माची वाढ बरीच खुंटली. यानंतर अनेक शतकांनीं होऊन गेलेल्या एझेकील या धर्माचार्यानें जरूसलेमविषयीं पुढील उद्गार काढले आहेत:—" तुझी आई हिटाइटवंशीय होती व तुझा बाप अमोराइट होता. " याचा अर्थ असा कीं, हें शहर प्राचीन धर्म व हिब्रू धर्म या दोघांच्या मीलनाचें स्थान होतें.

साम्युएल, सॉल, डेव्हिड व सालोमन या चार राजांच्या कारकीर्दींत जेहोवाच्या छत्राखालीं राष्ट्रीय ऐक्य उत्तम तऱ्हेनें साधलें गेलें. परंतु सालोमनच्या राज्याचे दोन तुकडे पडल्यानें त्या राष्ट्रीय ऐक्याला ओहोटी लागली. तरीपण ज्यावेळीं साहसी जेझेबेलनें फिनीशियन देवता हिब्रू धर्मांत घुसडायला सुरवात केली तेव्हां एलिजानें लोकांच्या हृदयांत सुप्त असलेली जेहोवाची भक्ति जागृत केली व आक्रमण करणाऱ्या बालदेवतेला कायमचें हुस-कून लावण्याविषयीं उद्युक्त केले. (१ किंग्ज १६ : ३१–३३; १८ : २०–४०)

६ यहुदी धर्मसाहित्यरचनेची सुरवात—

(खि. पू. ९००–७५०)

अमॉस व होसिया या धर्माचार्यांनीं खि. पू. आठव्या शतकांत आपला धर्मोपदेश केला. त्यावेळीं या दोघा धर्माचार्यांनीं असें गृहीत धरलें कीं, इस्राएल लोकांना प्राचीन इतिहासाची पूर्ण माहिती आहे. या त्याच्या समजुतीवरून असें सहज अनुमान करता येतें कीं, जेनेसीस पासून २ च्या किंग्ज पर्यंतच्या ग्रंथांत आलेल्या सर्व प्राचीन कथा खि.पू.७५० पूर्वीं तयार झाल्या होत्या. या धर्मग्रंथापैकीं पहिले पांच ग्रंथ त्यांच्या नांवावरून मोझेसनें रचले असावेत असें म्हणतात, पण हें ह्मणणें ठीक दिसत नाहीं; कारण एकतर मोझेसनें आपल्या स्वत:च्या मृत्यूची हकीकत स्वत:च सांगितली, ही गोष्ट अशक्य; व दुसरें मोझेसनें आपल्या मागून होऊन गेलेल्या धर्माचार्यांशी स्वत:ची तुलना करणें हेंहीं अशक्य. (डयूटरानामी ३४:५–१०) विद्वान् संशोधकांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, जुन्या कराराची पहिलीं सहा पुस्तकें एकाच काळीं सलंग रचलीं गेलीं आहेत; आणि सालोमन व त्याच्या पूर्वीचे धर्माचार्य साहित्यकार या दोघांमधील कालखंडांत त्या ग्रंथांतील बहुतेक भाग लिहिला गेला.

ह्या सुमारास हिब्रूलोकांचा प्राचीन इतिहास एक सुसंबद्ध कथारूपानें ग्रथित करण्याचे दोन निरनिराळे प्रयत्न हिब्रू धर्माचार्यांनीं केले. पुढें ह्या दोन्ही प्रयत्नांनीं एकजीव होऊन आज उपलब्ध असलेला हिब्रू इतिहास निर्माण केला. हा इतिहास पुढें पवित्र धर्मग्रंथांत मोडू लागला. ह्या ग्रंथांत त्याकाळीं उपलब्ध असलेली ऐतिहासिक सामग्री मनोरंजक व प्रमाणशीर रीतीनें

मांडली असल्यानें ग्रंथ सर्वमान्य झाला आहे. शिवाय परमेश्वराचा जग निर्माण करण्यांतील हेतू व त्याची जगदुद्धार करण्याची इच्छा ह्यांचें स्पष्ट निदर्शन व्हावयाचें असल्यास प्राचीन इतिहास व हिब्रू राष्ट्राचा वृत्तान्त जाणण्याची अत्यंत जरूरी आहे, अशी ही समजूत त्याकाळीं प्रचलित होती.

७ देशत्यागापूर्वींचे हिब्रू धर्माचार्य (७५०–५८६ खिस्तपूर्व)

बाबिलोनियामध्यें कोंडून पडण्यापूर्वीं हिब्रू लोकांना त्यांच्या धर्मातील अत्युच्च तत्त्वें शिकविण्याचें कार्य एकामागून एक आठ हिब्रू धर्माचार्यांनीं केलें. यांतील पहिल्या चार आचार्यांचा, धर्मांतील यज्ञयाग व मंत्रतंत्र यांचें त्याकाळीं माजलेलें स्तोम कमी करून नीतिनियमांना योग्य महत्त्व देण्यावर, फार कटाक्ष होता.

(१) आमॉस ह्या धर्माचार्यानें न्यायप्रिय ईश्वराची आज्ञा पाळणें हें व्यक्तिदृष्ट्या व राष्ट्रदृष्ट्या आवश्यक आहे, अशी घोषणा केली. असें न केल्यास जेहोवा आपल्या पूजकांचें पारिपत्य करील व हिब्रूंना मान्य नसलेल्या इतर राष्ट्रांतील देवतांच्या पूजकांवरही त्याचा रोष होईल असेंही त्यानें प्रतिपादिलें.

"तुमच्या प्रार्थनासंगीताचा गोंगाट बंद करा. मला तुझ्या कंठाच्या माधुर्याचा वीट आला आहे. ह्याचे ऐवजीं तुझ्या न्यायबुद्धीचा प्रवाह, पाण्याच्या लोंढ्या सारखा वाहू दे; आणि तुझ्या सद्भावना प्रचंड जलप्रवाहाप्रमाणें वाहू देत. (ॲमॉस ५: २३–२४)

(२) ईश्वराच्या न्याय–निष्ठुरत्वाबद्दल ॲमॉसनें केलेल्या ह्या

घोषणेच्या जोडीला, ईश्वराच्या दयाळुत्वाची घोषणा होसिया या धर्माचार्यांनें केली. ईश्वर हा मनुष्यप्राण्यावर प्रेम करतो हें तत्व जगांतील धर्मांच्या आद्यतत्वांपैकीं एक आहे. होसिया हा एका मोठ्या कौटुंबिक आपत्तींतून सुरक्षित पार पडल्यानें त्यांच्या मनांत अशी दृढ श्रद्धा उत्पन्न झाली कीं, परमेश्वर हा अत्यंत दयाळु आहे. पापी मनुष्याला मनापासून पश्चात्ताप झाल्यास ईश्वर त्याला क्षमा करावयाला सदैव तयार असतो; तरीपण तो न्याय-निष्ठुर असल्यानें अपराध्याचें शासन करायला तो मागें पुढें पाहणार नाहीं, हीं होसियाची आपल्या लोकांना शिकवणूक होती.

"मला यज्ञयागापेक्षां भूतमात्रांतर दया व प्रेम करणें जास्त आवडतें. यज्ञांत आहुति देण्यापेक्षां मला परमेश्वराविषयींचें ज्ञान मिळविणें ही गोष्ट जास्त महत्त्वाची वाटते." (होसिया ६:६)

"म्हणून परमेश्वराकडे चित्त लाव. अंतःकरणांत दया व न्यायबुद्धि जागृत ठेव." (होसिया १२:६)

(३) ईसा या आचार्यानें धर्मप्रसारकार्य सुरू करताना "जेहोवा हा अत्यंत पवित्र ईश्वर आहे" असा स्वतःला साक्षात्कार झाल्याचें जाहीर केलें.

"पवित्र, पवित्र, पवित्र, जगदीश्वर पवित्र आहे. सर्व पृथ्वी त्याच्या ऐश्वर्यानें भरून गेली आहे." (ईसा ६:३)

ज्या ज्या वेळीं आपल्या राष्ट्रावर संकटाचे प्रसंग आले, अथवा राष्ट्राराष्ट्रांत गुंतागुंतीचे प्रश्न उभे राहिले, त्या त्या वेळीं

ईसा या धर्माचार्यानें आपली कुलदेवता जेहोवा हिच्याविषयीं आपल्या हृदयांत असलेल्या आनुवंशिक श्रद्धेचीच कास धरली, व नीतिमार्गाचा आश्रय केला. त्याच्या धर्म व्याख्यानांच्या संग्रह-ग्रंथातील पहिल्या भागांत जेहोवा विषयीं ईसानें दिलेल्या व्याख्यानांचीं कांहीं खास उदाहरणें सांपडतात. उदा० "जेहोवाला कोणाही मनुष्याच्या जातीची अथवा त्यानें केलेल्या यज्ञयागांतील क्रियाकांडाची कांहींएक महती वाटत नाहीं. पापी जनांचा उद्धार करून त्यांना सन्मार्गाला लावणें हेंच त्याचें अवतारकार्य. (ईसा १:१-२०; व २:२-४; ८:१९-२०; २८:७-२२) इस्राएल लोकांनीं केलेल्या पापाबद्दल त्यांचे जेहोवा शासन करणारच; तरीपण, भावीकालांत त्यांचा खास उदय होणार अशारीतीची स्पष्ट ग्वाही ईसानें दिली होती.

(४) मिका या धर्माचार्यानें अशी घोषणा केली कीं, "जरी पूर्वीच्या ज्यू लोकांची श्रद्धा परमेश्वर आपल्याला सर्व ऐहिक सुखें देईल अशी होती, तरीपण मला तशी श्रद्धा मुळींच वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर आम्हा ज्यू लोकांच्या नैतिक हिताकरता जेहोवा आमचें जरूर शासन करील. फार काय, पण इतर राष्ट्रांकडूनही आमचें पारिपत्य करील." (मिका ३:११-१२) मिकानें मनुष्यांच्या धर्मकर्तव्याविषयीं संक्षेपतः जे उद्गार काढले आहेत, ते विद्यमान धर्मांत उत्तुंगगिरिशिखराप्रमाणें शोभण्यासारखें आहेत:—

"न्यायानें वाग. दयेचा ओलावा सदैव हृदयांत बाळग. ईश्वराच्या मार्गावर नम्रपणानें चाल."

बाकीचे चार धर्माचार्य ज्यू लोकांच्या राजसत्तेच्या शेवटच्या अमलांत होऊन गेले. झेफानिया या धर्माचार्यानें आमॉसप्रमाणेंच असें प्रतिपादन केलें कीं, पापाचारी मनुष्य पापापासून पश्चात्तापपूर्वक निवृत्त न होईल तर न्यायनिष्ठुर ईश्वर त्याचें उग्रशासन केल्यावांचून राहणार नाहीं. नाहूमनें असें उपदेशिलें कीं, 'ईश्वर हा न्यायी आहे, तसा दयाळूही आहे. सर्व पृथ्वींत तोच श्रेष्ठ आहे.' हबक्कूकची शिकवणूक अशी होती कीं, ईश्वर हा न्यायनिष्ठुर असला तरी त्याचे ठिकाणीं सर्व सद्भावना वास करतात. या प्राचीन धर्माचार्यांच्या उपदेशवचनांपैकीं एका वचनाचा अनेक रूपांतर होऊन गेलेल्या पाहून, आगस्टाइन व लूथर या प्रख्यात धर्माचार्यांच्या मनांवर फार परिणाम झाला होता. (हबक्कूक २:४) यानंतरच्या काळांत जेरेमिआ या धर्माचार्यानें धर्मजागृति व धर्मविकास करण्याचे बाबतींत जोराचा पुरस्कार केला. स्वतःवर आलेल्या भयंकर आपत्तीचे प्रसंगीं त्याला हें अनुभवानें कळून आलें कीं, ईश्वराशी सख्य जोडल्यानें मनुष्य दुःखापासून मुक्त होतो. धर्म ही एक कर्तव्याची बाब आहे; ईश्वरोपासनेच्या योगानें अन्तःकरणावर शुभसंस्कार उत्पन्न होतात, इत्यादि उपदेशही यानें केला आहे.

> " जेहोवा ह्मणाला—' हे पहा ! आज मी एक नवी प्रतिज्ञा करतों, आजपासून मी मनुष्यमात्रांच्या हृदयांत माझे नियम ठेवीन, त्यांच्या हृदयांत माझें शासन लिहून ठेवीन. (जेरमिया ३१:३१-३३)

पुण्यशाली व्यक्तीला परमेश्वर आपल्या जगद्वात्सल्याचे रहस्याचा लोकांत प्रसार करण्याला खास दूत म्हणून पाठवीत

असतो, ह्या दूतकर्मांत त्या व्यक्तीच्या राष्ट्राचा अथवा जातीचा कांहींएक संबंध नसतो. हें तत्त्व प्रतिपादन करून जेरेमियानें एकेश्वरीवादाचें द्वार सर्वांना खुलें करून दिलें, आजपर्यंत स्वतःला इष्ट अशी कोणती तरी देवता घेऊन लोक तिची उपासना करीत असत; पण उपास्यदेवता जगाचा नियंता एक परमेश्वरच होय, असें या आचार्यानें स्पष्ट जाहीर केलें, आपल्याला इष्ट वाटत असलेल्या धर्ममतांचा प्रसार करणें हें प्रत्येक धर्माचें आवश्यक कार्य आहे, असें प्रथम सांगणारा हाच धर्माचार्य. ही त्याची शिकवणूक ज्यू लोकांनीं कांहीं दिवस विकासितस्वरूपांत अमलांत आणून सोडून दिली; पण ती शिकवणूक ख्रिश्चन लोक आजपर्यंत मानीत आले आहेत.

८ विदेशवासाच्या काळीं उदय पावलेले दोन ज्यू धर्माचार्य—
(ख्रि. पू. ५८६--५३९)

बाबिलोनियामध्यें ज्यू लोकांनीं अर्धशतकापर्यंत कारावास केला. त्यासमयीं त्यांच्या धर्ममतावर विलक्षण प्रभाव पाडणारे दोन धर्माचार्य होऊन गेले:

(१) एझेकील या धर्माचार्यानें असें प्रतिपादन केलें कीं ईश्वर विश्वाचा शास्ता असून दयाळु व क्षमाशील आहे. ज्यू लोकांना स्वदेशांतून हुसकून लावण्यांत ईश्वरानें त्यांना त्यांच्या कृतापराधाबद्दल योग्यच शासन केलें, असें तो म्हणे. तरीपण त्याचें असें म्हणणें होतें कीं, ईश्वरानें ज्यू लोकांना ही निव्वळ शिक्षाच केली असें नसून, शिक्षेचे मिषानें आत्मशुद्धि व आत्मसंयमन करण्याची त्यांना ही

ईश्वरानें सोन्यासारखी संधि दिली आहे. एझेकीलच्या वेळेपर्यंत मोझेसच्या डिकॅलॉग मधील द्वितीय आज्ञेंत सांगिल्यामुळें लोकांची अशी समजूत झाली होती कीं, पूर्वजांनीं केलेल्या पापांचें फळ तीन–तीन चार–चार पिढ्यापर्यंत भोगायला ईश्वर लावतो. (एक्झोडस २०:५ डयुटरानॉमी ५:९) पण जेरेमियानें प्रतिपादलेल्या व्यक्ति कर्मवादाच्या आधारें एझेकीलनें या गोष्टीचा इनकार करून असें स्पष्ट जाहीर केलें कीं, स्वतः व्यक्ति जें पुण्य किंवा पाप करील त्यावरच त्याचेवर होणारी ईश्वराची कृपा अथवा शासन अवलंबून आहे. या गोष्टींत आनुवंशिक पुण्यपापाचा कांहींएक संबंध नसल्यानें लोकांनीं निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं.

" जो पाप करील तोच विनाश पावेल."

(एझेकिल १८:५,२०)

इतकेंच नव्हे तर, पापी हृदयाला पश्चात्ताप झाल्यास त्यांत परमेश्वर सद्बुद्धि उत्पन्न करीलच असा त्याचा पूर्ण विश्वास होता. (एझेकिल ११ : १९; ३६ : २६) याशिवाय एझेकीलनें एक नूतन धर्मसंघ व मंदिर स्थापून लोकांना धीर दिला व त्यांच्यांत चैतन्य उत्पन्न केलें. (अध्याय ४० ते ४८ पहा) पूर्वीची राजवट नसतानाही आपल्याला आपलें धार्मिक जीवन सुखानें पॅलेस्टाइनमध्यें घालवितां येईल अशा रीतीचा जनहृदयांत त्यानें दृढ विश्वास जागृत केला. धार्मिक पूजाविधींचें नवसंस्करण करून, जेहोवाचा आपल्यावर निश्चित अनुग्रह होईल अशी एक नवीन धर्मविधींची योजना करायची, अशी त्याची मनीषा होती.

ही त्याची कल्पना उच्च होती यांत शंका नाहीं; पण दुर्दैवानें जरुसलेम या शहरींच अमुक तऱ्हेचे क्रियाकाण्ड व धर्मविधि झाले पाहिजेत असा त्यानें आग्रह धरला.

" भगवान् जेहोवा म्हणाले:—' ज्यानें आपल्या शरीराचें व मनाचें कर्तव्यविधीप्रमाणें शुद्धीकरण केलें नाहीं असा कोणाही परकीय माणसाला माझ्या मंदिरांत प्रवेश करतां येणार नाहीं. " (एझेकील ४४ : ९)

अशा रीतीनें धर्मविधींचे हिब्रू लोकांच्या भोंवती एझेकीलनें एक कोंडाळें करून त्यांना एकत्रित केलें व त्यामुळेंच स्वदेश त्यागानंतर ज्यू हें नांव धारण करणाऱ्या हिब्रू लोकांनीं एझेकीलला यहुदीधर्माचा ' जनक ' हें नांव दिलें.

ईसा (४० ते ४५) हा धर्मपर उपदेशाचा संग्रहग्रंथ आहे. त्यांत बाबिलोनियांत केलेल्या देशविवासप्रसंगीं ज्यूलोकांना भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टांचें वर्णन आहे. या अध्यायांचा पहिल्या १ ते ३९ ह्या अध्यायांशीं विषयदृष्ट्या कांहीं संबंध नाहीं; कारण या पहिल्या ३९ अध्यायांत ख्रिस्तपूर्व आठव्या शतकांत होऊन गेलेल्या ईसा या धर्माचार्याच्या पॅलेस्टाईनमधील जीवनाचा वृत्तान्त आला आहे. या ग्रंथाचा कर्ता धर्मतत्त्व ग्रहणाचे बाबतींत फारच धार्मिक व उदार दृष्टीचा पुरुष दिसतो. इस्राएल धर्माचीं मतें स्पष्ट भाषेंत मांडण्याचें श्रेय यालाच देता येईल. इस्राएललोकांच्या इतिहासाचें ईश्वरीय ज्ञान संपादन करण्याचे बाबतींत खरें महत्व काय आहे, हें त्यानेंच लोकांना समजावून सांगितलें. जेहोवा हा विश्वाचा एकमेव ईश्वर आहे हे अगदीं स्पष्ट शब्दांत सांगणारा हा पहिलाच धर्माचार्य. (ईसा ४०:१२ ते २६; ४४:६–२०)

" माझ्याखेरीज दुसरा ईश्वर नाहीं.
न्यायी व तारक ईश्वर मीच आहे" (ईसा ४५:२१)

मी ईश्वराचा ' पाईक '—सेवक आहे; जगाचें तारण करण्याच्या कामीं ईश्वरानें मला साहाय्यकर्ता म्हणून घेतले आहे, मनुष्यांना ईश्वरातर्फे जामीन म्हणून मी उभा राहिलों आहे, असें तो लोकांना सांगत असे.

"लोकांना मार्गदर्शक म्हणून मी तुला पाठवीत आहे, जगाच्या अंतापर्यंत जनांचा उद्धारक म्हणून कार्य कर." (ईसा ४९:६)

परमेश्वराविषयींची व व्यावहारिक धर्माविषयींची ही कल्पना फार भव्य, तेजस्वी व अध्यात्मतत्त्वपूर्ण आहे. यहुदी धर्मांतील हे उद्गार अत्युदात्त आहेत. देशत्यागापूर्वी ज्यू लोक डेकालॉगमध्यें द्वितीय आज्ञेंत मूर्तिपूजेचा स्पष्ट निषेध असतांही मूर्तिपूजेकडे झुकत होते, पण आतां तें हलके हलके मूर्तिपूजा सोडूं लागले.

९ नियमबद्ध यहुदीधर्माची हळूहळू स्थापना—
(५३९–४०० ख्रिस्तपूर्व)

ख्रि० पू० ५३९ मध्यें बाबिलोन शहर सायरसनें हस्तगत केल्यानंतर ज्यू लोकांना पॅलेस्टाइन या पूर्वीच्या आपल्या देशांत परत जाण्याची परवानगी मिळाली, पण या परवानगीचा फायदा फारच थोड्या लोकांनीं घेतला. बहुतेक ज्यू यापुढें स्वदेशाबाहेरच कायमचे राहिले; पण याउप्पर शेती करण्याचे ऐवजीं ते व्यापारधंदा करूं लागले; व जसजशी संधि मिळत गेली, तसतसे ते

चोहोंकडे पसरले. तरीपण आपल्या धर्मसभा धर्मशास्त्री व पंडित यांच्या प्रभावामुळें आपल्या धर्माचें ध्येय व चालीरीती यांच्याशीं ते एकनिष्ठेनें वागत असत. एवंच ज्यू लोकांचा धर्म आपल्या स्वदेशाच्या मर्यादा ओलांडून इतरत्रही प्रभावशाली झाला.

हगाई व झेपारिआ यांच्या कळकळीच्या आग्रहावरून व झेरुबावेल आणि जोशुआ यांच्या नेतृत्वाखालीं जरुसलेममध्यें खि. पू. ५१६ मध्यें दुसरें एक मंदिर बांधण्यांत आलें; व जरुसलेमचा विध्वंस झाला असताही या मंदिरांत पूर्ववत् पूजा सुरु करण्यांत आली. यानंतर सुमारें शंभर वर्षांनीं नेहेमिया या पुढाऱ्याच्या हाताखालीं जरुसलेमला नवी तटबंदी करण्यांत आली, व त्यांत पूर्ववत् वस्ती होऊन त्यांचें पूर्वीचे वैभव त्याला प्राप्त झालें. यानंतर लौकरच इझरा या लेखकाच्या प्रेरणेनें एक चळवळ जोरानें सुरु झाली. ही चळवळ इझराच्या पूर्वी दोनशें वर्षें हळु हळु सुरुच होती. जोशिया राजानें डयूटरानामी ह्या धर्मग्रंथांत नव्यानें व्यवस्थित स्वरूपांत मांडलेले मोझेसचे धर्मनियम व त्यांची मूलतत्त्वें यांचे तंतोतंत पालन करण्यास आपल्या प्रजेला समजावून पटविलें होतें. या राजानें केलेल्या धर्मसुधारणा डयूटरानामीचा आधार घेऊनच केलेल्या होत्या व त्यांत मुख्य पूजा जरुसलेममध्येंच झाली पाहिजे हीही एक बाब होती.

यापुढील दोनशें वर्षेपर्यंत डयूटरानामी हें धर्मशास्त्राचें पुस्तक ज्यूलोक प्रमाणग्रंथ म्हणून मानीत. तथापि, ज्यूलोकांच्या स्वदेशत्यागानंतर, बहुधा एझेकीलच्या प्रभावामुळें आजपर्यंतच्या सर्वधर्मविधींचा एक बृहत् संग्रह करण्याचा प्रयत्न जोरानें सुरू झाला. हा धर्मविधींचा संग्रहग्रंथ एझेकीलच्या

कालीं पुरा करण्यांत येऊन त्याला ' पुरोहिताचें धर्मशास्त्र ' असें नांवही देण्यांत आलें होतें. हा संग्रहग्रंथ एक्झोडस लेव्हिटिकस व नंबर्स यांच्या प्रकरणांतून आलेला आहे. हा ग्रंथ इझरानें बाबिलोनियाहून पॅलेस्टाइनला नेला; आणि नेहेमिआच्या साहाय्यानें त्यानें तो ग्रंथ जेहोआविषयीं असलेल्या आपल्या भक्तीचें चिन्ह म्हणून व प्रमाणग्रंथ म्हणून स्वीकारण्याविषयीं लोकांचें मन वळविलें. हा त्याचा उद्देश स्तुत्य होता यांत संशय नाहीं; कारण ईश्वराचें व त्याच्या भक्तांचें पावित्र्य आदरणीय आहे अशी भावना लोकांचें मनांत त्याला जागृत करावयाची होती. पण त्याची चूक एवढीच झाली कीं, त्यानें ह्या ग्रंथांतील बाह्य धर्मविधींवर फार भर दिला. उदाहरणार्थ धर्माचार्य व इतर लोक यांचा शुद्धीकरणविधि, यज्ञयाग व कर्मकांड यांचें विधान न चुकतां अंमलांत आणलें पाहिजे हा नियम, सबाथ दिनाच्या विधीचें कडकडीत आचरण झालें पाहिजे हा नियम, ज्यू लोकांचें रक्त शुद्ध राहील अशारीतीनेंच लग्नसंबंध केले पाहिजेत हा निर्बंध आणि याप्रमाणें इतरही अनेक धर्माज्ञा यांचें भयंकर स्तोम माजविण्यांत आलें. वास्तविक जेहोवाचे ठिकाणीं पूर्ण निष्ठा रहावी हाच या धर्म विधींचा मूळ हेतु असूनही त्याचा विपर्यास झाला. एवंच एका बाजूनें परमेश्वराच्या सत्य स्वरूपाविषयीं लोकांचें ज्ञान वाढत चाललें असतां, दुसऱ्या बाजूनें धर्मविधिचें अवडंबर इतकें माजलें कीं, त्याखालीं खरें अध्यात्मज्ञान लुप्त होण्याची वेळ आली. धर्मनियमांची अशा रीतीची ही अवश्यकर्तव्यता या पुढच्या काळांतील यहुदी धर्मपंडितांनीं तर अगदीं कळसाला नेली.

१० झेफानिया, एझेकील जोल वगैरे अर्वाचीन धर्माचार्य एकीकडे नीतिनियमांचा उपदेश करीत होते तर दुसरीकडे परमेश्वर हा न्याय देण्याकरता अकल्पित रीतीनें प्रकट होईल असा विश्वास जनतेंत उत्पन्न करीत होते. इराणसारख्या बलाढ्य राष्ट्राशीं टक्कर देण्याचें स्वतांत सामर्थ्य नसल्यानें ज्यू लोक निराश झाले होते; तरीपण इस्राएल धर्माच्या मार्गातील विघ्नें दूर करण्याकरतां जेहोवा केव्हांतरी आपली शक्ति प्रकट करील अशी त्यांना आशा वाटत होती. अशा स्थितींत बराच काळ लोटला. या काळांत लोक नुसते विचार करीत बसले होतें; व ही कर्तृत्व-शून्य स्थिति, "सामाजिक अन्यायाशी टक्कर देण्यासाठीं आपण नीतितत्वांचा जोरानें पुरस्कार केला पाहिजे." ही जी त्यांच्या प्राचीन धर्माचार्यांची शिकवणूक, तिच्याशी संपूर्ण विसंगत होती. डॅनिएल, एनॉक व इतर साक्षात्कारवादी लेखक भावी काला-विषयींची सुखस्वप्नें पाहण्यांत गुंग होऊन गेले होते. न्यायी ईश्वराची आज्ञा पाळण्याची जबाबदारी प्रत्येक व्यक्तिमात्रावर आहे असें सांगण्याऐवजीं, दरएक बाबतींत ईश्वर पुढाकार घेऊन आपली शक्ति प्रकट करील, अशी आशा करीत ते स्वस्थ बसले.

भावीकालांत ईश्वर आपण होऊन येऊन आमचा उद्धार करील असे विचार लोकांच्या मनांत उद्भूत करणारा हा भगवदनुग्रहवाद इतर दृष्टीनें अगदीं कुचकामाचा असला, तरी त्याचे पोटांत ईश्वरावर एक प्रकारचा उज्ज्वल विश्वास व आत्मसमर्पण ह्या गोष्टी आढळून येतात, यांत शंका नाहीं. पण ह्या वादानें लोकांची कर्तृत्वशक्ति कुंठित करून टाकली व त्यांना बेजबाबदार बनविलें ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे. या वादाचा एक इष्ट परिणाम ज्यू

लोकांवर झाला; तो हा कीं, ज्या भयंकर परिस्थितींत दुसरीं राष्ट्रें नामशेष होऊन गेली असती, त्या परिस्थितींत ज्यू लोकांनीं ईश्वरावरील आपली श्रद्धा अचल ठेवली.

११ यहुदी धर्मांतील ईश्वरविषयक कल्पना.

ईश्वरविषयक कल्पनेचा विकास, ही गोष्ट या धर्माला अभिमान वाटण्याजोगी आहे. हा विकास पायऱ्या पायऱ्यानेंच होत गेलेला दिसतो. एकेश्वरीवाद हा मोझेसनेंच प्रथम शोधून काढला असें मुळींच नाहीं. डेकालॉगमधील प्रथम आज्ञेंत जेहोवा खेरीज इतर देव मुळीं नाहींतच असा स्पष्ट निषेध नाहीं; तरीपण, जेहोवाशिवाय दुसऱ्या देवांची पूजा करता कामा नये असा मात्र स्पष्ट निषेध आहे. (एक्झोडस २०:३ डयूटरानामी ५:७) खुद्द डेव्हिडसारख्या राष्ट्रजीवनाच्या निर्मात्यालाही असें वाटत होतें कीं, स्वदेशत्याग करणें ह्मणजे जेहोवापासून वियुक्त होणें. (१ साम्युएल २६:१९) अगदीं आठव्या शतकापर्यंत, अथवा बाबिलोनियांतील विदेशवासाचे सुमारास स्वत: हिब्रू लोक जरी जेहोवाचे भक्त होते तरी इतर राष्ट्रांनीं आपआपल्या देवतांची पूजा करण्याला त्यांची हरकत नव्हती. अशा तऱ्हेच्या ईश्वरविषयक मताला ' henotheism ' (एक श्रेष्ठदेवतावाद) अशी विशिष्ट संज्ञा आहे.

हिब्रू लोकांतील अमोसपासून देशत्यागाच्या वेळच्या अज्ञात पण श्रेष्ठ व्यक्ति पर्यंतच्या धर्माचार्यांच्या उज्वल परंपरेनेंच जगाला एकेश्वरवादाच्या भव्य व परिपूर्ण कल्पनेपर्यंत टप्याटप्यानें आणून सोडलें. प्रथम खिस्तपूर्व आठव्या शतकांतील अमोस होसिया, ईसा व मिका या चार धर्माचार्यांनीं नीतिदृष्ट्या परिपूर्ण अशा

ईश्वराची कल्पना लोकांपुढें मांडली. ईश्वर सद्भावनापूर्ण, पवित्र, प्रेमळ, विवेकी, असा आहे; "सर्वांनीं माझ्यापुढें मान वाकविलीच पाहिजे" असें ह्मणणाऱ्या अरेरावी राजासारखा तो नाहीं असें त्यांनीं ईश्वराचें वर्णन केलें. यानंतर खिस्तपूर्व सातव्या व सहाव्या शतकांतील धर्माचार्यांनीं विशेषतः जेरेमीआ व एझेकील यांनीं जेहोवाची भक्ति करण्याचें बाबतींत प्रत्येक व्यक्तिवर स्वतः-पुरती नैतिक जबाबदारी आहे या कल्पनेवर भार दिला. परमेश्वराचा अनुग्रह एकाद्या व्यक्तीवर होण्याकरता ती व्यक्ति स्वतः सद्भावनाशाली असली ह्मणजे बस्स आहे, त्या व्यक्तिचें संपूर्ण राष्ट्रही तसें असलें पाहिजे असें कांहीं नाहीं, असें त्यांचें स्पष्ट मत होतें. ज्यू लोकांखेरीज इतरानींही जेहोवाची पूजा करण्यास हरकत नाहीं अशा रीतीचा प्रथम उल्लेख 'जेरेमिआ १२:१५–१७' या ठिकाणीं सांपडतो. आणि शेवटीं ईसाच्या ४० ते ५५ या सर्वोत्कृष्ट अध्यायांत (ह्मणजे स्वदेशत्यागानंतरच्या कालापासून पुढें) अशी स्पष्ट घोषणा केली आहे कीं, ईश्वर हा विश्वव्यापी असल्यानें त्याला कोणत्याही जातीच्या कोणत्याही काळाच्या व कोणत्याही ठिकाणच्या माणसानें पूजायला हरकत नाहीं. ह्या कल्पनेचा प्रसार, वाटेल ते हाल भोगून व वाटेल तो स्वार्थत्याग करून, सर्वत्र करावा अशी, त्या सर्वशक्तिमान् सर्वसाक्षी व सर्वगुण संपन्न सृष्टिकर्ता, सर्वशास्ता व तारक अशा ईश्वरानें आपल्या दासांना (यहुदीलोकांना), आज्ञा केली असल्याचें वरील ग्रंथांत सांगितलें आहे.

परमेश्वरी योजनेचा अशारीतीनें अखिल पृथ्वीवर फैलाव करण्याच्या या कल्पनेला मूर्तस्वरूप शेवटीं येशूखिस्ताच्या उपदेशांत

मिळालें. सामान्यत: ज्यू लोकांनीं या अत्युच्च परमेश्वरीय कल्पनेपर्यंत केव्हांच मजल मारली नाहीं. त्यांचें बहुतेक लक्ष बाह्यधर्मविधींवर असे. पण अशारीतीनें बाह्याचारावर भर देण्यापासून त्यांचा एक फायदा असा झाला कीं, येशूख्रिस्ताच्या वेळेपर्यंतचा अनेक शतकांचा जो ' जंगली जमाना ' त्या काळांत यहुदी धर्मांतील अत्यंत महत्त्वाच्या तत्त्वांचें या लोकांना बाह्यधर्म विधींच्या कवचाखालीं संरक्षण करतां आलें. तथापि, एकंदरीनें पाहतां जीवनाच्या खडतर अनुभवांच्या बळावर या लोकांनी जो हा नीतियुक्त एकेश्वरवाद परिश्रमानें उभा केला, त्यामुळें तत्कालीन जगांत श्रेष्ठ नीतिधर्मोपदेशक ह्मणून ज्यू लोकांना अग्रस्थान मिळालें. किंबहुना, भावी ख्रिस्तीधर्माची भूमिका या लोकांनींच तयार केली.

१२ मेसा अथवा 'प्रभूनें अभिषिक्त' असा एक महापुरुष येऊन तो जगांत एक महान् कार्य करील अशी आशा बाळगणें ही यहुदी धर्मांत एक अपूर्व गोष्ट आहे. ईश्वरीयकल्पनेप्रमाणें ही कल्पनाही अनेक स्थित्यंतरांतून जात जात विकास पावली आहे. हिब्रू धर्माचार्यांनीं ख्रि. पू. आठव्या शतकांत उच्च ईश्वरीय कल्पनेला ज्याप्रमाणें जन्म दिला, त्याप्रमाणें त्यांनीं त्याकाळीं व विशेषत: ख्रिस्तीशकाचे प्रारंभीं अत्यंत महत्वाची मानली जाणारी एक योजनाही तयार केली. ही योजना ईश्वराचा सृष्टि उत्पन्न करण्यांतील हेतु सफळ व्हावा, या विषयींची होती. आतां हे प्राचीन धर्माचार्य नीतिपालनाला कितीही उत्तेजन देत असले, तरी मनांतल्यामनांत असें मानीत कीं, ईश्वर हा आपल्या विश्व-

सकशक्तीचा एकाएकी उपयोग करून लोकांना त्यांच्या पापाचें फळ देईल. तरीपण या धर्माचार्यांचा ईश्वराच्या चांगुलपणावर व सामर्थ्यावर इतका दृढ विश्वास होता कीं, बहुतेक माणसें ईश्वराची आज्ञा पाळीत नसली तरी पुढेंमागें कांहींजणांना तरी, कृतकर्मा-बद्दल पश्चात्ताप होईल व मग परमेश्वर त्यांच्यावर अनुग्रह करील असें ते मानीत. पश्चात्तापानें पावन झालेल्या लोकांना पुढें कोणी-तरी एक तारक नेता मिळेल व अशा रीतीनें ईश्वराची योजना अधिक यशस्वी होत जाईल, असें ईसानें जाहीर केलें होतें. पर-मेश्वराकडून अशा तऱ्हेचा तारक नेता केव्हांतरी आमचेकडे पाठ-विला जाईल, अशी ईसाच्या वेळेपासून आजपर्यंत श्रद्धाळु ज्यू लोक आशा करीत बसले आहेत. कधीं कधीं ते त्या भावी नेत्याला ' भावी राजा ' या नांवानें उल्लेखितात (जेरेमिया २३:५ ३०:९) कधीं कधीं ते त्याला ' भला मेंढपाल ' असें म्हणतात. (मिका ५:२–५; एझेकील ३४:२३; ३७:२४;) व कधीं कधीं ते त्याला ' शक्तिमान् सेवक ' या नांवानें संबोधतात. (ईसा ५२:१३–१५; ५३:१–१२ एझेकील ३४:२४)

प्रथम ज्यू लोक असें मानीत कीं, ही ईश्वरीय योजना आमचें नष्ट राज्य पुनरपि आम्हाला मिळवून देण्याच्या स्वरूपाची असावी, पण पुढें पुढें ह्या राज्यप्राप्तीबरोबर राज्य प्राप्त करून देणाराही आमचेकडे पाठविला जाईल, ही कल्पना प्रामुख्यानें पुढें आली. भविष्यकालीं आमचें (म्ह. ज्यू लोकांचें) एकछत्री राज्य होईल व त्याबरोबरच जगांत आदर्श समाजरचनाही सुरु होईल,अशा तऱ्हेची दुहेरी आशा यहुदी-धर्मग्रंथांत प्रदर्शित केल्याचे पुरावे मिळतात. पण खरें सांगायचें म्हणजे, ही दुहेरी आशा ख्रिस्तीधर्मांतच जास्त मह-

त्याची गणली जाते. यहुदी धर्माच्या इतिहासांत खिस्तीशतकापासून अलीकडल्या काळापर्यंत स्वतःला 'प्रभूचे प्रेषित' म्हणणारे निदान चौतीस लोक पुढें आले. यापैकीं अगदीं अलीकडचा 'मोझेस हाथिम लुझाटो' (सन १७४७ मध्यें मृत्यु) हा होय. ह्या सर्वांनीं राजकीय आकांक्षांचे बाबतींत स्वतःला 'मेसिया'—प्रभुप्रेषित—म्हणून घेतलें. (हेस्टिंग्ज ERE ८: ५८१–५८८) ही 'प्रभुप्रेषिता'ची कल्पना उत्कृष्टरीतीनें जर कोणी पूर्ण करून दाखविली असेल, तर ती ज्यू आईबापांचे पोटीं जन्माला आलेला जीझसख्राइस्ट यानेंच. तो स्वतःला प्रभुप्रेषित म्हणवून घेई आणि लोकही त्यानें हें म्हणणें मान्य करीत.

१३ ईश्वरीयनियमाविषयीं दृढभक्ति बाळगणारा यहुदी धर्म.

मनुष्यमात्रांत सद्गुणांचें प्रमाण कायम करण्याचा अयशस्वी पण हिंमतीचा प्रयत्न खि. पू. पांचव्या शतकांतील यहुदीधर्मानें केला. पुनश्च एकवार यहुदी लोकांनीं देशत्यागानंतर जरुसलेम मध्यें पुढील गंभीर प्रतिज्ञा केली:—

> परमेश्वराचा दास जो मोझेस त्यानें सांगितलेल्या ईश्वरीय नियमांचें पालन करणें; आपला प्रभु जेहोवा यानें केलेल्या सर्व आज्ञा मानणें व पाळणें; त्याचप्रमाणें त्याचे नियम व घोषणा ह्याही पाळणें. (नेहेमिया १०:२९)

> जेहोवानें घोषित केलेल्या म्हणून मानल्या जाणाऱ्या सर्व आज्ञांचा 'धर्मशास्त्र' च्या पहिल्या पांच अध्यायांत

समावेश केला आहे. यहुदी पंडितांचे मतें या आज्ञा एकंदर सहाशें तेरा भरतात. (यहुदी विश्वकोश ४:१८१ –१८६)

इतर कांहीं धर्मांतल्याप्रमाणें यहुदी धर्मांत भक्तांचे दोन निरनिराळे प्रकार दिसतात. पहिल्या प्रकारचे भक्तांची धर्मविधींचे अगदीं कडकडीत आचरण करण्याकडे मुख्य प्रवृत्ति दिसून येते; दुसऱ्या प्रकारचे भक्त जगाचा शास्ता जो परमेश्वर त्याच्याशीं सख्य करण्याविषयीं उत्सुक असलेले दिसतात. यहुदी धर्मांतील सामें लिहिणारे कवि बहुधा या दुसऱ्या वर्गांत मोडतात. आतां हे कविसुद्धां कित्येकवेळां ईश्वराच्या आज्ञांची प्रशंसाही मुक्तकंठानें करतात हा भाग वेगळा. उदाहरणार्थ

"भगवन् तुझ्या नियमांवर माझें किती प्रेम आहे म्हणून सांगूं" (साम ११९:९७)

खऱ्या भाविक हृदयाच्या ह्या छोट्याशा कविमंडळानें येशू ख्रिस्ताचा मार्ग तयार करून ठेविला; आणि याच कविमंडळानें 'येशू हा यहुदी धर्मांतील श्रद्धायुक्त आकांक्षा परिपूर्ण करणारा 'प्रभु प्रेषित' महापुरुष आहे असें प्रथम ओळखलें. अशा भक्तहृदयांचीं कांहीं नांवें नव्या करारांत आढळतात. येशूची आई मेरी (ल्यूक १: ४६–५५; २:५१) झाखारियास व एलिझाबेथ (जॉन धि बाप्टिस्टाचे आईबाप) (ल्यूक १:५–२५, ५७–७९) सायमन व ॲना जरुसलेमच्या मंदिरांतील पुजारी (ल्यूक २: २२–३८) आणि जीझसचा पुरोगामी

जॉन धि बाप्तिस्ट–हीं तीं मंडळी. (मॅथ्यू ३: १–११; जॉन १: १९–२६).

वरील दोन्ही जातीचे धर्मपंथ यहुदीधर्मांत शेवटपर्यंत कायम राहिले. परमेश्वरी नियम हें मुख्यत: धर्मविधींच्या स्वरूपांतच आढळतात आणि ते धर्मविधि केवळ ज्यू लोकांनाच बंधनकारक आहेत असें मानून त्याविषयीं श्रद्धा बाळगणें हा एक पंथ; व सर्वगुणसंपन्न प्रभूच्या आज्ञा पाळून त्याच्या विषयींची सगुणभक्ति करणें हा दुसरा पंथ. पहिला पंथ साक्षात् येशूच्या विरुद्ध होता. व दुसऱ्या पंथांतूनच जीझसचे पहिले शिष्य निर्माण झाले.

१४ विद्यमानकालीं यहुदीधर्माचें जगांतील धर्मांत स्थान–

एका छिन्नविच्छिन्न झालेल्या राष्ट्राचे अवशेषरूप असलेले ज्यू लोक आज साऱ्या पृथ्वीभर पसरले आहेत. ज्यू लोकांची पृथ्वीवरील लोकसंख्या एकंदर एक कोटी दहा लक्ष भरेल. यापैकीं निम्याहून जास्त ज्यू लोक रशियांत आहेत. खुद्द पॅलेस्टाईन ह्या ज्यू लोकांच्या आद्यस्थानीं जितके ज्यू लोक आहेत, त्याच्या दसपट एकट्या न्यू यार्क शहरांत आहेत. धर्मदृष्ट्या आम्ही अमर लोक आहोंत असे हे बलाढ्य लोक मोठ्या अभिमानानें सांगतात, आणि खरोखरीच गेलीं तीन हजार वर्षे त्यांनीं आपली धर्मनिष्ठा लोकोत्तर प्रकारानें प्रकट केली आहे. ह्या धर्माच्या पुनरुद्धाराची अगदीं प्रसिद्ध अशीं अलीकडील चळवळ म्हटली म्हणजे, 'झाओनिझम' ही होय. सन १८९७ सालीं भरलेल्या सार्वराष्ट्रीय महासभेनें ही चळवळ सुरु केली. हिचा उद्देश पॅलेस्टाईनमध्यें ज्यू लोकांना जाहीर रीतीनें निवासस्थान मिळावें हा होता. सन

१९१४ ते १९१८ च्या महायुद्धानंतर ज्या तहाच्या वाटाघाटी झाल्या, त्यांच्यांत वरील बाबतींत एक कलम घातलेलें आहे.

यहुदीधर्माचें रहस्य सांगणारे असे जे अनेक धर्मग्रंथ निर्माण झाले, त्या सर्वांत-परमेश्वरीय नियमाविषयीं अत्यंत आस्था दाखविण्यांत आली आहे. ह्या नियमांना पूज्य मानण्याच्या भरांत त्यांनीं त्यांच्या भोंवतीं एक कोटच उभा केला आहे. हल्लींच्या उदारमतवादी ज्यू लोकांचा जेहोवाच्या नैतिक नियमाना जास्त महत्त्वाचे मानण्याकडे कल आहे. यहुदीधर्मांत पांडित्याचें स्तोम ज्या काळीं माजलें, त्याकाळीं विधिनिषेधांची महती अवास्तव वाढू लागली आणि नैतिक जबाबदारी, त्याचप्रमाणें सगुण परमेश्वराची भक्ति करण्याचे प्रसंग, या गोष्टीकडे लोक ढुंकूनही पाहीनासे झाले. अशारीतीनें हा धर्म जरी पंडितांच्या हातांत सर्वस्वी गेला, तरी त्यांतील अनुयायांना सन्मार्गाला लावण्याचें कार्य हा धर्म करीतच होता. तथापि, येवढें कबूल करणें भाग आहे कीं, या धर्मांतील अत्यंत थोर विवेकवाद्यांनीं जो जागतिक धर्मप्रसाराचा सेवाधर्म आदर्श म्हणून पुढें ठेवला होता तो मात्र आज यहुदीधर्मांत कोठेंही पाळला जात नाहीं. यहुदीधर्माचो स्पष्ट व व्यापक आज्ञा अशी आहे कीं, " तुम्ही पवित्र व्हा. कारण तुमचा देव जो मी जेहोवा तोही पवित्र आहे." ही आज्ञा ख्रिस्तिधर्मांत जशीच्यातशीच घेतली आहे, नव्या करारांत (माथ्यू ५:४५; १ पिटर १:१६ १७) ही आज्ञा अक्षरशः घेतली आहे, पण परमेश्वर हा जगाचा पिता आहे, या खास ख्रिश्चन दृष्टीनें या आज्ञेचा त्या ठिकाणीं नवा अर्थ केला आहे. एकाबाजूनें जुन्या व नव्या धर्ममतांचे यहुदीधर्मि यांच्यांत आपापसांत व दुसऱ्या बाजूनें यहुदीधर्म व ख्रिस्ती आणि

इस्लाम ह्या तज्जन्य धर्मांत व्यावहारिक दृष्ट्या येवढाच फरक आहे कीं, विश्वाचा जो परमेश्वर त्याची आज्ञा पाळून स्वतः शुद्ध होण्याचे मार्ग ह्या सर्व पंथांत अथवा धर्मांत निरानिराळे आहेत. बाकी आज्ञापालनानें पवित्र होणें ही कल्पना तसेंच एकेश्वरत्वाचें तत्त्व या बाबतींत वरील तिन्ही धर्म अगदीं सारखें आहेत.

१५ यहुदीधर्माचें सामर्थ्य खालील गोष्टींत दिसून येतें:—

(अ) एकमेवाद्वितीय मंगलमय परमेश्वराची कल्पना.

(आ) जगाचा शास्ता परमेश्वरच आहे या कल्पनेवर भर.

(इ) इस्राएल धर्माचार्यांनीं ' परमेश्वराविरुद्ध पाप करण्याची नैतिक कल्पना ' लोकांत प्रस्तृत केली.

(ई) मानवजातींतील परस्पर—व्यवहार धर्माच्या पायावर अधिष्ठित असले पाहिजेत, असा यहुदी धर्माचार्यांचा आग्रह होता.

(उ) ईश्वर व भक्त यांचा साक्षात् संबंध आहे ही यहुदी धर्माचार्यांची व कांहीं सामगीतांचीही शिकवण आहे.

(ऊ) परमेश्वरीय आज्ञा पाळण्यांत आनंद आहे असें ह्या धर्म निःसंदिग्धरीतीनें सांगतो.

(ऋ) ह्या धर्मांतील पूजेची कल्पना.

(ऋ) देवाचे भक्त असणारांचें आत्यंतिक कल्याण होतें असा विश्वास.

(लृ) लोककल्याणाविषयीं या धर्माला वाटणारी कळकळ.

(लॄ) कौटुंबिक जीवन अत्यंत पवित्र असलें पाहिजे असा या धर्माचा कटाक्ष आहे.

(ए) आपल्यांतील तरुणांना धार्मिक शिक्षण देण्याची या धर्मानें चांगली काळजी घेतली आहे.

(ऐ) संकटाचे प्रसंगींही या धर्मांतील लोकांचा विश्वास दृढ राहिला व ते बंधुभावानें राहिले.

(ओ) भावी उज्ज्वल कालाविषयीं या धर्माला आशा वाटते.

१६ या धर्माची दुर्बलता पुढील गोष्टींत दिसते:-

(१) हा धर्म सामान्यत: फार एकलकोंडा आहे.

(२) इस्राएल लोकच ईश्वराला जास्त आवडतात अशी या धर्माची अवास्तव कल्पना.

(३) पूर्वींचे ईश्वरकृत नियम अबाध्य आहेत त्यांच्यांत यत्किंचित् फरक अथवा प्रगति होता कामा नये असा या धर्माचा दुराग्रह आहे.

(४) अनीतीनें वागणें हें पाप आहे. ह्या धर्माचार्यांच्या उच्च कल्पनेवरून खालीं गडगडत येत येत, शेवटीं हा धर्म धर्मविधींचें आचरण न करणें हें पाप आहे ह्या कल्पनेपर्यंत खालीं उतरला.

(५) धर्मविधींचे कडक निर्बंध व कर्मकांडाचा अतिरेक हीं ह्या धर्मांत दिसतात.

(६) जगांत आपल्या मतप्रसाराविषयीं ह्या धर्मानें हल्लीं प्रयत्न सोडून दिला आहे.

प्रकरण १० वें

झोरास्ट्रियन उर्फ पारशीधर्म.

जगांत अनादि काळापासून चालत आलेल्या पापाच्या बळाशीं, सद्गुणसंपन्न पण मर्यादित स्वरूपाच्या परमेश्वराबरोबर खांद्याशी खांदा भिडवून टक्कर देणारा धर्म.

१ प्रास्ताविक विद्यमान धर्मांत त्याचें स्थान:—

बायबलच्या अधिष्ठानावर उभारलेल्या धर्मांच्या गटाबाहेर असलेल्या इतर विद्यमानधर्मांत बायबलशी अत्यंत साम्य ज्याचें आहे असा पारशी धर्म हा एक आहे. याला झोरास्ट्रियनधर्म अथवा पारशीलोकांचा धर्म असेंही म्हणतात. ह्या पारशी लोकाचे मूळ निवासस्थान इराणांतील पार्स प्रांत होय.

(१) झोरास्ट्रियन धर्माचा बायबलशी ऐतिहासिक संबंध.

ह्या धर्माचा बायबलमध्यें नांवानें निर्देश आलेला नाहीं. तरीपण जुन्या कराराच्या आठ पुस्तकांत इराणचे राजे झोरास्ट्रियन धर्माचे असल्याचा उल्लेख आहे. (दुसऱ्या बखरींत ३६:२२. २३ इझरा १:१:८:१; नेहेमिआ २:१; ईस्थर १:३;१०:२;

ईसा ४४:२८; ४५:१ डॅनिएल ९:१; १०:१ हगाई १:१ झकारिया १:१) नव्या करारांतील पहिल्या अध्यायांत असें सांगितलें आहे कीं, नुकत्याच जन्मलेल्या जीझसला भेटायला मगी या नांवाचे ज्ञानी लोक पूर्वेकडून आले होते. हे लोक झोरास्ट्रियन लोकच असावेत असा तर्क करायला हरकत नाहीं. (मॅथ्यू २:१) बायबलशीं संबद्ध असलेल्या इतर धर्मांपैकीं (मग ते धर्म युरोपियन, आफ्रिकन, आशियाटिक कोणताही धर्म असो) झोरास्ट्रियन हा एकच धर्म असा आहे कीं, तो हल्लींच्या युगांतही जीवंत राहिला आहे. बायबलमध्यें ज्यांची मुळींच निंदा केलेली नाहीं, उलट ज्यांची प्रशंसाच केलेली आहे असें फक्त झोरास्ट्रियन हेच लोक. झोरास्ट्रियन राजा सायरस ह्याला " प्रभुप्रेषित " ह्मणून जेहोआनें संबोधिलें आहे. एवंच मूसा (प्रभुप्रेषित) हा शब्द नव्या करारांत ग्रीक—भाषांतरांत ख्राइस्टला उद्देशून योजण्यापूर्वीं अनेक शतकें जुन्या करारांत हा शब्द झोरास्टियनला उद्देशून वापरला होता. (जॉन १-४१) आणि झोरास्ट्रियन राजा सायरस याचाही जेहोवानें " माझा मेंढपाळ " (ईसा ४४:४८) या दुसऱ्या महत्वाच्या संज्ञेनें उल्लेख केला आहे. ही संज्ञा जुन्या कराऱ्यांत खुद्द परमेश्वराला उद्देशून वापरली आहे. (साम २३:१)

(२) धर्ममताचे बाबतींत झोरास्ट्रियन धर्माचा बायबलावर पडलेला प्रभाव.

बायबलहून इतर विद्यमान धर्मांपैकीं ज्यांतून निर्विवाद रीतीनें बायबलनें एखादें धर्ममत घेऊन त्याचा बायबलांत समा-

वेरा केला आहे, असा कोणता धर्म असेल तर तो झोरास्ट्रियन धर्म, जुन्या करारांत एकजात सर्व ठिकाणीं, आणि देशत्यागापूर्वींच्या ईसाच्या वचनग्रंथांतही असें सांगितलें आहे कीं, प्रत्येक वस्तूचें मूळ–पापाचें सुद्धां–जेहोवा देव हा आहे. देशत्यागानंतरच्या ग्रंथांत हें मत साफ बदललेलें दिसतें. राजा डेव्हिडला आलेल्या अनुभवाच्या दोन निरनिराळ्या ठिकाणच्या वर्णनाची तुलना केली असतां, असें दिसून येईल कीं, देशत्यागानंतरच्या ग्रंथांत (१ बखरी २१:१) सर्व गोष्टींचें मूळ कारण जेहोवाच्या ऐवजीं सैतानाला मानलें आहे. (२ साम्यूएल २४:१) अशा रीतीनें सैतानाची कल्पना मूळची बायबलांत नसून ती झोरास्ट्रियन धर्मांतून उचलली आहे.

बाबिलोनच्या विदेशवासाच्या वेळीं हिब्रूलोकांचा झोरास्ट्रियन धर्माशीं साक्षात् संबंध आला, त्यावेळीं तर त्यांनीं सैतानाच्या कल्पनेच्या जोडीला आणखीही कांहीं कल्पना त्या धर्मांतून घेतल्या असल्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, देवदूतांची एक लांबलचक यादी; राक्षसांची वंशावळ; तारक प्रभूचा अवतार होणार आहे ही कल्पना; सर्व मृतात्मे युगान्तीं पुन्हां उठतील व त्यावेळीं त्यांच्या पुण्यपापाचा निवाडा होईल ही कल्पना; भावी कालांत कृतयुग निश्चित येणार इत्यादि कल्पना झोरास्ट्रियन धर्मांतूनच घेतल्या आहेत असें वाटतें. आणि जीझसनें वापरलेला ‘ पॅराडाइझ ’ हा शब्द (ग्रीक भाषेंत याला पॅराडिओसास हा शब्द आहे; ल्यूक २३:४३) तरी निदान पारशी भाषेंतील शब्दापासून निघाला आहे असें व्युत्पत्तिशास्त्रानें निश्चित सांगतां येतें. (अवेस्ताभाषेंतील पैरीदैझ हा शब्द याच अर्थी वापरला आहे.)

बायबलच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, त्या
जागतिक धर्माची कल्पना स्पष्ट उद्भूत झालेली दिसं
विद्यमान धर्मांत झोरास्ट्रियन धर्म हाच स्वच्छेनें दरए
स्वीकारतां येणासारखा पहिला धर्म. या धर्मांतील अ
प्रमाणग्रंथांत एक दररोज म्हणायचें स्तोत्र आहे, त
स्ट्रियन धर्म हा जगांतील सर्व धर्मांत श्रेष्ठ असल्याचें
घोषणा केली आहे.

> " मझ्द धर्माची मी स्तुति करतों. हा पवित्रधर्म
> सर्व विद्यमान व भावी धर्मांत अत्यंत उत्कृष्ट
> असा धर्म आहे. ह्या धर्माला आहुराचा धर्म
> यनधर्म असेंही नांव आहे." (से. बु. ई. ३

पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, गेल्या चारशें
धर्माची व्यापकदृष्टि व उदात्त हेतु हीं हळुहळु जात
आहेत. आणि आज जगांतल्या इतर अनेक धर्मांप्रमाणें
पारंपरिक व संकुचित स्वरूपाचा होऊन बसला आहे.
दृष्टीनें पाहतां तर विद्यमान अकराही इतिहास प्रसिद्ध
धर्मांतील अनुयायांची लोकसंख्या सर्वांत कमी आहे;
गोष्ट खरी आहे कीं, या धर्माच्या अनुयायांत कांहि
तेजस्वी महात्मे होऊन गेले, तरीपण लोकसंख्येच्या
धर्मांत एक लाखाहून फारसे जास्त लोक नाहींत. हे स
हिंदुस्थानांतच राहतात. इसवी सनाच्या सातव्या शतक
इराणदेश विध्वस्त करणाऱ्या अरब विजेत्यांच्या तलवारीच
ऱ्यांतून वाचलेल्या कट्टर धर्माभिमानी पारश्यांचे हे
वंशज होत.

२ झोरास्टरचें जीवन—(खि. पू. ६६०–५८३)

इतिहासांतील एक अत्यंत महनीय व्यक्ति म्हणून पारशी लोक झोरास्टरला सदैव पूज्य मानतात. पण खरोखरीच ही ऐतिहासिक व्यक्ति होऊन गेली किंवा काय ही बाबत, तसेंच ती व्यक्ति खरी असल्यास कोणत्या काळीं जन्मास आली ही बाबत अजून अनिश्चितच आहे व याबद्दल अजूनही एकमत झालें नाहीं, तरीपण खि. पू. ६०००, १४०० किंवा १००० वर्षें असा त्याच्या जीवनाचा समय सुचविण्यांत येतो.

(१) त्याच्या जन्मसमयीं घडलेले चमत्कार:—

त्याच्या जन्मसमयीं अनेक चमत्कार घडल्याचें अर्वाचीन झोरास्ट्रियन ग्रंथांत वर्णन आलें आहे. ह्या तारक महात्म्याच्या जन्माचें भविष्य तो जन्मण्यापूर्वी तीन हजार वर्षें अगोदर एकदा व तीनशें वर्षें अगोदर असें दोनदा केलें होतें. (से. बु. ई. ५: २१; ४७:३१-३४, १३५-१३८) झोरास्टरच्या मातेच्या शरीरांत ईश्वरी तेजानें (आहुर मझ्द याच्या तेजानें) प्रवेश केला. (से. बु. ई. ४७:१७-१८) तें तेज अनंत तेज:सागरांतून येऊन झोरास्टरच्या मातेच्या शरीरांत प्रविष्ट झालें; तिचें वय त्यावेळीं फक्त पंधरा वर्षांचें होतें. (से. बु. ई. ४७; १३८-१३९) ह्या असाधारण स्त्रीच्या कौमार्यावस्थेंतील ह्या चमत्कारांचा तिच्या कुटुंबांतील लोकांना अर्थच समजेना. त्यांना वाटलें कीं, ही कांहीं तरी जादू आहे. (से. बु.ई. ४७:१८-२०) प्लिनी सेकुंदस या लॅटिन ग्रंथकारानें (सन २३-७९) आपल्या ' सृष्टीचा इतिहास '- या पुस्तकांत असाच एक चमत्कार

(झोरास्टरविषयींचा) वर्णिला आहे. त्याचा तर झोरास्ट्रियन धर्मग्रंथांत पांचदा उल्लेख आला आहे.

> " जन्माचे वेळीं तो खदखदा हंसला, "
>
> (से. बु. ई. ४७ ३५,४१,१२२,१४२,१४३.)

या मुलावर बरींच गंडांतरें आलीं, पण त्यांतून तें अद्भुतरीतीनें निभावलें. (से. बु. ई. ४:२२४-२२५;४७:३५:४०)

(२) प्रभुप्रेरणा होईपर्यंतचें जीवनः—(१ ते ३० वर्षांच्या वयापर्यंत) लहान असतांना झोरास्टर हा बोलण्यांत अत्यंत पटाईत होता.

> " बाल झोरास्टरची कुशाग्रबुद्धि, सावधपणा व बोलण्यांत चातुर्य ह्यामुळें, सर्व मुलें त्याच्यापुढें अगदीं गोंधळून जात; आणि स्वतःच्या बावळटपणाची त्यांना खंती वाटे. उलट बाल झोरास्टरच्या उत्तरांतील शहाणपण पाहून त्यांना फार आश्चर्य वाटे.
>
> (से. बु. ई. ४७:४३,४५)

तो पंधरा वर्षांचा झाला असता, धर्मजीवनाविषयींच्या स्वतःच्या श्रद्धेचें चिन्ह म्हणून त्यानें कमरेभोंवतीं यज्ञोपवीत (जानवें) धारण केलें. (से. बु. ई. ४७:१५१)

तो गरीब लोक व इतर प्राणिमात्राविषयीं फार दयाळू होता. (से. बु. ई. ४७:१५३)

वयाच्या विसाव्या वर्षी आपल्या आईबापांना न विचारतांच तो घराबाहेर पडला, व धर्मजीवनाकरतां रानोमाळ भटकूं लागला. (से. बु. ई. ४७:१५२-१५३)

त्याच्या बापानें त्याच्याजवळ त्याच्या लग्नाची गोष्ट काढली असतां तो म्हणाला,—" आपल्यांत जरी अशी चाल नाहीं तरी मी मात्र भावी पत्नी प्रथम पाहीन व ती मला पसंत पडल्यासच मी तिच्याशीं लग्न लावीन. " (से. बु. ई. ४७:१५३)

शेवटीं तिसाव्या वर्षी त्याच्या जीवनाला निराळें वळण लागलें. त्याला यावेळीं असें वाटू लागलें कीं, " परमेश्वर मला बोलावून सांगत आहे कीं, तुला शुद्ध होऊन धर्मसंस्थापकाच्या कार्याला लागलें पाहिजे. " (से. बु. ई. ३७:३१, १२७; ४७:१४-१५; १५४-१५९) अवेस्ताधर्मग्रंथांतील अगदीं पहिल्या अध्यायांत ह्या सर्व हकीकतीचें बहारीचें शब्दचित्र आढळतें. परमेश्वराचा संदेश व त्यानें आपली केलेली योजना झोरास्टरला वासराच्या हंबरड्याच्या द्वारानें कळली. ह्या हंबरण्याचा अर्थ येवढाच कीं, त्यावेळीं तुराणी लोकांच्या टोळधाडी येऊन झोरास्टरच्या देशांतील शेतकऱ्यांना अत्यंत त्रास देत होत्या; त्या शेतकऱ्यांच्या मदतीस झोरास्टरनें धांवावें हा या हंबरड्याचा खरा अर्थ, अहुरमझ्द या देवतेनें झोरास्टरची योग्यता व उत्साह पाहून ह्या कार्यावर त्याची योजना केली.

आमच्या हांकेला ओ देणारा असा हा एकच मनुष्य. मला पाहिजे होता तो मनुष्य मला मिळाला. (से. बु. ई. ३१: १०-११)

पण त्या वासराला (म्हणजे त्या शेतकरीवर्गाला) मात्र झोरास्टर पसंत नव्हता, ते म्हणाले हा आमचा स्वामी दुर्बल, भेंग्या व भेकड आहे. (से. बु. ई. ३१-११)

(३) जागतिक धर्म स्थापण्याचीं स्वप्नें; अयशस्वी उपदेश. (वय ३०–४२)

पुढील दहा वर्षांत झोरास्टरला अहुरमझ्दानें आणखी सातदा दर्शन दिलें, (से. बु. ई. ३७:३२) आतां मात्र ईश्वरानें मलाच पसंत केलें असून धर्मस्थापनेच्या कार्यावर माझी योजना केली आहे अशी त्याची अगदीं खात्री झाली.

"तूं प्रथम मला आज्ञा केलीस. तुझ्याहून इतरांचा मला तिटकारा आला आहे" [यस्न ४४:११; मोल्टन ई. झो. (Early Zorastrian) ३६८]

एक प्रगतिशील असा जागतिक धर्म लोकांना उपदेशून दुष्टांचेंही मन वळवून त्यांना या धर्मांत घेण्याचा त्यानें चंग बांधला.

हे मझ्द, तुझ्या प्रत्यक्ष तोंडानें ही गोष्ट आम्हाला सांग, म्हणजे आम्ही जगांतील सर्व माणसांना नवधर्माची दीक्षा देऊं. (यस्न ३१:३; मोल्टन ई. झो. ३५२)

ईश्वरानें दिलेल्या वचनाचा उच्चार करीत आम्ही चोरांच्या टोळीलाही ईश्वराचा भक्तगण बनवूं. (यस्न २८:५ मोल्टन ई. झो. ३४५)

जगाचा पुनरुद्धार करून त्याला प्रगतीच्या मार्गावर आणण्याचें कार्य आमचे हातून होईल कां ? (से. बु. ई. ३१:३३-३४)

झोरास्टरनें संपूर्ण आत्मसमर्पण केलें.

आपल्या प्राणांचा, सद्विचारांचा, कृतीचा व वाणीचा त्यानें मझ्द देवाला नैवेद्य अर्पण केला (मोल्टन, ई. सो. ३७९)

सर्वसाक्षी परमेश्वराच्या धर्माचा त्यानें उपदेश केला. परमेश्वरानें प्रकट केलेल्या धर्मतत्त्वांचा उपदेश त्यानें मोठ्या उत्साहानें सुरू केला. आपल्या विरोधकांवर तो अगदीं तुटून पडे.

" मी उच्चारलेल्या शब्दाप्रमाणें तुमच्यापैकीं जे वागणार नाहींत त्यांच्या कपाळीं जन्मभर दुःखच लिहिलें आहे असें समजा. (मोल्टन ई. झो. ३७०)

एकदां हिंवाळाचे दिवसांत एका ठिकाणीं तो निवाऱ्याकरता आला असतां त्याला जागा मिळेना; इतकेंच काय, पण त्याच्या थंडीनें कुडकुडणाऱ्या दोन घोड्यांनाही कुणी जागा देईना. (मोल्टन ई. झो. ३८६) अशा स्थितींत त्याला सैतानानें येऊन म्हटलें कीं, " तू मझ्द धर्माचा त्याग करशील तर अखिल पृथ्वीचें सार्वभौमपद तुला मिळेल, " पण या मोहाला झोरास्टर बळी पडला नाहीं. प्रार्थना व पूजा यांच्या बळावर तो या मोहपाशांतून निसटला. (से. बु. ई. २१०-२१२) पण मनांत मात्र त्याची बरीच निराशा झाली. त्याला त्याचे सरदार व अमीर उमराव यांनीं सोडलें. " आतां प्रभो ! तूंच मला आधार दे, " अशी त्यानें देवाजवळ करुणा भाकली.

" मी कुठें पळून जाऊं ? मझ्द देवा ! मी तुला कसा संतुष्ट करूं ? माझ्या वाट्याला अपयश आलें आहे. माझीं गुरेंढोरेंही कमी होत चाललीं आहेत. माझ्या बाजूला फार थोडे लोक राहिले आहेत; देवा ! तुझा मी धावा करीत

> आहे. माझी हांक ऐकून ये व मित्राप्रमाणें मला आधार दे. सत्संकल्प व सन्मार्ग याचा मला उपदेश कर. (मोल्टन ४६:१-२ मोल्टन ई. झो. २७२)

परमेश्वर आपल्या वचनाला खरें करून दाखवील कीं नाहीं असा त्याला संदेह वाटूं लागला.

> " हे अहुर ! मला खरें सांग, तूं मला वचन दिलें होतेंस कीं, ' तुला दहा घोड्या, एक घोडा व एक उंट मी देईन ' तें तुझें वचन खरें करशील कां ? आणि 'भावी कालांत तुझें कल्याण होऊन तुला अमरत्व प्राप्त होईल ' असा जो तूं मला वर दिला होतास तो केव्हां सफल होणार ? (यस्न ५१:९; मोल्टन ई. झो. ३८९-३९०)

> " माझी अशी दृढश्रद्धा आहे कीं, तूं आपला शब्द खरा करून दाखविशील. "
> (यस्न ४६:३; मोल्टन ई. झो. २७३)

(४) इराणच्या दरबारीं मिळालेलें यश; धर्माचा जोराचा प्रसार (वय ४२-५७)

राजा विष्टप याच्या धर्मदीक्षेनंतर झोरास्टरच्या जीवनाला पुन्हां निराळें वळण लागलें. (यस्न २८:७; ४६:१४; ५१:१६; ५३:२ शिवाय से. बु. ई. ४७:७०, ६७,७२ पहा.) यानंतर राजा विष्टपाचा भाऊ, मुलगा, मंत्री, व मुख्य प्रधान या सर्वांनीं झोरास्टरच्या धर्माची दीक्षा घेतली.

> " राज्यांतले अनेक लोक, अमीर उमराव, सरदार व इतर प्रतिष्ठित व वजनदार मंडळी यांनीं अहुरमज्दाच्या

धर्माचा उत्कर्ष उत्तरोत्तर होत जाणार असें पाहून त्या धर्माची दीक्षा घेतली. (से. बु. ई. ४७-१२५)

अशारीतीनें झोरास्ट्रियन धर्माची दीक्षा राजा विष्टपाबरोबर एकोणतीस हजार लोकांनीं घेतल्याचा उल्लेख आढळतो. (से. बु. ई. २३:२०३—२१४) झोरास्टरनें राजप्रधानाच्या मुलीबरोबर लग्न केलें. (जॅक्सन झोरास्टर ७६)

पुण्यशाली झोरास्टरला तीन बायका होत्या. त्या तिघीही आपल्या नवऱ्याचे मार्गें राहिल्या.

झोरास्टरला एकंदर तीन मुलगे व तीन मुली झाल्या. यापैकीं औवर्तद नर आणि खुरशेद शिहार हे दोन मुलगे त्याला त्याच्या लग्नाचे बायकोपासून झाले.

झोरास्टरच्या एका मुलीचें मुख्य प्रधानाशीं लग्न झालें. (दिनकर्द ९: ४५.४; से. बु. ई. ३७, २९९ नो. ४). पारशी धर्मग्रंथापैकीं खुद्द झोरास्टरनें लिहिलेल्या भागापैकीं एका अध्यायांत या मुलीच्या विवाहसूक्ताचा उल्लेख आला आहे. (यस्न, ५३) खुद्द राजा विष्टप या नवधर्माचा शूर व शस्त्रास्त्रसंपन्न असा एक धर्मप्रचारक बनला. (से. बु. ई. २३: २०४—२०५ जॅक्सन झोरास्टर ८१)

> " राजानें या नवधर्माचा स्वीकार करून त्याचा पृथ्वीवर प्रसार केला " (से. बु. ई. २४—१७१)

राजपुत्रांनींही या नवधर्माचा स्वीकार करून त्याचा प्रसार इराणच्या बाहेर आशियामायनर व हिंदुस्थान या देशांत करण्याचे प्रयत्न केले (से. बु. ई. २४—१७१)

(५) धर्मयुद्ध–शेवटचीं वीस वर्षें. (वय ५७ ते ७७)

धर्मप्रसाराकरतां हिंसेचा अवलंब करावा, असा उपदेश झोरास्टर धर्मग्रंथांत सापडतो. मात्र खुद्द झोरास्टरनें अशातऱ्हेचा उपदेश फक्त एकदाच केला आहे. अर्वाचीन धर्मग्रंथांतून असा उपदेश अनेक वेळ केलेला आढळतो.

"त्या सर्वांना तलवारीनें कापून काढा"

(यस्न ३१:१८; से. बु. ई. ३१–५०)

"आमच्या धर्माच्या हातांत तीक्ष्ण तलवार आहे"

(यस्न १२:९; से. बु. ई.) ३१:२५०

"ईश्वराचा भक्त, हातांतल्या भाल्याचा निर्भयपणें फेंक करणारा (यस्न १२:२; से. बु. ई. ३१:२९७)

याकाळीं झोरास्टरनें क्षात्रबलाधिष्ठित राष्ट्रधर्माचा पुरस्कार कितपत केला हें कळण्याला आज कांहीं साधन उपलब्ध नाहीं. तथापि, राजा विष्टप व त्याचा भाऊ यांनीं परमेश्वराचे सहाय्य घेऊन आठ बलाढ्य नास्तिक शत्रूंवर मोठा विजय मिळविल्याचा मात्र स्पष्ट उल्लेख मिळतो. (से. बु. ई. २२: ७९,११७,२०६) शेजारच्या एका राजानें स्वारी करून राजा विष्टपाजवळ खंडणी मागितली असता झोरास्टरनें "तूं खंडणी मुळींच देऊं नकोस" असें राजाला सांगितलें. अर्थात् राजाला शत्रूंशीं लढावें लागलें. या लढाईंत एक लाख इराणी सैनिक लढले. (जॅकसनकृत "झोरास्टर" १०२-११९)

"या धर्मयुद्धांत इराणी लोकांना जय मिळाला" (से. बु. ई. ५:४०) झोरास्टरच्या मृत्युचा अवेस्तांत उल्लेख आढळत

नाहीं. तथापि, धर्मग्रंथ सोडून दिल्यास इतर ग्रंथांत असें अनेकदा लिहिलेलें सांपडतें कीं, 'झोरास्टर हा आपल्या वयाच्या सत्याहत्तराव्या वर्षी बहुधा बल्क शहराच्या वेढयांत तुराणियन सैनिकांच्या हातून मारला गेला.

२ झोरास्टरविषयीं पूज्यभाव—

तेजस्वी व सद्गुणसंपन्न परमेश्वराविषयीं लोकांना विचार करायला लावण्याचें कार्य झोरास्टराइतकें इराणी लोकांपैकीं एकानेंही केलें नाहीं. इराणदेशांत झोरास्टरविषयीं लोकांचा पूज्यभाव जितका आहे, तितका आजपर्यंत दुसऱ्या कोणाविषयींही नाहीं.

३ झोरास्टरचा स्वभाव—

पारशी धर्मग्रंथांतील चरित्रात्मक भागांत असें लिहिलें आहे कीं, झोरास्टर हा एक नम्र व सरळ हृदयाचा माणूस होता. त्याला मधून मधून निराशा वाटे, कित्येकदां त्याला मोह होई; पण शेवटीं आपल्या देशांतील लोकांच्या किंबहुना अखिल जगाच्या उद्धाराकरतां सर्वज्ञ परमेश्वराच्या धर्माचा उपदेश करण्याचा आपल्याला परमेश्वराकडून "आदेश" होत आहे, अशी त्याची खात्री झाली. तरीपण, सुरवातीस धर्मप्रसाराच्या उत्साहाच्या भरांत त्याचा वारंवार चित्तक्षोभ होई; नवधर्मविरोधकांची त्याला मनापासून चीड येई.

"दुसऱ्याचा मी तिरस्कार करतों" (मोल्टन ई. झो. ३६८)

बेंद्वा नावाच्या एका विरोधकाला तर त्यानें 'तूं मरशील. (से. बु. ई. ३१, १६२) तुझा सत्यानाश होईल' (यस्न ४९:१ मोल्टन ३८०) असा शाप दिला.

जो मला ठार मारू पाहील तो मूर्तिमंत असत्याचा औरसपुत्र समजावा. (यस्न ५१:१०; मोल्टन ई. झो. २८५; से. बु. ई. ३१:१८२)

इराणच्या दरबारीं धर्मदीक्षेचे बाबतींत बऱ्याच कालानंतर त्याला कांहीसें यश आलें; पण यानंतर मात्र तरवारीच्या जोरावर धर्मप्रचार करण्याचें त्यानें ठरविलें; आणि स्वधर्म व स्वराष्ट्र यां-करतां शेजारच्या राष्ट्राशी त्यानें युद्ध सुरू केलें.

(२) अर्वाचीनकाळीं वाटणारा झोरास्टरविषयींचा पूज्यभाव.

अर्वाचीन धर्मग्रंथ झोरास्टर उत्कृष्ट नीतिसंपन्न, आदर्श पुरुष, देवाचा अंश, अहुरमझ्द व इतर देवतांच्या तोडीचा असलेला व धर्मदृष्ट्या अत्यंत पूजनीय होता असें मानतात.

> “ मनुष्यांचा अधिपति ” “ पवित्रपणा व ज्ञान या बाबतींत सर्वश्रेष्ठ पुरुष;” “ पापाला मुळासकट तोडणार वीर पुरुष.” (से. बु. ई. २३:१९०, २२२, २७५)
> “ झोरास्टर हा सर्व वस्तूंचा अधिपति आहे ” “ अत्यंत उत्कृष्ट व पुण्यशाली झोरास्टर ”
>
> (से. बु. ई. ५:८८; १८:९०)

“ प्राणिमात्राला उपदेश करणें, विरोधकांना पराभूत करण्याची युक्ति जाणणें आणि पुण्याविषयीं उत्कृष्ट इच्छा बाळगणें या बाबतींत सर्व मनुष्यांत हा अप्रतिम आहे.”

“ झोरास्टरच्या आजीच्या शरीरांत अनंत तेजोनिधींतून एक तेजोवलय शिरलें; हेंच पुढें तिच्या मुलीच्या शरीरांत ती कुमारिका असतानाच शिरून झोरास्टरच्या रूपानें प्रकट झालें.” (से. बु. ई. ४७:१८-२०; १३८-१३९)

"पृथ्वीवर प्रत्यक्ष जन्मण्यापूर्वी तीन हजार वर्षे झोरास्टर विद्यमान होता. इतक्या दिवस तो स्वर्गांत देवांच्याबरोबर देवरूपानें नांदत होता."

(से. बु. ई. ४७:२१, २२:१२२)

४ झोरास्ट्रियन धर्मातील धर्मग्रंथ—

या धर्मग्रंथांच्या गटाचें व्यापक नांव 'अवेस्ता' हें आहे. याचा अर्थ 'ज्ञान'. हिंदू लोकांच्या धर्मग्रंथांना 'वेद' हें नांव याच अर्थी दिलें आहे. ह्या धर्मग्रंथांची भाषा अवेस्ता असून ती संस्कृत भाषेशीं फार मिळती आहे. मूळ हे धर्मग्रंथ बरेच होते, पण त्यापैकीं कांहीं लुप्त झाले. हल्लीं अवशिष्ट असलेल्या ग्रंथाचे मुख्य पांच भाग पाडण्यांत आले आहेत. यस्न (ह्म० पूजा अथवा यज्ञ) हा भाग सगळ्यांत जुना व अत्यंत महत्वाचा मानला जातो. ह्या भागांत खुद्द झोरास्टरनें रचलेल्या ह्मणून मानल्या जाणाऱ्या सतरा गाथांचा समावेश होतो. विस्परद (ह्म० सर्व देवांचें आवाहन) हा एक पूजामंत्रांचा छोटासा ग्रंथ आहे. यस्नांतील मंत्राबरोबर यांतील मंत्रही पूजासमयीं ह्मटले जातात. वेंदिदाद (राक्षसांच्या विरूद्ध निबंध) हा तंत्रात्मक ग्रंथ असून त्यांत सृष्ट्युत्पत्तिविषयीं कांहीं चर्चा असून, इतरही ऐतिहासिक व मरणोत्तरस्थितिबद्दलची माहिती ह्यांत ग्रथित केली आहे.

वर लिहिलेल्या तीन धर्मग्रंथांचें या धर्मांत विशेष महत्व मानलें आहे. ह्या ग्रंथांतील मंत्र बहुधा प्रत्येक धर्मविधींत येतात. पुरोहिताखेरीज दुसरा कोणीही या ग्रंथाचा अधिकारी नाहीं, असें मान-

ण्यांत येतें. यानंतर यष्ट (स्तोत्रें) ह्या धर्मग्रंथांत एकवीस देवतांची व झोरास्ट्रियन धर्मवीरांचीं स्तोत्रें संगृहीत केलीं आहेत. शेवटल्या खोरदा-अवेस्ता (ह्म० छोटा अवेस्ता) ह्या धर्म ग्रंथांत सर्व झोरास्ट्रियन धर्मानुयायाना नित्यपाठाला उपयोगी पडतील अशा भजनांचा संग्रह आहे. यानंतरच्या काळांतही ह्यांतील धर्मसाहित्यांत महत्वाची वाढ झालेली आहे.

५ झोरास्ट्रियन धर्माचा इतिहास—

ह्या धर्माचा इतिहास, ह्या धर्माची जन्मभूमि जो इराणदेश त्याच्या इतिहासाशी निगडित आहे. नाहीं ह्मणायला ह्या धर्माचा अलीकडील कालखंड परदेशाशी संबद्ध आहे.

(१) स्वदेशाचें ह्या धर्मामुळें झालेलें पुनरुज्जीवन व विकास (सुमारें १०० वर्षें) [खि. पू. ५८३ ते ४८० पर्यंत]

ह्या नवधर्माच्या योगानें इराण पुनरपि चैतन्यानें भारून गेलें. इराणच्या सैन्यानें बाबिलोनिया ह्या पश्चिमेकडील शेजारच्या राष्ट्राला जिंकलें (खि. पू. ५३९) इराणचें स्वराज्य डारियस ह्या राजाच्या हाताखालीं समृद्ध झालें. इराणच्या राज्याचा विस्तार युरोपखंडांतही होऊं लागला. पण शेवटीं सालामिसच्या लढाईनंतर ही प्रगति खुंटली.

(२) ग्रीकराष्ट्राशी झगडा (१५० वर्षें पर्यंत)
(खिस्तपूर्व ४८० ते ३३० पर्यंत)

आशियांतून आलेल्या या बलाढ्य नवधर्माचा ग्रीकराष्ट्रावर जबरदस्त प्रभाव पडला. हिरोडोटस हा स्वतः इराणांत जाऊन आला. त्यानें इराणचें वर्णन लिहून

ठेविलें आहे. इराणांत जाऊन त्या ठिकाणीं झोरोस्ट्रियन धर्माचा अभ्यास करण्याचें प्लेटोच्याही मनांत होतें, पण ग्रीकलोकांचें व इराणी लोकांचें युद्ध सुरू झाल्यामुळें प्लेटोला इराणांत जाता येईना. या युद्धांत सिकंदराला संपूर्ण विजय मिळाला.

(३) परकीयांचा अंमल व पुनरपि पूर्वस्थिति. (५५० वर्षें-पर्यंत, खिस्तपूर्व ३३० पासून खिस्तोत्तर २२६ पर्यंत) इराण प्रथम शिकंदरनंतरच्या ग्रीक लोकांच्या, व नंतर पार्थियन लोकांच्या अंमलाखालीं आलें. या सुमारास झोरास्ट्रियन धर्मांत सूर्यपूजा व बहुदेवतापूजा सुरू झाली. मिथ्र-धर्मांत हे दोन्हीही प्रकार प्रचलित होते.

(४) स्वातंत्र्याचा काल (४०० वर्षेंपर्यंत. इ. स. २२६ ते ६५१ पर्यंत) अर्देशीर (पहिला) हा झोरास्ट्रियन धर्माचा कट्टा अनुयायी होता. त्यानें इराणला पुनरपि स्वातंत्र्य मिळवून दिलें, जवळच्या आर्मेनियन लोकांना जिंकलें आणि ससेन घराण्याची स्थापना केली. ह्या राजाचें खडकावर कोरलेलें एक चित्र आहे, त्यांत झोरास्ट्रियन देवता त्याला साम्राज्याचें चिन्ह म्हणून एक आंगठी देत आहे असा प्रसंग आहे.

(५) इराणांतून हकालपट्टी व नंतरचें शांतिमय जीवन १३०० वर्षेंपर्यंत. (इ. स. ६५१ पासून आजपर्यंत)

इस्लाम या नव धर्मामुळें अरब लोकांत विलक्षण चैतन्य खळूं लागलें. या चैतन्याच्या भरांतच त्यांनीं इराण

जिंकलें व बहुतेक पारशी लोकांना धर्मांतर मुसलमान बनविलें किंवा इराणांतून हुसकून लाविलें. आजकालचे पारशी लोक व्यापार—धंद्याचे निमित्तानें साऱ्या जगभर पसरले आहेत; तरीपण बहुतेक पारशी लोक मुंबई इलाख्यांतच राहतात. साऱ्या हिंदुस्तानांत सार्वजनिक हिताची कार्यें करणाऱ्या लोकांपैकीं कांहीं अत्यंत श्रेष्ठ पुरुष पारशी लोकांत होऊन गेले आहेत. उदार देणग्या देण्याचे बाबतींत या लोकांचे प्रमाण जगातील सर्व विद्यमान धर्मांतील लोकांमध्यें जास्तींत जास्त आहे.

६ परमेश्वरविषयक कल्पना; अहुरमझ्द हाच परमेश्वर —

पारशीधर्म असें मानतो कीं, या जगांत एकच पूज्य देव आहे तो ज्ञान, जीवन, सत्य, व सद्गुण यांची अधिष्ठात्री देवता आहे. यांचेंच विशिष्ट नांव अहुरमझ्द (सर्वज्ञ ईश्वर) 'अहुर-मझ्द' हे दोन सुटे शब्द पुढे एकत्र येऊन त्याचा अहुर मझ्द अथवा ओर्मझ्द असा एक समास बनला. अवेस्ता-तील अगदीं पहिल्या ऋचेंत ईश्वराविषयीं पूज्यभाव प्रकट केला आहे.

"अहुरमझ्द हा जगाचा कर्ता आहे. तो तेजस्वी, वैभवशाली, श्रेष्ठ, अत्यंत उत्कृष्ट, अत्यंत सुंदर, अत्यंत दृढ, सर्वज्ञ, संपूर्ण व अत्युदार असा आहे.

(से. बु. ई. ३१:१९५-१०६)

इराणमध्यें या एकाच देवाची पूजा होते असें नाहीं. आमास आणि इतर समकालीन इस्राएल धर्माचार्य यांनी

जेहोवा देवासंबंधीं जें कार्य केलें तेंच झोरास्टरनें केलें. ह्मणजे अहुरमझ्दवरील श्रद्धा दृढ करून त्यानें त्या श्रद्धेचा जोरानें पुरस्कार केला.

" झोरास्टरनें अहुरमझ्दला विचारलें, " हे सर्वज्ञ अहुर मझ्द ! तूं निद्रा रहित व अप्रमत्त आहेस, तरी पण जगांत सद्विचार मलिन होत चालला आहे; दैत्य त्या सद्विचाराला मलिन करीत आहेत "

(से. बु. ई. ४:२१५–२१६)

गाथामध्यें अहुरमझ्द हा सद्गुणसंपन्न व विशिष्टधर्मयुक्त असल्याचें लिहिलें आहे. गाथाभाग स्वतः झोरास्टरनें लिहिला असल्याचें वर सांगितलेंच आहे. ह्या धर्मांचें व गुणांचे खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

(१) " सृष्टीचा कर्ता " (यस्न: ३१:७, ११; ४४:७, ५०:११; ५७:७)

(२) सर्वसाक्षी (यस्न ३१:१३; ४४:२)

(३) सर्वज्ञ (यस्न ३१:१३; ४५:३; ४८:२–३)

(४) सर्वश्रेष्ठ, सर्वशक्तिमान्

(यस्न २८:५; ३३:११; ४५:६)

(५) सखा (यस्न ३३:२१; ४४:२; ४६:२)

(६) न्याय व सत्य यांचा जनक (अ. शा.)

(यस्न ४४:३; ४७:२)

(७) सन्मनाचा जनक (वोहुमना)

(यस्न ३१:८; ४५:४)

(८) कल्याणकारी (हुडे) (यश्न ४५:६; ४८:३)

(९) उदार (स्पेंट) यश्न ४३:४,५,७,९,११,१३,१५; ४४:२; ४५:५; ४६:९; ४८:३; ५१:३०)

(१०) अत्युदार व्यक्ति (यश्न ३०:५)

वर सांगितलेल्या पुस्तकापैकीं यष्ट या पुस्तकांत ईश्वरांची वीस नांवें झोरास्टरला प्रकट झालेलीं दिलीं आहेत.

> " दररोज रात्रीं व दिवसा तूं माझ्या ह्या वीस नावांचा जप करीत जा " (से. बु. ई. २३:२६)

या पेक्षांही एक मोठी लांबलचक यादी आहे, त्यांत चौपन्न नांवें सांगितलीं आहेत.

> " मी संरक्षक आहे, आरोग्यप्रदाता, पुरोहित, पुरोहिताधिपति मीच आहे, समृद्धिकर्ता, स्वेच्छामात्रेंकरून विश्वशासन करणारा, उदारराजा, निष्कपट, अविप्रलभ्य, चैतन्यशाली, पवित्रमूर्ति, श्रेष्ठ, सत्सम्राट् सर्वेश्वराज इ० (से. बु. ई. २३:२७–२८)

यानंतरच्या धर्मग्रंथांत भगवान् अहुरमझ्दाचीं एकशें एक नांवें दिलीं आहेत.

७ आंग्रमन्यु—

या धर्माच्या संस्थापकाच्या उपदेशांत जगांतील पापाचा मालिन्याचा निषेध हा मुख्य प्रकार आढळतो. या पुढील धर्माचार्यांच्या उपदेशांत ह्यावर भर दिलेला आहे. गाथांतून द्रुजाला (असत्यमूर्ति), इतर कपटी व असत्य-

वादी लोकांना, व त्यांच्यापासून निर्माण होणाऱ्या इतर दुष्टांना निदान सहासष्ट वेळ धिःकारिलेलें आढळतें. देवविद्रोही 'आंग्रमन्यु' हा या दुष्ट लोकांपैकीं मुख्य मानला असून त्याचा उल्लेख झोरास्टरच्या उपदेशांत फक्त एकदाच आला आहे. या स्थळीं असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, जगांत सृष्टीचा प्रारंभापासून परस्परविरोधी मूलतः विसंवादी अशीं दोन तत्वें चालत आलीं आहेत. (यत्न ४५:२) अर्वाचीन धर्मग्रंथांत मात्र अहुरमज्द हें नांव जसें वारंवार आढळतें तसें आंग्रमन्यु अथवा 'अहिमन्' हें संक्षिप्त नांव पुनः पुनः आलें आहे.

"अरिस्टाटलच्या वेळेपासून ग्रीक लोकांना, पारशी धर्मांतील अरिमानियस् हा शब्द माहीत होता. याच शब्दांत थोडा फरक करून लॅटिनलोक अरिमोनियस हा शब्द वापरूं लागले (हेस्टिंग्ज. इ. आर्. ई. २३७)

झोरास्ट्रियन धर्मांचें जगांतील इतर सर्व धर्मांहून पापपुण्याचा निरंतर झगडा अथवा देवदानवांचे चिरंतन युद्ध हे तुल्यबल तत्व अगदीं निराळ्या प्रकारचे असून मूळपासून त्या धर्मांत दिसून येतें. पाप व पुण्य यांच्या विरोधी शक्ति जगाच्या प्रारंभापासून चालत आल्या असून त्या जगाच्या अंतापर्यंत परस्परांवर नियंत्रण करीत राहणारच.

ईश्वर हा सर्वज्ञ असून त्यालाच अनन्यभावें शरण गेले पाहिजे, या धर्मश्रद्धेबरोबरच झोरास्ट्रियन धर्मांत इतर क्षुद्र देवताविषयीं श्रद्धा प्रथमपासूनच चालत आली आहे. ह्यापैकीं कांहीं देवता

इतर समकालीन धर्मांतील निसर्गांतील तत्वरूपी देवता असून कांहीं अनिष्टकारी भयानक देवताही आहेत. अवेस्तांतील पहिल्या भागांतील पहिल्या अध्यायांत असें सांगितलें आहे कीं, प्रथम अहुरमज्दाची पूजा करावी; यानंतर एका लांबलचक व अव्यवस्थित यादी त्या अध्ययांत दिली आहे व या देवतांची पूजा नंतर करावी असें सांगितलें आहे. या यादींत सूर्य, चंद्र, तारका, अग्नि, वायु, जल, पर्वत, इत्यादि तत्वें आलीं आहेत. त्यांच्या अधिष्ठात्री देवतांची पूजा करावी व दिवंगत सत्पुरुषांचीही पूजा करावी असेंही तेथें सांगितलें आहे.

> " स्पता मैन्यु " च्या सर्व पवित्र प्राण्यांची (मग ते स्त्री असोत कीं पुरुष असोत) पूजा करावी "

(१) शुभ देवतांची यादी—

> अहुर मज्दाशी निकट संबंध असलेली, पण निराळ्या नांवानें निर्देशिलेली अशी एक देवता गांथामध्यें पांचदा " उदार देवता " या नांवानें उल्लेखिली आहे, व अत्युदार देवता (स्पानिष्ट मैन्य) हिचा आठदा उल्लेख आला आहे.

याशिवाय आमेश स्पेंता (अंशपद हें संक्षिप्तरूप) (उदार अमर) या नांवानें संबोधलेला असा एक देवतांचा समूह आहे. त्यांचा व्यक्तिशः निर्देशही गाथांतून केलेला सांपडतो. या सर्व देवतांचा एकत्र उल्लेख मात्र एकाच ऋचेंत आला आहे. (यस्न ४७ : १)

> वोहुमन्ना म्ह० चांगलें मन, विचार अथवा स्वभाव.
>
> आशा म्ह० सत्, पुण्य, न्याय, व्यवस्था.

क्षथ्र म्ह० शक्ति, राजसत्ता, राज्य.

अर्मैती म्ह० दया, प्रेम.

हौर्वतत् म्ह० सफलता, कल्याण, आरोग्य.

अमेरेतत् म्ह० अमरता, अनंतजीवन.

मुळांत हीं सामान्य नामें असून धर्मलक्षणें मानिलीं जात. कदाचित् पुढें ह्यांचा काव्यकल्पनेप्रमाणें अहुरमझ्दाचे दूत, किंकर अथवा विशिष्टधर्म ह्या अर्थी उपयोग होऊं लागला असावा. पण शेवटीं झोरस्ट्रियन धर्मांत त्या शब्दांचा 'विविध सगुण देवता' याअर्थी प्रयोग सुरू झाला. ह्या देवता अहुरमझ्दाशीं संबद्ध असल्या तरी त्याहून स्वतंत्र आहेत. त्यांना कधीं कधीं मुख्य देवदूतही मानलेले आढळतें.

यझत अथवा सामान्य देवदूत ह्यानाही ह्या धर्मांत पवित्र मानतात. फ्रवर्शी ह्या देवता मनुष्य प्राण्यांच्या रक्षक देवता मानतात.

(२) पापदेवतांची यादी—

अहुरमझ्दाशीं व त्याच्या शुभदेवतांशी संपूर्ण व सदैव विरोध करणाऱ्या अशा आंग्रमन्यु नांवाच्या देवताही या धर्मांत आहेत. याशिवाय या धर्मांत असंख्य राक्षसही आहेत. (से. बु. ई. २३:४९) ह्या पापदेवतेंत क्षुधा, तृष्णा, क्रोध, मद, लोभ, अनृत, दुर्भिक्ष, हेमंत, वारांगना वगैरे देवता प्रमुख आहेत. ह्या सर्वांना "देव" हें नांव सामान्यरीतीनें देण्यांत येतें. याचाच पुढें फारशी भाषेंत 'दिव' हा अपभ्रंश झाला आहे. इंग्रेजींतील Devil शब्द याच शब्दापासून निघाला आहे.

ह्या विविध पापदेवतांच्या पापदृष्टींतून मुक्त होण्याकरतां अनेक शांतिमंत्र अथवा शुद्धीकरणविधि या धर्मांत सांगितले आहेत. त्या सर्वांचा समावेश धर्मग्रंथाच्या तिसऱ्या भागांत केला आहे.

९ शुद्धि, पूजा व प्रार्थना.

सामान्यतः पारशी लोकांना ' अग्निपूजक ' म्हणतात; पण हे म्हणणें सर्वथा खरें नव्हे. स्वतः पारशी लोकांना ' अग्निपूजन ' ही संस्था मुळींच मान्य नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, पारशी लोक अग्निला विशेषतः सूर्याला तेजोदेवता अथवा शुद्धि-देवतेचे अथवा औच्यदेवतेचे प्रतीक मानतात. तरीपण हेंही खरें आहे कीं, अखंड अग्नि ठेवणें हा प्रकार ख्रिस्तीशकापूर्वी-पासून आज हजारों वर्षें झोरास्ट्रियन धर्माचें एक महत्वाचें अंग मानण्यांत येतें.

" अग्निकुंड नेहमीं स्वच्छ राखलें पाहिजे, त्यांतील अग्नि केव्हांही विझणार नाहीं याबद्दल दक्षता ठेवावी. कसलाही अपवित्र अथवा खराब पदार्थ अग्निकुंडापर्यंत जाता कामा नये. विटाळश्या बाईनें अग्निपासून निदान तीन पावलें दूर उभे रहावें. (सद्-दर ११:१) (से. बु. ई. २४-२७०)

शरीर शुद्धीचे अनेक धर्मविधि या धर्मग्रंथांत सांगितले आहेत.

" कापलेलें केस व काढलेली नखें योग्य ठिकाणींच टाकून द्यावीं " (वेंदिदाद १७:१:११) से. बु. ई.

एकाद्याला शिंक आली तर त्यानें ठराविक मंत्र म्हणावा.

(सद्—दर ७:१-७) (से. बु. ई. २४:२६५-२६६)

" चांगलें साफ केलेलें दांतकोरणेंच वापरावें " (सद—दर १७:१-२; से. बु. ई. २४:२७८.)

याशिवाय अनेक जातीचे मंत्रही या धर्मांत आहेत.

उदा० —सर्वपापहरणमंत्र (वेंदिदाद ३:४१–४२)
(से. बु. ई. ४:३३-३४)

शुद्धि ही मनुष्याला प्राणाच्या खालोखाल अत्यंत कल्याण-कारी वस्तु आहे (वेंदिदाद ५:२१; १०:१८) से. बु. ई. ४:५६–१९४१.

" शांतिकूप " (म्ह० प्रेतें टाकण्याची विहीर) त्या स्थळीं पारश्यांचीं प्रेतें टाकण्याची या धर्मांत चाल आहे. प्रेताच्या संसर्गानें अग्नि अथवा पृथ्वी दूषित होऊं नये, ह्याविषयीं हे लोक फार दक्षता बाळगतात.

" प्रेतें पुरणें " हें इतकें घोर पातक आहे कीं त्याला प्रायश्चित्त नाहीं. वेंदिदाद १:१३ (से. बु. ई. ४:७) ह्या धर्मानें (वेंदिदादामध्यें) सांगितलेला शरीर—शुद्धीचा विधि अत्यंत तत्त्वपूर्ण व प्राचीनतम असून आजही माणसांच्या आरोग्यरक्षणाचे बाबतीत संपूर्ण उपयोगी पडण्यासारखा आहे.

त्या धर्मांत नित्य व नैमित्तिक पठण करण्याकरतां अनेक प्रार्थना-मंत्र सांगितले आहेत. (से. बु. ई. ३१:२६७-२८८) ह्यांतले अत्यंत महत्त्वाचे असे दोन मंत्र त्यांच्यांतील आद्याक्षराच्या नावा-नेंच प्रसिद्ध आहेत. लॅटिन भाषेंतील प्रार्थनेचीं नांवेंही त्यांच्या आद्याक्षरावरूनच पडलीं आहेत. पहिल्या मंत्राच्या " अहुना-वैरो " (होनोवर हें याचें संक्षिप्त रूप) या आद्याक्षरावरून मंत्राचें नांवही अहुना—वैरो (ह्म. ईश्वरीइच्छा हाच धर्म—नियम) असें पडलें आहे. (से. बु. ई. ४:१००, १४२, २१६; २३:२९)

दुसऱ्या मंत्राचीं आद्याक्षरें " अशेम-वोहु " (ह्म. पावित्र्य ही उत्कृष्ट वस्तु आहे). ह्यावरून या मंत्राचें नांवही "अशेम वोहु " हेंच पडलें. (से. बु. ई. ४:२१६; २३:३०, ३४) या धर्मांतील संक्षिप्त " प्रतिज्ञामंत्र " पुढीलप्रमाणें आहे:—

" मी मझ्दाचा पूजक, झोरास्टरचा अनुयायी, देवांचा द्वेषी व अहुराची आज्ञा पाळणारा आहे. "
(से. बु. ई. ३१:२०२; २१२, २४७, ३६७)

१० ह्या धर्मांतील नीतिकल्पना:—

झोरास्ट्रियन धर्माचे क्रियाकांडात्मक व व्यावहारिक नीतिचें स्वरूप थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगता येईल. " तेज अखंड तळपत राहो. " ह्या वाक्याचे शब्दशः व लाक्षणिक दोन्हीही अर्थ ह्या ठिकाणीं घेतले पाहिजेत. आदर्श पारशीधर्माच्या अनुयायांचें चित्र त्या धर्माच्या संस्थापकानें पुढीलप्रमाणें दिलें आहे:-

" हे मझ्द, तुझ्या धर्माचा अनुयायी तुझ्याप्रमाणें श्रद्धायुक्त, बहुश्रुत व उदारधी असतो " (यस्न ४३:३; मोल्टन ई. झो. ३६४)

दान करण्याच्या योगानें ईश्वरी राज्याला मदत केल्यासारखें होतें.

" जो गरिबाचें दैन्य फेडतो तो अहुराला राजा बनवितो. (से. बु. ई. ४:२१०,२५१) भल्याशी भलें, पण बुऱ्याशी बुरें वागावें, हा या धर्माचा दंडक आहे.

तुमच्या पाशीं धन थोडे असो वा पुष्कळ असो, पुण्यशील मनुष्यावर तुम्हीं प्रेम केलेंच पाहिजे. असत्य बोलणाराचा

मात्र तुम्हीं नाश करा. (यस्न ४७:४ मोल्टन ई. ओ. ३७७, यस्न ३३:२-३; मोल्टन ई. ओ. ३५८)

धर्मविरोधकांचा नाश करावा असें यांत स्पष्ट सांगितलें आहे.

" धर्मविरोधकांचा सशस्त्र प्रतिकार करा (यस्न ३१:१८; मोल्टन ई. ओ. ३५४ तसेंच से. बु. ई. ३१:५०, २५०, २९७)

" शत्रूंशी जशास तसें वागा. मित्राशी मित्रप्रेमानें वागा." (से. बु. ई. २४:१२) संन्यास अथवा संसारत्याग ही गोष्ट या धर्माला मान्य नाहीं. मितव्ययपूर्वक कृषिकर्म करून गृहस्थाश्रम करणें ही गोष्ट या धर्मानें इष्ट व व्यवहार्य मानली आहे.

" जो पुष्कळ धान्य पेरतो आणि गवत व फळें पुष्कळ तयार करतो, तो पुण्यसमृद्धि करतो. मझ्दधर्माला तो समृद्ध करतो. उपास करणाऱ्या माणसांत पावित्र्याची धर्मकृत्यें करण्याला ताकद कोठून येणार ? (से. बु.ई.४:२९-३१) या धर्मात अत्यंत उच्च मानलेला सद्गुण " शुद्धि " हा होय. "हे पुण्यशील मनुष्या ! आत्मशुद्धि कर. वाणी, मन व शरीर यांची शुद्धि करणें हीच आत्मशुद्धि."

(से. बु. ई. ४:१४१)

पारशी लोकांच्या नित्यव्यवहारांत धर्मग्रंथांतील एक वाक्य नेहमी येतें. या वाक्यावरून त्या लोकांच्या नीतिकल्पना स्पष्ट कळतात. तें वाक्य असें:—

" हु-माता, हु-उक्ता, हु-वर्ष्टाः सद्विचार, सद्वाणी, आणि सत्कर्म." (से. बु. ई. ४:५६; २८९, ३७६; ३१: २५०, २८२, २८५, ३९०)

" केव्हांही शेवटीं पापावर पुण्याचा जय झाल्यावांचून राहणार नाहीं. " हें तत्त्व शिकविणारा विद्यमान धर्मांत हाच बहुधा पहिला धर्म असावा. झोरास्टरचा अगदीं पहिला व वारंवार उच्चारलेला हा संदेश आहे कीं, पाप्याना दंड व पुण्यशाली लोकांना सद्गति अशा प्रकारचीं दोन निरनिराळीं फळें परमेश्वर प्राण्यांना त्यांच्या कर्माबद्दल देतो. (यस्न ३०:२, ४, ९-११; ३१:८, १९; ३२:६, १५; ३३:३, ५; ४३:१२; ४५:७; ४६:१२, ४८,४; ५१:६—५३—७.९)

अमरत्व मागितल्याचे अथवा मिळणार असा विश्वास प्रकट केल्याचें सतरा स्थळीं गाथांतून आढळतें. (यस्न ३१:२१; ३२:५; ३३:५; ८; ३४:१; ११; ४३:२—३; ४४:१७—१८; ४५:५,७,१०; ४७:१; ४८:१; ५१:७; ५३:१)

मृत मनुष्य पुन्हा सशरीर जीवंत झाल्याचें फक्त एकदाच खुद्द झोरास्टरनें सूचित केलें आहे. पण पुढील काळांतील धर्मग्रंथांत ही कल्पना वारंवार स्पष्ट तऱ्हेनें सांगितल्याचें आढळतें.

काळ्या मेंढ्यांत पांढरी मेंढी जशी चटकन् ओळखतां येते, तद्वत् त्या सभेंत दुष्ट मनुष्य चटकन् ओळखतां येतो. (से. बु. ई. ५:१२३)

पापीलोक व पुण्यशील लोक यांचे मध्यें एक अरुंद 'चिनवट' नांवाचा पूल असून तो त्या दोघांना मरणानंतर कायमचे विभक्त करतो, ही एकच विशिष्ट गोष्ट झोरास्टियन धर्मग्रंथांत पदोपदीं

सांगितलेली आहे. ही गोष्ट गाथांमध्यें तीन वेळ (यस्न ४६: १०, ११; ५१:१३) यस्नमध्यें दुसरीकडे (१९:६; ७१: १६) व से. बु. ई. ४:१५६; २१८-२१९; २३:१२, २०, ३३९; २४:२५८; ३१:३४५ इत्यादि ठिकाणीं आलेली आहे. भावी काळांत ईश्वर हा पापपुण्याचा निवाडा करील हें सांगण्याचें प्रसंगानें इतरही विशेष कल्पना केल्या आहेत:—

> "मरणानंतर प्रत्येक प्राण्याचीं कर्मे त्याच्यापुढें सब्दुद्धि किंवा असब्दुद्धि यारूपानें उभीं राहतील" (यस्न ३१:२०; ४६:११; व से. बु. ई. २३:३१५-३२१)
>
> "दोन देव प्राण्याच्या सत्कृत्यांची नोंध करतात."
> (से. बु. ई. २४:२५८)
>
> "आत्म्याला एका तागडींत घालून वजन करतील."
> (से. बु. ई. २४:१८)

सद्विचारांचें फळ स्वर्ग मिळणें हें आहे, स्वर्गांत वैषयिक सुख मिळत असल्याचें वर्णन या धर्मांत मुळींच नाहीं.

> "सद्विचारांचा उज्ज्वल परिणाम स्वर्गप्राप्ति हा." (यस्न ५३:४; व ३०:४, १०; ३१:२१; ३२:१५; ३३:३, ५)

असत्यवादी लोकांचें शासन करण्याकरतां एक भयाण व जुनाट अशी नरक या नांवाची जागा आहे असें ह्या धर्मांत सांगितलें आहे. (यस्न ३०:११; ४५:७; ४६:११) गाथांमध्यें फक्त दोनच ठिकाणीं नरकांतील घोर प्रकार वर्णिले आहेत.

अंधार, सडकें अन्न, क्लेशकारक बोलणीं, (यस्न ३१:२०; ४९:११)

सोष्यंत या नांवाची तारक विभूति भावी कालांत पृथ्वीवर अवतीर्ण होईल असें हा धर्म मानतो. या व्यक्तीचा उल्लेख गाथांतून (यस्न ४५:११; ४८, ९) इतरत्र यस्नांत (२९, ९, ५९:२८) व से. बु. ई. ४:२११; ५:२२, २३:२२०-२२१, २०६-२०७; ३१:२२९; ५७:१५६)

जगाच्या प्रलयापूर्वी दर हजार वर्षांनीं एकंदर तीन तारक महात्म्ये-आशुदार, आशुदार मह आणि सोष्यंत या नांवाचे-अवतीर्ण होतील. यांतील प्रत्येकजण झोरास्टर वंशांतील व्यक्ति (अतिमानुष व्यक्ति) असेल (कारण ते सर्व झोरास्टरप्रमाणेंच अयोनिज असतील.) झोरास्टरच्या आईविषयींही पुढील वर्णन आढळतें:—

> " ती पंधरा वर्षांची मुलगी होती तरी तिनें पुरुषसंग केव्हांही केला नव्हता. आणि यानंतरही ती गरोदर होऊन तिला मुलगा झाला, तरी तिचा कोणत्याही पुरुषाशी समागम घडला नव्हता."
>
> (से. बु. ई. ४७:१०६, १११, ११५)

जगाच्या प्रलयकालीं ईश्वर सर्वांना संपूर्ण शुद्ध करण्याचा विधि करवील. झोरास्टरनेंही, ईश्वर त्याकालीं अग्निदिव्याच्याद्वारें अथवा तप्त-धातुरसाच्या दिव्यानें (यस्न ३०:७ ३२:७) सर्वांची परीक्षा करील असें एके ठिकाणीं अस्पष्ट सूचित केलें आहे. (यस्न ४३:४) पण अगदीं अलिकडच्या धर्मग्रंथांत, प्रथम मृतात्मे उठतील, नंतर ईश्वर पापपुण्यांचा निवाडा करील; पापात्मे व पुण्यात्मे यांना निराळे पाडण्यांत येईल; व नंतर या दोन गटांना अनुक्रमें नरक व स्वर्ग याकडे पाठवतील असें तपशिलवार वर्णन आलें आहे.

" नंतर सर्व लोकांना तप्तधातुरसांत टाकून शुद्ध करण्यांत येईल. मग सर्व एका आवाजांत मोठ्यानें अहुरमझ्द व इतर देवांची स्तुति करतील. येथें अहुरमझ्दाच्या कार्याची परिसमाप्ति होईल. यापुढें सोष्यंत हा आपले मदतनीस घेऊन एक यज्ञ करील. त्या-प्रसंगीं एका बैलाचा बळि दिला जाईल. त्या बैलाच्या चरबी-पासून ' हश ' या नांवाचें द्रव्य तयार करून तें सर्व माणसांना वांटतील. त्यामुळें सर्व लोक कायमचे अमर होतील.

(से. बु. ई. ५:१२६)

१२ झोरास्टर धर्माचें सामर्थ्य कशांत आहे ?

(१) या धर्मानें कल्पिलेला ईश्वर सगुण, नीतिसंपन्न व कर्तव्यनिष्ठ आहे.

(२) ह्या धर्माला विश्वधर्म होण्याचें स्वप्न सर्वांत अगोदर पडलें.

(३) प्रथम प्रथम ह्या धर्मानें स्वमतप्रसाराचा उत्साहानें प्रयत्न केला.

(४) पुण्य व पाप यामधील सनातन विरोध या धर्मानें स्पष्ट केला आहे.

(५) आपल्या स्वत:च्या उद्धाराची जबाबदारी एकट्या स्वत:वरच आहे ही गोष्ट या धर्मानें स्पष्ट सांगि-तली आहे.

(६) मनुष्यव्यक्तीचें महत्व या धर्मानें पूर्णपणें ओळखलें.

(७) संन्यास अथवा उदासीनता या धर्माला पसंत नसून तो संपूर्ण प्रवृत्तिपर धर्म आहे.

(८) समाजाला हितकारक असेंच धार्मिकजीवन असलें पाहिजे, हा या धर्माचा कटाक्ष आहे.

(९) समाजहिताकरतां मनुष्यानें ईश्वराशीं सहकार करावा असा या धर्माचा स्पष्ट उपदेश आहे.

(१०) प्रलयांतीं होणाऱ्या पापपुण्याच्या निवाड्यांत व्यक्तीचें नैतिक ध्येय अमुक एक असलेंच पाहिजे.

(११) नैतिक सद्वर्तनाचा शेवटीं जयच होणार असा या धर्माचा विश्वास आहे.

(१२) या धर्माचा संस्थापक मोठा भक्त असून तो अनेक दृष्टींनीं एक प्रशंसनीय पुरुष होता:—

१३ या धर्मांतील दोषस्थळें:—

(१) ह्या धर्माच्या संस्थापकांत लोकांना आकर्षण वाटून स्फूर्ती उत्पन्न होईल असे गुण नव्हते.

(२) झोरास्टर नंतर या धर्मांत धर्माचार्य अथवा धर्मप्रचारकांची परंपरा अखंड टिकली नाहीं.

(३) शुद्ध ईश्वराद्वैतवाद यांत नसल्यामुळें या धर्माचा कल बहुदेवतावादाकडे गेला.

(४) सर्व जगांत स्वमतप्रसार करण्याची खरी दृष्टि या धर्मांत पहिल्यापासून मुळींच नव्हती.

(५) एका विशिष्ट वर्गाच्या कर्मकांडाचा अतिरेक या धर्मांत झाला.

(६) धर्मप्रसाराचें कामीं पशुबळाचा उपयोग करण्याचा उपदेश यांतील धर्मग्रंथांत आहे.

(७) कांहीं लढाया करण्यापलीकडे या धर्मानें फारशी प्रवृत्तिपरता दाखविलेली दिसत नाहीं.

(८) संकटें सहन करण्याचें महत्व या धर्माला कळलें नाहीं.

(९) केवळ सन्मार्गानें वागणें यांतच या धर्मानें समाधान मानून घेतलें. उच्च ध्येयाकरितां उच्च मार्ग शोधून काढण्याचे भानगडींत हा धर्म केव्हांच पडला नाहीं.

(१०) एका अनादि पापदेवतेपासून जगांतील सर्व पापें निर्माण झालीं, असा सोपा व सोयीचा निर्णय हा धर्मानें केलेला दिसतो.

(११) ह्या धर्मांतील आशावादीपणा प्रशंसनीय खरा, पण त्याचा पाया बराच कच्चा असून त्यांत परस्परविरोधि-तत्वाचा पोकळपणा आहे.

(१२) जगाचे प्रलयकाळीं ईश्वर येऊन सर्वांना शुद्ध करून अमर करील ह्या नुस्त्या कल्पनेवरच ह्यानें फाजील भर दिला आहे.

प्रकरण अकरावें

इस्लाम अथवा मुसलमानधर्म

जगदीश्वराला शरण जाणारा धर्म

१ प्रास्ताविकः या धर्माचें विद्यमान धर्मांत स्थान.

संख्येच्या दृष्टीनें पाहतां इस्लाम हा धर्म खिश्चनेतर धर्मांत दुसऱ्या नंबरचा धर्म. पहिला नंबर कानफ्यूशियन धर्माचा लागतो. जगांतील धर्मांत खिश्चन धर्माच्या खालोखाल या धर्माचा विस्तार झपाट्यानें वाढत चालला आहे.

उत्पत्तीचा प्रकार या दृष्टीनें पाहतां हा धर्म व्यक्तिसंस्थापित धर्मसमूहाखालीं येतो. एखाद्या महान् व्यक्तीच्या धर्मानुभवानें व उपदेशानें प्रस्तृत झालेले असे हल्लीं नऊ धर्म विद्यमान आहेत, त्यापैकीं इस्लाम हा एक. हिंदुधर्म व शिंटोधर्म यांचा प्रकार वेगळा आहे. हे दोन्ही धर्म एका विशिष्ट जातीच्या विकासाबरोबर सहजगत्या विकास पावले आहेत. जगाकडे पाहण्याचा दृष्टिबिंदु या दृष्टीनें पाहतां इस्लाम हा धर्म बुद्ध व खिश्चन या धर्मांप्रमाणें विश्वव्यापी धर्म आहे. हा धर्म अमुक एका विशिष्ट जातिकरतां अथवा राष्ट्राकरतां आहे असें नाहीं, तर सर्व राष्ट्रांकरतां किंबहुना

सर्व जगाकरतां आहे. बाकीचे आठ धर्म एकतर पारंपरिक अथवा राष्ट्रिय आहेत.

ईश्वरवादाच्या दृष्टीनें पाहतां असें ह्मणतां येईल कीं, यहुदीधर्म, शीखधर्म व ख्रिश्चनधर्म या तीन धर्मांप्रमाणें हा धर्मही एकेश्वरीमताचा आहे. बाकीच्या सात धर्मांपैकीं कांहीं अनेकदेवतावादी, कांहीं द्वैत-वादी, तर कांहीं व्यापकेश्वरवादी आहेत. अशा रीतीनें विद्यमान अकरा धर्मांत इस्लामचें जास्तींत जास्ती जर कुणाशीं जुळत असेल, तर तें ख्रिश्चन धर्माशीं; आणि तें पुन्हां व्यक्तिसंस्थापितत्व, विश्वव्यापकत्व, आणि एकेश्वरत्व या तीन मुख्य बाबतींत.

कालदृष्ट्या जगांतील धर्मांत इस्लाम हें जवळ जवळ सर्वांत धाकटें भावंड. नाहीं म्हणायला शीखधर्म हा इस्लामधर्मानंतर जन्माला आला; पण शीख लोक हिंदुस्तान आणि त्यांतल्या त्यांत हिंदुस्तानच्या एका कोपऱ्यांत सामावून राहिले आहेत. तसें म्हटलें तर गेल्या शतकांतही कांहीं नवे धर्म— थिऑसफी व बाहा-इझम व एथिकल कल्चर सोसायटी वगैरे—जन्माला आले आहेत; आणि या नवधर्मांचा दुसऱ्या कोणत्याही धर्मावर आधार आहे असेंही नाहीं. हे धर्म आपल्या जन्मभूमीच्या बाहे-रही फैलावत आहेत, तथापि या धर्मांना जन्मून अजून शंभर वर्षेंही झालीं नाहींत. एवंच जुन्या ऐतिहासिक धर्मांत गेलीं १३०० वर्षेंच विद्यमान असल्यामुळें हा धर्म ख्रिश्चनधर्माचें धाकटें भावंड म्हणता येईल, आज हा एकाच धर्म दोन तीन खंडांत ख्रिश्चन धर्माशीं जोराची स्पर्धा करीत आहे. या धर्माचा जन्मही ख्रिश्चन धर्माचा मुद्दयाम विरोध करण्याकरतांच झाला आहे. पण इतकें असूनही अजून या धर्मानें जगाच्या धर्मविचारसंपत्तींत

एकही नव्या विचाराची भर घातलेली नाहीं, या धर्माच्या संस्थापकानें या धर्माला जें साभिप्राय नांव दिलें आहे, त्यावरूनच या धर्माची मध्यवर्ती कल्पना ध्यानांत येते. कारण इस्लाम याचा अर्थ "परमेश्वराला शरण जाणें." (३:१७; ३:७९; ५:५; ६:१२५; ३९:२२; ६१:७) इस्लाम या शब्दांतील आरबी धातूवरून साधलेला दुसरा 'मुस्लीम' हा शब्द आहे. त्याचाही सरळ अर्थ "शरण आलेले" असा आहे.

'ह्या जगाचा एक सर्वश्रेष्ठ शास्ता आहे व तो जगावर अनियंत्रित सत्ता चालवितो, त्याचे भक्त त्याला सर्वभावें शरण जातात' अशी या धर्माची मूळ कल्पना असल्यामुळें, साहजिकच या धर्माच्या अनुयायांचा 'अनियंत्रितराज्यपद्धति' कडे कल आहे. मुसलमानांनीं आजपर्यंत अनेक देशांत नांव घेण्यासारखीं मोठालीं राज्यें स्थापलीं असें इतिहास सांगतो. तरीपण आजच्या घटकेला नांवाजण्यासारखें स्वायत्त राज्य मुसलमानांनीं यशस्वी रीतीनें चालविलेलें कुठेंही पाहण्यांत नाहीं. आज सगळ्यांत मोठा व संपन्न मुसलमानांचा गट हिंदुस्तानांत असून त्यांतील लोकांची संख्या सुमारें सहाकोटी ऐंशी लक्ष आहे.*

२ ह्या धर्माच्या संस्थापक महंमद यांचें जीवनचरित्र.—

(५७०–६३२ इ. स.)

ह्याच्या जीवनाविषयीं माहिती कांहींशी कुराणांत मिळते व कांहीं प्राचीन आरबी भाषेंत लिहिलेल्या अनेक चरित्रांवरून मिळते.

* ही गोष्ट खरी आहे कां ? तुर्कांचें राज्य संपन्न नाहीं कां ? —अनुवादक.

(१) एक सामान्य अरब (वय १–३५)

महंमदाचा जन्म मक्का ह्या अरबस्थानांतील अत्यंत प्रसिद्ध शहरीं झाला. हें शहर मूर्तिपूजा व सर्वचेतनवाद यांचें माहेरघर होतें. त्याचा जन्म कोरेश या जातींत झाल्या असल्यानें, त्या जातींतल्या इतर लोकांप्रमाणें हाही मेंढपाळ झाला व व्यापार-धंदाही करूं लागला. व्यापाराच्या निमित्तानें तो सिरिया व पालेस्टाईन या प्रांतांत गेला, त्याठिकाणीं त्याचा ज्यू व ख्रिश्चन लोकांशीं संबंध आला.

(२) धर्मज्ञानाचा प्रयत्न (३५ ते ४०)

एके वेळीं तीन शेख (अरब) आपापसांत भांडत असतां महंमदानें त्या ठिकाणीं जाऊन त्यांचें भांडण मिटविलें. त्यावरून लोकांना आशा वाटूं लागली कीं, ' हा पुढें धर्मगुरु होईल; ' कारण हे लोक आपआपसांतील कलहांनीं अगदीं गांजून गेले होते. (म्यूर-कृत महमंदाचें जीवनचरित्र पा. २७-३०) महंमदही आपल्या वेळच्या सामाजिक व नैतिक परिस्थितीला अगदीं कंटाळून गेला होता. त्यानें ज्यू व ख्रिश्चन लोकांकडून एकेश्वरमताची थोडी माहिती करून घेतली. यावेळीं तो धर्मज्ञानाचे बाबतींत अगदीं अंधरांत चांचपडत होता. अशा स्थितींत त्यानें आर्तरवानें प्रभूची जी करुणा भाकून प्रार्थना केली ती प्रार्थना आदर्शप्रार्थना म्हणून कुराणाच्या ' फातिह ' ह्या पहिल्या अध्यायांत आलेली आहे. प्रत्येक श्रद्धाळु मुसलमानाला ह्या प्रार्थनेचा दिवसांतून बत्तीस वेळा उच्चार करावा लागतो. (म्यूर-कृत जीवन पान ३८)

(३) दृष्टांत व निष्फळ उपदेश (वय ४०–५२ दरम्यान).

अशा या मनाच्या व्याकुळ स्थितींत एकाएकीं महंमदाला असें वाटलें कीं, सर्वत्र हिंडून एकेश्वरीधर्माचा प्रसार करण्याबद्दल मला प्रभूचा आदेश मिळाला आहे. एकेश्वरी धर्मांत परमेश्वर हा स्रष्टा, सर्वसत्ताधीश व परमन्यायी मानण्यांत येतो. अल्लाचा प्रेषित झाल्याचा त्याला जो प्रथम दृष्टांत झाला त्याचा उल्लेख कुराणाच्या शहाण्णवाव्या अध्यायांत आलेला आहे असें समजतात. बारा वर्षेपर्यंत महंमदाला सारखें दृष्टांत होत होते. परमेश्वर एकच आहे व प्राण्यांच्या पुण्यपापांचें फळ तो प्राण्यांच्या मरणोत्तर एका ठराविक दिवशीं देतो; मूर्तिपूजा व बाळवधाची चाल निंद्य आहे इत्यादि प्रकारचा त्याचा उपदेश लोकांच्या फारसा गळीं उतरेना. एवंच मक्का व त्याजवळचें दुसरें शहर टैफ या ठिकाणींही त्याला फारसें यश आलें नाहीं.

(४) महंदाचा पोबारा, अथवा (स्थानान्तर– हेजीरी (वय ५५)

आपला देश सोडून महंमदाला फक्त आपल्या एका मित्राला बरोबर घेऊन आपले प्राण वाचविण्याकरितां पळून जावे लागले. प्रथम मक्केच्या उत्तरेस एका पर्वताच्या गुहेंत तो तीन दिवस लपून राहिला, व शत्रूंच्या तावडीतून मोठ्या शर्थीनें सुटला.

" परमेश्वर त्याचा पाठीराखा होता, त्यामुळें तो जरी फक्त एक मित्र घेऊन पळत होता, तरी पाठलाग करणारे शत्रू त्याला कांहीं करू शकले नाहींत. ते दोघे गुहेंत शिरल्यावर महंमद

आपल्या मित्राला ह्मणाला, "मित्रा! तूं असा कष्टी होऊं नकोस. ईश्वर आपला 'सांगाती' आहे" आणि खरोखरींच ह्या अनन्य निष्ठेमुळें महंमदाच्या चित्तांत शांति उत्पन्न झाली. परमेश्वरानें त्याच्या मदतीकरतां हजारो सैनिक अदृश्यरूपानें पाठविले" (९-४०)

सन ६२२ ह्या वर्षीं महंमदाच्या दुर्दैवाची जशी एका बाजूनें परिसीमा झाली, तशी दुसरीकडून त्याच्या अलौकिक यशस्वितेची सुरवात पण झाली. हें प्रख्यात वर्ष महंमदी धर्माच्या पंचांगगणनेचें प्रारंभवर्ष मानतात. ह्या वर्षाला लॅटिन भाषेंत अनो हेजरी अथवा संक्षेपत: 'ए. एच.' म्हणतात.

(५) मदीना येथें देवराज्याची स्थापना, (वय ५२-६०).

उत्तर अरबस्तानांतील अत्यंत प्रख्यात शहरीं (मदीना येथें) महंमदानें अल्लाचें राज्य स्थापन केलें, व स्वत: त्या राज्याचा पहिला सर्वाधिकारी झाला. ही राज्यपद्धति त्यानें "अकबाच्या षड्विध प्रतिज्ञेवर" उभारली होती.

> " आम्ही एका परमेश्वराखेरीज दुसऱ्या कोणाचीही पूजा करणार नाहीं. आम्ही चोरी, व्यभिचार व बालवध ह्यापैकीं कांहींही करणार नाहीं. आम्ही कोणाचीही त्याच्या पाठीमागें निंदा करणार नाहीं. चांगल्या गोष्टींत आम्ही केव्हांही प्रभूच्या आज्ञेचा भंग करणार नाहीं. (म्यूरकृत 'जीवनचरित्र' ११८)

दैनिक त्याचप्रमाणें दर शुक्रवारची प्रार्थना करण्याकरता त्यानें एक मशीद बांधली. (६२:९) त्यांनीं आपल्या अनुयायांची भक्ति, धार्मिकशिक्षण, व धर्माच्या प्रसाराचे बाबतींत

उत्साहानें परधर्मावर आक्रमण करण्याची कला या बाबतींत व्यवस्थित संघटना केली. शक्तिमान परमेश्वराचा उत्साही प्रेषित असलेल्या महंमदाला आपली गुप्त शक्ति प्रकट झालेली दिसली. लौकरच त्याच्या अनुयायांची संख्या वाढत चालली. त्याच्या धर्मप्रसाराच्या उपदेशाच्या जोडीला त्यानें धर्मयुद्धाच्या उपदेशाचा प्रारंभ केला. ' धर्मार्थ युद्ध ' ही त्याची त्यावेळीं अगदीं नवी अशी एक कल्पना होती. शत्रूंच्या प्रचंड फौजेशीं झालेली बेद्र येथील लढाई अल्लाचें साहाय्य नसतें, तर मला मुळींच जिंकता आली नसती असें त्यानें सरळ कबूल केलें. डिच येथील लढाई-विषयींही त्यानें असेंच उद्गार काढलें आहेत. (३:११; ८:४१-४६)

तो जसजसा समर्थ व स्वतंत्र धर्मगुरु ह्मणून लोकापुढें येऊं लागला, तसातसा त्याच्या कार्यपद्धतींत व वागण्याच्या रीतींत मोठाच फरक होऊं लागला. उदाहरण सांगावयाचें ह्मणजे पूर्वीं त्यानें प्रार्थना करतेवेळीं जरूसालेमकडे म्हणजे पूर्वेकडे तोंड करण्याची पद्धति (किब्लह) अंमलांत आणली होती; पण आतां अरबस्तानच्या मध्यवर्ती मक्काशहराकडे म्हणजे पश्चिमेकडे सर्वांनीं प्रार्थना समयीं आपली तोंडें करावी असा त्यानें नवा हुकूम सोडला. पूर्वीं त्यानें ज्यू लोकांच्या प्रायश्चित्तदिनीं उपवास करावा असें आपल्या अनुयायांना सांगितलें होतें; पण आतां खास मुसल-मान लोकांच्या रमझान महिन्यांत उपवास करावा असें त्यानें नवें फर्मान काढलें. (२:१७९-१८३)

पूर्वीं तो ज्यू लोकांशीं मित्रत्वानें वागे; आतां त्यानें त्यांचा छळ करून त्यांना ठार मारण्याचा सपाटा चालविला. त्याची

पहिली बायको वारल्यानंतर त्यानें एका पाठीमागून एक अशीं लग्नें करण्याचा धडाका सुरु केला, व शेवटीं आपल्या बायकांची संख्या अकरा पर्यंत आणून भिडविली.

६ मक्केंत अप्रतिहत सत्ता—(वय ६०—६२)

शेवटीं मक्का हस्तगत करून त्यानें साऱ्या अरबस्तानावर आपली राज्यसत्ता सुरू केली. त्यानें मूर्तिपूजा नामशेष करण्याचा चंग बांधला व यहुदी व खिस्तीधर्माला अंकित करून टाकण्याचा निश्चय केला. (९:२९-३०; म्यूरकृत जीवनचरित्र ४०१-९, ४५३-५४) त्यानें आपले वकील ग्रीक, ईराण, ईजिप्त व हबशी या देशांच्या राजांकडे पाठविले व त्यांच्यावर आपल्या धर्माचा स्वीकार करण्याबद्दल सक्ती केली. अल्लाच्या धर्मांत लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत आहेत असें त्याला दिसून आलें. (११०:२) शेवटीं थोडासा ताप येऊन तो मरण पावला. आपल्या अन्तःपुरांतील पट्टराणी आइषा हिच्या मांडीवर त्यानें प्राण सोडला. त्याची शेवटची प्रार्थना पुढीलप्रमाणें:—

> " प्रभो ! मला क्षमा कर. मला तुझ्या संगतींत राहूं दे. स्वर्गांतील अमरता ! क्षमा कर ! प्रभूचा धन्य समागम !!
> (म्यूरकृत जीवन—चरित्र पा. ४९५)

(३) महंमदाचा स्वभाव.

(१) कांहीं प्रशंसनीय गुण

त्याला निःसंशय परमेश्वराचा साक्षात्कार झाला होता. तो सर्व शक्तिमान् ईश्वरावरील आपल्या अढळ—श्रद्धेच्या जोरावर एका सामान्य व्यापाऱ्याचा एक अद्वितीय धर्मगुरु झाला. त्याला

प्रार्थना हेंच जीवनसर्वस्व वाटत असे; आणि आपल्या अनुयायांनाही त्यानें प्रभुप्रार्थनेचाच उपदेश मुख्यतः केला आहे. ह्या बाबतींत त्याच्या अनुयायांनीं त्याची आज्ञा आश्चर्यकारकरीतीनें पाळली आहे.

धर्मध्येयाविषयी निरतिशय श्रद्धा ही महंमदाची एक विशेषता होती. त्यानें धर्माकरता अनेक वेळ आपला प्राण धोक्यांत घातला. ईश्वर हा कर्तुमकर्तुं शक्तियुक्त आहे, ही गोष्ट त्याचे अनुयायी अत्यंत एकनिष्ठपणानें आजपर्यंत मानीत आले आहेत.

> " ईश्वर माझा साहाय्यकर्ता आहे. माझा त्याच्यावरच आधार आहे. मी त्याला शरण आहे." (११. ९०)
>
> " अल्लावर विश्वास ठेव. अल्ला रक्षण करणारा असल्यावर इतरांची जरूर काय ? (४–८३; १४:३)
>
> " आम्ही मानवाला उत्पन्न केलें, तेव्हां त्याचें मनोगत आम्हाला चांगलें कळलें; कारण आम्ही खुद्द त्याच्या रक्तवाहिन्यांपेक्षांही त्याच्या जवळचे आहोंत. (५०:१५; से. बु ई. ९:२४२–२४३)

नेता ह्या दृष्टीनें महमंद ही व्यक्ति अत्यंत आकर्षक होती. त्याची संघटना–शक्ति अजब होती. आपापसांत लढणाऱ्या अरबांच्या अनेक जाति नव्या धर्माच्या भूमिकेवर त्यानें एकत्रित केल्या. धर्माच्या सूत्रानें अजूनही त्याचे अनुयायी एकत्र ग्रथित झालेले आढळतात.

> " श्रद्धाळु अनुयायांना गुरु महमंद स्वतः त्यांच्या शरीरापेक्षाही जवळ आहे. " (३३: ६)

" ज्यांनीं ईश्वरावर विश्वास ठेवून त्याच्याकरतां घरदार सोडलें व सर्वस्वावर पाणी सोडलें, अथवा ज्यांनीं गुरु महमंदाचे अनुयायी होऊन त्याला मदत केली, त्यांचा परस्पर स्नेहसंबंध असलाच पाहिजे. (८: ७३ रॉडवेल ३८१)

(२) त्याचे कांहीं निंदास्पद अवगुण :–

कित्येक प्रसंगीं जरी तो दयाशील होता, तरी कित्येक प्रसंगीं त्यानें खुनशीपणाही दाखविला. त्यानें ज्यू लोकांवर स्वतःच्या ग्रामबंधूंवर (मक्केच्या लोकांवर) आणि कोरीश नांवाच्या स्वतःच्या जातीच्या लोकांवर सूड उगविला आणि तो येवढ्याचबद्दल कीं, या सर्वांनीं त्याला ' धर्म गुरु ' म्हणून स्वीकारण्याचें नाकारलें. महमंद हा लढाऊवृत्तीचा असल्यानें साहजिकच त्याच्यांत अरेरावीपणा फार होता. मुसलमानेतर लोकांवर जुलूम करायला मुळींच हरकत नाहीं असें त्यांचें मत होतें.

" लढणें हा तुमचा धर्म आहे." (२, २१२ से. बु. ई. ६–३१)

" त्यांना (मुसलमानेतरांना) आपल्याशीं द्रोह करतां येऊ नये व चोहोंकडे परमेश्वराचें धर्मराज्य व्हावें, एवढ्याकरता जरूर त्यांच्याशी लढा. (८.४० से. बु. ई. ६–१६७)

" काफराशीं—नास्तिकांशी—अवश्य लढा. ते शरण येऊन आपल्या हातांनीं खंडणी देऊ लागेपर्यंत त्यांच्याशी लढा. ते दांतीं तृण धरीपर्यंत त्यांच्याशी लढा. (९.२९ से. बु. ई. ६-१७६-१७७)

> "परमेश्वराचा पक्ष घेऊन लढणाऱ्यांवर तो प्रेम करतो." (६१-४ से. बु. ई. ९-२८१)
>
> नास्तिक व ढोंगी लोकांशीं निकरानें लढा. त्यांच्याशी कठोरपणानें वागा. (६६-९; से. बु. ई. ९-२९२) आपल्या अनेक बायकांशीं वागण्याच्या त्याच्या पद्धतीमुळें तो कित्येकप्रसंगीं मोठ्या पेचांत पडला. (से. बु. ई. ६: २९; ९: २९०-२९१ म्यूरकृत जीवन—चरित्र २९०-२९१; ४२६-४२८)

पण ह्या सर्व गोष्टी त्याच्या सध्याच्या अनुयायांना मुळींच गैर वाटत नाहींत. (अल्ली यांचें 'पवित्र कुराण' पृष्ठ १९९-२००, १०९०—१०९२) तरीपण येथें हें स्पष्ट सांगणें भाग आहे कीं, ईश्वराच्या सहाय्यानें आणखी जास्त व चांगल्या बायका मिळण्याची आशा वाटत असेल, तर आपल्याला नावडत्या असणाऱ्या बायकांना धर्मसंस्थापकानें खुशाल सोडून द्यावें," असें इस्लामखेरीज दुसऱ्या कोणत्याही धर्मांत प्रतिपादिलेलें नाहीं. पहा:—

> "कदाचित् असेंही कशावरून नसेल कीं, तुझ्याशी काडी मोडून तुला सोडून दिल्यावर त्याला ईश्वर तुझ्यापेक्षांही जास्त चांगल्या बायका देईल; त्या नवीन मिळालेल्या बायका खऱ्या मुसलमान, भक्तियुक्त अन्तःकरणाच्या, उपास करणाऱ्या, देवपूजा करणाऱ्या अशा असतील; त्या अनेक पुरुषांच्या सहवासांत येऊनही कुमारिका राहिलेल्या असतील!! (६६:५; से.बु. ई. ९:२९१)

" त्यानें झैद या नांवाच्या आपल्या दत्तक मुलानें सोडून दिलेल्या बायकोशी (झैनाब हिच्याशी) लग्न लावलें; आणि या कृत्याचें समर्थन करण्याकरता, लोकांना असें सांगितलें कीं, " मी असें करावें याविषयीं अल्लानें मला खास आज्ञा केली आहे. "

" अल्लाच्या भक्तानीं आपल्या दत्तक मुलांच्या बायकांशीं लग्न लावण्यांत कांहींच गुन्हा नाहीं; येवढेंच कीं, त्या बायकांची (त्यांना सोडण्याची) त्या मुलांनीं योग्य व्यवस्था केली असली म्हणजे झालें. शिवाय परमेश्वराची आज्ञा पाळल्या-शिवाय गत्यंतरच नाहीं. जेथें प्रत्यक्ष परमेश्वरानें अमुक एक करायची परवानगी दिली आहे, तेथें ती गोष्ट करण्यानें दोष लागणें शक्यच नाहीं. मुसलमानानें चारांच्या वर बायका करता कामा नये, असा त्यानें निर्बंध घालून दिला. (४:३) तरीपण हा निर्बंध त्यानें स्वतःच पाळला नाहीं व खास परमेश्वरी आज्ञेपुढें नाइलाज आहे, असें त्या गोष्टीचें त्यानें समर्थन केलें.

" हे धर्माचार्या! ज्यांच्या पोटापाण्याची तूं व्यवस्था लाव-शील त्या बायकांशीं लग्न लावण्याची, परमेश्वराचे कृपेनें तुला जी लूट मिळते त्यांत तुझ्या हातीं आलेल्या दासींचा स्वीकार करण्याची, तसेंच तुझ्याबरोबर मदी-नाला पळून आलेल्या तुझ्या मावस बहिणी, आतेबहिणी व चुलत बहिणी यांच्याशीं लग्न करण्याची, अथवा अल्लावर विश्वास ठेवणारी कुणीही स्त्री तुझ्याकडे ' माझ्याशी लग्न करा ' म्हणून आली असतां, व तुझी

तिच्याशीं लग्न करण्याची इच्छा असतां तिचाही पत्नी म्हणून स्वीकार करण्याची, आम्ही तुला सदर परवानगी देतों. मात्र हा हक्क माझ्या भक्तांपैकीं फक्त तुलाच दिलेला आहे. (३३:४९; तसेंच कविता ५१; व रॉडवेल पृष्ठ ४३९)

४ महंमदाविषयीं पूज्यभाव

कुराणांत अशीं कांहीं वाक्यें आहेत कीं, त्यांत महंमद आपल्या स्वतःविषयीं अगदीं नम्रपणानें बोलत आहेसें दिसतें. आपल्या पूर्वआयुष्यांत त्यानें सुमारें बाराहून जास्त वेळा स्वतःला एक यःकश्चित् सामान्य मनुष्य म्हणवून घेतलें आहे. मला एक निरोप्या म्हणून ईश्वरानें पाठविलें आहे, असेंही त्यानें स्वतःविषयीं म्हटलें आहे.

" महंमद हा मात्र एक निरोप्या आहे. " (३:१३)

" तुम्ही ईश्वराला भीत जा असा तुम्हाला इशारा देण्याकरितां पाठविलेला तुमच्यांतलाच मी एक माणूस आहे. " (७:६१)

" मी सडेतोड बोलणारा एक इशारेवाला आहे. " (१५:८९ रॉडवेल ११६) तसेंच ५:२२; १०:२; १७:९५; १८:११०; २२:४८; २५:५८; २७:९४; ३८:३; ६५,७०; ४६:८, ३०; २२; ५१:५०-५१; ६७:२६; ७९:४५ इत्यादि. दोन कवितेंत तर त्याला " निरक्षर धर्मगुरु " असें म्हटलें आहे. अर्थात् तो अल्लाचा निरोप्या आहे असेंही म्हटलें आहे. (७:१५६, १५८) निदान पांच वेळां त्यानें अल्लाची क्षमा मागावी

अशी त्याला आज्ञा केली आहे. (४:१०६; ४०:५७; ४७:२१; ४८:२; ११०:३) " तूं सामान्य मनुष्य नसून ईश्वराचा प्रेषित असशील, तर ह्या गोष्टीची खात्री पटविण्याकरतां तूं कांहीतरी चमत्कार दाखीव, असें त्याला लोकांनीं आव्हान केलें असतांही " माझ्यांत चमत्कार करून दाखविण्याचें सामर्थ्य अगदीं नाहीं, " असें त्यानें सरळ कबूल केलें. (६:१०९; १७:९२-९८; २०:३,५,१०; २९:४९)

पण इतर अनेक कवितांतून महंमदाचा व अल्लाचा निकट संबंध असल्याचें सांगितलें आहे; आणि महंमदाची आज्ञा पाळणें म्हणजे अल्लाला शरण जाण्यासारखें आहे, असेंही म्हटलें आहे. (३:२८-२९; ४:१७-१८,६२, ८२; ९:१-१६,६६,७२,७५,८१,९१;२४:४६-६२;३३ १२, २२,२९,३३,३६; ४९:१,१५;५७:७-२८) कालांतरानें मात्र महंमद ही एक अतिमानुष व्यक्ति आहे असा समज झाला. मीरखंद यानें पंधराव्या शत-कांत महंमदाचें एक जीवन चरित्र लिहिलें आहे, त्यांत त्यानें केलेल्या चमत्काराचे वर्णनांत पन्नास पानें खर्ची पडलीं आहेत.

" महंमद हा धर्मगुरु म्हणून जन्माला येण्याच्या पूर्वी अस्तित्वांत होता, असें खुद्द महंमदाच्या सांगण्यांत केव्हांही आलें नाहीं. तो पूर्वजन्मींही विद्यमान होता असें कट्टर सनातनी मुसलमानही मानीत नाहींत. तसेंच दुस-ऱ्यांच्या उद्धाराचे बाबतींत महंमद रदबदली करूं शकतो

असेंही ते समजत नाहींत, शिवाय महंमदाचे थडगे अथवा खुद्द महंमद ही व्यक्ति ह्यांची पूजा करावी असेंही त्यांनीं कधीं म्हटलेले नाहीं, इतकें असूनही शिया व सुनी ह्या दोन्हीही पंथांतील लोक "महंमद ह्या धर्मगुरु म्हणून जन्मण्यापूर्वीं, इतकेंच नव्हे तर, सृष्ट्युत्पत्तीपूर्वींही "ज्योतिःस्वरूपा"नें विद्यमान होता," ह्या सांप्रदायिक कथनावर विश्वास ठेवतात. इतकेंच नव्हें तर, महंमद संपूर्ण पापरहित असून त्याचें नांवांत उद्धार करण्याचें व अनुग्रह करण्याचें सामर्थ्य आहे, असेंही ते मानतात. (जे. एल. बार्टन कृत 'इस्लामचा खिश्चनदृष्टया अभ्यास' या पुस्तकातील पृष्ठ. १३० पहा; तसेंच डी. बी. मॅकडोनाल्ड "इस्लामचें स्वरूप" पृष्ठ ९७-१०० पहा. शिवाय अंड्रेकृत 'डाय परसन महमदस्' पृष्ठ ९२ ते २९० पहा)

५ इस्लामांतील धर्मग्रंथ—

आमच्या धर्मसंस्थापकापुढें ईश्वरानें आमचे धर्मग्रंथ प्रकट केले असें घोषणापूर्वक सांगण्याचे दृष्टीनें हा धर्म अपूर्व खराच. कुराणांतील मुख्य वक्ता 'अल्ला.' कधीं कधीं कुराणांत अल्ला स्वतःच महंमदाला उद्देशून बोलत आहे, तर कधीं माझा प्रतिनिधी म्हणून तूं बोल' असें अल्ला महंमदाला सांगत आहे.

पण प्रचलित मान्यता कांहींही असली तरी ऐतिहासिक दृष्ट्या पाहता असें दिसतें कीं, हल्लीं आपल्याला उपलब्ध असलेल्या कुराणांतील एकही शब्द खुद्द महंमदानें लिहिलेला नाहीं. महंमदाच्या मरणानंतर एकावर्षांतच महमदामागून त्याच्या आचार्यपीठावर बसलेल्या अबू बेकरनें आपल्या आद्यगुरूचीं

जीं जीं वचनें चांगलीं स्मरणांत असतील अथवा गुरूच्या पट्ट-शिष्यांनीं जीं वचनें जतन करून ठेवलीं असतील, त्या सर्वांचा एक संग्रह करण्याची आज्ञा केली. महंमदाच्या मरणानंतर अकराबारा वर्षांनीं महंमदाचीं म्हणून संगृहीत केलेल्या वचनांत इतकीं पाठांतरें घुसलीं व इतका घोळ माजला कीं, उस्मान ह्या तिसऱ्या खलीफानें ह्या संग्रहग्रंथाचें पुनः संस्करण करविलें, व जुन्या आवृत्तीच्या प्रती नष्ट करून टाकल्या. एवंच हल्लींचें कुराण हा द्वितीय आवृत्तीतील ग्रंथ आहे आणि ही कुराणाची द्वितीय आवृत्ति ' इस्लाम धर्मानुयायांत खिश्चन व ज्यू धर्मांतल्या लोकांप्रमाणें धर्मग्रंथाच्या प्रामाण्याचे बाबतींत मतभेद होऊं नये,' या उद्देशानें काढण्यांत आली. (रॉडवेल " कुराण " अरबी कुराणाचें भाषांतर १; म्यूरच्या चतुर्भागात्मक जीवन चरित्रांतील भाग १ पृष्ठ १२)

साहित्यिकटीकेच्या दृष्टीनें पाहतां, असें दिसतें कीं, कुराणांतील उपदेशवाक्यें महंमदच्या तोंडून बाहेर पडण्यापूर्वी त्याच्या मनांत अनेक ठिकाणची विविध प्रकारची सामग्री गोळा झालेली होती. उदाहरणार्थ, अरबी लोकांतील कांहीं सांप्रदायिक समजुती व तत्कालीन लोककथा कुराणांत घुसल्याचें दाखवून देतां येईल. कांहीं गोष्टी झोरास्ट्रिन धर्मांतून कुराणानें घेतलेल्या आहेत. उदाहरणार्थ, राक्षस, देव, निर्णयदिन, मृतात्म्यांचें पुनरुत्थान वगैरे बायबलाच्या जुन्या करारांतून आढळणाऱ्या कांहीं प्रसंगांचे व व्यक्तींचे उल्लेख कुराणांत सांपडतात. ज्यूलोकांच्या 'तालमड' या ग्रंथांतल्या पांडित्यपूर्ण लेखांचे कांहीं अवशेष कुराणांत सांपडतात. नव्या करारांतील धर्माचार्य ' इन्‌जिल ' व खुद्द खिस्तीधर्म

यांचा अनेक ठिकाणीं निर्देश कुराणांत केलेला आहे. मेसीआचा निर्देश निदान आठ ठिकाणीं केलेला कुराणांत आढळतो, आणि जीझस ख्राइस्टचा उल्लेख तर त्यांत पंचवीस वेळा आला आहे. याशिवाय मौजेची गोष्ट ही आहे कीं, अरबी भाषेंतील अहमद हा शब्द (महंमद या शब्दाशी समानार्थक) व ग्रीक भाषेंतील 'पॅराक्लेट' हा शब्द या दोहोंत बरेंच अर्थसाम्य आहे; आणि जॉन १४:१६; १६:७,१२-१४ या स्थळीं तर ख्रिस्तीधर्मसंस्थापकानें इस्लामधर्माचा संस्थापक भविष्यकाळीं नक्की अवतरणार असें बिनचूक भविष्य केलें असल्याचें लिहिलें आहे.

> "मेरीचा पुत्र जीझस म्हणाला, "हे इस्राएलच्या मुलांनो ! मी तुमच्याकरतां प्रभूकडून प्रेषित म्हणून आलों आहे. पूर्वीच्या धर्मनियमांचें संस्करण करण्याकरतां, व अहंमद या नांवाचा एक प्रेषित माझ्या मागून येणार आहे, ही आनंदाची बातमी तुम्हाला सांगण्याकरतां, मी येथें आलों आहे." (६१:६; से. बु. ई. ९:२८१; रॉडवेल ४०५-४०६)

कुराणाचे एकंदर एकशे चौदा अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायाला 'सुरा' असें म्हणतात. नव्या करारापेक्षां हा ग्रंथ कांहींसा लहान आहे; आणि जुन्या कराराच्या तर एक चतुर्थांशाइतकाच तो भरेल. पहिल्या अध्यायांत प्रारंभीं एक छोटेसें स्तोत्र आहे. ह्या प्रसिद्ध स्तोत्राचें नांव 'फातिहा'. यानंतरचें अध्यायांची रचना लांबीच्या अथवा विस्ताराच्या क्रमानें केलेली आहे. म्हणजे प्रत्येक अध्याय उत्तरोत्तर लहान होत गेला आहे. पहिल्या अध्यायांत २८६

चांगले व वाईट असे दोन्ही प्रकारचे आहेत. (१९:–१२०; ७२:११) ह्यांच्यापैकीं कांहीं अल्लाला शरण जाऊन मुसलमान झाले आहेत. (७२:१३-१४) ह्यांतील एका आत्म्याला दुष्टात्मा असें म्हणतात. कुराणांत ह्याला विशेष नांव " शैतिन " असें दिलें आहे. हिब्रूभाषेंतील सैतान ह्या शब्दापासून हा शब्द निघाला आहे हें उघड आहे. ह्याला दुसरें नांव ' इब्लिश ' असें आहे. हा शब्द ग्रीक ' डायबोलोस ' ह्या शब्दापसून निघाला आहे. मनुष्यमात्रांना मोह पाडणारा हा प्राणी कुराणांतील एक महत्वाची व्यक्ति आहे. ह्याच्याबरोबर ह्याच्यासारखेच बंडखोर प्रवृत्तीचे " शयातिन " नांवाचे साहाय्यक प्राणी आहेत.

(३) कुराणावर विश्वास.

अल्लानें अनेक ग्रंथ प्रकट केले आहेत. (२९:४५; ४२:१४) ह्यापैकीं हिब्रू " तोरा " " मोझेसला प्रकट झालेलें तौरात " धर्मशास्त्र; सामगीतें, डेव्हिडचे ' झाबूर ' एव्हँजेल, जीझसचें ' इन्जिल ' आणि शेवटीं महंमदाला प्रकट झालेलें कुराण हे सर्व ग्रंथ ईश्वरानें प्रकट केलेले ग्रंथ-अपौरुषेय ग्रंथ-मानले जातात.

(४) अल्लाच्या प्रेषितांवर विश्वास.

एकंदर अठ्ठावीस प्रेषितांची नांवें कुराणांत आलेलीं आहेत. ह्यापैकीं बावीस नांवें जुन्या करारांत आलीं

ग्रंथ मानतात. यांतील मतें ईश्वरप्रेरित असून यांतील प्रत्येक अक्षर स्वयंसिद्धार्थ व सत्य आहे असें हे लोक मानतात.

> “ तरीपण कुराणाचा अर्थ अल्लाखेरीज कुणालाच कळायचा नाहीं. ” (३:५)

ऐतिहासिक दृष्ट्या अरबी साहित्यांत कुराणाइतका प्रभावशाली ग्रंथ दुसरा कोणताही नाहीं, असें निश्चितपणें सांगतां येतें. कुराणानंतर बहुधा असा एकही ग्रंथ अरबी साहित्यांत निर्माण झाला नाहीं कीं, ज्यांत कुराणाचा उल्लेख आला नाहीं अथवा त्यांतून अवतरणें घेतलीं नाहींत. कैरो येथील अल-अझहार या आधुनिक मुसलमान विद्यापीठांत कुराण हें मुख्य पाठ्य पुस्तक म्हणून नेमिलें आहे.

३ ईश्वरविषयक कल्पना; अल्ला हाच परमेश्वर.

परमेश्वर एक आहे हा मुसलमान धर्माचा मुख्य संदेश. तरीपण स्वत:विषयीं बोलताना कुराणांत अल्लानें बहुवचन वापरलें आहे. ‘ आम्ही ’ ‘ आम्हाला ’ ‘ आमचे ’ असेच प्रयोग सर्वत्र आढळतात. जुन्या करारांत (जेनसीस १:२६) एलोहिम या ईश्वरानें स्वत:विषयीं असाच बहुवचनी प्रयोग केलेला आहे. हल्लींच्या काळीं कित्येक राजे स्वत:विषयीं ‘ आम्हीं ’ असा प्रयोग करतात; व संपादकीय ‘ आम्ही ’ चा प्रयोग तर प्रसिद्धच आहे. तरीपण ह्या ‘ आम्ही ’ चा अर्थ बहुवचनी मात्र करायचा नाहीं हें उघडच आहे. परमेश्वर एकच असून त्याचें नांव अल्ला हें आहे, हीच या धर्माची मुख्य शिकवण.

ऐतिहासिक दृष्ट्या ही परमेश्वराद्वैतवादाची कल्पना महंमदाला तीन प्रकारें सुचली असावी असें दिसतें. एकतर त्याच्या अंतर्दृष्टीला विश्वांत ईश्वर एकच आहे, या सत्याची प्रतीति झाली असावी; दुसरें, यहुदीधर्मातील ईश्वराद्वैताच्या कल्पनेचाही त्याच्यावर प्रभाव पडला असावा; तिसरें, त्याला भेटलेल्या सीरियन ख्रिश्चन लोकांच्या "त्रिमूर्ति" च्या अडाणी कल्पनेविरुद्ध त्याच्या मनानें बंड करून ही परमेश्वराद्वैताची कल्पना काढली असावी. कुराणांत सुमारें बारा ठिकाणी असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, 'परमेश्वरानें एका मर्त्य स्त्रीशी समागम केला व त्यापासून ईश्वराचा पुत्र निर्माण झाला' ही कल्पनाच अत्यंत वेडगळपणाची आहे. तसेंच, एकच परमेश्वराचे त्रिमूर्तीच्या रूपानें तुकडे पाडलें जावें ही कल्पनाही कुराणाला हास्यास्पद वाटते. (२:११०; ४:१६९; ५:७६-७७; ६:१००,१०२; १०:६९; १७:१११; १८:३-४; १९:३६-३९; ९१-९३; २१:१९-३३; २३:९३; ३७:१५१-१६३; ३९:२-८; ७२:३-४)

सर्वशक्तिमान् व दयाळु परमेश्वराचें कुराणांत कांहीं ठिकाणीं केलेलें उदात्त वर्णन यहुदी व ख्रिश्चन लोकांनाही संपूर्ण मान्य होण्यासारखें आहे. (२:२७; ६:९६-१००; १४:३७; ४६:३२; ५०:३७ ५५:२-१२) कुराणांत ईश्वराचें सर्वांत उत्कृष्ट वर्णन 'सिंहासनकाव्य' अथवा 'शक्तिकाव्य' ह्या प्रसिद्ध काव्यांत आलेलें आहे. हें काव्य मशिदीवर कोरण्याचा प्रघात आहे. (२:२५६)

मुसलमानी धर्मसाहित्यांत अल्लाचे अनेक महत्त्वाचे गूण एकत्र केले असून त्यांचें वर्गीकरणही केलेलें आढळतें.

एकमेव—संपूर्ण अद्वैत—ह्या गुणाचा वारंवार पुनरुच्चार केला आहे (३:१,४,१६; ६:१०१-१०२; १६:१-३; २१:२२; २५:१-२; ३७:४-५; ७३:९; ११२: १-४)

सर्वसाक्षी (६:५९, १०३; १८:२५)

सर्वश्रोता (२:२५९; ४४:५)

सर्ववक्ता (१८:१०९; ३१:२६)

सर्वज्ञ (२:२७;६:५८;३१:२२;३३:५४;५८:७-८);

सर्वसंकल्प—अचिंत्य व अनिरुद्ध (६:३५; १३:३३; १६:२,९; ७६:३१; ८५:१६)

सर्वशक्तिमान् (२:१९; २:१५९; ५५:१६-१७)

नव्व्याण्णव मण्याची माळ घेऊन भाविक मुसलमान अल्लाच्या नव्व्याण्णव नामांचा जप करतात. या नामांतील अत्यंत प्रसिद्ध, व कुराणांतील पहिल्या तीस अध्यायांत आलेलें नाम ‘ रब्ब ’ (प्रभु) हें आहे. याखेरीज खालील नामेंही अल्लाविषयीं कुराणांत वारंवार योजिलेलीं आढळतात:—एक, शक्तिमान्, समर्थ, राजा, आक्रमणशील, शासक, संहारक, योजक, दयाळु, अनुकंपाशील, क्षमाशील इ०. अल्ला हा प्रेम करणारा आहे असेंही म्हटलें आहे; पण त्याचें प्रेम—

“ सज्जनावर ” (२:१९१)

“ महंमदाच्या अनुयायांवर ” (३:२८)

“ निर्गर्वी व निर्दम्भी मनुष्यावर ” (४:४०)

" खऱ्या श्रद्धाळु व सदाचरणी लोकांवर " (१९:९६)

" परमेश्वराचा पक्ष घेऊन लढणाऱ्या लोकांवर" (६१:४)च असतें. परमेश्वर हा दुष्टांचें शासन व सज्जनांचें रक्षण करतो असा संदेश महंमदानें लोकांना दिला. अल्ला शरण आलेल्याना क्षमा करतो व त्यांच्यावर अनुग्रह करतो अशी त्यानें वारंवार अल्लाची स्तुति केली आहे. ईश्वराचे ठायीं दोषांचा सर्वथैव असंभव आहे असें कुराणांत स्पष्ट सांगितलें आहे. (२:२४; ४:४४; २८:१४)

पण याहीपेक्षां, अल्लाचे ठायीं कर्तुमकर्तुं शक्ति आहे, असें वारंवार स्पष्ट सांगितलें आहे.

" त्याच्या इच्छेला येईल त्याला तो मार्ग दाखवितो " (२: १३६; २२:१६; २४:३५,४५; २८:५६;)

वरीलप्रमाणें असेंही स्पष्ट विधान कुराणांत आढळतें, कीं, अल्ला कित्येक लोकांना भलत्याच मार्गाला लावतो. (१३:३३; १४:३२; ४०:३५; ३६, ७४; ६१:५) तसेंच पहिले तर कुराणांत असें कितीतरी ठिकाणीं स्पष्ट सांगितलें आहे कीं, अल्ला हा सन्मार्गदर्शीही आहे व विमार्गदर्शीही आहे; तो निग्रहही करतो व अनुग्रहही करतो; त्याची इच्छा अचिंत्य व अकथनीय अशी आहे. (३:१२४; ५:४४; ६:३९, १२५; १३:२७; १४:४; १७९९; १८:१६; ३५:९; ३९:२४; ७४:३४) एकंदरीनें अल्ला हा ऐश्वर्यशाली, श्रीमान्, अप्रतिहत असा विश्वसम्राट् आहे अशी कुराणाची कल्पना आहे. थोडक्यांत म्हणजे एखाद्या अरब सरदाराला जगांतील अत्यंत उच्च स्थान दिल्यावर तो जसा होईल, तसाच अल्ला असल्याचें कल्पिलें आहे.

या धर्माच्या अनुयायांना मोक्ष कसा मिळेल याचें उत्तर 'इस्लाम' या धर्माच्या सुटसुटीत नांवातच मिळतें. इस्लाम म्हणजे 'परमेश्वराला शरण जाणें' हाच ह्या धर्मानें सांगितलेला मोक्षाचा उपाय.

७ साधारणपणें कोणीही समजदार मुसलमान घेतला, तरी त्याला आपल्या धर्मांतील खालीं सांगितलेलीं सहा तत्त्वें सहज व निश्चयपणानें सांगतां येतील:—

(१) अल्ला हा एकच परमेश्वर.

इस्लाम धर्मांतील अत्यंत प्रमुख मत म्हणजे एकेश्वरवाद. ह्या मताचा उल्लेख कुराणांत वारंवार येतो. मुसलमानाच्या धर्ममतांपैकीं ह्या मताला अग्रस्थान देण्यांत येतें.

(२) देवदूतांवर विश्वास.

मनुष्यांना क्षमा करण्याबद्दल अल्लाशी रदबदली करण्याचें काम हें देवदूत करतात. (४०:७-९, ४२:३) यापैकीं आठ देवदूत अल्लाच्या सिंहासनाचें रक्षण करतात; (६९:१७) एकोणीस देवदूत नरकावर पहारा करतात. (७४:३०) ह्यांच्यापैकीं प्रमुख देवदूताचें नांव गेब्रिएल. (२:९१; १६:१०४; ५३:५१६; ६६;४; ८१:१९) ह्यांला पवित्र आत्मा असेंही म्हणतात. (२:८१) ह्याशिवाय मनुष्य व देवदूत यांचेमधील वर्गांत जिन्न (इंग्लिश-जेनी) म्हणून आत्मे आहेत. ते

चांगले व वाईट असे दोन्ही प्रकारचे आहेत. (१९:–१२०; ७२:११) ह्यांच्यापैकीं कांहीं अल्लाला शरण जाऊन मुसलमान झाले आहेत. (७२:१३-१४) ह्यांतील एका आत्म्याला दुष्टात्मा असें म्हणतात. कुराणांत ह्याला विशेष नांव "शैतिन" असें दिलें आहे. हिब्रूभाषेंतील सैतान ह्या शब्दापासून हा शब्द निघाला आहे हें उघड आहे. ह्याला दुसरें नांव 'इब्लिश' असें आहे. हा शब्द ग्रीक 'डायबोलोस' ह्या शब्दापसून निघाला आहे. मनुष्यमात्रांना मोह पाडणारा हा प्राणी कुराणांतील एक महत्वाची व्यक्ति आहे. ह्याच्याबरोबर ह्याच्यासारखेच बंडखोर प्रवृत्तीचे "शयातिन" नांवाचे साहाय्यक प्राणी आहेत.

(३) कुराणावर विश्वास.

अल्लानें अनेक ग्रंथ प्रकट केले आहेत. (२९:४५; ४२:१४) ह्यापैकीं हिब्रू "तोरा" "मोझेसला प्रकट झालेलें तौरात" धर्मशास्त्र; सामगीतें, डेव्हिडचे 'झाबूर' एव्हँजेल, जीझसचें 'इन्जिल' आणि शेवटीं महंमदाला प्रकट झालेलें कुराण हे सर्व ग्रंथ ईश्वरानें प्रकट केलेले ग्रंथ-अपौरुषेय ग्रंथ-मानले जातात.

(४) अल्लांच्या प्रेषितांवर विश्वास.

एकंदर अठ्ठावीस प्रेषितांची नांवें कुराणांत आलेलीं आहेत. ह्यापैकीं बावीस नांवें जुन्या करारांत आलीं

आहेत. ह्यापैकीं अडॉम, एनॉक, मेथ्यूसाले, नोहा, ॲब्राहॅम, लॉन, इस्माएल, ऐझाक, जेकब, मोझेस, डेव्हिड, सालोमन, एलिजा, एलिशा, व जोना हे प्रमुख प्रेषित अथवा धर्माचार्य होत. झेचारिया, जॉन धि बॅप्टिस्ट व जीझस हे तीन धर्माचार्य (प्रेषित) नव्या करारांतून घेतले आहेत. बायबलांत नांव नसलेला इस्लामचा प्रेषित 'शिकंदर' बादशाह हा होय. सर्वांत शेवटचा व सर्वश्रेष्ठ प्रेषित महंमद. ह्याच्या आगमनाची भूमिका तयार करून त्याच्यावर धर्मकार्य सोंपविण्याचें काम ह्या सर्व प्राचीन धर्माचार्यांनीं केलें.

५) अन्तिमनिर्णय, स्वर्ग व नरक ह्याविषयींच्या कल्पना. जगाच्या प्रलयाच्यावेळीं ईश्वरापुढें सर्वांनीं उभे राहण्याच्या दिवशीं सर्व मृतात्मे उठतील; (५०:४१) व मग तुतारी वाजेल; व त्यासरशी सर्वजण प्रभुच्यापुढें पटापट जाऊन उभे राहतील. अल्लाच्या अन्तिम निर्णयाचा हा महत्वाचा दिवस, व ईश्वराचें अद्वैत, ह्या दोन कल्पना महंमदाच्या उपदेशांत अथपासून इतिपर्यंत सर्वत्र आढळतात. आज संशोधकांनीं अत्यंत प्राचीन म्हणून ठरविलेल्या दोन धर्मग्रंथांत ह्या भावी निर्णय–दिनाचा उल्लेख आहे. (७४:८-१०; ९६:८) निदान ८५२ कवितेंत महंमदानें, पूर्वीच्या हिब्रू धर्माचार्याप्रमाणें " अन्तिम निर्णय-दिन नजीक येत चालला आहे; त्यादिवशीं तुमच्या पापाबद्दल

तुमचे शासन व पुण्याबद्दल तुमच्यावर ईश्वराचा अनुग्रह निश्चितपणें होणार आहे," अशा तऱ्हेचा गंभीर इषारा त्यानें लोकांना घोषणापूर्वक दिला आहे. प्राण्यांच्या पुण्यपापांचें माप तोलण्याकरता कशा तऱ्हेचें तराजू स्वर्गांत वापरलें जाईल व त्यांत मोहरीच्या कणाइतकी सुद्धां चूक कशी होणार नाहीं ह्याचें विस्तृत व सूक्ष्म वर्णन कुराणांत आलेलें आहे. (७:५८;२१:४८;२३:१०३-१०५; १०१:६-८)

स्वर्गांतील अपूर्व विषयसुखाचा लाभ अल्लाच्या पुण्यशाली भक्तांना होणार असल्याचेंही कुराणांत सांगितलें आहे. स्वर्गांत सुंदर उद्यानें, स्वच्छ पाण्याच्या नद्या, नानाविध विषयसुख, सुग्रास भोजन, व आराम असल्याचें वर्णन निदान बारा ठिकाणीं कुराणांत आलें आहे.

" पुण्यशाली लोकांना स्वर्गाच्या बागांतून विहार करायला सांपडेल; त्याठिकाणीं प्रभूनें दिलेल्या वस्तूंचा ते उपभोग घेतील; त्यांना इतःपर नरकांतील यातनांची स्वप्नांतसुद्धां भीति नाहीं. "तब्येत संभाळून खा, प्या, व मजा करा; पलंगावर रांगेनें लोळत पडा; तुमच्या पुण्यकृत्यांचेंच हें फळ तुम्हाला मिळत आहे. आम्हीं तुमचीं हरिणाक्षींशीं लग्नें लावून देऊं. तुम्हाला पाहिजे असेल ते मांसादिक पदार्थ आम्हीं देऊं." असें प्रभु त्यांना सांगतो. (५२:१७–२२; से. बु. ई. ९:२४९)

" रमणीय उद्यानांत—सोन्याच्या पलंगावर.... ते यथेच्छ लोळत पडतील. त्यांच्या तैनातीला चिरयौवन पुरुष

सुंदर मद्यानें भरलेले प्याले घेऊन हजर राहतील. मनसोक्त दारू पिऊनही त्यांचें डोकें दुखणार नाहीं; अथवा ते झिंगून पडणार नाहींत. त्यांच्या पुण्यकृत्यांचें फळ म्हणून त्यांना पाहिजे तीं मधुर फळें, लुसलुशीत मांस, उज्ज्वल मौक्तिकाप्रमाणें तेजस्वी व टपोऱ्या डोळ्यांच्या सुंदर युवति त्यांना तेथें मिळतील (५६:१२–२३ से बु. ई. ९:२६३)

दुष्ट काफराना नरक ठेवलेलाच आहे. या नरकाचें भयानक चित्र कुराणांत अनेक ठिकाणीं काढलें आहे.

"पापी लोक नरकांत शिजत राहतील. तें स्थळ राहायला फारच खराब आहे." (१४:३४)

खरोखर आम्ही पाप्यांच्या करता एक अग्नि प्रज्वलित केला आहे. त्याच्या ज्वाळा त्या पाप्यांच्या अंगाला बिलगतील. 'ह्यांतून सोडवा हो,' म्हणून ते ओरडायला लागले तर त्यांच्यावर धातूच्या तप्तरसासारखें उकळणारे पाणी टाकून त्यांची तोंडे होरपळून काढतील. (१८:२८; से. बु. ई. ९:१७)

पाप्याला नरक हा ठरलेलाच आहे. नरकांत त्याला धड मरताही येत नाहीं व जगताही येत नाहीं. (२०:७६; से. बु. ई. ९:३९)

(६) ईश्वराच्या पूर्वकृत निर्णयावर विश्वास—

अल्लानें सर्व गोष्टी अगाऊच ठरवून ठेवल्या आहेत. श्रद्धाळु कोणी व्हावें, नास्तिक कोणी व्हावें हेंही त्यानें अगाऊच नक्की करून ठेविलें आहे. (१६:३८) ईश्वराच्या आज्ञेवांचून कुणालाही मरता यायचें

नाहीं. मरायची वेळसुद्धां त्यानें पूर्वीच लिहून ठेविली आहे.

" आपल्याविषयीं ईश्वरानें अगाऊ लिहून ठेवलेल्या गोष्टी-खेरीज इतर कांहींही घडायचें नाहीं." (९:५१; से. बु. ई. ६:१८०)

" ईश्वरानें त्यांना पूर्वीच मारून टाकलें आहे. तुम्ही निमित्तमात्र आहांत. ईश्वरानेंच त्यांना गोळ्या घालून ठार मारले आहे. गोळ्या घालून ठार मारणारे तुम्ही नव्हे (८:१७; से. बु ई ९:१३५)

८ प्रत्येक मुसलमानाचीं अवश्य कर्तव्यें.

ह्यांना ' इस्लामचे पंचस्तंभ ' असें म्हणतात.

(१) धर्मश्रद्धेचा उच्चार.

प्रत्येक मुसलमानाला धर्मश्रद्धेचा उच्चार प्रत्येक दिवशीं अरबीभाषेंतून करावा लागतो. या श्रद्धा-मंत्राला ' कलमा ' असें म्हणतात. त्या मंत्राचा अर्थ हा कीं:—

"अल्लावांचून ईश्वर नाहीं. महंमद हा अल्लाचा प्रेषित आहे'
(लाइलाह इल्लाल्ला महंमदुर्रसूलुल्लाह—हा मूळ मंत्र)

हा मंत्र कुराणांत सलग असा सांपडत नाहीं. पण त्याचे दोन अलग भाग वारंवार कुराणांत आले आहेत. (उदा० ४७:२१; व ४८:२९) केवळ हा मंत्र म्हटला तरी मुसलमान धर्माची दीक्षा घेतल्या-सारखें होतें.

(२) प्रार्थना:--

प्रार्थना हें अवश्य कर्तव्य असल्याचें कुराणांत वारंवार सांगितलें आहे. प्रत्येक मशिदीच्या मनोऱ्यावरून दिवसांतून पांच वेळ प्रार्थनेकरतां बोलावणें केलें जातें. सकाळ, दुपार व सायंकाळ ह्या तीन ठराविक वेळेला प्रार्थना करावी असें कुराणांत सांगितलें आहे. (११:११६; १७:८०-८१; २०:१३०; ३०:१६-१७; ५०:३८--३९) प्रार्थना करतांना मक्केकडे तोंड करावें लागतें.

" तुम्हीं कुठेंही असला तरी प्रार्थनेचे वेळीं तुमचें तोंड मक्केकडेच असलें पाहिजे. (२:१३९)

" दारूनें झिंगलेल्या स्थितींत प्रार्थना करूं नका; तुम्ही जी प्रार्थना कराल ती चांगली समजेल इतकें डोकें ठिकाणावर येई पर्यंत थांबत जा; स्त्रीच्या स्पर्शानें अथवा इतर रीतीनें दूषित झाला असता प्रार्थना करूं नका. (४:४६)

(३) दान--

धार्मिक मुसलमानांनीं ' दान केलेंच पाहिजे ' अशी कुराणाची स्पष्ट आज्ञा आहे. (२:४०; ६४:१६; ९८:४) मुसलमान धर्माच्या दीक्षाविधींत दानाचाही समावेश होतो. (९:५, ११)

" तुम्ही एखादी लूट मिळविली तर त्याचे प्रथम पांच भाग पाडा. नंतर त्यापैकीं पहिला भाग अल्लाचा म्हणून निराळा ठेवा; दुसरा भाग महंमदाच्या नांवानें

काढून ठेवा. तिसरा भाग आपल्या नातेवाईकांना द्या. चवथा पोरक्या मुलांना द्या व पांचवा भाग गरीबांना किंवा वाटसरूंना द्या (८:४२)

४) रमदान महिन्यांतील दिवसांत उपोषण करणें:—

श्रद्धाळु मुसलमानानो ! उपोषण हें धर्मकर्तव्य आहे. हें उपोषण रमदान महिन्यांत करावें. चंद्र पाहिला कीं उपास सोडावा; सकाळीं काळा व पांढरा दोरा एकमेकातून निराळे करता येण्याइतकें उजाडेपर्यंत खायला प्यायला हरकत नाहीं, नंतर मात्र रात्र पडेपर्यंत कडकडीत उपास करा. (२:१७९ १८३; रॉडवेल ३५)

(५) मक्केची यात्रा—

प्रत्येक मुसलमानानें जन्मांतून एकदातरी मक्केच्या यात्रेला गेलेंच पाहिजे, व तेथें गेल्यावर मशिदीभोंवतीं प्रदक्षिणा घालणें व काबा नांवाच्या काळ्या दगडाचें सातदा चुंबन घेणें, ह्याही गोष्टी केल्या पाहिजेत अशी प्रत्येक मुसलमानाला आज्ञा केलेली आहे. तरीपण, कांहीं कारणामुळें एखाद्याला मक्केच्या यात्रेला स्वतः जातां येत नसलें, तर त्यानें आपला बदली पाठविला तरी चालतो. यात्रेला अमुकच दिवसांत जायचें असें ठरलेलें आहे. यात्रेचा तपशीलवार विधीही ग्रंथांतून सांगितला आहे. (२:१८५,१९३-१९९)

“ आणि यात्रेची बातमी सगळीकडे जाहीर करा. प्रत्येकाला किडाकिडीत उंटावर बसून किंवा पायीं तुमच्या बरोबर येऊं दे.” (२२.२८)

" ज्याला ज्याला ह्मणून यात्रेला जाता येणें शक्य असेल त्यानें त्यानें जाणें हें त्यांचें कर्तव्यच आहे. (३:९१)

असें सांगतात कीं, गेल्या महायुद्धापासून एकही तुर्की मुसलमान हाजला (मक्केच्या यात्रेला) गेलेला नाहीं.

९ इस्लामचा इतिहास--

मरणसमयीं महंमदाला एकही मुलगा नव्हता. आपल्यामागें आपल्या पीठावर कोणी बसावें हेही त्यानें मरण्यापूर्वी नक्की केलें नव्हतें. महंमदानंतर अठ्ठावीस वर्षें त्याचे चार पराक्रमी मित्र एकामागून एक गादीवर बसले: त्यांपैकीं पहिला अबूबेकर ह्यानें महंमदाच्या वचनांचा संग्रह कराविला. दुसरा ओमर, ह्यानें सीरिया व इराण जिंकलें. तिसरा ओथमन, यानें कुराणाचें संस्करण करविलें, व व्यंजनयुक्त कुराणाच्या संहितेंत स्वरांची भरती केली. चवथा अली: हा महंमदाचा जांवई. ह्याचा खून झाल्यानंतर मुसलमान धर्मांत फूट पडून त्याचे दोन पंथ झाले. यापुढें निरनिराळ्या खलीफांच्या परंपरा सुरु होऊन त्यांचे एकमेकांशीं युद्ध सुरू झालें.

(१) इस्लाम धर्मांत राजकीय फूट—

ओमायद खलीफात (६६०–७५०) ह्यानें वंशपरंपरा गादीवर बसण्याची पद्धति दमास्कसमध्यें सुरू केली, व तरवारीच्या जोरावर उत्तर आफ्रिका व स्पेन ह्या देशांत इस्लाम धर्माचा प्रसार केला. पश्चिमेकडे

युरोपांत इस्लामचें आक्रमण भर वेगांत चालू होतेंच. ह्या आक्रमणाला स. ७३२ मध्यें फ्रान्समध्यें पाइटर्स अथवा टूर्सच्या लढाईंत चार्ल्स मार्टेल यानें थोपवून धरलें. महंमदाच्या मरणानंतर बरोबर शंभर वर्षांनीं अशा रीतीनें इस्लाम धर्माची प्रगति खुंटली.

अब्बासाइद खलीफात (७५०-१२५८). महंमदाच्या काकापासून (अबुल अब्बास) ह्याची परंपरा सुरु झाली, असें मानतात. मुसलमान खलीफांतील अत्यंत प्रसिद्ध खलीफा 'हरून अल्रशीद' ह्याच परंपरेंतील होता, असें म्हणतात. ह्याची राजधानी बगदाद हें शहर होय.

स्पेनमध्येंही (७५५ ते १२३६ पर्यंत) खलीफात चालू झाली. कोर्डोवा येथें त्याची गादी होती. तसाच एका मूरिश खलिफातीचा अधिकार ग्रानडा येथें (१२३८ ते १४९२) चालला. फातिमाईट खलिफातनें (९१० ते ११७१) इजिप्त व उत्तर आफ्रिकेंत आपला अंमल चालविला.

आटोमन तुर्कांनीं आपल्या खलिफातीची स्थापना १२९९ त केली. तुर्कांनीं सन १४५३ मध्यें कान्स्टँटिनोपल व १५१७ मध्यें इजिप्त सर केलें. त्यानंतर आज सहाशें वर्षें या दोन्ही ठिकाणीं मुसलमानी सत्ता चालू आहे. सन १९२२ मध्यें अंगोरा येथील तुर्कीराष्ट्रसभेनें कान्स्टँटिनोपल येथील सुलतानाला पदच्युत करून सर्व सत्ता आपले हातीं घेतली.

(२) इस्लाममधील पंथ उपपंथ—

ह्या बाह्य राजकीय फुटीबरोबरच इस्लामी धर्मांत अंतरथही फूट पडत चालली, व धर्ममतें व धर्मविधि ह्या बाबतींत एकमेकांहून अत्यंत भिन्न असे कांहीं पंथ अस्तित्वांत आले.

सुन्नी पंथ हा मुसलमानांतील मोठा धर्मपंथ. ह्या पंथांतील लोकांना पुराणमतवादी अथवा सांप्रदायिक म्हणता येईल. मूळ धर्मसंस्थापकापासून अखंड चालत आलेला मार्ग (सुन्न) च ग्राह्य असा ह्या पंथाचा आग्रह आहे. तुर्की मुसलमान बहुतेक सुन्नीपंथीय आहेत.

इस्लामच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, शिया हा पंथ ह्या धर्मांतून फार प्राचीन काळींच निघाला आहे. ह्या पंथांतील लोकांचें म्हणणें असें कीं, महंमदाचा खरा पहिला वारस अल्ली हाच मानला पाहिजे; कारण तो महंमदाच्या कुटुंबांतला होता. त्यामुळें महंमदाच्या गादीवर बसण्याचा अधिकार त्याचाच आहे. अल्ली व त्याचे दोन पुत्र हसन व हुसेन हे दोघेही धर्माकरिता मरणारे हुतात्मे होते, त्यांची शियापंथीय मुसलमान पूजा करतात. शिया पंथांतील मुसलमानांत आणखीही उपपंथ आहेत. इमाम (अल्लानें नेमलेले पुढारी) किती होते, अगदीं अलीकडचा महदी (ईश्वरानें मार्गाला लावलेला) कोण वगैरे बाबतींत मतभेद असल्यामुळें हे उपपंथ जन्माला आले. शिया पंथीय लोक मुख्यत: इराण व आफ्रिका ह्या ठिकाणीं आहेत. सर्वत्र ईश्वर आहे, ईश्वर भक्तिमार्गानेंच आकळिला येतो, परधर्मांविषयींही सहिष्णुता असावी वगैरे मानण्याकडे या लोकांचा कल आहे.

परधर्मांचा विशेषत: झोरास्ट्रियन धर्मांचा या पंथावर बराच प्रभाव पडला आहे.

सुफी पंथ हा मुसलमानांतील आणखी एक पंथ आहे. सुफी हे नांव या पंथाला पडण्याचें कारण ह्या पंथांतील लोक मूळ सूफ (=जाडीभरडी लोकर) चे कपडे वापरीत असत. शिया-पंथीय लोक असें मानतात कीं, परमेश्वराला मनुष्य अथवा इतर कसलेही रूप धारण करणें शक्य आहे. आतां ही कल्पना मूळच्या, ईश्वर हा जगाहून पर आहे असें मानणाऱ्या कट्टर मुसलमानांना भयंकर वाटणें जरी साहजिक आहे तरीपण, ईश्वरानें स्वतःच्या शरीरांत प्रवेश केला आहे व त्यामुळें एकप्रकारचा स्वर्गीय आनंद आपल्याला वाटत आहे अशा तऱ्हेचा अनुभव ह्या कट्टरांना कैक वेळ आला होता. असो. या शिया पंथीयांच्याही पुढें एक पाऊल जाऊन सुफी लोक असें मानूं लागले कीं, ईश्वर हा जगदुद्धारार्थ पृथ्वीवर अवतार घेतो. सर्वांभूतीं ईश्वर या कल्पनेकडे हे लोक पहिल्यापासूनच झुकत असल्यानें ते असें मानतात कीं, सामान्य मनुष्यही संयम व भक्ति यांच्यायोगानें ईश्वरसदृश होऊं शकतो. सुफीपंथीय लोक बहुतेक हिंदुस्तान व इराण येथें आढळतात. सुफीपंथांतील अत्यंत प्रसिद्ध पुरुष इराणचा महाभक्त जलालुद्दीन रुमी (१२०७-१२७३) हा होय. ह्याच पंथांत अत्यंत श्रेष्ठ धर्मसुधारक व इस्लामधर्मांतील विख्यात लेखक अल-गझली हा होऊन गेला. स. ११११ मध्यें तो वारला.

हल्लीं मुसलमानी धर्मांत एकंदर बहात्तर पंथ अथवा संप्रदाय आहेत. पंथ उपपंथ सुरू करणें हा अपराध आहे असें कुराणांत निक्षून बजाविलें असतांही धडधडीत त्याचे विरुद्ध ह्या धर्मांत अनेक पंथांचा सुळसुळाट माजला आहे.

" अल्लाची दोरी सर्वजण मिळून घट्ट हातांत धरा, पंथोपंथाच्या योगानें विस्कळित होऊं नका." (३:९८)

" ईश्वरानें इषारा दिला असतांही एकमेकांशी भांडून निरनिराळे पंथ पाडणाऱ्या लोकांप्रमाणें तुम्ही वागू नका." (६-१६०)

" धर्माची बळकट कांस धरा, व पंथ काढू नका. (४२:११)

१० इस्लामचें सामर्थ्य पुढील गोष्टींत आहे.

(१) जगांत एकच श्रेष्ठ ईश्वर असें जाहीर करून ह्या धर्मानें मूर्तिपूजेचा विरोध केला.

(२) ह्या जगाचा एक श्रेष्ठ शास्ता आहे अशी या धर्माची दृढ श्रद्धा आहे.

(३) ईश्वर हा दयाळु असून अनुग्रह करणारा आहे ही या धर्माची शिकवणूक.

(४) ईश्वरी इच्छेला सर्वस्वी शरण जाणें हें या धर्माचें तत्त्व आहे.

(५) जगाच्या अंतीं एक आन्तिम निर्णय-दिन येणार असून तो कुणालाही चुकविता येणार नाहीं, असें हा धर्म सांगतो.

(६) मनुष्यानें अहर्निश ईश्वराची प्रार्थना करावी, असें या धर्माचें आग्रहाचें सांगणें आहे.

(७) ह्या धर्माच्या उत्साही संस्थापकाचें चरित्र फारच स्फूर्तिदायक आहे.

(८) विश्वधर्म होण्याची ह्या धर्माची आकांक्षा.

(९) इतिहासावरून या धर्मानें स्वमतप्रसारार्थ परधर्मांवर जोराचें आक्रमण केल्याचें दिसतें.

(१०) ह्या धर्मांत अनेक पंथोपपंथ असूनही जबरदस्त एकी आहे.

११ इस्लाम धर्मांतील व्यंगें—

(१) अल्लाचा आडदांडपणा.

(२) पशुबळावर हा धर्म आधार ठेवतो.

(३) भीति व प्रसाद ह्या भावना उत्पन्न करण्यांत ह्या धर्मानें अतिरेक केला आहे.

(४) किस्मत् (नशीब) वर ह्या धर्माची श्रद्धा आहे.

(५) स्वर्ग व नरक ह्यांचीं ह्या धर्मांतील वर्णनें अत्यंत इंद्रियक्षोभकारी आहेत.

(६) हा धर्म स्त्रियांचा दर्जा अत्यंत हीन आहे असें मानतो.

(७) जगाच्या मोक्षासाठीं एखादा सामाजिक असा कार्यक्रम ह्या धर्मानें मुळींच सांगितलेला नाहीं.

(८) जिन्न प्राणी (दुष्टात्मे) यांत प्राण तर आहेच, पण नामजपांत तसेंच काबा दगडांतही प्राण आहे असें हा धर्म धडधडीत आपल्या तत्वाविरुद्ध मानतो!

(९) याच्या संस्थापकांत कींव करण्यासारखे कांहीं नैतिक दोष होते.

(१०) ह्या धर्मांत जगाच्या प्रगतीला वावच नाहीं. कारण जगांतला शेवटचा प्रेषित महंमद, त्यानंतर कुणीही प्रेषित जन्मणार नाहीं, असें हा धर्म बेधडक सांगतो.

प्रकरण १२ वें.

खिस्ती-धर्म

जीझस ख्राइस्टचे ठिकाणीं प्रकट झालेला, ईश्वर व मनुष्य यांचेविषयींच्या प्रेमाचा, धर्म.

१ प्रास्ताविकः—विद्यमान धर्मांत याचें स्थान—

अध्यात्मज्ञानसंपन्न अशा ऐतिहासिक महापुरुषांनीं स्थापलेल्या जगांतील नऊ धर्मांपैकीं हा एक धर्म असून, याच्या उपदेशाचा प्रभाव जगावर कायमचा पडला आहे. साक्षात् ऐतिहासिक महापुरुषानें न स्थापलेले असे दोनच धर्म. एक हिंदुधर्म व दुसरा शिंटो धर्म.

या धर्माचा संस्थापक एक अपूर्व पुरुष होता ही तर गोष्ट खरीच, पण एका सुप्रतिष्ठित धर्मांतील हजारों वर्षांच्या अध्यात्मानुभवाच्या बळावर हा धर्म जन्माला आलेला आहे हेंही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. अशा स्वरूपाचे चार धर्म आज विद्यमान आहेत. जैनधर्म, बौद्धधर्म, शीखधर्म व खिस्तीधर्म—

हे चारही धर्म अन्यधर्मोत्पन्न आहेत. पण त्यांतही ख्रिस्ती-धर्माचा विशेष हा आहे कीं, तो ज्या धर्मापासून निघाला त्या मूळ यहुदीधर्माचे धर्मग्रंथ त्यानें आपल्या धर्मग्रंथांत समाविष्ट केले आहेत. बाकीचे तीन धर्म आपल्या मूळ हिंदु धर्मांतील वेदग्रंथांचा उलट निषेधच करतात, व त्यांना अप्रमाण मानतात.

इतर सर्व विद्यमान धर्मांप्रमाणें ख्रिस्तीधर्माचा जन्मही आशियाखंडांत झाला आहे; तरी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, त्याचा विकास व प्रभाव बहुतांशीं पश्चिमेकडे युरोपांत दिसून येतो; आणि पश्चिमेकडील लोकांनीं न्याय, स्वातंत्र्य, समता, सहकार, विकास वगैरे ध्येयें दुसऱ्या कोणत्याही धर्मांतून न घेतां जीझसख्राइस्टच्या धर्मांतूनच घेतलीं आहेत.

शेवटीं हीही गोष्ट येथें सांगितली पाहिजे कीं, या धर्माच्या अनुयायांना आणि विरोधकांना (पण विशेषतः ह्याच्या अनुयायांना) असें मनापासून वाटतें कीं, या धर्माचीं ध्येयें अजून व्यवहारांत उतरविण्याची वेळ आलेली नाहीं.

२ यांतील धर्मग्रंथ—

बायबल हा या धर्माचा धर्मग्रंथ. ख्रिस्ती धर्म व त्याचा संस्थापक यांच्यासंबंधी माहिती या ग्रंथांतूनच मिळते. ख्रिस्ती-धर्माचीं तत्त्वें अविकृतरीत्या याच ग्रंथांत संगृहीत केली आहेत; आणि त्या शिकवण मनुष्यानें आयुष्य कसें चालवावें, याविषयीं अत्यंत महत्त्वाची मदत करणारें वाङ्मय म्हणजे हा धर्मग्रंथच होय.

या ग्रंथांत जुन्या कराराचे एकोणचाळीस अध्याय व नव्या कराराचे सत्तावीस अध्याय यांचा समावेश होतो. यापैकीं जुना

करार हा यहुदीलोकांचा धर्मग्रंथ असून अनेक शतकें हिब्रू भाषेंत रचला जात होता. नवा करार खिस्ती–शकाच्या पहिल्या शतकांत ग्रीक भाषेंत लिहिला. खिस्तीधर्माचें वैशिष्ट्य दाखविणारा असा ह्यांतील भाग नव्या करारांतच आलेला आहे; कारण यांत या धर्माच्या संस्थापकाचें जीवनचरित्र, त्याची शिकवण व त्याच्या प्रारंभींच्या शिष्यांचे विचार व अनुभव ग्रथित केले आहेत. ग्रीक व लॅटिन संप्रदायाच्या खिस्तीधर्मांत वरील खेरीज आणखी चौदा छोटेखानी धर्मग्रंथ प्रमाण म्हणून मानतात. पण ते ग्रंथ जुन्या कराराला परिशिष्ट म्हणून जोडले आहेत. ह्या ग्रंथसमूहाचें नांव " अपोक्रिफा " (म्ह० प्रक्षिप्तग्रंथ). हे ग्रंथ वरील संप्रदाय जरी प्रमाणग्रंथ म्हणून मानीत असले, तरी बहुतेक प्रॉटेस्टंट लोकांना ते मान्य नाहींत. या सर्व धर्मग्रंथांचा एक बृहत् धर्मग्रंथ इ. स. २०० च्या पूर्वी रचला गेला होता. सन ३२५ च्या सुमारास कॉन्स्टंटाइन राजाच्या हुकमानें बायबलची एक बृहत् प्रत तयार केली होती.

या धर्मग्रंथाचा अभ्यास करतां असें दिसून येतें कीं, बायबल म्हणजे विविध प्रकारच्या लिखणांचा एक संग्रह आहे; तरीपण त्याच्यांत एकसूत्रीपणाही ह्यांतील दिसून येतो. चांगल्याच विषयांची भिन्नता जर कुठें चटकन् ध्यानांत येण्यासारखी असेल, तर ती नव्या कराराच्या पहिल्या अध्यायांत. (माथ्यू ५:१७–४८) ह्या ठिकाणीं खास सहा बाबतींत जुन्या करारांतील शिकवण जीझसनें स्पष्टपणें उडवून लाविली आहे; तरीपण माझें कार्य विनाशाचें नसून पुरती जोडण्याचें आहे, असेंही त्यानें म्हटलें आहे. आतां या समग्र धर्मग्रंथांत एकप्रकारचा एकसूत्रीपणाही

आहे, तो असा कीं, सबंध बायबल हें विश्व, मनुष्य व ईश्वर यांचें सत्यस्वरूप ओळखण्याच्या प्रयत्नाची एक अखंड धारा दाखविणारें पुस्तक आहे व त्यांतील प्रयत्नांची परमावधि व उत्कृष्ट परिपाक जीझस–ख्राइस्ट व त्याची शिकवणूक ह्यांत दृष्टीस पडते.

धर्माची मोक्षदायक तत्त्वें संपूर्णरीत्या आविष्कृत करणारा बायबल हा एकच ग्रंथ असल्यानें इतर सर्व धर्मग्रंथापेक्षां याचें प्रामाण्य अधिक आहे. इतिहासांत आजपर्यंत बायबलइतका विलक्षण प्रभावशाली दुसरा कोणताही ग्रंथ निर्माण झालेला नाहीं. सन १९२२ सालीं या ग्रंथाचें खण्डशः अथवा समग्र असें पांचशें पन्नास भाषांत भाषांतर झालें होतें ! मानवी सुधारणेवर या ग्रंथाचा फारच मोठा प्रभाव पडलेला आहे, तरी अजून जीझसच्या ध्येयापर्यंत पोंचण्यास फारच अवधि आहे. तरीपण, मानवी स्वभावावर होणारा परिणाम, आकर्षकता व सार्वत्रिक प्रभाव या बाबतींत इतर सर्व धर्मग्रंथांत बायबल हा मूर्धाभिषिक्त ग्रंथ आहे असें म्हणण्यांत कांहींच गैर नाहीं.

२ या धर्माचा संस्थापक जीझस ख्राइस्ट याचें जीवन-चरित्र (ख्रिस्तपूर्व ४ ते इ. स. २९ पर्यंत).

जीझसच्या जीवनाविषयीं माहिती आपणाला मुख्यतः गॉस्पेल नांवाच्या चार छोटेखानी व्याख्यानांवरून व नव्या करारांतील कांहीं उल्लेखावरून मिळते. या माहितीच्या आधारावर (आणि ही माहिती तसें पाहिलें तर अगदीं किरकोळ आहे, तरीपण ती अत्यंत महत्त्वाची आहे) जीझसच्या जीवनाविषयीं इतके ग्रंथ लिहिले आहेत कीं, तितके आजपर्यंत जगांत दुसऱ्या कोणाहि-व्यक्तीबद्दल लिहिलेले नाहींत.

(१) त्याचें बालपण.

माथ्यू व ल्यूक या दोन गॉस्पेलमध्यें अशी सांप्रदायिक कथा आढळते कीं, जीझसची आई ही आजन्म कुमारिका होती व जीझस हा अयोनिज होता. तरीपण, त्याच्या जिवंतपणीं तो जोसेफ व मेरी या उभयतांचा पुत्र मानला जात असे. ज्यूडिया देशांतील बेथलेहेम् या स्थळीं त्याचा जन्म झाला; व गॅलीलीप्रांतांतील नाझारेथ येथें तो लहानाचा मोठा झाला. जीझस हा अस्सल यहुदी मुलाचा एक नमुना होता. त्याच्या लहानपणीं व तो मोठा होईपर्यंत त्याचे आईबाप यहुदी आचार अत्यंत कडकडीतपणें पाळीत असत. जरुसलेम मंदिरांतील घडलेल्या एका रोमांचकारी प्रसंगावरून जीझस हा मुलगा किती लोकविलक्षण होता हें दिसून येतें. (ल्यूक २:४१-५१) एका गरीब कुटुंबांत चार चौघाप्रमाणें आयुष्य कंठीत असतांही या तरुणानें आपल्याकाळीं मिळणारें उत्कृष्ट शिक्षण व जगाचा अनुभव हीं संपादन केलीं. प्रौढपणींच्या त्याच्या जीवनावरून त्याच्या संस्कृतीचा विस्तार व सखोलपणा हीं दिसून येतात.

(२) कोणत्या आणीबाणीच्या परिस्थितींत तो नेता झाला ?

तो जवळ जवळ तीस वर्षांचा असतां त्याचा चुलत भाऊ (ल्यूकच्या मतानें) जॉन धि बॅप्टिस्ट यानें जार्दन नदीच्या

तीरावर धर्म व नीति यांच्या पुनरुद्धाराची चळवळ सुरु केली. जॉनचे खिन्न झालेले देशबांधव या चळवळीनें खडबडून जागे झाले. जॉननें घोषणापूर्वक सर्वांना उपदेश केला:—" जन हो ! पश्चात्तापानें शुद्ध व्हा, म्हणजे प्रभूचें राज्य जवळ आलेंच म्हणून समजा." (मॅथ्यू ३:१) ह्या जॉनच्या हांकेला जीझसनें ओ देऊन धर्मसुधारणेच्या आखाड्यांत जोरानें उडी ठोकली. त्याला नवधर्मदीक्षा देण्याचे वेळीं, " परमेश्वर—स्वर्गांतील माझा दयाळू पिता—मला हांक मारीत आहे " असा त्याला स्पष्ट दृष्टांत झाला. त्यानें ईश्वराच्या हांकेला ओ दिली; आणि एकांतांत असा दृढ संकल्प केला कीं, ईश्वराचा खरा पुत्र होण्याची योग्यता मी संपादन करीन. ही योग्यता स्वार्थ साधणें, स्वत:चा गाजावाजा करणें अथवा ध्येयाला खालीं ओढणें, ह्या मार्गांनीं मी केव्हांही मिळविणार नाहीं. यानंतर जॉनला अधिकाऱ्यांनीं तुरुंगांत टाकलें, त्याबरोबर ' माझ्या कार्याला सुरवात करण्याला मला हा इषाराच मिळाला आहे ' असें म्हणून जीझसनें आपली चळवळ धडाडीनें सुरू केली.

(३) लोकांना उघड उपदेश करण्याची सुरवात.—

सामान्य जनतेनें त्याच्या उपदेशाचा स्वीकार मोठ्या आनंदानें केला. ते त्याला प्रभूचा एक प्रेषित मानूं लागले व त्याच्या भोंवतीं त्याचा उपदेश ऐकण्याकरतां जमा होऊं लागले. पण, यहुदीधर्मांतील शास्त्रीपंडितांना असें वाटूं लागलें कीं, हा कोणीतरी क्रांतिकारी आहे.

ह्याचा उपदेश आमच्या धर्माला धोक्याचा आहे, असेंही त्यांना वाटलें. पहिल्या पहिल्यानें ते त्याच्या उपदेशाची फारशी परवा करीत नव्हते, पण त्याच्या उपदेशामुळें, शिकवणीनें व वागण्यानें आपल्या अधिकारावर गदा येणार असें जेव्हां त्यांना दिसून आलें, तेव्हां ते त्याचे कट्टे शत्रू बनले. इकडे जीझसनें आपल्या शिष्यां-पैकीं बारा शिष्य निवडून काढले व त्यांना आपली नव-धर्ममतें नीट समजावून दिलीं, व त्यांना चहूंकडे धर्म-प्रचारार्थ पाठविण्याचें ठरविलें. तथापि, ही गोष्ट अगदीं खरी आहे कीं, तमाम लोकांनीं त्याला 'अपेक्षित यहुदी प्रेषित तो हाच' असें केव्हांही मानिलें नाहीं. त्यांनीं मनानें ठरविलेला प्रेषित निराळाच होता. खुद्द त्याच्या गांवच्या लोकांनींही त्याला धुडकावून लाविलें; फार तर काय, त्याच्या कुटुंबांतील मंडळींनासुद्धां "हा कुणी एक महात्मा' आहे असें बरेंच दिवसपर्यंत वाटत नव्हतें. त्याच्या या वेळेच्या कार्याचें वर्णन त्याच्या एका बड्या चळवळ्या शिष्यानें, यानंतर कांहीं वर्षांनीं लिहून ठेविलें आहे, तें असें:—

" नाझारेथच्या जीझसला साक्षात् ईश्वरानें आपलें तेज व शक्ति देऊन धर्मप्रचाराची दीक्षा दिली. आणि मग तो लोककल्याणाची कृत्यें करू लागला. भुतांनीं पछाडलेल्या सर्व लोकांना त्यानें बरें केलें.

पूर्वी एका हिब्रू धर्माचार्यानें आपला धर्मप्रचाराचा कार्यक्रम जाहीर केला होता. थेट तोच कार्यक्रम स्वतःचाही आहे, असें त्यानें जाहीर केलें.

"ईश्वरानें मला दीक्षा दिली व सांगितलें कीं, 'तूं गरिबांना त्यांचे कल्याणाचा संदेश पोंचव.' कैदेंत पडलेले लोक मुक्त होतील, आंधळयांना दृष्टि प्राप्त होईल, जखमी झालेले लोक हिंडू फिरू लागतील, प्रभूचें वर्ष जाहीर करण्याचीही मला आज्ञा झाली आहे. (ल्यूक ४:१८:१९; ईसा ६१; १—२)

शेवटीं यहुदी धर्माधिकाऱ्यांनीं जरुसलेम येथें जीझसला पकडलें व यहुदी लोकांच्या वरिष्ठ न्यायाधीशानें त्याला मृत्यूची शिक्षा फर्माविली; कारण काय तर, 'मी ईश्वराचा पुत्र आहे, माझें नांव ख्राइस्ट" असें जीझसनें जाहीर केलें. वर दिलेली शिक्षा कायम करण्याचा अधिकार रोमन सुभेदाराकडे होता; पण त्यानें 'जीझस निरपराधी आहे' असें कबूल करूनही त्याला सुळी देण्याची परवानगी दिली. अशा रीतीनें या अपूर्व धर्मोपदेशकाचें कार्य समाप्त झालें. आतां या उपदेशाचें विशिष्ट स्वरूप काय होतें तें पाहूं या;—

(४) त्याच्या उपदेशाची पद्धति—

जीझसचा उपदेश व उपदेशपद्धति हीं दोन्हींही अपूर्व होतीं. पहिल्या गॉस्पेलांत त्याच्या वचनांचा वर्गीकरणपूर्वक संग्रह केलेला आहे. त्यावरून त्याच्या वचनांतील विषयांची विविधता व गांभीर्य हीं दिसून येतात, व जीझस हा केवढ्या योग्यतेचा उपदेशक होता, ही गोष्टही वाचकांच्या मनावर चांगली बिंबते. उदाहरणार्थ, 'गिरीवरील उपदेश' (Sermon on the mount) ह्या प्रवचनांत जीझसनें यहुदी व ख्रिश्चन धर्ममतांची

तुलना करून असें सिद्ध केलें आहे कीं, खिश्चन धर्ममतें यहुदी धर्ममतापेक्षां जास्त दैवी आहेत. आपले सिद्धांत प्रतिपादन करण्याच्या प्रसंगानें जीझसनें ज्या दृष्टांतकथा सांगितल्या आहेत, त्यावरून त्याचें कौशल्य चांगलेंच प्रत्ययाला येतें. नित्य व्यवहारांतील हे दृष्टांत अथवा निसर्गांतील वस्तूंचें दाखले देऊन त्याचेद्वारें नकळत अशी गूढ धर्मतत्त्वें तो लोकांना शिकवी. ते गंभीर सनातन सिद्धांत असूनही श्रोत्यांच्या हृदयावर कायमचे बिंबून रहात.

उपदेशाचे भूमिकेवरून जीझस प्रसंग येतांच असें स्पष्ट सांगे कीं, प्रभूचें राज्य जवळ येत चाललें; पण तें राज्य भौतिक नसून मैत्री व सदाचार यांचे जोरावर मिळविलेलें हृदयांतील अध्यात्म-राज होय, असा आपल्या म्हणण्याचा त्यानें स्पष्ट खुलासा केला आहे. अर्थात् ही कल्पना सामान्य श्रोत्यांच्या आटोक्याबाहेरची असल्यामुळें ते त्याला 'हा निव्वळ कल्पनेंत गुंगणारा व मूर्ति-भंजक' असें म्हणू लागले.

रोग बरे करणारा म्हणून जीझसचा लौकिक होता, आणि खरोखरीच त्यानें कांहीं कांहीं रोग आश्चर्यकारक रीतीनें बरे केले. अनेक आजारी लोकांना त्यानें बरें केलें; वेड्यांचीं वेडें बरीं केलीं (तत्कालीन समजुतीप्रमाणें); व भूतग्रस्तलोकांची भुतें काढलीं. हे चमत्कार करण्यांत त्याचा दयेशिवाय दुसरा कोणताही हेतु नव्हता. ह्या माणसांना बरे केल्यावर तो त्यांना नीतीनें वागण्याची विनंति करी. कारण नीति ही जीवनांतील उच्च वस्तु आहे असें त्याचें मत होतें. हे सर्व चमत्कार म्हणजे, ईश्वराचें सहाय्य व

त्यानें आपल्याला दिलेली शक्ति यांचें चिन्ह होय, असें तो मानी. लोकांचा आपल्यावरील विश्वास वाढावा ह्याच उद्देशानें केवळ तो हे चमत्कार दाखवी असें नसून, त्याच्या हृदयांत दुःखी जीवाला पाहून प्रेमाचा व दयेचा उमाळा येई, हेंही तितकेंच खरें आहे.

(५) त्याच्या जीवनाचा विलक्षण अंत—

जीझसला शिपायांनीं पकडतांच त्याचे सर्व शिष्य त्याला सोडून पळून गेले. असें दिसतें कीं, त्यापैकीं कांहींजण निराश होऊन आपापल्या घरीं निघून गेले. जीझसचे थडगे चहूबाजूंनीं पक्के बंद केले होतें, तरी दोन दिवसांनीं तें उघडून पाहिलें असतां अगदीं रिकामें दिसलें ! तो येथें नाहीं पण येथून उठून गेला.' (मार्क १६:६)

मृत्यूच्या यातनतून सोडवून ईश्वरानें त्याला येथून उचलून नेले. तो कायमचा थडग्यांत राहणें शक्यच नव्हतें ? (ॲक्ट्स् २:२४)

खुद्द त्याच्या शिष्यांना तो थडग्यांतून निघून गेला ही गोष्ट खरी वाटेना. पण जेव्हां शिष्यांशीं त्यानें बोलायला सुरवात केली, तेव्हां त्यांची खात्री झाली कीं तो जिवंत आहे. सुळावर चढविण्यापूर्वीं त्यानें आपल्या सर्व शिष्यांना आशीर्वाद दिला, आणि आत्मिकदृष्ट्या मी कायमचा जिवंत आहे, असें त्यानें सर्वांना निश्चयपूर्वक सांगितलें. शिवाय माझें धर्मतत्त्व जगांत प्रसृत करण्याकरतां तुम्ही सहाय्य करा, असेंही त्यानें सर्वांना निक्षून बजा-

वले. इतकें झाल्यावर तो स्वर्गांत जायला चढत असल्याचें त्याच्या शिष्यांना दिसलें. तेव्हां ते त्याची भक्तिपूर्वक पूजा करू लागले.

" आणि शिष्यांना आशीर्वाद दिल्यानंतर तो शिष्यापासून दूर जाऊन बसला व नंतर स्वर्गांत त्याला नेण्यांत आले, त्यांनीं त्याची पूजा केली; आणि मोठ्या आनंदानें ते जरुसलेमला परत फिरले. (ल्यूक २४:५१–५२)

मग ते शिष्य चोहोंकडे जाऊन उपदेश करू लागले. परमेश्वर त्यांचा पाठीराखा होता आणि जीझसचे शब्द तो (ईश्वर नानाप्रकारचे चमत्कार दाखवून खरे करून दाखवी.

४ जीझसचा स्वभाव—

ख्रिश्चन धर्माची एक अपूर्व विशेषता म्हणजे त्याच्या संस्थापकाचें विमल चारित्र्य. एखाद्या व्यक्तीला अथवा सर्व जगाला जर कोणती महार्घ देणगी ख्रिस्तीधर्मानें दिली असेल, तर ती हीच. जझिस क्राइस्ट याचें चरित्र सर्व बाजूंनीं तेजस्वी, स्फूर्तिदायक, व्यापक व प्रभावशाली आहे. या चरित्राचा अनेक दृष्टीनीं अभ्यास करण्यासारखा आहे. प्रथमत: ख्रिस्तीधर्मग्रंथांत आढळणारी सामग्री घेऊन तिच्या आधारावर अभ्यास करणें ही गोष्ट फार महत्वाची आहे. ह्याच्याच जोडीला प्रत्येकानें आपल्या स्वत:च्या दृष्टिबिंदुप्रमाणेंही ख्रिस्ताच्या जीवनाचा अभ्यास करणें आवश्यक आहे.

जीझस ही एक मनुष्य व्यक्ति होती, ह्याबद्दलचे पुरावे चारी गॉस्पेलच्या बहुधा प्रत्येक पानावर मिळण्यासारखे आहेत:—

" ते मूल वाढीस लागून धष्टपुष्ट होत चालले. एवढ्याशा वयांतही त्याचें शहाणपण केवढें तरी होतें! साक्षात् परमेश्वराची कृपा त्याच्यावर होती. (ल्यूक २:४;)

" जीझसचा आकार व ज्ञान हीं दोन्हीही वाढतच होतीं. तो देवांचा व माणसांचा लाडका होता. (ल्यूक २:५२)

बालपणापासून तो संभाषणांत अगदीं हौशीनें भाग घेत असे. धर्माविषयीं बोलणें तर त्याला मनापासून आवडे (ल्यूक २:४६-४९) तो प्रवासाला अगदीं कंटाळून गेला होता. एक दोनदा त्याला वाटेंत फार तहान लागली, एकदा खाऊन व पाणी पिऊन तो निजला; पण त्याला झोंप येईना. तो कित्येकदां रडला. त्याला विश्वाचा विचार करीत असता फार आश्चर्य वाटे. कित्येक वेळां तो अगदीं खिन्न होई. वारंवार त्याच्या मनाला फार त्रास होई. त्याला कुणी सोबती भेटला अथवा त्याला कुणी कांहीं मदत केली, तर त्याबद्दल त्याला कृतज्ञता वाटे. त्याला आपल्या देशाविषयीं फार प्रेम वाटे व स्वदेशाच्या हीन स्थितीबद्दल त्याला फार हळहळ वाटे. त्याला निसर्गाच्या दृश्यांचें फार कौतुक वाटे. फुलें, गवत, पक्षी, व हवेंतील फरक हीं पाहून त्याचें मन रमे. नव्या करारांत सहा ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, त्याला भुरळ पाडण्याचे बरेच प्रयत्न झाले. हृदयाची व्यथा असह्य होऊन त्यानें कळवळून ईश्वराची प्रार्थना केली. त्याच्या अंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या. बायबलांत सव्वीस ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, त्यानें अंतःकरणपूर्वक ईश्वराची प्रार्थना केली व प्रभूनें त्याला आश्वासन देण्याकरितां स्वर्गांतून संदेश पाठविला. (ल्यूक २२:४३) "प्रभो! तुझी काय

इच्छा आहे तें मला सांग " असा टाहो फोडीत असल्याचें, बाराहून अधिक कवितेंत लिहिलें आहे. ईश्वराला पिता समजून तो सर्वस्वी शरण गेला, " माझ्यापेक्षां माझा पिता श्रेष्ठ आहे." (जॉन १४:२८).

तो आपल्याला वारंवार " मानवाचा पुत्र " म्हणून संबोधीत असे. चारी गॉस्पेलें मिळून सत्तर ठिकाणीं हें नांव आलें आहे. ह्याचा खरा अर्थ काय याविषयीं विद्वानांत मतभेद आहे. कदाचित् मानवांशीं असलेला स्वतःचा संबंध स्पष्ट सांगण्याकरतां, अथवा मी एक सामान्य मनुष्याचा नमुना आहे हें स्पष्ट कळविण्याकरितां, अथवा मी एक आदर्शपुरुष आहे असें सांगण्याकरतां त्यानें ' मानवाचा पुत्र ' ह्या शब्दसमूहाचा उपयोग केला असावा.

वरील अनुभव साधारण मनुष्यालाही येऊ शकतील. पण जीझसचा विशेष हा आहे कीं, त्याला वरील प्रकारची (मी मानवाचा पुत्र आहे) ही जाणीव असून तिच्या जोडीचा इतर तऱ्हेचीही विलक्षण जाणीव होती. ह्या जाणीवेंत ईश्वराशी स्वतःचा निकट संबंध असल्याची भावना इतकी दृढ होती कीं, त्यामुळें खिस्ती धर्मानें जीझसला स्पष्ट रीतीनें देवपुत्र म्हटलें आहे.

(२) मानव जातीच्या सेवेकरतां ईश्वराशी अत्यंत निकट संबंध त्यानें जोडला असल्याचा पुरावा त्याच्या जीवनचरित्रांत हवा तितका सांपडतो. सुमारे सदतीस कवितेंत तो स्वतःचा ' ईश्वराचा प्रेषित ' असा उल्लेख करतो. तिसाहून जास्त कवितेंत तो जुन्या करारांत निर्दिष्ट केलेल्या आशा सफल करीत असल्याचें वर्णन

केलें आहे; तरीपण, जुन्या धर्मांतील कांहीं बाबींना त्यानें अर्धचंद्र दिल्याचेंही वर्णन आढळतें. तो ईश्वराचा निरलस सहकारी होता. (जॉन ५:१७–४७; ६–३८–४०; ९:४) हें धर्ममत साऱ्या दुनियेंत उपदेशिलें जाईल असें त्यानें भाकीत केलें होतें. (मॅथ्यू २६:१३; मार्क १४:९) मानवसेवेकरतां आपलें आयुष्य वेंचावें हें तत्त्व स्वतःच्या उदाहरणानें त्यानें आपल्या अनुयायांना शिकविलें. (मॅथ्यू २०:२८; मार्क १३:४३).

"मानवांचा तारक' ही आपली भूमिका मानवांशी व ईश्वराशी असलेल्या आपल्या विविध तऱ्हेच्या संबंधानें त्यानें खरी करून दाखविली. कधीं कधीं तो स्वतःला मोक्षाचे द्वार म्हणवून घेई. (जॉन १०:९) तर कधीं प्राणार्पण करूनही आपल्या मेंढ्यांचा प्रतिपाळ करणारा भला मेंढपाळ म्हणून स्वतःचा उल्लेख करी. (जॉन १०:१०) केव्हां केव्हां तो स्वतःला आश्रयलता म्हणून समजून आपल्या शिष्यांना त्या लतेची फलसंपन्नशाखा समजे.(जॉन१५:१-६) तर केव्हां केव्हां स्वतःला पुनरुत्थान पावलेला प्राण मानी. (११:२५) कित्येक वेळीं तो सन्मार्ग, सत्य व जीवन यांचा आधार म्हणून स्वतःला संबोधीत असे (जॉन:१४:६), तर कित्येक वेळां तो स्वतःला ' मी जीवनाची भाकरी' आहे असें म्हणे. (जॉन ६:३५,४८) कांहीं ठिकाणीं तो ' ईश्वराची जीवनप्रद भाकरी' म्हणून स्वतःचा निर्देश करी (जॉन ६:३३) तर कांहीं ठिकाणीं मी ईश्वराचा समर्थ प्रतिनिधी आहे असे

तो स्वतःला उद्देशून म्हणे (मॅथ्यू ११:२७;२६:५३; जॉन८:१६,१९;१२:४४-४५; १३:३;१४:६;७,९) कधीं कधीं “मी स्वतः माझा पिता जो ईश्वर त्याच्याशी तादात्म्य पावलों आहे” असें तो जाहीर करी. माझें शब्द स्वर्ग व पृथ्वी यांचेपेक्षांही दीर्घकाळ टिकतील व जगाच्या प्रलयकालीं मी स्वतःच प्राण्यांच्या पुण्यपापाचा निवाडा करीन, असें त्यानें कैकवेळ जाहीर केलें होतें. (मॅथ्यू १६:२७;२४:३५; मार्क ८:३८;१३:३१ ल्यूक २१ ३३). वरील विधानांना शोभेल असें त्यानें सुमारें बारा ठिकाणीं दुसरेंही विधान केलें आहे. तें हें कीं, ‘लोकांनीं माझ्या ठिकाणीं अनन्य निष्ठा ठेवलीच पाहिजे.’ प्रत्येक गॉस्पेलांत मी ‘ ईश्वरपुत्र ’ आहे, असा त्यानें स्वतःचा निर्देश केला आहे, ‘ कुणाची छाती असेल तर त्यानें मी पापी आहे असें सिद्ध करावें ’ असें त्याचें सर्वांना आव्हान होतें (जॉन ८-४६).

५ जीझस ख्राइस्टविषयींचा पूज्यभाव—

खिस्ती धर्माचे अनुयायी आपल्या धर्मसंस्थापकाला आजपर्यंतच्या सर्व मनुष्यांत ईश्वराचा व मानवांचा अतिश्रेष्ट प्रतिनिधी मानतात. अर्थात् ज्या विरोधी धर्माधिकाऱ्यांनीं त्याला ठार मारलें त्यांनीं त्याच्याविषयीं जीं विशेषणें वापरलीं, अथवा त्याच्या कांहीं सहकाऱ्यांनीं त्याच्याविषयीं जें मत प्रकट केलें त्याहून भिन्नस्वरूपाचें असें हें वर दिलेलें खिस्तानुयायांचें मत आहे, हें उघड आहे. जीझसच्या जीवनचरित्रांत परस्परविरोधी मतांचा निर्देश नव्या करारांत स्पष्टपणें केलेला आढळतो.

त्याच्या कांहीं सहकाऱ्यांनीं त्याच्याविषयीं बरीच प्रतिकूल मतें प्रकट केलीं आहेत. उदाहरणार्थ, खुद्द त्याच्या गांवच्या मंडळींनीं त्याची 'एक यःकश्चित् गांवठी सुतार, पण कांहीं बाबतींत एक विचित्र व गूढ व्यक्ति,' अशी टवाळी केली आहे. एका प्रसंगीं तर वर सांगितलेल्या टवाळ दुर्जनांनीं त्याला ठार मारण्याचा घाट घातला होता. (मॅथ्यू १३:५४, ५७; मार्क ६:१–३; ल्यूक ४:१६–३०) त्याचे भाऊसुद्धां त्याचे बोलण्यावर विश्वास ठेवीनात (७:५). त्याचे कांहीं मित्र त्याला वेडा मानीत असत. (मार्क ३:२१; जॉन ७–२०; १०:२०) यहुदी धर्ममार्तंड तर त्याचा फार द्वेष करीत, व त्याला ठार मारण्याची वारंवार धमकी देत. त्याचे शत्रु त्याला भयंकर पंचाक्षरी व वेताळ (बील्झेबब) मानीत. 'अपेक्षित–प्रेषित अथवा धर्माचार्य तर तो असणें शक्यच नाहीं, कारण निंद्य अशा गॅलिली प्रांतांत त्याचा जन्म झाला आहे,' असें तत्कालीन धर्मशास्त्री मानीत. दुष्ट व बदमाष लोकांशी तो मैत्री करतो, असा त्याचा सर्वत्र दुर्लौकिक होता. तो राजद्रोही असून रोमनसत्तेला त्याचेपासून धोका आहे, असाही त्याच्यावर आरोप होता. ईश्वराची हा बरोबरी करणारा असल्यामुळें हा पक्का पाखंडी आहे असें म्हणून यहुदी अधिकारी त्याचा धिक्कार करीत असत. (जॉन ५:१८; १०–३३; १९:७)

याचे उलट त्याचेविषयीं अनुकूल मतही त्याचे सहकारी मंडळींनीं प्रकट केलें आहे. पापी व गरीब लोक त्याच्यावर प्रेम करीत. प्रत्येक कुटुंबांतील मंडळी विशेषतः मुलांचा तो फार आवडता होता. रोगनिवारक व उपदेशक म्हणून त्याचा बराच

लौकिक होता, व त्याचें जनतेवर वजनही फार होतें. अत्यंत ज्ञानी पुरुष म्हणून त्याची ख्याति होती. दोन रोमन अधिकाऱ्यांनीं त्याला निर्दोषी म्हणून जाहीर केलें होतें. लोक त्याला 'हा आमचा राजा' म्हणून म्हणत, व 'अपेक्षित यहुदी प्रेषित' हाच, असें मानीत. नव्या करारांतील पहिल्या पांच अध्यायांत असें सांगितलें आहे कीं, त्याच्या चमत्काराच्या योगानें अनेक लोक ईश्वराचे भक्त झाले. चारी गॉस्पेलांतही असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, त्याच्या सहवासांत येणाऱ्या लोकांना तो प्रत्यक्ष ईश्वरपुत्रच वाटे.

एखाद्या अतिश्रेष्ठ व व्यापक चारित्र्याच्या पुरुषाविषयीं जो पूज्यभाव दाखवावा तोच पूज्यभाव ख्रिस्तीलोक जीझसविषयीं दाखवितात. एका दृष्टीनें पाहतां तो खरोखरी एखाद्या सामान्य माणसासारख्या वागत असलेला दिसतो. इतकें कीं त्याबद्दल त्याचें कौतुकच करावें. मानवांचे बहुतेक सामान्य गुणधर्म त्याच्यांतही दिसतात. फरक इतकाच कीं, हे गुणधर्म पराकोटीला पोंचले होते. दुसऱ्या भाषेंत सांगायचें म्हणजे, मनुष्य प्रत्यक्ष कसा असतो व ईश्वरानुग्रहाचे बळावर कसा होऊं शकेल, ह्या दोन्हींही बाबतींत जीझसला आदर्शपुरुष म्हणता येईल. प्रत्येक ख्रिश्चन मनुष्यानें या आदर्शपुरुषाचें खुशाल अनुकरण करावें, अशी त्याची योग्यता आहे.

जीझसचें मन फार उच्च होतें, तुझें तसेंच असूं दे. (फिलिपियन्स २:५) याचे उलट, दुसऱ्या दृष्टीनें पाहतां जीझसला खरोखरी दैवी विभूतिही म्हणतां येईल. काल व मानवजाति यांच्या मर्यादेंत त्यानें सनातन परमेश्वराचे अनेक दैवीगुण

स्वतःमध्यें प्रकट केले होते. म्हणूनच जीझसला श्रेष्ठ प्रतिनिधि म्हणून पूज्य मानतात. विशेषतः मानवजातीचा उद्धार करणें, हा जो ईश्वराचा हेतु, त्या बाबतींत तर तो खरोखरीच ईश्वराचा प्रतिनिधि होता असें म्हणतां येईल.

६ ख्रिश्चन धर्माचा इतिहास.

जीझसनें जीवनविषयक व धर्मविषयक ओजस्वी तत्त्वें जगाला शिकविलीं. ख्रिस्तीधर्माच्या विकासांत या तत्त्वांचा अनेक तऱ्हेनें उपयोग झाला आहे.

(१) सुरवातीचा ख्रिश्चन संघ. (इ. स. ३०–५०)

येशूला सुळीं दिल्यानंतर त्याच्या खिन्न झालेल्या अनुयायांना त्यानें दर्शन दिलें. त्यामुळें त्यांच्या हृदयांत जीझसच्या अमरत्वाविषयीं व पुनरुत्थानाविषयीं अगदीं खात्री होऊन, त्यांना फार धीर आला. पहिले ख्रिश्चन लोक स्वतःला धार्मिक यहुदी म्हणवून घेत असत व जेरुसलेमच्या देवळांतच पूजा करीत असत. पण त्यांनीं स्वतःचा एक निराळा गट तयार केला होता, व जीझसला ते आपला प्रभु मानीत. ही गोष्ट यहुदी धर्माधिकाऱ्यांना कळतांच त्यांचा त्यांनीं छळ आरंभिला आणि त्यांना देशोधडी लावले. तरीपण, या ख्रिस्तानुयायांची संख्या वाढतच चालली.

(२) पॉलची कामगिरी (सन ५० ते ६५)

जीझसच्या सर्व शिष्यांत आपल्या गुरुची खरी योग्यता संपूर्ण जाणणारा व ख्रिस्तीधर्माला सार्वराष्ट्रिय धर्माचें

स्वरूप देणारा पॉल हाच प्रथम खिस्ती धर्माचार्य होण्याला लायक होता. त्याला मूळचें यहुदीधर्माचें मिळालेलें शिक्षण, नंतर खिस्तीधर्माची दीक्षा घेतल्यावर त्याला मिळालेला अनुभव, त्याचें विचारगांभीर्य वगैरेमुळें तो येशूच्या सर्वशिष्यांत मोठ्या योग्यतेचा पुरुष होऊन गेला. त्याला असें दिसून आलें कीं, आपल्या ईश्वरीय कल्पने-मुळें, आणि उदात्तजीवनाचे योगानें जीझसनें जगांत धर्मस्वातंत्र्य व धर्मसामर्थ्य याचें नवजीवन सुरू केलें आहे. पॉलनें युरोप व आशिया ह्या दोन्ही खंडांत खिस्ती धर्मपीठें स्थापन केलीं. ह्या पीठांना उद्देशून त्यानें लिहिलेलीं पत्रें हेंच नव्या करारांतील सर्वांत जुनें लिखाण. खिश्चनतत्त्वज्ञान व आचार या दोहोंचें प्रति-पादन ह्या पत्रांत सांपडतें.

(३) नव्या कराराची रचना पुरी झाली—

(सन ६५ ते १५०).

ह्या काळांत नवाकरार हा ग्रंथ लिहून पुरा झाला. ह्या प्राचीन धर्मसाहित्यांत जीझसचा जीवनवृतांत, खिस्ती-धर्मपीठांचा प्रारंभ, जीझसच्या शिकवणूकीचा अर्थ, व खऱ्या खिश्चनानें कसें वागावें या विषयींचा व्यावहारिक उपदेश इत्यादिकांचा संग्रह आहे; व या दृष्टीनें या प्राचीन लिखाणांचें पुढील खिश्चन-धर्माच्या इतिहासांत फारच महत्व आहे. याकाळच्या खिस्ती धर्मसंघांत सार्वजनिक पूजाप्रसंगीं या ग्रंथाचा साक्षात् उपयोग होत असे.

(४) रोमन साम्राज्यांत जिवंत राहण्याकरितां ख्रिस्ती-धर्मानें केलेली धडपड (सन १५० ते ३२५).

स्वतःचा जनक जो मूळ यहुदीधर्म त्याच्याकडून प्रथम ख्रिस्तीधर्माचा फार छळ झाला. यानंतर त्या धर्माचा अनेक रोमन बादशहाकडून छळ झाला व त्यांतूनही निभावून तो टिकला. ख्रिश्चनधर्माचा स्वीकार करून त्याची यथा-विधि दीक्षा घेणारा पहिला रोमन राजा कान्स्टंटाईन हा होय. सन ३२५ त नीसिया येथें त्यानें स्वतः अखिल ख्रिश्चन धर्मपीठांचें एक संमेलन भरविलें. त्यानें ख्रिश्चनधर्माला राज्याचा अधिकृत धर्म केला व ख्रिस्ती-धर्माचें चिन्ह म्हणून क्रॉसचा स्वीकार केला.

(५) हा धर्म साऱ्या युरोपांत प्रतिष्ठित धर्म होतो.

(सन ३२५–१०५४)

ह्याच सुमारास ख्रिस्ताच्या अध्यात्मिक स्वरूपाविषयीं व मठवासी ख्रिस्तीलोकांच्या अध्यात्म जीवनक्रमा-विषयीं अनेक घोटाळ्याचे प्रश्न उत्पन्न होऊन वादाचें रण माजल्यामुळें ख्रिस्ती धर्मपीठांचें बरेंच नुकसान झालें. तरीपण, ह्या सातशें वर्षांत साऱ्या युरोपनें एकजात ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला, ही गोष्ट कांहीं कमी महत्वाची नाहीं. अशारीतीनें एका खंडांत एकच धर्म प्रचलित असल्याचें अलीकडील उदाहरण अमेरिका खंडाचें होय.

(६) पोपचें वर्चस्व (स. १०५४–१५१७)

या नंतरच्या पांच शतकांतील ठळक गोष्ट ही कीं, साऱ्या युरोपखंडांत पोपची सत्ता अबाधित सुरु झाली. ही सत्ता केवळ धार्मिक स्वरूपाची नसून पश्चिम युरोपांतील कित्येक देशावर पोपनें आपली राजकीय सत्ताही प्रस्थापित केली होती. ह्या मध्ययुगीन धर्मपीठांत बरेच दोष होते; तरीपण गरीब व दुबळ्या लोकांना मदत करणें, कायद्याची प्रतिष्ठा वाढविणें, व्यवस्था ठेवणें व शिक्षण देणें ह्या बाबतींत ह्या पीठांनीं उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. सर्व लोकांचें केवळ राजकीय अथवा जातीय नव्हे, तर आध्यात्मिक ऐक्य घडवून आणणें, व त्याचेद्वारा न्याय, दया, शांति, सहकार, व बंधुता इत्यादिकांचा विकास करणें इत्यादि ध्येयें अजून संपूर्णतया कुणीच प्राप्त करूं शकलें नाहीं, तरीपण ह्या ध्येयाकडे पोंचण्याची धडपड, अपूर्णांशानें कां होईना, ह्या उपर्युक्त धर्मपीठांनीं केली यांत शंका नाहीं.

(७) धर्मसुधारणा व ख्रिस्तीधर्माचा जगभर प्रसार. (सन १५१७ पासून पुढें)

या सुमारास पोपच्या सत्तेनें अगदीं धुमाकूळ माजविला होता व विचित्र धर्माचारांचें थोतांड सुरु केलें होतें; त्याविरुद्ध विक्लिफ, हस व इतर धर्मसुधारकांनीं जोराचा हल्ला चढविला, पण त्याचा कांहीं फारसा उपयोग झाला नाहीं, पण यानंतर मार्टिन ल्यूथर नांवाच्या एका जर्मन साधूनें ही पोपच्या निषेधाची चळवळ

यशस्वी रीतीनें चालविली. ही चळवळ केवळ धार्मिक स्वरूपाचीच नसून त्यांत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय सुधारणांचाही समावेश होता. या चळवळीचा कॅथोलिक या पुराणधर्मपंथावरही इष्ट परिणाम होऊन त्या पंथांतही बरीच सुधारणा झाली. आज जगांतील प्रत्येक भागांत पुराणपंथ कॅथोलिक व नवधर्मपंथ प्रोटेस्टंट हे दोघेही आपापल्यापरीनें खिस्तीधर्मप्रसाराचें कार्य नेटानें करीत आहेत, ही गोष्ट खिस्तीधर्माच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाची आहे. मानवी जीविताला खिस्ताच्या जीवनाप्रमाणें संपूर्ण बनविणें म्हणजे पृथ्वीवर सर्वत्र खिस्तीधर्माचा प्रसार करणें हें तर खरेंच, पण तें जीवन बौद्धिक, सामाजिक, औद्योगिक, राष्ट्रिय व आंतर्राष्ट्रिय इत्यादि दृष्टींनीं खिस्तसदृश बनविणें ह्याचाही त्यांत समावेश होतो. ही गोष्ट परस्पर आदरभाव, सहकार व प्रगति ह्यांनींच घडवून आणतां येईल. ह्या विशाळ ध्येयाची सिद्धि करण्याकरतां पूर्व व पश्चिम या दोहोंकडील राष्ट्रांनीं सहकारितेनें काम केलें पाहिजे. आजकालचें अत्यंत महत्वाचें व स्फूर्तीदायक कार्य म्हणजे खिस्तीधर्माची तत्त्वें नीट समजावून घेऊन तीं संपूर्णरीतीनें व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न करणें हें होय.

७ खिस्तीधर्मातील ईश्वरविषयक कल्पनाः—

प्रत्येक धर्मांत परमेश्वराचें स्वरूप ही बाब अत्यंत व्यापक व नियामक अशी एक कल्पना समजली जाते.

ऐतिहासिक दृष्ट्या पाहतां, खिस्तीधर्मांतील ईश्वरविषयक कल्पना यहुदी धर्मांतील ईश्वरविषयक अत्युच्च कल्पनेपासून प्रसृत झाली आहे. येशू खिस्तानें धर्मांतील 'पहिली महत्वाची आज्ञा' जी केली तिची कल्पना त्यानें नव्यानें काढलेली नसून यहुदी धर्मांतूनच घेतली आहे. श्रद्धोच्चार उर्फ 'शेमा' या धर्मग्रंथांतील प्रकरणांतून ही आज्ञा त्यानें सरळ उद्धृत केली असून ही आज्ञा प्रत्येक यहुदी धर्मविधींत उच्चारली जाते; आणि प्रत्येक धार्मिक यहुदी दिवसांतून दोन वेळा हा श्रद्धोच्चार करतो.

> " आमचा परमेश्वर एकच आहे. तू आपल्या परमेश्वराची मनोभावानें व शक्तिसर्वस्वानें भक्ति कर. "
> (अनुवाद ६:४-५)

(१) एका परमेश्वराची भक्ति—

यहुदी धर्मांतल्याप्रमाणें खिस्तीधर्मांतही परमेश्वर हा जगाचा नैतिक सत्ताधीश आहे, असें मानिलें आहे. नव्या करारांतील अनेक कवितेंत परमेश्वराचें स्वरूप वर्णन केलें आहे. उदा०:—सर्वज्ञ, सर्वसाक्षी " स्वर्ग व पृथ्वीचा राजाधिराज, " पुण्यशाली, पवित्र दयाळु, जगाचा न्यायाधीश राजेश्वर इ०.

तथापि, यहुदीधर्मांतील वर सांगितलेल्या ईश्वरीय लक्षणांमध्यें येशूनें एका लक्षणावर वारंवार भर दिला आहे, तें लक्षण म्हणजे परमेश्वर अत्यंत प्रेमळ आहे हें. ह्या प्रेमळ परमेश्वरावर प्रेम करण्याचा स्वाभाविक परिणाम असा होतो कीं, आपण आपल्या शेजाऱ्यावरही अहेतुक प्रेम करूं लागतो. ह्या उपदेशाचे बाब-

तींत येशूनें आपल्या पदरचें कांहींही न सांगतां जुन्या करारांतून खालील वाक्यें शब्दशः उद्धृत केलीं आहेत:—

> " तू आपल्या स्वतःप्रमाणें आपल्या शेजाऱ्यांवर प्रेम कर " (लेव्हिटिकस १९:१८)
>
> तरीपण जुन्या करारांतील शिकवणुकीपेक्षां येशूची शिकवण फारच अपूर्व व उच्चप्रकारची आहे. यहुदीलोकांनीं शेजारी म्हणजे आपल्या जातींतील एक व्यक्ति असा अर्थ केला आहे. भल्या शमरितनच्या दृष्टांतकथेमध्यें येशूनें " कोणाही गरजू मनुष्याला प्रेमानें मदत करणें " असा शेजारधर्माचा अर्थ केला आहे.

(२) परमेश्वराचें राज्य—

मनुष्य कितीही अश्रद्धाळु व ईश्वराची आज्ञा मोडणारा असा असला, तरी भविष्यकाळांत केव्हांतरी साऱ्या जगावर प्रभूचें नैतिक राज्य स्थापित होईल असें यहुदी व ख्रिस्ती हे दोघेही मानतात. " देवाचें राज्य " असे साक्षात् शब्द जुन्या करारांत नाहींत, तरीपण याच्याशीं समानार्थक असे शब्दमात्र सातदा त्यांत आले आहेत. चारी गास्पेलमध्यें मात्र ' देवाचें राज्य ' व त्याच्याशीं समानार्थक असे ' स्वर्गाचें राज्य ' हे शब्द वारंवार आढळतात.

यहुदी व ख्रिस्ती या दोन धर्मांतील फरक केवळ नांवाचाच आहे असें नाहीं. यहुदीधर्माला अशी आशा वाटते कीं, भविष्यकाळीं केव्हांतरी परमेश्वर आपल्या

दैवीसामर्थ्याचे जोरावर आपलें कायमचें राज्य स्थापील, पण येशू नुसती ही आशा बाळगून स्वस्थ बसला नाहीं; तर हें ईश्वराचें राज्य पृथ्वीवर स्थापण्याचें कामीं प्रत्येकानें ईश्वराची आज्ञा पाळून मदत केली पाहिजे, आणि परमेश्वरी संदेश पृथ्वीच्या शेवटच्या टोंकापर्यंत पोंचविला पाहिजे, असें त्यानें स्पष्ट म्हटलें आहे.

(३) ईश्वराचें क्षमाशीलत्व.—

ईश्वर हा मनुष्याच्या पापाची क्षमा करतो, ही येशूची शिकवण म्हणजे खिस्तीधर्मांतील एक महत्वाचा भाग आहे. ह्या बाबतींत यहुदीधर्माशी त्याचें साम्य जसें आहे, तसा भेदही आहे. जुन्या करारांतील अनेक स्थळीं जेहोवा हा देव क्रोधिष्ट व सूड घेणारा आहे, असें म्हटलें आहे. अर्थात् आपल्या देवाचें अनुकरण करून यहुदी लोकांनीं अपमानाबद्दल सूड खुशाल घ्यावा अशी यहुदी धर्मांत नुस्ती स्पष्ट परवानगी आहे इतकेंच नव्हे तर आज्ञाही केली आहे.

" सूड घेतांना तुझ्या डोळ्याला पाणी येता कामा नये. प्राणाचा सूड प्राणानें, डोळ्याचा डोळ्यानें, हाताचा हातानें, व पायाचा सूड पायानें घे. (अनुवाद १९:२१; शिवाय एक्झोडस २१:२३–२५; लेव्हिटिकस २४:१७–२१)

याशिवाय जुन्या करारांतील धर्मविधींत अनेक मोठाले द्रव्ययज्ञ सांगितले आहेत. (लेव्हिटिकस् १–७) कांहीं ठिकाणीं जेहोवा, हा कोणतीही अट न घालतां पापाची क्षमा करतो

असें म्हटलें आहे. फारच थोड्या स्थळीं असें सांगितलें कीं, पश्चात्तापाशिवाय परमेश्वर क्षमा करीत नाहीं. (२ क्रॉनिकल ७:१४, ईसा ५५:७, एझेकील ३३:१५–१६) वरील चार पद्धतीपैकीं अत्यंत उच्च पण अत्यंत कठिण पद्धति (पश्चात्ताप-पूर्वक क्षमा) येशूनें स्वीकारून तिचाच उपदेश लोकांना केला. तरीपण, ह्या पद्धतींतही त्यानें पुढील दोन सुधारणा केल्या:—

पहिली सुधारणा ही कीं, पाप्यानें पश्चात्ताप दर्शविला असतां परमेश्वर त्यावर क्षमा करतो हें तर खरेंच, पण खुद्द त्या पापी मनुष्याला अपकार करणारे जे लोक—खुद्द त्याचे शत्रू—ह्यावरही (पापी मनुष्यानें) क्षमा केलीच पाहिजे. कारण प्रत्यक्ष परमेश्वर सर्वांना निश्चितपणें दयेनें वागवितो. (मात्थी ५:२३:२४ ४३–४८; ६:१२–१५; मार्क ११:२५–२६; ल्यूक ६:२७–३६; १७:३–४) जगांतील कोणत्याही धर्मांत ईश्वराचा अनुग्रह होण्याकरतां वरील प्रकारची अट घातलेली नाहीं.

दुसरी सुधारणा म्हणजे, खुद्द येशूच्या चरित्राच्या उदाहरणाची. यहुदी धर्मांत व जगांतील धर्मांत येशूनें ही अपूर्व सुधारणा केली. जुन्या करारांतील कोणत्याही व्यक्तीनें, फार काय, पण जगांतील धर्मसंस्थापकांपैकीं कुणीही येशूप्रमाणें क्षमाशीलता प्रकट केलेली नाहीं....शत्रूंनीं आपला नाहक अपमान केला असतांही व प्रत्यक्ष शूळावर चढविलें असतांही, येशूनें त्यांच्याबद्दल प्रभूजवळ प्रार्थना केली.

> “ हे पित्या ! त्यांना क्षमा कर. बिचाऱ्यांना आपण काय करीत आहों याची कल्पनाच नाहीं ” (ल्यूक २३:२४)

ह्या अलौकिक क्षमाशीलतेमुळें ईश्वराचें स्वरूप, येशूचें परमेश्वराशी असलेलें पुत्राचें नातें, व जगाच्या उद्धाराकरता त्यानें केलेली योजना या सर्वांचा स्पष्ट अर्थ कळून येतो. (जॉन ३:१६)

(३) परमेश्वर हाच पिता—

परमेश्वर हा भूतमात्रांचा पिता आहे ही खास ख्रिस्ती धर्माचीच कल्पना आहे. (हिब्रू १२:९)

जुन्या करारांत ईश्वराचें विशिष्ट नाम "जेहोवा" हे असून त्याच्या कूटस्थत्वावर व सर्वसत्ताधीशत्वावर जास्त भर दिला आहे. व्यक्तिमात्राच्या कल्याणाविषयीं सदैव चिंता वाहणारा असें अनेक ठिकाणीं त्याचें वर्णन केलें आहे. जुना करारांत अशी जवळ जवळ अठ्ठावीस स्थळें आहेत कीं, जेथें प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या परमेश्वर हा पिता आहे, असें म्हटलें आहे. तरीपण, तो यहुदीलोकांच्या टोळीचाच पिता आहे अथवा जे त्याला भितात त्यांचाच तो पिता आहे असें त्याठिकाणीं स्पष्ट सांगितलें आहे. (सामे १०३:१३) पण जेहोवा हा विश्वांतील मनुष्यमात्रांचा पिता आहे असें जुन्या करारांत एकादाही स्पष्ट विधान नाहीं. नाहीं म्हणायला दोन ठिकाणीं 'आमचा पिता' असें म्हटलें आहे, पण त्याठिकाणींही त्याची शक्ति अनाकलनीय असून कर्तुमकर्तुं या स्वरूपाची आहे असें सांगितलें आहे. (ईसा ६३:१६–१७; ६४:८–९) प्रार्थनेचे वेळीं 'हे माझ्या पित्या !' असें परमेश्वराला साक्षात् शब्दांनीं संबोधिल्याचें जुन्या करारांत कुठेंही दिसत नाहीं. याचे उलट येशूनें

अथवा नव्या करारांतील इतर कोणत्याही लेखकानें 'जेहोवा' ही यहुदी लोकांनीं परमेश्वराविषयीं योजलेली विशिष्ट संज्ञा योजलेली नाहीं. फार काय, जेहोवाला उद्देशून लिहिलेल्या एक साम येशूनें उद्धृत केलें आहे. त्यांत मुळांत जरी जेहोवा हें नांव दहादा आलें आहे, तरी त्या दाही ठिकाणीं जेहोवाचे ऐवजीं येशूनें नेमका 'पिता' हा शब्द घातला आहे. दुसऱ्या अशाच एका कवितेंत जेहोवा हें नांव आलें असतां येशूनें ती कविता उद्धृत करतांना नेमकें तें नांव गाळून टाकलें आहे. (ल्यूक २३:४६; सामें ३१:५)

चारी गॉस्पेलांत मिळून सुमारें दीडशें स्थळीं येशूनें योजिलेली 'पिता' ही विशिष्ट संज्ञा आढळते. अर्थात् प्रत्येक प्रयोगाचा प्रसंग निरनिराळा आहे.

"पिता" हा शब्द एकसष्ट कवितेंत आला आहे.

"हे पित्या' हे शब्द ईश्वराची प्रार्थना करीत असतां सतरा कवितेंत आले आहेत.

"हे माझ्या पित्या" हे शब्द पन्नास कवितेंत आले आहेत.

"तुमचा पिता," "तुमचा स्वर्गीय पिता" असे शब्द अठरा कवितेंत आले आहेत.

"आमचा पिता" हे शब्द प्रभुप्रार्थनेंत आले आहेत. (मात्थी ६:९; ल्यूक ११:२)

ईश्वर याअर्थीं पिता हा शब्द नव्या करारांत एकंदर तीनशे वेळा आला आहे.

जगांतील कोणत्याही धर्मांत ईश्वराला उद्देशून वापरलेला इतका ठसठशीत, इतका तेजस्वी, इतका सलगीचा, इतका भावपूर्ण व इतका सगुणत्वद्योतक दुसरा शब्दच नाहीं. ख्रिस्ती लेखकांनीं हा ' पिता ' शब्द धर्मग्रंथांत एकसारखा वापरला आहे व इतर धर्मांतील ग्रंथांत या शब्दाच्या तोडीचा तर राहोच, पण खालोखालसुद्धां दुसरा शब्द आढळत नाहीं.

(५) ख्रिस्तीधर्माच्या ईश्वरीय कल्पनेंतील कांहीं विशेष मुद्दे—

मूळ यहुदीधर्मांतील ' ईश्वर हा जगाचा राजाधिराज आहे ' ही विशिष्ट कल्पना ख्रिस्तीधर्मानें अंशतः स्वीकारून त्यांतील ईश्वरविषयक अत्युदात्त विशेषणें उचललीं. पण शिवाय त्यांत आपली स्वतःची अमोलिक भर टाकली. यहुदी व ख्रिस्ती या दोन्ही कल्पनेंत सादृश्याचे मुद्दे कांहीं आहेतच. उदाहरणार्थ, मंडळावरील श्रेष्ठ सत्ता; ईश्वरी शासन पाळणें व पापी माणसांना शिक्षा. खालील कोष्टकांत या दोन्ही धर्मांतील ईश्वरविषयक कल्पनेंचे तौलनिक पद्धतीनें, पण थोडक्यांत पृथक्करण केलें आहे; त्यावरून या दोन्ही धर्मांतील कल्पनांचा विकास स्पष्ट दिसून येईल.

यहुदी धर्मांतील ईश्वरविषयक कल्पना ' राजाधिराज ' ही संज्ञा	ख्रिस्ती धर्मांतील ईश्वरविषयक कल्पना ' जगाचा पिता ' ही संज्ञा
(१) राजाधिराज हा राजसत्तेनें प्रजेहून श्रेष्ठ असतो.	मुख्य मुख्य बाबतींत पिता आपल्या मुलांसारखाच असतो.

(२) राजा प्रजेवर अधिकार गाजवितो.	पिता मुलाशी आपलेपणानें वागून त्यांना सत्ता वांटून देतो.
(३) राजा आज्ञा पाळायला लावतो.	पिता शिक्षण देऊन मुलांशी सहकार करतो.
(४) कायद्याच्या जोरावर अंमल चालवितो.	स्वतःचा प्रभाव पाडतो.
(५) आपल्या तत्त्वांचें ऐश्वर्य प्रस्थापित करूं पाहतो.	पिता मुलांवर प्रेम करतो, क्षमा करतो व त्यांना वाढवितो.
(६) न्यायनिष्ठुर असतो.	व्यक्तिविशेषाप्रमाणें वागतो. प्रसंगीं दयाही करतो.
(७) अपराध्यास शासन करतो.	पिता अपराध्याला शासन करतानाही स्वतः दुःखी होतो, व "आपण सुधरावें म्हणून आपल्या हिताकरता शासन करतो"

८ पाप व मोक्ष या कल्पनेचें पृथक्करण व भेदनिर्देश.

पापें जवळ जवळ बारा प्रकारचीं आहेत. अर्थात् त्यांच्याच जोडीला एकंदरींत बारा प्रकारचीं पुण्यें ही आहेत.

पापाचा प्रकार	त्यापासून होणारें दुःख	त्यांतून मुक्त होण्यानें कोणतें सुख मिळतें ?
शारीरिक	रोग, दुःख, हाल	आरोग्य
बौद्धिक	अज्ञान	ज्ञान
आध्यात्मिक	व्यक्तित्वाचा संकोच	समग्रता; सर्वांभूतीं ऐक्य

भावनात्मक	शोक	शांति, समाधान
इच्छात्मक	अपयश	सामर्थ्य, यश
सामाजिक	अंदाधुंदी, अन्याय	न्याय
शासनविषयक	गुन्हे	आज्ञाधारकपणा, नम्रपणा
सौंदर्यविषयक	कुरूपता	सौंदर्य
आचारविषयक	अनौचित्य	औचित्य, क्रियाकांड
नैतिक	पाप	पुण्य
धार्मिक	देवताविषयक पाप.	सदाचार
खास ख्रिश्चन कल्पना	**स्वार्थ**	**प्रेम**

एखाद्या धर्माचें गंभीरत्व व विशालता यांचें माप त्या धर्मांतील पापाच्या कल्पनेचें सूक्ष्मत्वावरून जसें काढतां येतें तद्वत्‌च मोक्षाच्या कल्पनेंतील औचित्यावरूनही तें काढतां येतें. उदाहरणार्थ जैन धर्मानें शारीरिक पापाचा विचार मुख्यत: केला आहे. तरीपण आश्चर्याची गोष्ट ही कीं, जैन धर्मानें आरोग्य उपभोगण्याबद्दल फारशी परवा केली नसून देहदंडाचें जास्त स्तोम माजविलें आहे. बुद्धधर्मानें भावनात्मक पापांचा विचार केला आहे. तरीपण वैयक्तिक अथवा सामाजिक जीवनाबद्दल त्या धर्मांचें औदासीन्य दिसून येतें व व्यक्तित्वाला दाबून टाकण्याकडेच त्याचा जास्त कल दिसतो. एका येशू ख्रिस्तानेंच असें स्पष्टपणें जाहीर केलें आहे कीं, तुम्हाला संपूर्ण जीवनाचा उपभोग घेतां यावा म्हणून मी या जगांत आलों आहे.' (जॉन १०:१०)

एका व्यापक व सर्वसंवादी मोक्षावस्थेंत विपुल आनंद प्राप्त करणें आणि पापरूप दुःखांचा त्याग करणें या दोन्ही कल्पनांचा समावेश करण्यांतच ख्रिस्ती धर्माची इतर धर्माहून अपूर्वता

आहे. ख्रिस्तीधर्माला निराशावादी केव्हांही म्हणता येणार नाहीं, तरीपण, इतर धर्मापेक्षां यांत पाप व पापनिरास या दोन कल्पनांचें फारच प्राबल्य आहे ही गोष्ट अगदीं नाकबूल करतां येणार नाहीं. परमेश्वर, स्वतःसाधक, व इतर साधु पुरुष हे तिघेही व्यक्तीच्या पापनिरासाचें कार्य अंगावर घेतात व व्यक्तीला पुण्यफलरूप आनंदाची प्राप्ति करून देतात असें मानणारा ख्रिस्तीधर्म आशावादीच मानला पाहिजे हें उघड आहे. पाप व मोक्ष यासंबंधीं आम्ही पुढें पांच प्रश्न दिले आहेत. त्याच्या उत्तरावर धर्मांचें वर्गीकरण, तुलना वगैरे उत्तम तऱ्हेनें करता येईल. ते प्रश्न हे:—

(१) पापाची व्याप्ति केवढी मोठी आहे ?
(२) पापाबद्दल जाबाबदार कोण ?
(३) पाप म्हणजे काय ?
(४) मोक्ष कसा मिळविता येतो ?
(५) सामुदायिक मोक्षाचा उपाय काय ?

ह्या पांच मौलिक प्रश्नांना विद्यमान आठ धर्मापैकीं प्रत्येक धर्मानें जीं जीं उत्तरें दिलीं आहेत, तीं त्या त्या धर्मांच्या कालक्रमानुसार खालीं दिलीं आहेत:—

१ पापाच्या कल्पनेकडे फारसें लक्षच देता कामा नये.

टाओ धर्म म्हणतो:—

(१) जगांत पाप असें फारच थोडें आहे.
(२) पापाबद्दल जबाबदार असें कोणीच नाहीं, सगुण परमेश्वर अथवा निर्गुण परमेश्वर असा वस्तुतः कोणीच नसून, मूर्त सैतान

असाही कोणी नाहीं. मनुष्याला मूर्ख म्हणा किंवा पाहिजे तर दुःखी म्हणा, पण त्याला पापी मात्र केव्हांही म्हणता येणार नाहीं.

(३) तेव्हां पापाची कल्पना करण्याची जरूरच नाहीं.

(४) जगाचा अमूर्त मार्ग (टाओ) गाजावाजा न करता सेविल्यानें शांति मिळते.

(५) निसर्गाला अनुसरून वागा. सामुदायिक मोक्षाचा उपाय उपलब्धच नाहीं.

(२) पाप हें वस्तुतः मिथ्याच आहे (कारण तें मायिक आहे) हिंदुधर्माच्या मतें:—

(१) पाप ही वस्तु खरीच नाहीं. कांहीं काळ चुकीच्या रस्त्यानें जाणें हेंच पाप.

(२) पापाबद्दल जबाबदार कोणीच नाहीं. क्षणजीवी जीवात्मा अथवा शाश्वत ब्रह्म यापैकीं पापाचें मूळ कारण कुणीच नाहीं. विश्वांत माया ही अनादि असून तीच पाप या कल्पनेचें मूळ आहे.

(३) ईश्वर सर्वव्यापी आहे या विषयींचें जीवात्म्याला अल्पकाल होणारें अज्ञान हेंच पाप.

(४) ईश्वराच्या सर्वव्यापकतेचें ज्ञान अथवा समाधीचा आनंद, अथवा भक्तीचा आनंद, अथवा धर्म-क्रियाकाण्ड यांच्याद्वारें मोक्ष मिळविता येतो.

(३) पाप हें शाश्वत दृष्टीनें मिथ्या आहे (कारण तें अनिश्चित आहे)

इस्लाम धर्माचें म्हणणें असें कीं:—

(१) जगांत फारसें पापच नाहीं; आणि असलेंच तर तें अल्लाला शरण न येणाऱ्या काफरांमध्येंच आहे.

(२) एखादी व्यक्ति अल्लाला न जुमानणारी असेल, पण त्या व्यक्तीचें प्रत्येक कर्म अल्लाच्याच इच्छेप्रमाणें होत असल्यानें त्या कर्माची जबाबदारी त्या व्यक्तीवर येऊ शकत नाहीं, आणि अचिंत्यस्वरूप ईश्वरावर त्याची जबबदारी टाकणें ही मानवांच्या शक्तीबाहेरची गोष्ट आहे.

(३) तेव्हां अल्लाला शरण न जाणें हेंच पाप.

(४) अल्लाला शरण जाणें व इस्लाम धर्माचा पशु-बळाच्या जोरावर प्रचार करणें, ह्याचें योगानें कोणत्याही व्यक्तीला स्वर्गप्राप्ति करून घेता येते.

(५) अल्लाचें व इस्लामचें साम्राज्य, वेळ पडल्यास मनगटाच्या जोरावर, चोंहोकडे जगांत फैलावणें हाच सामुदायिक मोक्षाचा मार्ग.

(४) पाप ही वस्तु सत्य आहे.

१ बुद्धधर्म म्हणतोः—

(१) जग हेंच पापरूप आहे. जन्माला येणें म्हणजेच दुःखी होणें.

(२) कर्मविपाकाप्रमाणें प्रत्येक व्यक्तीला आपल्या प्राक्तन कर्मानुसार सुखदुःखें भोगावीं लागतात, तरी जगातील पापाच्या अस्तित्वाबद्दल कोणा-लाही जबाबदार धरता येत नाहीं.

(३) स्वभावतः कधींही तृप्त न होणारी तृष्णा हेंच पाप. व्यक्तीच्या यच्चावत् कर्मांचा अनिष्ट परिपाक म्हणजेंच पाप.

(४) तेव्हां वासनेचा उच्छेद करण्यानेंच मोक्ष मिळतो. मोक्षाचे योगानें जीवात्मा सर्व कर्मा-पासून व जन्म मरणाच्या फेऱ्यांतून कायमचा सुटतो.

(५) समाजांतून निघून एकांतांत जाणें व मठवासी होणें हाच सामुदायिक मोक्षाचा उपाय.

२ जैनधर्म असें मानतो कीं—

(१) जगांत दोन तत्त्वें आहेत; जड व आत्मा; पैकीं जड हा जगाचा अर्धा भाग पापरूप आहे; वस्तुस्वभावानेंच तो कायमचा पापरूप आहे. आत्मा मात्र शुद्धस्वरूप आहे.

(२) पापाबद्दल जबाबदार कोणीच नाहीं. जग हें स्वभावतःच द्वैतस्वरूप आहे.

(३) अनंत जीवात्म्यासभोंवती अनिष्टस्वरूप जडाचें आवरण असणें म्हणजेंच पाप.

(४) शरीर दमन करून आत्मा जडापासून मुक्त करणें हाच मोक्ष.

(५) सामुदायिक मोक्ष असूच शकत नाहीं. सिद्ध पुरुष हा एकान्तिक संन्यासीच असतो.

६ झोरास्ट्रियन धर्म असें प्रतिपादन करतो कीं—

(१) जगांतील अर्धा भाग पापरूप आहे; उदा०—अज्ञान, असत्य, अंधकार, प्रमाद व मृत्यु.

(२) सैतान ‘ आंग्रमैन्यु ’ हाच अखेरीस जगाच्या पापाबद्दल जबाबदार आहे.

(३) सत् व असत् यांच्यांतील स्वाभाविक विरोध हेंच पाप. जगाच्या रचनेंत एक क्रियाशील द्वैत स्वभावतःच दिसून येतें.

(४) आहुर मझ्द ह्या सत्स्वरूप परमेश्वराची आज्ञा पाळल्यानें मोक्ष मिळतो. विशेषतः सद्विचार, सद्वाणी, व सत्कर्म हे मोक्षाचे मार्ग होत.

(५) सामुदायिक मोक्षाचा उपायच नाहीं, (तरीपण शेतीची सुधारणा हा उपाय म्हणून प्रथम झोरास्टरनें सांगितलेला आढळतो). प्रत्येक व्यक्तीनें सदाचारानें वागावें म्हणजे अंतीं परमेश्वराचा विजय झाल्याखेरीज राहणार नाहीं.

कान्फ्यूशियस धर्माचें मत असें आहे कीः—

(१) जगांत फारसें पाप नाहींच. मनुष्य हा जात्याच भला आहे.

(२) वरिष्ठ वरिष्ठांचे चुकीबद्दल जबाबदार आहेत, तसेंच कनिष्ठ कनिष्ठांच्याच उद्धतपणाबद्दल जबाबदार आहेत.

(३) सामाजिक सदाचाराचा अभाव हेंच मुख्यतः पाप.

(४) पारस्परिक सदाचाराचे नियम पाळणें याचे योगानें मोक्ष मिळतो.

(५) सदाचार, सदादर्श, व सुराज्य हाच सामुदायिक मोक्षाचा उपाय.

खिस्तीधर्म असें सांगतो कीं—

(१) मानवी जीवनांत पाप ही एक सर्वव्यापी भयंकर गोष्ट आहे. मनुष्य हा मूलतः भला आहे, तरी पण त्याचे हातून पाप घडतें. हें पाप ईश्वराविरुद्ध, इतर मनुष्याविरुद्ध व स्वतःविरुद्ध असें त्रिविध असतें.

(२) ईश्वरानें पापपुण्याविषयीं मनुष्याला इच्छास्वातंत्र्य दिलें असल्यानें मनुष्यांच्या पापाबद्दल अखेरीस ईश्वरालाच जबाबदार मानलें पाहिजे. पारंपरिक पाप व इतर सामाजिक पाप याबद्दल खरोखरी समाजरचनेलाच जबाबदार धरले पाहिजे. प्रत्यक्षतः प्रत्येक व्यक्ति आपापल्या पापाबद्दल जबाबदार आहे.

(३) ईश्वरदत्त इच्छास्वातंत्र्याचा दुरुपयोग करणें हेंच मुळांत पाप. परोपकार हेंही पापच.

(४) व्यक्तीनें सर्वभावें प्रेम करणें, समाजाची सेवाभावाच्या तत्त्वावर रचना करणें, व परमेश्वराचा अनुग्रह, यांचे योगानें मोक्ष मिळतो.

(५) सामुदायिक मोक्षाचा उपाय शोधून काढणें अगत्याचें आहे. व्यक्तीच्या मोक्षालाही सामुदायिक मोक्षाची जरूर आहे. परमेश्वर व येशू ख्रिस्त ह्यांच्या साहाय्यानें प्रत्येक व्यक्तीनें समाजाची व समाजानें प्रत्येक व्यक्तीची सेवा केलीच पाहिजे.

९ ख्रिस्तीधर्माच्या सामर्थ्याचें बीज पुढील गोष्टींत आहे.

(१) परमेश्वर हा पवित्र व प्रेमळ पिता आहे ही कल्पना.

(२) ह्या धर्माचा संस्थापक येशू खिस्त याचें विमल चारित्र्य व शिकवणूक.

(३) विकासाला साहाय्य करणारा असा एक दैवी पवित्र आत्मा आहे ही कल्पना.

(४) [illegible]

(५) मृत्यूमुळेंही मानवी विकास कुंठित होत नाहीं, असा या धर्माचा विश्वास आहे.

(६) ह्याच्या धर्मग्रंथांची अपूर्वता.

(७) प्राण्यांना दुःखमुक्त करण्याविषयीं ह्या धर्माला सक्रिय कळकळ वाटते.

(८) खिस्तीधर्मांत जगाची सुधारणा करण्याचें सामर्थ्य आहे.

(९) ह्या धर्माची स्वमतप्रसाराची प्रवृत्ति.

१० खिस्तीधर्मांतील व्यंग्यें:—

(१) ईश्वराशी स्वतःचा साक्षात् संबंध मानणें हें ह्या धर्माच्या संस्थापकाचें जें उच्च ध्येय त्यापासून कांहीं खिस्तीधर्मपीठें च्युत झालीं आहेत.

(२) 'आम्ही ईश्वराचीं लेंकरें आहोंत ' असें म्हणण्यांत जी एकप्रकारची जबाबदारी अंगावर येऊन पडते, त्यांतून कांहीं खिस्तीधर्मपीठें निसटू पहात आहेत.

त्यानें आपल्याला दिलेली शक्ति यांचें चिन्ह होय, असें तो मानी. लोकांचा आपल्यावरील विश्वास वाढावा ह्याच उद्देशानें केवळ तो हे चमत्कार दाखवी असें नसून, त्याच्या हृदयांत दुःखी जीवाला पाहून प्रेमाचा व दयेचा उमाळा येई, हेंही तितकेंच खरें आहे.

(५) त्याच्या जीवनाचा विलक्षण अंत—

जीझसला शिपायांनीं पकडतांच त्याचे सर्व शिष्य त्याला सोडून पळून गेले. असें दिसतें कीं, त्यापैकीं कांहींजण निराश होऊन आपापल्या घरीं निघून गेले. जीझसचे थडगे चहूबाजूंनीं पक्के बंद केले होतें, तरी दोन दिवसांनीं तें उघडून पाहिलें असतां अगदीं रिकामें दिसलें ! तो येथें नाहीं पण येथून उठून गेला.' (मार्क १६:६)

मृत्यूच्या यातनतून सोडवून ईश्वरानें त्याला येथून उचलून नेले. तो कायमचा थडग्यांत राहणें शक्यच नव्हतें ? (ॲक्ट्स् २:२४)

खुद्द त्याच्या शिष्यांना तो थडग्यांतून निघून गेला ही गोष्ट खरी वाटेना. पण जेव्हां शिष्यांशीं त्यानें बोलायला सुरवात केली, तेव्हां त्यांची खात्री झाली कीं तो जिवंत आहे. सुळावर चढविण्यापूर्वी त्यानें आपल्या सर्व शिष्यांना आशीर्वाद दिला, आणि आत्मिकदृष्ट्या मी कायमचा जिवंत आहे, असें त्यानें सर्वांना निश्चयपूर्वक सांगितलें. शिवाय माझें धर्मतत्त्व जगांत प्रसृत करण्याकरतां तुम्ही सहाय्य करा, असेंही त्यानें सर्वांना निक्षून बजा-

प्रकरण १३ वें

विद्यमान धर्मांची संक्षिप्त तुलना

१ ह्या धर्मांच्या परस्पर सादृश्याचे व वैसादृश्याचे कांहीं सामान्य मुद्दे:—

वरील सर्व धर्मांत कांहीं मुद्दे अगदीं समान आहेत, नाहीं म्हणायला ख्रिस्तीधर्मांत हे मुद्दे थोडे निराळ्या स्वरूपाचे आहेत. या सर्व समान मुद्दयांचे ह्या ठिकाणीं खास स्वतंत्र परीक्षण व सिंहावलोकन करणें योग्य आहे.

(१) परमेश्वर एक आहे हा विश्वास.

ह्या बाबतींत मूळच्या जैन व बौद्ध धर्मांनीं उघड उघड विरोध केला होता. पण पुढें पुढें या दोन्हीही धर्मांत, त्या त्या धर्माच्या संस्थापकांची पूजा सुरु झाली.

यहुदी धर्मांतही वनवासकालापर्यंत, जेहोवा हा एक पूज्य देव आहे असा समज होता. तरीपण इतर राष्ट्रांनीं आपापल्या इष्ट देवतांची पूजा करावी अशीही त्या धर्मानें इतरांना मोकळी

वाट ठेविली होती. परंतु वनवासानंतर मात्र अखेरपर्यंत यहुदी-धर्मानें सतत एकेश्वरवादाचाच पुरस्कार केला आहे.

कान्फ्यूशियन धर्मांतही एकच परमेश्वरावर विश्वास ठेवण्याची शिकवण आहे, पण त्या परमेश्वराला कधीं कधीं ह्या धर्मांत सगुण जगदीश्वर तर कधीं कधीं निर्गुण मानलें आहे. तरीपण ह्या परमेश्वराची पूजा साऱ्या चीन देशांत एकाच व्यक्तीला करण्याचा अधिकार आहे असें हा धर्म मानतो. ती व्यक्ति म्हणजे चीनचा बादशहा. आणि बादशहालासुद्धां दरवर्षी डिसेंबर ता. २२ रोजीं रात्रौ फक्त एकदाच ही पूजा करता येते. व्याव-हारिक अथवा लौकिकी कान्फ्यूशियन धर्मानें अनेक आत्म्यांची (निसर्गदेवतांची अथवा पितृदेवतांची) पूजा करण्याची सामान्य लोकांना सूट दिली आहे.

झोरास्ट्रियन धर्म, एकच विश्वशक्ति—आहुरमज्द—ह्याची उपा-सना करावी, असें सांगतो, पण ही विश्वशक्ति सर्वातिशायी नाहीं, कारण ह्या शक्तीशी विरोधी अशी आंग्र मैन्यु ही दुसरी एक विश्वशक्ति आहे असें हा धर्म मानतो. याशिवाय आहुर मज्दाचे खालोखाल त्याच्या हाताखालील इतर शुभ देवतासुद्धां पूजनीय आहेत असें या धर्माचें सांगणें आहे.

हिंदु व टाओ ह्या दोन्हीही धर्मांत एक निर्गुणतत्त्व (परब्रम्ह किंवा टाओ) जगाचा परमेश्वर आहे असें मानलें आहे. या निर्गुणतत्त्वाची पूजा करणें शक्य नसल्यानें त्याचें ध्यान करायला या धर्मांत सांगितलें आहे. तरी या धर्माच्या लौकिकी स्वरूपांत अनेक देवतावांदाचें प्रस्थ फार माजलें असून त्यांत अनेक देव-तांची साक्षात् पूजा करण्यास सांगितलें आहे.

निर्भेळ एकेश्वरवाद म्हणजे सर्व लोकांना एकजात एकच परमेश्वराची—एकाच विश्वशक्तीची पूजा करायला सांगणें, हा प्रकार फक्त चार धर्मांतच आढळतो. वनवासानंतरचा यहुदीधर्म, ख्रिस्तीधर्म, मुसलमानधर्म व शीखधर्म हे ते चार धर्म. हे चारही धर्म एकाच परमेश्वर मानतात, तथापि परमेश्वर हा नीतिसंपन्न आहे असें मानणें ही ख्रिस्तीधर्माची अपूर्वता आहे. यहुदी व इस्लाम या धर्मांचा ईश्वर जगाच्या उद्धाराकरतां स्वतः स्वात्मार्पणपूर्वक प्रयत्न करीत असल्यानें दिसत नाहीं, अथवा त्या ईश्वराच्या पृथ्वीवरील प्रेषितानें अथवा प्रतिनिधीनेंही स्वार्थ-त्यागपूर्वक जगदुद्धाराचा प्रयत्न केल्याचें इतिहासांत आढळत नाहीं. याचे उलट ख्रिस्तीधर्मांतील परमेश्वराच्या कल्पनेंत अत्युदात्त नीतितत्व दिसून येतें—तें हें कीं, या धर्मांतील परमेश्वर हा मनुष्यांचा पवित्र व प्रेमळ असा दैवी पिता असून तो अखिल मानव जातीचें कल्याण करण्याचा प्रयत्न स्वतः करीत असतो व तें करताना मानवजातीचा विश्वास, सहकार आज्ञापालन वगैरेंचीही तो अपेक्षा करतो.

(२) दैवी अवताराची कल्पना

ईश्वर हा अवतार घेतो ही कल्पना अनेक धर्मांत आढळते, पण बहुधा ह्या सर्व धर्मांत ह्या कल्पनेचें निराळेपण कोणत्याना कोणत्यातरी बाबतींत दिसून येतें; व त्याचा व्यावहारिक उपयोग निरनिराळ्या रीतीनें निरनिराळ्या धर्मांत केलेला आढळतो.

हिंदु तत्त्वज्ञानांत उपनिषत्कालापासून असें मानण्यांत येतें कीं, प्रत्येक पदार्थ हा निर्गुण, अमूर्त व पुण्यपापाहून पर

अशा परब्रह्माचा आविर्भाव आहे. तरीपण त्यातल्या त्यांत उच्चवर्णीय ब्राह्मणांना ब्रह्माचा अवतार मानण्याचा जास्त प्रघात आहे.

लौकिक हिंदुधर्मांत राम कृष्ण इत्यादि अनेक उपास्य देवता मानल्या आहेत ह्या सर्व देवता मूळ परमेश्वर स्वरूप असून पृथ्वीवर मानुषरूप धारण करून अवतरल्या आहेत, असें हिंदु-लोक मानतात. विष्णु ह्या देवतेनें अनेक अवतार घेतल्याची प्रसिद्धि आहे. ह्या अवतारांची संख्या नवापासून बावीसपर्यंत मतभेदानें मानली आहे. ह्यापैकीं कांहीं अवतार पशूंचेही आहेत. ह्या हिंदु अवतारांपैकीं कोणताही अवतार नीतीचे बाबतींत आदर्श अथवा सगुण परमेश्वराचा साक्षात् प्रतिनिधी मानिला जात नाहीं.

बौद्धधर्मीय वस्तुतः पूर्ण निरीश्वरवादी, पण त्याच्यांतही बुद्धाला पुढें पुढें अवतार मानू लागलें. आजपर्यंत बुद्धाचे चोवीस अवतार होऊन गेले. त्यापैकीं गौतमबुद्ध हा चोविसावा. यापुढें एक पंचविसावा बुद्धाचा अवतार पुढें होणार आहे, असें हे लोक मानतात.

इस्लामधर्मांत, अल्ला हा जगाहून संपूर्ण पर आहे अशी दृढ मान्यता असूनही, अवताराचें मत शिरलेंच आहे. त्या धर्मांतील शियापंथ हा सुनी ह्या दुसऱ्या एका प्रमुख पंथांतून जो फुटून निघाला तो "अली हा चवथा खलीफ हा खरा अवतार असल्यानें महंमदाच्या नंतर गादीवर बसण्यास सर्वथैव योग्य आहे." ह्या मुद्यावर. अली हा अवतार असें शियापंथीय मानतात. तरी पण आजपर्यंत अल्लांचे अवतार किती झाले—सात कां बारा—

आणि त्यांतला शेवटचा अवतार कोण ह्या बाबतींत अजूनही कांहीं शिया उपपंथांत मतभेद आहेच.

तथापि, खिस्ती धर्मांतील मात्र मुख्य आणि विशिष्ट मान्यता ही आहे कीं, येशूखिस्त हा ईश्वराचा अपूर्व अवतार आहे. परमेश्वराचा शब्द अथवा शब्दब्रह्म हेंच एका ऐतिहासिक व्यक्तीच्या रूपानें अवतरलें आहे असें हा धर्म मानतो; कारण पवित्र व अमूर्त परमेश्वराचें स्वरूप व जगन्निर्माणाचा हेतु ही या मानुष अवतारांत संपूर्णतया व्यक्त झालेली दिसतात. अर्थात्च मानवी जीविताची मर्यादा ध्यानांत ठेवूनच ह्या वरील विधानाचा अर्थ केला पाहिजे हें उघड आहे.

(२) धर्म संस्थापक दैवी पुरुष आहे ही कल्पनाः—

खिश्चन धर्माहून निराळे असे चार धर्म आपापल्या संस्थापकांना दैवी पुरुष मानतात.

चमत्कारांनीं भरलेल्या अशा कांहीं अर्वाचीन बौद्ध धर्मग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, जन्मापूर्वीं बुद्ध हा दैवी पुरुष होता व एका राणीला एक भावी सत्यकथन करणारें स्वप्न पडल्यामुळें तिच्या उदरांत तिच्या वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षीं बुद्धानें तिचें प्रथम अपत्य म्हणून जन्म घेतला.

तसेंच लाओट्झ या धर्माचार्याविषयीं लाओट्झनंतर हजार वर्षांनीं लिहिलेल्या एका ग्रंथांत सांगितलें आहे कीं, तो जन्मतःच एक ‘ ज्ञानी वृद्धपुरुष ’ अथवा ‘ एक वृद्धतत्वज्ञानी ’ म्हणूनच प्रकट झाला. जन्मतःच त्याचे केस पांढरे होते व आईच्या पोटांत तो बहात्तर वर्षे (कुणी ह्मणतात एक्यायशीं

ग्रें) राहिला होता. (पहा ह्याच ग्रंथाचें पृष्ठ; शिवाय एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका १६:१९२ अकरावी आवृत्ति; महावीर ह्या जैन तीर्थंकारानंतर ९८० वर्षांनीं लिहिलेल्या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, जन्मापूर्वी महावीर हा एक दिव्य पुरुष होता. त्याच्या भावी आईला (एका राणीला) चौदा अद्भुत स्वप्नें पडलीं, तीं खरीं करून दाखविण्याकरतां त्यानें त्या राणीच्या उदरांत अतिमानुषरीतीनें प्रवेश केला.

झोरास्टर हाही एका कुमारिकेचा पुत्र असल्याचें सांगितलें आहे. एका अर्वाचीन झोरास्ट्रियन ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, झोरास्टरची आई पंधरा वर्षांची अविवाहित बालिका असतांना तिला अलौकिकरीतीनें गर्भधारणा झाली. झोरास्ट्रियनप्रमाणेंच आणखी तीन प्रेषितांचे बाबतींतही अशाच रीतीनें पंधरा वर्षांच्या कुमारिकांपासून त्यांची उत्पत्ति झाल्याचें लिहिलें आहे.

बायबलच्या नव्या करारांत मात्र येशूख्रिस्ताचा जन्म दैवी होता कां मानुष होता याविषयीं निश्चित असें विधान सांपडत नाहीं. तथापि, खुद येशूख्रिस्ताच्या उद्गारावरून व इतरांच्या त्याच्याविषयींच्या उद्गारावरून असें दिसतें कीं, त्याचा जन्म साक्षात् परमेश्वरापासूनच झाला होता. परमेश्वराला तो 'पिता' म्हणत असे. आणि ह्या पित्याशी त्याचा पुत्र हा अत्यंत जिव्हाळ्याचा अखंड संबंध होता.

(४) धर्मग्रंथांतील सत्यतत्त्वें अपौरुषेय व ईश्वरकृत असल्याबद्दलची कल्पना.

विद्यमान धर्मांपैकीं प्रत्येक धर्मातील लोक असें मानतात कीं, आमचें धर्मग्रंथांत दैवी सत्यज्ञान असून

तें मनुष्यलिखितही नाहीं अथवा मनुष्यानें शोधूनही काढलेलें नाहीं. याशिवाय ख्रिस्तीलोक असेंही मानतात कीं, ईश्वरानें आपल्या अस्तित्वाचा पुरावा जगांत प्रत्येक ठिकाणीं सांपडावा म्हणून प्रत्येक धर्मांत कांहीं विशिष्ट सत्यतत्त्वें प्रकट केलीं आहेत. (ॲक्टस् १४:१७) अशा विशिष्ट सत्यतत्त्वांची यादी खालीं दिली आहे:—

हिंदुधर्मांतील विशिष्ट तत्त्वें—

परमेश्वर हा विश्वांत ओतप्रोत भरून राहिला आहे. २ चातुर्वण्य हें ईश्वरकृत आहे. ३ ईश्वराशी सायुज्य पावणें हें मानवी जीविताचें अन्तिमध्येय होय.

जैनधर्मांतील विशिष्ट तत्त्वें:—

सर्वसंन्यास हाच मोक्षाचा मार्ग. देहदंडनपूर्वक आत्ममोक्ष हेंच ध्येय.

बुद्धधर्मांतील विशिष्ट तत्त्वें:—

१ वासना हेंच दुःखाचें मूळ. २ आत्मसंयम व आत्मशुद्धि हाच मोक्षाचा मार्ग.

शीखधर्मांतील विशिष्ट तत्त्वें:—

एका सतस्वरूप परमेश्वराचें शिष्यत्व हाच धर्म. २ ईश्वराच्या नामस्मरणावर संपूर्ण श्रद्धा.

कान्फ्युशियन धर्मांतील विशिष्ट तत्त्वें:—

मानवी स्वभावांत मूलतःच चांगुलपणा असून तो दैवी स्वरूपाचा आहे, २ सामाजिक सदाचार हाच खरा धर्म.

टाओधर्मांतील विशिष्ट तत्त्वें:—

शांतिमय व दैवी ' टाओ ' पंथ नम्रपणानें अनुसरणें हाच धर्म.

शिंटोधर्मांतील विशिष्ट तत्त्वें:—

निसर्ग हीं ईश्वराची एक सुंदर कृति आहे. वरिष्ठांची आज्ञा पाळणें व आत्मशुद्धि करणें हाच धर्म.

यहुदाधर्मांतील विशिष्ट तत्त्वें:—

पुण्यस्वरूप ईश्वराची आज्ञा पाळल्यानेंच उच्च आनंदाची प्राप्ति होते.

झोरास्ट्रियन धर्मांतील विशिष्ट तत्त्वें:—

सत्स्वरूप विश्वशक्तीशीं, पापशक्तीविरुद्ध लढण्याकरता सहकार करणें हाच धर्म.

इस्लामधर्मांतील विशिष्ट तत्त्वें:—

सर्व शक्तिमान् परमेश्वराला शरण जाण्यानें एका निरतिशय

आनंदाची प्राप्ति होते. परमेश्वर हा केवळ राजाधिराजच नसून, न्यायी व पापपुण्याचीं फळें देणाराही आहे.

जगांतील धर्मांत असलेलीं उपर्युक्त सत्यतत्त्वें साक्षात् परमेश्वरानें प्रकट केलीं आहेत, असें मानण्यांत येतें. हीं सर्व तत्त्वें ख्रिस्तीधर्मांत आहेतच, पण या सर्वांपेक्षांही एक उच्च तत्त्व यांच्या जोडीला ख्रिस्तीधर्मांत दिसून येतें; आणि हीं सारीं तत्त्वें परस्पर संवादानें एकत्र त्या धर्मांत नांदत आहेत. हें उच्च ईश्वरीय तत्त्व हें कीं, जगांतील श्रेष्ठ शक्ति हा एक परिपूर्ण सगुण पुरुष आहे व त्यांच्याशीं आपला सर्वांत योग्य संबंध पित्याचा आहे. या स्वर्गीय पित्याचा पृथ्वीवरील परिपूर्ण प्रतिनिधी व पुत्र येशूख्रिस्त हा होय. ह्या पित्याची प्रेमानें आज्ञा पाळणें व आपल्या मानव बांधवांची प्रेमानें सेवा करणें ह्यांतच प्रत्येक व्यक्तीला परमानंदाची प्राप्ति होते.

(५) धर्मग्रंथ अपौरुषेय असल्याची कल्पना:—

भूतकालीन बारा धर्मांत पवित्र धर्मग्रंथ असे नव्हतेच. पण विद्यमान अकरा धर्मांत मात्र धर्मग्रंथ आहेत; यांतील अपूर्व दैवी सत्यतत्त्वें मोक्षाकरतां प्रत्येकानें जाणलीच पाहिजेत असें दरएक धर्मांत मानण्यांत येतें. हे धर्मग्रंथ खालील प्रमाणें:—

हिंदुधर्मांतील	धर्मग्रंथ	वेद म्ह० ‘ ज्ञानाचे ग्रंथ ’
जैन ,,	,,	अंगें म्ह० ‘ ज्ञानाचीं अंगें ’

बौद्ध	,,	,,	त्रिपिटक म्ह० 'उपदेशाच्या तीन टोपल्या '
शीख	,,	,,	ग्रंथ म्ह० ' उच्च पुस्तक '
कान्फ्यूशियनधर्म		,,	पांच आदर्श-ग्रंथ व इतर चार
टाओ	,,	,,	ग्रंथ 'टाओ–टे–किंग' म्ह० सद्गुण व ज्ञानाचा धर्मग्रंथ
शिंटो	,,	,,	कोजिकी म्ह० 'प्राचीन–वृत्तांत-संग्रह ' २ निहानगी म्ह० जपानचा वृत्तान्त.
यहुदी	,,	,,	'धर्मशास्त्र' 'धर्माचार्य' व 'पवित्र लिखाण '
झोरास्ट्रियन	,,	,,	अवेस्ता म्ह० ' ज्ञान '
इस्लाम	,,	,,	कुराण म्ह० 'वाचन अथवा पठण'
खिस्ती	,,	,,	बायबल म्ह० 'उत्कृष्ट पुस्तक'

ह्यापैकीं दोन ग्रंथ वेद व कुराण हे ईश्वरानें स्वतः प्रकट केले असून त्यांतील प्रत्येक अक्षर मंत्र असून त्यांत अबाधित सत्य भरलेलें आहे, असें मानण्यांत येतें. कांहीं खिस्तीधर्मशास्त्री बायबलविषयीं थेट असेंच मानतात. प्रत्येक धर्मांतील लोक "आमचा हा धर्मग्रंथ जगांतील साहित्यांत सर्वश्रेष्ठ व अद्वितीय आहे " असेंच मानतात.

उदाहरणार्थ, झोरास्ट्रियन धर्म काय ह्मणतो पहा, " अवेस्ता हा एक अद्भुत ग्रंथ आहे जगांतील सर्व पंडितांचें असें मत आहे कीं, ह्या ग्रंथांत अत्युच्च ज्ञानाचीं उत्कृष्ट सुभाषितें संगृहीत केलीं आहेत. (दिनूकर्द ७:५, ११; से. बु. ई. ४७:७६)

शिंटोधर्म स्वतःच्या धर्मग्रंथाविषयीं ह्मणतो:—" ह्या आदर्शग्रंथासारखें अत्युदात्त व मूल्यवान् लिखाण साऱ्या दुनियेंत सांपडायचें नाहीं. (निह्मानगीचें अस्टननें केलेलें भाषांतर भाग १ पृ. १३ टिप्पणी १ ली)

ख्रिस्तीधर्मही आपल्या धर्मग्रंथाला—बायबलाला-ईश्वरानें प्रकट केलेला ग्रंथ मानतो; पण त्याबरोबरच त्या ग्रंथाची किंमत केवढी थोर आहे हें त्या धर्मानें खालील व्यावहारिक कसोटी लावून सिद्ध केलें आहे:—बायबल हा अपौरुषेय ग्रंथ अत्यंत उच्च आहे कां, तर त्यांत ईश्वर व मानव याविषयीं जें ज्ञान प्रकट झालें आहे त्याचे योगानें अत्यंत उच्च व पवित्र धार्मिकजीवन घालविण्याची स्फूर्ति प्रत्येक व्यक्तीला होते.

(६) चमत्कारांचीं वर्णनें—

विद्यमान अकराही धर्मांत त्या त्या धर्मांच्या संस्थापकाच्या जीवनासंबंधीं धर्मदृष्ट्या अत्यंत महत्वाचे असे चमत्कार वर्णिले आहेत. उदाहरणार्थ बौद्धधर्मांत बुद्धाविषयीं वर्णिलेले चमत्कार:—

बुद्ध नावेंत न बसतां एका क्षणांत गंगानदीच्या पैल तीराला गेला. (से. बु. ई. ११:२१; १७:१०४)

बुद्ध आश्चर्यकारक रीतीनें प्रकट होत असे, व गुप्त होत असे. (से. बु. ई. ४८:४९;१०४:१०७)

केवळ एकदाच पाहून एका आजारी बाईला त्यानें बरें केलें. (से. बु. ई. १७:८३—८४)

चमत्कार दाखवून व उपदेश करून एका नास्तिकाला त्यानें बुद्धधर्मांत घेतलें. (से.बु.ई. १०:२;१२—१४)

चमत्कार दाखवून शेंकडो लोकांना त्यानें बुद्धधर्मांत आणिलें. (से. बु. ई. १३:१२२-१३४ १७:३-५; १९:२२१-२२६)

पूर्वी कांहींएक तयारी नसतां पांचशें शिष्यांना त्यानें जेवायला घातलें. (जातक कथा ७८)

झोरास्टरचे चमत्कार—

झोरास्टरनें चमत्कार केल्याचें गाथा या प्राचीन ग्रंथांत वर्णन नाहीं. पण पुढील धर्मग्रंथांत त्याचेसंबंधीं अनेक चमत्कार वर्णिले आहेत. विशेषतः त्याचे जन्मासंबंधींचे (से. बु. ई. ४७:१७ ३४; १३९; १४३) व त्याचे बालपणाविषयींचे चमत्कार (से. बु. ई. ४७: ३५-४६; १४४-१४८) वर्णिलेले आढळतात.

त्यानें अनेकांचे रोग बरे केलें; तो लांडग्याशीं व इतर उपद्रवी जनावरांशीं झुंजला. त्यानें निरभ्र आकाशांतून पाऊस पाडला; त्यानें गारा अधांतरीं थांबविल्या; कोळी, टोळ व इतर उपद्रवी प्राण्यांना त्यानें अगदीं आपल्या ताब्यांत ठेवले होते. (से. बु. ई. ४७:७६)

महंमदानें

लोकांनीं आव्हान केलें असतांही ‘ चमत्कार करण्याचें माझ्यांत सामर्थ्य नाहीं ’ असें स्पष्ट कबूल केलें होतें. (कुराण ६:१०९; १०:२१; १७:९२-९८; २१:५ -१०,२९-४९)

तरीपण पुढील ग्रंथांत त्यानें अनेक चमत्कार केल्याचें वर्णन आहे. मर्कहंद यानें मध्ययुगांत लिहिलेल्या

महंमदाच्या चरित्राचीं पन्नास पानें चमत्कारांच्या वर्णनानें भरलीं आहेत.

येशूनें दाखविलेल्या चमत्कारांचें बायबलांतील वर्णन इतर धर्मग्रंथांतील वर्णनासारखेंच बहुधा आहे; तरीपण मृत्यूनंतर व जमिनींत पुरल्यानंतर लौकरच, पुन्हां सजीव स्थितींत थडग्यांतून बाहेर येणें व पूर्ववत् शिष्यांना उपदेश करून धर्ममार्गाला लावणें हा चमत्कार येशू ख्रिस्ताच्या बाबतींत झाल्याचें जसें वर्णिलेलें आढळतें, तसें इतर आजपर्यंतच्या कोणाही ऐतिहासिक व्यक्तीच्या बाबतींत झाल्याचें वर्णिलेलें नाहीं.

(७) उत्कृष्ट सदाचाराचे नियम —

दुसऱ्याशीं योग्यरीतीनें वागण्याचे नियम व इतर सदाचाराचे नियम एकंदरींत आठ धर्मांत सांगितले आहेत.

धर्म	सदाचारांचे नियम
हिंदुधर्म	.... दुसऱ्यानें जें तुझ्याविषयीं केलें असतां, तुला दुःख होईल, तें तूं दुसऱ्याविषयीं करूं नकोस. हें धर्माचें सार (महाभारत ५:१५: ७, मॉनियर विल्यमकृत भाषांतर, इंडियन विज्डम या ग्रंथांतल्या उताऱ्यावरून)
बुद्धधर्म	.... प्रत्येकानें आपल्या जातिबांधवांना, मित्रांना व इतर परिचितांना अगदीं

आपल्यासारखें वागवावें (शिगलोवद सुत्त ३१ बुद्धधर्मग्रंथ ४:१८२) "हे राहुला! तुला एखादें कृत्य करावेंसें वाटल्यास प्रथम असा विचार करीत जा कीं, ह्या कृत्यानें माझें नुकसान होण्याचा, अथवा दुसऱ्याचें नुकसान होण्याचा, अथवा माझें व दुसऱ्याचें असें दोघांचेंही नुकसान होण्याचा संभव आहे काय ? जर संभव असेल, तर तें कृत्य वाईट मान; कारण त्यापासून दुःख होणारच. असलें कृत्य तूं केव्हांही करूं नकोस. (मज्झिमनिकाय १:१४५ मिसेस र्‍हाइस डेव्हिड यांच्या बुद्धधर्म या पुस्तकांत अनुवादित)

कान्फ्यूशियन धर्म.... 'रुपेरी नियम ' असें नांव कान्फ्यूशियसनें सदाचाराच्या नियमांना दिलें होतें. ह्या नियमांचें वर्णन ह्या धर्माच्या ग्रंथांतून निरनिराळ्या सहा ठिकाणीं सांपडतें.

पण ह्या सर्व ठिकाणीं हे नियम विधिमुखानें (म्हणजे 'अमुक कर' या स्वरूपांत)न सांगतां निषेधमुखानें (म्हणजे 'अमुक करूं नकोस' ह्या

स्वरूपांत) सांगितले आहेत. उदा० :- सद्गुरू म्हणाले, 'दुसऱ्यानें आपल्याला जें करू नयेसें वाटतें, तें आपण दुसऱ्याला करू नये.' (अनालेक्टस् १५:२३ व ५:११, १२:२ श्रेष्ठज्ञान १०:२ मध्यममाग १३:३ लीकी २८:१, ३२; से. बु. ई. २८:३०५)

टाओधर्म ... . अपकाराची फेड उपकारानें करा. (से. बु. ई. ३९:१०६) जे माझ्याशी भलेपणानें वागतात, त्यांच्याशी तर मी भलेपणानें वागतोंच, पण जे माझ्याशी भलेपणानें वागत नाहींत, त्यांच्याशीसुद्धां मी भलेपणानें वागतों. अशारीतीनें सर्वच भलेपणानें वागू लागतात. जे माझ्याशी निष्कपटपणानें वागतात, त्यांच्याशी तर मी निष्कपटपणानें वागतोंच, पण जे माझ्याशी निष्कपटपणानें वागत नाहींत त्यांच्यांशीही मी निष्कपटणानें वागतों. अशारीतीनें सर्वच लोक निष्कपटपणानें वागू लागतात. से. बु. ई(३९:९१)

झोरास्ट्रियनधर्म .... जें तुला आवडत नाहीं तें दुसऱ्याला आवडावें असा आग्रह राखू नको. अशा रीतीनें वागलास तरच तूं सदाचारी म्हणायचा. (से. बु. ई. २४:३३०)

स्वतःला जें अनिष्ट वाटतें तें दुसऱ्याला न करणें याचेंच नांव चांगला स्वभाव. (से. बु.ई. १८:२७१)

एखाद्या सज्जनाला कोणी द्वेषानें मारलें, तर तें मलाच मारलें असें प्रत्येकानें समजावें. (से. बु. ई. ३७:५१)

यहुदीधर्म... .... बाळा ! प्रत्येक कृत्य विचार करून कर; व प्रत्येकाशी वागताना नीट विचार करीत जा. तुला ज्याचा तिटकारा आहे तें दुसऱ्याला करू नकोस. (टोबीर ४:१४:१५)

दुसऱ्यानें आपल्याला जें करू नये असें तुला वाटतें तें तूं दुसऱ्यांना करू नको. (बाबिलोनचा साबाथ ३१ अ)

ग्रीकतत्त्वज्ञान.... .... दुसऱ्याला दुःख देऊ नकोस, कारण तुला स्वतःला दुःख व्हावें असें वाटत नाहींना ? (इसाक्रेटिस,

निकोक्लीज किंवा सायप्रीयन्स ६१; ई. एस. फॉर्स्टर कृत इसाक्रीटसूचीं सायप्रीयन व्याख्यानें १४९)
तुला तुझ्या मित्रांनीं जसें वागवावेसें वाटतें, तसें तूं त्यांना वागवीत जा. (आरिस्टॉटल: डायोजीनिस लेर्टियस कृत "प्रसिद्ध तत्त्वज्ञांचीं मतें व चरित्रें" या पुस्तकाचे आधारें. ५:२१ बोहन लायब्ररींतील भाषांतर पृ. १८८) जें अनुभवतांना दुसऱ्यांना दुःख होईल तें करूं नकोस. [यूसेबियस्च्या प्रेपेरेशियो एव्हॅन्जेलिका (८:७१६) या ग्रंथांत उध्दृत केलेले फिलोचे नियम]

ख्रिस्तीधर्म... दुसऱ्यांनीं तुमच्याशीं जसें वागावें असें तुम्हाला वाटतें, तसं तुम्ही दुसऱ्यांशीं वागत जा. (मात्थी ७:१२)
तुम्हांला दुसऱ्यानें जें करावेंसें वाटतें तें तुम्हीं दुसऱ्यांना करा (ल्यूक ६:३१)

अशा रीतीनें आठ धर्मांत सदाचाराचे नियम दिलेले आढळत असले, तरी ते नियम बहुधा प्रत्येक धर्मांत निषेधमुखानें सांगितलें आहेत. म्हणजे तुला जें स्वतःला केलेलें आवडत नाहीं,

तें तूं दुसऱ्याला करूं नकोस' अशा स्वरूपाचे तें नियम आहेत. फक्त येशूखिस्त व लाओट्झ या दोनच धर्मसंस्थापकांनीं हे सदाचाराचे नियम विधिमुखानें (अमुक तऱ्हेनें वाग, अशा स्वरूपांत) व व्यापकदृष्टीनें सांगितलेले आढळतात. म्हणजे दुराचार करूं नकोस असें नकारार्थी न सांगतां, 'प्रेमानें वाग,' असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. शिवाय, इतर धर्मांत बहुधा ' तूं आपल्या जातिबांधवांशीं व मित्रांशीं चांगला वाग ' असें मर्यादित विधान केलें आहे; पण वरील दोन धर्मसंस्थापकांनीं अखिल जगांतील प्राणिमात्रांशीं प्रेमानें वागत जा असें अत्यंत व्यापक विधान केलें आहे. तरीपण, या दोघांतही पुन्हा फरक आहेच. कारण ख्रिस्तानें ' आधीं केलें, मग सांगितलें ' अशा तऱ्हेचा आपल्या प्रत्यक्ष जीवनांत उतरविलेला उपदेश लोकांना केला आहे. पण लाओट्झ आपल्या ऐंशी वर्षांच्या आयुष्यांत दुसऱ्याला केलेल्या सुंदर उपदेशाप्रमाणें स्वतः वागलेला मुळींच दिसत नाहीं. इतकेंच नव्हे तर, अडचणीची वेळ येतांच त्यानें समाजसुधारणेच्या कार्यांतून आपलें अंग काढून घेतलें व अनिष्ट गोष्टींना तोंड देण्याचें टाळलें.

येथें प्रसंग आल्यामुळें हेंही सांगणें भाग आहे कीं, वरील सर्व धर्मसंस्थापक व तत्त्वज्ञानी, सदाचाराच्या आवश्यकतेच्या बाबतींत, जरी एकमत असले, तरी त्यांतल्यात्यांत दोन तऱ्हेनें येशू ख्रिस्ताचें अपूर्वत्व दिसून येतें. एकतर एकट्या येशू ख्रिस्तानेंच स्वतःच्या उपदेशाप्रमाणें शत्रूंशींदेखील स्वतःच्या प्राणावर बेतली असतांही प्रेमाचें वर्तन ठेवलें, व दुसरें हें कीं, अखिल जगाशीं प्रेमानें वाग-

याचा हा कित्ता एकट्या येशूनेंच आपल्या पित्याकडून (खुद्द ईश्वराकडून) घेतला होता.

" मी तुम्हांला सांगतों कीं, तुम्ही आपल्या वैऱ्यावरही प्रेम करा; तुमचा छळ करणारावरही तुम्ही प्रेम करा, म्हणजे तुम्ही स्वर्गीय पित्याचे खरे पुत्र व्हाल (म्ह० शोभाल); कारण तुमचा स्वर्गीय पिता सूर्याला सरसकट चांगल्या व वाईट पदार्थांवर आपला प्रकाश पाडण्याची आज्ञा करतो, आणि पर्जन्यालाही दुष्ट व सुष्ट सर्वांच्यावर एकजात पडण्याची आज्ञा करतो. (माथ्थी ५-४४–४५)

(८) स्वतःचें धर्ममंडळ विशेष पवित्र असल्याचा अभिमान.

जगांतील सर्व धर्म आपापल्या मंडळाला सर्वांत जास्त पवित्र मानतात. निदान तें मंडळ पवित्र असलेंच पाहिजे असें समजतात.

जैन व बौद्ध या दोन एकान्तिक व्यक्तिनिष्ठ धर्मांनीं आपापल्या धर्मांतील अनुयायांचे स्वतंत्र गट बनविले आहेत. ह्या अनुयायांच्या गटांना 'संघ' असें विशिष्ट नांव देण्यांत येतें. त्यांतल्या त्यांत या धर्मांतील भिक्षूंचे पण स्वतंत्र संघ आहेत. हे लोक स्त्रियांना कमी प्रतीच्या लेखतात.

हिंदुधर्म आपल्यांतील चातुर्वर्ण्याला ईश्वरकृत मानतो, व तें चातुर्वर्ण्य जगांतील इतर कोणत्याही वर्णापेक्षा पवित्र आहे असें मानतो; या चातुर्वर्ण्यांतील वर्ण उत्तरोत्तर श्रेष्ठ मानण्यांत येतात.

उच्चनीचपणाची ही भानगड, जन्मजात वर्णाची ही प्रणाली व राष्ट्राराष्ट्रांतील हे भेदभाव या सर्वांना इस्लामनें एका तडाख्यांत उखडून टाकलें आहे. जगाचा राजाधिराज जो अल्ला त्याला शरण जा, एवढेंच ह्या धर्माचें सर्वांना आग्रहाचें सांगणें आहे; व अल्लाचें कार्यांत मदत करण्याकरतां हा धर्म यच्चयावत् मानवजातींना बोलावीत आहे.

"धर्मयुद्धांत खांद्याला खांदा भिडवून लढत असता घायाळ होणारे व अल्लावर श्रद्धा ठेवणारे लोक कोणत्याही देशांतील व जातींतील असो, ते सर्व एकमेकांचे बंधुच समजावे." (कुराण ८:७२)

तरीपण या धर्मांत एक गोम आहे, ती ही कीं, जे पाखंडी लोक अल्लाला सर्वभावें शरण जात नाहींत आणि म्हणूनच जे इस्लाम धर्मांतील श्रद्धाळु, धार्मिक मुसलमानांच्या पवित्र संघांत प्रविष्ठ होत नाहींत, त्यांचा संहारा करावा असें महंमदानें सरळ सांगितलें आहे !

पण ख्रिस्तीधर्माची शिकवण अशी आहे कीं, सर्व मानवजातीला नैतिकदृष्ट्या पवित्र करण्याचा आणि प्रत्येक व्यक्तीला व राष्ट्राला प्रेमानें विश्वपित्याच्या छत्राखालीं अखिल मानव जातीच्या एका विशाल भ्रातृसंघांत आणण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येक ख्रिस्ती मनुष्याचें कर्तव्य आहे.

९ विश्वधर्माची आशा

स्वतःचा धर्म विश्वधर्म करण्याची आशा बाळगणें ह्या दृष्टीनें विद्यमान धर्मांचे अनेक वर्ग पाडतां येतील.

शीखधर्म व टाओधर्म या दोन्ही धर्मांतील धर्मग्रंथांत आपापल्या धर्मांना विश्वधर्म करण्याची कल्पनाच आढळत नाहीं व पुढील काळांतही त्या धर्मांत ही आकांक्षा उद्भूत झालेली दिसत नाहीं.

वरील दोन्ही धर्मांप्रमाणें हिंदुधर्म व चीन आणि जपानमधील धर्म यांच्यांतील धर्मग्रंथांत आपापल्या धर्मांना विश्वधर्म करण्याची कल्पना असल्याचें दिसत नाहीं. अलीकडे मात्र युरोपियन महायुद्धा (१९१४–१८) नंतर वरील तिन्ही देशांतील धर्मांत नवसुधारक उत्पन्न होऊन ते आपापल्या धर्माला विश्वधर्म करण्याविषयीं घोषणा करूं लागले आहेत.

उरलेल्या धर्मांपैकीं जैन, यहुदी व झोरास्ट्रियन या तीन धर्मांतील धर्मग्रंथांत आपापल्या धर्माचा प्रसार अखिल जगांत करण्याची कल्पना स्पष्ट व्यक्त केलेली आहे. तरीपण, पुढील काळांत या तीनही धर्मांनीं अशा तऱ्हेचा प्रयत्न अजिबात सोडून दिलेला दिसतो.

बाकीच्या बौद्ध, ख्रिश्चन व इस्लाम या तीन धर्मांतील धर्मग्रंथांत आपापल्या धर्माला विश्वव्यापी करण्याची योजना स्पष्टपणें सांगितलेली दिसते. इतकेंच नव्हे तर, त्या योजनेप्रमाणें प्रयत्न पण ह्या तिन्ही धर्माच्या संस्थापकांनीं जोराचा केलेला आहे. पुढें त्या त्या धर्माच्या अनुयायांनीही हा प्रयत्न चालू ठेवला होता. त्याचा परिणाम असा झाला कीं, आज हे तिन्ही धर्म आंतरराष्ट्रिय स्वरूपाचे होऊन बसले आहेत.

बौद्धधर्माची स्वमतप्रसाराची प्रवृत्ति आज अजिबात थंडावली आहे. तेव्हां स्वतःला विश्वधर्म करण्याचे बाबतींत आज ख्रिस्ती-

धर्माला इस्लामधर्म हा एकच भयंकर प्रतिस्पर्धी उरला आहे. तरीपण इस्लामधर्म आपल्या अनुयायांपैकी निम्म्या लोकांना (ह्मणजे सर्व स्त्रियांना) कोणत्याही प्रकारचे धार्मिक हक्क व जबाबदारी यांच्यांत भाग घेऊं देत नाहीं ही गोष्टही लक्षांत ठेवण्यासारखी आहे. खरें सांगावयाचें ह्मणजे जगांतील सर्व धर्मांत विश्वधर्म होण्याची पात्रता ख्रिस्तीधर्माचेच अंगीं आहे असें म्हटलें पाहिजे; कारण सर्व मानव एकाच (परमेश्वराचीं) पित्याचीं लेंकरें आहेत, या विशाल भूमिकेवर या धर्माचें अधिष्ठान आहे. आणि विश्वधर्माचें स्वरूप प्राप्त करण्याचा साधा व्यावहारिक उपायही ख्रिस्तीधर्मांतच सांगितलेला आहे; तो हा कीं यच्चयावत् ख्रिस्तीलोकांनीं प्रेमपूर्वक स्वार्थत्याग करावा व अखिल जगाची विविध प्रकारची व व्यवस्थित सेवा करून तद्द्वारा आपलें धार्मिकत्व सुंदररीतीनें सिद्ध करावें. ही गोष्ट साधी असली तरी प्रत्यक्ष अंमलांत येणें भयंकर कठीण आहे; व त्याकरतां अखिल ख्रिस्तीलोकांच्या संपूर्ण सहकाराची फार जरूर आहे.

१० मरणोत्तर अवस्थेविषयींची आशा व भीति—

प्रत्येक मनुष्यप्राण्याचें जीवन देहपातानंतरही चालूच राहातें, असें जगांतील प्रत्येक धर्मांत प्रतिपादन केलें आहे. तरीपण मरणोत्तर जीवन कसें असतें अथवा मरणोत्तर जीवन असणें इष्ट आहे कीं नाहीं, याबाबतींत या सर्व धर्मांचा परस्परांशी फारच मोठा मतभेद आहे.

हिंदुधर्म व बौद्धधर्म हे दोन्ही धर्म असें मानतात कीं, आपलें इहलोकींचें जीवन, अविद्या व दुःख या योगानें इतकें बिघडून

गेलें आहे कीं, तें जगण्यांत कांहीं राम नाहीं; त्यामुळें परलोकींचें जीवन आवश्यक आहे, तरीपण तेंही जीवन भयप्रदच आहे. तेव्हां या अशा तऱ्हेच्या अनिष्ट जीवनापासून कायमचें मुक्त होणें अगत्याचें आहे; आणि धर्मप्रतिपादित सन्मार्गाचा अवलंब केल्यास ह्या क्षणभंगुर व दुःखमय मानवी जीविताचा कायमचा उच्छेद करणें शक्य आहे.

याचे उलट जैनधर्म असें मानतो कीं, आत्म्याचें अमरत्वाची स्थिति वस्तुतः टाळतांच येत नाहीं. तेव्हां मरणोत्तर व्यक्ति—जीवात्मा—कां तर स्वर्गांत जाणार अथवा नरकांत जाणार हें निश्चितच आहे.

हिंदुस्थानांत जन्म पावलेले चारी धर्म पुनर्जन्म स्वीकारतात. त्यांचे असें म्हणणें कीं, कर्मविपाकाचें तत्त्व अनिवार्य असल्यानें त्याच्या सत्तेनें प्रत्येक जीवात्म्याला आपापल्या या जन्मींच्या कर्माप्रमाणें देहपातानंतर कोणत्यातरी योनींत पुन्हा जन्म घ्यावाच लागतो.

कान्फ्यूशियन धर्माचे मतें सदाचार हाच धर्म. तरीपण इतकें मानूनही तो धर्म भावी जीवनाविषयीं कांहीं विचित्र कल्पना करतो. या धर्माच्या मताप्रमाणें पाहतां मनुष्य प्राण्याचें इहलोकींचें जीवन कसेंही असलें तरी, त्याचा भावी जीवनावर कांहींच परिणाम होत नाहीं, म्हणजे काय कीं, सत्कर्मानें स्वर्ग मिळेल अशी आशा करूं नये व दुष्कृत्यानें नरकप्राप्ति होईल अशीही भीति बाळगूं नये. एवंच मरणोत्तर एक प्रकारचें भुतासारखें जीवन जीवात्म्याला प्राप्त होईल असें हा धर्म मानतो.

मुसलमान धर्म व झोरास्ट्रियन धर्म ह्या दोन्हीही धर्मांत अन्तिम निर्णयदिन कोणालाही चुकविता येणार नाहीं, असें ह्मटलें असून त्या अन्तिमदिनाचें मोठें विचित्र वर्णन त्यांतील धर्मग्रंथांत केलें आहे. त्या दिवशीं प्रत्येक व्यक्तीच्या पुण्यपापानुसार ईश्वर त्याचें शासन करील, अथवा त्यावर अनुग्रह करील असें ह्या धर्मांत ह्मटलें आहे. पुण्यात्म्याला स्वर्गांत मिळणाऱ्या विविध विषय-सुखांचें, व अल्लाला शरण न येणाऱ्या काफराला नरकांत मिळ-णाऱ्या अनंत यातनांचें आणि देहदंडाचें भडक वर्णन) मुसलमान धर्मांत केलें आहे. या वर्णनांतील अत्युक्तिपूर्णभाग बहुतेक गाळून बाकीचें सामान्य वर्णन (स्वर्ग व नरक यांचे वर्णन झोरास्ट्रि-यन धर्मांत केलेलें आढळतें. तरीपण, त्यांत ही गोष्ट विशेष आहे कीं, जगांतील सर्व पाप अखेरीस एका विशिष्ट धर्मसंस्काराच्या योगानें नाहींसे होईल असें आश्वासन या धर्मानें दिलें आहे.

मरणोत्तर अवस्थेविषयींचे विविध प्रकारचे समज बायबलांत व त्यानंतरच्या खिस्तीधर्मग्रंथांत आढळून येतात. तथापि, एक गोष्ट खिस्तीधर्मांत निश्चितपणें सर्वत्र सांगितली आहे, ती ही कीं, अखिल मानवजातीकरतां एक अन्तिमनिर्णयदिन नक्की येणार आहे, व त्या दिवशीं पुण्यात्म्यावर प्रभु आपल्या चिरंतन सान्नि-ध्याचा अनुग्रह करील व पापी लोकांना प्रभु वियोगाचें घोर-दुःख भोगावयास लावील.

“ ईश्वरापुढें कांहीं लटपट चालावयाची नाहीं. तुह्मी जसें पेराल तसें तुमच्या हातीं लागेल,” (गॅलॅशियन्स ६:७) तुह्मी या आयुष्यांत सर्व मनुष्यप्राण्यांवर प्रेम कराल, तर तुह्माला वर्धिष्णु आध्यात्मिकजीवनाचा लाभ होईल, ही दिव्य आशा

येशूख्रिस्तानें आपल्या अनुयायांना दाखविली आहे. आपापल्या पुण्यपापांचीं फळें व्यक्तीला कशा तऱ्हेचीं मिळातात, याविषयीं अनेक तऱ्हेचीं विधानें ख्रिस्तीधर्मांत आढळतात; तथापि ह्या बाबतींत अत्यंत प्रसिद्ध व प्रभावशाली असें, पॉलच्या तोंडचें पुढील वाक्य ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. " पापाचें फळ मृत्यु हें होय; पण ईश्वराचे अनुग्रहानें अनंत जीवनाचा लाभ होतो " (रोमन्स ६:२३)

वर केलेल्या तुलनेंत ख्रिस्तीधर्म व इतर धर्म यांत दहा मुद्यांचे बाबतींत सादृश्य असल्याचें दिसून आलें. पण या दरएक मुद्यांत-सुद्धां कांहींकांहीं स्थळें अशी वैसादृश्याचीं आहेत कीं, त्यावरून ख्रिस्तीधर्माचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें.

ख्रिस्तीधर्मांत तीन प्रकार असे आहेत कीं, त्यांची तुलना इतर धर्मांशी मुळीं करताच येत नाहीं. या तीन प्रकारांत ख्रिस्ती-धर्माचें अपूर्व वैशिष्ट्य भरलें आहे, असें ख्रिस्तीलोक मानतात.

(१) **प्रेमळ स्वर्गीय पिता हें परमेश्वराचें स्वरूप**—

परमेश्वर हा पिता आहे ही बरीच साधी कल्पना आहे, आणि ख्रिस्तीधर्माशिवाय इतर तीन धर्मांत ही कल्पना आली आहे.

सहा मुख्य देवापैकीं दोन देवांचें वर्णन करताना झोरा-स्टरनें असें म्हटलें आहे कीं, आहुरमझ्द हा न्यायाचा अथवा सत्याचा पिता आहे व सन्मानाचाही पिता आहे. (यस्न ४४:३;४७:२;३१:८;४५:४) तरीपण

मनुष्यानें परमेश्वराला पिता म्हणावें, असें झोरास्टरनें कोठेंही ध्वनित केलेलें नाहीं.

यहुद्यांच्या धर्मग्रंथांत एकंदर अठ्ठावीस ठिकाणीं जेहोवाला पिता म्हटलें आहे, तरीपण त्याला सर्व जगाचा पिता असें न म्हणतां इस्राएल लोकांचा अथवा "जेहोवाला भिणाऱ्या लोकांचा" पिता असें म्हटलें आहे. (सामें १०३:१३) फक्त एका ठिकाणीं यहुदी धर्मग्रंथांत जेहोवाला व्यापक स्वरूपानें वर्णिल्यानंतर त्याला (जेहोवाला) विश्वाचा पिता म्हटलें आहे. (मलाची २:१०)

हिंदूंच्या प्राचीन धर्मग्रंथांत सुमारें ऐशीं देवतांतील मुख्य देवता जो इंद्र त्याची अनेक तऱ्हेनें प्रार्थना केली आहे त्याप्रसंगानें त्याला एके ठिकाणीं "पिता—सर्व पित्यांत अत्यंत वत्सल" असेंही म्हटलें आहे. (ऋग्वेद ८:१७;१७) तरीपण याच देवतेचे त्या धर्मग्रंथांत दुसरीकडे दारुडा, बडबड्या व "मी आपल्या मानवी पूजकाविषयीं अत्यंत उदासीन आहे" अशी बढाई मारणारा, असें त्याचें वर्णन केलें आहे.

"पंच जनांची मला डोळ्यांतील कस्पटाइतकीही परवा नाहीं."

मी सोमरस पिऊन मस्त झालों नाहीं कां ?

(ऋग्वेद १०:११९,५) (ग्रिफिथचे ऋग्वेद भाषांतर २-५६३.

ह्याच इंद्राचें, वेदानंतरच्या उपनिषद्ग्रंथांत एके ठिकाणीं असें वर्णन आढळतें: इंद्र प्रतर्दनाजवळ बढाई मारीत आहे.

कीं, " मी विश्वासघातादिक अनेक दुष्कृत्यें केलीं तरी, मला त्यांचें कांहींच पाप लागलें नाहीं; जनहो ! तुम्ही माझ्यासारखे वागाल तर तुम्हालाही पापाचा लेप लागणार नाहीं. "

" मी त्वष्ट्याच्या पुत्राला ठार मारलें. मी अरुन्मुख यतींना जंगली कुत्र्यापुढें टाकलें. अनेक वेळ वचनभंग करून मी प्रल्हाद, पौलोम व कालखंज या नांवाच्या लोकांना जाळून टाकले; तरीपण, माझा एक केसही वांकडा झाला नाहीं. अशा मला, जो जाणतो त्याचें जगही कांहीं वांकडें करू शकत नाहीं." (कौषीतकी उपनिषद् ३:१ ह्यूम-कृत भाषांतर ३२०-३२१.)

वरील ' पिता ' ह्या कल्पनेपेक्षांही उच्च अशी ' स्वर्गीय-पिता ' ही कल्पना विद्यमान अकराही धर्मांत फक्त हिंदुधर्मग्रंथांत एका महत्त्वाचे ठिकाणीं आली आहे. आकाशांतील दोन देवतेपैकीं एकीला उद्देशून ऋग्वेदांत "द्यौ:पिता" असे शब्द वापरले आहेत. ह्याचा सरळ अर्थ "स्वर्गीय–पिता" असा होतो. ही देवता निःसंशय पुरुष देवता आहे. ह्याच्याशीं संलग्न अशी दुसरी एक "पृथ्वी-माता " या नांवाची स्त्रीदेवता असल्याचें तेथेंच सांगि-तलें आहे. भाषेच्या दृष्टीनें पाहतां ह्या दोन्ही देवतांचीं नांवें संस्कृतांत एका समासांत द्विवचनी शब्दांत आलीं असून, जगाचे माता–पिता असा त्या शब्दाचा अर्थ आहे. अर्थात् स्वर्गाकडे पितृत्व देऊन त्याला पुरुष देवता मानणें ही कल्पना बायबलांतील स्वर्गीयपिता

ह्या कल्पनेशी पूर्ण जुळती आहे. तरीपण अखिल हिंदु-देवतांच्या प्रभावळींत ही (द्यौःपिता ही) देवता इतकी सामान्य दर्जाची आहे कीं, ऋग्वेदांतील एकंदर १०२८ सूक्तांपैकीं एकाही सूक्तांत केवळ ह्याच देवतेची अशी स्वतंत्रपणें स्तुति आलेली नाहीं. ऋग्वेदानंतरच्या काळांत तर द्यौःपिता ही देवता संस्कृतसाहित्यांतून अजिबात लुप्त होऊन गेली, त्या शब्दाचें मूळचें पुल्लिंग बदलून त्याचें स्त्रीलिंग झालें व तो शब्द दिवसाची सामान्यनाम होऊन बसला.

जगांतील सर्व धर्मांशी तुलना करतां असें दिसून येतें कीं, खिस्तेतर धर्मांत ईश्वराला पित्याची उपमा अत्यंत संकुचित अर्थानें व संकुचित प्रदेशापुरतीच दिलेली आहे. ईश्वर हा अखिल मानवजातीचा प्रेमळ पिता आहे, ही उदात्त कल्पना खिस्तीधर्माहून अन्यत्र कुठेंही इतकी विकास पावलेली दिसत नाहीं.

परमेश्वर हा स्वर्गीय पिता असें सांगणारा " नवाकरार " हा जगांत एकच धर्मग्रंथ. ह्या शिकवणींत खिस्तीधर्माचें अपूर्व वैशिष्ट्य आहे. " परमेश्वर हा ज्ञानी पवित्र व सेव्य असा जगाचा सम्राट् आहे; तो पुण्यशाली व प्रेमळ असल्यानें आपल्या लेकरांच्या म्हणजे मानवांच्या पापाबद्दल आपण स्वतः दुःख भोगतो. आणि शांतपणानें व यशस्वी रीतीनें तो मानवांना पापापासून मुक्त करून आपल्यासारखें करण्याचा प्रयत्न करीत करतो. "

(२) ख्रिस्तीधर्मसंस्थापकाचें "देवपुत्र व मानवांचा बंधु" हें विशिष्ट स्वरूप--

विद्यमान अकरा धर्मांपैकीं नऊ धर्मांचे संस्थापक इतके उदात्त चरित होते कीं, खुद्द त्यांच्या हयातींत हजारो लोक त्यांचे परमभक्त झाले व अजूनही अनेक लोक त्यांचे भक्त होत आहेत. हे सर्व संस्थापक वृत्तीनें फार नम्र होते, तरीपण आपण कांहीं तरी श्रेष्ठ कार्य करण्याला या जगांत आलों आहे अशा तऱ्हेचा आत्मविश्वासही त्यांचे ठिकाणीं होता. ह्या नऊ संस्थापकांपैकीं बुद्ध व महावीर हे दोघे इतके तेजस्वी व बाणेदार वृत्तीचे होते कीं, व्यक्तीच्या उन्नती-करता ईश्वराच्या मदतीची जरूर मुळींच नाहीं, असें ते स्वच्छ सांगत असत. प्रत्येकाचें कर्मच त्याला उच्च किंवा नीच दशेप्रत घेऊन जातें असा कर्मविपाकाचा अढळ सिद्धांत त्यांनीं जगाला उपदेशिला, जगांत कुणी-तरी एक सर्वश्रेष्ठ सगुण ईश्वर आहे असें त्यांना केव्हांही वाटलें नव्हतें. तरी आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांच्या भक्तांनीं त्यानांच ईश्वर मानिलें व त्यांची पूजा केली. आज तर त्यांची सर्वत्र मूर्तिपूजा जोरांत चालू आहे.

येशू खिस्ताखेरीज बाकीच्या सर्व संस्थापकांच्या पूर्ववयांत त्यांच्या मनाला तळमळ, संशय, व ईश्वराच्या शोधाविषयीं निकराचे प्रयत्न करणें ह्या सर्व अवस्थेंतून जावें लागलें, असें त्यांच्या चरित्रांत लिहिलें आहे. कान्फ्यूशियसनें तर आपल्या उतारवयांतही 'माझ्यांत अनेक दोष

आहेत; ज्ञान आणि सदाचार या बाबतींत उन्नती-करतां मला अजून पुष्कळ प्रयत्न केला पाहिजे,' असें प्रांजळपणें कबूल केलें आहे. येशूखेरीज इतर सर्व धर्माचार्यांच्या वर्तनांत धरसोडपणा बराच दिसतो. 'वारा वाहील तशी पाठ फिरवायची' अशा तऱ्हेचा त्यांचा स्वभाव असल्याचें दिसतें.

येशू ख्रिस्त मात्र अशा तऱ्हेचा नव्हता. त्याला ईश्वराची जाणीव प्रथमपासूनच असून, त्यानें आपल्या नवधर्माच्या कार्याची दिशा निश्चितपणें ठरविली होती. त्याचें धर-सोडीचें वर्तन केव्हांही नव्हतें. विशालदृष्टि, विश्वोपयो-गिता, उदात्तपणा, सुसंगतपणा, व निष्पापता हे गुण त्याच्या स्वभावांत अलौकिक रीतीनें प्रकट झाले होते.

त्याचें बालपणापासूनचें जीवन अगदीं सामान्य मनुष्या-प्रमाणें होतें. जसें जसें त्याचें वय वाढत गेलें, तसें तसें त्याच्यांत ज्ञान प्रकट होत गेलें असें त्याचेविषयींचें स्पष्ट वर्णन आहे. (ल्यूक २:५२) अशा तऱ्हेनें तो अगदीं चार चौघासारखा होता, तरी एका दृष्टीनें तो अलौकिक आदर्शपुरुषही होता. तो ईश्वराचा पुत्र जसा होता, तसा तो मानवाचा पुत्रही होता, ही त्याची विशेषता. तो शरीरधारी होता, तरी त्याच्यांत ईश्वरभावही होता, आणि मानवशरीरांत ईश्वर किती उत्कटपणानें प्रकट होऊं शकतो हें त्यानें आपल्या चरित्रावरून जगाला दाखविलें. मनुष्यमात्रांना वडीलभावासारखा, धर्मश्रद्धेच्या बाबतींत त्यांचा मार्गदर्शक, व मोक्षपथावरील

त्यांचा धुरीण होता. आजपर्यंत त्याच्यासारखा पुरुष पृथ्वीचे पाठीवर झालेला नाहीं. तरीपण मनुष्यांत न आढळून येण्यासारखें असें त्याच्यांत कांहींच नव्हतें. किंबहुना त्याच्या अनुग्रहानें प्रत्येकाला त्याच्यासारखें परिपूर्ण मानव होता येणें शक्य आहे.

(३) दैवी व पवित्र आत्म्याचें विश्वव्यापी कार्य

परमेश्वराचें स्वरूप व ख्रिस्तीधर्माच्या संस्थापकाचें स्वरूप या दोन गोष्टीबरोबर एक तिसरीही गोष्ट ख्रिस्तीधर्मश्रद्धा व धर्मानुभव यांत दिसून येते. ह्या तिन्ही गोष्टींचा उल्लेख ख्रिस्ती धर्मग्रंथांत आला असून त्याचा उपदेशही या धर्माच्या संस्थापकानें केलेला आहे. या तिन्ही गोष्टींचा संक्षेपतः उच्चार, ख्रिस्तीधर्माची नवदीक्षा घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, करावा लागतो. ह्या तिन्ही गोष्टीं प्रथमपासूनच ख्रिस्तीधर्माचें वैशिष्ट्य व अभिनवता दाखविणाऱ्या असून ख्रिस्ती धर्माच्या मौलिक तत्त्वांत त्यांची गणना होते. आणि इतर सर्व धर्मांच्या विशिष्ट तत्त्वांशी या ख्रिस्तीधर्मांतील तत्त्वत्रयांची तुलना केल्यास असें स्पष्ट दिसून येतें कीं, इतर धर्मांत या तत्त्वत्रयाशी सदृश अशी तत्वें जरी आढळत असलीं तरी या तत्त्वांना ख्रिस्तीधर्माची स्वरूपप्रतिपादक विशिष्ट तत्वें म्हणून निश्चितरीतीनें मानता येईल. या तत्वत्रयाचें वर्णन करण्यापूर्वी इतर धर्मांतील मौलिक तत्त्वांशी त्यांची तुलना करूं या.

झोरास्ट्रियन धर्म असें म्हणतो कीं, आहुरमझ्द ही देवता मर्यादित सामर्थ्याची असली तरी ती 'उदार' आहे, अथवा 'स्पैंतामैन्यु' या देवतेच्या द्वारें ती आपलें औदार्य प्रकट करते. स्वतः उदार अथवा परतः उदार दोहोंपैकीं कोणताही अर्थ घेतला तरी एवढें निश्चित आहे कीं, हा धर्म आपल्या इष्ट देवतेला सर्वश्रेष्ठ अद्वितीय सामर्थ्याचा मानीत नाहीं; कारण अनादिकालापासून त्याच्याशीं विरोध करणारी एक अनिष्ट पापमय शक्ति जगांत आहे, अशी या धर्माची समजूत आहे.

कान्फ्यूशियस धर्म मनुष्याला स्वभावतःच सत्प्रवृत्तीचा व दैवी अंशाचा मानतो ही गोष्ट खरी; तरी परिपूर्णता मिळविण्याच्या प्रयत्नांत मनुष्याला ईश्वर मदत करतो ही कल्पना मात्र या धर्मांत मुळींच आढळत नाहीं.

यहुदीधर्मांत मात्र खिस्तीधर्मांतील या तत्त्वत्रयाशी अत्यंत सदृश अशीं तत्त्वें आहेत. ईश्वर हा एकमेव सर्वश्रेष्ठ आहे असें हा धर्म मानतो ही गोष्ट खरी आहे; तरीपण यहुदी धर्मग्रंथांत या तत्त्वाला फारसें उच्चस्थान दिलेलें नाहीं; व प्रत्यक्ष व्यवहारांतील धार्मिकजीवनांत तर या तत्वाचा मागमूसही दिसत नाहीं.

खिस्तीधर्म मात्र ह्या तत्त्वाला आपल्या धर्मग्रंथांत उच्च-स्थान देतो व व्यवहारांतही त्याला महत्त्वाचें मानतो. या धर्मानें असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, परमेश्वर हा पवित्र व विश्वव्यापक असून तो मानवांच्या उन्नतीकरतां सतत प्रयत्न करीत आहे. या ईश्वराला—या हृदयस्थ भगवं-

ताला—शरण जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला तो अन्तःस्थ परमात्मा कधीं उपदेश करतो, तर कधीं अस्पष्ट इषारा देतो; कधीं कान उघडणी करतो, तर कधीं स्फूर्ति देतो; आणि अखेरीस तो भक्ताला आत्मरूप करून टाकतो. परमेश्वराची दिव्यशक्ति जगदुद्धाराकरतां प्रयत्न करीत आहे व मानवांनें येशूप्रमाणें वागून स्वतःला परिपूर्ण स्थितीप्रत न्यावें अशी त्याची इच्छा आहे, अशी येशूखिस्ताची शिकवण आहे.

३ हीं तीन तत्वें व जगाची धार्मिक आकांक्षा ह्याचें खालीं वर्णन केलें आहे.

ईश्वर हा सर्वधर्मांचें मूळ अथवा सार, अथवा मध्यवर्ती कल्पना आहे. ह्या कल्पनेला धरून वरील तीन तत्वें सांगितलीं आहेत.

(१) परमेश्वर हा अनंत आहे. हा अनंत परमेश्वर जगाचा स्रष्टा असून मानवी जीविताचा प्रेमळ शास्ता आहे. यालाच ‘ पिता ’ असें ह्मणतात.

(२) हाच परमेश्वर मानवीजीवितांतील दैवी परिपूर्णता ह्मणजे काय हें जगाला दाखविण्याकरता दयाळु येशू ख्रिस्ताचे रूपानें जगांत प्रकट झाला. येशूला ‘ ईश्वराचा पुत्र ’ असें नांव देण्यांत येतें तें यामुळेंच.

(३) ईश्वरांत विकासाचें—उन्नतीचें—तत्त्व स्वभावतःच आहे. मानवांचा ‘ सांगाती ’ राहून त्यांना उन्नतीच्या मार्गानें घेऊन जाणारें ईश्वराचें जें स्वरूप त्यालाच ‘ पवित्र आत्मा ’ असें सर्वप्रसिद्ध नांव आहे.

खिस्तीधर्मांतील हीं तिन्हीं तत्त्वें एका दृष्टीनें गूढ व आध्यात्मिक आहेत; धर्माचे दृष्टीनें त्यांच्यांत महत्त्वाचा अर्थ भरलेला आहे. पण दुसऱ्या दृष्टीनें पाहतां हीं तत्त्वें व्यवहारांत आणण्याच्या योग्यतेची आहेत. हीं तत्त्वें समजावून घेऊन अनुभवाच्या कसोटीवर पडताळून पाहण्याच्या योग्यतेचीं आहेत. खिस्तीधर्म ह्मणजे काय ? हें थोडक्यांत पण विशदरीतीनें या तत्त्वत्रयावरून कळतें. पण याही पुढें एक पाऊल जाऊन अखिल जगांतील अत्युच्च धार्मिक आकांक्षा या तत्वत्रयांत समाविष्ट होत असून धर्माच्या भावी इतिहासांत ह्याच तत्त्वत्रयाला सारें जग प्रेमानें स्वीकारील असें खिस्ती लोक मानतात.

खिस्तीधर्माचें सारभूत तत्त्व कोणतें व खिस्तीधर्म जगावर कोणत्या रीतीचा अनुग्रह करूं पहात आहे, हें नव्या करारांतील पुढील प्रसिद्ध आशीर्वचनांत सांगितलेलें आहे. “ तुमच्यावर प्रभु येशूखिस्ताचा अनुग्रह होवो; परमेश्वर तुमच्यावर प्रेम करो; आणि पवित्र आत्म्याचा समागम तुम्हाला सदैव लाभो ” (२ कॉरिन्थियन्स १३:१४)

समास.

परिशिष्ट १ लें

मूळ ग्रंथकारानें, तुलनात्मक धर्माभ्यास या विषयावर अभ्यासकास उपयुक्त म्हणून, निर्दिष्ट केलेल्या ग्रंथांची यादी.

कोशग्रंथ व संग्रहग्रंथ

सेक्रेड बुक्स ऑफ धि ईस्ट" ही माला, संपादक म्यॅक्स्-म्यूलर साहेब भाग ५० हे भाग धर्माभ्यासाचे दृष्टीनें अत्यंत उपयुक्त आहेत. पण ह्यांच्यांत सर्व विद्यमान धर्म मात्र आले नाहींत. इस्लाम व टाओधर्म ह्यावरील प्रमाण ग्रंथ यांत संपूर्ण आले आहेत. कान्फ्यूशियन व पारशी-धर्म यांचे धर्मग्रंथ यांत बरेचसे आले आहेत. जैनधर्मग्रंथ फारच थोडे आले आहेत; हिंदुधर्मग्रंथ २१ भागांत आले आहेत, व बुद्धधर्मग्रंथ दहा भागांत आले आहेत.

बिलेट यांच्या जर्मन भाषेंतील ग्रंथात सहा धर्मांच्या प्रमाण-ग्रंथांतून उतारे घेतले आहेत.

लेमन व हास (लिपझिक १९२२) ह्यांनीं प्रकाशित केलेल्या ग्रंथांत आठ विद्यमान धर्मांतून उतारे घेऊन संगृहीत केले आहेत.

हेस्टिंग्ज यांनीं संपादिलेला "एन्सायक्लोपीडिया ऑफ रिलिजन ॲन्ड एथिक्स" हा कोशग्रंथ, बारा भाग. धर्मशास्त्रांतील कांहीं विषयावर ह्यांत फार उपयुक्त माहिती आहे.

याविषयावर अलीकडे प्रसिद्ध झालेले ग्रंथ:

बार्टन यांचा "धि रिलिजन्स ऑफ् धि वर्ल्ड" हा ग्रंथ (आवृत्ति २री १९१९शिकागो युनिव्हर्सिटी). उत्तम ग्रंथ.

केव्ह यांचा "ॲन इंट्रोडक्शन टु सम लिव्हिंग रिलिजन्स ऑफ् धि ईस्ट" (स्क्रिब्नर्स, १९२१) विद्यमान सात धर्मांतील उदात्ततत्वें समजावून देणारा ग्रंथ.

हॉपकिन्स, ई डब्ल्यु. यांचा "धि हिस्टि ऑफ रिलिजन्स्" (म्यॅकमिलन १९१८) हा ग्रंथ विद्वत्ताप्रचुर असून त्यांतील अर्धा भाग प्राचीनकाळीं प्रचलित, पण आतां मृत, असलेल्या धर्मांच्या माहितीनें भरलेला आहे.

मेन्झीज ह्यांचा 'हिस्टि ऑफ रिलिजन्स' हा ग्रंथ (स्क्रिबनर्स नीं ह्याची चतुर्थ आवृत्ति सुधारून १९१४ त छापली आहे.) ग्रंथांत फारसें नाविन्य नाहीं, पण ग्रंथ विवेचक व मुद्देसूद आहे.

मूर यांचा 'हिस्टि ऑफ् रिलिजन्स' (भाग १ ला, १९२०; भाग २, १९१९) हा ग्रंथ प्रचंड पांडित्यानें युक्त असून अभ्यासकांना उपयुक्त आहे (प्रकाशक स्क्रिबनर्स व टी ॲन्ड टी क्लार्क)

...र कृत 'बर्थ ॲन्ड ग्रोथ ऑफ रिलिजन्स' (प्रकाशक स्क्रिबनर्स व टी ॲन्ड टी क्लार्क १९२३)

मायर्स यांचा ' हिस्ट्रि ॲज पास्ट एथिक्स्; ॲन इंट्रोडक्शन टु धि हिस्ट्रि ऑफ मॉरल्स ' (प्रकाशन जिन्न १९१३)

पॅटन यांचा ' जीझस क्राइस्ट ॲन्ड धि वर्ल्डस् रिलिजन्स् ' (द्वितीयावृत्ति १९१८; प्रकाशक युनायटेड कौन्सिल फॉर मिशनरी एज्युकेशन लंडन.) पाठ्य पुस्तकासारखा या ग्रंथाचा उपयोग होण्यासारखा आहे.

सोपर कृत " धि रिलिजन्स् ऑफ मन्काइंड " या ग्रंथाची सुधारून वाढविलेली तृतीयावृत्ति. १९२३. या ग्रंथांत धर्मांचा क्रमविकास उत्तम दाखविला असून त्यांत ग्रंथकाराची गुणग्राहकता व वर्णनसामर्थ्य हीं दिसून येतात.

स्पियर " धि लाइट ऑफ् धि वर्ल्ड; ए ब्रीफ् कंप्यारिटिव्ह स्टडी ऑफ् क्रिश्चानिटी ॲन्ड नॉन–क्रिश्चन रिलिजन्स् " या ग्रंथांत खिश्चनधर्माची इतर धर्मांशीं थोडक्यांत तुलना करण्याचा प्रयत्न केला आहे. (प्रकाशक: सेंट्रल कमिटी ऑन् धि युनायटेड स्टडी ऑफ मिशन्स्, वेस्ट मेडफोर्ड १९११)

" रिलिजन्स ऑफ मिशन फील्डस् ॲज व्ह्यूड बाय प्रॉटेस्टंट मिशनरीज " ह्या पुस्तकांत मिशनऱ्यांनीं केलेलें नऊ विद्यमान धर्मांचें विवेचन आलें आहे. (प्रकाशक: स्टुडंट व्हॉलंटियर मूव्हमेंट फॉर फारेन् मिशन्स; न्यूयॉर्क १९०५)

कांहीं लोकप्रिय ग्रंथः—

मार्टिन यांच्या "ग्रेट रिलिजस टीचर्स ऑफ धि ईस्ट" या पुस्तकांत न्यूयॉर्कमधील 'सोसायटी फॉर एथिकल कल्चर' पुढें दिलेल्या व्याख्यानांची माला संगृहीत केली आहे. (प्रकाशकः मॅक्‌मिलन कंपनी; १९११) "धि वर्ल्डस् ग्रेट सेमेटिक रिलिजन्स ॲन्ड धि रिलिजन् ऑफ धि फ्यूचर" हें पुस्तकही वरीलप्रमाणेंच व्याख्यानमालेचें संग्राहकरूप आहे (प्रकाशकः ॲपलटन् १९२१)

रीड कृत "ए ख्रिश्चन ॲप्रीसिएशन् ऑफ अदर फेथ्स" या ग्रंथांत जगांतील महान् धर्मांतील उत्कृष्ट अंशांचा अभ्यास केलेला आहे. तथापि, यांत विवेचकतेपेक्षां धर्मतत्वांचा गौरव करण्याकडेच कल जास्त आहे. ग्रंथांत पांच ख्रिस्तेतर धर्मांचा अभ्यास केला आहे.

(प्रकाशक ओपन कोर्ट १९२१)

हिंदूंच्या धर्म ग्रंथांचीं भाषांतरें.

ऋग्वेद—भाषांतरकार ग्रिफिथ साहेब. ग्रंथाचे नांव "हिम्स ऑफ धि ऋग्वेद" हें असून ग्रंथाचे दोन भाग आहेत. हा ग्रंथ बनारस येथें १८९६ मध्यें प्रसिद्ध झाला आहे.

अथर्ववेद—भाषांतरकार: व्हिट्‌ने व लन्‌मन भाग २ (प्रकाशक हार्वर्ड ओरिएन्टल सीरीझ १९०५)

शतपथब्राम्हणः इग्लिंग यांनीं अनुवादित; भाग ५; से. बु. ई. या मालेंतील भाग १२, २६, ४१, ४३, ४४,

हे सर्व भाग १८८२ ते १९०० च्या दरम्यान प्रसिद्ध झाले आहेत.

ऐतरेय व कौषीतकी ब्राम्हण: अनुवादक कीथ (प्रकाशक हार्वर्ड ओरिएन्टल सीरीझ १९२०)

उपनिषदें: अनुवादक म्यॅक्समयूलर से. बु. ई. या मालेच्या प्रथम भागांत व पंधराव्या भागांत मिळून एकंदर बारा उपनिषदांची भाषांतरें आलीं आहेत.

ह्यूमसाहेब (प्रस्तुत ग्रंथाचा कर्ता) यांचा ' धि थर्टीन प्रीन्सिपल उपनिषद्स् हा भाषांतर ग्रंथ (ऑक्स्फोर्डमध्यें १९२१ त प्रसिद्ध झालेला)

मनुधर्मशास्त्र अथवा **मनुस्मृति:** अनुवादक ब्यूलर से. बु. ई. माला, भाग २५

भगवद्गीता: अनुवादक बार्नेट "टेंपल क्लासिक्स" या मालेंत.

(२) अनुवादक: सर एड्‌विन ऑर्नाल्ड. पुस्तकाचें इंग्रेजी नांव: धि सॉंग सिलेश्चियल् (प्रकाशक हार्वर्ड क्लासिक्स)

(३) अनुवादक डेव्हिड्स ट्रूब्नर्स ओरिएन्टल सीरीझ कडून प्रकाशित.

रामायण व महाभारत: अनुवादक रमेशचंद्र दत्त. हा ग्रंथ धि रामायण ॲन्ड महाभारत कन्‌डेन्स्ड इन्टु इंग्लिश व्हर्स या नांवानें इंग्रजींत प्रसिद्ध झाला आहे. वरील दोन्ही ग्रंथातील निवडक भागांचा यांत आंग्ल कवितात्मक अनुवाद केला आहे. (प्रकाशक-एव्हरी मॅन्स लायब्ररी). अद्यापि हिंदूंच्या सर्व धर्मग्रंथांचें इंग्रेजींत भाषांतर झालेलें नाहीं.

भाषांतरित मजकुरांची पृष्ठसंख्या कमींत कमी अठरा हजार होईल.

हिंदुधर्मावरील ग्रंथः—

हॉप्किन्स् यांचा 'धि रिलिजन्स् ऑफ इंडिया' हा ग्रंथ (प्रकाशक जिन्न १८१८)

फार्कहार यांचा " ए प्रायमर ऑफ हिन्दूइझम हा ग्रंथ (ऑक्सफोर्ड १९१२) यांचाच धि क्राउन ऑफ हिंदुइझम" हा ग्रंथ " सोसायटी फॉर प्रोमोटिंग ख्रिश्चन नॉलेज " द्वारा प्रकाशित (१९११).

सर मॉनियर विलियम्स कृत " इंडियन विज्डम " हा ग्रंथ.

प्रॅट साहेबांचा "इंडिया ॲन्ड इटस् फेथ्स्" हा ग्रंथ. (हटन मिफिन द्वारा प्रकाशित १९१५)

जैनधर्मग्रंथ—भाषांतरें:—

(जैनांच्या ८१ सूत्रग्रंथापैकीं आचारांगसूत्र, कल्पसूत्र व उत्तराध्ययनसूत्र सूत्र कृतांगसूत्र या फक्त चारच सूत्रग्रंथाचीं भाषांतरें से. बु. ई. या मालेंत प्रसिद्ध झालीं आहेत.)

हॉर्नेल कृत 'उवागदसाओ' चें भाषांतर—भाग २ (कलकत्याच्या बिब्लिऑथेका इंडिका" द्वारा प्रकाशित १८८८-१८९०)

बार्नेट कृत 'अंतगडदसाओ व अनुत्तरोववाइयदसाओ'ह्या ग्रंथांचीं भाषांतरें (" लंडन येथील ओरिएन्टल ट्रान्स्लेशन फंड" द्वारा १९०७ मध्यें प्रकाशित)

जैनधर्मावरील ग्रंथ

मिसिस् स्टीव्हन्सन् कृत ' धि हार्ट ऑफ जैनिझम " हा ग्रंथ (ऑक्सफोर्ड १९१५) यांचाच " नोट्स ऑन

मॉडर्न जैनिझम; विथ स्पेशल रेफरन्स टु धि श्वेतांवर दिगंबर ॲन्ड स्थानकवासी सेक्ट्स'' हा ग्रंथ(ऑक्स्फोर्ड१९१०)

ब्यूलर कृत "ऑन धि इन्डियन सेक्ट ऑफ धि जैन्स" (लंडन येथील ल्यूझॅक कंपनीद्वारा प्रकाशित. १९०३)

जैनी यांचा "आउटलाइन्स ऑफ जैनिझम" (केंब्रिज १९१६)

हेस्टिंग्ज यांचे "आजीविक" व "जैनिझम" हे लेख.

बौद्धधर्मग्रंथ

त्रिपिटकाच्या **कांहीं** भागाचें भाषांतर से. बु. ई. मालेंतील पांच भागांत आलेलें "सेक्रेड बुक्स ऑफ धि बुधिस्ट" या मालेतर्फे दोन भागांत केलेलें; व पाली टेक्स्ट सोसायटी ट्रॅन्स्लेशन सीरीझ तर्फे पांच भागांत केलेलें.

धम्मपदाचें वागीश्वरांनीं केलेलें भाषांतर. इंग्रेजी नांव "धि बुद्धज् वे ऑफ व्हर्च्यू." (विज्डम ऑफ धि ईस्ट सीरीझ तर्फे प्रकाशित,प्रकाशक डटन्१९१२) "बुधिझम इन् ट्रान्स्लेशन" ह्या नांवानें हार्वर्ड ओरिएन्टल सीरीझ या मालेंत प्रसिद्ध झालेलें भाषांतर. भाषांतरकार वॉरन. ह्यांत बौद्धधर्मग्रंथ व इतर कांहीं बौद्धग्रंथ यांतील बऱ्याच निवडक भागांचें भाषांतर आलें आहे.

सॉंडर्स यांच्या "हार्ट ऑफ बुधिझम" या ग्रंथांत बौद्धधर्मग्रंथ व इतर ग्रंथ यांतील कांहीं थोड्या भागांचें भाषांतर आलें आहे.

बौद्धधर्मावरील ग्रंथ

सर मॉनियर विलियम्स यांचा बुधिझम इन् इट्स कनेक्शन विथ ब्रॅम्हॅनिझम् ॲन्ड हिंदुइझम, ॲन्ड इन् इट्स् कॉन्

ट्रस्ट विथ क्रिश्चानिटी. " हा ग्रंथ. (प्रकाशक मरे १८८९)

ऱ्हाइस डेव्हिड्स यांचा " बुधिझम बीइंग ए स्केच ऑफ धि लाइफ ॲन्ड टीचिंग्ज ऑफ् गौतम धि बुद्ध " हा ग्रंथ. (लंडन येथील ' सोसायटी फॉर प्रॉप्रेगेटिंग क्रिश्चन नॉलेज ' ह्या संस्थेच्या द्वारा प्रकाशित केलेला; सुधारलेली प्रथमावृत्ति १९१८)

सॉंडर्स कृत "स्टोरी ऑफ् बुधिझम" (ऑक्स्फोर्ड १९१६). यांचाच " गौतमबुद्ध, ए बॉयोग्राफी; बेस्ड ऑन् धि कॅनॉनिकल बुक्स ऑफ धि थेरावेदी हा ग्रंथ. (असोसिएशन प्रेस नें प्रकाशित केलेला १९२०) यांचाच " बुधिझम ॲन्ड बुधिस्ट ऑफ सदर्न एशिया" हा ग्रंथ (म्यॅक्मिलन कंपनीनें प्रसिद्ध केलेला १९२३) यांचाच " इपॉक्स इन् बुद्धिस्ट हिस्ट्री " युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस द्वारा प्रकाशित १९२४)

कार्पेंटर यांचा " बुधिझम ॲन्ड क्रिश्चॅनिटी; ए कॉन्ट्रास्ट ॲन्ड ए प्यॅरेलल् " हा ग्रंथ. (हाडर व स्टाउटन द्वारा प्रकाशित १९२३)

शीखधर्म ग्रंथ

ग्रंथ " ग्रंथ अथवा ग्रंथसाहेब " याचें " धि आदि ग्रंथ ऑर होली स्क्रिपचर्स ऑफ् धि शीख्स " या नांवानें प्रसिद्ध झालेलें भाषांतर. (ट्रूबनर १८७७); भाषांतरकार अर्न्स्टट्रूंप.

मॅकॉलिफ् यांचें षष्ठभागात्मक भाषांतर. यांत शीखधर्मग्रंथ, गुरूंचे ग्रंथ व इतर शीखग्रंथांचीं भाषांतरें आलीं आहेत (ऑक्स्फोर्ड येथें १९०९ मध्यें प्रसिद्ध झालें)

शीख धर्मावरील ग्रंथ

डोरोथी फील्ड यांचा "धि रिलिजन्स ऑफ् धि शीख्स" हा ग्रंथ. "विज्डम ऑफ् धि ईस्ट" या मालेतर्फे १९१४ त प्रसिद्ध झालेला.

हेस्टिंग्ज यांचे नानक व शीखलोक या विषयावरील लेख.

सेवारामसिंग थापर यांचा "ए क्रिटिकल स्टडी ऑफ् धि लाइफ अॅन्ड टीचिंग्ज ऑफ् श्रीगुरु नानकदेव; धि फाउंडर ऑफ् शिखिझम्" हा ग्रंथ. (प्रकाशित रावळ पिंडी १९०४).

हेन्री कोर्ट यांचा "हिस्ट्रि ऑफ् धि शीख्स ऑर ट्रान्स्लेशन ऑफ् धि शीखं दे राज दी विखिया" हा ग्रंथ. (लाहोर १८८८)

वालजीभाई यांचा "हरिचरित ऑर कंप्यरिझन बिट्वीन धि आदि ग्रंथ अॅन्ड धि बायबल,' हा ग्रंथ. (लुधियाना १८९३)

कान्फ्यूशियन धर्मग्रंथ.

लेगे यांनीं "धि चायनीझ क्लासिक्स, ह्या मालेतर्फे आठ भागांत केलेलें भाषांतर (ट्रूब्नर व ऑक्स्फोर्ड)

पंच आदर्शग्रंथः—

(१) शू किंगः इतिहास-ग्रंथ. (से. बु. ई. भाग ३) लेगेकृत भाषांतर 'चायनीझ क्लासिक्स' मध्यें प्रका-

शित, भाषांतर. डब्ल्यू–जी ओल्ड कृत. (थिऑसॉफिकल सोसायटी १९०४)

(२) शी किंगः काव्य–ग्रंथ.
लेगेकृत भाषांतर (ट्रूबनर १८७६)
जेनिंग्ज ,, ,, (सर जॉन ल्युबॉक यांच्या हंड्रेड बुक्स ' या मालेंत प्रसिद्ध झालेलें.
ॲनल कृत भाषांतर. (ट्रूबनर१९९१) से.बु.ई.मधील वेंचे

(३) इ किंगः भविष्यग्रंथ. से. बु.ई.मालेंतील भाग १६ वा.

(४) लीकी : आचार ग्रंथ. (से. बु. ई. मालेंतील भाग २७ व २८)

(५) चून चिऊ; वसंत व शरद्. लेगे कृत भाषांतर "चायनीझ क्लासिक्स " मधील.

चार ग्रंथ

लुन यू—कानफ्यूशियसचा वचनसंग्रह.
भाषांतरकार लेगे ' चायनीझ क्लासिक्स' द्वारा प्रकाशित.

(१) चायनीझ क्लासिक्स.

(२) " लाइफ ॲन्ड टीचिंग्ज ऑफ् कॉन्फ्यूशियस "

(३) " चायनीझ क्लासिक्स "

(४) " चायनीझ क्लासिक्स "
सूथिल यांनीं केलेलें भाषांतर. (शांघाय येथील मिशन प्रेसनें प्रकाशित केलेलें.)

जेनिंग्ज कृत भाषांतर 'सर जॉन ल्युबॉक यांच्या हंड्रेड बुक्स' या मालेमार्फत प्रसिद्ध झालेलें.

एल. ए. ल्यायल् कृत भाषांतर (लाँगमन् मार्फत प्रकाशित १९०९)

कु हंग मिंग यांचें भाषांतर (शांघाय येथील 'केली ॲन्ड वाल्श' कंपनीद्वारा प्रकाशित १८९८)

ता. सिओ: 'उच्चज्ञान' यांचें लेगे नें केलेलें भाषांतर. "चायनीझ क्लासिकस" मालेतर्फे प्रसिद्ध झालेलें से. बु. ई. भाग २८ व लीकी भाग ३९ यांतही याचें भाषांतर झालें आहे.

चुंग यंग: (मध्यममत)—या ग्रंथाचें लेगे नें 'चायनीझ क्लासिक्स'च्या पहिल्या भागांत केलेलें भाषांतर.

कु हंग मंग: (आचारधर्म) या ग्रंथाचें "विज्डम ऑफ धि ईस्ट सीरीझ" या मालेतर्फे प्रसिद्ध झालेलें भाषांतर. (मरे १९१२) ली की भाग २८ व से. बु. ई. पृष्ट ३०० ते ३२०. मध्येंही यांचें भाषांतर आलें आहे.

मेन्सीयस् ग्रंथाचें भाषांतर लेगे नें केलेलें, व 'चायनीझ क्लासिक्स'मध्यें प्रसिद्ध झालेलें; मालेच्या प्रथम भागांत.

लेगेचें "लाइफ ॲन्ड वर्कस ऑफ मेन्सियस" हें पुस्तक (१८७५)

फेबर कृत 'माईंड ऑफ मेन्सियस' हा ग्रंथ (बोस्टन १८८२)

सहावा आदर्शग्रंथ

सिआयो किंग: पितृभक्तिप्रतिपादक ग्रंथ से. बु ई. भाग ३ (४५५–४८८)

चैन यांचें ' पितृभक्तिग्रंथ ' हें पुस्तक " विज्डम ऑफ धि ईस्ट " मालेंतील.

कान्फ्यूशियन् धर्मावरील लिखाण

ह्या विषयावर समग्र ग्रंथ असा अजून प्रसिद्ध झालेला नाहीं. पण किरकोळ लेख खालीलप्रमाणें आहेत:—

जाइल्स यांचा " कान्फ्यूशियानिझम अन्ड इट्स रायव्हल्स" हा लेख (१९१५)

लेगे यांचा " धि रिलिजन्स आफ् चायना " हा लेख

सूथिल यांचा " धि थ्री रिलिजन्स् आफ् चायना " हा लेख

डग्लस् यांचा " कान्फ्यूशियानिझम अन्ड टाओइझम " हा लेख (१९११)

टाओ धर्मग्रंथांची भाषांतरें:—

इंग्रजींत ह्या ग्रंथांचीं निदान चौदा निरनिराळीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं आहेत.

टाओ टे किंग भाषांतर से. बु. ई. भाग ३९ (पृ. ४७ ते १२४)

कैरस यांचें " लाओट्झेस, टाओ टे किंग " हें भाषांतराचें पुस्तक. (शिकागो १८९८) याचीच संक्षिप्त आवृत्ति " धि कॅनन् आफ् रीझन अन्ड व्हर्च्यू, बीइंग लाओट्झेस् टाओ टे किंग " या नांवानें १९१३ त प्रसिद्ध झाली आहे.

गॉडर्ड व बोरेल यांचें " लाओट्झ टाओ ॲन्ड वी. वी. " हें भाषांतर. (न्यू यॉर्क १९१९; प्रकाशक बेटानो).

पार्कर यांचें " चायना अॅन्ड रिलिजन् " या नांवानें प्रसिद्ध झालेलें भाषांतर (प्रकाशक डटन. न्यूयॉर्क १९०५) यांचेंच " स्टडीज् इन् चायनीझ रिलिजन् " हें पुस्तक. पृ. ९६–१३१

'टाई शांग कानायींग पीन' हा ग्रंथ

भाषांतर से. बु. ई. मालेंत प्रकाशित भाग ४०; पृ० २३५–२५६ 'ट्रॅक्टेट ऑफ् अक्शन्स अॅन्ड देअर रिट्रिब्यूशन्स " हें भाषांतराचें नांव.

केरस व सुझुकी यांचें "ट्रीटाईझ ऑन् रेस्पॉन्स अॅन्ड रिट्रीब्यूशन (शिकागो; प्रकाशक, ओपन कोर्ट १९०६)

डग्लस 'कान्फ्यूशियानिझम् अॅन्ड टाओइझम' पृ० २५७–२७१

जेम्स वेबुस्टर यांचें "बुक् आफ् रिवार्ड्स्. अॅन्ड पनिशमेंट्स" (शांघाय येथील मिशन प्रेस मध्यें मुद्रित)

वीजर यांचा " मॉरल टेनेट्स अॅन्ड कस्टम्स् इन् चायना " हा ग्रंथ पृ० २४५ २६९ (प्रकाशक होकीन–चीन १९१३).

(कांगूझे (अत्यंत महत्वाचा ग्रंथ; पण धर्मग्रंथ नव्हे)

भाषांतर से. बु. ई. मालेंतील; भाग ३९ (पृ० १२७ २९२)

भाग ४० (पृ० १–२३२)

जाइलसचें " कांगझू " हें भाषांतर (लंडन १८८९)

यांचेंच " म्यूझिंग्ज ऑफ् ए चायनीझ मिस्टिक्" या

नांवानें प्रसिद्ध झालेलें भाषांतर. "विज्डम ऑफ् धि ईस्ट" या मालेंतील (लंडन मरे कंपनी १९११)

टाओ धर्मावरील लेख

या विषयावर समग्र ग्रंथ अजून प्रसिद्ध झालेला नाहीं. पण खालील प्रकरणें पहा.—

डग्लस यांच्या "कान्फ्यूशियानिझम् ॲन्ड टाओइझम" या ग्रंथांतील प्रकरण; (पृष्ठ १७२ ते २८७)

लेग यांच्या " धि रिलिजन्स् ऑफ चायना " या ग्रंथांतील भाग. (पृ० १५७–२३६)

डेग्रूट यांच्या " रिलिजन्स् ऑफ धि चायनीझ " या ग्रंथांतील भाग. (पृ० १३२–१६२)

सूथिल यांच्या "धि थ्री रिलिजन्स् ऑफ चायना" ह्या पुस्तकांतील प्रकरण.

शिंटो धर्मग्रंथ

कोजिगी हा शिंटोचा पुराणवृत्तग्रंथ. भाषांतरकर चेंबरलेन; " ट्रॅन्झॅक्शन्स ऑफ धि एशियाटिक सोसायटी ऑफ जपान " यांत प्रसिद्ध झालेलें भाषांतर.

निहानगी: जपान—वृत्त भाषांतरकार अस्टन. " ट्रॅन्झॅक्शन्स ऑफ धि एशियाटिक सोसायटी ऑफ जपान " यांत प्रसिद्ध झालेलें भाषांतर.

येंगी शिकी: " इन्स्टिट्यूटस ऑफ धि पीरियड ऑफ येंगी " नोरिटो गर्वील वेंचे; " ट्रॅन्झॅकशन्स ऑफ धि एशियाटिक सोसायटी ऑफ जपान " द्वारा प्रसिद्ध झालेले; साटो; भाग ७ वा (१८७९) पृष्ठ ९५ ते १२६

३९३-४३४; भाग ९ वा (१८८१) पृष्ठ १८३ ते २११; फ्लॉरेंझ भाग २७ (१८९९) पृष्ठ १ते११२

मानियो शिऊ " दहा हजार पृष्ठांचा संग्रह " या ग्रंथांतील वेंचे; अस्टन यांनीं काढलेले; " हिस्ट्री ऑफ जपानीझ लिटरेचर " या मालेंत (पृष्ठ ३७ ते ४८) प्रसिद्ध झालेले (ट्रूबनर १८८०)

चेंबरलेन यांनीं "क्लासिकल पोएट्री ऑफ धि जपानीझ" या नांवानें प्रसिद्ध केलेला ग्रंथ.

या शिवाय "लायब्रेरी ऑफ धि वर्ल्डस बेस्ट लिटरेचर" भाग १४ वा पृष्ठ ८१५७-८१६१.

"धि वर्ल्डस ग्रेट क्लासिक्स; ओरिएन्टल लिटरेचर जपानीझ" भाग २पृ० २२३-२६७ (न्यूयार्क प्रेस १८९९)

शिंटो धर्मावरील ग्रंथ

अस्टन यांचा "शिंटो, धि वे ऑफ गॉड्स"हा ग्रंथ. (प्रकाशक: लॉंगमन् १९०५) उपलब्ध ग्रंथापैकीं उत्कृष्ट ग्रंथ.

यांचाच " शिंटो, धि एन्शंट रिलिजन ऑफ जपान" हा ग्रंथ "रिलिजन्स, एन्शंट ॲन्ड मॉडर्न " या मालेंतील(१९१०).वरील ग्रंथाचाच यांत संक्षेप केला आहे

नॉक्स यांचा " डेव्हेलपमेंट ऑफ रिलिजन् इन् जपान". या ग्रंथांतील " शिंटो, धि वे ऑफ धि गॉड्स नॅचरल रिलिजन" हें दुसरें व्याख्यान. (अमेरिकन लेक्चर्स ऑन् धि हिस्ट्री ऑफ रिलिजन्स; प्युटनॅम्स १९०७)

ग्रिफिस यांच्या " धि रिलिजन्स ऑफ जपान " या ग्रंथांतील दुसरें, तिसरें व सातवें व्याख्यान. (स्क्रिब्नर्स१९१२).

अर्नेस्ट साटो यांचा " धि रिव्हायव्हल् ऑफ प्युअर शिंटो " हा ग्रंथ " ट्रन्झॅक्शन्स ऑफ धि एशियाटिक सोसायटी ऑफ जपान " ह्या मालेंतील तिसरा भाग (१८७५) प्रकरण १ लें परिशिष्ट पुनर्मुद्रित १८८३ व १९०५.

होल्टम् यांचा " धि पोलिटिकल फिलॉसॉफी ऑफ मॉडर्न शिंटो; ए स्टडी ऑफ धि स्टेट रिलिजन ऑफ जपान" हा ग्रंथ " धि ट्रॅन्झॅक्शन्स ऑफ धि एशियाटिक सोसायटी ऑफ जपान " या मालेंतील; भाग ४९ वा (१९२२) प्रकरण २ रें पृ० १–३२५

यहुदी धर्मांतील पवित्र ग्रंथः

हा ग्रंथ ' ओल्ड टेस्टॅमेंट ' जुना–करार म्हणून ख्रिस्तीधर्म ग्रंथाबरोबर सर्वांना सुलभतेनें मिळूं शकतो. ह्या ग्रंथाचें लेसर साहेबांनीं फारच काळजीपूर्वक व अविकृत असें भाषांतर केलें आहे. " धि ट्वेंटी-फोर बुक्स ऑफ धि होली स्क्रिप्चर्स" या नांवानें हें भाषांतर प्रसिद्ध आहे. (सीन् सिनाती, ब्लॉश १८८४). दुसरें भाषांतरः यहुदी पंडितांच्या एका मंडळानें मॅसोरेटिक संहितेप्रमाणें केलें आहे. (प्रकाशकः ज्यूइश पब्लिकेशन सोसायटी १९१७; फिलाडेल्फिया)

केन्ट (सी. एफ.) यांनीं " धि स्टूडंट्स ओल्ड टेस्टॅमेंट " या नांवानें पांच भागांत भाषांतर प्रसिद्ध केलें आहे. (प्रकाशक स्क्रिब्नर्स १९०४–१९१४)

जे. मोफाट यांचें ' धि ओल्ड टेस्टॅमेंट; ए न्यू ट्रॅन्स्लेशन ' हें दोन भागांत केलेलें भाषांतर. (प्रकाशक हॉडर व

स्टाउटन् १९२४; अथवा डोरन् १९२४–१९२५)

यहुदी धर्मावरील कांहीं ग्रंथ.

जी. ए बार्टन यांचा ' रिलिजन ऑफ इस्त्राएल ' (म्यॅक्‌मिलन १९१८) हा ग्रंथ.

कोल्हर यांचा ' ज्यूइश थिऑलॉजी; सिस्टेमॅटिकली ॲन्ड हिस्टॉरिकली कन्‌सिडर्ड ' (प्रकाशक: म्यॅक्‌मिलन कं. १९१८) हा ग्रंथ.

जे. पी. पिटर्स यांचा " रिलिजन् ऑफ धि हिब्रूज ' हा ग्रंथ. (जिन्न १९१४).

एच पी. स्मिथ यांचा " धि रिलिजन् ऑफ इस्त्राएल ' हा ग्रंथ (प्रकाशक: स्क्रिब्‌नर्स आणि टी ॲन्ड टी क्लार्क १९१४).

एच्. टी. फाउलर यांचा ' धि ऑरिजिन ॲन्ड ग्रोथ ऑफ धि हिब्रू रिलिजन ' (शिकागो युनिव्हर्सिटी तर्फे प्रकाशित १९१६)

पारशी धर्मांतील पवित्र ग्रंथ.

१ यस्नः ' पूजा ' अथवा ' यज्ञ. '

भाषांतर: मिल्स साहेबांनीं केलेलें. से. बु. ई. मालेंतील भाग ३१ पृ. १ ते ३३२ ए. एच. ब्लीक यांनीं केलेलें. " अवेस्ता; धि रिलिजस बुक्स ऑफ धि पारसीझ, फ्रॉम स्पीगेल्स जर्मन ट्रॅन्स्लेशन. (प्रकाशक अस्टिन हर्टफोर्ड १८८४) भाग २ पृष्ठ २६ ते १४१.

गाथाः झोरास्टरचीं सामगीतेंः–(यस्न ग्रंथाचे सतरा अध्याय ह्या गाथांनीं व्यापले आहेत.)

भाषांतरेंः–(१) जे. एच. मोल्टन यांचें ' अर्ली झोरास्ट्रियानिझम ' या नांवानें प्रसिद्ध. पृष्ट ३४४–३९० (प्रकाशकः विलियम्स ॲन्ड नोर्गेट १९१३)

(२) के. एस्. गुथ्री यांचें भाषांतर; 'धि हिम्स ऑफ झोरास्टर ' (प्रकाशकः ब्रुक्लीन, कम्पॅरिटिव्ह लिटरेचर प्रेस १९१४) यांत मूळ संहिता, भाषांतर, कोश, शब्दसूची वगैरे आले आहे.

(३) एल्. एच्. मिल्स कृत भाषांतर से. बु.ई. ३१ पृ. १ ते १९४

(४) यांचेंच " धि गाथाज ऑफ झोरास्टर इन् मीटर ॲन्ड रिध्म" या नांवानें प्रसिद्ध झालेलें भाषांतर. (ऑक्स्फोर्ड १९००)

२ विस्पराड्ः विश्वेदेवांना आव्हान.

भाषांतरकारः (१) एल्. एच्. मिल्स (से. बु. ई. भाग ३१ पृ. ३३३–३६४)

(२) ए. एच्. ब्लीक (स्पीगल्स अवेस्ता भा. ४ पृ. ५–२४)

३ वाद्देदिः—भाषांतरकारः

(१) डार्मस्टेटर (से. बु. ई. भाग ४ पृ. १–२४०)

(२) ए. एच. ब्लीक (स्पीगल्स अवेस्ता १ः १–१५६)

वरील तिन्ही ग्रंथ पारशी धर्मग्रंथांत महत्वाचे गणले असून त्यांचे अधिकारी पारशी धर्मोपाध्यायच आहेत असें मानतात.

४ यस्त 'पूजामंत्र' भाषांतरकार (१) डार्मस्टेटर (से. बु. ई. २३; २१–३४५) (२) ए. एच. ब्लीक (स्पीगल्स अवेस्ता ३: २१–१३५)

५ खोर्दा अवेस्ता (लघु अवेस्ता) भाषांतरकार; ए. एच. ब्लीक (स्पीगल्स अवेस्ता ३: १–१९२)

पारशी धर्मावरील पुस्तकें

ए. व्ही. डब्ल्यु जॅकसन यांचा 'झोरास्टर, धि प्रॉफेट ऑफ एन्शंट इराण' हा ग्रंथ. (प्रकाशक: म्यॅकामिलन् १९०१)

जे. एच्. मोल्टन यांचा 'अर्ली झोरास्ट्रियानिझम' हा ग्रंथ (प्रकाशक: विलियम्स ॲन्ड नोर्गेट १९१३)

यांचाच "अर्ली रिलिजस पोएट्री ऑफ पार्शिया' हा ग्रंथ (केंब्रिज येथें प्रकाशित १९११)

यांचाच " धि ट्रेझर ऑफ धि मगी; ए स्टडी ऑफ मॉडर्न झोरास्ट्रियानिझम" हा ग्रंथ (ऑक्सफोर्ड १९२७)

एम्. हॉग यांचा "एसेझ ऑन धि सेक्रेड लॅंग्वेज; राइटिंग्ज् ॲन्ड रिलिजन ऑफ धि पारसीझ' हा ग्रंथ (प्रकाशक: ट्रूब्नर १८७८)

एम्. एन्. धल्ला यांचा "झोरास्ट्रियन थिऑलॉजी फ्रॉम धि अर्लीएस्ट टाइम्स टु धि प्रेझेंट टाइम' हा ग्रंथ (न्यूयॉर्क १९१४)

गुथ्री के. एस्. "धि लाइफ ऑफ झोरास्टर इन् धि वर्डस ऑफ हिज ओन हिम्स' हा ग्रंथ. (प्रकाशक: ब्रुक्लीन कम्पॅरिटिङ्ग लिटरेचर प्रेस १९२१)

इस्लाम धर्माचे पवित्र ग्रंथ

भाषांतरें:—(१) "धि कुराण" भाषांतरकार जे. एम. रॉडवेल (एव्हरीमन्स लायब्ररीतर्फे) यांत कालक्रमानुसार कुराणांच्या अध्यायांची पुनारचना केली आहे. हें भाषांतर अत्यंत सुटसुटीत झालें आहे.

(२) "धि कुराण" भाषांतरकार इ. एच. पामर. (से. बु. ई. मालेंतील भाग ६ वा, व ९ वा.) यांत कवितांची संख्या मात्र नीट दाखविलेली नाहीं.

(३) अली महंमदकृत भाषांतर: "धि होली कुराण" अरबी भाषेंत, मूळ भाषांतर व टिप्पणी. (प्रकाशक: इस्लामिक रीव्हू. लंडन १९१७) हे भाषांतर एका सुशिक्षित, उदारमतवादी व भक्तहृदय मुसलमानानें केलें असून त्यांत कुराणाचा नवीन अर्थ केलेला आहे.

(४) मिर्झा अब्दुल फदल यांनीं केलेलें कुराणाचें भाषांतर "धि कुरान; अरेबिक टेक्स्ट ॲन्ड इंग्लिश ट्रन्स्लेशन" (अलहाबाद १९११) भाषांतराचे दोन भाग आहेत.

(५) जॉर्ज सेल यांचें टीकात्मक भाषांतर. प्रथम १७३४ त प्रसिद्ध झालें. आतांपर्यंत याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत.

कुराणाचें वेंचे

एच्. यु. डब्ल्यू. स्टंटन यांचें " टेक्स्ट फार स्टूडंट सीरीझ " या मालेतर्फे प्रसिद्ध झालेलें वेंच्यांचें पुस्तक. (प्रकाशकः सोसायटी फॉर प्रमोटिंग क्रिश्चन नॉलेज; लंडन, म्यॅक-मिलन कंपनी न्यूयॉर्क १९२२)

ई. डब्ल्यु. लेनः—यांनीं काढलेले वेंचे (प्रकाशक ट्रूबनर १८८७; बोस्टन हौउटन् १८७९)

एस्. लेन.—पूल यांचा " स्पीचेस ॲन्ड टेबलटॉक ऑफ धि प्रॉफेट महंमद " हा ग्रंथ. " गोल्डन ट्रेझरी " मालेंतील (लंडन १८८२)

ए. एन्. वोलॅस्टन यांचा " धि रिलिजन ऑफ धि कुरान " हा ग्रंथ. " विज्डम ऑफ धि ईस्ट " या माले मार्फत प्रसिद्ध. (१९११)

ईस्लाम धर्मावरील ग्रंथ

टी पी. ह्यूज यांचा " डिक्शनरी ऑफ इस्लाम " हा ग्रंथ. (प्रकाशकः ॲलन, लंडन १८८५)

एम्. टी. हौत्स्मा—मुख्य संपादक " एन्सायक्लोपिडिया ऑफ इस्लाम ". २५ भागांत. (ल्यूझॅक लंडन १९१३-१९२३)

एच. यू. डब्ल्यु स्टंटन यांचा " धि टीचिंग ऑफ धि कुरान " हा ग्रंथ (प्रकाशकः म्यॅकमिलन कंपनी १९१९)

जे. एल्. बार्टन यांचा " धि क्रिश्चन अप्रोच टु इस्लाम " हा ग्रंथ. (पिल्ग्रिम प्रेस १९१८)

सी. एस. हरग्रोंजे यांचा " मॉहमेडॉनिझम " हा ग्रंथ (प्रकाशक प्युटनॅम्स १९१६)

डब्ल्यू. म्यूर " धि लाइफ ऑफ महंमद " हा ग्रंथ (एडिंबरो ग्रँट १९१२)

एस. एम् झ्वेमर यांचा " इस्लाम " हा ग्रंथ. (प्रकाशकः न्यूयार्क स्टूडंट व्हालंटीयर मूव्हमेंट १९०७)

अल्ली अमीर यांचा " धि स्पिरिट ऑफ इस्लाम " हा ग्रंथ. (प्रकाशक क्रिस्टॉफर्स; लंडन १९१२)

ख्रिस्तीधर्माचे पवित्र ग्रंथ

प्रॉटेस्टंट पंथाच्या लोकांकडून बायबलच्या खालील भाषांतर-ग्रंथांचा प्रामुख्यानें उपयोग होतो:—

राजा जेम्स चें अधिकृत भाषांतर (१६११)

सुधारलेली इंग्रेजी आवृत्ति (१८८५)

सुधारलेली अमेरिकन आवृत्ति (१९०१)

कॅथोलिकपंथाच्या लोकांकडून बायबलाच्या खालील भाषांतर-ग्रंथाचा प्रामुख्यानें उपयोग केला जातो:—

डॉवे बायबल: लॅटिन भाषांतरावरून केलेल इंग्रेजी भाषांतर " धि व्हल्गेट " या नांवानें प्रसिद्ध असलेलें; डॉवे येथें प्रथम प्रसिद्ध झालेला जुना करार (१६०९); येथेंऱ्हीम्स प्रसिद्ध झालेला नवा करार (१५८२)

इतर अर्वाचीन भाषांतरें

जे. बी. रॉदरहॅम यांचें ' धि एम्फसाइज्ड बायबल " नांवाचें भाषांतर. भाग ४ (प्रकाशकः स्टन्डर्ड पब्लिशिंग कंपनी १९०२ सिन् सिनाति या ठिकाणीं)

" अमेरिकन बाप्टिस्ट पब्लिकेशन सोसायटी " द्वारा प्रकाशित (फिलाडेल्फिया १९१२)

सी. एफ्. केंट यांचें " धि हिस्टॉरिकल बायबल " नांवाचें भाषांतर. भाग ६; (प्रकाशक स्क्रिबनर्स १९०८–१९१६)

जे. मोफात यांनीं केलेलें भाषांतर भाग ३; (१९१३–१९२५

बायबलांतील वेंचे

एच्. ए. शेरमन व सी. एफ. केंट यांनीं " धि चिल्ड्रेन्स बायबल " या नांवानें प्रसिद्ध केलेला ग्रंथ. (प्रकाशक; स्क्रिबनर्स १९२२)

आर. जी. मोल्टन यांचा " धि मॉडर्न रीडर्स बायबल " हा ग्रंथ (प्रकाशक मॅकमिलन १९०७)

सी. एफ. केंट व एच. ए. शेरमन यांचा "धि शॉर्टर बायबल" हा ग्रंथ (प्रकाशक स्क्रिबनर्स १९२१)

नव्या कराराचीं अलीकडील भाषांतरें:—

वीस पंडितांनीं केलेलें " ट्वेंटीएथ सेंचरी न्यू टेस्टॅमेंट " नांवाचें भाषांतर. (प्रकाशक रेव्हेल १९०१)

आर. एफ्. वेमाउथ यांचें " मॉडर्न स्पीच न्यू टेस्टॅमेंट " नांवाचें भाषांतर. (बेकर अॅन्ड टेलर, प्रकाशक, १८०४)

जे. मोफात यांचें " ए न्यू ट्रॅन्स्लेशन ऑफ धि न्यू टेस्टॅमेंट " नांवाचें भाषांतर (प्रकाशक: डोरन १९१३)

डब्ल्यु. जी. बॅलेंटाइन यांचें "धि रिव्हर साइड न्यू टेस्टॅमेंट " हें भाषांतर (प्रकाशक: हाउटन, मिफ्लिन १९२३)

इ. जे. गुडस्पीड यांचें " धि न्यू टेस्टॅमेंट " नांवाचें अमेरिकन भाषांतर; (प्रकाशक: शिकागो युनिव्हर्सिटी प्रेस १९२३)

ख्रिस्तीधर्मावरील ग्रंथ

विलियम न्यूटन क्लार्क यांचा " ॲन आउट लाईन आफ ख्रिश्चन थिऑलॉजी " हा ग्रंथ (प्रकाशक स्क्रिब्नर्स व ॲल टी. क्लार्क १८९८)

विलियम्स अडॅम्स ब्राउन यांचा " ख्रिश्चन थिऑलॉजी इन् आउटा लाइन " हा ग्रंथ (प्रकाशक: स्क्रिब्नर्स व टी. ॲन्ड टी. क्लार्क १९०६)

जी. बी. स्मिथ यांनीं " ए गाइड टु धि स्टडी ऑफ धि ख्रिश्चन रिलिजन " (प्रकाशक: शिकागो युनिव्हर्सिटी १९१६)

परिशिष्ट २ रें.

जगांतील विद्यमान अकरा धर्मांचें कोष्टक.

हे धर्म अस्तित्वांत येण्याच्या समयाच्या दृष्टीनें त्यांचा क्रम.

परिशिष्ट

जगांतील विद्यमान

हे धर्म अस्तित्वांत येण्याच्या

धर्माचें नांव.	धर्मांचा उत्पत्तिसमय अथवा त्याच्या संस्थापकाचा जन्मसमय.	संस्थापक.
हिंदुधर्म	१५०० ख्रि. पू.	कोणीही नाहीं
यहुदीधर्म	१२०० ,,	मूझेस्
शिंटोधर्म	अंदाजी ६६० ख्रि. पू.	कोणीही नाहीं
झोरास्ट्रियन उर्फ पारशीधर्म	अंदाजी ६६० ख्रि. पू.	झोरास्टर
टाओधर्म	६०४ ख्रि. पू.	लाओट्झ
जैनधर्म	५९९ ख्रि. पू.	वर्धमान महावीर
बौद्धधर्म	५६० ख्रि. पू.	गौतमबुद्ध
कान्फ्यूशियन धर्म	५५१ ख्रि. पू.	कान्फ्यूशियस
ख्रिस्तीधर्म	ख्रि. पू. ४	येशू ख्रिस्त
महंमद अथवा इस्लामधर्म	५७० इ. स.	महंमद
शीखधर्म	इ. स. १४६९	नानक

२ रें.

अकरा धर्मांचें कोष्टक.

समयाच्या दृष्टीनें त्यांचा क्रम.

देवता	या धर्मांचें आजचें निवासस्थळ कोणतें ?	पवित्रग्रंथ	अनुयायांची संख्या
ब्रह्म अथवा विविध देवता	हिंदुस्तान	वेद	कोटि लक्ष २१—७०
जेहोवा	सर्वत्र विखुरलेला-अर्धभाग रशियांत	जुना करार	१—१०
निसर्ग—देवता	जपान	कोजिकी व निहानगी	१—६०
अहुरमझ्द	इराण व हिंदुस्तान	अवेस्ता	१ लाख
टाओ	चीन	टाओ टे-किंग	कोटि ४—३०
मूळ कोणीही नाहीं. आतां महावीर	हिंदुस्तान	अंगग्रंथ	१० लाख
मूळ कोणीही नाहीं. आजकाल बुद्ध	पूर्व	त्रिपिटक	कोटि १३—७०
स्वर्ग अथवा कान्‌फ्यूशियस्	चीन	आदर्श-ग्रंथ	२५......
परमेश्वर -पिता	सर्व जग	बायबल	५५—७०
अल्ला	मुसलमान देश	कुराण	२३......
सत् नाम	हिंदुस्तान	ग्रंथबावा	३० लाख

परिशिष्ट २ रें

तुलनात्मक धर्मशास्त्राच्या अभ्यासकाला उपयुक्त अशा प्रश्नांचा (प्रस्तुत ग्रंथाच्या आधारें) संग्रह.

१ ह्या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणांत धर्मांचा अभ्यास करण्याचे नऊ प्रकार सांगितले आहेत; ह्या नवाखेरीज आणखी कांहीं उपयुक्त प्रकार सांगता येतील काय ?

२ आपल्या जन्मभूमींत, मुख्यतः, नांदत असलेले असे कोणते धर्म आहेत ?

३ आपल्या जन्मभूमीच्या बाहेर प्रसृत झालेले असे नांव घेण्या-सारखे धर्म कोणते ?

४ पूर्वभावी धर्मांच्या आधारावर कोणते धर्म अस्तित्वांत आले ? अशा धर्मांनीं कोणत्या बाबतींत पूर्वभावी धर्मांचें ऋण घेतलें आहे ? व त्याचा परिणाम त्या त्या धर्मावर काय झाला ?

५ इतर धर्मांशीं स्पष्ट विरोध करण्याच्या हेतूनें कोणते धर्म अस्तित्वांत आले ? असे धर्म कोणत्या बाबतींत पूर्वधर्मांशी विरोधी होते ? व त्या विरोधाचा परिणाम काय झाला ?

६ प्राग्भावी धर्मांतून ग्राह्यांश घेण्याच्या उद्देशानें प्रेरित होऊन त्याप्रमाणें आपल्यांत योग्य ते फरक करणारे असे धर्म कोणते ? कोणत्या बाबतींत त्यांनीं असा फरक केला ? व त्याचा परिणाम काय झाला ?

७ प्राग्भावी धर्मांत सुधारणा करण्याचे उद्देशानें पांच धर्म अस्तित्वांत आले. ते पांच धर्म कोणते ? त्यांनीं प्राग्भावी धर्मांतील घेतले काय व सोडले काय ?

८ आपल्याला पितृस्थानीं असलेल्या धर्माहून इतर धर्मांचें ऋण घेणारे असे धर्म कोणते ? त्यांनीं आपल्या विकासावस्थेंत इतर धर्मांचें कोणतें ऋण घेतलें ?

९ आपल्या विकासाचे अवस्थेंत इतर धर्मांशीं संबंध येऊनही त्यांचा आपल्यावर परिणाम होऊ न देणारे असे धर्म कोणते ? त्यांनीं इतर धर्माचा आपल्यावर प्रभाव पाडू दिला नाहीं हें कसें ? व त्याचा परिणाम काय झाला ?

१० संस्थापकाच्या मूळ आदर्शापासून ढळढळीत च्युत होणारे असे धर्म कोणते ? कोणत्या बाबतींत ते च्युत झाले ?

११ मूळ संस्थापकाच्या आदर्शांत स्पष्ट सुधारणा कोणत्या धर्मांनीं केली ? व कोणत्या बाबतींत केली ?

१२ आपल्यांत सुधारणा करण्याचा कोणत्या धर्मानीं बुद्धिपुरःप्रयत्न केला ? व कोणत्या बाबतींत केला ?

१३ पंथ, उपपंथ झाल्यानें धर्मांना लाभ आणि हानि झाल्याचीं उदाहरणें दाखविता येतील कां ?

१४ जुन्या करारातील कोणतीं तत्वें ख्रिस्तीधर्मानें कायम ठेविलीं आहेत ? कोणतीं अजिबात टाकून दिलीं आहेत ? कोणत्या तत्त्वांत फरक केला आहे ? कसा केला आहे ? हल्लींच्या ख्रिस्तीधर्माच्या शिकवणुकींत असें काय आहे कीं, तें जुन्या अथवा नव्या करारांत मुळींच नव्हतें ?

१५ इतर धर्मांच्या पवित्र ग्रंथाशीं ज्यांचें साम्य दाखविता येईल, अशा कोणत्या कविता बायबलांत आहेत ?

१६ ख्रिस्तीधर्मांत स्पष्टरीतीनें सांगितलीं नसलेलीं अथवा सूचित नसलेलीं अशीं कोणतीं धर्मतत्वें इतर धर्मांपासून ख्रिस्त धर्मीयांना शिकता येतील ?

१७ ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्या चातुर्वर्ण्यांतील कोणाही हिंदूला आचारधर्मांतील कोणत्या लाभाला मुकावें लागेल ? परधर्मस्वीकारानें त्याला नवीन लाभ (धर्म दृष्ट्या) कोणता होईल ?

१८ जपानी राष्ट्रानें अथवा त्यांतील एखाद्या पंथानें ख्रिस्तीधर्म स्वीकारला तर त्याला कोणत्या परंपरागत लाभाला मुकावें लागेल ? अथवा धर्मदृष्ट्या त्याला नवीन लाभ कोणता होईल ?

१९ ख्रिस्तीधर्मस्वीकारानें स्वतःच्या धर्मभावनेंत व आचारांत जास्तींत जास्त फरक करावा लागेल अशी स्थितीं कोणत्या धर्मांतल्या लोकांची होईल ? कमींत कमी फरक कोणत्या धर्मांतल्या लोकांना करावा लागेल ? तुमच्या उत्तराची भूमिका काय तें सांगा ?

२० एखाद्या कान्फ्यूशियन धर्माच्या माणसानें ख्रिस्तीधर्म स्वीकारला तर त्याला आपल्या पारंपरिक धर्मसमजुती-पैकीं कोणत्या सोडाव्या लागतील ? कोणत्या ठेवता येतील ? कोणत्या धर्मसमजुती नव्यानें त्याला मिळतील ?

२१ वरील (२० तील) तिन्ही पोट प्रश्नांना ख्रिस्तेतर सर्व धर्मांच्या दृष्टीनें उत्तरें द्या.

२२ येशूख्रिताच्या कोणत्या धर्मानुभवांशी इतर धर्मांच्या संस्थापकांना आलेल्या अनुभवाचें साम्य आहे ?

२३ येशूख्रिस्तापूर्वीच्या १२ शतकांत व नंतरच्या १५ शतकांत होऊन गेलेल्या इतर धर्मांच्या संस्थापकांपैकीं येशूख्रिस्तापेक्षां श्रेष्ट असा संस्थापक कोण ? व कोणत्या मौलिक बाबतींत त्याचें श्रेष्ठत्व आहे ?

२४ इतर-धर्म-संस्थापकांच्या चरित्रांत येशूख्रिस्ताच्या चरित्रांच्या दृष्टीनें कोणत्या मौलिक सुधारणा सुचवाल ?

२५ परमेश्वराविषयींच्या कल्पनेनें व्यक्तींचें जीवन समृद्ध व उपयुक्त करणारे असे धर्म कोणते ? जीवन समृद्ध करणारे म्हणजे काय ?

२६ मानवव्यक्ति व मानवसमाज याविषयींच्या कल्पनेनें समाजाची उन्नति करणारे असे धर्म कोणते ? तुमच्या उत्तराची भूमिका स्पष्ट करा.

२७ राजकीय दृष्ट्या लोकसत्तेला अनुकूल असे कोणते धर्म आहेत ? लोकसत्तेच्या तत्त्वाशी सर्वथैव विरोधी धर्म कोणते ? कारणें देऊन प्रश्नांची उत्तरें द्या.

२८ निरानिराळ्या देशांत नांदत असलेल्या धर्मांनीं त्या त्या देशाची सुधारणा करण्यांत किती साहाय्य केलें ? कोणत्या विशिष्ट तत्त्वांनीं हें साहाय्य केलें ?

२९ मूळ संस्थापकाच्या तत्त्वांशीं विरोध न करतां बदलत्या परिस्थितीच्या दृष्टीनें प्रगति करतां येईल काय ? आल्यास कोणत्या रीतीनें ?

३० विशिष्ट सुधारणेला स्थिरपद करणाऱ्या मुख्य धर्मभावना कोणत्या ?

३१ यापुढें कोणते धर्म नष्ट होण्याचा संभव आहे ? नष्ट होणार असल्यास कां ?

३२ एखाद्या धर्माला जिवंत व तेजस्वी ठेवायला कारणीभूत अशीं तत्त्वें कोणतीं ?

३३ एखाद्या धर्मास संपूर्ण जागतिक धर्माच्या पदवीला नेणारीं अशीं कोणतीं आवश्यक तत्त्वें आहेत ?

३४ यापुढें एखादा नवा धर्म स्थापावयाचा झाल्यास त्याचें अभिधान कोणतें असावें ?

विषय नाम व सूची

विषय अथवा नाम	पृष्ठ
अकबर	९१
अजयदेव	९०
अॅनॅलेक्ट्स्	१९४
अमरदास	१७९
अमोघवर्ष	९०
अमृतसर	१०६
अर्जुन	१७९
अर्नोल्ड मॅथ्यू	८,१६६
अवेस्ता	३४५
अल्ला	३८३
अल्लाउद्दिन	९१
अशोक	८८
आंग्रमैन्यु	३५०
आत्माराम पांडुरंग डॉ.	५९
आदर्शसाहित्य	२०४
अब्राहाम	३०३
अमॉस	३०८
आर्यसमाज	५९
ऑस्टन	२६७, २६९
अहुरमझ्द	३४८
इझरा	३१७
ईसा	३१५
ईसाई	६९
ईसो	२७८
उपनिषदें	४०
ऊकेमोची	२७८
ऋग्वेद	३५
एझेकील	६९, ३१३
ओल्डनबर्ग	१२१
अंगद	१७९
अंगुत्तरनिकाय	१२१
अंड्रे	३७९
अंतिमनिर्णयदिन	३८९
कॅंट एमॅन्युएल	८
कड	२९१
कबीर	५८
काकेही	२९४
'कान्फ्यूशियस'	१९४
त्याचें जीवनचरित्र	१९४
यशस्वी उपदेशक	१९५
यशस्वी अधिकारी	१९५
धर्मोपदेशार्थ संचार	१९६
शेवटची वाङ्मयकृति	१९७

विषय अथवा नाम	पृष्ठ
त्याच्याविषयीं पूज्यभाव	१९८
त्याचें नीतिशास्त्र	२०७
त्याची देवताविषयक कल्पना	२१०
पितृपूजा	२१६, २१७
कुन्ह	८९
कुमारपाल	९०
कुरल	५४
कुराण	३८०, ८१, ८२, ८३
केरस	२३४, २४७
कोजिकी	२६३, ६४, ६५
कोर्ट	१८२, ८४
कांगझे	२५१
खलीफात	३९६
खालसा संगत	१७८
गीता	४६, ४७ ४८, ४९
गेब्रिएल	३८७
गोविंदसिंग	१८१
गौतमबुद्ध	५४
त्याचें जीवनचरित्र	१०२
मोक्षसाधना	१०५
दिव्य ज्ञान	१०५
धर्मप्रचार	१०७
त्याचेविषयीं पूज्यबुद्धि	११०
त्याचें दिव्यत्व	११३
त्याचें नीतिशास्त्र	११५
त्याचें निर्वाण	१२३
चातुर्वण्य	३९
चार वेद	३४
चिनवट	३५८
चेंबरलेन	२९६
चैतन्य	५७
जॅक्सन	३४१
जनतेंतील हिंदुधर्म	५१
जनमसाखी	१४७
जलालउद्दिन रुमी	३९८
जाइल्स	३०३
जातिसंस्था	३२
जॉन धि बॅप्टिस्ट	४०५
जीझस क्राइस्ट	४०४
त्याचें जीवनचरित्र	४०४
बालपण	४०५
उघड उपदेश	४०६
उपदेशाची पद्ध	४०८
विलक्षण अंत	४१०
स्वभाव	४११
त्याचे विषयीं पूज्यभाव	४१५
जिन्न	३८७
जिनसेन	९०
जेम्स विलियम्स	९

विषय अथवा नाम	पृष्ठ
जेरेमिया	६९
जेहोवा	३०७
जैन धर्मग्रंथ	७७
जैन धर्मातील पंथ	८६
जोशुआ	३१७
झेपारिया	३१७
झेरुबाबेल	३१७
झेंद	३७६
झैनाव	३७६
झोरास्टर	३३५
त्याचें जीवन चरित्र	३३५
जन्मसमयीचे चमत्कार	३३५
त्यांचे आत्मसमर्पण	३३८
धर्म प्रसार	३४०
कुटुंब	३४१
धर्म युद्ध	३४२
विषयीं पूज्यभाव	३४३
स्वभाव	३४३
झोरास्टर धर्मातील पवित्रग्रंथ	३४५
ट्रूंप	१४९,१५२,१५४
	१५५,१५६,१६०
	१७२,१७३,१७४
	१७५,१८४,१७५
	१८७

विषय अथवा नाम	पृष्ठ
टाओ	२२९
टाओ-टे-किंग	२३९
टाओधर्म, आधुनिक	२५६
टाओ धर्मग्रंथ	२३८
डगलस	२०३
	२२९,२४४
डथुबाय्	२५८
डेव्हिड ऱ्हाइस	१०१,११८,१२७
तिरुवल्लवर	५४,९०
त्रिपिटक	१२६
तीर्थंकर	९४
तुळशीदास	५८
तेगबहादूर	१८०
दयानंद सरस्वती	१५९
दादू	५८
देवतांची विशिष्ट लक्षणें	४
द्वैतमत	५५
धम्मपद	१२०
धर्माचीं विविध स्वरूपें	२
धर्माच्या अभ्यासाचे विविध मार्ग	१२
धर्माचें कार्य	२
धर्माच्या व्याख्या	७
नवा करार	४१९
नानक	५७
त्याचें जीवनचरित्र	१४७

विषय अथवा नाम	पृष्ठ
वैवाहिक जीवन	१४९
परमेश्वराचा आदेश	१५०
धर्मप्रचार	१५२
अद्भुत मृत्यु	१५८
त्याचेविषयीं पूज्यभाव	१५९
नानकानें केलेले चमत्कार	१६३
नानकारा	१४९
नालदियार	८९
निद्दानगी	२६२
नेहेमिया	३१७
नोरीटू	२६६
परमेश्वर पिता	४२७, ४२८
पॅलेस्टाइन	३००
पारस्परिकाचार	२०८
पॉल	७०, १५५
पुराणें	४९
पोपचें वर्चस्व	४२१
प्रार्थना समाज	५९
बरेल	१७
बायबल	४०२, ४०३
बील	८९
बुशिडो	२८८
बेझंट	१८
बौद्धपंथ	११३
बौद्धसंघ	१२४

विषय अथवा नाम	पृष्ठ
ब्रम्हसमाज	५८
ब्राऊन ॲडॅम्स	१०
ब्राम्हणग्रंथ	३७
ब्रिक्के	२९१
मॅकनिकल	५७
मॅकलिफ	१४९, १६१
माणिक्कवसागर	५४
मध्वाचार्य	५५
मनुस्मृति	४३, ४४
मॅनोशियू	२६६
मबूची	२९१
मर्दन	१५३
महावीर	४३, ७०, ५३
चरित्र	७०
तपश्चर्या	७३
नवधर्माचा उपदेश	७४
भक्ति	७५
महंमद	
जीवनचरित्र	३६७
धर्मज्ञानाचा प्रयत्न	३६८
दृष्टान्त	३६९
हिजरी	३६९
मदीना येथें धर्म स्थापना	३७०
मक्केंत सत्ता	३७२
त्याचा स्वभाव	३७२

विषय अथवा नाम	पृष्ठ
त्याचेविषयीं पूज्यभाव	३७७
मार्टर जस्टिन	३०
मार्कर श्लील	८
मिका	३११
मिकाडोंची पूजा	३७२, ७३
मिमाकी	३७५
मीरखंद	३७९
मूर	२०२
मूर्तिपूजा	५०
मेन्झीज ॲलन	९
	९९,१२८
मेसा	३२२
मेन्सियस्	१९४,१९७
मैत्र, हरींद्रनाथ	१९
मोझेस	३०४
मोतुरी	२९२
मोल्टन	३३८,३४०,३४१
म्यूर	३६८
युवनशिकाई	२०२
रमदान	३९४
रॉडवेल	३७४
रामदास	१७९
राममोहनराय	५८
रामानुजाचार्य	५५
रामानंद	५६
रायनाक	१६
रेम्यूसा	२४५
रेव्हिल अल्बर्ट	६
लाओत्झे	२२७
जीवन चरित्र	२२७
त्याचा स्वभाव	२३१
त्याच्या विषयीं पूज्यभाव	२३४
नीति कल्पना	२४८
लीकी	२२२
लेगे	२१४,२२५
वरुण	३६
वॉरन	१०२,१०५,१०७
	११०,११२,११३
	१२९
विलियम्स मॉनिअर	४४,९९,१२१
विशिष्टाद्वैत	५५
वेंदिदाद	३५४-५५
वैद्य ग. भा.	५९
वैष्णव पंथ	५०
व्हिन्सेंट स्मिथ	७९,९१
शतपथब्राह्मण	३८
शिखांचा दीक्षाविधि	१८१
शिया पंथ	३९७

विषय अथवा नाम	पृष्ठ
शैवपंथ	४०
सत्नाम	१७३
साटो	२६६
सुनी पंथ	३९७
सूधिल	२३६
सेवारामसिंग थापर	१६६
सैतान	३८८
संभ्राली	८८
स्क्रिब्नर एडवर्ड	९
स्टीव्हन्सन्	७८, ८८
स्ट्रेटन, डब्ल्यू	१०
स्पेंतामन्यु	३५२
हबक्कूक	३१२
हरकृष्ण	१८०
हरगोविंद	१८०
हरराय	१८०
हवेल	५५
हगाई	३१७
हॉपकिन्स	५७
हिटोमारो	२९५
हिडास्पीस	१४७
हिराटा	२९३
हेमचंद्राचार्य	९०
हेसिंग	२४१
हेस्टिंग	१६०
हेस्टिंग्ज	२३४
होल्टोम	२६९, २९४
होसिया	३०९
ह्यूएनत्संग	१२९

शुद्धिपत्र.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
९	७ वी	जुना	खेदा
११	११ वी	एक तऱ्हेचा	एकाच तऱ्हेच्या
२७	८ वी	सुमारे हजार	सुमारें तीन हजार
,,	१४ वी	उत्पन्न झालेला शूद्र	शूद्र उत्पन्न झाला.
,,	२० वी	शाी	अशी
५१	२०	सेवन करता	सेवन न करता
५५	५ वी	धर्मोपदेश	धर्मोपदेशक
५८	२ री	ग्रंथवाक्या	ग्रंथबाबा
६७	६ वी	लागलें	लागतें
९६	१६ वी	दिसून	असून
११३	५ वी	कल्पना,	कल्पना तरंगमय
११६	३ री	संयमानानें	संयमानें
१२३	१९ वी	'पण' हा शब्द	काढून टाका
२९५	शेवटून २ री	दड	दृढ
३२८	९ वी	परमेश्वराविरुद्ध पाप करण्याची नैतिक कल्पना	परमेश्वराविरुद्ध पाप ही कल्पना।